(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

March -2021

ISSUE No- (CCLXXV) 289 (A)

## आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive Editor**
Dr. Vanmala Govindrao Gundre
Principal
Yeshwantrao Chavan College,
Ambejogai, Dist.- Beed

**Editor**
Dr. Anant Dadarao Markale
Head, Dept. of Hist.
Yeshwantrao Chavan College,
Ambejogai, Dist.- Beed

**The Journal is indexed in:**

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

Aadhar International Publication Amaravati

**Website** – www.aadharsocial.com **Email** – aadharsocial@gmail.com.

**Impact Factor – 7.675** **ISSN – 2278-9308**

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refreed Indexed

### Multidisciplinary International Research Journal

# March -2021

**ISSUE No- (CCLXXV ) 289 ( A)**

## आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान

**Prof. Virag.S.Gawande**
Chief Editor
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

**Dr. Vanmala Govindrao Gundre**
Executive Editors
Principal
Yeshwantrao Chavan College, Ambejogai, Dist.- Beed
**Dr. Anant Dadarao Markale**
Editor
Head, Dept. of Hist.
Yeshwantrao Chavan College, Ambejogai, Dist.- Beed

## Aadhar International Publication

For Details Visit To : **www.aadharsocial.com**

**© All rights reserved with the authors & publisher**

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –7.675,Issue NO, 289 (CCLXXXIX )
ISSN : 2278-9308
March, 2021

प्राचार्य मनोगत...



यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई जि. बीड, येथील इतिहास विभागाच्यावतीने दिनांक १२ मार्च २०२१ रोजी 'आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान' या मुख्य विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते.

मराठवाडा विभाग अन्य विभागाच्या तुलनेत सामाजिक, आर्थिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रदेश म्हणून ओळखला जातो, आजही हे चित्र फारसे पालटलेले नाही. स्वाभाविकपणे ही गरज लक्षात घेऊन 'तमसो मा ज्योतिर्गमय' या ब्रीद पूर्ततेसाठी मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना औरंगाबाद येथे १९५९ या वर्षी करण्यात आली. आजघडीला प्राथमिक शिक्षण ते पदव्युत्तर शिक्षण, विविध विषयातील संशोधन कार्य संस्थे अंतर्गत सुरू आहे. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या मार्गदर्शनाखाली अंबाजोगाई येथे यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाची स्थापना १९७२ मध्ये करण्यात आली. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ हे महाविद्यालयाच्या स्थापनेचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. अगदी प्रारभिंक वर्षापासून ते आजतागायत आमच्या महाविद्यालयाने या परिसरातील शेतकरी, कष्टकरी वर्ग व शिक्षणापासून वंचित घटकांना प्रामुख्याने शिक्षण देण्याचा, त्यांना स्वावलंबी करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. परिणामी यशवंतराव चव्हाण महाविद्यालय हे अंबाजोगाई शहर व परिसरामध्ये या भूमिकेमुळे एक स्वतंत्र ओळख निर्माण करण्यात यशस्वी ठरले आहे. आमच्या महाविद्यालयाने शैक्षणिक कार्यासोबतच सामाजिक, संस्कृती, साहित्य व संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. नॅक मानांकन व मूल्यांकनमध्ये B++ ग्रेड दर्जा महाविद्यालयास प्राप्त आहे.

इतिहास विभागात कार्यरत असलेले विभागप्रमुख प्रा. डॉ. अनंत दादाराव मरकाळे यांनी इतिहास विषयामध्ये महत्त्वाचे उपक्रम सातत्याने राबविले आहेत. त्याचाच भाग म्हणून दिनांक १२ मार्च २०२१ रोजी 'आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान' या विषयावर एक दिवसाचे राष्ट्रीय वेबिनार आयोजित करून ते यशस्वीरित्या संपन्न केले. या अंतर्गत ९० पेक्षा अधिक संशोधकांनी आपले संशोधन पेपर आमच्या महाविद्यालयास सादर केले. हे सर्व संशोधन पेपर आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिका 'B. Aadhar' मधून प्रकाशित करण्यात आले. या महत्वपूर्ण उपक्रमासाठी मी त्यांचे हार्दिक अभिनंदन करते व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देते. धन्यवाद...

**डॉ. वनमाला गुंडरे (रेड्डी)**
प्राचार्य
यशवंतराव चव्हाण महाविदयालय, अंबाजोगाई,
जि.बीड,



संपादकीय मनोगत...

यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई, येथील इतिहास विभागाच्यावतीने दिनांक १२ मार्च २०२१ रोजी 'आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान' या मुख्य विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते.

इतिहास विषयामध्ये संशोधन विकासाच्या अनुषंगाने इतिहास विभागाच्या वतीने महाविद्यालयात विविध उपक्रम राबविण्यात येतात. या अंतर्गत विविध विषयांवर राष्ट्रीय पातळीवर वेबिनार, सेमिनार व परिषदा आयोजित करण्यात येतात. यामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा जाणीवपूर्वक समावेश केला जातो. 'आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान' या मुख्य विषयावर आधारित एक दिवसीय राष्ट्रीय वेबिनार चे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रामुख्याने सुप्रसिद्ध जेष्ठ पत्रकार डॉ. उल्हास उढाण औरंगाबाद हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून निमंत्रित होते. या अंतर्गत यशवंतराव चव्हाण यांनी शिक्षण, ग्रामीण विकास, सहकारी चळवळ, पंचायत राज, कृषी, उद्योग, साहित्य व संस्कृती अशा विविध क्षेत्रात केलेल्या कार्यावर महत्वपूर्ण सविस्तर चर्चा घडवून आणण्यात आली. विचारमंथन झाले. वेबिनारच्या निमित्ताने महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयातील प्राध्यापक, अभ्यासक, संशोधकांना या मुख्य विषयाला अनुसरून अथवा त्यानुषंगाने असलेल्या उपविषयावर शोध निबंध लिहिण्याची विनंती करण्यात आली होती. त्यास प्रतिसाद म्हणून जवळपास ९० पेक्षा अधिक शोध निबंध आमच्या महाविद्यालयात प्राप्त झाले. या सर्व शोधनिबंधातून सदरील विषय अतिशय सखोल व विविध अंगाने चर्चिला गेला. लिखित स्वरूपात पुढे आला. ही बाब इतिहास विषयामध्ये संशोधन समृद्धीच्या, विकासाच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण पाऊल आहे, असे आम्हास मनोमन वाटते.

प्राप्त झालेले सर्व शोधनिबंध आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिका 'B. Aadhar' या माध्यमातून प्रकाशित करण्यात आले. या प्रकाशनासाठी व वेबिनार आयोजित करण्यापासून महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य डॉ. वनमाला गुंडरे यांनी केलेले मार्गदर्शन व सहकार्य मौलिक स्वरूपाचे होते. याबद्दल त्यांचे इतिहास विभागाच्या वतीने हार्दिक आभार व्यक्त करताना आनंद वाटतो आहे. उपप्राचार्य डॉ. रमेश शिंदे, IQACविभाग प्रमुख प्रा. डॉ. मुकूंद राजपंखे यांचे मार्गदर्शन लाभले या दोहोंचे ही मन:पूर्वक आभार. 'B. Aadhar' चे संपादक प्रा विराग गावंडे यांचेही आभार व्यक्त करतो. ह्या वेबिनार व संशोधन पेपर पाठविण्याच्या प्रक्रियेत ज्यांनी आवर्जून सहभाग घेतला, त्या सर्व शिक्षक, अभ्यासक, संशोधक बंधू-भगिनींचे हार्दिक आभार व्यक्त करतो. त्यांना धन्यवाद देतो...

**प्रा. डॉ. अनंत दादाराव मरकाळे**
इतिहास विभाग प्रमुख
यशवंतराव चव्हाण महाविदयालय, अंबाजोगाई,
जि.बीड,

# Editorial Board

**Chief Editor -**

**Prof.Virag S.Gawande,**
**Director,**
Aadhar Social Research &,
Development Training Institute, Amravati. **[M.S.] INDIA**

## Executive-Editors -

- **Dr.Dinesh W.Nichit** - Principal, Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage, **Walgaon.Dist. Amravati.**
- **Dr.Sanjay J. Kothari** - Head, Deptt. of Economics, G.S.Tompe Arts Comm,Sci Collage Chandur Bazar Dist. Amravati

## Advisory Board -

- **Dr. Dhnyaneshwar Yawale** - Principal, Sarswati Kala Mahavidyalaya , Dahihanda, Tq-Akola.
- **Prof.Dr. Shabab Rizvi** ,Pillai's College of Arts, Comm. & Sci., New Panvel, Navi Mumbai
- **Dr. Udaysinh R. Manepatil** ,Smt. A. R. Patil Kanya Mahavidyalaya, Ichalkaranji,
- **Dr. Sou. Parvati Bhagwan Patil** , Principal, C.S. Shindure College Hupri, Dist Kolhapur
- **Dr.Usha Sinha** , Principal ,G.D.M. Mahavidyalay,Patna Magadh University.Bodhgay Bihar

## Review Committee -

- **Dr. D. R. Panzade,** Assistant Pro. Yeshwantrao Chavan College, Sillod. Dist. Aurangabad (MS)
- **Dr.Suhas R.Patil** ,Principal ,Government College Of Education, Bhandara, Maharashtra
- Dr. **Kundan Ajabrao Alone** ,Ramkrushna Mahavidyalaya, Darapur Tal-Daryapur, Dist-Amravati.
- **DR. Gajanan P. Wader** Principal , Pillai College of Arts, Commerce & Science, Panvel
- **Dr. Bhagyashree A. Deshpande**, Professor Dr. P. D. College of Law, Amravati]
- **Dr. Sandip B. Kale,** Head, Dept. of Pol. Sci., Yeshwant Mahavidyalaya, Seloo, Dist. Wardha.
- **Dr. Hrushikesh Dalai** , Asstt. Professor K.K. Sanskrit University, Ramtek

*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responcible for originality of the papers and intensive thoughts in the papers.*

- **Executive Editor**

**Published by -**

**Prof.Virag Gawande**
**Aadhar Publication ,**Aadhar Social Research & Development Training Institute, New Hanuman Nagar, In Front Of Pathyapustak Mandal, Behind V.M.V. College,Amravati
( M.S ) India Pin- 444604 **Email :** aadharpublication@gmail.com
**Website :** www.aadharsocial.com **Mobile :** 9595560278 /

# INDEX


| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | यशवंतराव चव्हाण एक अष्टपैलू व्यक्तीमत्व | प्रा.अरूण महादेव राख | 1 |
| 2 | यशवंतराव चव्हाण यांचे सहकार विषयक विचार व कार्य | प्रा.तानाजी जाधव | 6 |
| 3 | यशवंतराव चव्हाण यांच्या राजकारणाची दिशा आणि परिपूर्ती | डॉ. नामानंद गौतम साठे | 11 |
| 4 | यशवंतराव चव्हाणांचे शैक्षणिक क्षेत्रातील कार्य | प्रा. डॉ. शिवाजी गोविंदराव दिवाण | 14 |
| 5 | यशवंतराव चव्हाण यांचे महाराष्ट्रातील कृषी क्षेत्रातील योगदान | कु.भाग्यश्री श्रीकृष्णराव गाडगे | 17 |
| 6 | यशवंतराव चव्हाण आणि पंचायत राज व्यवस्था | प्रा.डॉ.लोखंडे बी.बी. | 21 |
| 7 | आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार : यशवंतराव चव्हाण | प्रा.डॉ.रत्नाकर रामराव कांबळे | 24 |
| 8 | एक अष्टपैलू व्यक्तिमत्व: | प्रा.डॉ.भास्कर गायकवाड | 28 |
| 9 | जानतं नेतृत्त्व : यशवंतराव चव्हाण | डॉ. भुजंग विठ्ठलराव पाटील | 32 |
| 10 | यशवंतराव चव्हाण यांच्या साहित्यातील वाङ्मयीन आणि वैचारिक सौंदर्य | प्रा.मोहन बाबुराव चव्हाण | 35 |
| 11 | यशवंतराव चव्हाण अष्टपैलू व्यक्तीमत्व | प्रा.डॉ. विजेंद्र श्रीकृष्ण पुराणीक | 39 |
| 12 | यशवंतराव चव्हाण यांचे आर्थिक विचार" | प्रा.डॉ.चांगुणा विठ्ठल कदम | 42 |
| 13 | यशवंतराव चव्हाण यांचे लोकशाही विकेंद्रीकरण व प्रशासन विषयक विचार | श्रद्धा मोहन पवार | 46 |
| 14 | यशवंतराव चव्हाण यांचे विसापूर कारागृहातील दिवस | डॉ. वाजगे नवनाथ दत्तात्रय | 52 |
| 15 | यशवंतराव चव्हाण यांचे सांस्कृतिक क्षेत्रातील कार्य. | डॉ.सुरेश एन.काळे | 56 |
| 16 | महाराष्ट्राच्या विकासात यशवंतराव चव्हाण यांची भूमिका | प्रा.डॉ.केशव अंबादास लहाने | 60 |
| 17 | यशवंतराव चव्हाण— व्यक्ती व कार्य | डॉ. अतुल नारायण खोटे | 64 |
| 18 | यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक कार्य | प्रा.डॉ.संजय बाबुराव वाकळे | 68 |
| 19 | यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय क्षेत्रातील कार्य | प्रा. निखिल गणेश जगताप | 72 |

| | | |
|---|---|---|
| 20 | यशवंतराव चव्हाण यांचे शिक्षण विषयक कार्य : ऐतिहासिक विश्लेषण' डॉ नितीन उल्हासराव सराफ | 76 |
| 21 | यशवंतराव चव्हाण यांचे परराष्ट्र धोरण एक चिंतन डॉ.महेश मोटे | 80 |
| 22 | यशवंतराव चव्हाण यांचे आर्थिक विचार डॉ. अशोक भाऊराव माळशिखरे | 88 |
| 23 | यशवंतराव चव्हान व्यक्ती व कार्य सौ.सरिता दशरथ देशमुख | 92 |
| 24 | अष्टपैलू यशवंतराव चव्हाण डॉ. महेश प्रल्हादराव गोमासे | 97 |
| 25 | अष्टपैलू यशवंतराव चव्हाण" डॉ.सविता ज्ञानेश्वर वावगे | 100 |
| 26 | समृद्ध महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण डॉ. गोरखनाथ पांडुरंगराव फसले | 105 |
| 27 | सामर्थ्यशाली भारत– नेतृत्व यशवंतरावजी चव्हाण डॉ.भांगे चंद्रकांत बन्सीधर | 112 |
| 28 | महामेरू यशवंतराव चव्हाण एक अष्टपैलू व्यक्तिमत्व डॉ. डी. डी. कोल्हेकर | 116 |
| 29 | यशवंतराव चव्हाण यांचे शिक्षणविषयक विचार **प्रा. डॉ. संजय कांबळे** | 121 |
| 30 | यशवंतराव चव्हाण यांचे पंचायत राज व सहकार क्षेत्रातील कार्य डॉ. बबन आमले | 124 |
| 31 | यशवंतराव चव्हाण आणि बहुजनांचे सक्षमीकरण डॉ भारत विकल्याणकर /डॉ. प्रविण सु.सदार | 128 |
| 32 | साहित्यप्रेमी यशवंतराव चव्हाण प्रा.डॉ.बडुरे राजू सायन्ना | 132 |
| 33 | यशवंतराव चव्हाण यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदानप्रा. **उगीले माधव उत्तमराव** | 134 |
| 34 | यशवंतराव चव्हाण यांचा शिक्षणासंबधीचा दृष्टीकोन प्रा.डॉ.निलेश शेरे | 137 |
| 35 | यशवंतराव चव्हाण : विचार व कार्य **प्रा. किशन मिराशे** | 140 |
| 36 | यशवंतराव चव्हाण यांचे स्वातंत्र्यलढ्यातील व राजकीय क्षेत्रातील कार्य डॉ.गजानन बापुराव ठाकरे | 143 |
| 37 | यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय विचारांचा व कार्याचा चिकित्सक अभ्यास डॉ.मधुरा प्रतापसिंह मोहिते | 149 |
| 38 | यशवंतराव चव्हाण–सक्षम नेतृत्व''(भारत – चिन–पाक संदर्भात) प्रा.डॉ. श्रीकांत म. सोनटक्के | 154 |
| 39 | समृद्ध महाराष्ट्राचे शिल्पकार व लोकनेते यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक विचार व कार्य डॉ वंदना राजेश शिंदे | 158 |
| 40 | यशवंतराव चव्हाण . एक अष्टपैलू व्यक्तिमत्व प्रा.डॉ.प्रदिप शा. ढोले | 163 |

| | | |
|---|---|---|
| **41** | यशवंतराव चव्हाण यांची संरक्षणमंत्री म्हणून भूमिका आणि कार्य<br>डॉ. लक्ष्मी रामभाऊ कांगुणे. | **168** |
| **42** | मा.यशवंतराव चव्हाण यांचे भारतीय संरक्षण क्षेत्रातील योगदान **प्रा. डॉ. जितेंद्र आनंदा माळी** | **172** |
| **43** | यशवंतराव चव्हाण यांचे महाराष्ट्राच्या निर्मितीचे ओजस्वी कार्य<br>**प्रा..डॉ. दिलीप तुकाराम कदम** | **176** |
| **44** | अष्टपैलू यशवंतराव चव्हाण प्रा.एस. के. इंगळे | **179** |
| **45** | धुरंधर नेते यशवंतराव चव्हाण प्रा.सुनिता विठ्ठलराव भोसले | **183** |
| **46** | अष्टपैलु यशवंतराव चव्हाण **प्रा. राहुल चोखाजी साळवे** | **186** |
| **47** | आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतराव चव्हाण यांचे शेती,उद्योग व शिक्षणातील योगदान शिवाजी काशीनाथ गायकवाड | **188** |
| **48** | यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक व सामाजिक विचार व कार्य<br>प्रा. बालाजी रावसाहेब बोडके | **193** |
| **49** | Hon. Shri. Yashwantrao Chavan's Educational Thoughts and Works Dr. **Sabale Shashikant Gokul** | **199** |
| **50** | The Versatile Personality of Yashwantrao Chavan<br>**Smt. Mane Poonam Prakashrao** | **203** |
| **51** | भारताच्या संरक्षण धोरणाविषयी यशवंतराव चव्हाण यांची भूमिका – एक आकलन<br>प्रा. डॉ. प्रशांत प्रभाकर सराफ | **209** |

# यशवंतराव चव्हाण एक अष्टपैलू व्यक्तीमत्व

प्रा.अरूण महादेव राख
(राज्यशास्त्र विभाग प्रमुख)
बाबुजी आव्हाड महाविद्यालय, पाथर्डी ता . पाथर्डी जि. अहमदनगर
मो. ९४२३०४५८७४

---

महाराष्ट्रराज्याचे पहिले मुख्यमंत्री, महाराष्ट्राच्या जडण–घडणीचे शिल्पकार, भारताचे संरक्षणमंत्री , गृहमंत्री, अर्थमंत्री, परराष्ट्रमंत्री, अर्थ आयोगाचे अध्यक्ष, उपपंतप्रधान, विरोधी पक्षनेता, कर्तव्यदक्ष प्रशासक, चतुर राजकारणी, संस्कृतीचे उपासक, साहित्याचे सहृदयी रसिक, कृषी पंढरीचे वारकरी, असं विविधांगानं बहरलेलं बहुआयामी संपन्न व संयमी व्यक्तीमत्व लाभलेले महाराष्ट्राचे सुपुत्र यशवंतराव चव्हाणसाहेब

**यशवंतरावाचे राजकीय क्षेत्रातील योगदान**

२६ जानेवारी १९३० रोजी वयाच्या १७व्या वर्षी त्यांनी टिळक हायस्कुल मधील झाडावर कॉंग्रेसचा झेंडा फडकावून कायदेभंग चळवळीत उडी घेतली. त्यांना तुरूंगात जावं लागलं. तुरूंगातील अनेक स्वातंत्र्य सेनांनींच्या सहवासामुळे त्यांच्यात राष्ट्रप्रेमाचे चैतन्य सळसळले. गांधीजीच्या असहकार चळवळीचा प्रचंड परिणाम झाला. १९४६ साली निवडणूक जिंकून त्यांची पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून नेमणूक झाली. १९५२ सालची निवडणूक लढवून त्यांनी मुबंई राज्याचं पुरवठा मंत्रीपद भुषवले १९५६ ला द्विभाषिक राज्याची निर्मिती झाली. मोरारजी देसाई मुख्यमंत्री झाले. पण संयुक्त महाराष्ट्र आंदोलनातील अपयशामुळे त्यांना पायउतार व्हावं लागलं. १९५७ ला ते मुख्यमंत्री झाले. संयुक्त महाराष्ट्रचळवळीत महत्वाची भूमिका बजावली. महाराष्ट्रातील सामान्य माणसांना द्विभाषिक राज्य कसं नको आहे. ते दिल्लीतल्या नेतृत्वाला पटवून देण्यात ते यशस्वी झाले व भारताचे पंतप्रधान पं.जवाहरलाल नेहरूंनी महाराष्ट्र राज्य स्थापनेला संमती दिली आणि १ मे १९६० रोजी यंशवंतरावांनी संयुक्त महाराष्ट्राचा अमृतकलश अथक प्रयत्नाने मिळवला. आणि स्वतंत्र महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून ते १ मे १९६० रोजी विराजमान झाले.

यशवंतरावांनी राजकारण करताना सत्तेचे विकेंद्रीकरण केलं, त्यांनी महाराष्टाच्या सर्वागीण विकास व्हावा यासाठी सत्तेच्या विकंद्रीकरणाला विशेष महत्व दिलं. त्यामूळे राजकारणाचं एक चित्र बदललं गेलं. राजसत्तेचे धनी जनता आहे. जनता जनार्दन हाच माझा परमेश्वर आहे. आणि ही जनता ऊपाशी राहू नये. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य त्यांना मिळावं या साठी प्रशासनातील कार्यपध्दतीत अमुलाग्र बदल केला. मंत्रालयातून घेतले जाणारे निर्णय गावपातळीवर आणण्यासाठी यशवंतरावांनी कार्यकत्याची फौज तयार केली. ग्रामपंचायत,तालुका पंचायत, जिल्हा परिषदांच्या माध्यमातून खेडयातील तरूण सक्षमपणे आप–आपल्या भागाचा विकास करण्यासाठी सज्ज झाले. सामुहिक नेतृत्वातून गुणसंपन्न, कर्तबगार तरूण पिढी या राज्याचा कारभार करण्यासाठी पूढे सरसावली. देशाचा कारभार करू लागली. त्यांच्या कुशल दुरदृष्टीमुळेच महाराष्ट्राला धडाडीचे, कर्तृत्वान नेते लाभले. सुशीलकुमार शिंदे, मधुकरराव चौधरी, वसंतदादा पाटील, शरद पवार, विलासराव देशमुख, यंशवतराव गडाख, विनायकराव पाटील, आशी अनेक कर्तबगार नेत्यांची नावं सांगता येतील. या सर्व मान्यवरांनी आपल्या कार्यकतृत्वाचा ठसा राज्यपातळीवर, देशपातळीवर उमठविला.

**नवमहाराष्ट्राची उभारणी**

यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीत पदावर असतांना महत्वपूर्ण निर्णय घेऊन नव महाराष्ट्राची उभारणी केली. ते धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचे कट्टर समर्थक आहेत. त्यांनी जाती धर्मनिरपेक्ष, समाजवादी, प्रजासत्ताक, लोकाशाहीचा नवा भारत उभा करण्याचे स्वप्न पाहिले. त्यांनी राज्यसंस्था व धर्म यांची कधीही गल्लत होऊ दिली नाही. त्यांनी राजकारण जरूर केल पण ते जनसामान्याच्या हितासाठच केले. त्यांच्या राजकीय कारकिर्दित लोकांनाही खऱ्या अर्थाने रयतेचे राज्य अनुभवास मिळाली. यशंवतराव चव्हाण हे जनतेला दिलेल्या वचनांची परिपूर्ती करणारे व लोकांच्या समाधानात आनंद मानणारे नेता होते. त्यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीत महत्वपूर्ण निर्णय घेतले. महार वतनाचा कायदा

रद्द करून उपेक्षितांना न्याय दिला. वनातील जमिनी कुणी काढून घेवू नयेत म्हणून कायद्यामधे व्यवस्था केली. विदर्भ, मराठवाडा, कोकण, दुष्काळी भाग यांच्या विकासासाठी स्वतंत्र योजना कार्यान्वीत केल्या.

**यशवंतरावाचे कृषी विषय धोरण**

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर अर्थात १९६० नंतर मुख्यमंत्रीपदाच्या आवघ्या दोन– आडीच वर्षात समाजाच्या सर्वागीण विकासासाठी शेती आणि शेतकरी यांच्या संदर्भात अतिशय धाडसी निर्णय घेतले. त्यांच्या 'कसेल त्याची जमीन' या क्रांतीकारी निर्णयामुळे शेतीवर गुलामासारखा राबणारा शेतमजूर शेतकरी झाला. याच बरोबर शेतकरी स्वाभिमानानं जगावा म्हणून शेतक–याचं कर्ज निवारण कायदा केला, जमीन कमाल मार्यादा कायदा केला, वेठबिगारी बंद केली, कमाल वेतनाचा कायदा आमलात आणला. बंद पडलेली पाणलोट क्षेत्राची कामं सुरू केली. गरीब शेतक–यांना शेतीची औजारे, खते यासाठी आर्थिक मदत केली. सहकाराच्या माध्यमातून कृषी औद्योगीक क्रांतीची पायाभरणी केली.

मुळात शेतकरी शेतीतील अनेक अडी–अडचणी मुळे, दुष्काळ, सावकार, व्यापाऱ्यांकडून होणारी अडवणूक, व्यसनाधिनता, यांच्या मगरमिठीत सापडून कसा पिचला जातो. हे यशवंतरावांनी आपल्या घरातच अनुभवलेलं असल्यामूळे त्यांनी छोटे, मोठे, मध्यम सिचंन प्रकल्पांची पाया भरणी केली. पाणी म्हणजे शेतकऱ्याला मिळणारं जीवन आहे हे जाणून त्यांनी कायेना, उजणी प्रकल्पाची पाया भरणी केली. आज हाजारो एकर जमीन ओलीताखाली आलेली दिसते. कोयनेच्या पाण्यावर वीज निर्मिती करावी आणि शिल्लक पाण्याचा शक्य झाल्यास शेतीलाही उपयोग व्हावा असा विचार १९४७साली मांडला आज त्याचे प्रत्यंतर येते.

'विना सहकार नाही उद्धार' या सहकाराच्या मंत्राने सहकारी साखर कारखान्यांच्या उभारणीला बळ दिले. पंचायतराज योजना सुरू करून ग्रामीण भागातील गरीबी, दारिद्रय, बेकारी, कमी करण्याचा प्रयत्न केला. कृषी विद्यापीठांची स्थापना करून नवनवीन संशोधनाद्वारे, तंत्रज्ञानाद्वारे शेती उदयोगाला चालना दिली. महाराष्ट्राची प्रगती करायचीच या निश्चयाने त्यांनी मुबंई, ठाणे, नाशिक, या ठिकाणी औद्यौगीक वसाहती निर्माण करण्याचा निर्णय घेतला. महाराष्ट्रातील 'कृषी औद्यौगीक धोरणाचे जनक' म्हणून यशवंतरावांचा अभिमानानं उल्लेख केला जातो.

१९६२ साली चीनंन भारतावर आक्रमण केला त्यात भारताचा पराभव झाला. तत्कालीन सरंक्षण मंत्री कृष्ण मेनन यांनी राजीनामा दिला. पंतप्रधान पं नेहरूंनी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांना दिल्लीला ताबडतोब बोलावून घेतले व भारताच्या सरंक्षणमंत्री पदाची जबाबदारी सोपवली त्यांनी सरंक्षणमंत्री पदाची शपथ घेतली 'महारष्ट्राचा हा सहयाद्री हिमालयाच्या मदतीला धावून गेला. आणि त्याच रात्री चीननं युध्दबंदीची घोषणा केली. परंतु त्यांनी आपल्या सेनादलाचं मनोधर्य वाढविलं भारतीय लष्कराची पुनर्रचना केली. युध्द साहित्य निर्मितीचे प्रकल्प निर्माण केले. यशवंतराव चव्हाण यांनी पुन्हा मागे वळून पाहिले नाही. त्यांच्या राजकीय कार्यकतृत्वाचा आलेख उंचावत गेला. त्यांनी केद्रांत गृहमंत्री, अर्थमंत्री, परराष्ट्रमंत्री, अर्थ आयोगाचे अध्यक्ष, उपपंतप्रधान, विरोधी पक्षनेता अशी अनेक पदे भूषवली. एकंदर राज्यपातळीवर, देशपातळीवर, त्यांच्या राजकारणाचा प्रभावीपणे ठसा उमठविला. त्याच्या विषयी एवढेच म्हणता येईल.

'दिव्यत्वाची जिथे प्रचिती। तेथे कर माझे जुळती'

अलीकडील राजकारणाकडे पाहता या थोर व्यक्तीमत्वाची आठवण होते. एक सुसंस्कृत राजकारणी म्हणून त्यांचा अभिमानानं उल्लेख करता येतो.

**यशवंतरावाचे सामाजिक कार्यातील योगदान –**

महाराष्ट्रामध्ये महात्मा ज्योतिबा फुलेपासून कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पर्यंत थोर समाजसुधारकांचा वारसा महाराष्ट्राला लाभलेला आहे. त्यांच्या विचारांचा यशवंतराव चव्हाण यांच्यावर फार मोठा प्रभाव जाणवतो. त्यांच्या विचाराने प्रभावित होऊन त्यांनी सामाजिक चळवळीमध्ये भाग घेतला. त्यांना समाज, समाजातील दीन–दलीतांचे, कष्टकऱ्यांचे कामगारांचे, महिलांच्या प्रश्नांची जाण होती. त्यांच्या अडचणी, दु:ख, वेदना त्यांनी अतिशय जवळून पाहिल्या, त्यामुळे त्यांनी आपल्या कारकिर्दीत समाजासाठी अनेक योजना राबविल्या त्यामूळेच सामान्यातून असामान्य झालेल्या परंतु सदोनित सामान्यांची काळजी करणारा लोकनेता म्हणून यशवंतराव चव्हाण यांचं महत्व कालातीत आहे. ते माणसातला माणूस असल्यामूळे माणसांना प्रेमाने जोडण्याची हातोटी त्यांच्याकडे होती. संत तुकाराम महाराजांच्या अंभगाप्रमाणे

जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुला।

तोचि साधु ओळखावा । देव तेथेचि जाणावा ।।

त्यांना सहचारीणी म्हणून आदरणीय वेणूताई लाभल्या. त्या अन्नपूर्णाच होत्या. साहेबांच्या घरी सारखी माणसांची वर्दळ असायची. ताई सर्वांची मायेने विचारपूस करायच्या साहेबांच्या कार्याला त्यांचा फार मोलाचा हातभार लाभला.

यशवंतराव चव्हाण साहेबांचे व्यक्तिमत्व हे समाजशील होतं. त्यामुळे त्यांचा लोकसंग्रह फार मोठा होता. सामान्यातील सामान्य कार्यकर्त्यांची त्यांनी सदोनित आठवण ठेवली. मा. भिकाजीराव फाकले सारख्या मित्राच्या चंद्रमौळी घरात भोजण घेणारे, मराठवाडयातील दौऱ्यावर असतांना केजच्या माळरानावर विठाबाईसारख्या ग्रामीण भागातल्या प्रेमळ माऊलींच्या चरणाला वाकुन नमस्कार करणारे, देशाचे गृहमंत्री असताना नाशिकची कष्टकरी वृध्दा भेटीला आली असतांना तिचे म्हणणे शांतपणे ऐकून घेऊन यथोचित पाहुणचार करून सौ. वेणूताईकरवे तिची चोळी–लुगडं देवून ओटी भरणारे, संरक्षणमंत्री असताना साताऱ्याहुन कोल्हापूरकडे चालले असतांना रस्त्याच्या कडेला श्रीपादराव विर माने दिसतात. १९४२ च्या चळवळीतील आपल्या बेडीतील जोडकैदी या मित्राला संरक्षणमंत्रीपद विसरून कडकडून भेटतात. त्यांच्या गळयात भलामोठा हार घालणारे साहेब समाजातील आशा कितीतरी स्नेहभावनांना अलगदपणे आपल्या उराशी कुरवाळणारे समाजाचे नेते होते.

**यशवंतराव चव्हाण यांचे आर्थिकक्षेत्रातील योगदान**

यशवंतराव चव्हाण यांचे आर्थिक क्षेत्रातील योगदान मोलाचे ठरते. स्वत: शेतकरी कुटंबात जन्मलेले असल्यामुळे त्यांना अनेक वेळा आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागले. ग्रामीण भागातील अर्थकारण त्यांनी जवळून पाहिलेले असल्यामुळे मुख्यंमत्री असतानाच्या कालावधीत त्यांनी अनेक धाडसी निर्णय घेतले. द्रारीद्रयाने हैरान झालेल्या खेडयातील सामान्य माणसाला आर्थिक समस्येतून सोडवण्यासाठी त्यांनी, सहकारी साखर कारखाने, सहकारी बॅंका, सहकारी सोसायटया, खरेदी विक्री केंद्रांची स्थापना केली तसेच सहकारी सिंचन योजनांसाठी प्रयत्न केले. सहकारी चळवळीचं जाळं महाराष्ट्रभर निर्माण केलं. कृषीला औद्यौगीकतेची जोड दिली. त्यातून अनेक तरूणांना रोजगार मिळवण्यास मदत झाली. आज डेअरी, पोल्ट्री (कुकुटपालन), दुग्धव्यवसाय, फळबाग, मच्छिमारी यांना आर्थिक मदत, अनुदान मिळताना जाणवते. यशवंतरावानी सुरू केलेल्या या सहकारी चळवळीने भारतासमोर एक आदर्श निर्माण केला.

साहेब देशाचे अर्थमंत्री असतांना १९७१ ते १९७६ या कालखंडात त्यांनी भारतदेशाला पाच अर्थसंकल्प दिले. त्यांच्या अंगी देशाच्या आर्थिक विकासा विषयीची तळमळ होती. त्यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पातून त्यांची अर्थतज्ञ म्हणून प्रतिमा सर्वांच्या मनावर कोरली गेली. त्यांनी 'पंचवार्षीक योजना' प्रभावीपणे राबविण्याचा प्रयत्न केला. भारतीय अर्थव्यवस्था ही शेतीशी प्रामुख्याने निगडीत आहे, हे लक्षात घेऊन त्यादृष्टीने अर्थव्यवस्था भक्कम करण्याचा प्रयत्न केला. चलनवाढीस चालना मिळविण्यासाठी प्रयत्न केले. राज्यांच्या आर्थिकव्यवस्थेचा विचार करून केंद्राच्या उत्पन्नातून योग्य वाटा देण्याचा प्रयत्न केला. देशाची आर्थिक स्थिती भक्कम करण्यासाठी औद्योगीक उद्योगांना महत्व दिले. त्यांची अर्थमंत्री म्हणून असलेली कारकिर्द अर्थव्यवस्थेला उपकारक ठरली.

**सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान–**

यशवंतराव चव्हाण यांचे सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान मोठे आहे. त्यांनी साहित्य, संगीत, नाटय, लोककला, तमाशा, या सर्व कलांच्या विकासासाठी भरघोस मदत केली. बालपणापासून त्यांना नाटकांचे, लोककलांची आवड होती. दळतांना आईने म्हटलेल्या ओव्यांनी त्यांच्या मनावर सुस्कांर झाले. आईबरोबर बालपणी ऐकलेली कथा, कीर्तने, प्रवचने, इत्यादीमधून त्यांची सांस्कृतिक जडण–घडण होत गेली. त्यातूनच पूढे सत्तेवर असतांना साहित्य कला, संस्कृतीची जोपासना व्हावी म्हणून अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले.'तमाशा' या लोककलेला प्रतिष्ठा मिळावी म्हणून 'तमाशा बोर्डाची' स्थापना केली. त्यांच्या आग्रहातून तमाशाचे लोकनाटयात रूपांतर झाले.

नाटय कलेला उत्तेजन देण्यासाठी आर्थिक योजना आखली.हौशी कलावंतासाठी नाटय महोत्सव सुरू करण्यात आले. अनेक शहरात खुल्या नाटयगृहांची निर्मिती करण्यात आली. साहित्य, संस्कृती, यांच्या संवर्धनासाठी 'महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळाची' स्थापना केली. रंगभूमी परिनिरीक्षण मंडळ, भाषा विभाग, शासकीय परिभाषा कोश, व पदम्नाम कोश यांच्या निर्मितीस चालना दिली.

मराठवाडयातील कला क्रीडागुणांना प्रोत्साहन मिळावे म्हणून' मराठवाडा सांस्कृतिक मंडळाची' स्थापना केली. 'मराठी विश्वकोश मंडळ' व 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ' स्थापन केले. विश्वकोषाचे आज १९ खंड प्रकाशित झालेले पाहावयास मिळतात. लोकसाहित्य समिती स्थापन करून लोककलांना प्रोत्साहन दिले. विविध कोश वाड:मय निर्मितीस चालना दिली. आशा विविधतेने सांस्कृतिक, साहित्यिक, सवर्धनाचा विचार करणारे, ते दुरदृष्टीचे नेते होते. भाषा, साहित्य, संस्कृती कलांचा अभ्यास करून त्यांच्या संवर्धनासाठी भरभरून मदत केली. त्यामूळे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडणघडणीत त्यांचे योगदान दीपस्तंभासारखे आहे.

**शिक्षणक्षेत्रातील भरीव योगदान**

यशवंतरावांनी राज्यकारभार करताना शिक्षणाचा विस्तार यावर आपले लक्ष केंद्रीत केले.

'विदयेनेच मनुष्या आले श्रेष्ठत्व या जगमाजी।
न दिसे एकही वस्तू विदयेनेही असाध्य आहे जी ।।

या कृष्णशास्त्री चिपळूणकरांच्या काव्यपंक्तीप्रमाणे विदयेमुळे मनुष्यास जगात श्रेष्ठ स्थान मिळालेले आहे. असाध्य गोष्टी विदयेनेच साध्य होतात. म्हणूनच महात्मा फुले म्हणतात—

' विदेयविना मती गेली, मतीविना गती गेली,।
गतीविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले ।
इतके अनर्थ एका अविदयेने केले।।'

शिक्षण नसेल तर मनुष्याच्या जीवनाची काय आवस्था होते हे वरील पंक्तीतून लक्षात येते. हेच यशवंतराव चव्हाण यांनी जाणले आणि शैक्षणिक विकास केल्याशिवाय सामाजिक विकास व देशाची प्रगती होणार नाही हे लक्षात घेतले. शिक्षणाने माणसात नव सामर्थ्य निर्माण व्हावे, रूढी, अधंश्रध्दा, यातून बंधमुक्त होऊन स्वतंत्र विचार करणारा असावा हा शिक्षणाचा हेतू त्यांना अभिप्रेत होता. हजारो वर्ष शिक्षणापासून वंचित राहिलेला समाज हाच शिक्षण प्रणालीचा केंद्रबिदूं असावा असे त्याचे मत होते.

यशवंतरावांना जनसामान्यांच्या शिक्षणविषयी अत्यंत तळमळ होती. कारण त्यांनी स्वत:च अत्यंत प्रतिकूल परिस्थिती शिक्षण घेतले होते.आर्थिकदृष्टया मागास असलेल्या विदयार्थ्यांना मोफत शिक्षणाची सवलत मंजूर करून खेडयापाडयातही प्राथमिक, माध्यमिक शाळा सुरू झाल्या, जिल्हा, तालुकास्तरावर महाविद्यालये सुरू झाली. संपूर्ण राज्यभर शिक्षणाची मोठी चळवळ उभी राहिली. यशवंतरावांनी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र व्हावा यासाठी आपले मंत्रिपद व गोरगरिबांच्या शिक्षणासाठी मुख्यमंत्रीपद पणला लावले होते. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून महाराष्ट्राच्या विकासाच्या नियोजनात शैक्षणिक धोरण स्पष्ट करताना यशवंतराव चव्हाण साहेब म्हणाले की '' येत्या बारा ते पंधरा वर्षाच्या काळामध्ये शिक्षणाचा प्रचंड प्रवाह महाराष्ट्रातील प्रत्येक शहरात व खेडयात पोहचला पाहिजे आणि त्यातून खेडयातील नवी पीढी सुशिक्षित झाली पाहिजे. शिक्षणाद्वारे होणारी क्रांती झालीच पाहिजे. असे एकही घर राहता कामा नये की, जेथे उच्च शिक्षणाची संधी पोहचलेली नाही.'' शिक्षणाकडे त्यांनी भविष्यातील आर्थिक विकासाचे मुलभूत साधन म्हणून पाहिले. म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहु महाराज, सयाजीराव गायकवाड, कर्मवीर भाऊराव पाटील, पंजाबराव देशमुख, यांचा शैक्षणिक वारसा महाराष्ट्राला लाभला होता, या महान व्यक्तींनी दाखविलेल्या मार्गाने यशवंतरावांनी गतीने शैक्षणिक वाटचाल केली. शिक्षणाची गंगा घरोघरी पोहचविण्याच्या कामात रयत शिक्षण संस्था, शिवाजी शिक्षण संस्था, स्वयंसेवी छोटया शिक्षण संस्था या सर्वांना सहभागी करून घेतले. प्राथमिक शिक्षण वाडया, वस्त्यापर्यंत, माध्यमिक शिक्षण ग्रामिण भागापर्यंत तर महाविद्यालयीन शिक्षण प्रत्येक तालुक्यापर्यत उपलब्ध करून दिले. त्यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या काळातच 'मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद' व' शिवाजी विदयापीठ, कोल्हापूर या विदयापीठांची स्थापना करून, कला व वाणिज्य शाखेचे शिक्षण मराठी भाषेतून उपलब्ध करून दिले. सातारा येथे सैनिकी स्कुलची स्थापना करून नवा विचार महाराष्ट्राला प्रथमत: यशवंरावांनीच दिला. अदिवासी मुला— मुलींसाठी आश्रमशाळा सुरू करून शिक्षण अदिवासींच्या पाडयापर्यत नेणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य त्यांच्या अथक प्रयत्नामुळे ठरले.

शेतीच्या शास्त्रीय शिक्षणाचा दृष्टीकोन लोकामध्ये वाढविण्यासाठी कृषी विदयापीठांची निर्मिती केली. शेतीला पुरक व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम सुरू केला. तसेच उदयोग चांगल्या रितीने व्हावा या साठी त्यांनी

उदयोग व्यवसायाचा अभ्यासक्रम तयार करून शिक्षण देण्यास सुरूवात केली. यशवंतरावांची विचारसाधना होती की, प्रत्येक व्यक्तीला सर्व प्रकारचे शिक्षण घेता यावे. ज्ञानाची गंगा सर्व स्तरापर्यंत पोहचली पाहिजे. यशवंतरावांचे शैक्षणिक विचार आज सार्थ ठरत आहेत. अनेक पिढयांनी सातत्याने अनुकरण करून त्यांचे शैक्षणिक विचार आचरणात आणले. त्यांच्या कीर्तीचा सुगंध अखंड दरवळत आहे. त्यांचे कार्य, विचार आणि आचार हा आर्दश एका युगप्रवर्तकाचाच होता. महाराष्ट्रातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक जीवनात एक नवे युगच निर्माण करणारी व्यक्ती म्हणजे यशंवतरावजी चव्हाण होय.

आशाप्रकारचे सुसंस्कृत मन, चितंनशील वृत्ती, ज्ञानलालसा, गुणग्राहक नेता, जीवनातील सुखदु:खे,टिका, निंदा,स्तुती, समबुद्धीने पचविणारे हे स्थितप्रज्ञ जाणता राज्यकर्ता, जिज्ञासू अभ्यासक, सर्जनशील विचारक, मराठी भूमीशी व देशाशी काया –वाचा – मानाने पूर्णतया समरस होणारे, उच्च नैतिक मूल्यांचे जतन करणारे विधायक दूरदृष्टी ठेवून समन्वयाची भूमिका घेणारे असे लोकोत्तर लोकनेते आदरणीय यशवंतराव चव्हाण होते.

यशंवतरावांच्या व्यक्तिमत्वाबद्दल जेवढे बोलावे, लिहावे, तेवढेच कमीच पडते. शब्दही मुके होतात. शेवटी

“ मुक्या मनाने किती उधळावे शब्दांचे बुडबुडे
तुझ्या यशाचे पवाडे गातील स्वर्गीचे चौघडे”

या शब्दांत या ‘यशवंत’ अष्टपैलू व्यक्तिमत्वास माझा कोटी कोटी प्रणाम!

**ठळक निष्कर्ष**

१. मा. यशवंतराव चव्हाण यांचे आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मिती मध्ये भरीव योगदान मौलिक स्वरूपाचे आहे.
२. यशवंतराव चव्हाण यांनी नवं राज्य, नवा समाज, नवा माणूस घडविला.
३. कृषी संस्कृती विकसित करण्यासाठी अनेक नवनवीन योजना अंमलात आणल्या.
४. सांस्कृतिक परंपरा जतन करून ठेवण्यासाठी भरघोस मदत केली.
५. शिक्षणाचं विस्तारीकरण करून, शिक्षणाची गंगोत्री सर्वसामान्यपर्यंत पोहचवली.
६. सुसंस्कृत राजकारणाचा पाया रचला.
७. समाज आणि राज्याच्या हितासाठी अविरतपणे काम केले
८. आर्थिकस्तर उचांवण्यासाठी विविध योजना सुरू केल्या.
९. दीन–दलितांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध कायद्यांची अंमलबजावणी केली.

**आधारभूत ग्रंथ**

१. कृष्णाकाठ – यशवंतराव चव्हाण
२. यशवंतराव चव्हाण – नवमहाराष्ट्राचे शिल्पकार:– संपादक उत्तम कांबळे
३. युगप्रर्वतक यशवंतराव – यशवंतराव चव्हाण व्यासपीठ अहमदनगर.
४. यशवंतराव चव्हाण : व्यक्ती आणि कार्य – यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, १२ मार्च २०१२
५. जडण– घडण :– दिवाळी विशेषांक २०१२, सहयाद्री प्रकाशन पुणे.
६. जडण– घडण :– अंक सातवा ऑगस्ट २०१२
७. लोकराज्य– मार्च २०१३, माहिती व जनसंपर्क महासंचानालय महाराष्ट्र शासन.

# यशवंतराव चव्हाण यांचे सहकार विषयक विचार व कार्य

प्रा.तानाजी जाधव
इतिहास विभाग प्रमुख,
महात्मा फुले नूतन महाविद्यालय,मिरजगाव. ता- कर्जत जि .अ.नगर.
मो. 9921116548. मेलthjadhav444@gmail.com

**सारांश:-**

यशवंतराव चव्हाण यांना आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून ओळखले जाते.द्विभाषिकमहाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री पद स्वीकारल्यानंतर त्यांनी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी स्वतःला वाहून घेतले. राजकारणाबरोबरच सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक शैक्षणिक व सहकार क्षेत्रांमध्ये त्यांनी आपल्या कार्याचा व कर्तुत्वाचा ठसा उमटविला. यशवंतराव चव्हाण यांनी ग्रामीण भागातील प्रश्न डोळ्यासमोर ठेवून आधुनिकीकरणाची कास धरली होती. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची सावकाराच्या पाशातून मुक्तता करण्यासाठी त्यांना वेळीच अर्थसाह्य मिळालेपाहिजे, कृषी व औद्योगिक अर्थव्यवस्थेला सहकारी चळवळीच्या माध्यमातून बळकटी मिळावी.याहेतुने त्यांनी जाणीवपूर्वक सहकारी चळवळीला महाराष्ट्रामध्ये ऊर्जितावस्था प्राप्त करून देण्याचे कार्य केले. त्यातूनच पुढे महाराष्ट्रात सहकारी संस्थांचे जाळे निर्माण झाले.सहकारी बँका, सहकारी पतपेढ्या, सहकारी साखर कारखाने, सूत गिरण्या, सहकारी कुक्कुटपालन संस्था, दूध उत्पादक संस्था, सहकारी खरेदी विक्री संघ, अशा अनेक संस्था महाराष्ट्रात सुरु झाल्या.त्यातूनच ग्रामीण भागाचा कायापालट झाला आणि महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळाली. आज महाराष्ट्रामध्ये एकूण2 लाख 18 हजारएवढ्या सहकारी संस्था वजवळपास 200सहकारीसाखर कारखाने अस्तित्वात आहेत. साखर कारखानेसाखर निर्मिती बरोबरच इथेनॉल, वीज निर्मिती, स्पिरिट यासारखी उत्पादने बनवून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त भाव देण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळेसाखरपट्ट्यातील शेतकऱ्यांचे जीवन समृद्ध झाले आहे.काही साखर कारखान्यांच्या माध्यमातून शाळा-महाविद्यालये चालवली जात आहेत. दवाखाने काढून आरोग्य सेवा पुरवण्याचे काम काही कारखान्यांच्या माध्यमातून केले जात आहे. तर अनेक साखर कारखाने सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम राबवित आहेत.सहकारी संस्थांच्या माध्यमातून महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होऊन शेतकरी व शेतमजुरांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा होत आहे .आज महाराष्ट्राच्या अर्थकारणात मध्ये सहकारी संस्थांचा वाटा महत्वपूर्ण आहे.या सहकारी चळवळीची पायाभरणी महाराष्ट्रामध्ये यशवंतराव चव्हाण यांनी केलेली दिसते.

**प्रास्ताविक:-**

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये यशवंतराव चव्हाण यांचे योगदान महत्त्वाचे आहे.त्यांच्यावर महात्मा गांधी, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारांचा प्रभाव होता. मुख्यमंत्री झाल्यावर त्यांनीआपले लक्ष ग्रामीण भागावर केंद्रित केले. ग्रामीण भागातील सामान्य जनतेची आर्थिक स्थिती फार नाजूक आहे.आर्थिक समस्या बरोबरचग्रामीण भागात अनेक सामाजिक समस्याआहेत,हे यशवंतराव चव्हाण यांनी पाहिले होते. म्हणून त्यांनी ग्रामीण भागाच्या विकासाची व

आधुनिकीकरणाची कास धरली. ग्रामीण भागातील आर्थिक व सामाजिक विकासाचे सहकार हे एक माध्यम आहे.या धारणेतून यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्रामध्ये सहकारी संस्थांचे जाळे निर्माण केले.यशवंतराव चव्हाणांच्या सहकार विषयक धोरणातून महाराष्ट्रातसहकार क्षेत्रात काम करणाऱ्याअनेक नेत्यांची फळी निर्माण झाली. त्यामध्ये पद्मश्री विखे पाटील, धनंजयराव गाडगीळ, रत्नाप्पा कुंभार, वसंतदादा पाटील, तात्यासाहेब कोरे, शंकरराव मोहिते पाटील, यशवंतराव मोहिते, शंकरराव काळे, यशवंतराव कोल्हे, यासारखे सहकार महर्षी तयार झालेव संपूर्ण महाराष्ट्रात सहकार चळवळ फोफावली.महाराष्ट्रातील या सहकाराच्या प्रगतीचे श्रेय यशवंतराव चव्हाणांकडे जाते. त्यांनीच सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्राचे आधुनिकीकरण घडवून आणले. म्हणून यशवंतराव चव्हाण यांचे सहकार विषयक विचार व कार्य याचा अभ्यास प्रस्तुत शोधनिबंधामध्ये केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:-**

1. यशवंतराव चव्हाण यांच्या सहकार विषयक विचाराचा व दृष्टिकोनाचा अभ्यास करणे.
2. यशवंतराव चव्हाण यांचे सहकारविषयक कार्य अभ्यासणे.
3. यशवंतराव चव्हाण यांची सहकारी साखर कारखान्याबाबतची भूमिका पाहणे.

**यशवंतराव चव्हाण यांचे सहकार विषयक विचार:-**

महाराष्ट्राचे नेतृत्व स्वीकारल्यानंतर महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचे स्वप्न यशवंतराव चव्हाणांनी पाहिले.सहकाराच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा विकास होईल. त्याबरोबरचशहरी व ग्रामीण जनतेतील आर्थिक व सामाजिक दरी कमी होऊनसामाजिक समता प्रस्थापितहोईल अशी यशवंतराव चव्हाण यांची धारणा होती. सहकारी चळवळीच्या माध्यमातूनमहाराष्ट्रमध्येच नव्हे तर संपूर्ण देशात समाजवादी समाजरचना अस्तित्वात येईल.असा विश्वास यशवंतराव चव्हाण यांना होता.यासंदर्भात आपल्या भाषणात ते म्हणतात, " सहकारी चळवळ ही मूलतः जनतेच्या प्रयत्नावर आधारित असली तरी सरकार देखील तिचे अगदी काळजीपूर्वक संगोपन करेल व करीत आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना आपल्या साधनसामग्रीचा उपयोग करण्याच्या निमित्ताने बाहेरून येणाऱ्या भांडवलामुळे त्या भागात जे प्रश्न निर्माण होतात ते टाळता येतील शिवाय त्याने ग्रामीण व शहरी मूल्यांना असलेले अंतर नष्ट होऊन शहरातील व खेड्यातील लोक एका पातळीवर येतात. उदा. एखाद्या सभेत मोठे उद्योगपती, कार्पोरेशनचे प्रतिनिधी, सरकारी अधिकारी, तंत्रज्ञ व इंजिनियर यांच्या बरोबरीने शेतकऱ्यांचे प्रतिनिधी जेव्हा डायरेक्टर म्हणून खांद्याला खांदा लावून बसतात, तेव्हा ग्रामीण व शहरी हा भेद सहाजिकच नष्ट होतो. त्याशिवाय वाढलेले उत्पन्न सहकारी संघटनेमुळे शक्य तितक्या जास्त क्षेत्रात वाटले जाते व त्यामुळे खऱ्या अर्थाने समाजवादी समाज रचनेचा उद्देश साध्य होतो"[1]यावरून केवळ आर्थिक विकासाच्या नव्हे तर सामाजिक समता निर्माण करण्याच्या दृष्टिकोनातून यशवंतराव चव्हाण यांनी सहकाराकडे पाहिले होते असे दिसते.

नव्याने स्वतंत्र झालेल्या आपल्यादेशातलोकशाही मजबूत झाली पाहिजे,असे यशवंतराव चव्हाण यांना वाटत होते. त्यामुळे सहकारी चळवळ, पक्षीय राजकारणापासून अलिप्त राहावीव ती लोकशाही बळकट करणारीचळवळ व्हावी, याविषयी यशवंतराव चव्हाण म्हणतात, " सहकारी चळवळ ही काही एखाद्या पक्षाची चळवळ नव्हे, तात्विकदृष्ट्या सहकारी चळवळ ही मूलतः लोकशाहीची चळवळ आहे. हे आपण विसरता कामा नये"[2]यशवंतराव चव्हाणकेवळ विचार मांडून थांबले नाहीत, तर त्यांनीविरोधी पक्षातील लोकांनाही या चळवळीमध्ये सामावून घेतले व त्यांना मदत केली. अकलूजचे शंकरराव मोहिते पाटील शेकापचे आमदारहोते. नवीन सहकारी साखर कारखाना काढण्यासाठी प्रयत्न करत होते.

शंकरराव मोहिते पाटील यांनी यशवंतराव चव्हाण यांना कारखान्याच्या ऑफिसच्या उद्घाटनाला बोलावले.रजिस्टर न झालेल्या कारखान्याच्या ऑफिसच्या उद्घाटनप्रसंगी, "सहकारी साखर कारखान्यांना परवानगी देण्याचे धोरण लवकरच बदलले जाईल आणि परवानगी मिळालेला तुमचा कारखाना हा राज्यातील पहिला कारखाना असेल, असे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी सभेत जाहीर केले.[3]पुढे कारखान्याच्या नोंदणीच्या कामात यशवंतराव चव्हाणांनी शंकरराव मोहिते यांना सहकार्य केले.'यशवंतरावांचा दांडगा अभ्यास, राजकारणातील पकड व लोकप्रियता पाहता, शंकररावांनी कारखान्याला 'यशवंत सहकारी साखर कारखाना' हे नाव दिले.[4]पुढे 14 फेब्रुवारी 1963 रोजी यशवंतराव चव्हाण यांनी या कारखान्याचे उद्घाटन केले.

सहकार चळवळीचा प्रसार महाराष्ट्राबरोबरच संपूर्ण देशात झाला पाहिजे.इतर राज्यातील लोकांनाही सहकाराचा उपयोग झाला पाहिजे, याविषयी यशवंतराव म्हणतात, " या विशाल देशात फक्त आपण चांगले होऊन भागणार नाही, तेव्हा या चांगुलपणाचा उपयोग सर्वसमाजाला वसर्व देशाला झाला पाहिजे."[5]यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्रात सामाजिक नेतृत्वाची उभारणी व्हावी, या अपेक्षेने सहकार क्षेत्राची मुहूर्तमेढ रोवली. पुढेसहकारी संस्थांच्या माध्यमातून अनेकभागातून ग्रामीण नेतृत्व उदयाला आलेले दिसते.सहकाराच्या माध्यमातून आर्थिक विकास करीत असताना, सहकारी संस्था या आर्थिक व राजकीय सत्ताकेंद्रे बनतील. अशी भीती यशवंतराव चव्हाण यांना वाटत होती," सहकारी चळवळ ही एका अर्थाने आर्थिक सत्ता आहे, सत्तेचे केंद्र आहे, तेव्हा तिच्यावर अंकुश ठेवला गेला पाहिजे, तसे न केल्यास सत्तेमुळे विकासाचे हे शस्त्र दुधारी ठरण्याची शक्यता त्यांनी वर्तविली होती."[6]यशवंतराव चव्हाण यांच्या या शक्यतेचा प्रत्येय आज महाराष्ट्रामध्ये अनेक सहकारी संस्थांच्या बाबतीत दिसून येतो.यावरून यशवंतराव चव्हाण यांच्या दूरदृष्टीची कल्पनायेते.

**1960 चा सहकारी संस्था विषयक कायदा:-**

यशवंतराव चव्हाण यांनी त्यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कारकिर्दीत सहकार चळवळ विषयक एक विधेयक तयार केले होते. 1960 ला हे विधेयक मंजूर झाले.[7]राज्य घटनेतील मार्गदर्शक तत्त्वानुसारहा कायदा तयार करण्यात आला होता, या कायद्यामुळे सहकारी संस्थांना भांडवल उपलब्ध होणार होते, याबरोबरच सहकारी संस्था स्थापन करण्याच्या बाबतीत लवचिकता निर्माण केली होती. त्यामूळे1960 नंतर महाराष्ट्रात सहकारी संस्थांमध्ये झपाट्याने वाढ झाली.

**सहकारी साखर कारखान्याविषयक यशवंतराव चव्हाण यांची भूमिका:-**

ऊसउत्पादक शेतकऱ्यांनी गुळ निर्मितीवरच न थांबता साखर कारखान्यांकडे वळले पाहिजे. हे कारखानेसहकारी तत्त्वावर सुरु करावेत, त्यातून शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारेल असे यशवंतराव चव्हाण यांना वाटत होते. यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री झाले, तेव्हा महाराष्ट्रात केवळ एक सहकारी साखर कारखाना होता. "त्यांनीऑगस्ट1957 मध्ये महाराष्ट्रामध्ये 18 सहकारी साखर कारखान्याची नोंद करून देशांमध्ये अग्रेसरत्व प्रस्थापित केले, नवे साखर कारखाने काढण्यासाठी शासनाने भाग भांडवलाची सोय केली.[8]सहकारी चळवळ राज्यात वाढवण्याच्या यशवंतराव चव्हाण यांच्या दूरदृष्टीतूनच,1960 पर्यंत महाराष्ट्रात 14 सहकारी साखर कारखाने सुरू झाले. 1985 मध्ये ही संख्या 75 वर गेली, तर आज महाराष्ट्रात 200च्या आसपास सहकारी साखर कारखाने अस्तित्वात आहेत.साखर उद्योगाकडून यशवंतराव चव्हाण यांना फार अपेक्षा होत्या. याबाबतची त्यांनीआपलीभूमिका 5 नोव्हेंबर 1960 रोजी डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशनच्या उद्घाटन प्रसंगी केलेल्या भाषणात स्पष्टकेली. ते म्हणतात, " केवळ कारखाना आर्थिकदृष्ट्या संपन्न होणे किंवा उत्पादनात वाढ होणे, एवढाच

संकुचित अर्थ मला अभिप्रेत नाही. या धंद्याच्या निमित्ताने महाराष्ट्रात सहकारी तत्वांचा विकास झाला आहे आणि इतर प्रकारच्या उद्योगांनाही तुमचा हातभार लागला आहे. ही गोष्ट मी महत्त्वाची मानतो. साखर कारखानदार हे या क्षेत्रातील पाईक आहेत. त्यामुळे त्यांच्यावर महाराष्ट्राच्या विकासाची निश्चितपणे जबाबदारी राहील, सहकारी साखर कारखाने ग्रामीण भागातील सहकारी संस्थांना पोषक ठरावेत, यावरच तुमच्या सहकारी साखर कारखान्याचे यश मोजले जाईल.[9]यावरून साखर कारखान्याच्या माध्यमातून केवळ कारखान्यांचा नव्हे, तर सहकारी चळवळी बरोबरच ग्रामीण महाराष्ट्राचा सर्वांगिनविकास यशवंतराव चव्हाण यांना अभिप्रेत होता. दिल्ली येथील कौन्सिल फॉर सोशल डेव्हलपमेंट या संस्थेने मार्च 1981 मध्ये सहकारी साखर कारखान्यांच्या सामाजिक व आर्थिक परिणामांची पाहणी केली. या अहवालावरून महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांचा परिसरावर झालेला सामाजिक व आर्थिक परिणाम इतर राज्यांपेक्षा अधिक चांगला आहे, असा निष्कर्ष काढला आहे.यावरून"यशवंतरावांच्या प्रयत्नांमुळेच सहकारी कारखाने हे त्यांच्या अवतीभोवतीच्या सामाजिक आर्थिक परिवर्तनाची केंद्रे बनली आहेत. ग्रामीण भागाचा आर्थिक कायापालट करणारी सहकारी साखर कारखान्याची संजीवनी म्हणजे, यशवंतरावांनी महाराष्ट्राला दिलेली देणगी आहे.[10] असे म्हणता येते.

**दुग्ध व्यवसाय :-**

ग्रामीण भागात पूर्वीपासूनच शेतीबरोबर पशुपालन हा व्यवसाय केला जातो. ग्रामीण भागातील अल्पभूधारक शेतकरी शेतमजुरांना त्यांच्या आर्थिक उत्पादनाचे साधन मिळवून देण्याच्या दृष्टीने दुग्ध व्यवसायाला यशवंतराव चव्हाण यांनी महत्त्व दिले. सहकारी संस्थांमार्फत दुग्धव्यवसायाचा विकास करण्याचे धोरण यशवंतराव चव्हाण यांनी स्वीकारले.1958 मध्ये महाराष्ट्र शासनाने स्वतंत्र दुग्धविकास खात्याची निर्मिती केली. मुंबईला दूध पुरवठा करण्यासाठी वरळी याठिकाणी 1961 मध्ये दूध डेअरी तयार केली. त्यामाध्यमातून भारतीय दुग्धालय पदविका अभ्यासक्रम सुरू केला, "आज महाराष्ट्रात एवढ्या मोठ्या प्रमाणावर दुग्धव्यवसाय जो फोफावला आहे, त्याची बीजे यशवंतरावांनी सहकाराच्या माध्यमातून रुजवली होती.[11]

**सूतगिरणी व इतर सहकारी संस्था:-**

1960 मध्ये सहकारी सूतगिरण्यांना प्रोत्साहन देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. 1997 मध्ये महाराष्ट्रात 182 सूतगिरण्या होत्या. त्यामध्ये 1 लाख 78 हजार कामगार काम करीत होते........1970 मध्ये विणकर संस्थांची संख्या 41362 एवढी होती. हातमाग व्यवसायात सुमारे दहा लाख कुटुंबे गुंतलेली होती. [12]" महाराष्ट्राच्या समाजजीवनात विविध क्षेत्रातसहकाराने कसा प्रवेश केला आहे याची नोंद घेण्यासारखी आहे. कुंभारकाम करणाऱ्या 147 सहकारी संस्था, चर्मकार व्यवसायिकांच्या 82 सहकारी सोसायट्या, धोबी व रिक्षावाले यांचे सहकारी संघ, सहकारी केशकर्तनालय, 16 सहकारी दवाखाने व इस्पितळे, सहकारी तत्त्वावर चालणारी विद्यार्थी वस्तीग्रह व भोजनालये, तसेच सहकारी शिक्षण संस्था, फक्त महाराष्ट्रातच पाहायला मिळतात.[13]यावरून सहकाराची विचारसरणी महाराष्ट्रात किती खोलवर रुजली आहे याचा प्रत्यय येतो.

निष्कर्ष :-

महाराष्ट्रामध्ये सहकारी चळवळीचा पाया यशवंतराव चव्हाण यांच्या दूरदृष्टी नेतृत्वाने घातला होता.सहकाराच्या माध्यमातूनग्रामीण भागाच्याआर्थिक विकासाबरोबरच सामाजिक समता प्रस्थापित करून समाजाचा सर्वांगीणविकास करण्याच्या दृष्टीने यशवंतराव चव्हाण यांनी सहकारी चळवळीकडे पहिले. यशवंतराव चव्हाण यांच्या सहकार विषयक धोरणामुळेच आज महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणावर

सहकारी संस्था अस्तित्वात असून, अनेक तरुणांनासहकाराच्यामाध्यमातून रोजगाराच्या संधी मिळाल्या आहेत. सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून ग्रामीण भागाचाकायापालट झालेला आहे.एकूणच महाराष्ट्राच्या आर्थिक सामाजिक शैक्षणिक आणि सांस्कृतिक विकासामध्ये सहकारी चळवळीचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

**संदर्भसूची:-**

1. चव्हाण यशवंतराव, सह्याद्रिचे वारे, रोहन प्रकाशन, पुणे, 2014, पृ.क्र. 80-81.
2. नाईकवाडे डॉ. अशोक, (संपा ) महाराष्ट्राचे भाग्यविधाते यशवंतराव चव्हाण, विद्याभारती प्रकाशन, पृष्ठ क्र. 245.
3. मगर हरिश्चंद्र, महाराष्ट्राचे शिल्पकार शंकरराव मोहिते पाटील, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,पृष्ठ क्र. 113.
4. कित्ता. पृष्ठ क्र. 117.
5. नाईकवाडेडॉ. अशोक, उपरोक्त, पृष्ठ क्र. 253
6. नाईकवाडेडॉ. अशोक, उपरोक्त, पृष्ठ क्र. 253.
7. थोरात अनंत, ( लेख ) महाराष्ट्र विधानसभेची वाटचाल, महाराष्ट्र विधानसभा सुवर्ण महोत्सव स्मृतिग्रंथ, विधान भवन, मुंबई, 1988, पृष्ठ क्र. 44.
8. लोकराज्य, यशवंतराव चव्हाण स्मृती विशेषांक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, 1995, पृष्ठ क्र. 92.
9. डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन, उद्घाटन कार्यक्रम भाषण, 1960, पृष्ठ क्र. 2
10. दैनिक तरुण भारत, कोल्हापूर, 12 मार्च 1999.
11. वाघ रामनाथ, (संपा ) युगप्रवर्तक यशवंतराव, यशवंतराव चव्हाण व्यास्पीठ, अहमदनगर, 2008, पृष्ठ क्र. 42.
12. भोळे भा.ल., एन. डी. पाटील गौरव ग्रंथ, बदलता महाराष्ट्र, आंबेडकर अकॅडमी, सातारा, 2003, पृष्ठ क्र. 68 –69.
13. कित्ता, पृष्ठ क्र. 84.

# यशवंतराव चव्हाण यांच्या राजकारणाची दिशा आणि परिपूर्ती

डॉ. नामानंद गौतम साठे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,शि.म.ज्ञानदेव माहेकर महाविद्यालय कळंब जि. उस्मानाबाद.
ई.मेल आयडी.ngsathe11@gmail.com Mob. 9765256812

**प्रस्तावना:**

आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण लोकशाही मूल्यावर तसेच समाजवादी समाजरचनेवर झाली पाहिजे हे त्यांच्या विचार आणि कार्याचे मुख्य सूत्र होते. आयुष्यभर सत्ताधीश राजकारणी म्हणूनच ते वावरत असल्यामुळे राजकारणाच्या पर्यायाने सत्ताकारणाच्या माध्यमातूनच महाराष्ट्रात नवसमाज निर्मीतीचे उद्दिष्ट साकार होऊ शकते यावर त्यांची संपूर्ण कार्यशैली अधिष्ठित होती.

यशवंतराव चव्हाण यांच्या  राजकारणाची दिशा आणि परिपूर्ती या उपशीर्षकाला अनुसरुन मांडणी करताना दुसरा पैलू लक्षात घ्यावा लागतो तो असा की, यशवंराव यांच्या नेतृत्वगुणांत जे सामाजिक, राजकीय भान होते त्यात महात्मा फुले, वि. रा. शिंदे, शाहू महाराज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या गौरवशाली परंपरेला पुढे घेऊन जाणारी प्रचंड ऊर्मी होती. त्यातूनच प्रचंड व प्रबळ लोकनिष्ठा हे त्यांच्या सार्वजनिक जीवनाचे खास वैशिष्ट्य तयार झाले होते.

श्शोधनिबंधातील तिसरा अत्यंत महत्वाचा पैलू म्हणजे यशवंतराव चव्हाणांनी राजकारण आणि समाज यातील आंतरक्रिया बळकट करण्याचे प्रमाणिक प्रयत्न केले. त्यातूनच जातीअंतावर आधारित बहुजनवादी राजकारणाची, सामाजकारणाची दिशा निश्चीत झाली. राजकारण आणि राजकीय नेतृत्व या संकल्पनेच्या पारंपरिक व संकुचित परिभाषेला छेद देऊन संकुचित स्वार्थापलीकडे जाऊन राजकारणाला आणि नेतृत्वाला काही प्रयोजन असले पाहिजे असा जननिष्ठेवर आधारीत विचार महाराष्ट्राच्या समाजरचनेत रूजविण्याचा प्रयत्न केला.

प्रस्तुत लिखाणातील आणखी एका पैलूवर आधारित यशवंतराव चव्हाणाचे विचार आणि कार्य पर्यायाने त्यांची राजकारणातील दिशा समजावून घेणे क्रमप्राप्त ठरते. तो म्हणजे, प्राप्त झालेल्या राजकीय आयुधांचा अगदी प्रभावीपणे वापर करून त्या माध्यमातून सामजाच्या जडणघडणीचे प्रश्न सोडवता येतात यावर त्यांचा प्रचंड विश्वास होता.

वर निश्चित केलेल्या पैलूंना अनुसरून यशवंराव चवहण यांच्या राजकारणाची दिशा अगदी श्शास्त्रीय पध्दतीने मांडता येते. मात्र प्रस्तुत शोधनिबंधातील परिपूर्तीचा दुसरा भाग मांडण्यासाठी काही स्वतत्र  पैलू स्वीकारावे लागतात परिपूर्तीच्या अंगाने महाराष्ट्राच्या राजकारणाची वाटचाल आधोरेखित करण्यासाठी व काही निष्कर्षापर्यंत जाण्यासाठी मूल्यमापनात्मक आशयाला अनुसरून पुढील पैलू समोर ठेवण्यात आले आहेत.

१) यशवंराव चव्हाणांनी निश्चित केलेली दिशा व दाखविलेला मार्ग फारसा पुढे जाऊ शकत नाही.
२) यशवंराव चव्हाण यांनी आयुष्यभर अंगी बाळगलेल्या मूल्याधिष्ठित राजकारणाची नंतरच्या काळात प्रचंड उपेक्षा झाली.
३) त्यांनी राजकारणाची व नेतृत्वाची केलेली परिभाषा पुढील पिढीने धडपणे समजून घेतली नाही.
४) यशवंतरावांनी महाराष्ट्राच्या राजकारणात प्रस्थपित केलेला बहुजनवादी विचारप्रवाह सत्ताकारणातच अडकून पडला.
५) सामाजिक आणि आर्थिक विषमतेबद्दल चीड निर्माण करणारी कार्यकर्त्याची फळी आपण निर्माण करू शकलो नाही ही यशवंरावांनी व्यक्त केलेली खंत अगदी रास्त अशीच आहे.

**श्शोधनिबधाची व्याप्ती आणि मर्यादा :**

उपरोक्त शिर्षकाला अनुसरून श्शोधनिबंधाची मांडणी करताना लेखात यशवंराव चव्हाण यांच्या राजकारणातील नेतृत्वातील खालील काही विचार व कार्याचा सामावेश करण्यात आला आहे. शिवाय त्यांचे महाराष्ट्राच्या जडघडणीतील योगदान एवढ्यापुरतेच श्शोधनिबंधाचे अभ्यास क्षेत्र मार्यादित असल्यामुळे त्यांची राष्ट्रीय राजकारणातील भूमिका व कार्ये प्रस्तुत लेखात सामाविष्ट केली नाहीत. १९५६ – १९६२ या सहा वर्षाच्या कारकीर्दीतील घटना – घडामोडींना अनुसरून त्यांचा विचार व कार्याची चर्चा केली आहे.

**अ) महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपूर्वीचे राजकारण आणि परिपूर्ती :**

राज्यपुनर्रचना आयोगाच्या शिफारशीनंतर व्दिभाषिक मुंबई राज्याची निर्मीती झाली व १९५६ मध्ये यशवंतराव चव्हाण व्दिभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले हा काळ महाराष्ट्राच्या राजकारणात अत्यंत संवेदनशील व तेवढाच गंभीर अशा पेचप्रसंगांचा होता. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ऐन भरात आली होती. महाराष्ट्रापेक्षा नेहरू मोठे या यशवंराव चव्हाणाच्या वक्तव्यामुळे जनतेत प्रचंड संतापाची लाट उसळली होती. मात्र या पार्श्वभूमीवर त्यांनी जे स्पष्टीकरण दिले होते ते या कालखंडातील राजकीय नेतृत्वाने नीटपणे लक्षात घेतले पाहिजे. यशवंराव म्हणाले होते, गैरसमज असोत अथवा अविश्वासामुळे असो आपले म्हणणे जर आपले राष्ट्रीय नेते मान्य करत नसतील तर त्यांच्यावर न रागवता किंवा त्यांच्या विरोधात न जाता त्यांचा आपल्याबद्दलचा गैरसमज अथवा अविश्वास आपल्या कृतीने दूर करूनच आपण मन वळविले पाहिजे, त्यांना जिंकले पाहिजे आणि मला विश्वास वाटतो की, याच पध्दतीने मराठी भाषिकांचे स्वतंत्र राज्य आपण मिळवू शकू म्हणून माझ्या भूमिकेत मुळीच महाराष्ट्राचा व्देष नाही.

यशवंतरावाचे वरील विधान खरे ठरले. पंडित नेहरूंचे मत परिर्वन करण्यात त्यांना यश आले व महाराष्ट्र समितीचे योगदान नाकरण्याचे मुळीच प्रयोजन नाही. मात्र गुणसंपन्न राजकारणाला प्राधान्य देऊनच सामाजाच्या विकासाचे प्रश्न सुटू शकतात हे त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले हे देखील नाकारता येणार नाही. व्दैभाषिकांची हेलकावे खाणारी नौका त्यांनी अगदी सुरक्षितपणे सुयुक्त महाराष्ट्र निर्मीतीच्या किनाऱ्यावर आणून सोडली.

संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात यशवंतरावांच्या नेतृत्वांचा कस लागला. श्रीपाद अमृत डांगे, प्र.के. अत्रे, एम.एम. जोशी, उध्दवराव पाटील असे दिग्गज नेते विरोधात गेलेले असताना त्यांनी अगदी धैर्याने तोंड दिले. यशवंतरावांचा संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मीतीला विरोध होता. हा आरोप घटनाक्रमाच्या वरवरच्या अभ्यासातून आलेला आहे. संयुक्त महाराष्ट्र निर्मीतीबद्दल त्यांची भूमीका किती विकासाभिमुख होती हे त्यांच्या पुढील वक्तव्यावरून स्पष्ट होते.

राष्ट्रीय प्रवाहापासून महाराष्ट्र वेगळा राहीला तर आपल्या राज्यांची प्रगती खुंटेल. मात्र व्दिभाषिक मुंबई राज्याचे त्यांनी कधीच समर्थन केले नव्हते हे लक्षात घेतले पाहीजे. १९५२ – ५६ या चार वर्षात मोरारजी प्रशासनाने संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन अगदी निर्दयपणे दडपून टकाण्याचा प्रयत्न केला होता. १०५ हुतात्मे झाले होते. मुंबई राज्यात मराठी भाषिकांचा प्रचंड असंतोष होता व पार्श्वभूमीवर यशवंतरावांनी व्दिभाषीक मुंबई राज्याचे मुख्यमंत्रीपद एक आव्हान म्हणून स्वीकारले होते. मी बंदुकीची एक ही गोळी न वापरता हे राज्य चालवणार आहे असे ते म्हणाले होते.

आज यशवंतराव यांच्या मुल्यधिष्ठित व गुणसंपन्न राजकारणाची प्रचंड ऊपेक्षा झालेली आहे. त्यावर अगदी सोप्या भाषेत विधान करताना आपल्या यशवंतराव ते विलासराव या ग्रंथात मधुकर भावे लिहतात, यशवंराव पाच वर्षाचे असताना पंढरपूरला गेले होते. त्यांच्या आईने यशवंतरावाच्या मामांना सांगीतले होते की, यशवंताचे बोट अगदी घट्ट पकड, तो गर्दीत भरकटेल त्यांच्या मामाने यशवंतरावाचे बोट अगदी घट्ट पकडले यशवंतराव गर्दीत भरकटले नाहीत पण महाराष्ट्राने मात्र यशवंतरावाचे पकडलेले बोट सोडले म्हणून आज महाराष्ट्र काहीसा भरकटलेला दिसतो.

**ब)संयुक्त माहाराष्ट्राच्या निर्मीतीनंरचे राजकारण : दिशा आणि परिपूर्ती**

द्वैभाषिक मुंबई राज्याचे विभाजन होऊन १ मे १९६० रोजी स्वतंत्र माहाराष्ट्राची निर्मीती झाली. साहाजिकच राज्यकारभार सरू केला. १९६० – ६२ अशी केवळ दोन वर्षे त्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद सांभाळले असले तर या अल्पावधीतच आपल्या कार्यकतृत्वाचा स्वतंत्र ठसा उमटविला. त्यांनी महाराष्ट्राची जडणघडण अत्यंत विधायक, रचनात्मक तसेच लोकभिमुख पद्धतीने करण्यासाठी विचार आणि कृती कार्यक्रम अशा दोन्ही आघाड्यावर जे कार्य केले त्याचे विवेचन खालील उपशीर्षकाच्या अंतर्गत करता येईल.

१)बहुजनवादी राजकारणाची दिशा आणि परिपूर्ती.

२)कषी औद्योगिक समाजरचनेची पायाभरणी.

३)सहकार आणि विकेंद्रीकरणाला प्राधान्य.

४)प्रादेशिक एकात्मतेचे राजकारण आणि सामाजिक ऐक्याचा विचार.

५)शिक्षण आणि शिक्षणाचे बहुजनीकरण.

६)भावी नेतृत्वाला दिशादर्शन.

यशवंतराव चव्हाणांची राजकीय वाटचाल अत्यंत कर्तृत्वसंपन्न होती. आपल्या आयुष्यात त्यांनी अनेक पदे उपभोगली, यापेक्षाही समाजातील अनेक आघाड्यांवर जे प्रबोधन व कार्य केले ते अत्यंत मौलिक स्वरूपाचे आहे. राष्ट्रीय ऐक्यभाव, सामाजिक समता, आर्थिक विषमतेला विरोध, अस्पृश्यता, जातिभेदाला विरोध, साहित्य, शिक्षण, शेती, सहकार पर्यायाने कृषी – औद्योगिक समाजाची उभारणी करण्याचा त्यांचा ध्यास इ. प्रशासनांबाबत त्यांनी मांडलेले विचार व राबविलेल्या योजना आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघणीत व नवसमाज रचनेच्या प्रक्रियेत अत्यंत प्रस्तुत व तेवढ्याच विकासान्मुख सिद्ध झालेल्या आहेत.

**समारोप :**

यशवंतराव चव्हाण यांच्या राजकारणाची दिशा आणि परिपूर्ती या उपशीर्षकांर्तत प्रस्तुत श्शोधनिबंधाची मांडणी करण्यात आली. मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाल्यापासून म्हणजे १९५६ पासून आयुष्याच्या श्शेवटपर्यत म्हणजे १९८४ पर्यत अशी तब्बल तीन दशके त्यांनी माणसाच्या मनावर राज्य केले. त्यांचा विचार व कार्याचे अनेक पैलू आहेत. हे लक्षात घेऊन या लेखात त्यांच्या राजकारणाची दिशा आणि परिपूर्ती महाराष्ट्र संदर्भ एवढाच भाग मांडणीची मर्यादा निश्चित केली होती. या बहुआयामी व्यक्तीमत्वाचे, नेतृत्वाचे महाराष्ट्राच्या उभारणी पर्यायाने राजकीय – आर्थिक विकासातील योगदान अगदी तटस्थपणे व तेवढ्याच वस्तुनिष्ठ पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न केला. त्यांनी आखून दिलेल्या राजकारणाची परिपूर्ती पुढील काळात कितपत होऊ शकली हा प्रस्तुत शोधनिबंधातील एक प्रमुख पैलू होता व त्यास अनुसरून काही गृहीत कृत्ये स्वीकारण्यात आली होती. १९५६ ते १९६२ या अवघ्या सहा वर्षात त्यांनी महाराष्ट्राला जे वळण दिले, जो मार्ग दाखवला त्याची उपयुक्ता तर वादावादीत आहेतच परंतु महाराष्ट्राचा मागील चार दशकांचा प्रवास यशवंतराव चव्हांणांनी आखून दिलेल्या मार्गनुसार झाला आहे काय ? या प्रश्नाचे उत्तर श्शोधत गृहीत कृत्यांची तपासणी करावी लागेल.

प्रत्यक्ष परिणाम हीच राज्यकारभाराची व समतेची कसोटी असली पाहिजे या तत्वावर श्रद्धा आणाऱ्या यशवंतराव चव्हाणांच्या राजकारणाची पुढील काळातील वाटचाल फारशी समाधानकारक झाली नाही. नितीमान व गुणसंपन्न राजकारण या मुल्याचे भयंकर वावडे आजच्या राजकारणात निर्माण झाले आहे. अपेक्षा आणि वस्तुस्थिती यात प्रचंड दरी निर्माण झाली. यशवंतराव चव्हाणांना राजकारणात अभिप्रेत असलेली बौद्धिक, वैचारिक प्रेरणा कॉग्रेसी राजकारणाच्या भावविश्वात लुप्त झाली. बहुतांश राजकीय पक्षांना बुद्धविरोधाने ग्रासल्यामुळे सवंग लोकप्रियता हेच राजकारणाचे प्रमुख अधिष्ठान बनले. सहकार क्षेत्रे व स्थानिक स्वराज्य संस्था ग्रामीण नेतृत्वाच्या पाठशाळा बनतील असा विश्वास त्यांनी बाळगला होता. मात्र या संस्था पाठशाळा न बनता निवडणूक राजकारणाचे आखाडे बनल्या. ही सुद्धा यशवंतराव चव्हाणांच्या नीतिप्रवण राजकारणाची झालेली घोर उपेक्षाच म्हणावी लागेल.

लोकांचे समाधान हीच चांगल्या राजकारभाराची एकमेव कसोटी असते असा लोककल्याणकारी विचार त्यांच्या राजकारणात अंतर्भूत होता. कोणत्याही समाजातील कतृत्वान मुनष्य हा समाजाला सोडून कर्तृत्व करू शकत असे त्यांनी म्हटले होते. या वैचारिक पार्श्वभूमीवर आज आपल्यास सार्वजनिक जीवनात काय अवस्था आहे. हरित क्रांतीचे लाभधारक घटक कोणते ? हे तपासून पाहण्याची वेळ आलेली आहे ? सहकार क्षेत्राच्या माध्यमातून शेतकऱ्यांचा कायापलट होईल ही त्यांची आपेक्षा कितपत फलद्रूप झाली हा एक संशोधनाचा विषय होईल. त्यांनी शेवटच्या श्श्वासापर्यत महाराष्ट्राचे हित पाहण्याचे काम केले.

**संदर्भ सुची :–**

१) नाईकवाडे अशोक:– आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद. २००९.

२) भोळे भास्कर लक्ष्मण:– यशवंतराव चव्हाण राजकारण आणि साहित्य, साकेत प्रकाशन पुणे, २००६.

३) पारकर रमाकांत:– महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण, वार्ताहार दर्शन, पान २ दि. ३/४/२००६.

४) पाटील विठ्ठलराव:– महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंराव चव्हाण, महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळ पुणे, २००५.

# यशवंतराव चव्हाणांचे शैक्षणिक क्षेत्रातील कार्य

**प्रा.डॉ.शिवाजी गोविंदराव दिवाण**
सहयोगी प्राध्यापक,राज्यशास्त्र विभाग महिला महाविद्यालय,गेवराई ता.गेवराई जि.बीड (महाराष्ट्र)
मो.नं.९४२३४७००८९ Email- shivajidiwan@gmail.com

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र ते दिल्ली असा अलौकिक प्रवास करणारा महाराष्ट्राचा तत्वचिंतक नेता मा.यशवंतराव चव्हाण यांच्या जीवन पैलूंची विविधता ही अलौकिक आहे. आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून त्यांचा उल्लेख केला जातो. त्यांनी महाराष्ट्राच्या विकासाचा पाया घातला व त्यामुळेच महाराष्ट्राची ओळख संपूर्ण देशात एक प्रगतीशील राज्य म्हणून पुढे आली.

यशवंतराव चव्हाण हे एक धोरणी, नम्र, सुसंस्कृत, साहित्यिक,विद्वान आणि राजकारणातील एक आदर्श असे नेतृत्व होते. यशवंतराव चव्हाण हे युगपुरुष होते. काही माणसे पदामुळे मोठी होतात, तर काही माणसांच्या मोठेपणामुळे त्या पदाला झळाळी प्राप्त होते. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाला यशवंतराव चव्हाणांच्या बाबतीत हेच सत्य आहे की, महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाला त्याच्यांमुळे मोठेपण प्राप्त झाले.

आधुनिक काळात शिक्षण, समाजकारण, राजकारण, अर्थकारण, सिंचन, कृषी आणि साहित्य क्षेत्रामध्ये त्यांच्या पाऊलखुणा आजसुध्दा उमटलेल्या दिसून येतात. एकाचवेळी कला, सहकार, औद्योगिक विकास, वाचनसंस्कृती, समाजप्रबोधन आणि प्रशासन अशा असंख्य क्षेत्रात स्वत:ची छाप उमटविली. आजच्या जागतिकीकरणाच्या काळात महागडे होत जाणारे शिक्षण, शिक्षणातून आपली जबाबदारी झटकणारे शासनाचे धोरण आणि वंचितांच्या शिक्षणाचा निर्माण झालेला प्रश्न भविष्यात गंभीर स्वरुप धारण करेल. या पार्श्वभूमीवर यशवंतरावांच्या शैक्षणिक भूमिकेची राज्याला आणि देशाला नितांत गरज आहे.

राज्याच्या भौतिक विकासासोबत सामाजिक आणि सांस्कृतिक विकास ही तितकाच महत्त्वाचा आहे. भौतिक प्रगतीसाठी मानवी संसाधनांची आवश्यकता असते आणि मानवी संसाधनाचा विकास शिक्षणाशिवाय होऊ शकत नाही. म्हणून त्यांनी राज्याच्या शिक्षणावर आपले लक्ष केंद्रीत करुन येथील शैक्षणिक व्यवस्थेला मोठी गती आणि दिशा दिली. परिणामी, महाराष्ट्रात शिक्षणाचा मोठा प्रचार आणि प्रसार झाल्याचे दिसून येते. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वातंत्र्यपूर्वकाळात शिक्षणाबाबत ज्या भूमिका घेतल्या, मांडल्या आणि कृतीत उतरवल्या त्या भूमिकेचेच प्रकटीकरण करण्याचे कार्य यशवंतरावानी केले.

ज्याप्रमाणे इतिहास माणसाला घडवतो त्याचप्रमाणे यशवंतरावांनी माणसे घडविण्याचे काम केले. यशवंतराव हे उदारमतवादी शिक्षणाचे समर्थक होते. शिक्षण ही एक गती आहे. या गतीलाच प्रगतीचे पंख फुटतात. शिक्षणासारखे समाजपरिवर्तनाचे दुसरे समर्थ साधन नाही. विषमता, अज्ञान, अंधश्रध्दा, रुढीप्रियता यासारख्या सामाजिक रोगांवर तर शिक्षणाशिवाय अन्य इलाज नाही. यासाठी ते सगळयांना समानतेने शिक्षण मिळाले पाहिजे, शिक्षणाची संजीवनी समाजाच्या सर्व स्तरापर्यंत पोहचली पाहिजे. शिक्षणासारख्या मूलगामी विषयावर यशवंतराव अत्यंत तळमळीने विचार व्यक्त करतात.

**उद्दिष्टे :**

१) यशवंतराव चव्हाण यांच्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास करणे.
२) यशवंतराव चव्हाणांच्या सर्वांगीण कार्याचा आढावा घेणे.
३) यशवंतराव चव्हाण यांच्या शिक्षण विषयक विचारांचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोधनिबंध लिहिण्यासाठी दुय्यम साधनांचा वापर करण्यात आलेला आहे. त्यासाठी संदर्भ ग्रंथ, पुस्तके, मासिके, वृत्तपत्रे इ.साधनांचा उपयोग करण्यात आलेला आहे.

**गृहितके :**

१) यशवंतराव चव्हाणाच्या शैक्षणिक विचारांमध्ये शास्त्रीय दृष्टीकोन होता.
२) यशवंतराव चव्हाणांच्या प्राथमिक, माध्यमिक व विद्यापीठ स्तरावर शिक्षणाचा भर अधिक होता.

३) यशवंतराव चव्हाणांनी शैक्षणिक विचारांमध्ये तांत्रिक शिक्षणाला महत्व दिले होते.

**यशवंतराव चव्हाणांचे शैक्षणिक विचार :**

"शिक्षण म्हणजे शिक्षीत व्यक्तीला स्वत:भोवती घडणाऱ्या गोष्टी व ज्यामध्ये घडणाऱ्या इतर गोष्टींची ज्यामुळे काही संगती लावता येते, ज्यांचा योग्य अर्थ समजावून घेता येतो आणि ज्याचा परिणाम आपल्या जीवनावर व व्यक्तीमत्त्वावर काय घडतो हे समजावून घेता येते व समजावून देता येते ते शिक्षण होय."

अशाप्रकारे यशवंतराव चव्हाणांनी शिक्षणाचे गमक, महत्त्व तसेच आवश्यकता अतिशय सोप्या शब्दांमध्ये मांडली. अलिगड मुस्लिम विद्यापीठाच्या पदविदान समारंभामध्ये दिक्षांत भाषणामध्ये यशवंतराव चव्हाण म्हणाले, शिक्षण प्रसार, प्रौढ मतदान पध्दतीबरोबर येणारी गोष्ट असून प्रौढ मतदान पध्दती लोकशाही कारभाराचा पाया आहे.

शिक्षणांची व्याख्या करताना यशवंतरावांनी म्हटले आहे, "ज्ञान केवळ पुस्तकातूनच मिळते असे नाही, ज्यामुळे ज्ञानाचा पाठलाग करण्याची, ज्ञानाची सफर पूरी करण्याची शक्ती, दृष्टी माणसात निर्माण होते ते शिक्षण होय."

यापुढे जाऊन यशवंतराव म्हणत की, "विद्येच्या मंदिरात कसलाही भेद असू नये, ज्ञानामृताची तहान प्रत्येकाला लागली पाहिजे, समाजवादी समाजरचनेत हे तत्व प्रमुख मानले पाहिजे."

**यशवंतरावांचे शैक्षणिक कार्य :**

**अ) प्राथमिक शिक्षण :**

भारतीय राज्यघटनेतील वयाच्या १४ व्या वर्षापर्यंतच्या सर्व मुला-मुलींना सक्तीच्या व मोफत शिक्षणाच्या मार्गदर्शक तत्वांचा कार्यक्षमपणे अंमल हा सर्वराज्याच्या शिक्षणविषयक धोरणाचाच अविभाज्य भाग ठरावा, असे यशवंतरांवाना वाटे. प्राथमिक शिक्षणापासून समाजातील कुणी वंचित राहू नये यासाठी त्यांनी खालील निर्णय घेतले.

१) गाव तिथे प्राथमिक शाळा

२) प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे दिले जावे.

३) विद्यार्थ्यांचा प्राथमिक शिक्षणातून ज्ञानाचा पाया पक्का व्हावा यासाठी प्राथमिक शाळांच्या स्वतंत्र इमारती बांधण्यात आल्या पाहिजेत.

४) प्रशिक्षणाच्या माध्यमातून प्राथमिक शिक्षकांना प्रशिक्षित करावे.

५) पाचवी वर्गापासूनच इंग्रजी शिक्षणाचा प्रारंभ करण्यात यावा.

**आ) माध्यमिक शिक्षण :**

१) शाळांचे जाळे निर्माण झाले पाहिजेत, या उद्देशाने शाळा उघडण्याची परवानगी खाजगी संस्थांनाही देण्यात आली व अशा संस्थांना सरकारी अनुदानावर मान्यता देण्यात आली.

२) ७ मार्च १९६० रोजी पुणे येथे या धर्तीवरच एस.एस.सी. बोर्डाची स्थापना झाली.

३) माध्यमिक शिक्षण मंडळाकडे शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या तज्ञ अशा अधिकारी सेवकांचे एक पार्लमेंट, संसद म्हणून मी पाहतो असे ते म्हणत.

४) तांत्रिक शिक्षणाचे जाळे निर्माण करण्याची सोय करण्यात आली.

५) माध्यमिक शिक्षण हा एकूण सर्व शिक्षणाचा गाभा होय.

६) हुशार विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या बाबतीत कोणत्याही प्रकारे अडचणी येऊ नयेत म्हणून शिष्यवृत्या वगैरे मागणी सर्व प्रकारे सहाय्य करण्यात येईल. रु.१२०० वार्षिक उत्पन्न खालील सर्वांना ईबीसी ची योजना लागू करण्यात येईल. पुढे उत्पन्न मर्यादा ४८०० रुपयापर्यंत वाढली.

**इ) उच्च शिक्षण :**

१) २३ ऑगस्ट १९५८ मध्ये मराठवाडा मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे स्थापन करुन त्याचे उद्घाटन पंडित नेहरु यांच्या हस्ते करण्यात आले.

२) महाराष्ट्राचा कृषी क्षेत्रात विकास व्हावा म्हणून इ.स.१९५९ मध्ये १४ शेतकी महाविद्यालये स्थापन करण्यात आली. यातून कृषी महाविद्यालयाची कल्पना पुढे आली.

३) ५० लाख रुपयांची तरतूद करुन १८ नोव्हेंबर १९६२ रोजी कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठांची स्थापना ही यशवंतरावाची देण होय.

४) सांगली, बार्शी, पंढरपूर, वेंगुर्ले, उरण, इस्लामपूर, वाई या ठिकाणी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये सुरु करण्यात आली.

५) औरंगाबाद व कराड तसेच नागपूर येथे अभियांत्रिकी महाविद्यालये सुरु करण्यात आली.

६) गरीब, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्तीची अंमलबजावणी करण्यास मान्यता दिली.

७) औरंगाबाद येथे स्वतंत्र वैद्यकिय महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली.

८) आदिवासी मुला-मुलींसाठी निवासी आश्रमशाळेची तरतूद करण्यात आली. शिक्षणाविषयी यशवंतरावाची भूमिका किती व्यापक होती ते त्यांच्या वाक्यावरुन कळते, "मी महाराष्ट्राचा मुख्यमंत्री होतो, केंद्रात संरक्षणमंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री आणि परराष्ट्र मंत्री या नात्याने प्रदिर्घ काळ काम करण्याची संधी मला मिळाली, पण शिक्षण मंत्री होण्याची संधी मला मिळाली नाही."

**समारोप :**

स्वतः प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन यशवंतराव चव्हाणांनी महाराष्ट्रात अनेक शैक्षणिक संस्था उभारण्यात महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. अष्टपैली व्यक्तीमत्व असणारे महाराष्ट्रातील लोक कर्तृत्वाचे महानायक यशवंतराव चव्हाण यांनी शैक्षणिक क्षेत्रात व्यापक धोरण आखून महाराष्ट्रात ज्ञानगंगा घरोघरी पोहचविली.

**संदर्भ :**

१) ना.धो.महानोर,'यशवंतराव चव्हाण' साकेत प्रकाशन, बाबा भांड, प्रा.लि.११५ म.गांधीनगर, औरंगाबाद.
२) युगंधर नेते यशवंतराव चव्हाण - संपादक बा.ह.कल्याणकर
३) यशवंतराव चव्हाण - भास्कर लक्ष्मण भोळे
४) यशवंतराव ते विलासराव- मधुकर भावे, मनोविकास प्रकाशन पुणे
५) कृष्णाकाठ - यशवंतराव चव्हाण
६) ऋणानुबंध - यशवंतराव चव्हाण
७) सह्याद्रीचे वारे - यशवंतराव चव्हाण
८) भारतीय राजकीय विचारवंत - प्रा.डॉ.ज.रा.शिंदे
९) आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान - डॉ.व्ही.एल.एरंडे
१०) लोकराज्य - यशवंतराव चव्हाण स्मृती विशेषांक- महाराष्ट्र शासन
११) शिक्षणतज्ञ-यशवंतराव चव्हाण- डॉ.जे.ए.धायगुडे
१२) यशवंतराव चव्हाण-डॉ.गंगाधर कायदे पाटील, चैतन्य पब्लिकेशन, नाशिक
१३) यशवंतराव चव्हाण यांचे महाराष्ट्राच्या जडण घडणीतील शैक्षणिक योगदान-डॉ.सुरेखा शिंदे, संपादक, डॉ.प्रतिभा पाटील-एज्युकेशन पब्लिशिर्स औरंगाबाद.
१४) यशवंतराव कर्तृत्व आणि नेतृत्व-शंकर सारडा, दिलीपराज पुणे-०३
१५) यशवंतराव एक इतिहास - जोशी रामभाऊ प्रतिभा प्रकाशन परभणी.

# यशवंतराव चव्हाण यांचे महाराष्ट्रातील कृषी क्षेत्रातील योगदान

कु. भाग्यश्री श्रीकृष्णराव गाडगे
संशोधक विद्यार्थी नारायणराव राणा महाविद्यालय बडनेरा (रेल्वे), अमरावती.
मो. नं. 9403612849ईमेल- gadgebhagyashri@gmail.com

**प्रास्ताविक -**

आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणीत ज्या थोर व्यक्तींनी प्रयत्न केले. त्यामध्ये सिंहाचा वाटा असणारे, आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, महाराष्ट्रातील चळवळीचे एक खंदे शिलेदार, महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री, भारताच्या राजकीय क्षेत्रात विविध पदाचा पदभार सांभाळणारे, दूरदृष्टीचे नेता, अष्टपैलू व्यक्तिमत्व म्हणजे यशवंतराव चव्हाण. महात्मा ज्योतिबा फुले आणि वडीलबंधू गणपतराव चव्हाण यांच्या सामाजिक व आर्थिक विषमता दूर करण्याचा कार्याची प्रेरणा घेत त्यांना एक नवी दृष्टी मिळाली. महाराष्ट्राला समृद्ध बनवायचे असेल तर इथली आर्थिक प्रगती साध्य करायला हवी हे त्यांनी हेरले. इंग्रजांच्या आर्थिक धोरणामुळे बहुसंख्य लघु व कुटीर उद्योगांचा ऱ्हास होऊन येथील कारागीर हे प्रचंड प्रमाणात शेती क्षेत्राकडे वळले. पर्यायाने महाराष्ट्र राज्यामध्ये बहुसंख्य शेतकरी व शेतीवर आधारित मजूर वर्ग तयार झाला. त्यामुळे शेती क्षेत्रात छुपी बेकारी निर्माण होऊन बेरोजगारांची समस्या तीव्र बनवून त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला. जर महाराष्ट्राला आर्थिकदृष्ट्या संपन्न करायचे असेल तर तिथली शेती समृद्ध करणे हा एकमेव प्रभावी उपाय त्यांना दिसू लागला. शेतीच्या समृद्धीसाठी जलसिंचन, शेतीचे आधुनिकीकरण, सहकारी उद्योग, पतपुरवठा इत्यादी बाबी अत्यावश्यक असल्याने त्यादृष्टीने त्यांनी विशेष प्रयत्न करून महाराष्ट्रातील शेती आणि शेतकरी यांच्या प्रगतीसाठी नानाविध प्रयत्न केले. या प्रयत्नांचा यथोचित आढावा घेणे हा या शोधनिबंधाचे उद्देश आहे.

**संक्षिप्त परिचय -**

यशवंतराव बळवंतराव चव्हाण यांचा जन्म दि. 12 मार्च 1913 मध्ये महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातील देवराष्ट्रे या गावी झाला. त्यांचे बालपणापासून ग्रामीण भागामध्ये वास्तव्य असल्याने त्यांना ग्रामीण भागातील समस्यांची जाण होती; तिथला समाज, शेतकरी, शेतमजूर यांची परिस्थिती त्यांनी जवळून अनुभवली होती. भाई माधवराव यांनी त्यांच्या **'माझे यशवंतराव चव्हाण'** या ग्रंथामध्ये नमूद केले आहे की, "यशवंतराव हे स्वतः उत्तम शेतकरी होते तसेच त्यांना शेतकरी व कामगार वर्गाच्या शोषणाची जाणीव होती."

महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली तेव्हा महाराष्ट्र हा आर्थिकदृष्ट्या विपन्नावस्थेत होता. संपूर्ण देशात अन्नधान्याची प्रचंड टंचाई होती. भारताने 1951 पासून पंचवार्षिक योजना राबविण्यास सुरुवात झाली. दोन्ही पंचवार्षिक योजनांमध्ये शेतीवर विपुल प्रमाणात भर देण्यात आला असूनही पाहिजे त्या प्रमाणात यश मिळाले नव्हते. देशांमध्ये असलेली अन्नधान्याची टंचाई ही कायम असल्याने अन्नधान्याची आयात करावी लागत होती. या पार्श्वभूमीवर 1960 च्या दशकात डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांनी हरितक्रांती घडवून आणली. ती बऱ्याच प्रमाणात यशस्वी झाल्याने चित्र निर्माण झाले परंतु ही हरितक्रांती काही मोजक्याच पिकांच्या बाबतीत यशस्वी झाली. विशेषत: तांदूळ आणि गहू या पिकाच्या बाबतीतच हरितक्रांती प्रचंड प्रमाणात यशस्वी झाली. हरितक्रांतीमुळे देशाची अन्नान झालेली स्थिती बदलून संपूर्ण देशाचे चित्र परिवर्तीत होईल असे वाटायला लागले. परंतु हरितक्रांती त्याच ठिकाणी प्रभाव ठरली होती जिथे मुबलक प्रमाणात जलसाठा, सिंचनाच्या सोयी उपलब्ध होत्या. त्यामुळे महाराष्ट्र राज्यात मोठा पेच निर्माण झाला. महाराष्ट्रातील बहुसंख्य भूभाग डोंगराळ व मुरमाड जमिनीचा असल्याने तसेच तेथे सिंचनाच्या सुविधा ही उपलब्ध नसल्याने येथील शेती आणि शेतकरी विवंचनेत आला. त्यावर तोडगा काढून महाराष्ट्राला संपन्न बनविण्यासाठी शेतीच्या संपन्नतेसाठी यशवंतराव चव्हाण यांनी नद्यांच्या पाण्याचा शेतीसाठी

वापर आणि नद्यांवर धरणे बांधली पाहिजे हा विचार मांडून त्यावर प्रभावी अंमलबजावणी करतानाच त्यांच्या प्रयत्नातून महाराष्ट्राची भाग्यरेषा म्हणजेच कोयना धरणाची निर्मिती झाली.

**यशवंतराव चव्हाण यांचे कृषी क्षेत्रातील योगदान -**

महाराष्ट्राचे भाग्य उजळून टाकणाऱ्या कोयना प्रकल्पाची सुरुवात ही सन 1901-1902 पासून झाली. दक्षिणेच्या विशिंडा पर्वत शिखरावर सुमारे 1350 मीटर उंचीवर कोयना नदी उगम पावते. कोयनेच्या खोऱ्यात जलविद्युत प्रकल्प उभारण्यासाठी 1917 ते 1924 दरम्यान सर्वेक्षण करण्यात आले. 1940 मध्ये एक समिती स्थापन झाली. दि. 16 जानेवारी 1954 मुंबई प्रांताचे तत्कालीन मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांच्या हस्ते कोयना प्रकल्पाचे भूमिपूजन झाले. तत्कालीन मुंबई राज्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते दि. 1 मे 1958 रोजी धरणाच्या कामास व जलविद्युत योजनेस प्रारंभ झाला. या योजनेतील पहिले जनित्रही दि. 16 मे 1962 रोजी यशवंतराव चव्हाण यांच्याच हस्ते सुरू झाले. 1964 पर्यंत या धरणाचे बांधकाम पूर्ण झाले. सन 1962 पासून आज पर्यंत कोट्यावधी युनिट वीज निर्मिती बरोबरच हजारो हेक्टर शेतजमीन या प्रकल्पामुळे सिंचनाखाली आली. कवी यशवंत यांनी कोयना धरणाचे यथार्थ असे वर्णन त्यांच्या कवितांमधून केलेले आपल्याला दिसून येते ते म्हणतात,

"तुडुंबली ही इथे कोयना। विशाल जणू मांडीला आयना ॥
डोकावूनी हो यात पहा ना। भवितव्य महाराष्ट्राचे ॥
या इथे निरखुनी घ्यावा। आनंदवनभुवनी या ॥"

असे म्हटले जाते की, महाराष्ट्राचे भवितव्य कोयना धरणानेच घडविले ते कवी यशवंत यांच्या वरील कवितेच्या ओळींमधून प्रत्ययास येते.

यशवंतराव चव्हाणांनी सामाजिक शांतता व सामाजिक न्यायाच्या दृष्टिकोनातून शेतीचा विकास केला. त्यांनी शेतीच्या मालकी हक्काचा प्रश्न, भूमिहीनांचा प्रश्न तसेच शेती विकासासाठी उपाय यावर अधिक भर दिला. तसेच सरकारनेही या बाबींकडे लक्ष द्यावे, शेतीकडे सकारात्मक दृष्टीने पाहणे किती महत्त्वाचे आहे हे पटवून दिले. शेतकरी हा देशाचा अन्नदाता असल्याने जर शेतकरी आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागासलेला राहिला तर तो विपन्नावस्थेत जाऊन आत्महत्येचा मार्ग स्वीकारेल असे भाकीत त्यांनी केले होते. त्यामुळे शेतकरी हा शेत जमिनीचा मालक असावा अशी त्यांची भूमिका होती. शेती सुधारायची असेल तर प्रथम शेतकरी शहाणा झाला पाहिजे म्हणूनच त्यांनी राज्यात शेती शाळा, शेतकी महाविद्यालय सुरू केले. तसेच महात्मा फुले कृषी विद्यापीठाची स्थापना राहुरी येथे केले. राज्यामध्ये जिल्ह्याच्या ठिकाणी कृषी विद्यापीठ स्थापन करावे या बाबत ते म्हणतात, "कृषी विद्यापीठामार्फत माझ्या शेतकऱ्याचा मुलगा जागतिक शेतीशी स्पर्धा करु शकेल; शेतीमध्ये अनेक प्रतिभावान संशोधक निर्माण झाल्याने शेतीक्षेत्र आणि ही मरगळलेली शेती याला नवसंजीवनी मिळून शेती संपन्न होईल."

भारतात शेती क्षेत्रात भूमिहीनांची संख्या अधिक असल्याने आचार्य विनोबा भावे यांनी भूदान चळवळ केली. या चळवळीचा यशवंतराव चव्हाण यांनी ही पुरस्कार केला म्हणून वाजवीपेक्षा अधिक जमीन असणाऱ्या जमीनदार लोकांनी त्यांच्या जमिनीचा एक ते दोन टक्के भाग भूमिहीनांना द्यावा अशी भूमिका मांडली. त्यामुळे त्यांना प्रचंड टीकेला व रोषाला सामोरे जावे लागले परंतु या सर्व बाबींचा त्यांनी विचार केला नाही.

महाराष्ट्र विकसनशील असल्याने इथली बरीच शेतजमीन ही अनुत्पादित व पडित होती. अशा शेतजमिनी लागवडीखाली आणणे अगत्याचे होते. त्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले त्यांच्या प्रयत्नाने महाराष्ट्रातील बरीच जमीन उत्पादनासाठी सक्षम बनवण्यात आले.

मुंबई राज्यात नवा कुळ कायदा लागू करून कसेल त्यांना शेत शेतात हे तत्त्व स्वीकारले. त्यामुळे महाराष्ट्रातील शेती क्षेत्रात जमीन मालकीच्या क्षेत्रात प्रचंड क्रांती घडवून आली. 1 एप्रिल 1959 पासून **तुकडेबंदी व तुकडे तोड हा कायदा** प्रत्यक्षात लागू केला. या कायद्याने उपलब्ध झालेल्या शेत जमिनीवर पिके घेण्यासाठी 'महाराष्ट्र कृषी मंडळ' स्थापन केले. शेतीलाही शेत जमिनीचे क्षेत्र सलग होण्याच्या दृष्टीने या कायद्याच इष्ट असाच परिणाम झाला. खास करून जमीनदारी पद्धत नष्ट करण्याचा कायदा अंमलात आणून राज्यातील जहागीरदारी पद्धत नष्ट केली. भारतीय शेतीचे आधुनिकीकरण व्हावे या मताचे ते पुरस्कर्ते होते. त्यांनी शेतीच्या आधुनिकीकरणाच्या मार्गातील अडथळयांना दूर करण्याचा प्रयत्न केला.

ISSN : 2278-9308
March, 2021

यशवंतराव चव्हाण हे समतोल विकासाचे पुरस्कर्ते होते त्यांनी विविध योजना आखतांना अविकसित विभागांचा आधी विचार केला. ग्रामीण औद्योगीकरण याबाबत ते म्हणतात की, "ग्रामीण भागात उद्योग सुरू करून शेती आणि उद्योग यांची सांगड घालायला हवी त्यामुळे ग्रामीण भागातून शहरी भागात जाणारा श्रमिकांचा ओढा कमी होईल. ग्रामीण भागात त्यांच्या रोजगाराची समस्या कायमस्वरूपी मिटल्याने ते ग्रामीण भागात राहून शेतीच्या विकासासाठी प्रयत्नरत होऊन शेती क्षेत्रात नवनवीन प्रयोग करुन शेती समृद्ध बनवेल."

नवनिर्मित महाराष्ट्राचा विकास साधायचा असेल तर तो सहकारी माध्यमातून शक्य होईल याची त्यांना जाण होती. त्यामुळे त्यांनी सहकारी चळवळीला उत्तेजन दिले. सहकारी क्षेत्र विस्तृत करण्यासाठी व त्यांचा ग्रामीण जीवनाच्या आर्थिक परिस्थितीवर अनुकूल परिणाम घडवण्यासाठी सहकाराला चालना दिली. ही सहकारी चळवळ सर्व ग्रामीण भागातून उभी केली. त्यासाठी त्यांनी राज्यातील महत्त्वाच्या उद्योगांना प्रोत्साहन दिले. उद्योग वाढला तर रोजगार वाढेल हे त्यांचे धोरण होते. यशवंतराव चव्हाणांनी त्यांच्या काळात एकूण 18 सहकारी साखर कारखान्याची स्थापना करण्यास प्रोत्साहन दिले. एक सहकारी साखर कारखान्याच्या जोरावर औद्योगिक वसाहत निर्माण करण्याची फार मोठी ताकद असते, फार मोठे आर्थिक गणिते होतात, सहकारी कारखान्यामुळे सहकारी बँका, सहकारी पतसंस्था, कुक्कुटपालन केंद्रे यातून शेतीचे मार्केटिंग आणि रोजगार निर्मिती होते हे स्वप्न ते मनाशी बाळगून होते. हे साखर कारखाने म्हणजे विकासाचे आणि समृद्धीचे प्रतीक आहेत असे ते मानीत होते.

महाराष्ट्राच्या कृषी व औद्योगिक धोरणाचा पाया त्यांनी सन 1960 च्या दशकात घातला व त्यामध्ये कृषी व औद्योगिक वाढ परस्परांना पूरक व पोषक ठरेल हे सूत्र त्यांनी ठेवले. डॉ. धनंजयराव गाडगीळ सारख्या अर्थतज्ज्ञांना बरोबर घेऊन सहकारी तत्त्वावर महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा पाया घातला. त्यामध्ये कृषी व औद्योगिक क्षेत्रातील समतोल किती महत्त्वाचा आहे हे त्यांनी ओळखले. त्यांच्या दूरदृष्टीची कल्पना 1986 मध्ये झालेल्या **जागतिक आर्थिक परिषदेत** झाली. या परिषदेचा विषय **'कृषी आणि औद्योगिक क्षेत्रातील समतोल विकास'** हाच होता.

नागपूर येथे 30 जून 1960 मध्ये 'विदर्भ विकास परिषदेच्या उद्घाटन' प्रसंगी बोलताना यशवंतराव चव्हाण म्हणतात, "भारताच्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेकडे पाहिल्यास असे दिसून येते की, या योजनेमध्ये बेसिक इंडस्ट्रीवर म्हणजे मूलभूत उद्योगधंद्यावर अधिक भर देण्यात येत आहे. ज्याला उद्योगप्रधान योजना किंवा इंडस्ट्रियल प्लॅन म्हणतात. अशा योजनेची भारताला आवश्यकता आहेत पण त्याच बरोबर हेही खरे की भारताची औद्योगिक योजना शेतीकडे दुर्लक्ष करून पुढे जाऊ शकत नाही. किंबहुना शेती हा एक अत्यंत महत्त्वाचा उद्योगधंदा आहे हे गृहीत धरूनच आपण आपली औद्योगिक योजना आखली पाहिजे. हे जे काही मूलभूत उद्योगधंदे आहेत त्यापैकी काही उद्योग धंद्यांमुळे महाराष्ट्र राज्याची अर्थव्यवस्था साकार होणार आहेत. विशेषत: पोलाद किंवा लोखंड यासारखी खनिज साधनसंपत्ती विदर्भातील नागपूरच्या आसपास विपुल प्रमाणात सापडते. म्हणून अशा प्रकारचे उद्योगधंदे विदर्भात उभारणे गरजेचे आहेत ही त्यांची भूमिका होती."

यशवंतराव चव्हाण यांनी मंत्रिमंडळात प्रथम अर्थमंत्री व नंतर उद्योगमंत्री म्हणून कार्यभार पाहिला. तेव्हा त्यांनी महाराष्ट्राच्या आर्थिक औद्योगिक व्यवस्थापनाची घडी घातली व स. गो. बर्वे सारख्या अर्थतज्ज्ञ व्यक्तींना तसेच त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींना पुरेसे स्वातंत्र्य देऊन त्या त्या क्षेत्रातील व्यक्तींना ते ते स्थान दिले. त्यामुळे निर्णय प्रक्रियेत अधिक व्यावसायिकता आली.

**निष्कर्ष -**

शेती पिकविण्यासाठी कायमची व्यवस्था करण्याच्या दृष्टीने पाटबंधारे, पाणी पुरवठा, पाण्याची उपलब्धता व वीज निर्मिती अशा विविध हेतूने त्यांनी कामाची आखणी केली. त्यासाठी जल विभाग, साधन सामग्री व संशोधन विभाग (सर्कल) सुरू केले. राज्यामध्ये इरिगेशन डिव्हीजन व सबडिव्हिजन स्थापन करून उपलब्ध पाणी पुरवठ्याच्या सोयीची व्यापक पाहणी करण्याचे आदेश त्यांनी दिले होते. मुंबई राज्य इरिगेशन बोर्डाची स्थापना ही केली. कापूस पिकवणाऱ्या शेतकऱ्यांना त्यांनी सूतगिरणी, भुईमूग उत्पादकांना तेलगिरण्या, उसाच्या क्षेत्रात साखर कारखाने अशी रचना केली. कापूस एकाधिकार योजना राबवून कापूस उत्पादकाला भावाची हमी दिली. शेतीसाठी आवश्यक पाणीपुरवठा खते, नवीन तंत्रज्ञान, सुधारित बियाणे, कीटकनाशके, आधुनिक अवजारे उपलब्ध करून देण्यासाठी नवी धोरणे ठरवली. ग्रामीण भागातील समाज जीवन सुधारण्यासाठी, त्यांना कर्ज पुरवठा मिळणे सोयीचे होण्यासाठी

त्यांनी सहकारी बँका, भूविकास बँक, जिल्हा मध्यवर्ती बँका, ग्रामीण पतपुरवठा संस्था स्थापन केल्या. शेतकऱ्यांच्या शेतीमालाला हमीभाव मिळावा यासाठी खरेदी विक्री संघ व इतर संस्था स्थापन केल्या. विदर्भातील पारस वीज केंद्राची स्थापना यशवंतराव चव्हाण यांच्याच पुढाकाराने झाली. थोडक्यात महाराष्ट्रातील गरीब शेतकरी आर्थिकदृष्ट्या प्रगत व्हावा या दृष्टिकोनातून त्यांनी कृषीविषयक धोरणे ठरविले.

**संदर्भ ग्रंथ सूची -**

1. कठारे, डॉ. अनिल - **आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास इ.स. 1818-1930**, विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगपुरा, दुसरी आवृत्ती जून 2013.
2. कालेरकर, भा. क्र. - **यशवंतराव : राष्ट्रीय व्यक्तिमत्व**, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई.
3. चव्हाण, यशवंतराव - **कृष्णाकाठ**, प्रेस्टीज प्रकाशन, पुणे.
4. जोशी, लक्ष्मणशास्त्री (संपादक) - **श्री यशवंतराव चव्हाण**, अभिनंदन ग्रंथ, मुंबई.
5. जोशी, रामभाऊ लक्ष्मणराव - **इतिहासाचे पान,** केसरी प्रकाशन, पुणे.
6. पाटील, रा. तु. - **यशवंतराव चव्हाण : एक कर्तबगार पण वादग्रस्त मुत्सद्दी**, राजे - देसाई प्रकाशन, कोल्हापूर.
7. बाबर, सरोजिनी (संपादन) - **मी पाहिलेले यशवंतराव**, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई.
8. तळवलकर गोविंद, - **यशवंतराव चव्हाण : व्यक्तित्व व कर्तुत्व**, मौज प्रकाशन गृह, खटाववाडी गिरगाव, मुंबई. पहिली आवृत्ती- 22 एप्रिल 2012.
9. कापरे, प्रा. गौरी. - **कृषी पदवीकेत हवा काळानुरूप बदल**, □ग्रोवन, दि. 1 जून 2018.
10. चव्हाण, जसवंत. - **कोयना प्रकल्पाचे संस्मरणीय शब्दचित्र,** लोकसत्ता, दि. 23 ऑगस्ट 2015
11. पवार, बाबुराव नि. - **सुवर्ण महोत्सव महाराष्ट्र**, विचार मंथन संशोधन पत्रिका, जानेवारी 2012
12. नलावडे, प्रमोद (संपादक) - **लोकराज्य**, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय महाराष्ट्र शासन, मार्च 2012.

# यशवंतराव चव्हाण आणि पंचायत राज व्यवस्था

**प्रा.डॉ.लोखंडे बी.बी.**
जयभवानी कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा. ता.पाटोदा.जि.बीड.४१४२०४.
Email : lokhandebandu75@gmail.com मोबा.९४२३१७०६८२

**प्रस्तावना :**

भारताचे माजी उपपंतप्रधान आणि महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री मा.यशवंतराव चव्हाण यांचे महाराष्ट्राच्या विकासात मोलाचे योगदान आहे. यशवंतराव चव्हाण यांनी भारताच्या व महाराष्ट्राच्या राजकारणात अनमोल असे कार्य केले महाराष्ट्र राज्य स्थापना झाल्यानंतर खऱ्या अर्थाने त्याचे योगदान महत्वाचे आहे. राजकिय,सामाजिक आर्थिक, शैक्षणिक, सहकार, इत्यादी क्षेत्रात त्यांनी महत्वाची कामगिरी केली. भारतीय लोकशाही मजबुत करण्यासाठी लोकशाहीचे विकेद्रीकरण करण्यासाठी व लोकांचा राजकारणातील सहभाग वाढविण्यासाठी पंचायत राज व्यवस्था मजुबत करण्याचे कार्य त्यांनी केले एवढेच नाही तर पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून ग्रामीण विकासाची पायाभरणी त्यांनी केली त्यांच्या या कार्याचा व पंचायत राज व्यवस्थेचा अभ्यास आज महत्व पूर्ण आहे. हा उद्देश समोर ठेवून संशोधन पत्रिका लिहिण्यात आली.

**संशोधन पत्रिकेचे संशोधनात्मक महत्व :**

संशोधक संशोधनाचे कोणतेही कार्य करित असतांना संशोधन पत्रिकेचा विषय हा महत्वाचा असतो. पंचायत राज व्यवस्था हा स्थानिक स्वराज्य संस्था मजबुत करण्या बरोबर भारतीय लोकशाही मजबुत करण्यासाठी अत्यंत महत्वाचा घटक आहे. पंचायत राज व्यवस्था मजबुत करण्याच्या कार्यात यशवंतराव चव्हाण यांचे योगदान महत्वाचे आहे.या कारणाने या विषयाची निवड करण्यात आली.

**संशोधन पत्रिकेचा उद्देश :-**

सामुहिक विकासाच्या योजना स्वातंत्र्य नंतर ग्रामीण व शहरी भागात राबवुन भारतीय लोकशाही मजबुत करण्यासाठी राष्ट्र विकासासाठी नियोजन बध्द प्रक्रिया म्हणजे पंचायत राज व्यवस्था होय. समाजाच्या व राज्याच्या विकासाच्या योजना नियोजन बध्द प्रक्रियेच्या माध्यमातून राबवून शेती,उद्योग, शिक्षण आरोग्य इत्यादी सार्वजनिक विकास हा पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून राबविण्यापर्यत झाला. यातून राजकिय सहभाग वाढला परिणामी लोकशाही मजबूत झाली इत्यादी कारणाचा अभ्यास करण्याच्या उद्देशाने संशोधन लिहिली गेली आहे.

**संशोधन पत्रिकेचे उद्दिष्टये :-**

संशोधकाला आपले संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी उद्दिष्टये महत्वाची असतात या हेतूने यशवंतराव चव्हाण यांचे पंचायत राज व्यवस्था निर्माण करण्यात अत्यंत मोलाचे योगदान आहे, या संशोधनात्मक अभ्यास व्हावा हा पहिले उद्दिष्ट आहे. तर पंचायत राज व्यवस्था हि स्थानिक स्वराज्य संस्था मजबुत करण्याची व विकासाची प्रक्रिया आहे. पंचायत राज मुळे स्थानिक स्वराज्य संस्थाचा विकास झाला भविष्यात प्रभावी विकासाचे माध्यम म्हणून स्थानिक संस्था आणखी सुधारणा करण्यासाठी संशोधन प्रत्रिका लिहिण्यात आली.

**संशोधन पत्रिकेचे स्वरुप :-**

या संशोधन पत्रिकेचे स्वरुप अत्यंत व्यापक नाही पण विषयाची व्याप्ती व्यापक आहे हा अत्यंत महत्वपूर्ण विषय आहे. या कारणाने खालील मुद्दयाचा आधार संशोधन पत्रिका पूर्ण करण्यात आली आहे.

**१) पंचायत राज व्यवस्था :**

भारताच्या स्वातंत्र्य पूर्ण काळापासून स्थानिक स्वराज्य संस्थेचे महत्व अत्यंत प्रभावी आहे स्वातंत्र्यानंतर भारतीय लोकशाही मजबुत करण्यासाठी व जनतेचा राजकिय सहभाग वाढविण्यासाठी लोकशाही शासन व्यवस्थेचे विकेंद्रीकरण करण्यासाठी या बरोबर स्थानिक स्वराज्य संस्थाचा नियोजन बध्द विकास करण्यासाठी पंचायत राज व्यवस्था हि ४२ वी घटना दुरुस्ती करुन स्थानिक स्वराज्य संस्थाना अधिकचे अधिकार देवून राष्ट्र विकास बरोबर राज्याच्या विकासाचा अत्यंत महत्वपूर्ण भाग मानला गेला.पंचायत राज व्यवस्थेची पायाभरणी महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण यांनी केली. याची अंमलबजावणी संपूर्ण देशात नंतरच्या

काळात करण्यात आली पंचायत राज व्यवस्था हे स्थानिक स्वराज्य संस्थाच्या विकासाचे आधुनिक मॉडेल आहे. या भारतीय लोकशाही मजूबत झाली त्याच बरोबर लोकांचा राजकिय सहभाग वाढविण्यास मदत झाली.

**पंचायत राज व्यवस्थेत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान :-**

पंचायत राज व्यवस्थेची पाया भरणी यशवंतराव चव्हाण यांनी केली ते उदारमत लोकशाही शासनाचा पुरस्कार करणारे राजकिय विचारवंत होते. समाजातील सर्व घटकाचा विकास नियोजन पध्दतीने करण्यासाठी त्यांनी कृषी ,उद्योग, सहकार,शिक्षण, आरोग्य,इत्यादी व्यवस्थाचा अभ्यास केला. भारतात सामाजिक विषमता भौगोलीक विषमता दुर करुन कृषी,उद्योग,बेकारी, दारिद्रय या क्षेत्रात मोलाचे कार्य केले.

महाराष्ट्रात त्यांनी राजकिय व्यवस्था मजबुत करण्या बरोबर कृषी,उद्योग,सिंचन,सहकार इत्यादी क्षेत्रात मोलाचे योगदान दिले. शहरी भागाबरोबर ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठ॰ त्यांनी पंचायत राज व्यवस्था हे राज्याच्या सुधारणेचे नविन मॉडेलस उदयास आणले. महाराष्ट्राबरोबर त्यांनी देशाच्या विकासात अत्यंत महत्वाचे योगदान आहे भारतीय लोकशाही मजबुत करण्यासाठी व भारतात राजकिय परिवतन घडविण्यासाठी त्यानी मोलाचे योगदान दिले.

भारतात चौथ्या व पाचव्या पंच वार्षीक योजनेत कृषी,आरोग्य, सिंचन इत्यादी क्षेत्राबरोबर उद्योग,व्यवसाय,शेती,सहकार,जल सिंचन,पिण्याचे पाणी,आरोग्य,शिक्षण,सार्वजनिक वाहतूक इत्यादीच्या समावेश करुन त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्था मजबूत केल्या.

**भारतातील पंचायत राज व्यवस्था आणि यशवंतराव चव्हाण यांचे योगदान :-**

स्वातंत्र्य पूर्व काळात औद्योगिक क्रांतीबरोबर औद्योगिक समाजाची निर्मीती झाली. त्याचा परिणाम म्हणून शहरीकरन मोठया प्रमाणात वाढल. रशिया,चीन,उत्तर कोरिया,अमेरीका इंग्लड इत्यादी देशाने विकासाची नविन मार्ग स्विकारला दारिद्रय,बेकारी,शिक्षण,आरोग्य विज्ञान,तंत्रज्ञाना क्षेत्रात मोठया प्रमाणात विकास झाला.

स्वातंत्र्यानंतर भारतात सुध्दा औद्योगिक क्रांतीचे वारे वाहु लागले. स्वातंत्र्य पूर्व काळात ब्रिटिशाने स्विकारलेले भांडवलशाही धोरणाचा अवलंब लोककल्याणच्या योजना राबविण्यात आल्या यातून मोठया प्रमाणात शहरीकरण झाले.

त्यामुळे शहराचा विकास करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला. याचाच प्रत्यय भारतात शहराच्या विकास झाला पण ग्रामीण भागाचा विकास झाला नाही. ग्रामीण व शहरी भागाचा विकास करण्यासाठी कॉग्रेस पक्षाने पुढाकार घेवून ४२ वी घटना दुरुस्ती करुन पंचायत राज व्यवस्था उदयास आली. शहरी भागा बरोबर ग्रामीण भागाचा विकास करण्यात येवू लागला.

यशवंतराव चव्हाण यांनी स्थानिक स्वराज्य संस्थाचा विकास करण्यासाठी केंद्र सरकार, जागतिक बँक याचे आर्थिक मदतीने बेकारी,दारीद्रय,रोजगार,शिक्षण,आरोग्य, कृषी, पिण्याचे पाणी, जलसिंचन, सहकार या घटकाला प्राधान्य देण्यात आले. सफल्य हा केंद्र बिंदू मानून त्याचे जीवन समृध्द करण्याचा,सामाजिक विषमता दुर करण्याचा हा मार्ग म्हणजे पंचायत राज होय. जमिन,सुधारणा ,कर्जमुक्ती ,सिंचन,सहकार यावर अधिक भर देण्यात आला. समाजातील प्रत्येक व्यक्तीचे दरडोई उत्पन्न वाढविण्यावर भर देण्यात आला.

देशाच्या तिसऱ्या १९६१-६६ चौथ्या १९६९-१९७४,पाचव्या १९७४-१९७९ या तीन पंचवार्षिक योजनाच्या माध्यमातुन देशाच्या नागरी व ग्रामीण भागाचा विकासकरण्याचे उद्दीष्टे यशवंतराव चव्हाण यांनी ठेवले.यानंतर सुध्दा पंचवार्षिक योजना मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थाच्या विकासाला प्राधान्य देण्यात आले. १९५१ ते १९९२ पर्यत आर्थिक नियोजनात दारिद्रय निर्मुलन रोजगार निर्मिती जलद आर्थिक विकास,आर्थिक विषमता कमी करणे आत्मनिर्भय आणि आधुनिकरण हे मुलभूत उद्दष्टये डोळयासमोर ठेवण्यात आले.

१९९२ ते २००७ या कालावधी जागतिकरण उदारीकरण,खाजगीकरण या त्रिसुची धोरणाचा स्विकार करण्यात आला. या मुक्त अर्थव्यवस्थेचा स्विकारकरुन रोजगार ,दारिद्रय,आर्थिक विषमता दुर करण्यात आली.भारताच्या नागरी व ग्रामीण विकासात यशवंतराव चव्हाण यांचे योगदान अत्यंत महत्वाचे आहे.

**महाराष्ट्रातील पंचायत राज व्यवस्था आणि यशवंतराव चव्हाण यांचे योगदान :**

पंचायत राज व्यवस्थेची पायाभरणी हि महाराष्ट्रात झाली आहे.छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्य स्थापनेपासून ग्रामीण विकासाला अत्यंत महत्वाचे स्थान दिले आहे. ब्रिटीश शासन व्यवस्थेत स्थानिक स्वराज्य संस्थाचा विकास करण्यात आला १९३१ च्या कॉग्रेसच्या अधिवेशनात शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी,शेत मालाला योग्य भाव मिळण्याचा ठराव करण्यात आला. १९३५ साली नेहरु यांनी शेती व्यापार क्षेत्रात सुधारण करण्यासाठी समिती नेमण्यात आली.

१९५५च्या आवडीच्या अधिवेशनात भांडवली विकास व समाजवादी विकासाची सकल्पना मांडण्यात आली स्वातंत्र्य नंतर महाराष्ट्र हे भारतीय संघ राज्याचेच घटक राज्य असल्यामुळे केंद्रातील सत्तेवर आलेल्या कॉंग्रेस पक्षाने स्थानिक स्वराज्य संस्थाच्या विकासाला चालना देण्यासाठी महाराष्ट्रात पंतप्रधान नेहरु आणि यशवंतराव चव्हाण यांनी सामुहिक विकासाच्या योजना राबविल्या गांधीजीचे ग्राम स्वराज्याचे स्वप्न ,लोकशाहीचे विकेंद्रीकरण हे मुख्य उद्दिष्ट होते.

यशवंतराव चव्हाण यांनी स्थानिक स्वराज्य संस्थाचा पाया मजबुत करण्यासाठी त्रिस्तरीय रचना निर्माण केला त्यात ग्रामपंचायत,पंचायत समिती, जिल्हा परीषद या संस्था निर्माण केल्या. या संस्था प्रत्येक निवडणूक घेण्यात आल्या. स्वातंत्र्य प्रशासक जिल्हा परिषद अध्यक्षांना उपमत्र्यांचा दर्जा देण्यात आला. मानधन सुविधा, स्थानिक स्वराज्य संस्थाच्या कामावर ज्या विविध समिती स्थापन केल्या स्थानिक स्वराज्यसंस्थाचा विकास करण्यासाठी राज्य सरकार व केंद्र सरकार आपल्या वार्षिक बजेट मध्ये तरतुद करण्याच्या कायदा करण्याता आला. ७३ ची ७४ वी घटना दुरुस्ती करत स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक अधिकार देण्यात आला. दि.२४/०४/१९९३ पासुन पंचायत राज कायदयाची अमंलबजावणी करण्यात आली. स्थानिक स्वराज्य संस्था मध्ये ३३ टक्के आरक्षण देण्यात आले. निवडणुका लेखा पिरक्षत वित्त आयोग कार्यकाळ अधिकार, व कार्य देण्यात आले. महाराष्ट्रात यामुळे शहरी भागाबरोबर ग्रामीण भागाचा विकासाला चालणा मिळाली यात यशवंतराव चव्हाण यांच्या सारख्याचे योगदान मोलाचे आहे.

**समारोप :**

महाराष्ट्राच्या व देशाच्या ग्रामीण विकासात यशवंतराव चव्हाण साहेबांचे योगदान अतिशय महत्वाचे आहे. पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातुन संपुर्ण देशाच्या विकासाचे नविन मॉडेल त्यांनी निर्माण केले. नवभारताच्या शहरी व ग्रामीण भागाच्या विकासात व देशाच्या उभारणीत यशवंतराव चव्हाण यांनी अत्यंत नियोजन बध्द कार्य केले. त्यांच्या पंचायत राज व्यवस्थे म्हणून महाराष्ट्राचा व देशाचा विकासाची प्रक्रिया गतिमाण झाली महाराष्ट्राच्या उभारणी साठी यशवंतराव चव्हाण यांचे योगदान महत्वाचे आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१) भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था. भा.ल.भोळे.
२) भारतीय प्रशासन व्यवस्था - के.आर.बंग
३) ग्रामीण विकास दृष्टीकोन - गंगाधर कराळे
४) महाराष्ट्र शासन व राजकारण - प्रा.पाटील बी.बी.
५) महाराष्टाचे राजकारण - प्रा.सुहास पळसीकर
६) ग्रामीण विकासाचे राजकारण - डॉ.प्रा.संग्राम मोरे
७) थोरले साहेब - प्रा.डॉ.विजय प्राचौकट
८) इंटरनेट , वर्तमानपत्र,साप्ताहिक.

ISSN : 2278-9308
March, 2021

# आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार : यशवंतराव चव्हाण

प्रा.डॉ.रत्नाकर रामराव कांबळे
सहयोगी प्राध्यापक,अर्थशास्त्र विभाग,शारदा महाविद्यालय, परभणी
e-mail : kamble.ratnakar@rediffmail.com Mobile : 9960422081

1.1 प्रस्ताविक :

शतकातून एकदाच युगपूरूष जन्माला येतो आणि आपल्या तेजोवलयाने सारे विश्व व्यापून टाकतो, राजा शिवछत्रपतीनंतरचा युगपुरूष हा बहुमान मिळविलेल्या यशवंतरावांनी खेडे (गाव) हा केंद्रबिंदू मानून आपल्या शासनाच्या विविध योजना आखल्या. त्यांनी कृषी व औद्योगिक क्रांतीचा पाया रचला. त्यांच्या विचारातूनच अनेकांना प्रेरणा मिळून त्यातूनच सहकारी साखर कारखाने उभे राहिले. सांगली, प्रवरानगर, वारणानगर, माळीनगर, शंकरनगर ही महाराष्ट्राच्या कायापालट करणारी आधुनिक तीर्थक्षेत्रे असून त्याठिकाणी उभारलेल्या सहकार मंदिरांचे एकमेव शिल्पकार म्हणजे यशवंतरावच होत. यशवंतराव चव्हाण यांनी भारतीय स्वातंत्र्य लढयात मोलाचे योगदान दिले. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री व महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून ते ओळखले जातात. त्यांनी 1 मे 1958 रोजी धुम्या गडावर जावून राष्ट्रसंत भगवानबाबांच्या समोर धूम्या गडास भगवानगड नाव दिले. ते प्रागतिक विचारसरणीचे होते. उत्कृष्ट संसदपटू, उदारमतवादी व अभ्यासू व्यक्तीमत्व म्हणून त्यांची ख्याती आहे. ते रसिक व साहित्यीकही होते, 'युगांतर', 'सह्याद्रीचे वारे', 'ऋणानुबंध' ही त्यांची साहित्यसंपदा आहे. सदरील शोधनिबंधात यशवंतराव चव्हाण यांच्या आर्थिक विचारांचा थोडक्यात आढावा घेण्यात आलेला आहे.

1.2 जिवन परिचय (1913—1984) :

यशवंतराव चव्हाण यांचा जन्म 12 मार्च 1913 रोजी सांगली जिल्ह्यातील देवराष्ट्रे या गावी झाला. यशवंतरव चव्हाण यांच्या वडिलांचे नांव बळवंतराव तर आईचे नांव विठाबाई होते. त्यांच्या जडणघडणीमध्ये त्यांच्या आईचाच फार मोठा वाटा होता अनेक संकटांस तोंड देत त्यांनी यशवंतरावांना शिकविले. इ.स.1934 मध्ये मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण झाले व त्यांनी कोल्हापूर येथील राजाराम कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. 1938 मध्ये त्यांनी मुंबई विद्यापीठाची पदवी मिळविली. इ.स. 1940 मध्ये त्यांनी एल.एल.बी. परीक्षा उत्तीर्ण करून वकिलीच्या व्यवसायास सुरूवात केली. इ.स. 1942 मध्ये त्यांचा विवाह मोरे कुटूंबातील सुकन्या वेणुताई यांच्याशी झाला.

इ.स.1946 मध्ये मुंबई विधिमंडळाच्या निवडणूकीत कराड मतदार संघातून विजयी झाले व गृहखात्याचे पार्लमेंटरी सेक्रेटरी पद भुषविले. इ.स. 1956 मध्ये ते द्वैभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले. 1 मे 1960 मध्ये महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून त्यांनी शपथ घेतली. यशवंतराव चव्हाण यांनी भारताचे संरक्षण मंत्रीपद 1962 ते 1966, भारताचे गृहमंत्रीपद 1966 ते 1970, भारताचे अर्थमंत्रीपद 1970 ते 1974, भारताचे परराष्ट्रीय व्यवहारमंत्रीपद 1974, लोकसभेत विरोधीपक्ष नेता 1978, चरणसिंग मंत्रीमंडळात उपपंतप्रधान पद 1979, आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष 1982, यासारखी महत्वपूर्ण पदे भूषविली. 25 नोव्हेंबर 1984 मध्ये या महान नेत्याचे निधन झाले.

1.3 आर्थिक विकास :

देशाची आर्थिक, सामाजिक किंवा राजकीय पध्दती कोणती का असेना परंतू त्या देशाला आर्थिक विकासातील नियोजनाचे महत्व कळाले नसेल तर आर्थिक क्षेत्रात प्रगती करणे अवघड जाईल. मागास अर्थव्यवस्थेत जलद विकास घडवून आणण्यासाठी प्रारंभी निरनिराळया उद्योगधंद्यांच्या समतोल वाढीकडे लक्ष द्यावे कारण जर अनियंत्रित आर्थिक स्वातंत्र्याच्या तत्वावर आर्थिक विकास होवू दिला नाही तर उद्योगधंद्याची विषम वाढ होईल व आर्थिक प्रगतीचा मार्ग रोखला जाईल. माणसाचे कर्तत्व जागृत करून,

वाढवून कामाला लावले पाहिजे. सर्वांनी शक्ती एकवटून सर्व सामर्थ्य एकत्र करून राज्याची प्रगती करण्यासाठी सारखे प्रयत्न करावेत या मताचे यशवंतराव चव्हाण होते.

आर्थिक प्रगतीच्या आणि सामाजिक व राजकीय ऐक्याच्या मार्गातील अडथळा दूर करण्यासाठी विकासाची कामे काही अंशी खाजगी क्षेत्रावर सोपवावी आणि शासनाने औद्योगिक प्रकल्प व उद्योग सुरू करण्यात व वाढ करण्यात पुढाकार घ्यावा. राष्ट्राची प्रगती म्हणजे शक्य तेवढया जास्त प्रमाणात स्थानिक प्रदेशांची प्रगती करणे होय. कारण स्थानिक प्रदेशांच्या एकून प्रगतीमुळेच संबंध देशाची प्रगती साध्य करता येते, असे ते मानत. म्हणजेच एकसंध विकास घडवून आणने त्यांना अपेक्षीत होते. त्यांच्या मते देशाचे सामर्थ्य दुबळया घटकांनी नियंत्रित होत असते. म्हणून अविकसीत प्रदेशांच्या विकासाचा प्रथम विचार केला पाहीजे. आर्थिक विकासात सामाजिक न्यायाला प्राधान्य दिले पाहीजे व प्रादेशिक विषमता न येता समतोल विकास कसा होईल याची सतत काळजी घेतली पाहिजे. विकासाच्या ज्या क्षेत्रावर आपण भांडवल गुंतवित आहोत ते क्षेत्र तसेच चालू ठेवले पाहिजे. उदा. विद्युत उत्पादन, कालवे, रासायनिक खत कारखाने इत्यादी आवश्यक विकास प्रकल्प चालू राहिले पाहिजेत.

1.4 योजना संदर्भातील विचार :

योजनेच्या प्रगतीचा यशापयशाचा आढावा वरवर पाहणी करून कळत नाही तो समजण्यासाठी योजनेची अंतर्गत माहिती घेतली पाहीजे. विकासाच्या क्षेत्रात झालेल्या कार्याची पाहणी व अंमलबजावणी करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणेची आवश्यकता असते त्याचप्रमाणे योजनांची तयारी करून उद्दीष्टांचा तपशिल ठरविण्याकरीता स्वतंत्र यंत्रणेची तेवढीच गरज किंबहूना त्याहून अधिक आहे. असे झाल्यास योजनेतील कामाची व खर्चाची प्रगती होण्यास हातभार लागेल. शेतीकडे दुर्लक्ष करून पुढे जाणे शक्य नाही त्यामुळे उद्योगप्रधान योजना आखण्याऐवजी शेती हा उद्योगधंदा गृहीत धरून आपली औद्योगिक योजना आखावी.

1.5 औद्योगिक विकाससंबंधी विचार :

औद्योगिक विकास लोकहिताच्या दृष्टीने होण्यासाठी सरकारने मदत करावी, बॅंकाकडून भांडवलपुरवठा करावा, शिवाय उद्योगपतींना आपले कर्तव्य चांगल्यारितीने पार पाडता यावे म्हणून त्यांच्या समस्या, गरजा वगैरे यासंबंधी तपशिलवार व खात्रीलायक माहिती सरकारजवळ असावी सरकार व कारखानदार यांच्र्कात सतत विचार विनिमय चालू रहावा, ज्यामुळे उद्योग सुरू करण्यास आकर्षक वातावरण व परिस्थिती निर्माण होईल. राज्यात उद्योगाचे भव्य मंदीर उभारण्यासाठी कारखानदारांना सरकारकडून हवे असणारे मार्गदर्शन व मदत यावर प्रकाश टाकावा ज्यामुळे उद्योग उभारणीस सहाय्यभूत अशी योजना तयार करणे शक्य होईल. औद्योगिक विकासाचा वेग वाढविण्यासाठी पोलाद, वीज, वाहतूक यासारखी आवश्यक साधनसामुग्री निर्माण केली आहे तेंव्हा तिचा पुर्ण काटकसरीने उपयोग करून घ्यावा आणि उत्पादन निर्मितीची जी क्षमता आहे तिचा पूण्र वापर करण्यासाठी खबरदारी घ्यावी त्यासाठी कामातील कसब व तंत्र ज्या व्यक्तीजवळ आहे अशांचा औद्योगिक उत्पादन वाढते राहण्यासाठी योग्य प्रकारे उपयोग करून घेतला पाहिजे. सरकारने जी औद्योगिक वसाहतीची योजना तयार केली आहे ती जलद पूर्ण होण्यासाठी जनतेने पुढे यावे त्यासाठी सरकारचे जे सहकार्य लागेल ते घ्यावे व वसाहत स्थापनेचे प्रयत्न करावेत.

1.6 शेती विकाससंबंधीचे विचार :

महाराष्ट्राच्या शेतीचा जो प्रश्न आहे तो मोठाच मोठा लांबलचक असा दुष्काळी भाग आहे. ज्यात शेतकरी काळया जमिनीतून नवनवीन संपत्ती काढणाऱ्या शेतीतून सोने निर्माण करणाऱ्या कष्टकरी वर्गाचा विकास कसा करावा? ही मुलभूत समस्या आहे. मुख्य प्रश्न आहे तो अपूरे अन्नधान्याचे उत्पादन व जमिनीवर पडणारा वाढता ताण. शेतीची उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी उपाययोजना करीत असतांना जमिनीविषयक सुधारणाद्वारे आर्थिक व सामाजिक समस्या सोडविणे जमीन धारणेवर मर्यादा घालून ही प्रश्न सुटणार नाही म्हणून कृषी उद्योगांचा विकास करणे गरजेचे आहे. शेतीमध्ये ज्या वस्तू तयार होतात त्या वस्तूचा पक्का माल तयार करण्यासाठी आम्हाला कारखाने उभे करता आले पाहिजेत. ग्रामीण भागात

ISSN : 2278-9308
March, 2021

आधुनिक स्वरूपाचे उद्योगधंदे सुरू करण्याच्या दृष्टीने शेतीच्या क्षेत्रात सहकारी तत्वावर आधारलेले प्रक्रिया उद्योग म्हणजेच शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योगधंदे काढणे फायद्याचे ठरेल असे त्यांचे शेतीचा विकास घडवून आणण्यासंदर्भात विचार होते.

1.7 आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण :

यशवंतराव चव्हाण यांनी लोकशाही पध्दतीच्या आर्थिक सत्तेच्या केंद्रीकरणाचा प्रयोग सर्वप्रथम महाराष्ट्रामध्ये केला होता आणि 1 मे 1962 पासून राज्यामध्ये जिल्हापरिषद व पंचायत राज्याची योजना अंमलात आणणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले. या धोरणात्मक निर्णयाचे श्रेय यशवंतराव चव्हाण यांना द्यावे लागेल. या त्यांच्या विकेंद्रीकरणाच्या धोरणाचा फायदा कितीतरी लोकांना वेगवेगळया मार्गांने मिळताना दिसून येतो. बऱ्याचशा शासकीय उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याचे कार्य जिल्हापरिषदा व पंचायत समित्या करतांना दिसून येतात. यावरून त्यांचा दूरदृष्टीपणा आपल्या लक्षामध्ये येतो. महाराष्ट्रामध्ये सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा प्रयोग खऱ्या अर्थाने यशस्वी झाला. सामान्य मानसाचेदेखील सत्ता उपभोगण्याचे स्वप्न साकार झाले हे खरोखरच यशवंतरावांनी दिलेली एक प्रकारची देणगीच होय.

1.8 सहकारी क्षेत्रात योगदान :

'विना सहकार नही उध्दार' हा कानमंत्र सहकारी चळवळीने दिला. मानवी जीवनात सहकार क्षेत्राचे अनन्यसाधारण असेच महत्व आहे. कारण सहकार हे खऱ्या अर्थाने भांडवलशाही, समाजवादी आणि मिश्र अर्थव्यवस्था या तीन अर्थव्यवस्थेपेक्षाही एक सुवर्णमध्य साधणारी अर्थव्यवस्था म्हणून ज्याचा उल्लेख आजच्या मुक्त अर्थव्यवस्थेच्या कालखंडातही करता येईल, अशी अर्थव्यवस्था होय. अशा या अर्थव्यवस्थेचा पाया यशवंतरावांनी 1957 मध्ये पहिला सहकारी साखर कारखाना स्थापन केला व त्यापुढे 18 पर्यंत हा आकडा गेला त्याचबरोबर मालाची विक्री कर्जपुरवठा, गृहबांधणी, भूविकास बॅंक इ. बाबीही सहकारी पध्दतीवर आधारितच निर्माण केल्या. सहकारी सुतगीरणी निर्माण करून कापूस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना कारखानदार बनविण्याचे कार्य केले. दि. 7 नोव्हेंबर 1961 रोजी परळी येथे रू. 3 कोटीची दूध डेरीची योजना सुरू केली. या सर्व बाबी अत्यंत महत्वाच्या असून अर्थशास्त्रीय दृष्टया लक्षात घेण्यासारख्या आहेत.

1.9 बौध्दांना आर्थिक सहाय्य :

दलितांना न्याय देण्यासाठी यशवंतराव चव्हाण यांनी अनेक निर्णय घेतले. बौध्द धर्माचा स्विकार केलेल्या हरिजनांना मिळणाऱ्या सवलती सरकारने बंद केल्या होत्या. हरिजनांनी बौध्द धर्म स्विकारल्याने त्यांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीत कांहीच फरक पडणार नव्हता म्हणून यशवंतरांवानी हरिजनांना मिळणाऱ्या सवलती बौध्द धर्म स्विकारणाऱ्यांनाही देण्याचे मान्य केले. पाठीमागे एकच हेतू होता की, राज्यामध्ये आर्थिक समता निर्माण झाली पाहिजे.

सारांश :

आधुनिक महाराष्ट्राचे धुरंधर शिल्पकार मनमिळावू, कर्तबगार व कठीण पसंगातून मार्गक्रमण करत उच्च पदावर पोहोचलेल्या यशवंतरांवाच्या आर्थिक विचारावर मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचारांचा प्रभाव होता. त्यांनी कृषी औद्योगिक समाजरचनेसाठी सहकार चळवळीचा पुरस्कार केला. यातून सहकारी साखर कारखानदारी व अन्य शेतमाल प्रक्रिया उद्योगांची उभारणी होवून समाजपरिवर्तन घडून आले याचे श्रेय यशवंतरांवांनाच जाते. कारण त्यांनी शेती व उद्योगाला आवश्यक असलेल्या व्यक्तींना शिक्षण देण्यासाठी तांत्रिक व शेतीशाळा सुरू केल्या. महाराष्ट्रातील प्रत्येक खेडयात शेती व उद्योगासाठी वीज उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले. भारतात सर्वप्रथम कमाल जमीनधारण कायदा करून जमीनसुधारणेचा पाया घातला. आजच्या जागतिकीकरणाच्या काळात सुशिक्षीतांनी सहकार तत्वावर कृषी आधारित उद्योग सुरू केल्यास भारतातील खेडयांचा विकास होवून खऱ्या अर्थाने भारत विकसीत राष्ट्र म्हणून उदयास येईल.

संदर्भ ग्रंथ :

1. श्री भुजंगराव कुलकर्णी, मराठवाडयाचा विकास, अभ्यास व चिंतन
2. प्रा.रायखेलकर, खेडकर, औद्योगिक अर्थशास्त्र, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद (1999)
3. डॉ.बी.डी.इंगळे, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, अरूणा प्रकाशन, लातूर. 2009
4. डॉ.आर.एस.सोळुंके, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद. 1999
5. र.पु.कुरूलकर, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, विद्या प्रकाशन नागपूर. 2006
6. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, अर्थ व सांख्यिकी संचालनालय,नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई 2012–13.
7. भाग्यविधाता– यशवंतराव चव्हाण याचे आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीतील योगदान, संपादक,डॉ. आर.टी.बेंद्रे, प्रा.एच.पी.कदम, न्यू मॅन पब्लिकेशन.
8. स्मरणिका, शोधनिबंध, मराठवाडा अर्थशास्त्र परिषद, संपादक, डॉ.पी.ई.विभूते, प्रा.राम देशमुख, यशवंत महाविद्यालय, नांदेड, 2005
9.Maharashtra Development Report 2007- Planning Commission, Govt. of India, New Delhi.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 289 (CCLXXXIX)

ISSN : 2278-9308
March, 2021

# एक अष्टपैलू व्यक्तिमत्व: यशवंतराव चव्हाण

प्रा.डॉ.भास्कर गायकवाड
महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा.विभाग प्रमुख (मराठी)
संपर्क:- ९४०३२५०५४६ bhilori24@gmail.com

प्रस्तावना:-

जागतिक पातळीवर अशी काही मोजकीच माणसे दिसतात की त्यांचा अभ्यास कितीही आणि कसाही केला तरी, तो न संपणारा आहे. त्यांचं साहित्य, आचार-विचार, वागणूक, पोशाख यावर बरेच काही लिखाण झालेले आहे. पण त्यात अजूनही खंड पडलेला नाही. यावरून हे व्यक्तिमत्त्व अष्टपैलू कसं होतं हे लक्षात येतं. त्यातीलच एक महत्त्वपूर्ण नाव म्हणजे यशवंतराव चव्हाण. राजकारणी. समाजकारणी, तत्त्ववेत्ता , शिक्षणमहर्षी, अशा विविध बिरूदांनी यशवंतरावांचे नाव महाराष्ट्रात अजरामर झालेलं आहे. यशवंतराव चव्हाण हे नेहमी सामाजिक क्रांतीसाठी पुढाकार घेत असत. राजकारणाचा उपयोग समाजपरिवर्तनाचे एक साधन म्हणून केला गेला पाहिजे असे त्यांना नेहमीच वाटत होते. यासाठी जात, धर्म, पंथ यांच्या भिंती पाडून टाकल्या पाहिजेत, देशाचे राजकारण हे जात, धर्म ,पंथ यासाठी नसावे तर देशातील प्रत्येक व्यक्तीसाठी ते असावे त्यातून समाजकारण साधले गेले पाहिजे. देशाच्या राजकारणासंबंधी यशवंतराव चव्हाण एके ठिकाणी म्हणतात," महात्मा फुले फक्त माळयांचे, डॉ.आंबेडकर फक्त बौद्धांचे, गांधी फक्त गुजरात्यांचे, टिळक फक्त ब्राह्मणांचे ,शिवाजी फक्त मराठ्यांचे अशाप्रकारे जर या महापुरुषांच्या व्याख्या केल्या गेल्या तर या हिंदुस्थानमध्ये सामाजिक क्रांती कधीच होणार नाही." १ यशवंतरावांचा हा विचार आजही तेवढ्याच आत्मीयतेने समजून घ्यावा लागेल. फक्त राजकारण नाही तर समाजकारण, शिक्षण, साहित्य, वैचारिकता, कर्तव्यनिष्ठा, दूरदृष्टीपणा अशा विविध पैलूतून यशवंतराव चव्हाण यांचे व्यक्तिमत्व समजून घेतलं तरच त्यांचे अष्टपैलू व्यक्तिमत्व उलगडू शकेल. हे त्यांचं अष्टपैलू व्यक्तिमत्व शोधण्याचा प्रयत्न या शोधालेखाधारे केलेला आहे.

साहित्य, संस्कृती आणि समाज यांच्याशी यशवंतराव चव्हाण यांचे नाते फार जवळचे. राजकारणी माणूस या तीन घटकांशी जवळीकता निर्माण करतो यावरून असे लक्षात येते की, समाजपरिवर्तन, देशाची प्रगती, एकनिष्ठ समाज, जातीनिर्मूलन, मजबूत लोकशाहीची निर्मिती, राष्ट्रहित जर निर्माण करायचे असेल तर उपरोक्त उल्लेख केल्याप्रमाणे तीन घटक फार महत्त्वाचे आहेत हे यशवंतराव चव्हाण यांना कळाले होते. म्हणून त्यांनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारल्या बरोबर भाषा सल्लागार मंडळ, विश्वकोश मंडळ, साहित्य संस्कृती मंडळ, यांची स्थापना केली आणि साहित्य, संस्कृती, आणि समाज यांच्या शिवाय सामाजिक परिवर्तन करता येऊ शकत नाही हे प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिले.

आज काल साहित्य संमेलनाचे देखील भाग पाडून टाकलेले आहेत. आदिवासी साहित्य संमेलन, दलित साहित्य संमेलन, ग्रामीण साहित्य संमेलन, मराठवाडा साहित्य संमेलन, विदर्भ साहित्य संमेलन, खानदेश साहित्य संमेलन, अशी प्रांतवार, भाषावार निर्मिती साहित्य संमेलनांची झालेली आहे. हा सर्व राजकारणाचा परिपाक आहे हे लक्षात येते. यशवंतरावजी चव्हाण यांच्यासारखा कणखर, धुरंधर राजकारणी माणूस साहित्याचा भोक्ता होता हे समजून घेणे फार गरजेचे आहे. आणीबाणीच्या काळात विरोध करणाऱ्या दुर्गाबाई भागवत कराडच्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा होत्या. विचारपीठावर पु.ल.देशपांडे यांच्यासारखे ज्येष्ठ साहित्यिक बसलेले होते. त्यावेळी यशवंतराव चव्हाण यांनी कार्यक्रमाला हजेरी लावली दुर्गाबाई भागवत आणि पु.ल. देशपांडे यांना नमस्कार करून ते म्हणाले," मी राजकारणी म्हणून येथे आलेलो नाही. तर, तुमच्या साहित्याचा चाहता,रसिक आणि मराठी वांड.मयावर नितांत प्रेम करणारा आस्वादक म्हणून आलो आहे. माझी जागा आज समुदायात आहे." २ यशवंतरावांच्या हा विचार आजच्या राजकारणी लोकांसमोर आदर्श ठेवणारा आहे. साहित्य हा यशवंतरावांचा अत्यंत जिव्हाळयाचा विषय होता. साहित्यातील शब्दांवर त्यांचा फार मोठा विश्वास. कारण शब्दच हे यशाच्या शिखरावर पोहोचतात आणि

शब्दच शिखरावरून खाली सुद्धा खेचतात, या शब्दांच्या सामर्थ्याबद्दल ते एके ठिकाणी म्हणतात, "मी शब्दांना फार मानतो. त्यांच्यात अस्त्रांचे सामर्थ्य आहे, तसेच प्रकाशाचे तेज आहे, एखादा शब्द कोणी अशा वेळी उच्चारतो की त्यामध्ये एक विलक्षण सामर्थ्य येते. गांधीजींनी 'क्विट इंडिया !' हे शब्द उच्चारले.केवढे सामर्थ्य या दोन शब्दात होते." ३ यशवंतराव चव्हाण स्वयंभू साहित्यिक होते. असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. 'कृष्णाकाठ', 'युगांतर', 'सह्याद्रिचे वारे', 'ऋणानुबंध', 'विदेशदर्शन', 'शिवनेरीच्या नौबती', असे अनेक ग्रंथ या विचारांची साक्ष आज देत आहेत.

आज सध्या महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये जो चढ-उतार दिसतो आहे, तो पाहिल्यावर असे वाटते की राजकारण हे स्वार्थासाठीच असते. आणि स्वार्थासाठी लोक राजकारणाचा गैरवापर करू लागतात. पक्ष कोणताही असो समाजकारणाचा बळी देऊन राजकारण यशस्वी करण्याचा प्रयत्न केला जातो. राज्यकारभार चालवत असताना लोकांचे हित, समाधान असा लोककल्याणकारी विचार राजकारणाच्या माध्यमातून यशवंतराव चव्हाण यांनी केला होता. म्हणूनच ते यशस्वी झाले. यशवंतराव चव्हाण यांची नवसमाज निर्मितीची संकल्पना फार महत्त्वाची होती. महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर यशवंतरावांनी खेड्याकडे अधिक लक्ष दिले. राष्ट्राचा सर्वांगीण विकास साधायचा असेल तर खेड्यातील माणूस हा केंद्रबिंदू ठेवला पाहिजे. तो स्वतःच्या श्रमाचा मालक झाला पाहिजे अशी यशवंतरावांची भूमिका होती.

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यापासून आज पर्यंत सहा दशके झालेली आहेत. आणि या काळात महाराष्ट्राने अनेक मुख्यमंत्रीही पाहिलेले आहेत, पण ज्या वेळी आपण मागे वळून पाहतो तेव्हा असं वाटतं की, महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाणांनी आपली यशाची कारकीर्द सुरू केली. नंतर महाराष्ट्राने साठ वर्षात बरीच प्रगती केली पुरोगामी महाराष्ट्राला यशाच्या शिखरावर घेऊन जाण्यासाठी सर्वच मुख्यमंत्र्यांनी प्रयत्न केलेत. परंतु यशवंतराव चव्हाण यांना जे यश मिळालं ते अन्य कुणाला मिळालं असं मला वाटत नाही. कारण 'संयुक्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री' 'मुंबईसह महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री' केंद्रात गृह, अर्थ, परराष्ट्र, संरक्षण या महत्त्वाच्या खात्यांचा कारभार त्यांनी सांभाळला. लोकसभेत विरोधी पक्ष नेता म्हणूनही यशस्वी कारकीर्द त्यांनी पार पाडली. चरणसिंग पंतप्रधान असताना उपपंतप्रधान पदही त्यांनी भूषविले. यावरून त्यांचे कर्तुत्व सिद्ध होते . संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतराव चव्हाण यांचे फार मोठे योगदान आहे हे विसरता येणार नाही. १ नोव्हेंबर १९५६ ला द्विभाषिक राज्य अस्तित्वात येऊन राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांची निवड झाली. परंतु मुंबई मध्ये मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झाला पाहिजे यासाठी क्रांतिसिंह नाना पाटील, प्रबोधनकार ठाकरे, दादासाहेब गायकवाड, भाई श्रीपाद डांगे,प्र. के. अत्रे, एस. एम. जोशी यासारखे नेते आणि साहित्यिकांनी संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना केली होती. १९५७ ला ज्या निवडणुका झाल्या त्यात पश्चिम महाराष्ट्र आणि मुंबईत काँग्रेस पक्षाला म्हणावे तसे यश प्राप्त झाले नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखे नेते ही संयुक्त महाराष्ट्र समितीच्या विरोधात होते यातूनच एक नेतृत्व जन्माला आलं ते म्हणजे यशवंतराव चव्हाण. इंदिरा गांधी, जवाहरलाल नेहरू यासारख्या काँग्रेसी बड्या नेत्यांना मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची भूमिका पटवून देण्यास यशवंतराव यशस्वी झालेत. आपल्या मुत्सद्देगिरीची कमाल यशवंतरावांनी दाखवली. राजकारणातील विविध डावपेच त्यांनी त्यावेळी खेळले. आणि १ मे १९६० रोजी एकभाषिक महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली आणि राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण विराजमान झाले. भूतकाळातील हे अनेक संदर्भ आज वर्तमान काळाशी निगडीत आहेत हे विसरता येणार नाहीत. आपल्या संपूर्ण कारकीर्दीत यशवंतरावांनी समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेला गती देण्याचं काम केलेले आहे. आज सहकार चळवळ महाराष्ट्रात पाय रोवून उभी आहे. या सहकार क्षेत्राचा पाया यशवंतराव चव्हाण यांनीच महाराष्ट्रात पक्का केला. 'कसेल त्याची जमीन' या सारखा प्रगत विचार यशवंतरावांसारखा मुत्सद्दी राजकारणीच मांडू शकतो. साखर निर्मितीच्या बाबतीत महाराष्ट्राला अग्रेसर बनविण्याचे काम यशवंतराव चव्हाण यांनीच केले. कोणत्याही गोष्टीचा पाया जेवढा मजबूत असेल तेवढा वरील डोलारा यशस्वीपणे पेलू शकतो हेच यशवंतरावांच्या कार्याबद्दल सांगता येईल.

यशवंतराव चव्हाण हे जातीपातीच्या पुढचे व्यक्तिमत्व आहे. राजकारणात राहून जर समाजकारण करायचे झाले तर समाजकारण हे निरोगी स्वरूपाचे असले पाहिजे. १९४६ ला जी निवडणूक झाली, त्या निवडणुकीत

यशवंतराव चव्हाण प्रचंड बहुमताने निवडून आले त्यांच्यासोबत काँग्रेस पक्षाचे इतर चारही उमेदवार निवडून आलेले होते. आज जशा निवडणुका होतात तशा त्या निवडणुका नव्हत्या. "सरळ, बिन खर्चाची, तत्त्वनिष्ठ व जनतेच्या स्वयंस्फूर्त पाठिंब्यावर निवडून आलेली ही निवडणूक होती." ४यावरून हे लक्षात येते की त्या वेळच्या निवडणुका या जाती-पाती विरहित, सामाजिक जाणिवेतून लढविल्या जात होत्या व लोकही या पद्धतीने निवडूनही देत होते. आपल्या 'कृष्णाकाठ' आत्मचरित्रात यशवंतराव एके ठिकाणी लिहितात, "आमच्या आजोळच्या घराशेजारी असणाऱ्या मुसलमान कुटुंबाची असणारा घरोबा, त्याचप्रमाणे शेजारच्या सनगर आणि धनगर मंडळींशी असणारा जिव्हाळा, हे त्यावेळेचे सगळे आठवले म्हणजे जाती-जमातीतील वैमनस्य ही समस्या पुढे केव्हा, कशी निर्माण झाली हे समजत नाही. एकमेकांची माणुसकीच्या नात्याची बांधिलकी होती." त्यांचे हे विचार त्यांच्या कर्तृत्वातूनही दिसून येतात. देशाची जी अवनती होत आहे त्याला एकमेव घटक कारणीभूत ठरतो आहे आणि तो म्हणजे, समाजात असलेली विषमता. ही जोपर्यंत नष्ट होणार नाही तोपर्यंत देशाची प्रगती होणे शक्य नाही. हे यशवंतराव ओळखून होते म्हणून तर ते त्या काळात कराडच्या हरिजन वस्ती मध्ये शिक्षक म्हणून शाळा चालविण्यासाठी दररोज जात असत. राजकारण करण्यासाठी निकोप अशा समाजकारणाचा पाठिंबा असावा लागतो, जो यशवंतराव चव्हाण यांना प्राप्त होता.

यशवंतराव चव्हाण यांचं घडलेलं अष्टपैलू व्यक्तिमत्व हे त्यांना त्यांच्या आयुष्यात मिळालेल्या आई,वडील, पत्नी,मित्र परिवार, त्यांना भेटलेल्या व्यक्ती यांच्या सहवासातून प्राप्त झाले आहे. आपण कोणाच्या सहवासात राहतो त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व कसे आहे त्याच्यावर आपला स्वभाव बनत जातो. राजकारणातील माणसे जगाच्या समोर जशी वागतात तसे प्रत्यक्षात नसतात असे म्हटले जाते. वेळप्रसंगी त्यांना खोटे बोलावे लागते असेही मानले जाते. प्रसंगानुरूप माणसाला एखाद्या माणसाबद्दल चांगले-वाईट बोलावे लागते. यशवंतरावांच्या बाबतीत तसे झालेही असेल पण, काही माणसे त्यांना भेटल्यानंतर त्यांच्या बद्दलची मते त्यांनी प्रत्यक्ष नोंदवून ठेवलेली आहेत. त्यातून त्यांच्या मनाचा मोकळेपणा सिद्ध होतो. माणसं वाचता आली पाहिजेत असे म्हणतात आणि ती जर वाचायची असतील तर मनाचा मोकळेपणा पाहिजे. समोरच्याचे ऐकूनही घेतले पाहिजे. तरच ते शक्य आहे हे यशवंतरावांना चांगले जमले होते. आजच्या राजकारणातील मोठ्या पदावर बसलेल्या सगळयांना ते जमते असे नाही. चांगली माणसे भेटली की माणसाची बुद्धिमत्ता तल्लख होते, समाजकल्याणाची तळमळ मनात निर्माण होते, विचारांशी जुळवून घेण्याची वृत्ती निर्माण होते, काम करण्याची जिद्द, चिकाटी, आत्मविश्वास, निर्माण होतो यासाठी तशी माणसं संपर्कात यावी लागतात. यशवंतरावांच्या संपर्कात अशा विचारांची मनाची माणसं आली होती, म्हणून त्यांचे व्यक्तिमत्त्व हे अष्टपैलू बनलं असे म्हणता येईल. त्यांच्याच शब्दात सांगायचे झाल्यास यशवंतराव एके ठिकाणी चिंतन प्रकट करताना म्हणतात,"आयुष्यात माणसे भेटतात, पांगतात, काहींची तर पुन्हा गाठभेटही होत नाही. पण काही पुन्हा भेटतात त्यांच्याशी संबंध निर्माण होतात आणि ते संबंध शक्तिशाली बनतात. परस्परांच्या जीवनाचा सहारा बनतात. ते जीवन समृद्ध आणि संपन्न बनवतात.माणसा माणसाचे संबंध नाजूक असतात ते शब्दांनी वर्णून सांगायचे समर्थ प्रयत्नही पुष्कळदा मागे असमाधान ठेवून जातात. तरीही प्रसंगानुरूप माणसांना माणसांबद्दल बोलावे, लिहावे लागते हे अवघड असते. पण म्हणून ते टाळावे हे काही खरे नाही.मिळालेली भावव्यक्तींची संधी आपल्याला नीट वापरता आली तर समाधान वाटते. ज्यांच्याबद्दल आपण बोलतो त्यांनाही त्यातल्या प्रामाणिकपणाचा प्रत्यय आला तर बरे वाटत असावे असा अंदाज मी माझ्या अनुभवावरून बांधतो." ५ थोडक्यात, माणूस मोठा होतो तो त्याच्यावर झालेल्या संस्कारातून त्याला मिळालेल्या मित्र परिवाराच्या सहवासातून हे तेवढेच खरे आहे.

यशवंतरावांचा लोकशाहीवर अढळ विश्वास आहे, निष्ठा आहे. लोकशाही टिकवायची असेल तर राजकारणातील सर्वांना विश्वासात घेऊनच राजकारण करावे लागते. आज देशात जी परिस्थिती निर्माण झालेली आहे त्याचे निराकरण करण्याची ताकद फक्त लोकशाहीत आहे. त्याच्याशी मुकाबला करण्याचे सामर्थ्य प्रत्येक राजकीय पक्षात पाहिजे. राजकारण हे समाजकारण झाले तरच देशाची परिस्थिती चांगली होऊ शकेल. फक्त राजकीय स्वातंत्र्य महत्त्वाचे नाही, तर सर्व पातळयांवर ते स्वातंत्र्य निर्माण झाले पाहिजे. आज देशात सत्ताप्राप्तीसाठी एकमेकांचा कौटुंबिक, वैयक्तिक गोष्टींचा आधार घेऊन समाजात बदनाम केले जाते. चुकीच्या खोट्या घटना प्रसंग यांचा वापर करून समाजात तेढ निर्माण केली जाते. लोकशाहीत हे योग्य नाही. असे झाल्यास राष्ट्रीय एकात्मता धोक्यात येईल.

सत्ता कोणत्याही पक्षाची असो ती लोकाभिमुख बनली पाहिजे. लोकांच्या कल्याणासाठी तिचा वापर झाला पाहिजे. यशवंतराव चव्हाणांचा राजकारणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन निकोप होता. ते एके ठिकाणी म्हणतात ," हे तख्त कोणा एका व्यक्तीचे नाही, कोणा एका धर्माचे नाही, कोणा एका वर्गाचे नाही. ते या देशातील ४०-४५ कोटी लोकांचे तख्त आहे , आणि त्याचे रक्षण हे तुमचे आमचे कर्तव्य आहे. तुमचे आमचे हे तख्त जोपर्यंत चंद्र सूर्य उगवत राहतील तोपर्यंत कायम राहिले पाहिजे, कारण ते आमच्या स्वातंत्र्याचे व लोकशाहीचे प्रतीक आहे. अशा तऱ्हेची देशभक्तीची भावना आपल्या मनात फुलली पाहिजे पेटली पाहिजे."६ यशवंतरावांचे हे विचार आजच्या राजकारणी लोकांना चपराक आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

यशवंतरावांचे हे सर्व व्यक्तिमत्त्वाचे पैलू पाहता महाराष्ट्राच्याच नाही, तर देशाच्या राजकीय व सामाजिक पटलावर यशस्वी कारकीर्द गाजवणारा नेता, व्यक्ती म्हणून त्यांचे मूल्यमापन आवश्यक ठरते. लोकशाहीवर विश्वास ठेवणारा, दुसऱ्यांची मने जाणून घेणारा, नैतिक मूल्यांची जपणूक करणारा, शब्दावर प्रेम करणारा साहित्यप्रेमी, कौटुंबिक जिव्हाळा जपणारा, देशावर प्रेम करणारा देशप्रेमी, उपक्रमशील स्वभावाचे, सर्वांना सोबत घेऊन चालणारे, अशा विविध पैलूंनी एकवटलेले हे एक अजब रसायन आहे. ज्यांनी महाराष्ट्राचीच नाही तर, देशाची आण, बाण, शान उंचावली. यांच्या या अष्टपैलू व्यक्तीमत्वात त्यांच्या विचारात समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेला चालना देण्याचे सामर्थ्य आहे. या सामर्थ्याचा शोध घेण्याचा हा अल्पसा प्रयत्न केलेला आहे. यशवंतरावांच्या भुतकाळी व्यक्तीमत्वात आजच्या वर्तमानकाळातील राजकारण्यांसाठी भविष्याचा वेध घेणारे सामर्थ्य आहे हे मात्र नक्की..

**संदर्भ ग्रंथ सूची**

१. जनामनातील यशवंतराव, डॉ.नागनाथ हेगे, संपादकीय पुष्ठ, पद्मगंधा प्रकाशन पुणे, २००२.

२. जनामनातील यशवंतराव, डॉ.नागनाथ हेगे, पुष्ठ-६६ , पद्मगंधा प्रकाशन पुणे, २००२.

३. शब्दांचे सामर्थ्य, संपादक- राम प्रधान, पुष्ट २४९,

४. शैलीकार यशवंतराव, प्रा. डॉ.शिवाजीराव देशमुख, पुष्ठ १४८, कौशल्या प्रकाशन, सोलापूर, २००९.

५. शैलीकार यशवंतराव, प्रा. डॉ.शिवाजीराव देशमुख, पुष्ठ २०५, कौशल्या प्रकाशन, सोलापूर, २००९.

६. यशवंतराव चव्हाण यांचे समीक्षालेखन व भाषणे, प्रा.डॉ. शिवाजीराव देशमुख, पृष्ठ-१६१, कौशल्या पब्लिकेशन्स, सोलापूर. २००९.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –7.675,Issue NO, 289 (CCLXXXIX )
ISSN : 2278-9308
March, 2021

# जानतं नेतृत्त्व : यशवंतराव चव्हाण

**डॉ. भुजंग विठ्ठलराव पाटील**
सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग प्रमुख स्वामी विवेकानंद महाविद्यालय, शिरुर ताजबंद

नेतृत्त्वाला विविध श्रेत्रातील जाण असावी लागते. नेतृत्त्व बहुअलामी असावयास हवे. अर्थात नेतृत्त्वाकडून सामान्याना जीवन जगत असताना येणाऱ्या आडचणी, समस्या, प्रश्न यांची समर्पक सोडवणुक करता आली पाहिजे व भविष्या संदर्भात योग्य मार्गदर्शन मिळाले पाहिजे. उदभवलेली परिस्थिती त्याचे योग्य अकलन व त्यातून बाहेर पडण्याचा योग्य कार्यक्रम देऊन लोकसहभागातून प्रश्न सोडविला तर अनुयायांचा नेतृत्त्वावरील विश्वास वाढतो. नेतृत्वास लोकाची अधिमान्यता मिळते. अशा प्रकारे नेतृत्त्वाचा विकास होतो. प्रस्तुत शोधनिबंधातून 'जानतं नेतृत्वः यशवंतराव चव्हाण' यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**उद्दिष्टये**

१. यशवंतराव चव्हाण यांचे जीवन व कार्य अभ्यासणे.
२. यशवंतराव चव्हाण यांची नेतृत्त्वाची जडण घडण अभ्यासणे.
३. यशवंतराव चव्हाणच्या नेतृत्त्वाचे आदर्श शोधणे.

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून ज्यांचा सार्थ गौरव केला जातो, ते महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण हे सर्वार्थाने लोकोत्तर लोकनेता होते. समतोल राजकारणी, कुशल मुत्सद्दी, व्यवहारचतुर, कुशल प्रशासक, अफाट लोकसंग्राहक, साहित्यिक, उत्तम वक्ता, कलारसिक, तत्वचिंतक, कुंटुंबवत्सल अशा विविध पैलुनी त्यांचे व्यक्तीमत्व समृद्ध होते. यशवंतरावाचा राजकीय पिंड स्वातंत्र्याच्या आंदोलनावर पोसलेला होता. भारतीय राजकारणातील गांधी युगाला, सत्यागृह-सविनय, कायदेभंग प्रतिकार या मोहिमेला वेग व परिवक्वता आलेल्या काळात यशवंतरावाचा राजकीय प्रवास सुरु झाला. देशात तेव्हा देशभक्तीचा अंगार फूलला होता. पंडित जवहारलाल नेहरुही स्वतेजाने तळपत होते. महात्मा गांधीचा संदेश सत्यागृहाचा होता, तर पंडितजीचा क्रांतीचा होता. त्याला रशियन राज्यक्रांतीचा संदर्भ होता. पंडितजीचे संस्कारक्षम मन या क्रांतीने भाराऊन गेले होते. यशवंतरावाचा राजकीय पिंड ही याच क्रांतीच्या तत्त्वज्ञानावर पोसला होता. तसेच त्यांच्यावर सत्यशोधकी तत्त्वज्ञानाचाही प्रभाव होता. गावोगाव हिडूंन त्यांनी लोकांच्या चळवळविषयक जिज्ञासेची पूर्ती केली. कार्यकर्त्यांसी व्यक्तीगत संबंध जोडले. ब्रिटिश सत्तेची दहशत कमी करणारे कार्यक्रम घेतले. ते सर्वप्रथम १९४६ मध्ये निवडून आले. मोरारजी देशाई यांनी त्यांना गृहखात्याचा संसदीय सचिव होण्याची गळ घातली. पुढे ते महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे सचिव झाले. १९५२ च्या निवडणूकी नंतर नागरी पुरवढा व स्थानिक स्वराज्य खात्याचे मंत्री झाले. जेव्हा द्वैभाषिक मुंबई राज्य करण्याचा निर्णय वरिष्ठ कॉंग्रेसने घेतला. तेव्हा मुख्यमंत्री पदावर यशवंतराव आले. तत्कालीन प्रक्षुब्ध जनमतास तोंड देत यांनी द्वैभाषिकांची नौका सहिसलामत महाराष्ट्र निर्मितीच्या किणाऱ्याला लावली. ते संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री झाले. असा यशस्वी नेता एका राज्यात कायम राहणे शक्य नव्हते. २० नोव्हेंबर १९६२ ला यशवंतराव देशाचे संरक्षण मंत्री झाले. 'हिमालयाच्या मदतीला सहयाद्री धाऊन आला' असी साहित्यकांनी कोटी केली. चीनसी झालेल्या युद्धात भारताचा पराभव झाला होता. देशही त्या धक्यातून सावरला नोव्हता. सरक्षणमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर तासाभरात तीन्ही सैनादलाची बैठक घेऊन आपली नवी जबाबदारी त्यांनी पुरेशा गंभीरपणे पत्करकरली होती. त्यांच्या प्रयत्नाना आलेले यश पुढे १९६५ युद्धात भारताने पाकिस्थानवर मिळवलेल्या पहिल्या विजयात देशाने पाहिले. १९७१ च्या युद्धात भारताने पाकिस्थानचा निर्मायक पराभव करुन त्याचे दोन तुकडे केले. पाकिस्थान व चीन यांच्या भारतविरोधी संघटीत कारवायानी संघटीत स्वरुन घेतले तेव्हा देशाने यशवंतरावांची नियुक्ती परराष्ट्र खत्याच्या मंत्रीपदावर केली. या काळात रशिया, अमेरिका, जपान इ. देशांना भेटी देऊन द. आशियात उद्दभऊ शकणाऱ्या संकटाविषयी त्यांनी त्या देशाच्या परराष्ट्र विभागाचे केलेले जागरण असेच महत्वाचे आहे. अमेरिका, रशिया चीनवरील भारतानुकूल दबाव वाढत राहिल याची खबरदारीही घेतली. आर्थिक संकटाच्या व मंदीच्या काळात त्यांच्याकडे देशाचे अर्थमंत्रीपद दिले गेले तेव्हा यशवंतरावानी अंदाजपत्रके सादर केली ती आर्थिक तुट कमी करणारी, संतूलीत स्वरुपाची व विकासाला गती देणारी होती. त्यातून करदात्याला मदत झाली आणि जीवनावश्यक वस्तुच्या भावावरही नियंत्रण राहिले. १९६५ मध्ये रा. स्व. संघाने गोवधबंदीसाठी दिल्लीत आक्रमक मोर्चा काढला. तेव्हा जाळपोळ, लुटालुट होऊन दिल्ली अस्वस्थ झाली. तेव्हा गृहमंत्री गुलजारीलाल नंदा यांनी राजीनामा दिला. परिणामी, ते जोखमीचे पद यशवंतरावाकडे आले.

त्यांनी नक्षलवादया विरोधी घेतलेली यशस्वी भूमिका भाविदेशाकरीता मार्गदर्शक ठरली आहे. धार्मिक दंगली, जातीय तनाव यांना त्यांच्या कारकिर्दीत आळा बसलेला दिसला. राजकीय कारणाखातर होणारी हमरीतुमरी मर्यादेत राहिली. अंरभीच्या दहा वर्षात यशवंतरावाची दिल्ली कारकिर्द त्यांची लोकप्रियता व देशातील मान्यता वाढवणारी ठरली. या काळात महाराष्ट्राच्या राजकारणावरही त्यांची पक्कड राहिली. राज्याच्या मुख्यमंत्रीपदावर कोणीही असले तरीही सत्तेची खरी सुत्रे त्यांच्याच हाती असलेली साऱ्यांनी पाहिली. चव्हाण साहेबांच्या उत्तुंग व्यक्तीमत्वाचे आनेक पैलु सांगता येतील. ते थोर विचारवंत होते. साहित्यक होते. मुत्सद्दी नेते होते. विरोधकांचा मान राखणारे संयमी राजकारणी होते. त्यांच्या राजकारणाला वैचारिक अधिष्ठान होते. जनतेच्या सुखदुखासी समरस झालेले, जनमताची नाडी अचूक ओळखणारे ते लोकनेते होते. त्यांच्या व्यक्तीमत्वात सर्वांना भावणारा सुसंस्कृतपणा होता. सर्वात महत्वाचे म्हणजे राजकीय क्षेत्राला त्यांनी वेगळी उंची प्राप्त करुन दिली. त्या बळावर राज्यातीलच नव्हे, देशातील जनतेचा विश्वास त्यांनी संपादन केला होता.

यशवंतरावांनी १९५७ ला ग्रामपंचायतीचा कायदा केला. १९६२ साली पंचायत समित्या व जिल्हा परिषदा निर्माण केल्या त्यामुळे गावागावात काँग्रेसचे कार्यकर्ते निर्माण झाले. स्थानिक सत्ताकेंद्राच्या मदतीने पक्ष विस्तारत असतो. यशवंतरावानी राज्यात सहकारी कारखाने, खरेदी-विक्री, दुध संघ, प्रक्रिया संघ, ग्रहाकांचे संघ, प्राथमिक सोसायटया, सहकारी बँकाची स्थापना केली. ही चळवळ पुढे विठ्ठलराव विखे पाटील, धंनजय गाडगीळ, वैकुंठभाई मेहता, वसंतदादा पाटील यांनी पुढे नेहली चव्हाण साहेबानी त्यांच्या कारकीर्दीत सर्वसामान्याच्या हिताचे आनेक निर्णय घेतले. 'कसेल त्यांची जमीन' या तत्वावर कुळ कायदा लागू केला. शेतजमीनीच्या कमाल धारणेवर मर्यादा आणण्याचा कायदा करुन त्यांनी जमीन सुधारणेच्या दिशेने क्रांतीकारी पाऊल उचलले. या निर्णयाचा गरीब शेतकरी वर्गाला मोठया प्रमाणावर फायदा झाला. राज्याची 'पंचवार्षिक योजना' सुरु केली. कोयना व उजनी या दोन महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची उभारणी केवळ त्यांच्यामुळे होऊ शकली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विध्यापीठ आणि शिवाजी विध्यापीठाची निर्मीती त्यांनी केली. कृषी विध्यापीठाची स्थापना केली. पैसा हा पुंजीपतीच्या किंवा सरकारच्या तिजोरीत नसून तो अकाशातील ढगात आहे. त्या ढगातून खाली पडणाऱ्या जलधारात आहे. त्या पाण्याच्या प्रवाहरुपी नदीत आहे. नदीच्या दुकाठास मिळणाऱ्या काळया जमीनीत आहे. जमीनीतील खनिज संपत्तीत आहे. त्याच खनिज संपत्तीद्वारा निर्माण होणाऱ्या वैज्ञानिक यंत्रसामुग्रीत आहे. इतकेच नव्हे तर तो सर्वांना एका सुत्रात बांधणाऱ्या मनगटात आहे. असे जर या गरीब जनतेला पटवून देऊन त्यांच्यात सृजनशक्ती निर्माण करुन कार्यप्रवण केले तर, आपले सर्व प्रश्न सुटतील व त्या सुटण्यातच भारतीय लोकशाहीचे भवितव्य सामावलेले आहे.

यशवंतराव चव्हाणाना शिक्षण, साहित्य, कला, क्रीडा या क्षेत्रातील जाण चांगली होती, मात्र त्यांनी या क्षेत्रातील मी विनम्र रसिक आहे असे सांगीतले. ते साहित्यावर बोलू लागले की त्यांच्यातील साहित्यसम्राट जागा होई. साहित्य संमेलनातील त्यांची उद्घाटनाची भाषने प्रत्येक्ष अध्यक्षांच्या भाषणाहून आधिक चांगली होत. हा प्रस्तुत लेखकांना आलेला आनुभव आनेकांच्या पदरी आहे. मराठी साहित्य व संस्कृती मंडळ, मराठी विश्वकोष निर्मिती, आर्थिक दृष्टया दुर्वलासाठी ई.बी.सी.ची सवलतीच्या माध्यमातून त्यांनी 'ज्ञान गंगा घरोघरी' पोहचवण्याचा मार्ग दाखवला आहे. कवी, साहीत्यक, लेखक, नाटककार, गायक, यांच्या सानिध्यात व मौफिल्लीत ते आवर्जून उपस्थित राहत. लोककलावंत, कुस्तीपटू, कब्बडीपटू, खोखोपटू, शास्त्रोक्त गायक, नाटक, सिनेमावाले, पत्रकार, साहित्यक, बुद्धीमंत अशा सर्वाबद्दल यशवंतरावानी आपुलकी मानली. साहित्याच त्यांना फार वेड होत. त्यांनी लिहलेले 'कृष्णाकाठ,' सहयाद्रीचे वारे, भूमिका या सारखे भाषनसंग्रह तसेच त्यांनी केलेला साहित्यकांसी पत्रव्यवहार, पत्नी वेणुताईस केलेला पत्रव्यवहार अभ्यासल्यानंतर त्यांच्यातील साहित्यक लक्षात येतो. त्यांच्या बद्दल काही साहित्यकांनी नोंदवलेले मत खुप बोलके आहे. ते राजकारणाच्या धकाधकीत शिरले नसते, तर कदाचित साहित्याच्या इतिहासात, ते अजरांमर साहितकृती निर्माण करु शकले असते. त्यांचा मुळ पिंड प्रतिभावंताचा होता.

राजकारणात लोक जोडले पाहिजेत, समाजाच्या विविध घटकांसी सुसंवाद ठेवला पाहिजे, साहित्य, संगीत, नाटय, कला-क्रीडा यांच्याशी जवळील ठेवली पाहिजे. कितीही मोठया पदावर गेलो, तरी सभ्यता, सुसंस्कृतपणा व नम्रता याच विस्मरण होता कामा नये. आपल्या पेक्षा अनुभव असलेल्या व्यक्ती पेक्षा आपली राजकीय प्रतिष्ठा आधिक असली, तरी जाणकारांच्या समोर आपण विनम्र राहिला पाहिजे. अशा व्यक्तीपासून शिकण्याचा प्रयत्न नेहमी केला पाहिजे. तसेच ग्रंथासी सुसंवाद ठेवून वाचन संस्कृतीचे महत्व त्यांनी नव्या पिढयासमोर ठेवल आहे.

यशवंतरावांनी महाराष्ट्राची उभारणी केली. त्यांच्या वाटचालीची दिशा निश्चित केली. त्यांच्या एकात्मतेला खतपाणी घातले. हजारो माणसे जोडली, लाखो चाहते मिळवले, सारा मराठी मुलुख मनाने जिंकला, देशाला संकटकाळात खंबीर साथ

दिली. राष्ट्रीय नेतृत्त्वाचा ठसा उमटवला तरीही त्यांच्या आखेरच्या काळात त्याच्याजवळ कोणी नोव्हते. दूरचे दूर होते व जवळचे जवळ राहिले नव्हते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद चार वेळा राबविलेल्या, केंद्रात चार महत्वाची मंत्रीपदे भूषविलेल्या आणि आखेर उपपंतप्रधान सारख्या मोठया पदावर राहिलेल्या या माणसाने दिल्लीत स्वतःचे घर बांधले नाही. की मुंबईत फ्लॅट घेतला नाही. डझनांनी साखर कारखाने उभारणाऱ्या या नेत्याच्या नावावर महाराष्ट्रात एकही एकर जमीन नाही. मृत्युनंतर त्यांच्या दिल्लीतील बंगल्यातून त्यांचे व्यक्तीगत सामान हलवायला आधिकार गेले तेव्हा त्यांच्या कपाटात सापडलेल्या स्टेट बँकेच्या पासबुकात, साऱ्या हयातीत त्यांनी मागे ठेवलेली ३६ हजार रुपयांची शिल्लकच तेवढी राहिली असल्याचे त्यांना आढळले.

यशवंतराव चव्हाण व्यक्ती व कार्यकृतृत्त्व हा नेतृत्वाचा, लोकशाहीचा आदर्श वस्तुपाठ ठरतो. त्यामुळे यशवंतराव चव्हाण हे नेतृत्त्व खऱ्या अर्थाने अभ्यास विषय बनतो. प्रस्तुत अभ्यासातून यशवंत रावाच्या नेतृत्वाची जीवनसुत्रे पुढील प्रमाणे सांगता येतात.

१. यशवंतराव चव्हाण नेतृत्वाचा अदर्श वस्तुपाठ ठरतात.
२. यशवंतरावाच्या राजकारणातून लोककल्याणकारी लोकशाहीची दिशा सापडते.
३. यशवंतरावांनी विकासाचे व विश्वासाचे राजकारण केले त्यामुळे, ते तत्वाचे राजकारण ठरते.
४. जननिष्ठा व पक्षनिष्ठा या दोन संज्ञा यशवंतरावानी समानार्थी म्हणून स्वीकारल्या.
५. असामान्य बुद्धीमता, स्वच्छ चारित्र्य, सामान्याविषयीची आम्तीयता यातून पदाला, प्रतिष्ठा मिळवून देणारा धुरधंर नेता, मानवतावादी नेता ही यशवंतरावांची खरी ओळख ठरते.

''नीतीविना व्यापार, विवेकाविना सुखोपभोग,
तत्वाविना राजकारण, चारित्र्याविना ज्ञान,
मानवतेविना विज्ञान, परिश्रमविना संपत्ती,
त्यागाविना अराधना.'' व्यर्थ ठरते हे म. गांधीचे विचार राजकारण, समाजकारण, अर्थकारण, विज्ञान याचे शुद्धीकरण वरील तत्वावर आधारीत व्यवहारातून करता येते. हे म. गांधीचे विचार यशवंतराव चव्हाणांना तंतोतंत लागू पडतात.

**संदर्भ :-**

१. 'लोकराज्य' यशवंत – कीर्तिवंत, माहिती व जनसंपर्क, महासंचालनालय, मंत्रालय मुंबई-३२, १२ मार्च २०१२.
२. प्रा. अशोक नाईकवाडे (संपा) आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण, राष्ट्रीयचर्चा सत्र देवगीरी महा. औरंगाबाद. ७ मार्च २००९.
३. यशवंतराव चव्हाण, भूमिका, प्रेस्टीज प्रकाशन पूणे, १५ डिसे. १९७९.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 289 (CCLXXXIX )
ISSN : 2278-9308
March, 2021

# यशवंतराव चव्हाण यांच्या साहित्यातील वाङ्मयीन आणि वैचारिक सौंदर्य

प्रा. मोहन बाबुराव चव्हाण
लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर

**प्रस्तावना :**

यशवंतराव चव्हाण यांचे व्यक्तिमत्त्व काळाच्या पटलावर सतत प्रकाशमान राहिले आहे. देशाच्या आणि महाराष्ट्राच्या जडणघडणीत त्यांचे योगदान ऐतिहासिक ठरले आहे. आजही त्यांचे पुरोगामी आणि प्रगल्भ विचार अनेकांना दिशादर्शक ठरत आहेत. त्यांनी सर्वच क्षेत्रात बहुमोल असे कार्य केले आहे. राजकीय व्यक्तिमत्त्व असणाऱ्या यशवंतरावांत संवेदनशील, प्रतिभावंत साहित्यिक दडला होता. वाचनाची आवड लहानपणीच त्यांना लागली होती. त्यांचा मूळ पिंड राजकारणी असला, तरी त्यांची साहित्यवर निष्ठा अपार होती. निबंधलेखन ते ललित लेखनापर्यंतचे लेखन त्यांनी केले आहे. अर्थात या लेखनाची पार्श्वभूमी राजकीय आणि वैचारिक राहिली आहे. या लेखनाची मूळ प्रवृत्ती अनुभवकथन हीच आहे. त्यांच्या लेखनातून त्यांची वाङ्मयीन आणि वैचारिकदृष्टी अधोरेखित झाली आहे.

**भूमिका :**

यशवंतराव चव्हाण यांच्या साहित्यिक व्यक्तिमत्त्वाची चर्चा अनेकविध अंगाने झाली आहे. काळाच्या टप्प्यावार प्रतिभावंत साहित्यिकांच्या साहित्याचा वेगवेगळ्या अंगाने विचार केला जातो. आजच्या काळात यशवंतराव चव्हाण यांचे साहित्य आणि विचार यांच्या मौलिकतेचा उहापोह प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात येणार आहे.

**उद्दिष्ट्ये :**

१. यशवंतराव चव्हाण यांचे साहित्यिक व्यक्तिमत्त्व जाणून घेणे.
२. यशवंतराव चव्हाण यांच्या साहित्यविश्वाची चर्चा करणे.
३. यशवंतराव चव्हाण यांचा साहित्यविषयक दृष्टीकोन समजून घेणे
४. यशवंतराव चव्हाण यांच्या साहित्यातील वाङ्मयीन आणि वैचारिक सौंदर्याचे मूल्यमापन करणे.

**विषय विवेचन :**

यशवंतराव चव्हाण यांच्या जडणघडणीत माता विठाईचा महत्त्वाचा वाटा आहे. श्रद्धाळू आणि ओव्याख्यान गात असणाऱ्या मातेकडून त्यांच्या मनात बालपणापासूनच साहित्याची आवड निर्माण झाली. पुण्यामध्ये कायदाचे शिक्षण घेत असताना साहित्यविषयक सभा, मेळावे, संमलने यांच्यात ते सहभागी होत होते. पुढे राजकीय सर्वोच्च पदावर काम करीत असतानाही साहित्याशी उपक्रमात सहभागी होत होते. १९७५ च्या कऱ्हाड येथील साहित्य संमेलनाचे ते स्वागताध्यक्ष होते. इचलकरंजीच्या साहित्य संमलेनात त्यांनी श्रोत्यांच्या रांगेत बसून संमेलनाचा आनंद घेतला. मराठी साहित्याविषयी त्यांच्या मनात अफाट जिव्हाळा आणि अभिमान होता.शब्दांचे सामर्थ्य त्यांनी जाणले होते. ''शब्दांच्या सामर्थ्यावर व सौंदर्यावर माझा नितांत विश्वास आहे. नवनिर्मितीचे सर्जनशील कार्य जसे शब्द करतात तसेच साम्राज्यशक्ती धुळीला मिळविण्याचे संहारक सामर्थ्यही शब्दात आहे. शब्द हे साहित्यिकांचे प्रमुख शस्त्र आहे.'' (ऋणानुबंध, प्रस्तावना, पृ. ०७) संत तुकारामांनी शब्दांची महती सांगितली आहे. तिच भूमिका यशवंतराव यांनी मांडली आहे. शब्द शस्त्राहून संहारक असतात. शब्दांनी अनेक साम्राज्य उलथून टाकली आहेत. शब्दांच्या सामर्थ्यावर सत्ता गाजवता येते, याची अनेक उदाहरणे आहेत. यशवंतराव चव्हाण हे शब्दप्रभू होते. कारण त्यांनी प्रारंभीच्या मराठी साहित्यापासून मार्क्सवादापर्यंतचे साहित्य चोखंदळपणे वाचन केले होते. शब्दांशी

जडलेले नाते त्यांना यशाची शिखरे पादाक्रांत करण्यास उपयोगी पडले. राजकीय जीवनात व्यस्त असतानाही पुस्तकाबरोबरची मैत्री अखंड होती. पुस्तके वाचनातूनच त्यांच्यातील साहित्यिक घडत गेला. त्यांनी आत्मचरित्र, व्यक्तिचित्रण, प्रवासवर्णन, ललित निबंध आणि समीक्षात्मक लेखन केले आहे. यांच्या नावावर जवळपास सोळा साहित्यकृती आहेत. यातील 'शिवनेरीच्या नौबती', सह्याद्रीचे वारे', 'युगांतर', कृष्णाकाठ', 'ऋणानुबंध', 'विदेशी दर्शन', 'शब्दांचे सामर्थ्य' या कलाकृतींचा नामोल्लेख करता येईल. या लेखनातून त्यांचे वाङ्मयीन आणि वैचारिकसौंदर्यस्पष्ट झाले आहे. एवढेच नव्हे तर लालित्यपूर्ण भाषणातून ते आपले विचार स्पष्ट करायचे. यामुळे त्यांची भाषणे कधी कंटाळवानी ठरली नाहीत.

यशवंतराव चव्हाण यांचे व्यक्तिमत्त्व अनुभव संपन्न होते. आईच्या संस्कारची श्रीमंती, कृष्णा—कोयनाचा लळा, आजोळीच्या सागरोबाचे शिवार, सोनहिरा ओढ्याची घनगर्द आंबराई, डोंगर रांगाची चढउत्तार आणि हिमालयाच्या संरक्षणापर्यंतचे अनुभवविश्व, जीवनदृष्टी त्यांच्या साहित्यातून आविष्कृत झाली आहे. सामाजिक आणि राजकीय जीवनाच्या धावपळीत त्यांना साहित्य लेखनाकडे वेळ देता आले नाही. परंतु त्यांच्या मनात खोलवर रुजलेली वाङ्मयीन संस्कारची जाणीव त्यांच्या लेखन आणि भाषणातून दिसून येते. साहित्यातील त्यांची पहिली भूमिका आस्वादाकाची आणि नंतर लेखकाची होती. साहित्य हे जीवनवादी असावे हीच त्यांनी भूमिका स्वीकारली होती. साहित्य हे सर्वसमावेशक असते. जीवनाच्या सर्व अंगाचा वेध घेणारे असते. याच जाणिवेतून त्यांनी लेखन केले आहे. ''साहित्य कोणत्याही रंगाचे असले, तरी चालेल, पण आजूबाजूच्या परिस्थितीचा डोळसपणे अभ्यास करून समाजात सर्व थरांत निर्माण झालेल्या अस्वस्थेची जाणीव असणारे समाजचिंतन त्यात असले पाहिजे'' (ऋणानुबंध, पृ. २००) यशवंतराव चव्हाण यांनी साहित्यातील वेगवेगळ्या विचारधारापेक्षा सामाजिक जाणिवांना महत्त्व दिले आहे. राजकारणी आणि साहित्यिक यांनी मर्यादा घालून घेण्याची गरज नाही, हे त्यांच्या कृतीतून दिसून येते. यशवंतरावांचे ललित गद्य साहित्य वाङ्मयील सौंदर्याबरोबर विचारसौंदर्याने नटलेले आहे. साहित्यात शब्दलालित्य असावेच, परंतु ते विचारांच्या पार्श्वभूमीवर जिवंत आणि भाविश्वाची अनुभूती देणारे असावे. याला कोणत्याही क्षेत्राच्या मर्यादा घालू नये हा विचार त्यांनी स्पष्ट केला आहे. यशवंतराव चव्हाण साहित्याकडे व्यापक दृष्टीने पाहातात.

यशवंतराव चव्हाण यांनी विविध प्रकारत साहित्य लेखन केले आहे. यातून त्यांच्या विचारांचे अनेकविध पैलू दिसून येतात. यशवंतरावांच्या वैचारिक गद्य लेखन वाचनीय बनले आहे. त्यांच्या सातित्याची मूळ पीठिका समाज चिंतन आणि समाजप्रबोध नही आहे. यशवंतरावांचे विचार सखोल आणि व्यापक आहेत. सामाजिक समस्यांचे सूक्ष्म दृष्टीने केलेले चिंतन विस्तृत रूपाचे आहे. यशवंतरावांची साहित्यविषक दृष्टी संवेदनाशील असून प्रश्नांच्या संदर्भात विधेयक विचार स्पष्ट करणारी आहे. इथल्या समस्यांचा पाठपुरावा करून त्या सोडविण्याचा प्रयत्न करणारी आहे. यशवंतरावानी राजकीय आणि सामाजिक जीवनातील आव्हांनातून बाहेर पडण्यासाठी अभूतपूर्व अशी कामगिरी केली आहे. यशंतराव चव्हाणांची भूमिका आस्वादकाची होती. मराठी साहित्यातील कथा, कादंबरी, कविता, नाटक, चरित्र, व्यक्तिचित्रणे, समीक्षा, संत, पंत, तंत आणि महानुभवीय साहित्याचे त्यांनी सूक्ष्म अवलोकन केले आहे. या साहित्यप्रकारांवर त्यांनी मुक्तपणे आपले विचार मांडले आहेत. शब्दांच्या सामर्थ्याची जाण त्यांनी आपल्या लेखनातून करून दिल आहे. साहित्यबरोबर यशंतरावांची समीक्षात्मक दृष्टी अनेकांना दिशा देणारी ठरली आहे.

यशवंतराव चव्हाण अभिजत दर्जाचे साहित्यिक होते. 'कृष्णाकाठ' हा त्यांच्या आत्मचरित्रपर ग्रंथ आयुष्यातील अनेक प्रसंगाचे चित्रण करणारा आहे. आपल्या परिसराविषयी प्रेम, छंद जोपासना, गांधीवाद, समाजवाद, मार्क्सवाद, वैचारिक आंदोलने, ४२ चे आंदोलन, भूमिगत चळवळ,

निवडणुका, प्रभावशाली व्यक्ती, विश्वास, मैत्री जीवाभावाचे नातेसंबंध जपणारे मन यांसारखी भावनिक आंदोलनांचे दर्शन त्यांच्या 'कृष्णाकाठ'त पडले आहे. 'ऋणानुबंध' या पुस्तकात छोटे छोटे चरित्रात्मक लेख आहेत. ही चरित्रे लहान असली तरी विश्वात्मक झाली आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, लो. टिळक, रविंद्र टागोर, वि. स. खांडेकर, पंडित नेहरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या व्यक्तींचे कर्तृत्व आणि विचारदृष्टी समजून घेण्यासाठी या चरित्रकथा उपयोगी ठरतात. आत्मकथनपर चरित्रलेखनात वेणुताई, आचार्य भागवत, कृष्ण धनगर, आत्माराम पाटील यासारखी उठावदार व्यक्ती आल्या आहेत. यांच्याविषयची आत्मियता, प्रेत यातून प्रकट झाले आहे. यशवंतरावांच्या प्रवास वर्णनातही आत्माविष्कार व अनुभव कथनाचे प्रकटीकरण झाले आहे. विदेशात असताना केलेल्या पत्रलेखनातून कौटुंबिक स्नेह, आंतरीक जिव्हाळा आणि परदेशातील अनेक गोष्टींची केलेली चर्चा हा साहित्यातील दर्जेदार, अनमोल ठेवा आहे. समीक्षात्मक लेखनातून साहित्यविषयक स्वतंत्र दृष्टी त्यांची स्पष्ट होते. त्यांनी विविध साहित्यिक, साहित्यकृती, साहित्यप्रकार, मराठी भाषा, शब्दांचे सामर्थ्य या विषयी मांडलेली मते प्रगल्भ, अभ्यासूपणाची साक्ष देणारी आहेत.

यशवंतराव चव्हाण यांचे साहित्य जीवनानुभावातून आवतरले आहे. हे अनुभविश्वाला सौंदर्याची किणार आहे. सार्वजनिक जीवनात व्यस्त असताना आपल्या कुटुंबाविषयाच्या आठवणी नेमक्या शब्दात मांडतात. ''मी कितीही थकलेला असलो तरी घरातील व कुटुंबातील प्रेमळ वातावरणाने माझे मन उल्हासित होते. देवघरातील मंद प्रकाशामध्ये भाविकांच्या मनात सुखद लहरी उठतात त्याचे वर्णन नुसत्या शब्दात कसे करता येणार? भावनेची भाषा भावनेलाच समजते. कुटुंबातील मंडळीत बसून हास्यविनोद करीत, गप्पागोष्टी करीत, वेळ घालविण्यात केवढा आनंद असतो! माझ्या कुटुंबातील मंडळींबरोबर अशा प्रकारे काही वेळ घालविणे हा माझा एक विरंगुळा आहे.'' (सह्याद्रीचे वारे, पृ. ३११) व्यक्तीजीवनातील कुंटुबातील सुख, समाधानाचे वर्णन करताना भावनिक ओलावा प्रस्तुत ओळीतून स्पष्ट झाला आहे. यशवंतरावांचे साहित्य काल्पनिक विश्वाला नाकरून वास्तवाल आणि अनुभवाला आविष्कृत करणारे आहे. त्यांचे साहित्य अलंकारादि रचनेत अडकत नाही. साध्या साध्या वाक्यरचनेतून कमालिची सौंदर्यविचार त्यांच्या साहित्यातून वाहत आहे. छोटी छोटी आशयघन वाक्ये, मर्यादित उपमा—प्रतिमांच वापर, जगलेले अनुभवविश्व आणि जगण्याचे तत्तज्ञान त्यांच्या साहित्यात आले आहे. त्यामुळे यशंतराव चव्हाण यांचे साहित्य जीवनवादी विचारसौंदर्याने ओतपोत भरलेले आहे. मराठी मनाला सतत उर्जा देणारे ठरले आहे. याचबरोबर मराठीच्या वाङ्मेतिहासात मोलाचे योगदान देणारे आहे.

कोणत्याही साहित्याची बांधिलकी राष्ट्रीय जीवनाशी आहे. राष्ट्रात घडणाऱ्या घडामोडींचा डोळसपणे अभ्यास करण्यात यावा. चिंतनशील व समाजपयोगी साहित्य समाजामध्ये परिवर्तन घडवून आणते. समाजाला दिशा देणारे, प्रगतीकडे घेऊन जाणारे, मनामनात प्रेम निर्माण करणारे, व्यापक आणि नव्या जाणिवा निर्माण करणारे लेखन खरे साहित्य ठरेल हा विचार त्यांच्या साहित्य लेखनाच्या केंद्रस्थानी होता. समाजाचे प्रश्न, समस्या, सुखदु:खे, सोडविण्यासाठी यशवंतराव चव्हाण राजकारणाला साहित्याची जोड देतात. यशवंतरावांनी समाजकारण—राजकारण—साहित्य यांच्यात अनुबंध जोडण्याचा प्रयत्न केला आहे. यशवंतरावांच्या साहित्य लेखनानंतर अनेक राजकारणींनी साहित्य लेखन केले आहे. सध्या मा. शरद पवार यांचे 'लोक माझे सांगती' हे आत्मकथन प्रकाशित झाले आहे.

**समारोप आणि निष्कर्ष :**

यशवंतराव चव्हांनाच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू त्यांच्या साहित्यातून व्यक्त झाले आहेत. त्यांचे साहित्य लेखन सकस आणि संपन्न विचारांचे दर्शन घडविणारे आहे. यशवंतरावांनचे साहित्य

कौटुंबिक आणि नात्यातील स्नेहभाव, सामाजिक चिंतन, समाजप्रबोधन करणारे आहे. त्यांचे लेखन सामाजिक बांधिलकी आणि जाणिवेतून झाले आहे. आत्मकथन आणि आत्माविष्कार हे त्यांच्या लेखनाची खरी उर्जा आहे. सुज्ञ आणि आस्वादक वाचक, मागदर्शक ठरणारी समीक्षकदृष्टी, अनुभवातून दिशा देणारे त्यांचे साहित्य आजच्या समाजजीवनाला दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरले आहे.

यशवंतराव चव्हाणांची साहित्यिक जडणघडण वाचनाच्या छंदातून घडत गेली आहे. यशवंतराव चव्हानांचे साहित्य मनोरंनाच्या पातळीवर उतरत नाही तर समाजचिंतन, समाजप्रबोधन पातळीवर उतरले आहे. त्यांच्या साहित्याचा केंद्रभूत विषय तरुणाई हाच आहे.शब्दांचे सामर्थ्य त्यांनी आपल्या लेखनातून आणि कृतीतून अधोरेखित केले आहे. जीवनवादी दृष्टीमुळे त्यांचे वाङ्मय विचारसौंदयाने समृद्ध झाले आहे. मराठी साहित्याच्या अभिजात दर्जा समृद्ध करणारे ते एकमेव राजकारणी साहित्यिक ठरतात.

**संदर्भ :**

१. 'कृष्णकाठ', यशवंतराव चव्हाण, प्रेस्टिज पब्लिकेशन्स, पुणे
२. 'ऋणानुबंध', यशवंतराव चव्हाण, प्रेस्टिज पब्लिकेशन्स, पुणे
३. 'युगांतर', यशवंतराव चव्हाण, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे
४. 'साहित्यिक यशवंतराव', डॉ. सहदेव चौगुले—शिंदे, सिंधू प्रकाशन, कोल्हापूर
५. 'यशवंतराव चव्हाण : राजकारण आणि साहित्य', भास्कर भोळे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद

ISSN : 2278-9308
March, 2021

# यशवंतराव चव्हाण अष्टपैलू व्यक्तीमत्व

**प्रा.डॉ. विजेंद्र श्रीकृष्ण पुराणीक**
अधिव्याख्याता, आर.सी.पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय, शिरपूर जि. धुळे
मो.नं. ९४२१९९७१२५ ईमेल : vijendrapuranik@gmail.com

**प्रस्तावना :**

आपल्या महाराष्ट्र राज्याला अनेक संत, समाज सुधारक राजकारणी लोक यांचा वारसा लाभला आहे. ज्ञानेश्वरांनी आपल्या दिव्य ज्ञानातून समाजाला 'भावार्थ दिपीका' म्हणजेच ज्ञानेश्वरीतून मानवी जीवन कसे जगावे ? व परमार्थ जीवन कसे जगावे? यांचे मार्गदर्शन केले. संत तुकाराम महाराजांनी समाजाला मानवी जीवनाचे अमृत दिले ते आजही समाजाला उपयुक्त ठरत आहे. संतांप्रमाणेच समाजसुधारकांनी आपल्या कतृत्वातून मानवी जीवनाला योग्य दिशा दिली. महात्मा फुले यांनी शिक्षण व स्त्री जीवन यांचे वर जे कार्य केले आहे त्याचे फलित आज आपण पहात आहोत. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजाचा उध्दार केला व भारताला उत्कृष्ट घटना दिली त्या मूळे लोकशाहीची मूल्ये समाजात रूजली. तसेच लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, धोंडा केशव कर्वे, राजाराम मोहन रॉय, सावरकर यांचे विचार, समाजासाठी केलेले कार्य आजही मानवी समाजाला उपयुक्त ठरत आहे. समाज सुधारकांप्रमाणे भारतात थोर विचारवंत राजकारणी लोकांनी आपल्या कर्तुत्वातून समाजासाठी जे कार्य केले त्यांच्यापैकी विशेष उल्लेख करावासा वाटतो ते म्हणजे यशवंतराव चव्हाण यांचा.

यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राला लाभलेले थोर विचारवंत, समाजसुधारक व राजकारणी व्यक्तीमत्व होवून गेले. यशवंतराव चव्हाण यांचा जन्म १२ मार्च १९१३ रोजी देवराष्ट्रे जि. सांगली येथे झाला व त्यांचे शिक्षण टिळक हायस्कूल कराड येथे झाले. बालपनापासून यशवंतराव खूप हुशार, होतकरु व व्यवहारी होते. त्यांना बालपणापासुनच वाचनाची खूप आवड होती. तुकारामांची गाथा त्यांना फार आवडत असे त्यामुळे प्रार्थना समाज, ब्राम्होसमाजाकडे ते आकृष्ट झाले होते. वाचनाच्या आवडीमुळेच त्यावेळच्या सामाजिक, धार्मिक राजकिय जागृतीचा फार मोठा परिणाम त्यांचेवर झाला होता. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या विचारमूल्यातून तौलनिक व समन्वयवादी लेखन करण्याची दिशा त्यांना मिळाली वाईचे प्रकांड पंडीत तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी यांचाही सहवास त्यांना लाभला त्यातूनच १९ व्या शतकातील प्रबोधनाचे चिंतन विकास पावले. त्यातूनच त्यांच्या वैचारिक पिंड पक्का झाला. महात्मा फुलेंची सत्यशोधक चळवळीची वैचारीक बैठकही त्यांना लाभली व त्यांचा खूप मोठा प्रभाव यशवंतरावांवर झाला. शेतकरी, दलीत, स्त्रीया यांवर होणारा अन्याय दूर करण्यासाठी शिक्षणांशिवाय तरणोपाय नाही अशी त्यांचीही धारणा दृढ झाली.

**सामाजिक कार्य :-**

यशवंतरावांनी छोट्या छोट्या जातीय किंवा धार्मिक प्रश्नांकडे लक्ष पुरवण्याबरोबर यांसाठी व्यापक दृष्टीने कार्य करण्याचे ठरविले त्यासाठी स्वराज्याच्या राष्ट्रीय प्रश्नांना त्यांनी महत्व द्यावयाचे ठरविले ते लोकमान्य टिळकांना खूप मानत असल्यामुळे टिळकांचे स्वराज्याचे विचार त्यांचेवर खूप प्रभाव टाकत होते. याच दरम्यान ते कोल्हापूरला कॉलेजचे शिक्षण घेत होते शाहू महाराजांनी उघडलेल्या जातीनिहाय वसतीगृहात ते न राहता स्वतंत्रपणे राहून त्यांनी शिक्षण घेतले. स्वत:शी प्रामाणिक राहून आपली मते ते आचारणात आणत होते. यशवंतरावांना शिक्षणासाठी त्यांची आई व वडीलबंधु नेहमीच सहकार्य करीत होते. यशवंतरावांना वैचारीक विरोधक खूप होते. परंतु त्यानाही आपलेसे करण्याचे कसब त्यांच्यात होते. यशवंतराव चव्हाण यांनी सामाजिक कार्यसाठी स्वत:ला वाहून घ्यावयाचे ठरवले त्यासाठी त्यांनी हरीजन वस्तीत शाळा चालवली व स्वत: शिक्षक म्हणून कार्य केले. महार वतनांचे स्वरुप बदलवण्यासाठी १९३७ ला आंदोलन केले होते त्यांत त्यांना आत्माराम बापुंनीही खूप मदत केली होती. यशवंतरावांनी १९५८ मध्ये बॉम्बे इन्फिरिअर व्हीलेज वॉन्टस अबॉलिश ॲक्ट पास केला होता. आक्टोबर १९५६ मध्ये बाबासाहेबांनी बौध्द धर्माची दिक्षा घेतल्यानंतर नवबौध्दांनाही सवलती मिळाव्यात म्हणून यशवंतरावांनी महत्वपूर्ण कार्य केले होते. पंचायत, जिल्हापरिषद यांमध्ये सर्व जाती जमातींना विशेष करुन मागासवर्गीयांना योग्य प्रतिनिधित्व मिळाले म्हणून त्यांनी प्रयत्न केले. जातीय विषमता चव्हाणांनी अनुभवली होती. शिक्षणात मराठी संस्कृत हा भेद त्यांनी अनुभवला होता. त्यामुळे त्यांची धार्मिक संकल्पना खूप टोकाची नव्हती.

**शैक्षणिक विचार :**

प्रत्येक व्यक्तीच्या विकासाचे मुख्य साधन शिक्षण आहे. शिक्षणामुळे व्यक्ती समाज व राष्ट्र यांची प्रगतीत हातभार लावतो हे त्यांना माहीत होते. शिक्षणाबाबत महात्मा फुले यांचे विचार त्यांना खूप प्रभावीत करत होते. ज्ञानवंत होण्याने मनूष्य प्रशुत्वातून मुक्त होतो असे त्यांना वाटत होते. त्यासाठी सर्व जातीधर्माच्या मूलांना शिक्षण मिळालेच पाहीजे. अशी तळमळ त्यांची होती. शिक्षणासाठी त्यांनी आपले मुख्यमंत्रीपदही पणाला लावले होते. शिवाजी विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, रयत शिक्षणसंस्था यांच्या विकासासाठी यशवंतरावांनी खूप कष्ट घेतले होते. त्यांनी ग्रामीण भागात शिक्षणावर खूप भर दिला होता.

**आर्थिक विचार :**

शेती, उद्योग, सहकार, समाजवाद, आर्थिक विषमता, विकासातील समस्या आणि नियोजन या सर्व क्षेत्रांशी संबंधीत त्यांच्या प्रगल्भ अभ्यास होता. विशेषकरुन त्यांनी शेतीवर जास्त भर दिला होता त्यात मालकी हक्कांचा प्रश्न, भूमिहिनांचा प्रश्न, यांवर त्यांचे विशेष लक्ष होते. भारतात भूमिहीनांची संख्या जास्त असल्यामूळे ज्यांचे जवळ जास्त जमिन आहे. त्यांनी २% जमिन भूमिहिनांना द्यावी असा त्यांचा आग्रह होता. शेती ही व्यापार तत्वाने केली पाहीजे. नद्यांचा पाण्याचा वापर शेतीत व्हावा व विस्थापितांचे पूर्नवसन यांवर त्यांनी सर्वांचे लक्ष वेधले होते. नद्यांवर धरण बांधणे कृषीशास्त्राचा अभ्यास करणे याबाबत ते आग्रही होते. विकासाच्या योजनांमध्ये ग्रामीण उद्योगांवर भर देवून शेती व उद्योग यांच्या समन्वय त्यांनी साधला होता. अवकिसित भागात संयुक्त उद्योगाची कल्पना मांडली होती. राष्ट्राच्या आर्थीक विकासासाठी सहकार तत्वाचा पूरस्कार त्यांनी केला होता. त्याचा मोठा परिणाम म्हणजे ग्रामीण भागात, साखर कारखाने, सुतगिरण्या उभारल्या गेल्या होत्या. यासाठी काही योजना आखल्या गेल्या त्यात पंचायत राज व्यवस्थेची सुरुवात, पंचवार्षिक योजना प्रारंभ कोयना व उजनी प्रकल्पांना गती, तर सहकारी साखर कारखान्यांना परवानगी, कृषी विकासासाठी कृषी विद्यापीठांची स्थापना, यांसारख्या अनेक उपक्रमातून आर्थिक दृष्ट्या सर्वांना समपातळीवर आणण्यासाठी त्यांचा प्रयत्न होता.

**राजकिय कारकिर्द :**

यशवंतराव बळवंतराव चव्हाण यांची सामाजिक वैचारीक शक्ती खूप प्रभावी असल्यामुळे ते सहजच राजकिय कार्यात खूप सक्रिय झाले त्यांनी आपली राजकिय कारकिर्द १९३०-३३ कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेवून केली. समाजवादी पक्षाची स्थापना १९३५ मध्ये झाल्यानंतर एम.एन.राय यांच्या प्रभावाखाली काम केले ते सातारा जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष ही झाले चले जाव, भारत छोडो चळवळीतही त्यांनी भाग घेतला. राजकिय स्वातंत्र्याच्या मुद्यांवर त्यांना १९४४-४५ मध्ये कारावासही सहन करावा लागला. १९४७ ला देशाला स्वातंत्र्य मिळाले व २६ नोव्हेंबर १९५० ला देशाला घटना मिळाली. देश स्वातंत्र्य झाला तेव्हा जवळपास ५५६ संस्थाने देशात होती. सरदार वल्लभभाई पटेल यांनी ही सर्व संस्थाने एकत्र करुन काश्मिर ते कन्याकुमारी पर्यंत स्वतंत्र व अखंड भारताचे स्वप्न पूर्ण केले असे असले तरी देशात भाषावार प्रांतरचना करुन भारतात वेगवेगळे राज्य निर्माण झालीत. त्यावेळेस मुंबई हे व्दीभाषीक राज्य होते. १ नोव्हेंबर १९५६ ला यशवंतराव मुख्यमंत्री झाले त्यांनी अशी अपेक्षा न करताही त्यांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पद मिळाले होते. यशवंतराव चव्हाणांनी मराठी भाषिकांच्या भावना पंडीत नेहरुंच्या लक्षात आणून दिल्या होत्या. नेहरु, इंदिरा गांधी यांच्या मदतीने संयुक्त महाराष्ट्राच्या वाटाघाटी सुरु झाल्या. महाराष्ट्रातील उद्योगपती, शेतकरी, आदीवासी, उच्चजाती, यांना विश्वासात घेवून कॉंग्रेस पासुन दूर गेलेल्यांना त्यांनी जवळ केले. अनेक सामाजिक आर्थिक निर्णय घेवून त्यांनी महाराष्ट्राची सेवा केली होती. एवढ्यावरच ते थांबले नाही तर २२ नोव्हेंबर १९६२ रोजी त्यांची देशाचे संरक्षणमंत्री म्हणून निवड झ ााली. तेथेही त्यांनी कृष्णमेनन, टी.टी.कृष्णामाचारी, बिजूपटनायक या समवेत काम केले. चव्हाण यांनी देशाचे सैन्यप्रबळ करण्याचे काम केले. चीन सोबतच्या युध्दात भारताला पराभव मिळाल्यामुळे सैन्यशक्ती वाढविणे व सामर्थ्यशाली बनवण्याची जबाबदारी निष्ठने पार पाडली. त्याचाच परिणाम म्हणजे १९६५ मध्ये पाकिस्तानला धुळ चारुन भारताला युध्दात प्रचंड यश मिळाले. राष्ट्रकारणात यशवंतराव चव्हाण प्रचंड यशस्वीही झाले होते. १४ नाव्हेंबर १९६६ ला ते देशाचे गृहमंत्रीही झाले. तेव्हा विद्यार्थ्यांचे आंदोलन, गोवंश आंदोलन, संत फत्तेसिंग यांचे उपोषण अशा तीव्र परीस्थितीतूनही मार्ग काढण्यात यशवंतराव यशस्वी झाले होते. त्यांनी गृहविभागाचे काम योजनाबद्ध पद्धतीने चालवल्यामुळे हिंदु मुस्लीम दंगे, राजकिय पक्षांचे आंदोलने, धार्मिक तेढ या सर्वांवर पोलीसांना संशोधनात्मक मार्गदर्शन देवून तोडगा काढला व सर्व व्यवस्था पूर्ववत केली. यशवंतरावांचे कार्य इतके प्रभावी होते की त्यांना दोनवेळा देशाचे प्रधानमंत्री पदाची संधी चालून झाली होती. परंतू ते केवळ सत्तेचा विचार करणारे नव्हते. महाराष्ट्र राज्याचे शिल्पकार म्हणून त्यांचे कडे पहिले जाते महाराष्ट्रात त्यांनी १ मे १९५८ ला धुम्या गडावर जावून तिथे पांडूरंगाची मूर्ती स्थापन केली. राष्ट्रसंत भगवान बाबांच्या समोर त्यांनी या गडास भगवानगड नाव दिले. ते प्रागतीक विचारसरणीचे होते. ते उत्कृष्ट संसदपटू,

उदारमतवादी होते. यशवंत रावांनी महाराष्ट्र राज्याच्या जडणघडणीत अतिशय मोलाचे कार्य केले होते. आज महाराष्ट्र राज्याच्या सहकार तत्वाचे ते जनक मानले जातात. ग्रामीण भागातील लोकांना शेतीवर आधारीत उद्योग देवून त्यांच्या आर्थिक विकास घडण्यासाठी त्यांनी खूप मोलाची कामगिरी केली आहे.

**लोकनेते :**

यशवंतरावांच्या पूर्वजांचे गाव खानापूर तालुक्यातील ढवळेश्वर हे होते. पूर्वीच्या सावकारशाही मुळे त्यांचे पूर्वज भूमीहीन झाले व त्यांनी गाव सोडले त्यांनतर त्यांचे वडील कराड येथे नौकरीस आले. वडीलांचा प्रामाणिकपणा व कष्टाळूपणा यांचे संस्कार यशवंत रावांवर झाले व तेही प्रत्येक कामात प्रामाणिकपणे काम करु लागले. १९३१ मध्ये पुण्याच्या नुतन मराठी विद्यालयात वकृत्वस्पर्धेसाठी आले तेथे 'ग्रामसुधारणा' या विषयावर त्यांना पारीतोषिक मिळाले तेच त्यांचे पहिले यश होते. यशवंतराव चव्हाण समाजकारणा बरोबर राजकारणातही यशस्वी झाले व ते लोकनेते झाले. त्यांनी समाजातील कनिष्ठ वर्गासाठी खूप मेहनत घेवून त्यांना समाजाचा इतर प्रवांहासोबत सर्वांनी येण्यासाठी कठोर परिश्रम घेतले त्यांनी नेहरुंचा अलिप्ततावादी धोरणाचा प्रभाव जगभरातील बऱ्याच देशात जावून अभ्यासला यातही लोककल्याणाविषयीची त्यांची जाणीव लक्षात येते यशवंतरावांच्या या कार्यात त्यांच्या पत्नी वेणूताईंनी सुध्दा तुरुंगवास भोगला. जनकल्याणासाठी स्वतःला पूर्णपणे समर्पित करणारे ते दृष्टे नेते होते. १९५८-५९ साली बेळगाव निवाली कारवार भागात संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे उग्र आंदोलन झाले. बेळगावाचे जिल्हा पोलीस लूईस यांनी आंदोलकांवर बेछूट गोळीबार केला त्यात नऊ आंदोलकांचा मृत्यू झाला. यावेळी यशवंतरावांनी राजाराम बापू पाटील यांच्या नेतृत्वाखाली परीस्थीतीची माहिती घेतली व योग्य दखल घेतल्यामुळे लुईसची उचलबांगडी केली होती. यावरुन त्यांची जनमानसाबद्दलची तळमळ लक्षात येते.

**यशवंत चव्हाण व साहित्य :**

यशवंतराव चव्हाण हे थोर साहीत्यीकही होते. युगांतर, सह्याद्रीचे वारे, कृष्णाकाठ, ऋणानुबंध ही त्यांची साहित्यसंपदा आहे. तसेच यशवंतरावांचे चरीत्र वर्णन करणारी अनेक पुस्तके आहेत. आधुनिक महाराष्ट्र के शिल्पकार (के.जी.कदम), आमचे नेते यशवंतराव (रमणलाल शहा), कृष्णाकाठचा माणूस (अरुण शेवते) नव महाराष्ट्राचे शिल्पकार (दत्तात्रय बावसकर), Chavan, The man of crisis (B.B. Kale), यशवंतराव : इतिहासाचे एक पान (रामभाऊ जोशी), यशवंतराव चव्हाण जीवन दर्शन (पंजाबराव जाधव), सह्याद्रीचा सुपूत्र (डॉ.न.म. जोशी), ही ज्योत अनंताची (रामभाऊ जोशी) अशी अनेक पुस्तके प्रसिद्ध आहेत.

**यशवंतराव चव्हाण नावांच्या संस्था :**

१. यशवंतराव चव्हाण नाट्यगृह कोथरुड, पूणे
२. यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, मुंबई
३. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान जगन्नाथ भोसले रोड, मुंबई
४. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक
५. यशवंतराव चव्हाण मेमोरीयल हॉस्पीटल, पिंपरी पूर्व
६. यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) पूणे
७. यांबरोबर यशवंतराव चव्हाणांचे नाव साखर कारखाने, कला दालने, प्रवेशव्दार यांनाही देण्यात आले आहे.

**निष्कर्ष :**

अशा या महान अष्टपैलू महाराष्ट्र रत्नाचे कार्य अवर्णनीय आहे. त्यांचे वरील साहीत्यही अवर्णनीय आहे. जनमाणसाच्या कल्याणासाठी त्यांनी स्वतःला पूर्णपणे वाहून घेतले होते. या महान कर्तुत्वाचा अंत निसर्गनियमाप्रमाणे २५ नोव्हेंबर १९८४ रोजी दिल्लीत झाला.

**संदर्भ :**

१) कृष्णाकाठ : जेनेटिक प्रकाशन, २०११, ॲडीशन २०१५, ॲडीशन २
२) सह्याद्रीचे वारे : रोहन पब्लीकेशन, २०१४
३) १९६५ war the inside story : Defence Mini story, Y.B. Chavan diary of India & Pakistan war - R.D. Pradhan & Y.B. Chavan.
४) यशवंतराव चव्हाण जडणघडण, संपादन, अरुण साधु, मधु गणेश कर्णिक, डॉ. पु.द. कोडोलीकर, अनघा प्रकाशन.
५) यशवंतराव चव्हाण, व्यक्तीत्व व कर्तुत्व- गोविंद तळवलकर.
६) यशवंतराव चव्हाण राजकारण आणि साहित्य : भास्कर लक्ष्मण भोळे.
७) लोकनेते यशवंतराव चव्हाण : अनिल चव्हाण .

# "यशवंतराव चव्हाण यांचे आर्थिक विचार"

प्रा. डॉ. चांगुणा विठ्ठल कदम
बी. डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव
मो.नं. ९५२७७९७६८६ ईमेल kadamcv.78@gmail.com

दीनदुबळयांच्या प्रश्नांविषयी कळवळा असणारे आणि आधुनिक महाराष्ट्राची पायाभरणी करणारे द्रष्टे नेते म्हणजे यशवंतराव चव्हाण होय. यशवंतराव चव्हाण हे चळवळीच्या मुशीतून तयार झालेले एक परिपक्व व्यक्तिमत्व होते. धर्मनिरपेक्ष यशवंतराव चव्हाणांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण म.गांधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, यांच्या आचार विचारांच्या प्रभावातून झाली होती. ह.रा. महाजनी, वि.म.भुस्कुटे, एस.एम.जोशी, आचार्य भागवत अशा दिग्गजांचा सहवास त्यांना तुरूंगात असताना लाभला होता. गांधीवाद, समाजवाद, मार्क्सवादाबरोबरच त्यांनी लेनिनचे चरित्र, रशियन राज्यक्रांतीचा इतिहास वाचला होता.सत्यशोधक समाजाचाही त्यांच्यावर प्रभाव होता. मानवेंद्रनाथ रॉय यांच्या लिखाणाचा यशवंतरावांच्या मनावर मोठा विलक्षण परिणाम झाला. रॉयवादामुळे प्रभावित झालेल्या यशवंतरावांनी स्वातंत्र्याचे सामाजिक आणि आर्थिक अंतरंग न्याहाळण्याचा प्रयत्न केला. त्याबाबत त्यांचे वक्तव्य होते, " हेच प्रश्न मला आणि माझ्या मित्रांना सारखे भेडसावीत. आम्ही त्याची चर्चा करीत असू. जमीनदार आणि साधा गरीब शेतकरी यांचं काय करायचं? हा प्रश्न होता. मात्र त्याआधी स्वातंत्र्य हे आमचं पहिलं ध्येय असले पाहिजे. याची आम्हाला खात्री पटली होती. "१

स्वत: शेतकरी कुटुंबात जन्मलेले असल्यामुळे त्यांना अनेक वेळा आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागले. ग्रामीण भागातील अर्थकारण त्यांनी जवळून पाहिलेले असल्यामुळे मुख्यमंत्री असतानाच्या कालावधीत त्यांनी अनेक धाडसी निर्णय घेतले. त्यामुळे यशवंतराव चव्हाण यांचे आर्थिक क्षेत्रातील योगदान महत्वपूर्ण ठरते.

आर्थिक क्षेत्रातील जशी काही तात्कालिक उद्दिष्टे असतात, तशीच दीर्घकालीन ध्येयेही असतात.या दीर्घकालीन ध्येयांनुसार देशाच्या आर्थिक धोरणास विशिष्ट दिशा लाभत असते. यशवंतराव चव्हाण यांचे आर्थिक विचार प्रामुख्याने शेती, उदयोग, सहकार, समाजवाद, आर्थिक विषमता, विकासातील समस्या, जमीन सुधारणा, बॅकांचे राष्ट्रीयीकरण, दारिद्रय व बेरोजगारी, करपध्दती, नाणेसुधारणा, नियोजनाचे महत्व इ.शी निगडीत आहेत. यशवंतराव चव्हाण यांच्या समाजवादी अथवा अर्थशास्त्रीय विचारांवर एम.एन.रॉय यांच्या विचारांचा प्रभाव जाणवतो. या देशात शेतकऱ्यांची क्रांती झाली पाहिजे. हे मानवेंद्रनाथ रॉय यांच्यासह यशवंतरावांनीही मान्य केले होते.

यशवंतराव चव्हाण यांनी कृषिविषयक विचार मांडताना शेतीच्या मालकीहक्काचा प्रश्न, भूमिहिनांचा प्रश्न, व कृषी विकासासाठी उपाय यावर अधिक भर दिला. त्यांच्या मते, जमीन कसणारा शेतजमिनीचा मालक असावा. यशवंतरावांनी सामाजिक समता व सामाजिक न्यायाच्या दृष्टिकोनातून शेतीचा विचार केला. भारतात शेती क्षेत्रात भूमिहिनांची संख्या अधिक आहे. म्हणून वाजवीपेक्षा अधिक जमीनी असणाऱ्या लोकांनी त्यांच्या जमिनीच्या एक ते दोन टक्के जमीन त्यांना द्यावी. तसेच जमीन अविकसित असल्याने ती अनुत्पादक व पडीक राहिली आहे. अशा जमिनी लागवडीखाली आणणे आवश्यक आहे. शेती व्यापारी तत्वाने केली पाहिजे. शेतीच्या आधुनिकीकरणाच्या मार्गातील अडथळे दूर केले पाहिजेत. नद्यांच्या पाण्याचा शेतीसाठी वापर केला पाहिजे. नद्यांवर धरणे बांधली पाहिजेत. धरण बांधल्याने विस्थापित होणाऱ्या लोकांचे पुनर्वसन केले पाहिजे शेतकऱ्यांनी कृषीशास्त्राचा अभ्यास केला पाहिजे असे मत त्यांनी मांडले.

त्यांच्या मते, "शेतीच्या क्षेत्रात प्रगती साध्य करायची, तर या प्रश्नाच्या मानवी आणि आर्थिक अशा दोन्ही बाजू कल्पकतेने सोडवाव्या लागतील."२ हे ओळखून यशवंतरावांनी पावले टाकली. आज शेतीचा संबंध नव्या शोधांशी, शेती करण्याच्या नव्या नव्या पध्दतींशी जर जोडावयाचा असेल तर हे नवे शास्त्र शेतीच्या धंद्याशी नेऊन भिडवण्याचे काम आपण केले पाहिजे. या कामामध्ये आम्हाला शिक्षणाचा उपयोग करून घेता येईल या दृष्टीने तांत्रिक शिक्षणाचे महत्व त्यांनी पटवून दिले.

ग्रामीण समाजाचा आर्थिक चेहरामोहरा बदलण्याच्या ध्येयाची बांधिलकी त्यांनी स्वातंत्र्यपूर्वकाळापासून कार्यकर्ता या नात्याने ग्रामीण क्षेत्रात कार्य करीत असलेल्या काळापासून मनाने स्वीकारली होती. शेतकरी हाच महाराष्ट्राचा प्राण असून शेतकरी हेच महाराष्ट्राचे राज्यकर्ते आहेत असे जाहीरपणे सांगणारे यशवंतराव हे पहिले मुख्यमंत्री होते. मुख्यमंत्री म्हणून महाराष्ट्रात सत्तेच्या सर्वोच्च स्थानावर आरूढ होताच कृषि औद्योगिक समाजरचना, आणि त्यासाठी सहकार चळवळीचा पुरस्कार करून महाराष्ट्राचे ग्रामीण कृषीजीवन त्यांनी आमुलाग्र बदलले. शेतजमिनीच्या कमाल धारणेवर मर्यादा घालण्याचा कायदा करून यशवंतरावांनी महाराष्ट्र हा खऱ्या अर्थाने पुरोगामी असल्याचे देशात याच काळात सर्वप्रथम प्रत्ययास आणून दिले. १९६१ च्या जानेवारीमध्ये महाराष्ट्रातल्या शेतजमिनीबाबतचे विधेयक समोर आले. या विधेयकामुळे दूरगामी अशा जमीन सुधारणेचा पाया घातला गेला. केंद्र सरकारने सीलिंगचा कायदा करण्याचा विचार त्यानंतर दहा – बारा वर्षांनी केला. यातच यशवंतरावांच्या ठिकाणचा ग्रामीण आणि शेती विकास विषयक द्रष्टेपणाचा प्रत्यय येतो.

यशवंतराव चव्हाण यांनी विकास योजना आखताना अविकसित विभागांना प्राधान्याने अग्रक्रम दिला. ग्रामीण औद्योगिकीकरणाबाबत ते म्हणतात की, “ ग्रामीण भागात उद्योग सुरू करून शेती आणि उद्योगांची सांगड घातली जावी. औद्योगिक विकासासाठी नियोजन महत्वपूर्ण आहे. देशाचा संतुलित आर्थिक विकास व्हावा यासाठी ते औद्योगिक विकासाच्या मास्टर प्लानची कल्पना मांडतात.”३ अविकसित भागात विकासासाठी त्यांनी संयुक्त औद्योगिक क्षेत्राची कल्पना मांडली. तत्कालिन कालखंडात मुंबई राज्यात औद्योगिक वसाहती स्थापन करण्यासंदर्भातील योजनेत त्यांनी पुढाकार घेतला. राज्याचे औद्योगिकीकरण करण्यासाठी एक सर्वंकष योजना मांडली. या योजनेच्या माध्यमातून “ उत्पादनाची समन्वित प्रगती घडवून आणणे, त्यापासून उपलब्ध होणाऱ्या फायद्याची मालक, कामगार व ग्राहक यांच्यात समान वाटणी करणे हे या योजनेचे उद्दिष्ट असल्याचे यशवंतरावांनी धोरणसूत्रात नमूद केले.”४ त्यांच्या मते, ज्या देशांची अर्थव्यवस्था अगतिक किंवा मागासलेली आहे तेथे जलद विकास घडवून आणावयाचा असल्यास निदान सुरूवातीला तरी निरनिराळया उद्योगधंद्यांची समतोल अशी वाढ करण्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र व्यापारी व औद्योगिक परिषदेत सहभागी झाल्यानंतर त्यांनी व्यक्त केले की, “ उद्योगधंद्यात सरळ प्रवेश करण्याच्या उपक्रमांत आणि विशेषत: शेतमालावर प्रक्रिया करण्याच्या उद्योगात सहकारी संघटनेला फार महत्व आहे. उद्योगधंद्यांची सहकारी तत्वावर कशी परिणामकारक संघटना होऊ शकते, हे या राज्याने दाखवून दिले आहे.”५ महाराष्ट्रात जमीनधारणेचा प्रभाव कमी असून लहान लहान शेतकऱ्यांची संख्या जास्त, बागायती शेतीच्या तुलनेत कोरडवाहू शेतीचे क्षेत्र फार मोठे अशा स्थितीत शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी कृषी औद्योगिक समाजरचनेची कल्पना त्यांनी मांडली. शेतीला जोडव्यवसाय किंवा पूरक उद्योग जोडणे आवश्यक असल्याचे त्यांनी जाणले. त्याचे महत्व त्यांनी मंत्रिमंडळ सहकाऱ्यांना पटवून दिले.

या पार्श्वभूमीवर कापूस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना सूतगिरणी, भुईमूगाच्या उत्पादकांना सहकारी तेलगिरण्या, ऊसाच्या क्षेत्रात साखर कारखाने यामाध्यमातून उद्योग, व्यवसाय आणि सहकार क्षेत्र यांचा समन्वय साधला. राज्याच्या अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या दृष्टिकोनातून कृषि, मत्स्य व्यवसाय, उद्योग वन आणि सहकाराशी निगडीत कार्यक्रम राबविण्यावर त्यांनी भर दिला. दारिद्रयाने हैराण झालेल्या खेडयातील सामान्य माणसाला आर्थिक समस्येतून सोडविण्यासाठी त्यांनी सहकारी साखर कारखाने, सहकारी बॅंका, सहकारी सोसायटया, खरेदी विक्री केंद्रांची स्थापना केली. तसेच सहकारी सिंचन योजनांसाठी प्रयत्न केले. सहकारी चळवळीचे जाळे महाराष्ट्रभर निर्माण करत कृषीला औद्योगिकतेची जोड दिली. यशवंतरावांच्या सहकारी तत्वाच्या पुढाकारामुळे ऑगस्ट १९५७ मध्ये महाराष्ट्राने १८ सहकारी साखर कारखान्यांची नोंद करून अग्रेसरत्व प्रस्थापित केले. याशिवाय नव्या साखर कारखान्यांची आर्थिक भांडवलाची अडचण दूर करून सरकारने त्यांच्या भागभांडवलात २८ लाख रूपये गुंतविण्याचा निर्णय घेऊन प्रत्यक्षात ते भांडवल गुंतवून कामाला चालना दिली. सहकारी शेतीचाही त्यांनी पुरस्कार केला.

समाजवाद ही अर्थशास्त्रीय संकल्पना आहे. जेव्हा देशातील संपत्ती आणि संसाधनांवर प्रामुख्याने समाजाची मालकी असते, तेव्हा त्यास समाजवाद असे म्हणतात. समाजवादाच्या सैध्दांतिक अधिष्ठानात, “ समाजाची मालकी, आर्थिक नियोजन, राज्याचे महत्व, आर्थिक विषमता कमी करणे, वर्गहीन समाजरचना, सामाजिक कल्याण, मुलभूत बाबींची हमी, आर्थिक अपव्ययांवर नियंत्रण, समाज निगडीत वस्तूंचे उत्पादन इ. बाबींना महत्व दिले जाते.”६ महाराष्ट्रात सर्वप्रथम

समाजवाद आणण्याची घोषणा यशवंतरावांनी १९६२ साली केली. यशवंतराव शास्त्रशुध्द समाजवादाचे पुरस्कर्ते होते. समाजवादाबाबतचे आपले विचार मांडताना यशवंतराव उधृत करतात की, " भिन्न भिन्न व्यक्तींच्या आर्थिक परिस्थितीमध्ये आज जी मोठी दरी आहे, ती जास्तीत जास्त कमी करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे, समाजातील सर्व वर्गांना एक प्रकारची, एक सारखी आणि समान तऱ्हेची संधी मिळेल अशा प्रकारची संधी निर्माण झाली पाहिजे. कुठलाही एक व्यक्ति किंवा व्यक्तींचा समूह अथवा गट अगर वर्ग दुसऱ्याची पिळवणूक करीत नाही. अशा प्रकारचे समाजवादाचे चित्र मी पाहतो."७

यशवंतराव चव्हाण गृहमंत्री असताना कॉंग्रेसने समाजवादाच्या प्रस्थापनेसाठी दिल्ली कॉंग्रेसच्या अधिवेशनात १० कलमी कार्यक्रम मांडला. त्यात देशातील बॅंकांवर सामाजिक नियंत्रण, संस्थानिकांचे तनखे बंद करणे, देशातील त्वरीत भू सुधारणा, शहरी मालमत्ता कमाल जमीन धारणा, प्राथमिक शिक्षणाची पूर्तता, विकेंद्रीकरण, मक्तेदारीविरूध्द उपाययोजना, आयात निर्यात व्यापार, विमा राष्ट्रीयीकरण, अर्थसत्तेचे विकेंद्रीकरण इ. हा कार्यक्रम तयार करण्यामध्ये गृहमंत्री यशवंतरावांचे यश महत्वाचे होते. देशाचे अर्थमंत्री असताना १९७१ ते १९७६ या कालखंडात त्यांनी भारत देशाला पाच अर्थसंकल्प दिले. त्यांच्या अंगी देशाच्या आर्थिक विकासाविषयीची तळमळ होती. त्यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पातून त्यांची अर्थतज्ञ म्हणून प्रतिमा सर्वांच्या मनावर कोरली गेली. त्यांनी पंचवार्षिक योजना प्रभावीपणे राबविण्याचा प्रयत्न केला. यशवंतरावजींच्या कारकिर्दित १९७० – १९७१ हे आर्थिकदृष्टया महागाईचे वर्ष होते. भारतीय जनता महागाईच्या वणव्यामध्ये भरडली जात होती. देशात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती. देशात अन्नधान्य समस्या निर्माण झाली आणि धान्य आयातीच्या समस्येमुळे देशातील आंतरराष्ट्रीय व्यापार प्रतिकूल झालेला होता. देशात बेरोजगारीच्या पातळीमध्ये मोठया प्रमाणावर वाढ झाली होती.

या सर्व परिस्थितीत अर्थमंत्री म्हणून यशवंतरावांनी घेतलेले निर्णय महत्वाचे होते. त्यांनी देशातील महागाई नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न केले. आर्थिक क्षेत्रातील मक्तेदारीचा अभ्यास आणि उपाययोजना या संदर्भात आयोगाची नियुक्ती केली. आर्थिक क्षेत्राच्या संदर्भात अनेक महत्वाचे कायदे मंजूर केले. देशातील काळा पैसा साठविण्याच्या प्रवृत्तीला आळा घालण्याचा प्रयत्न केला. देशातील करदात्यांचे प्रमाण वाढवून कर चुकविणाऱ्यांवर नियंत्रण प्रस्थापित केले. गरिबी हटाव योजनेशी पूरक निर्णय आणि आर्थिक तरतूद उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला. यशवंतरावांच्या आग्रहामुळे प्रमुख बॅंकांचे राष्ट्रीयीकरण आणि संस्थानिकांचे तनखे रद्द झाल्याने आर्थिक धोरणाचे दिशादर्शन झाले. यशवंतरावांनी २४ मार्च १९७१ रोजी लोकसभेत सादर केलेला अर्थसंकल्प हा नव्या दिशेचा निदर्शक होता. शहरी भागातील मालमत्तेच्या धारणेवर कमाल मर्यादा घालण्याचे धोरण त्यांनी राबविले. शेतमालाच्या व्यापारातील मध्यस्थाला आणि त्याच्या नफेबाजीला मुळीच वाव राहणार नाही. अशा रीतीने शेतमालाची खरेदी सुरू व्हावयास हवी, या पध्दतीने त्यांनी धोरणे आखण्यावर भर दिला. साठेबाजी करून कृत्रिम टंचाई निर्माण करण्याचा व लोकांकडून भरमसाठ भाव वसूल करण्याचा कटही त्यांनी उधळून लावला.

अशा प्रकारे यशवंतराव चव्हाण यांच्या राज्य आणि समाजपरिवर्तनाच्या संकल्पना व्यापक होत्या. १९५६ मध्ये द्विभाषिक राज्याचे आणि १ मे १९६० रोजी अस्तित्वात आलेल्या संयुक्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी राज्याच्या आर्थिक व औद्योगिक विकासाला चालना देण्याचे धोरण प्रभावीपणे राबविले. केंद्र सरकारमध्ये त्यांनी संरक्षण, गृह, अर्थमंत्री व परराष्ट्रमंत्री म्हणून आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटविला. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासामध्ये यशवंतरावांचे योगदान अनन्यसाधारण स्वरूपाचे आहे. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, उद्योग, शेती, नियोजन, शिक्षण, समाज, राष्ट्रीय एकात्मता, लोकशाही, समाजवाद, सीमाप्रश्न, राष्ट्रभाषा, साहित्य, संस्कृती अशा विविध विषयांवर त्यांनी चौफेर विचार मांडले आहेत. यशवंतरावांच्या या विचारांमुळेच महाराष्ट्रात हरित क्रांती, कृषि औद्योगिक क्रांती, धवल क्रांती घडून आली. महाराष्ट्रात विकासाचे पर्व उभे करताना येथील मातीत राबणारा माणूस केंद्रस्थानी ठेवून यशवंतरावांनी कार्य केले.

त्यांच्या एकूणच कार्यामुळे यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राच्याच नव्हे तर संपूर्ण भारताच्या राजकारणातील, समाजकारणातील, अर्थकारणातील प्रगल्भ जाणिवेचे नेतृत्व ठरतात.

संदर्भ व टीपा :

१. राम प्रधान, यशवंतराव चव्हाण, जीवनप्रवाह, इंडस सोर्स बुक्स प्रकाशन, प्रथमावृत्ती, जानेवारी २०१३, पृ. १६३.
२. अरूण टिकेकर व इतर (संपा.), महाराष्ट्रभूषण यशवंतराव चव्हाण, गंधर्ववेद प्रकाशन, नोव्हेंबर २०१०, पृ. १२२.
३. यशवंतराव चव्हाण, सहयाद्रीचे वारे, रोहन प्रकाशन, नवीन जन आवृत्ती, जून २०१४, पृ. १०९.
४. यशवंतराव चव्हाण, भूमिका, रोहन प्रकाशन, नवीन विशेष जन आवृत्ती, जानेवारी २०१३, पृ. ७९.
५. गंगाधर वि. कायंदे पाटील, यशवंतराव चव्हाण, चैतन्य पब्लिकेशन्स, प्रथमावृत्ती, डिसेंबर २०००, पृ. ९६.
६. यशवंतराव चव्हाण, सहयाद्रीचे वारे, पूर्वोक्त, पृ. ८४.
७. कित्ता, पृ. २२७.
८. यशवंतराव चव्हाण, कृष्णाकाठ, रोहन प्रकाशन, नवीन विशेष जन आवृत्ती, एप्रिल २०१२.
९. एन. डी. पवार, यशवंतराव चव्हाण: व्यक्ती आणि वाड्.मय, स्नेहवर्धन प्रकाशन, प्रथमावृत्ती, २०१२.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –7.675,Issue NO, 289 (CCLXXXIX )
ISSN : 2278-9308
March, 2021

# यशवंतराव चव्हाण यांचे लोकशाही विकेंद्रीकरण व प्रशासन विषयक विचार

श्रद्धा मोहन पवार
लोकप्रशासन विभाग स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय, अंबाजोगाई .
shraddha7790@gmail.com

**गोषवारा:**

संयुक्त महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री आणि आधुनिक महाराष्ट्र राज्याचे शिल्पकार म्हणूनश्री. यशवंतराव चव्हाण यांची ओळख महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात तसेच जगभरात आहे. राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांतील महाराष्ट्राचा थोर वैचारिक वारसा त्यांनी गतिमान केला. राष्ट्रीय जीवनात त्यांनी महाराष्ट्राला निर्णायक स्थानी नेले. प्रखर स्वातंत्र्यसेनानी, सावध राजकारणी, मुत्सद्दी, सुसंस्कृत विचारवंत, लोकाग्रणी म्हणून त्यांचे स्थान जनमानसात चिरंतन राहणार आहे. गरीब, मागास आणि सामान्य माणसांतही आत्मविश्वास जागवून त्यांच्या जागृत, संघटित कर्तृत्वशक्तितून आधुनिक महाराष्ट्राची पायाभरणी करण्याचे महान कार्य त्यांनी केले. यशवंतराव चव्हाण यांचे व्यक्तिमत्व हे अष्टपैलू व्यक्तिमत्व होते. त्याचबरोबर त्यांचे समाजकारण, राजकारण, प्रशासन, अर्थकारण, शिक्षण, साहित्य, इ. अशा कित्येक क्षेत्रातील योगदान व त्या त्या क्षेत्रातील त्यांचे विचार हे अत्यंत मौलिक स्वरूपाचे असल्याचे दिसून येतात. त्यांचे असे मौलिक विचार त्याकाळातील विकासात विशिष्ट योगदान देणारे ठरलेच परंतु आजही राज्यकारभाराच्या दृष्टीने त्यांचे विचार तितक्याच उपयोगाचे व विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरतील. त्यांनी स्वतंत्र महाराष्ट्रराज्य निर्मितीमध्ये दिलेले योगदान, तसेच मुख्यमंत्री म्हणून कार्यरत असताना प्रशासनात केलेले बदल, राज्यकारभार करण्याची त्यांची शैली आदर्शवत ठरली आहे. आणि म्हणूनच यशवंतराव चव्हाण यांच्या अशाच मौलिक विचारांपैकी त्यांचे लोकशाही विकेंद्रीकरण व प्रशासन विषयक विचारांची माहिती करून घेण्यासाठी प्रस्तुत शोधनिबंधाचे लेखन करण्यात आले आहे.

**मुख्य शब्द :**

यशवंतराव चव्हाण यांचा परिचय, महाराष्ट्र राज्य निर्मिती व सर्वांगीण विकासात यशवंतराव चव्हाण यांचे योगदान, यशवंतराव चव्हाण यांचे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व, यशवंतराव चव्हाण यांचा लोकशाही विकेंद्रीकरण विषयक दृष्टीकोन, यशवंतराव चव्हाण यांचा प्रशासन विषयक दृष्टिकोन.

**उद्दिष्टे:**

१) यशवंतराव चव्हाण यांची महाराष्ट्र राज्य विकासातील विविधांगी भूमिका अभ्यासणे.
२) यशवंतराव चव्हाण यांचे लोकशाही विकेंद्रीकरण विषयक विचार जाणून घेणे.
३) यशवंतराव चव्हाण यांच्या प्रशासन विषयक विचारांची माहिती घेणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोध निबंधाचे लेखन करण्यासाठी संशोधनाच्या विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. तसेच माहिती संकलनाच्या द्वितीयक स्त्रोतांचा वापर करून माहितीचे संकलन करण्यात आले आहे. ज्यात यशवंतराव चव्हाण यांच्या विषयीचे साहित्य ग्रंथ, पुस्तके, वर्तमान पत्रातील लेख,मासिकेव विविध संकेतस्थळांचा समावेश करण्यात आलाआहे.

**प्रस्तावना:**

संयुक्त महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री आणि महाराष्ट्र राज्याचे शिल्पकार श्री. यशवंतराव चव्हाण यांनी प्रारंभापासूनच स्वतंत्र महाराष्ट्र राज्य निर्मितीचे स्वप्न पाहिले होते. संयुक्त महाराष्ट्र राज्य निर्मितीचे ऐतिहासिक आंदोलन आणि यशवंतराव चव्हाण यांच्या प्रभावी मतपरिवर्तनाचे कौशल्य यांचे फलीत म्हणजे स्वतंत्र महाराष्ट्र राज्य निर्मिती होय. परस्परांच्या सहकार्याने आणि परस्परांच्या समंजस्य भूमिकेद्वारे चालविलेला कारभारच लोकाभिमुख राज्यकारभार होय. या सकारात्मक भूमिकेमुळे आणि कार्यपद्धतीमुळे यशवंतराव चव्हाण यांची राजकीय कारकीर्द आदर्श, प्रेरणादायी आणि आधुनिक महाराष्ट्रासाठी संजिवनी ठरली. लोकशाही शासन, प्रशासन

प्रणाली बद्दल यशवंतराव चव्हाण यांचे विचार मुलभूत स्वरूपाचे होते. शासन आणि प्रशासनाच्या सुरेख संगमातूनच राज्याच्या सामुहिक विकासाचे चक्र गतिमान होऊ शकते असा त्यांचा विश्वास होता. सर्वांगिण उत्कर्ष, सामाजिक न्याय, समतोल विकास, सत्ताकेंद्राचे (लोकशाहीचे) विकेंद्रीकरण आणि सर्वस्तरावरील सत्तेत जनसामांन्याचा सहभाग या सर्व महत्त्वाच्या बाबींना यशवंतराव चव्हाण यांनी केंद्रबिंदू मानले.राष्ट्रीय मूल्यांवर त्यांची डोळस श्रद्धा होती. अनेक पिढ्या दबलेले मराठी कार्यकर्तृत्वाचे स्त्रोत मुक्त करण्यात आणि महाराष्ट्रामध्ये समतावादी नवे चैतन्य निर्माण करण्यात ते यशस्वी झाले. त्यांनी दिलेली दिशा आणि दृष्टी नेहमीच मार्गदर्शक ठरणारी आहे.

राज्याचा कारभार हा जनहिताच्या दृष्टीने कसा चालविला पाहिजे या विषयीची त्यांची मते आज चर्चेत असणाऱ्या सुप्रशासनाच्या कल्पनांशी सुसंगत अशीच आहेत. लोकशाही, समाजवाद, नियोजनबद्ध विकास, शेतीचे आधुनिकीकरण, राजसत्तेचे विकेंद्रीकरण,उद्योगधंद्यांचा विस्तार, सहकाराचे महत्त्व आणि चोख राज्यकारभार व राज्यकारभारातील नियोजन  या विषयांवर त्यांचे विचार महत्त्वाचे आहेत. यावरून त्यांची महाराष्ट्राबद्दलच्या विकासाची तळमळ आणि राज्याच्या तसेच देशाच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास प्रकर्षाने दिसून येतो.

**यशवंतराव चव्हाण यांची विविधांगी भूमिका :**

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, संयुक्त महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्व. श्री.यशवंतराव चव्हाण हे सर्वार्थाने लोकोत्तर लोकनेते, समतोल राजकारणी, कुशल मुत्सद्दी, व्यवहारचतूर, कुशलप्रशासक-शासक होते. तसेच साहित्यिक, उत्तम वक्ता, कलारसिक, तत्वचिंतक, कुटूंबवत्सल अशा विविध पैलुंनी त्यांचे व्यक्तीमत्व समृध्द होते.महाराष्ट्राच्या व देशाच्या समाजकारणात आणि राजकरणात जसजशी अधिकाधिक उंच शिखरे त्यांनी गाठली तसतसे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे पैलू समोर येत गेले. ते एक उत्तम प्रशासक होते, अभ्यासू विचारवंत होते, तसेच ते अत्यंत प्रभावी असे वक्ते होते. अनेक वर्षांच्या वाचनातून व चिंतनातून काही मूलभूत विषयांवर ते एका निश्चित भूमिकेवर आलेले होते. ती भूमिका एका बाजूला महाराष्ट्राच्या उज्ज्वल इतिहासावर आधारलेलेली होती, तर दुसऱ्या बाजूला राज्याच्या व देशाच्या भवितव्याची दिशा ठरविणारी होती.

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, थोर नेते श्री. यशवंतराव चव्हाण यांचा जन्म १२ मार्च १९१३ रोजी झाला. सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्र हे एक हजार वस्तीचे खेडे त्यांचे जन्मस्थान. यशवंतरावांना शालेय वयातच विचारवंत, साहित्यिक यांच्या ग्रंथांसंबंधी आकर्षण वाटू लागले. त्यांनी कोल्हापुरातील राजाराम महाविद्यालयामध्ये असताना त्यांचा व्यासंग वाढवला. ना.सी. फडके यांच्यासारखे नामवंत साहित्यिक त्यांना प्राध्यापक म्हणून लाभले होते. त्यांनी बी.ए., एल्.एल्. बी. या परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर १९४२ मध्ये स्वातंत्र्यलढ्यात भूमिगत होऊन कार्य केले. त्यांनी १९४७ नंतर मंत्री, मुख्यमंत्री आणि नंतर देशाचे संरक्षण, गृह, परराष्ट्र आणि वित्तमंत्री ही पदे समर्थपणे सांभाळली. त्यांनी केंद्र सरकारमध्ये पं. जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली कार्य केले. यशवंतराव चव्हाण यांनी २५ नोव्हेंबर १९८४रोजी जगाचा निरोप घेतला.

यशवंतराव चव्हाण हे १९५६ मध्ये द्वैभाषिक राज्याचे मुख्यमंत्री झाल्यापासून ते १९६२ साली महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद सोडून दिल्लीला संरक्षण मंत्री पदाचा कारभार स्वीकारण्यासाठी गेले तो सहा वर्षांचा काळ हा यशवंतराव यांच्या जीवनातील असाच परीक्षेचा, कसोटीचा व परिश्रमपूर्वक मिळविलेल्या लोकमान्यतेचा होता. स्वतंत्र महाराष्ट्राच्या निर्मितीचं ध्येय पूर्ण झाल्यानंतर प्रगतशिल महाराष्ट्र घडविण्याचं स्वप्न यशवंतराव चव्हाण यांनी पाहिलं आणि राज्याच्या सर्वांगिण विकासावर आपलं लक्ष केंद्रीत केलं. मुंबई,कोकण, खान्देश, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ अशा भौगोलीक आणि सांस्कृतीक विविधता असलेल्या राज्याला एका सुत्रात बांधण्याचे काम करित असताना राज्यातल्या जनतेत भावनात्मक एकजुट निर्माण करण्यावर यशवंतराव चव्हाण यांनी मुख्यमंत्री म्हणून भर दिला.महाराष्ट्रातल्या ७०% जनतेचे जीवन शेतीवर अवलंबून आहे. राज्याचा पाया हा कृषी विकास आहे हे लक्षात घेवून त्यांनी कृषी-औद्योगिक विकासाची संकल्पना मांडली आणि महाराष्ट्र राज्य कृषी औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना केली.त्या बरोबरच परस्परांच्या सहाय्यातून परस्परांचा सामुहिक विकास साध्य करण्यासाठी सहकार चळवळ ग्रामीण महाराष्ट्रात रूजविली. गावा-गावात सहकारी संस्था स्थापन झाल्या पाहिजेत असा त्यांचा आग्रह होता. सहकारी बँका, सहकारी साखर कारखानदारी सूरू करण्यासाठी यशवंतराव चव्हाण यांनी भरीव मदत केली त्यांच्या या धोरणामुळेच ग्रामीण महाराष्ट्रात कृषी व ग्रामीण विकासाची गुरूकिल्ली 'सहकारी साखर उद्योग'

होऊ शकला. त्याबरोबरच औद्योगिक वसाहती स्थापन करण्याचा संकल्प प्रत्यक्षात कृतीत आणून उद्योगासाठी राज्यात पोषक वातावरण निर्माण केले.शेतीचे व उद्योगधंदयाचे प्रश्न, विकासातील शिक्षणाचे महत्वाचे स्थान, मराठी भाषा ही ज्ञानभाषा व्हावी या दृष्टीने करावयाचे प्रयत्न व महाराष्ट्राच्या विविध प्रदेशांमधील भावनिक एकात्मतेचे अनन्यसाधारण महत्व अशा विविध विषयांवर त्यांनी आपली मौलिक मते मांडली आहेत.

**यशवंतराव चव्हाण यांचा लोकशाही विकेंद्रीकरण विषयक दृष्टीकोन :**

महाराष्ट्रातील लोकशाही विकेंद्रीकरण व्यवस्थेचे प्रणेते अशीही यशवंतराव चव्हाण यांची ओळख आहे. त्यांच्या कारकीर्दीतच महाराष्ट्रात बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशींचा स्वीकार करून पंचायत राज संस्थांच्या त्रिस्तरीय प्रारूपाचा विचार केला गेला. राजकीय लोकशाहीला सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीची जोड असणे आवश्यक आहे. तशी जोड ज्यावेळी मिळेल तेंव्हाच तिला ख-या लोकशाहीचे स्वरूप प्राप्त होईल अशी यशवंतराव चव्हाण यांची भूमिका होती. राजकीय हक्कांच्या बाबतीत सर्वांना समान संधी मिळणे हाच राजकीय लोकशाहीचा अर्थ असेल तर या राजकीय हक्कांबरोबरच सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रातही प्रत्येक व्यक्तीला ज्यायोगे समान संधी मिळेल अशी आर्थिक व सामाजिक न्यायाची परिस्थिती निर्माण झाली पाहिजे. अशी भूमिका घेवून केवळ मताचा अधिकार म्हणजे लोकशाही एवढाच लोकशाहीचा मर्यादित अर्थ असेल तर समाजाच्या दृष्टीने यापेक्षा अधिक हानिकारक अशी दुसरी गोष्ट असून शकणार नाही. असे यशवंतराव चव्हाण यांचे मत होते.शिक्षणप्रसार ही प्रौढ मतदान पद्धतीबरोबर येणारी गोष्ट असून प्रौढ मतदानपद्धती लोकशाही राज्यकारभाराचा पाया आहे असे यशवंतराव यांचे मत होते. म्हणून आपल्या नवजात लोकशाहीची मुळे खोलवर रुजविण्याच्या दृष्टीने प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारास महत्त्व आहे असे ते म्हणत. भारतामध्ये लोकशाहीचे आदर्श अशा पातळीवर राज्यकारभार नेण्याचे काम, ज्यांना सार्वजनिक सेवक म्हणता येईल अशांनी करावयाचे आहे असे त्यांचे मत होते.

लोकशाही शासन व्यवस्थेत सामान्य माणूस हा केंद्रबिंदु मानला तरी प्रत्यक्ष निर्णयप्रक्रियेत आणि प्रशासकीय व्यवस्थेत त्यांच्या सहभाग नगन्य असतो. हे लक्षात घेवून राज्यात जिल्हा परिषद, पंचायत समीती आणि ग्रामपंचायत अशी स्थनिक स्वराज्य संस्थांची त्रिस्तरीय पंचायत राज्यव्यवस्था निर्माण करण्याच्या महत्वाचा निर्णय यशवंतराव चव्हाण यांनी १९५७ आणि १९६२ साली घेतला. यशवंतराव चव्हाण यांच्या या निर्णयामुळे सत्तेचे विकेंद्रीकरण तर झालेच त्याशिवाय ग्रामीण भागातील नेतृत्वाला समाजकारणात आणि राजकारणातील सत्तेत संधी प्राप्त झाली. या प्रयत्नामुळे महाराष्ट्राचा सर्वांगिण विकास गतीमान झाला.ग्रामीण विकासाचे कार्य सातत्याने स्वावलंबनाच्या वृत्तीने व्हावयाचे असेल तर स्थानिक स्वराज्य संस्थांनी ग्रामीण भागाचा आर्थिक विकास घडवून आणणाऱ्या योजनांकडे अधिकाधिक लक्ष पुरविले पाहिजे.लोकशाही पद्धतीने आणि जनतेचे संपूर्ण सहकार्य मिळवून विकासकार्यक्रम पार पाडावयाचे असतात. कल्याणकारी राज्य निर्माण होण्यासाठी जनतेच्या गरजा भागवण्यासाठी सहजिकपणे शासनाला निरनिराळ्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर विकास कार्यक्रम हाती घेणे आवश्यक होते.लोकशाही पद्धतीने आणि जनतेचे संपूर्ण सहकार्य मिळवून हे कार्य पार पाडावयाचे असते,आपल्या सरकारची हीच वैचारिक भूमिका असल्याकारणाने ज्यांच्यामुळे विकास कार्याचा वेग वाढण्यास मदत होईल आणि देशातील लोकशाहीचा ही पाया दृढमूल होईल अशा प्रकारच्या शासन संस्थाआणि लोकशाही संस्था आपण निर्माण केल्या पाहिजेत. असा यशवंतराव चव्हाण यांचा मानस होता. लहान-मोठ्या पातळीवरील लोकांच्या या संस्था अर्थातच लोकशाही पद्धतीने उभारल्या गेल्या पाहिजेत कारण निरनिराळ्या पातळीवर लोकशाही संस्था निर्माण झाल्याशिवाय आपण लोकशाही नेतृत्व निर्माण करू शकणार नाही असे त्यांचे मत होते. लहान लहान क्षेत्रात काम करणाऱ्या या लोकशाही संस्थांतूनच भावी नेते तयार होतील असे ते म्हणत. आपण स्वीकारलेली लोकशाही पद्धत दृढमूल करण्याच्या दृष्टीने या गोष्टीला फार महत्त्व आहे. लोकशाही जीवन पद्धतीवर आपली संपूर्ण निष्ठा आहे आणि म्हणून आपली प्रत्येक कृती ही निष्ठा दृढतर कशी होईल यादृष्टीने घडली पाहिजे असे त्यांचे मत होते.वेगवेगळ्या पातळीवर लोकशाही संस्थांची उभारणी अशाप्रकारे करावयास पाहिजे की त्यामुळे त्यांना आपल्या विकास योजना सुरळीतपणे पार पाडता येतील. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्रातील लोकशाही विकेंद्रीकरणा संबंधी वसंतराव नाईक समिति चे गठन करताना असे म्हणतात की,लोकशाही विकेंद्रीकरणाची ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे असे माझे ठाम मत आहे. आणि म्हणून या बाबतीत आम्हाला कोणतेही फेरबदल घाईने करावयाचे नव्हते. विशेषतः आपल्या मुळे लोकशाही विकेंद्रीकरणाच्या दृष्टीने पुढचे पाऊल टाकण्यापूर्वी तत्संबंधी सर्व प्रश्नांचा अत्यंत बारकाईने विचार करणे आवश्यक आहे. असे आम्हास वाटले आणि म्हणून या समितीची नेमणूक करण्यात आली.

लोकशाही तत्वाबरोबर ज्या सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टांचा देशाच्या संविधानात उल्लेख केलेला आहे ती उद्दिष्टे आपण स्वीकारलेली आहेत या सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टांचा स्वीकार केल्यानंतर लोकशाहीचे

संघटनात्मक स्वरूप कसे असावे हा एक प्रश्न आहे परंतु लोकशाहीचा विचार आणि आचार यांचा मेळ घालण्याचा देशांत प्रामाणिक प्रयत्न होण्याची आवश्यकता आहे. यशवंतराव चव्हाण म्हणतात की, आपल्या घटनेत लोकशाहीचे मूलभूत तत्व आपण स्वीकारले असले तरी जे नवीन समाज सूत्र आपल्याला निर्माण करावयाचे आहे ते सर्वसामान्य जनतेच्या हिताचे व्हावे म्हणून त्याला लोकशाही स्वरूप कसे देता येईल या दृष्टीने प्रयत्न होणे अत्यावश्यक आहे. ग्रामीण जीवनातील लोकशाही संघटना आम्हाला उभी करावयाची आहे. लोकशाही विकेंद्रीकरणाच्या पाठीमागचा हा मूळ विचार हा खरंच खरा विचार आहे. आपल्यासमोर जी आर्थिक आणि सामाजिक उद्दिष्टे आहेत ती कोणत्या पद्धतीची संघटना निर्माण केली असता सत्य होऊ शकतील यादृष्टीने या देशात जो विचार झाला त्या विचारांतूनच लोकशाही विकेंद्रीकरणाचा मार्ग निघाला. देशात लोकशाहीची वाढ करावयाची असल्यास लोकशाही विकेंद्रीकरणाशिवाय दुसरा मार्ग नसल्यामुळे विकेंद्रीकरण यासंबंधीचा निर्णय आपण थोडा ध्येयपूर्वक घेतला पाहिजे आणि या निर्णयानुसार ग्रामपंचायतींना अधिक अधिकार सत्ता देण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. आम्हाला सत्तेचे विकेंद्रीकरण करावयाचे आहे सत्तेचे विसर्जन करावयाचे नाही. असे यशवंतराव हे अगदी सूचकपणे नमूद करतात. अशाप्रकारचे अत्यंत मोलाचे विचार यशवंतराव चव्हाण यांचे लोकशाही विकेंद्रीकरणासंबंधी होते. यावरून महाराष्ट्रातील लोकशाही विकेंद्रीकरण तसेच पंचायत राज संस्थांच्या निर्मितीमागची भूमिका व त्यात त्यांचे योगदान अत्यंत महत्वाचे असल्याचे दिसून येते.

**यशवंतराव चव्हाण यांचा प्रशासन विषयक दृष्टीकोन:**

लोकशाही शासन प्रणालीतील प्रशासनाबद्दल यशवंतराव चव्हाण यांनी अगदी मुलभूत विचार केला होता. शासन आणि प्रशासन या एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्या तरी त्या दोन्ही बाबी स्वतंत्र आहेत व त्या दोन्ही बाबींचे स्वतंत्र बलस्थाने आहेत. शासन म्हणजे राज्यकारभार आणि प्रशासन म्हणजे यंत्रणा. शासन आणि प्रशासन यांचा सुरेख समन्वय आणि संगम झाला तर त्याचे पर्यावसान साहजिकच लोकांच्या समाधानात होईल असे यशवंतराव चव्हाण यांचे शासन आणि प्रशासन बाबत साधे आणि सोपे सुत्र होते.

प्रशासन पद्धती व प्रशासकीय अधिकारी यांवर मत मांडत असताना यशवंतराव म्हणतात की, प्रत्यक्ष सरकारी यंत्रणेमध्ये राहून काम करणारे आणि सरकारी यंत्रणेच्या बाहेर राहून काम करणारे असे हे सार्वजनिक सेवकांचे दोन प्रकार आहेत. सरकारी यंत्रणेमध्ये राहून काम करणारा सेवक त्या कामासंबंधी एका विशिष्ट प्रकारचे शिक्षण घेऊन ते काम करीत असतो. त्याला एक प्रकारची शिस्त घालून दिलेली असते आणि त्याच्यावर निश्चित अशी जबाबदारी टाकलेली असते. त्यासाठी त्याला वेतन मिळत असते. परंतु सरकारी यंत्रणेबाहेर काम करणारा सेवक त्या सेवेची जबाबदारी आपल्या विचाराने पत्करीत असतो. तो वेतनाने बांधलेला नसतो, तर तो आपल्या विचाराने बांधलेला असतो. सार्वजनिक सेवकांच्या या दोन प्रकारांतील हा महत्त्वाचा फरक आहे परंतु हा फरक असला तरी शेवटी दोघांच्या कामांमध्ये एक साधर्म्य आहे ते म्हणजे दोघांनाही शेवटी जनतेचीच सेवा करायची असते. असे त्यांचे मत होते.

लोकशाही आणि प्रशासन प्रणाली विषयी त्यांचे असे मत होते की, 'लोकांचे, लोकांसाठी आणि लोकांनी चालविलेले शासन म्हणजे लोकशाही ' असे लोकशाहीचे वर्णन करता येते. परंतु ही औपचारिक स्वरूपाची व्याख्या आहे. कारण या व्याख्येवरून लोकशाही सरकारच्या कार्यपद्धतीचा नक्की बोध होत नाही. माझ्या पुरते मी असे म्हणेन की,'प्रशासनातील लोकशाही म्हणजे एकमेकांच्या सतत विचार विनिमयाने चालणारा राज्यकारभार होय. कोणत्याही प्रकारचा साचेबंद दृष्टीकोन न ठेवता लोकांचे प्रतिनिधी एकत्र येऊन जेथे विचार विनिमय करतात अशा शासनाच्या पद्धतीला मी लोकशाही मानतो. लोकशाहीचा अर्थ केवळ एक शासनाचा प्रकार,असा होत असेल तर अशा लोकशाही संबधी मला बिलकुल आकर्षण वाटणार नाही'. या वरून यशवंतराव चव्हाण यांची लोकशाही आणि लोकशाही शासन प्रणाली विषयीचा दृष्टीकोण स्पष्ट होतो. यशवंतराव यांना राज्यशास्त्र व प्रशासन याविषयाचा गाढा व्यासंग होता त्यांच्या मते 'राज्यशास्त्र हे एक सामाजिक शास्त्र असल्याने ते परिवर्तनिय आहे.' यावरून हेच स्पष्ट होते की, आपण जेंव्हा एखाद्या सामाजिक शास्त्रांचा विचार करू लागतो. जेंव्हा आपण बदलल्या जगात रहात आहोत व सामाजिक जीवन परिवर्तनशील आहे. परिवर्तन हे प्रगतीचे गमक आहे. हे सत्य आपल्याला लक्षात घ्यावे लागते असा विचार याद्वारे स्पष्ट होतो. यशवंतराव चव्हाण यांची लोकशाहीवर विशेषत: भारताने स्वीकारलेल्या संसदीय लोकशाही शासन प्रणालीवर नितांत श्रद्धा आणि निष्ठा होती. पुढे ते म्हणतात की,माझ्यामते लोकांचे समाधान हीच चांगल्या राज्यकारभाराची खरी कसोटी आहे. लोकशाही राज्य कारभारामध्ये मी चांगले काम करतो, लोकांच्या उपयोगाचे काम करतो, एवढी कसोटी अपुरी आहे. काम चांगले तर केलेच पाहिजे पण काम चांगल्या

प्रकारे झाले आहे याची लोकांना प्रचीती आली पाहिजे, लोकांना ते जाणवले पाहिजे. म्हणूनच मी म्हणतो की राज्यकारभाराची खरी कसोटी लोकांच्या समाधानात आहे. सरकार चांगले असून उपयोगी नाही, तर सरकार चांगले आहे, राज्य कारभार चांगला चालला आहे असे लोकांना वाटले पाहिजे, जाणवले पाहिजे. तरच तो सरकारी कारभार चांगला म्हणता येईल. लोकांचे समाधान होण्याकरिता राज्य कारभाराबाबत च्या दृष्टीने माननीय यशवंतराव चव्हाण यांनी महत्त्वाच्या काही बाबी स्पष्ट केल्या आहेत. पहिली महत्त्वाची गोष्ट अशी की लोकांचे समाधान ही जर आपण कसोटी ठरविली तर लोकांना या बाबतीत स्वतःचे निश्चित मत व्यक्त करण्याइतका धीर आणि विश्वास वाटला पाहिजे. ते म्हणतात की, राज्य कारभार कार्यक्षम पाहिजे. कार्यक्षम राज्यकारभाराच्या माझ्या कल्पना अगदी साध्या आहेत. कार्यक्षम कारभार याचा अर्थ जे काम असेल ते आपण तातडीने केले पाहिजे, प्रामाणिकपणाने केले पाहिजे, आणि ते करून आपण लोकांचे समाधान केले पाहिजे. माझ्या कल्पनेप्रमाणे कार्यक्षम राज्यकारभाराच्या या तीन कसोट्या आहेत. सरकारने, विभागीय अधिकाऱ्यांनी किंवा जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्या खात्यामध्ये काही गोष्टीत थोडाफार बदल करून हा प्रश्न सुटणार नाही. तर त्यासाठी लागणारा विलंब टाळण्याचा एकच मार्ग आहे व तो म्हणजे आलेले काम एका ठराविक मुदतीत पूर्ण केले पाहिजे, अशी आपण आपल्या मनाला सवय लावून घेतली पाहिजे आणि त्याप्रमाणे ती इतरांना लावली पाहिजे. यावरून प्रशासकीय कार्यपद्धतीतील कारभारावरती त्यांनी अतिशय परखड मत व्यक्त केल्याचे दिसून येते. यशवंतराव प्रशासकीय अधिकाऱ्यांना उद्देशून असे म्हणतात की,आपले सरकार हे केवळ लोकशाही सरकार आहे असे नव्हे, तर लोककल्याणाची जबाबदारीही त्याने स्वीकारलेली आहे म्हणून सरकार जे धोरण ठरवेल त्याची अंमलबजावणी केवळ आपणास करावयाची नसून त्याने आखलेला लोककल्याणाचा कार्यक्रम पूर्ण करण्याची जबाबदारीही आपणावर आहे. या देशातील लोकशाही व येथील राज्यकारभार यशस्वी व्हावयाचा असेल, तर शिक्षण, सहकार, शेती आणि आरोग्य या चार खात्यांचे काम यशस्वी झाले पाहिजे. या खात्यांचे लोक ज्या प्रमाणात लोकांच्या जवळ जाऊ शकतील त्यांच्याबद्दल लोकांच्या मनात ज्या प्रमाणात आपुलकी व जिव्हाळा वाढेल त्या प्रमाणात या देशांतील लोकशाही आणि येथील राज्यकारभार यशस्वी होणार आहे. यावरून यशवंतराव यांची प्रशासकीय कार्याबद्दल, कार्यक्षम राज्यकारभाराबाबत तसेच प्रशासकीय कार्यावरील निष्ठे बाबत चे विचार आज ही तितकेच अनुकरणीय असल्याचे दिसून येतात. अशाप्रकारे यशवंतराव चव्हाण यांचे काही निवडक प्रशासकीय विचार सांगता येतील.

यावरून वर्तमान राजकीय सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीचे अवलोकन केले असता यशवंतराव चव्हाण यांचे समाज कारण,राजकारण, शासन व प्रशासन विषयक विचार किती महत्वाचे आणि मुलभूत होते याची कल्पना येते.

**निष्कर्ष:**

1) यशवंतराव चव्हाण यांची स्वतंत्र महाराष्ट्र निर्मिती मागची भूमिका, त्यात त्यांचे योगदान उल्लेखनीय अशा प्रकारचे आहे.

2) यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी चे प्रयत्न केले त्यातूनच आज महाराष्ट्राला देशातच नव्हे तर जगभरात लौकिक प्राप्त झाले आहे.

3) महाराष्ट्राचे भविष्य हे यशवंतराव चव्हाणांच्या विचारांआधारे प्रगल्भ झाले आहे.

4) यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्रात लोकशाही विकेंद्रीकरणाच्या माध्यमातून पंचायत राज संस्थांच्या निर्मितीची योजना राबविली.

5) यशवंतराव चव्हाण यांची लोकशाही शासन, प्रशासन प्रणाली आणि सर्वांगिण मानवी विकासाची क्षमता यांच्या विषयी भूमिका स्पष्ट होती.

6) आजच्या काळातील शासनकर्ते आणि प्रशासकांनी यशवंतराव चव्हाण यांच्या मौलिक विचारांचा बोध घेतला तर आजही त्यांना त्यांचे हे विचार दिशादर्शक ठरू शकतात.

**संदर्भ:**


1) बा.ह. कल्याणकर,युगंधर नेते यशवंतराव चव्हाण, आकांक्षा प्रकाशन नागपूर.

2) रा.तु. पाटील, समर्थ प्रशासक आणि कुशल संघटक, यशवंतराव चव्हाण: एक कर्तबगार पण वादग्रस्त मुत्सद्दी, राजे-देसाई प्रकाशक, कोल्हापूर.

3) लोकशाही शक्तीचा प्रभावी आविष्कार, सह्याद्रीचे वारे, यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, रोहन प्रकाशन

4) लोकशाही राज्यकारभाराची कसोटी, सह्याद्रीचे वारे, यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, रोहन प्रकाशन

5) विकेंद्रीकरण- लोकशाही जीवनपद्धतीचा पाया, सह्याद्रीचे वारे, यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, रोहन प्रकाशन

6) नव्या जीवनाची साधनशक्ति, सह्याद्रीचे वारे, यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, रोहन प्रकाशन

7) लोकशाहीतील प्रशासन, सह्याद्रीचे वारे, यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, रोहन प्रकाशन

8) http://beedlive.com/newsdetail?cat=Yuva&id=2282&news

9) https://marathiinfo.wordpress.com

10) https://www.thinkmaharashtra.com/node/2541

11) https://m.dailyhunt.in/news/nepal/marathi/webduniya+marathi-epaper-

ISSN : 2278-9308
March, 2021

# यशवंतराव चव्हाण यांचे विसापूर कारागृहातील दिवस

डॉ. वाजगे नवनाथ दत्तात्रय
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,
सावित्रीबाई कला महाविद्यालय, पिंपळगाव पिसा,ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर,
(महाराष्ट्र) मो.नं. ८८०५१०९६३७ ई—मेल : ndwajage@gmail.com

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण युवा अवस्थेत सविनय कायदेभंग चळवळीत सहभागी झाले होते. स्वातंत्र्य आंदोलनातील सहभागामुळे त्यांना अठरा महिन्यांची शिक्षा झाली, अठरा महिन्यांच्या शिक्षेपैकी पंधरा महिने त्यांना प्रत्यक्ष जेलमध्ये काढावे लागले. १९३२ च्या फेब्रुवारी महिन्यात यशवंतराव चव्हाण येरवडा जेलमध्ये आले. येरवडा येथील कॅंपजेलमध्ये त्यांनी एक वर्षाचा कारावास पूर्ण केला. तिथे एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर पुढचे तीन महिने त्यांनी विसापूर जेलमध्ये पूर्ण केले. यशवंतराव चव्हाणांनी आपल्याला जेलमध्ये आलेले अनुभव, त्यातून आलेली प्रगल्भता, समृध्द झालेले अनुभव विश्व या संदर्भात आपल्या आत्मचरित्रातून वर्णन रेखाटले आहे. प्रस्तुत लेखातून यशवंतराव चव्हाण यांनी विसापूर जेलमध्ये जे तीन महिने व्यतीत केले, त्या संदर्भात मांडणी केली आहे.

अहमदनगरपासून सुमारे ४५ कि.मी. अंतरावर विसापूर या गावामध्ये हंगा नदीच्या काठावर निर्जन ठिकाणी विसापूर कारागृह वसविण्यात आले होते. इ.स. १८६१ मध्ये दौंड — मनमाड रेल्वेमार्गाला सुरुवात झाली. हा रेल्वेमार्ग विसापूर गावाजवळून जातो. Great Indian Peninsula Railway या नावाने देखील हा रेल्वेमार्ग ओळखला जातो. विसापूर गावामध्ये कारागृह स्थापन करत असताना हा रेल्वेमार्ग अतिशय महत्त्वाचा होता. पुणे किंवा अहमदनगरपासून विसापूरमध्ये कैदी आणत असताना हा रेल्वेमार्ग ब्रिटिशांना निश्चितच उपयोगी ठरला असेल.

ब्रिटिशांच्या विसापूरमधील वास्तव्याच्या खुणा आजही आपल्या स्वातंत्र्यपूर्व काळातील आठवणींना उजाळा देतात. विसापूर कारागृ ह हे ब्रिटिशांच्या येथील वास्तव्याची फार मोठी निशाणी आहे. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात अन्याय, अत्याचार, वाईट वागणूक यासाठी कुप्रसिध्द झालेले 'विसापूर कारागृह' हे विसापूरमध्ये असून आज या कारागृहाचे रुपांतर खुल्या कारागृहात झाले आहे. विसापूर रेल्वेस्टेशनपासून सुमारे एक ते दिड कि.मी. अंतरावर हे कारागृह असून स्वातंत्र्यपूर्व कालखंडात हे कारागृह चर्चेचा मुख्य विषय बनले होते. भारतात ब्रिटिशांच्या विरोधात ज्यावेळी सविनय कायदेभंग आंदोलन सुरु झाले. त्यावेळी विसापूर कारागृह हे तेथील कैद्यांना दिलेल्या वागणूकीबाबत केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर आखिल भारतीय पातळीवर चर्चेत आले होते.

इ.स. १९३० मध्ये संपूर्ण भारतभरात सविनय कायदेभंग चळवळीस सुरुवात झाली. महाराष्ट्राचा सविनय कायदेभंग चळवळीतील सहभाग अतिशय महत्त्वाचा होता. सविनय कायदेभंग चळवळीच्या काळात जनतेच्या मनातील तुरुंगाची, ब्रिटिश लष्कराची भिती कमी झाली. जनता उत्स्फूर्तपणे आंदोलनात सहभाग घेऊन स्वत:ला अटक करवून घेत होती. दुसऱ्या बाजूने आंदोलकांना तुरुंगात डांबण्याचे काम मात्र ब्रिटिशांकडून अतिशय उत्स्फूर्तपणे पार पाडले जात होते. महात्मा गांधींनी जनतेच्या मनातील तुरुंग, कारावास या गोष्टींची भीती घालवली होती. त्यामुळेच सविनय कायदेभंग चळवळीमध्ये महाराष्ट्रातील जनतेचा सहभाग उत्स्फूर्त होता. अटक करुन घेणे, तुरुंगवास भोगणे यासारख्या गोष्टींचे कॉंग्रेसचे कार्यकर्ते, सर्वसामान्य जनता यांना अजिबात भीती वाटत नव्हती. अशा परिस्थितीत आंदोलकांना ब्रिटिशांमार्फत महाराष्ट्रातील विविध कारागृहांमध्ये डांबून ठेवण्यात येत होते. महाराष्ट्रामध्ये ब्रिटिशांनी नाशिक जेल, वरळी जेल, ऑर्थर रोड जेल, येरवडा जेल यांसारखी कारागृहे उभी केली. यामध्ये अहमदनगर जिल्हयातील श्रीगोंदा तालुक्यातील विसापूर येथील कारागृहाचा देखील समावेश होतो. सविनय कायदेभंग चळवळीच्या काळात राजकीय कैद्यांना ठेवण्यासाठी या कारागृहाचा उपयोग केला गेला. येथे कैद्यांवर जो अन्याय होत असे तो तर अगदी राष्ट्रीय पातळीवर गाजलेला विषय होता. त्यामुळे स्वातंत्र्यपूर्व कालखंडात विसापूर कारागृह हे चर्चेच्या केंद्रस्थानी राहिलेले होते.

महात्मा गांधींच्या विचारांनी प्रभावित होऊन यशवंतराव चव्हाणांनी भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात सहभाग घेतला. सविनय कायदेभंग चळवळीच्या काळात यशवंतराव चव्हाण हे १७–१८ वर्षाचे असतानाच त्यांनी या चळवळीत सहभाग घेतला. सभेचे आयोजन करणे, सभांमध्ये भाषण करणे, पत्रके वाटणे, प्रभात फेरी काढणे, वृत्तपत्रासाठी बातमी पुरवणे यांसारखी कामे यशवंतराव चव्हाणांनी केली. अगदी शालेय जीवनापासूनच कराड तालुक्यामधील चळवळीमध्ये यशवंतराव सहभागी झाले. सविनय कायदेभंग चळवळीच्या काळात कराड तालुक्यात ब्रिटिश सरकारविरोधी केलेल्या कारवायांमुळे यशवंतराव चव्हाणांना अठरा महिने कारावासाची शिक्षा सुनावली गेली. या शिक्षेपैकी एक वर्ष त्यांनी येरवडा कारागृहात पूर्ण केले. त्यानंतरचे तीन महिने त्यांची रवानगी विसापूर कारागृहात झाली. यशवंतराव या कारागृहात येण्याअगोदर हे कारागृह येथील कैद्यांवर होणाऱ्या अन्यायाबाबत संपूर्ण भारतामध्ये चर्चेस आले होते. या पार्श्वभूमीवर इ.स. १९३२ मध्ये यशवंतराव चव्हाण या कारागृहात येऊन पोहोचले होते.

इ.स. १९३२ हे वर्ष सुरु झाल्यानंतर यशवंतराव चव्हाणांच्या शिक्षेपैकी एक वर्षाचा कालावधी पूर्ण झाला. शिक्षेचे एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर येरवडा जेलमधून काही कैद्यांना विसापूर जेलमध्ये घेऊन जाणार आहेत असे जाहीर करण्यात आले. या कैद्यांमध्ये यशवंतराव चव्हाणांचे नाव देखील होते. विसापूर कारागृहाची ख्याती अत्यंत कष्टदायी कारागृह अशा प्रकारची होती. येथील हवामान चांगले नव्हते. पाण्याची कमतरता, कडक बंदोबस्त आणि कठोर अधिकारी असलेले कारागृह अशी विसापूर कारागृहाची ख्याती होती. यशवंतरावांचे येरवडा कारागृहातील दिवस चांगले गेले होते त्यामुळे राहिलेले दिवस दु:खात गेले तरी चालेल अशी त्यांनी आपल्या मनाची तयारी केली होती. ठरलेल्या दिवशी सकाळी विसापूर कारागृ  हामध्ये जाणाऱ्या कैद्यांचे गट तयार करण्यात आले. शंभर माणसांचा एक गट तयार करण्यात आला. यामध्ये यशवंतराव चव्हाण देखील होते. कॅंप जेलच्या दाराशी असलेल्या पोलीसांच्या मोटारीत बसण्यासाठी निघण्यापूर्वी त्यांनी पुन्हा एकदा मागे जेलकडे वळून बघितले. घर सोडताना जसे दु:ख होते, त्याच्यापेक्षा काहीसे जास्त दु:ख त्यांना येरवडा जेल सोडताना झाले. ही एक वर्षाची जेलची आनंददायी संगत त्यांच्या जन्मभर लक्षात राहील अशी होती. तेथे भेटलेली माणसे, वाचलेली पुस्तके, झालेल्या चर्चा व त्यातून आलेली नवी जाण या सर्व बाबी जीवनाला शक्ती देणाऱ्या व पोषक गोष्टी होत्या त्यामुळे यशवंतरावांच्या मनात कृतज्ञतेचा भाव निर्माण झाला आणि त्यांचे डोळे अक्षरश: भरुन आले.

दुसऱ्या दिवशी हे सर्व कैदी विसापूरला पोहोचले. विसापूर कारागृह हे दौंड आणि मनमाड या रेल्वेलाईनवर असलेल्या विसापूर रेल्वे स्टेशनपासून एक ते दीड कि.मी. अंतरावर आहे. एखादया ओसाड माळरानावर बांधलेला हा जुना जेल बऱ्याच लांबून पाहिल्यावर मनामध्ये एक प्रकारची भीती निर्माण करतो. येरवडा जेलमधील कैद्यांचा हा गट विसापूरला पोहोचल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की, मागील वर्षापासून तेथे राहणाऱ्या सत्याग्रहींनी या जेलला अतिशय वेगळे रुप दिले होते. जेल अधिकाऱ्यांची आणि सत्याग्रहींची एक सहकाराची भावना तेथे निर्माण झाली होती. गुजरात आणि मुंबई येथून आलेले अनेक प्रमुख नेते आणि कार्यकर्ते या जेलमध्ये होते. या जेलला अनेक बराकी असून प्रत्येक बराकीला सत्याग्रहींमधून एक प्रमुख 'स्पोक्समन' निवडला जात असे. त्या बराकीतील सत्याग्रही कैद्यांचे जे प्रश्न असतील ते प्रश्न सोडवण्याचे काम हा पुढारी करत असे. पत्रव्यवहार, पुस्तके मागवणे, आजारपणासाठी लागणारी औषधे मिळवणे अशा स्वरुपाचे हे प्रश्न असत. यशवंतराव चव्हाण ज्या बराकीत होते, त्या बराकीचे पुढारी बडोद्याचे प्रसिध्द कॉंग्रेस नेते श्री. मगनभाई पटेल हे होते. मनमिळाऊ स्वभाव, मृदू व मधुर भाषण करण्याची सवय या गुणांमुळे त्यांच्यावर सगळयांचा पूर्ण विश्वास होता.

येरवडा जेलमधील कैद्यांच्या या गटाने विसापूर कारागृहात गेल्यानंतर थोडयाच दिवसांत येरवडयातील बाराव्या बराकीचे रुप विसापूर येथील बराकीस देण्याचा प्रयत्न केला. स.का. पाटील हे मुंबईचे प्रसिध्द नेते यावेळी विसापूर कारागृहामध्ये होते. त्यांनी जेलमध्ये अतिशय व्यवस्थित आणि संपन्न अशी लायब्ररी उभी केली होती. या लायब्ररीमध्ये शेकडो जुनी पुस्तके येत. त्याचप्रमाणे शेकडो जुनी पुस्तके परत जात, असा सहकार्याचा संबंध येथे प्रस्थापित झालेला यशवंतरावांनी पाहिला.

यशवंतराव चव्हाण राहत असलेल्या बराकीमध्ये येरवडा कॅंप जेल येथील बारा नंबरच्या बराकीतील काही मित्र होते. यामध्ये तात्या डोईफोडे, दयार्णव कोपर्डेकर आणि यशवंतराव चव्हाण हे तिघे अगोदर येरवडा जेलमध्ये एकत्र

राहिलेले होते. पुढे ह.रा. महाजनी हे देखील याच बराकीत आले. त्यामुळे येरवडा जेलप्रमाणेच वाचनाच्या व चर्चेच्या बैठकी येथे देखील सुरु झाल्या. या बराकीमध्ये काही गुजराती राजबंदी होते. त्यांच्या सहवासामुळे गुजराती बोलणे यशवंतरावांना समजू लागले. गुजराती भाषेशी नजिकची ओळख देखील यशवंतरावांना विसापूर जेलमध्येच झाली. त्याचा उपयोग पुढे त्यांना व्दिभाषिक राज्याचा मुख्यमंत्री झाल्यानंतर फार झाला.

ह.रा. महाजनींनी यशवंतराव चव्हाणांना सूचना केली की, आपण गेले वर्ष सव्वा वर्ष विविध विषयांवरील पुस्तके वाचली आहेत, अभ्यासली आहेत. तेव्हा त्यांचे आपल्या मनावर झालेले परिणाम आणि आपल्या विचारांच्या दिशा इतर लोकांना सांगण्यासाठी बराकीतील मित्रांपुढे एक व्याख्यान द्यावे. त्या सूचनेस अनुसरुन यशवंतराव चव्हाणांनी 'गांधीवाद' हा विषय घेऊन ३५ ते ४० मिनिटांचे एक भाषण त्या बराकीत दिले. यशवंतराव चव्हाणांना गांधीवादाचे जे वेगवेगळे पैलू समजले होते. आणि त्यांच्या वाचनामधून आणि चिंतनामधून त्यांना जी समज आली होती. तिची मांडणी त्यांनी आपल्या भाषणामधून केली. आपल्या भाषणाच्या शेवटी त्यांनी स्पष्ट केले की, मला जो गांधीवाद समजला आहे, तो असा आहे. परंतू ही माझी जीवननिष्ठा आहे असे मी प्रामाणिकपणे म्हणू शकत नाही. यशवंतरावांच्या मते, मानवी जीवनाला नित्य उपयोगी पडणारी गांधीवादाची सर्वात महत्वाची देणगी म्हणजे साध्य—साधनशुचिता ही होय. गांधीवादाचे राजकीय आणि आर्थिक कार्यक्रम कोणी स्विकारो अगर न स्विकारो परंतू साधनशुचितेचा हा सिध्दांत केवळ तत्वत: श्रेष्ठ वाटतो असे नव्हे तर व्यवहारात दैनंदिन आचारासाठीही अत्यंत उपयोगी पडणारा सिध्दांत आहे.

एखादा नेमका विषय घेऊन त्यावर बोलण्याचा यशवंतरावांचा हा पहिलाच प्रसंग होता. यशवंतरावांचे पाऊण तासाचे ते भाषण संपल्यानंतर अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले. विशेषत: ह.रा. महाजनी आणि निपाणीचे अनंतराव कटकोळ या गांधीवादाच्या पुरस्कर्त्या नेत्यांनी यशवंतरावांचे फारच कौतुक केले. यशवंतरावांनी वयाच्या आणि शिक्षणाच्या मानाने केलेली विषयाची मांडणी त्यांना फार मोलाची वाटली. यशवंतरावांना गेले वर्ष, सव्वा वर्ष आपण जे वाचतो आहोत, त्याचा काही ना काही उपयोग झाला याचे समाधान वाटले. यापुढे आपण जे वाचू त्यासंबंधाने असेच बोलत गेले पाहिजे असा विचार यशवंतरावांच्या मनात आला.

इ.स. १९३३ च्या मे महिन्यात शिक्षेची मुदत संपली. सजा होण्यापूर्वीचे कपडे अंगावर चढवून यशवंतराव चव्हाण विसापूर स्टेशनवर येऊन दाखल झाले. यावेळी त्यांच्याबरोबर तात्या डोईफोडे हे देखील होते. तात्या डोईफोडे आणि यशवंतराव चव्हाण हे दोघेही एकाच वेळी जेलमध्ये आले होते व दोघांची सुटका देखील एकाच वेळी झाली होती. घरचे कपडे अंगावर घातल्यावर यशवंतरावांना काही क्षण चुकल्यासारखे वाटले. पण केवळ थोडाच वेळ. यावेळी जेलचे अधिकारी तिकीटे काढून देण्याकरता स्टेशनवर आले होते. यशवंतरावांनी त्यांच्या मदतीने तिकिटे काढून घेतली आणि दौंडहून पुण्याला जाणाऱ्या गाडीत बसले. अशा तऱ्हेने कारागृहातील एक दिर्घ मुदतीचा मुक्काम संपवून यशवंतराव चव्हाण आपल्या घरी पोहोचले.

२६ जानेवारी १९३१ रोजी कराड म्युनिसिपालटीवर तिरंगा फडकावून तसेच आपल्या हायस्कूलमध्ये सकाळी झेंडा उभारुन 'वंदे मातरम्' च्या घोषणा दिल्या. त्यांनी आपल्या सहकाऱ्यांबरोबर राष्ट्रगीत गायले म्हणून यशवंतराव चव्हाण यांना अटक झाली. अठरा महिन्यांच्या सक्षम कारावसाची शिक्षा त्यांना झाली. यशवंतरावांनी नमूद केले आहे की, त्यांच्या जीवनात भावनाशीलता कमी होऊन विचारांची खोली वाढण्याची प्रक्रिया ही जेलमध्येच झाली. 'जेलमधील हा काळ म्हणजे एक प्रकारे माझे विद्यापीठीय जीवनच होते. येथे भेटलेली माणसे, वाचलेली पुस्तके, झालेल्या चर्चा आणि त्यातून आलेली नवी जाण या सर्व जीवनाला शक्ती देणाऱ्या व पोषक गोष्टी होत्या,' असे देखील त्यांनी नमूद केले आहे. विसापूर येथील कारागृहात यशवंतरावांनी 'गांधीवाद' या विषयावर भाषण केले. गुजराती भाषा शिकले, पुढे व्दिभाषिक मुंबई राज्याचा मुख्यमंत्री झाल्यावर त्यांना फार उपयोग झाला. नव्या नव्या गोष्टी प्रयत्नपूर्वक आत्मसात करायच्या आणि त्यांचा आत्मविश्वासपूर्वक उपयोग करुन दाखवायचा हे देखील त्यांना कारागृहातच शिकायला मिळाले. कारागृहातून बाहेर आल्यानंतर महात्मा गांधींच्या आदेशानुसार यशवंतराव अस्पृश्यता निवारणाच्या कामाला लागले.

अधिक माहितीसाठी संदर्भ ग्रंथ :

१. मधुकर भावे, **यशवंतराव ते विलासराव,** मनोविकास प्रकाशन, पुणे, २००८.
२. भास्कर भोळे, **यशवंतराव चव्हाण राजकारण आणि साहित्य,** साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २००४.
३. यशवंतराव चव्हाण, **आत्मचरित्र, कृष्णाकांठ,** रोहन प्रकाशन, मुंबई, २०१२.
४. रामभाऊ जोशी, **यशवंतराव चव्हाण : इतिहासाचे एक पान,** केसरी प्रकाशन, पुणे, १९७६.
५. लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा.), **श्री. यशवंतराव चव्हाण अभिनंदन ग्रंथ,** मुंबई, १९६१.
६. गोविंद तळवलकर, **यशवंतराव चव्हाण व्यक्तित्व व कर्तृत्व,** मौज प्रकाशन, मुंबई, १९६१.
७. ना.धों.महानोर, **यशवंतराव चव्हाण,** साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २००६.
८. राजेंद्र व्होरा, **स्वातंत्र्योत्तर काळातील वैचारिक वाङ:मय, अमृतसंचय,** पुणे मराठी ग्रंथालय, पुणे, २००२.
९. सरोजिनी बाबर, **मी पाहिलेले यशवंतराव,** महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००७.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –7.675,Issue NO, 289 (CCLXXXIX )
ISSN : 2278-9308
March, 2021

# यशवंतराव चव्हाण यांचे सांस्कृतिक क्षेत्रातील कार्य.

**Dr. Suresh N. Kale**
Head of The Dept. History,Researcher and Supervisor,
H.B.T. Arts & Commerce College,New Subhedar lay out, Nagpur-440024.
Cell No.- 9850345614E-Mail:- sureshkale1972@rediffmail.com

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्याविषयी असे म्हटले जाते की, जर ते पंतप्रधान झाले नसते तर ते साहित्यिक झाले असते. यशवंतरावांच्या बाबततही काही अंशी असेच म्हटले तरी अतिशयोक्ती होणार नाही. राजकारणात न पडता त्यांनी साहित्य रचना केली असती तरी ते मराठी सारस्वतात अग्रणीच राहिले असते. विदयार्थी दशेतील कला,प्रेरणा व जाणिवा त्यांनी कलामंचावरील प्रत्यक्ष सहभागाने जाग्या ठेवल्या असत्या, तर जगाच्या रंगभूमीवर ठसा उमटविणार हा महापुरुष महाराष्ट्राला एक कलावंत म्हणूनही लाभला असता.

**यशवंतरावांचे शाळेतील नाटकाचे प्रयोग.**

यशवंतरावांना लहानपणापासूनच नाटकाचे आकर्षण होते. यशवंतराव पाचव्या—सहाव्या वर्गात शिकत असतांना शाळेच्या स्नेहसंमेलनात बर्नाडशॉ यांच्या 'डॉक्टर डायलेमा' या नाटकाच्या एका प्रवेशामध्ये त्यांनी काम केले होते. त्याशिवाय शाळेच्या स्नेहसंमेलनात 'माईसाहेब' या नाटकात त्यांनी भूमिका केली होती. कोल्हापूरला जावून 'प्रेमसन्यास' नाटक त्यांनी पाहिले होते. याबाबत यशवंतराव 'कृष्णाकाठ' या आपल्या चरित्रग्रंथात म्हणतात, '' मी नाटक कंपनीची नाटके हौसेने पाहत असे. आनंद विलास मंडळी ही क—हाडला वर्षे — दीड वर्षाने भेट देत असे. मास्टर दीनानाथ मंगेशकर, रघुवीर सावकार या प्रसिध्द नटांच्या कंपन्याची नाटकेही क—हाडला होत. नाटयगृहतल्या स्वस्त तिकिटांच्या जागेत बसून मी ती सगळी नाटके मनमुराद पाहिली, शाळेतील संमेलनातील 'माईसाहेब' या नाटकात किर्लोस्करवाडला एका प्रयोगात काम केल्याचे आठवते.(१) ते पुढे म्हणतात, ''मनमुराद संगीत ऐकण्याच्या ओढीने मी भजनी मंडळात जात असे, संगीत भजनासाठी रात्री जागलो, हिंडलो, टाळ वाजविले, भजन म्हटले, नाचलो. शिवजन्मोत्सवासाठी म्हणून सातारा, कोल्हापूर, सांगली येथील भजनाचे फड क—हाडात भरविले.(२) अशाप्रकारे यशवंतरावांना बालपणापासूनच सात्विक आणि प्रासादिक ओढ निर्माण झाली व नंतरच्या धका—धकीच्या काळात जरी त्यांना स्वत:ला संगीताची, नाटकाची उपासना करता आली नाही तरी संगीताशी, नाटकाशी जडलेले नाते मात्र जीवनाच्या अखेरीपर्यंत त्यांनी जोपासलेले होते.

**यशवंतरावांचे नाटय क्षेत्रातील कार्ये.**

नाटकांची गोडी त्यांना बालपणीच लागली असल्यामुळे पुढे नाटयाचार्य खाडिलकरांच्या नाटकांच्या निमित्ताने लिहिताना त्यांच्या नाटयकृतीचे मार्मिक रसग्रहण करुन जुन्या व नव्या नाटकांतील तफावत ते अचुक दाखवू शकले. खाडिलकरांनी 'स्वयंवर', 'भाऊबंदकी' किंवा 'सवाई माधवरावांचा मृत्यू' असे विषय नाटकासाठी निवडण्याची कारणमीमांसा यशवंतराव करतात. त्यांच्या मते महाभारताप्रमाणेच मराठयांच्या इतिहासातही सर्व व्यक्तिरेखांना युध्दाची पार्श्वभूमी आहे. त्यातील शृंगार हा विरांचा शृंगार आहे. युध्दामुळेच मानवी जीवनात निर्माण झालेल्या तणावाचे चित्रण करण्याचे युयुत्सू व प्रभावशाली नाटककाराला वाटलेले आकर्षणच अशा नाटय विषयांची निवड करण्यामागे असू शकते असे नाटकाविषयी यशवंतरावांचे विचार होते.(३)

जुन्या आणि नव्या नाटकातील समाजजीवनाचे चित्रण त्यांच्या अभ्यासाचा विषय होता. जुन्या नाटकांची मांडणी स्थुल आणि ढोबळ असायची, पण नवीन नाटकांची सामाजिक जीवनाची जाणीव अधिक खोल असल्याने त्यामध्ये क्लिष्टता आणि नाटय विषयाची गुतागुंत वाढत असल्याने ही आधुनिक नाटके समाजवास्तवाचा सूक्ष्म वेध घेऊ पाहात आहेत, यांचे त्यांना जरुर कौतुक होते. पण नाटय एक कलानंद देणारी कृती आहे. त्यात प्रेक्षकांना व श्रोत्यांना आनंदाचे डोही डुलता आले पाहिजे. जर समस्या शोधनाच्या कर्कश गदारोळात नाटयगीतातील गायनरस नष्ट होणार असेल तर वेळीच नाटककारांनी, नटांनी जागे होण्याची गरज आहे, असे त्यांनी आवर्जुन सांगितले होते. म्हणूनच नाटय शिक्षण संस्था

महाराष्ट्रात ज्या पूर्वी काम करीत होत्या त्या पुन्हा सुरु झाल्या पाहिजे असे त्यांनी म्हटले आहे. ते म्हणतात,'' साहित्यिकांच्या व नटांचा सहवास घडल्यानंतर नटाची नाटकाविशयीची समज वाढते, त्यामुळे अभिनयाचा दर्जा वाढतो. मराठी साहित्यिकांनी व नव्या नाटककारांनी ही परंपरा पुन्हा चालू करण्यासारखी आहे.(४) यादृष्टिने जर एखादी नाटय शिक्षण संस्था महाराष्ट्रात उभी राहिली तर यशवंतरावांच्या स्मृतीस ते अभिवादनच ठरेल.

**यशवंतरावांनी तमाशाला, लोकनाटय व लोककलेचा दर्जा दिला.**

यशवंतरावांचे नेतृत्व सर्वकष होते. समाजाचा व राष्ट्राचा विकास त्यांचा नित्यध्यास होता, म्हणजे देशात सुबत्ता व शांतता कशी आणता येईल ते त्यांचे पहिले अवधान होते. पण मनुष्य हा कलाप्रेमी आहे. आर्थिक सुबत्ता आल्यानंतर येणारी विश्रांतीची संधी व हातातली संपत्ती योग्य मार्गाने जर वापरली नाही, योग्य करमणूक साधने जनतेला उपलब्ध करुन दिली नाहीत तर समाज अनीतिमान भोगतृष्णेमध्ये वाया जातो याची त्यांना जाणीव होती. म्हणूनच लोकांपुढे अभिजात संगीत नाटक आणि इतर कला मनोरंजन झाले पाहिजे, कलांचे उन्नयन झाले पाहिजे.(५) मागच्या बाजूस दूर माळावर अंधा—या जागी होणा—या करमणुकीचा हीन प्रकार नष्ट करावयाचा असेल तर लोककला, लोकनाटय सभ्य स्त्री — पुरुषासमोर झगझगीत प्रकाशांत सादर करा, म्हणजे त्यातील अश्लील, अनैतिक अंधार आपोआपच नष्ट होईल असे ते म्हणत. त्याच्या या आग्रहातूनच महाराष्ट्रात तमाशाचे लोकनाटयात रुपांतर झाले. (६)

यशवंतराव मुख्यमंत्री असताना त्यांनी घेतलेला महत्वाचा निर्णय म्हणजे 'तमाशा' या लोककलेला त्यांनी दिलेले संरक्षण, प्रोत्साहन. त्यांनीच सुचविले की, तमाशा म्हणू नका, त्या ऐवजी ' लोकनाटय', 'लोककला' असे शब्दप्रयोग वापर. (७) कुस्ती सारख्या मैदानी कलेला त्यांनी प्रोत्साहन दिले. ' महाराष्ट्रा केसरी' हा कुस्तीपटू विजेत्याला दिला जाणारा सन्मान यशवंतरावांनी सरु केला. यशवंतराव संरक्षण मंत्री असताना शैलजा राजे यांच्या ' तुळशीपत्र' या कादंबरीच्या ७५० प्रती शासन स्तरावर खरेदी केल्या होत्या.(८)

यशवंतरावांना लोककलेची आवड होती. ग्रामीण भागातील लोककला लोकजागृतीचे कार्य करते. ती जिवंत राहावी म्हणून त्यांनी श्शासन स्तरावर निर्णय घेतला. पोवाडे, शाहीरी आणि लावणीचे ते चाहते होते. मुख्यमंत्री झाल्यावर त्यांनी 'तमाशा' बोर्डाची स्थापना करुन लोककलेला लोकमान्यता व राजमान्यता मिळवून दिली.(९) महाराष्ट्रात नाटयकलेसाठी नाटय महोत्सव सुरु केले. मोठमोठी नाटय संमेलन भरविले. नाटय कलावंतासाठी मोठे नाटय व्यासपीठ मिळवून दिले. मराठी चित्रपटाला उर्जितावस्था यावी त्यांचा सन्मान व्हावा म्हणून मराठी चित्रपटांना शासन करमणूक करातून सुट देण्याचा निर्णय त्यांनी घेतला. ग्रामीण भागातील लोककलावंत हलाखीच्या परिस्थितीत जीवन जगत होती त्यांची यादी तयार करुन मानधन देण्याची सर्वव्यापी योजना त्यांना अंमलात आणली.(१०)

**यशवंतरावांनी चित्रपट, नाटयक्षेत्राला दिलेले उत्तेजन व मदत.**

नाटयकलेला उत्तेजन देण्यासाठी २.१६ लाख रुपयांची एक योजना आखली. नाटकांच्या पुस्तकांना बक्षिसे, हौशी कलावंतांचा नाटय महोत्सव, खुल्या नाटयगृहाची निर्मिती, विपन्नावस्थेतील कलावंतांना आर्थिक सहाय्य, संगीत, नृत्य आणि नाटयशाळांना अनुदान, तमाशांना परितोषिके आदी गोष्टी महाराष्ट्रामध्ये यशवंतरावांनी सर्वप्रथम सुरू करून प्रशासकीय गुणाबरोबरच आपल्या रसिक व कलाप्रेमवृत्तीचा परिचय त्यांनी जनतेला करुन दिला. नाटयकलेच्या विकासासाठी नाटय महोत्सव, शिबिरे यांना प्रोत्साहन दिले. एप्रिल १९५७ पासून चित्रपटांना करमणूक करात सूट देण्याची नवी पध्दत लागू केली. कलावंतांना शासनातर्फे आर्थिक सहाय्य देण्याची प्रथा त्यांनी सुरू केली. बालगंधर्वांना त्यांच्या विपन्नावस्थेत तिनशे रूपये मासिक मानधन सुरू केले.(११)

या देशातील सांस्कृतिक भावविश्व जुनाट आणि कालबाहय अशा सामाजिक रचनेच्या केंद्राभोवतीच फिरत आलेल्या आहेत. ते बदलायचे असेल तर लोकापर्यंत ज्ञान घेऊन जावे लागेल, नाटय—चित्रपट—लोककला याच माध्यमाव्दारे हे समर्थपणे करता येईल असा त्यांना विश्वास होता.

समाजिक, सांस्कृतिक समृध्दीमध्ये कलावंताचे स्थान ब—याच वेळा डळमळीत होण्याची शक्यता असते आणि त्यामुळे कलावंतांना समाजात प्रतिष्ठा मिळावी. त्यांचे जीवन समाधानी असावे यासाठी त्यांनी कलावंतांच्या अस्मितेची नेहमीच जपणूक केली. कधी स्वत:चे कलावंतापर्यंत श्रोते आस्वादक म्हणून बसले, मैफलीत सामील झाले, तर कधी त्यांना

सन्मानाने आमंत्रित करून त्यांचा गुणगौरव केला.(१२) कलावंत हा कलेनेच ओळखला जातो, तेथे प्रांतभेद–जातिभेद–धर्मभेद कधीही मानायचे नसतात, असे आदर्श त्यांनी आपल्या कृतीने निर्माण करून ठेवले आहेत.

**यशवंतरावांनी सिने कलावंताचा सत्कार व आश्रय दिला.**

साहित्यिक कलाकार, चित्रपट व्यावसायिक, नाटय कलावंत, दिग्दर्शक, नाटककार, लोकशाहीर व लोकनाटय क्षेत्रातील कलावंताबरोबर यशवंतरावाचे जवळचे, मित्रत्वाचे संबंध होते. राजकपूर, अमिताभ बच्चन, शशीकपूर इत्यादी चित्रपट कलाकारांसोबत त्यांचे जिव्हाळयाचे संबंध होते. नव्या महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर कुसुमाग्रजांनी 'नव्या जीवनाचा नाद मला ऐकू येत आहे' हे काव्य लिहिले होते, त्याची यशवंतरावांनी स्तुती केली होती.(१३)

माजी केंद्रीय मंत्री सुशिलकुमार शिंद यशवंतरावांचे साहित्यिक व सांस्कृतिक कार्याबद्दल लिहितात, यशवंतरावांनी लिहिलेल्या 'कृष्णाकाठ' या पुस्तकाचे प्रकाशन करण्याचे भाग्य मला लाभले तेही! कराडमध्ये, प्रकाशन समारंभाचा वृत्तांत कुणीतरी यशवंतरावांना दूरध्वनीवरून कळविला. त्यावर त्यांचा लगेच मला फोन आला. सुशिल तुझे भाषण फार चांगले झाले असे ऐकले हे यशवंतरावांनी दिलेले सर्टिफिकेट माझ्या दृष्टीने फार मोलाचे होत.(१४) महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर मराठी भाषा ही राजभाषा करण्याचे यशवंतरावांनी ठरविले. त्यासाठी भाषा संचालनालयाची निर्मिती करण्यात आली. सरकारी कारभारात मराठी भाषेचा माध्यम म्हणून उपयोग करण्यासाठी त्वरीत उपाय योजण्यात आले. शासकीय कार्यालयातील कारभार मराठी भाषेतून चालविण्याचा नियम करून सर्व जिल्हा तालुक्यातील, कचे–यातील कारभार, पत्रव्यवहार मराठी भाषेतून करावा असा निर्णय यशवंतरावांनी शासन स्तरावर घेतला.(१५)

'रायगडाला जेव्हा जाग येते' या नाटकाच्या शतकमहोत्सवी प्रयोगाला यशवंतराव चव्हाण उपस्थित होते. नाटक संपल्यावर रंगमंचावर जाऊन त्यांनी संभाजींची भूमिका करणारे डॉ. काशीनाथ घाणेकर यांना 'वा शंभूराजे' म्हणत मिठीत घेतले. डॉ. घाणेकर लिहितात की, 'शब्दाची गरज भासू नये इतकी ती कृती बोलकी होती.'

रंगमंचावरील कलाकारांचा व लेखकांचा यथोचित सन्मान करणे हे यशवंतरावांचे खास वैशिष्टय होते. रंगमंचावर जाऊन लेखक व कलाकारांचे कौतूक करीत असत. बाळ कोल्हटकरांचे त्यांनी कौतुक केले होते. बाळ कोल्हाटकरांना ऐकेरी भाषेतून आवाज देवून त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारली होती. बाळ कोल्हटकर साता–याच्या वाटेवर सांडलेली बुगडी एकदाची विसरले असतील मात्र यशवंतरावांची कौतुकाची थाप विसरले नाहीत.

मराठी सिनेसृष्टीतील अभिनेत्री सुलोचना यांच्या या अभिनेत्रीबद्दल कौतुकाने व गौरवाने बोलत. 'वहिनीच्या बांगडया' या चित्रपटाच्या प्रिमीयर शो ला यशवंतराव सौ. वेणूताईसह उपस्थित होते. सुलोचनाबाईच्या रसिकप्रिय अभिव्यक्तीबद्दल ते म्हणाले, '' अहो, आपली आई, बहीण किंवा वहिनी असावी तर तुमच्यासारखीच'' असे जिव्हाळयाने बोलून सुलोचनाबाईना या श्रेष्ठ विचारवंताकडून लाभलेल्या प्रशस्तीने जीवनाचे सार्थक झाल्यासारखेच वाटले.(१६)

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यावर (१ मे १९६०) अवघ्या दोन–अडीच वर्षाच्या कालावधीत साहित्य, संगीत, नाटय या संस्कृती क्षेत्रातील सर्वांगीण विकासाला संपूर्ण उत्तेजन देऊन आपल्या अभिजात व उमद्या रसिक अभिरूचीची साक्ष केवळ महाराष्ट्रीयांनाच नव्हे, तर इतर प्रांतीयांनाही पटवून दिली व आपले सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान सिध्द केले.

गाणे, नाटक, साहित्य व संगीत ही महाराष्ट्राच्या संस्कृतीची अनन्यसाधारण वैशि टये आहेत. मराठी माणूस जसा नाटकाचा वेडा तसाच तो गाणवेडा, साहित्याच्या क्षेत्रात अनेक वाटा आणि वळणांनी साहित्याला संपन्नता लाभली. महाराष्ट्राच्या या अभिजात गुणांची वाढ व्हावी, अभिव्यक्तीच्या विविध क्षेत्रातील कलावंताच्या अविष्काराला योग्य वाव मिळावा, त्यांच्या गुणांचे कौतुक व्हावे आणि पर्यायाने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाची जडणघडण आपल्याकडूनही घडावी, हा थोर मूल्यभाव यशवंतरावांनी आपल्या राजकीय जीवनात सुध्दा सातत्याने जपला राजकारणा व्यतिरिक्त जीवनातील सर्व कलांची कदर केली. त्यातून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचे सामर्थ्य वाढविण्यासाठी वेळोवेळी जे कार्य केले ते महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातील यशवंतरावांचे खरे योगदान होते.

**संदर्भ सुची :–**

(१) चव्हाण यशवंतराव,'कृष्णाकाठ', प्रेस्टिज प्रकाशन,पुणे,१९८७ पृ.५४.
(२) चव्हाण यशवंतराव,'ऋनानुबंध', प्रेस्टिज प्रकाशन,पुणे,१९८६ पृ.५५.

(३) सगणे शांताराम(संपा.), 'लोकराज्य पाक्षिक' यशवंतराव चव्हाण स्मृती विशेषांक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई, १ मार्च १९८५ पृ.१३.

(४) चव्हाण यशवंतराव,'ऋनानुबंध', प्रेस्टिज प्रकाशन,पुणे,१९८६ पृ.५५.

(५) पाटील विठ्ठलराव, 'यशवंतराव चव्हाण विविधांगी व्यक्तीमत्व' विजयादशमी प्रकाशन क—हाड दुत्तिय आवृत्ती २००२ पृ.४५.

(६) कित्ता पृ.४६.

(७) बाबर सरोजिनी(संपा), 'मी पाहिलेले यशवंतराव,' महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ, मुंबई, प्रथम आवृती,१९८८ पृ.४९०,४९१.

(८) कित्ता.

(९) दुकळे प्रकाश, 'यशवंतराव चव्हाण माणूस आणि लेखक,' ग्रंथाली प्रकाशन, मुंबई २०१२ पृ.३६.

(१०) लोकराज्य मासिक, मार्च २०१२ पृ.८१.

(११) कित्ता.

(१२) पाटील विठ्ठलराव, पुर्वोक्त पृ.४६.

(१३) बाबर सरोजिनी(संपा), पुर्वोक्त पृ.३९२.

(१४) लोकराज्य मासिक, मार्च २०१३ पृ.५४.

(१५) कित्ता. पृ.८२.

(१६) पाटील विठ्ठलराव, पुर्वोक्त पृ.५०.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –7.675,Issue NO, 289 (CCLXXXIX )
ISSN : 2278-9308
March, 2021

# महाराष्ट्राच्या विकासात यशवंतराव चव्हाण यांची भूमिका

प्रा. डॉ. केशव अंबादास लहाने
विभाग प्रमुख, इतिहास विभाग राजर्षी शाहू महाविद्यालय पाथ्री ता. फुलंब्री जि. औरंगाबाद 7020996611, 9923722628 keshavlahane@gmail.com

**प्रस्तावना**

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून यशवंतराव चव्हाण हे ओळखले जातात. शालेय जीवनापासून त्यांनी देशसेवेसाठी आपले जीवन वाहून घेतले. 1 मे 1960 रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश मोठ्या चातुर्याने संयुक्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी मोफत तांत्रिक व कृषी शिक्षणाला प्रोत्साहन दिले. विद्युत प्रकल्प स्थापन करून मोठ्या प्रमाणात कृषी व ग्रामीणाना पूरक उद्योगधंद्याची उभारणी करून औद्योगीकरण घडवून आणले. दलित ,मागासवर्गीय व बहुजनांसाठी झटत राहिले. मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा देऊन मराठी विश्वकोश व साहित्य संस्कृती मंडळाची स्थापना केली. स्वतः यशवंतराव चव्हाण हे साहित्यिक होते. त्यांनी साहित्य व नाट्य कलेला प्रोत्साहन दिले. यशवंतरावांनी समृद्ध व संपन्न महाराष्ट्राचे जे स्वप्न पाहिले ते प्रत्यक्षात उतरवण्यासाठी अविरतपणे झटत राहिले. एक अभ्यासू, कर्तृत्वशाली, कुशल प्रशासनाची जाण असलेले, प्रचंड आत्मविश्वास व कार्यक्षमतेच्या बळावर महाराष्ट्र सुजलाम सुफलाम व समृद्ध केला. यशवंतराव चव्हाण यांची महाराष्ट्राच्या जडणघडणीत फार मोठी महत्त्वाची भूमिका मानली जाते.

महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांच्या सारखा एक नेता लाभला हा एक चांगला योग म्हणावा लागेल. विसाव्या शतकातील महाराष्ट्रातील आधुनिक नेत्यांमध्ये यशवंतराव चव्हाण यांचे स्थान अतिशय महत्वाचे आणि अग्रगण्य आहे. महाराष्ट्रात विविध धर्माची, जातीची व पंथाचे लोक राहतात त्यांची प्रत्येकाची मते वेगवेगळी असतात. मतभेद असले तरी त्या सर्वांना बरोबर घेऊन राज्यकर्त्यांना जावे लागते. यशवंतराव चव्हाणांनी हा आदर्श उभा केला. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदावर वर केंद्र सरकार मध्ये संरक्षण ,अर्थ, परराष्ट्र, व्यापार व गृहमंत्री पदावरून आंतरराष्ट्रीय स्थानावर कार्य करताना जगातील सर्व क्षेत्रामध्ये त्यांचे व्यक्तिमत्त्व खुलून उठले. अतिशय कमी व तरुण वयात यशवंतराव चव्हाण यांनी मुख्यमंत्री पदाचा कारभार हाती घेतला व महाराष्ट्र राज्याला विकासाच्या दिशेने नेण्याचा प्रयत्न सफल केला. महाराष्ट्रातील समाजाला प्रत्येक क्षेत्रात समान संधी मिळवून देण्याचे स्वप्न त्यांनी साकार करून दाखविले. सामाजिक, राजकीय, आर्थिक व साहित्यिक अशा विविध क्षेत्रात त्यांनी आपल्या कार्याचा ठसा निर्माण करून महाराष्ट्रापुढे आदर्श निर्माण करून दिला. महाराष्ट्र राज्याच्या सामाजिक जडणघडणीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान महत्त्वाचे आहे. सामाजिक जडणघडणीत विषयी ते म्हणतात, 'समाज वादातील मूलतत्त्व समतेचे आहे.त्यामध्ये सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक या सर्व प्रकारची समानता अंतर्भूत आहे. भारतात सामाजिक समतेला विशेष महत्त्व आहे.जातीय उच्चनीचतेच्या कल्पनांनी आपला समाज आता पोखरलेला आहे असे विचार ते माडतात.

**यशवंतराव चव्हाण यांची जडणघडण**

यशवंतराव चव्हाण शाळेत शिकत असतानाच स्वातंत्र्यचळवळीत सहभागी झाले होते. 26 जानेवारी 1932 रोजी कायदेभंग चळवळीचा भाग म्हणून त्यांनी शाळेच्या पटांगणात झेंडावंदन करून वंदे मातरम म्हटल्याबद्दल त्यांना अठरा महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा येरवडा तुरुंगात उपभोगली. त्यांच्यावर कार्ल मार्क्स, महात्मा गांधी,

पंडित नेहरू यांच्या विचारांचा प्रभाव होता. तुरुंगातून सुटल्यानंतर त्यांनी पुढे एलएलबी ची पदवी संपादन केल्यावर कराड येथे वकिली करण्यास सुरुवात केली. सातारा जिल्हा काँग्रेसच्या अध्यक्ष पदाची जबाबदारी त्यांच्याकडे आल्याने त्यांचे जनसंपर्क व कार्यकर्त्यांचे जाळे वाढले. 1942 च्या चले जाव आंदोलनात भूमिगत राहून कार्य केले. मार्च 1946 मध्ये विधानसभेची निवडणूक जिंकली. श्री बाळासाहेब खरे यांच्या गृह खात्यात व पुढे संसदीय सचिव बनले. तेव्हापासून त्यांच्या शासनात व सत्तेत प्रवेश झाला. या काळात त्यांनी होमगार्ड संघटना स्थापन करणे, तमाशा कलेला उत्तेजन देण्यासाठी तमाशा बोर्ड आणि प्रवासी वाहतूक सेवेचे राष्ट्रीयीकरण हे तीन महत्त्वाचे निर्णय घेतले.

**आधुनिक महाराष्ट्र आणि यशवंतराव चव्हाण**

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून यशवंतराव चव्हाण यांची ओळख आहे.त्यांच्याकडे जेव्हा द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री पद होते त्यावेळी संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ऐन भरात होती. अनेक हुतात्म्यांनी प्राणांची आहुती महाराष्ट्र साठी दिली होती.अशा परिस्थितीत यशवंतरावांनी खंबीरपणा व मुत्सद्दीपणा दाखवत सर्वांशी सामना केला. इंदिरा गांधीचे मन वळून महाराष्ट्र व गुजरात असे दोन राज्ये निर्माण करण्यात त्यांना यश आले. म्हणून संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश आणण्याचे श्रेय यशवंतराव चव्हाण यांच्याकडे आपोआपच येते. महाराष्ट्राचे मराठी भाषिक कशासाठी निर्माण केले ते ही यशवंतरावांनी जाहीरपणे सांगितले आहे. जाती, धर्मनिरपेक्ष, समाजवादी, सत्तक लोकशाहीचा नवभारत उभा करून चालवायचा, ही भूमिका त्यांनी मांडली.

**संयुक्त महाराष्ट्राचे शिल्पकार**

संयुक्त महाराष्ट्राच्या दैदीप्यमान चळवळीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान अत्यंत महत्वपूर्ण राहिलेले आहे.तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या हस्ते 1 मे 1960 रोजी सकाळी संयुक्त महाराष्ट्राच्या नवीन राज्याचे उद्घाटन झाले.पहिल्या दिवशी महाराष्ट्राला उद्देशून यशवंतरावांनी जे भाषण केले ते नव्या राज्याबद्दल त्यांची संकल्पना स्पष्ट करणारे होते. ते म्हणाले, गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रातील जनतेची जी विचलित अशी अवस्था झाली होती ती आता संपून महाराष्ट्राला यापुढे स्थैर्याचे दिवस येतील. अशी अपेक्षा करण्यास मुळीच हरकत नाही. त्यायोगे जनतेला आता आपल्या विकासाच्या प्रश्नाकडे कटाक्षाने लक्ष देता येईल व विकास कार्याच्या बाबतीत येणाऱ्या निरनिराळ्या अडचणींना ते अधिक परिणामकारकपणे तोंड देऊ शकतील. नव्या महाराष्ट्र राज्याच्या जन्माने आपल्याला भरभराटीचे व सुखाचे दिवस येतील, ही सामान्य जनतेची अपेक्षा योग्य अशीच आहे.हा जनतेच्या अपेक्षा पूतिचा क्षण जवळ आणणे हा महाराष्ट्र राज्याचा मी मानबिंदू मानतो.

**शिक्षण प्रवाहातून विकासाकडे**

शिक्षणामुळे समाजाचा सर्वांगीण विकास व राष्ट्राचे समग्र सांस्कृतिक परिवर्तन व्हावे यशवंतराव चव्हाण यांचे मत होते. महात्मा फुले यांनी सांगितलेल्या ज्ञानाची महती यशवंतराव चव्हाण यांनी चांगलीच अभ्यासली होती. बहुजनांसाठी शिक्षणाची बंद असलेली दारे, ग्रामीण भागात पसरलेला अंधार महाराष्ट्राच्या विकासातील एक अडथळा असल्याची यशवंतराव चव्हाण यांना जाणीव होती.त्यांनी आपले शिक्षण विषयक विचार स्पष्ट केले, माध्यमिक शिक्षणात व्यावसायिक शिक्षणाचा समावेश असावा, अभ्यासू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात यावी, ईबीसी सवलत देण्यात यावी, मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात यावी, लोक भाषा हीच ज्ञान भाषा असावी, शिक्षणाद्वारे संस्कृतीची जोपासना व्हावी, तांत्रिक विकासाशिवाय आर्थिक विकास शक्य नाही. त्यामुळे तंत्रनिकेतन, अभियांत्रिकी महाविद्यालय खाजगी संस्थांना चालवण्यासाठी शासनाची परवानगी द्यावी,त्या विचारांची अंमलबजावणी प्रत्यक्षात करून समाजातील सर्व स्तरावरील लोकांना शिक्षण घेणे सोयीस्कर झाले.

**सामाजिक लोकशाही विषयी विचार**

महाराष्ट्राचे शिल्पकार यांचे विचार हे राजकीय स्वरूपाचे नव्हते तर त्यांनी महाराष्ट्र सुजलाम सुफलाम करण्यासाठी प्रयत्न केलेले आहे. जनतेचा,विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या दृष्टिकोनातून प्रयत्न केलेच यासोबतच राज्यातील सर्वांना रोजगार मिळावा म्हणून देशात सर्वप्रथम महाराष्ट्र राज्यात रोजगार हमी योजना सुरू करण्याचे सर्वस्वी श्रेय यशवंतराव चव्हाण यांना जाते.तसेच कृषी क्षेत्राच्या सर्वांगीण विकासात ही त्यांनी कोयना आणि उजनी या दोन मोठ्या धरणाच्या निर्मितीसाठी प्रयत्न केले. लोकांचे समाधान हा एक वेगळाच प्रकार आहे. याचीही कल्पना त्यांना होती.त्यामुळे त्यांनी राजकीय लोकशाहीला सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीची जोड असणे अत्यंत आवश्यक मानले होते.तशी जोड ज्यावेळी मिळेल तेव्हा तिला खऱ्या अर्थाने लोकशाही चे स्वरूप प्राप्त होईल अशी त्यांची भूमिका होती. राजकीय हक्काच्या बाबतीत सर्वांना समान संधी मिळणे हा राजकीय लोकशाहीचा अर्थ असेल, तर या राजकीय हक्का बरोबरच सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात ही प्रत्येक व्यक्तीला ज्यायोगे समान संधी मिळेल अशी आर्थिक व सामाजिक परिस्थिती निर्माण झाली पाहिजे अशी मांडणी ते करतात. आजच्या राजकीय सामाजिक आर्थिक परिस्थितीचे अवलोकन केले तर यशवंतरावाचे विचार किती मूलभूत आणि महत्त्वाचे आहे त्याची कल्पना येते. जेव्हा सर्वार्थाने समर्थ लोकशाही उभी राहते,तेव्हा प्रत्येक व्यक्तीला खऱ्या स्वातंत्र्याचा लाभ होतो आणि तेव्हाच लोकशाहीचे खरे स्वरूप पाहायला मिळते. हे जेव्हा घडते, तेव्हाच समाज सामर्थ्यवान बनतो. अशा समाजात केवळ व्यक्ती स्वतंत्र होतो असे नाही, बौद्धिक दृष्ट्या व अन्य प्रकारे स्वातंत्र्याचा उपभोग घेण्यास समर्थ बनतो असे यशवंतराव चव्हाण यांचे प्रतिपादन होते. मला वाटते की, आजच्या काळात शासक आणि प्रशासक हे दोघेही जनता, प्रसारमाध्यमे यांच्या टीकेचे लक्ष होत असताना यशवंतरावांचा हा विचार पुन्हा एकदा नव्याने रुजविण्याची, त्याचा प्रसार करण्याची वेळ आल्याचे दिसून येते.

**यशवंतरावांचे आर्थिक विकास विचार**

देशाचा आर्थिक विकास जलद गतीने करण्यासाठी व साध्य करण्यासाठी नियोजनाची कास धरून देशासमोरील प्रश्न सोडविण्यासाठी व राष्ट्राचा जलद विकास करण्यासाठी यशवंतराव आणि सामाजिक न्यायला प्राधान्य दिले. आधुनिक महाराष्ट्राची सामाजिक व आर्थिक जडणघडण कशी करावी हे यशवंतरावांचे जीवन कार्य होते. खेड्यातील प्रत्येक व्यक्ती हा स्वतःच्या आश्रमाचा मालक बनून न व समाजरचना निर्माण झाली पाहिजे. यासाठी त्यांनी लोकशाही, लोकनिष्ठा स्वीकारून महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी वाटचाल निश्चित केली. सामाजिक व राजकीय क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्था साठी कृषी-औद्योगिक समाज रचनेची प्रतिमान तयार करून सहकार क्षेत्र औद्योगीकरण ही समाजरचनेची प्रबळ साधने ठरावीत यासाठी कार्यक्रम निष्ठापूर्वक राबवला आहे.

**सहकारातून विकासाकडे**

महाराष्ट्रात यशवंतरावांनी सहकार क्षेत्राची मुहूर्तमेढ रोवून शेतीमालावर प्रक्रिया करणारे उद्योग महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर उभे राहिले पाहिजे त्या भावनेतून सहकारी साखर कारखाने, सूतगिरण्या, सहकारी बँका, दूध डेरी इत्यादी उद्योगांना प्रोत्साहन दिले.आज महाराष्ट्रात शंभरपेक्षा अधिक सहकारी कारखाने उभे आहेत व देशातील सहकारी चळवळीत महाराष्ट्रातील सहकारी चळवळ अग्रभागी आहे. त्यांचे सर्व श्रेय यशवंतराव चव्हाण यांना जाते. एकमेकांना सहाय्य करणारी सहकारी चळवळ ही जनतेची चळवळ व्हावी आणि ती गरीब घटकापर्यंत पोहोचून स्वयंपूर्ण व्हावी यासाठी त्यांचे प्रयत्न होते.

**पंचायत राज**

भारत हा खेड्यांचा देश असून या देशाचा आत्मा खेडेगाव हेच आहे त्यामुळे स्वातंत्र्यानंतर सामूहिक विकास, ग्राम विकास अर्थात पंचायतराज विकासासाठी भरपूर प्रयत्न करण्यात यावी अशी महात्मा गांधी यांचे म्हणणे होते.

त्यांच्या विचारांना विकसित करण्याचा प्रयत्न यशवंतराव चव्हाण यांनी केला. सत्तेत तळागळातील माणसांचा सहभाग वाढावा या धारणेतून यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्रात लोकशाही विकेंद्रीकरणाचा प्रयोग जिल्हा परिषद व पंचायत समिती च्या रुपाने पंचायत राज राज्याची योजना प्रत्यक्षात अमलात आणून राबविला व महाराष्ट्र हे भारतातील लोकशाही विकेंद्रीकरणाचे अंमलबजावणी करणारे पहिले राज्य ठरले. याचे सर्व श्रेय यशवंतराव चव्हाण यांना द्यावी लागते.

**साहित्य आणि यशवंतराव**

शाहिरांचे स्फूर्तीस्थान आणि साहित्य कला गुणांना वाव देणारे मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांची ख्याती राहिलेली आहे. ते काव्याचे चाहते व जाणकार रसिक होते. साहित्य व कलेच्या माध्यमातून ते अनेक कलाकारांचे, कवींचे व लेखकांचे मित्र बनले. रायगडाला जेव्हा जाग येते, एकच प्याला, संशयकल्लोळ अशी एक ना अनेक नाटके त्यांनी छंद म्हणून पाहिली. कोल्हटकरांनी तर आपल्या लोक राज्याच्या अंकात यशवंतराव चव्हाण यांचा उल्लेख रसिकांचा राजा म्हणून केला होता. यशवंतराव चव्हाण पुण्याच्या दैनिक ज्ञानप्रकाशचे वार्ताहर होते. त्यापूर्वी ते सत्यशोधक दिनकरराव जवळकर यांचे कैवारी, देशाचे दुश्मन, पुण्यातील विजयी मराठा, बेळगावचे राष्ट्रवीर इत्यादी नियतकालिकांचे ते चिकित्सक वाचक होते. यशवंतराव चव्हाण साहित्यिकांचे गौरव करणारे एक ललित साहित्यिक होते. अर्थातच त्यांचा व्यासंग फार मोठा होता नव्हे त्यांचे उत्तुंग व्यक्तिमत्व घडण्यात वाचनाचा मोठा वाटा होता.

**समारोप**

यशवंतराव चव्हाण हे स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय सहभागी होऊन त्यांनी राज्याचा सर्वांगीण विकासाचा पाया रचला. शिक्षण, शेती, पंचायत राज, औद्योगिक, सामाजिक, साहित्य व प्रशासन अशा सर्वच क्षेत्रातील विकास कामांचा अंकूर त्यांच्या कारकीर्दीत निर्माण झाला आणि त्यांचे रूपांतर मोठ्या वृक्षात होऊन आज आपण उभा महाराष्ट्र सावलीच्या रूपाने अनुभवतो आहे. ते सर्जनशील विचारांनी झपाटलेले, कर्तव्यदक्ष अभ्यासू, प्रशासक व दृष्टे नेते होते. महाराष्ट्राच्या जडणघडणीत त्यांचे अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. त्यांनी समाजाला आपल्या कर्तृत्वातून एक आदर्श निर्माण केलेला आहे. त्यांची महाराष्ट्र राज्याचे जडणघडणीतील योगदान अनन्यसाधारण व मोठे आहे म्हणून आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार ही उपाधी त्यांना पूर्णतः सार्थ वाटते.

**संदर्भ ग्रंथ**

१) शैलीकार यशवंतराव, डॉ. शिवाजीराव देशमुख, कौशल्य प्रकाशन, सोलापूर, 2009.
२) यशवंतराव चव्हाण - महाराष्ट्राचे शिल्पकार, उत्तम कांबळे, ( संपा) सकाळ प्रकाशन, 2012.
३) गोविंद तळवलकर, यशवंतराव चव्हाण व्यक्तित्व व कर्तुत्व, मौज प्रकाशन, मुंबई, 2012.
४) रामभाऊ जोशी, यशवंतराव एक इतिहास, प्रतिभा प्रकाशन, परभणी, 2010.
५) कल्याणकर बा. ह., युगंधर नेते- यशवंतराव चव्हाण, आकांक्षा प्रकाशन, नागपूर, 2003.
६) यशवंतराव चव्हाण, कृष्णकाठ आत्मचरित्र, प्रेस्टिज पब्लिकेशन, पुणे, 1984.
७) डॉ. सरोजिनी बाबर, मी पाहिलेले यशवंतराव चव्हाण, महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळ, मुंबई, 2007.
८) विश्वास मेहेंदळे , यशवंतराव चव्हाण ते अशोकराव चव्हाण, अनुबंध प्रकाशन, पुणे.
९) डॉ. प्रतिभा पाटील, (संपा) युगपुरुष यशवंतराव चव्हाण, एज्युकेशन प्रकाशन, औरंगाबाद, 2014.
१०) यशवंतराव चव्हाण, युगांतर, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, 1970.
११) डॉ. गंगाधर कायंदे पाटील, यशवंतराव चव्हाण, चैतन्य प्रकाशन, नाशिक, 2000.
१२) भोळे भा.ल., यशवंतराव चव्हाण राजकारण व साहित्य, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, 2007.

ISSN : 2278-9308
March, 2021

# यशवंतराव चव्हाण - व्यक्ती व कार्य

**डॉ. अतुल नारायण खोटे**
स्व. पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय रिसोड, जिल्हा वाशिम.
मो.नं. ९८२२६००४२७, E-mail- atulkhote11@gmail.com

**प्रस्तावना:-**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे शिल्पकार, कुशल प्रशासक होते. त्यांचे पूर्ण नाव यशवंतराव बळवंतराव चव्हाण यांचा जन्म १२ मार्च १९९३ मध्ये सांगली जिल्ह्यातील देवराष्ट्रे या गावी झाला. त्यांच्या सामाजिक व राजकीय कारकीर्दीचा व कार्याचा आढावा घेतल्यास १९३० ते ३३ या काळात कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतला, १९३२ मध्ये १८ महिन्यांचा कारावास, १९४२ मध्ये चले जाव चळवळीत सामील झाले, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९५२ मध्ये कराड मतदार संघातून विधानसभेवर निवड आणि नागरी पुरवठा मंत्री म्हणून नेमणूक करण्यात आली. १९५६ मध्ये द्विभाषिक मुंबई राज्याच्या मुख्यमंत्रीपदी विराजमान झाले. १९६३ मध्ये लोकसभेवर निवड होऊन त्यांनी केंद्रात विविध खात्यांचे मंत्री म्हणून काम केले. १९७७ मध्ये भारताचे उपपंतप्रधान आणि १९८२ मध्ये १८ व्या वित्त आयोगाचे अध्यक्ष म्हणून काम केले. एवढेच नव्हे तर साहित्यिक लेखक म्हणून सुद्धा त्यांनी कार्य केले. त्यांच्या लेखणीतून युगांतर, ऋणानुबंध, कृष्णाकाठ, सह्याद्रीचे वारे इत्यादी उल्लेखनीय ग्रंथकृती साखर झाल्यात. राजकीय, सामाजिक नेता म्हणुन कार्य करणाऱ्या यशवंतराव चव्हाण यांचे सामाजिक, राजकीय व आर्थिक कार्य सुद्धा उल्लेखनीय आहेत.

**चव्हाण यांचे आर्थिक विचार:-**

यशवंतराव चव्हाण यांनी मांडलेल्या आर्थिक विचारात पुढील घटकांचा समावेश होतो.

**१. शेतीविषयक विचार:-**

भारत हा खेड्यांचा देश असून त्या काळात राष्ट्रीय उत्पन्नात जवळपास ५० टक्के शेती उत्पन्नाचा वाटा होता. तेव्हा शेतीची प्रगती करण्यासाठी रचनात्मक बदल घडवून आणणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी मांडले आहे. त्यासाठी कृषी क्षेत्रात पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात व सिंचनावर भर दिला पाहिजे. भारतात प्रत्येक राज्यात नद्यांवर धरणे बांधून पाण्याचा वापर जलसिंचनासाठी मोठ्याप्रमाणात करण्यात यावा असे यशवंतराव चव्हाण यांचे मत होते. शेतकरी परंपरागत पद्धतीने शेती करतात. प्रत्येक शेतकरी उपजीविकेची शेती करतात. अनेकांचा उपजीविकेचा प्रश्न शेतीतून सोडवला जात नाही. कारण शेतीचे उत्पादन तंत्र कालबाह्य झालेली आहे. इतर देशांमध्ये नवीन तंत्रज्ञान, यंत्र, बियाणे, रासायनिक खते यांचा वापर करून शेतमालाचे उत्पादनात मोठी वाढ झाली. अशा स्वरूपाची कृषिक्रांती भारतात व्हावी अशी त्यांची अपेक्षा होती. शेतीत

बदलत्या काळानुसार होणारे परिवर्तन शेतकऱ्यांनी आत्मसात केले पाहिजेत तसेच कृषी विद्यापीठाचे संशोधन शेतकऱ्यांपर्यंत पोहोचले पाहिजे असे त्यांना वाटत होते. शेतीस वित्त पुरवठा पुरेशा प्रमाणात होत नाही. सहकारी क्षेत्रातील संस्था शेतीस कर्जपुरवठा करतात मात्र तो अपुरा आहे. परिणामी अनेक शेतकरी सावकारांकडून कर्ज घेतात. त्यांची व्याजाचे दर अधिक असतात. त्यामुळे कर्जदार शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती हलाखीची होते. यावर उपाययोजना म्हणून सहकारी बँका बरोबरच राष्ट्रीयीकृत बँकांनी शेतीस प्राधान्याने कर्ज द्यावे असे त्यांचे मत होते.

**२. उद्योग-धंद्याविषयी विचार:-**

यशवंतराव चव्हाण यांनी उद्योगधंद्या संबंधी विचार मांडताना कृषीसंकल्पना संरचनेची औद्योगिक-मांडली. त्यामध्ये त्यांनी ग्रामीण स्तरावर भर दिला. ज्यामध्ये कृषी आधारित उद्योग स्थापन करावेत, प्रक्रिया उद्योग स्थापन करावेत. औद्योगिक वसाहती तसेच विभिन्न महामंडळाची स्थापना करावी. औद्योगिक उत्पादनात नवीन तंत्र, नवीन पद्धती यांचा वापर करावा.

त्यांनी समतोल आर्थिक विकासाचा पुरस्कार केला आहे. देशाच्या प्रत्येक विभागामध्ये उद्योग सुरू करावेत तसेच त्यासाठी आर्थिक नियोजन यांचा स्वीकार करावा. तसेच उद्योग सुरू करावेत तसेच त्यासाठी आर्थिक नियोजन यांचा स्वीकार करावा. तसेच उद्योगधंद्यांचा विकास करताना साधनसामुग्रीचा काटकसरीने वापर करावा असा सल्ला त्यांनी दिला. उद्योगधंद्यांच्या प्रक्रियेत कामगारांना सहभागी करून घेतले गेले पाहिजे असे त्यांचे मत होते. त्यामुळे औद्योगिक कलह निर्माण होणार नाहीत. देशात बचत व गुंतवणुकीचे प्रमाण वाढून स्वयंचलित विकास करावा असे चव्हाण म्हणतात. उद्योगधंद्याच्या उभारणीसाठी रस्ते, रेल्वेमार्ग, वीज, पाणी, अर्थसाह्य इत्यादी घटकांना विशेष महत्त्व द्यावे. या सुविधा पुरविण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारांनी पुढाकार घ्यावा.

**३. सहकार:-**

यशवंतराव चव्हाण यांनी सहकारा मध्ये आर्थिक विकास करण्याची शक्ती आहे याचे प्रतिपादन केले. त्यांच्या मते भारतासारख्या कृषिप्रधान राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा विकास साधण्यासाठी सहकारी तत्व उपयोगी पडते. शेती उत्पादन वाढविण्यासाठी त्यांनी सहकारी शेती पद्धतीचा पुरस्कार केला. जमीन मालकांची संयुक्त मालकी असलेली व त्यांच्या संयुक्त व्यवस्थेसाठी काम करणारी स्वयंस्फूर्त सहकारी शेतीसंस्था स्थापन करावी असा विचार मांडला. या पद्धतीमुळे शेतकऱ्यांना एकमेकांच्या अनुभवांची देवाण घेवाण करता येऊ शकेल. या पद्धतीमुळे शेतकऱ्याला शेतीत आधुनिक तंत्राचा, यंत्राचा अवलंब करता येऊ शकेल. उत्पादनात वाढवून त्यांचे उत्पन्नही वाढेल. शेतकऱ्यांच्या धान्याला योग्य भाव मिळण्यासाठी सहकारी खरेदी विक्री संस्था, त्याचे योग्य दरात कर्ज पुरवठा होण्यासाठी सहकारी ग्राहक संस्था स्थापन कराव्यात आणि सहकाराचा विस्तार करावा असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण यांनी केले.

**यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय कार्य:-**

आपणास १९४७ मध्ये देशाला स्वातंत्र्य प्राप्त झाले. काँग्रेसचे नेतृत्व भाषावार प्रांतरचनेला अनुकूल नसल्याची जाणीव होऊ लागली. एस.के. दार यांच्या नेतृत्वाखाली यासंबंधीच्या युगातही अशा प्रकारच्या प्रांतरचनेच्या विरोधात आयोग असल्याचे मत नोंदवले. शंकरराव देव यांच्या सारख्या नेत्यांच्या अध्यक्षतेखाली काम करणारी संयुक्त महाराष्ट्र परिषद ही संस्था केंद्रीय नेत्यांचा रोष पत्करून घ्यायला तयार होत नाही असं दिसतं पण तेच शिवधनुष्य यशवंतरावांनी उचलले. यात वापरलेली कसब फार मोलाची वाटते. अशा या संयुक्त महाराष्ट्राचं भाग्य घडवण्यास अनेक मोठ्या नेत्यांचा वाटा आहे. त्यातीलच एक नाव म्हणजे यशवंतराव चव्हाण होय. या महाराष्ट्राच्या भाग्यविधात्याने हे राज्याला इतर राज्यांपेक्षा राजकीय, आर्थिक, सामाजिक, कला, साहित्य, संस्कृती यामध्ये एक मानदंड घालून दिला. त्याच वाटेवर आजचा महाराष्ट्र वाटचाल करताना आपणास दिसून येतो. संघर्ष हा मानवाच्या जीवनातील अविभाज्य घटक आहे. यशवंतरावांनी स्वातंत्र्य चळवळीसाठी अनेक मोलाचे कार्य केलेले दिसून येते. ग्रामीण भागात युवकांची संघटना तसेच जनमानसात प्रबोधन घडवून आणणे आणि युवकांना स्वातंत्र्यलढ्यासाठी प्रेरित करणे. दलितांशी संवाद साधणे त्यांचे दुःख निवारने, त्यांच्याशी सलोखा निर्माण करून सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यावर यशवंतरावांनी भर दिला.

सयुक्त महाराष्ट्र चळवळीत किंवा संयुक्त महाराष्ट्र समितीच्या एकंदर कार्यात एकजिनसीपणा नव्हता. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारखा नेता ही संयुक्त महाराष्ट्र समितीच्या बाजूनं नव्हता. कारण दलितांवर अन्याय होईल अशी भीती त्यांना वाटत होती. याच सुमारास यशवंतराव चव्हाण यासारखा एक प्रभावी नेता म्हणून महाराष्ट्राच्या राजकारणात उदय होत होता. त्यांचं पंडित जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी आणि इतर काही तत्सम नेत्यांना संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचे महत्त्व पटवून देण्यात संबंधित नेत्यांना आणि खास करून मुत्सद्देगिरीची कमाल दाखवणाऱ्या यशवंतरावांना संयुक्त म्हणजेच मुंबई सह महाराष्ट्र मिळविण्यात यश आले. यशवंतरावांच्या महाराष्ट्र राज्याच्या स्वप्नास अनेक अंग होती. ' महाराष्ट्र राज्याची स्वप्ने' या विषयी बोलतांना ते म्हणाले 'शेतीवर देशाची प्रगती होत नाही.' त्यासाठी लहान उद्योगधंदे उभारले पाहिजे. शेतकऱ्यांची मुले उच्चशिक्षित झाली पाहिजे. विजेचा वापर ग्रामीण भागात झाला पाहिजे. असा नवा विचार नवा माणूस निर्माण केल्याशिवाय काहीच साधणार नाही. मी हे नवीन स्वप्न पाहतो हे महाराष्ट्राचे स्वप्न साकार करण्याचा प्रयत्न केला तसेच संस्कृती व भाषावार प्रांत विदर्भाची एकनिष्ठ भाऊ-भाऊ म्हणून नांदू. असे विदर्भ, मराठवाडा, कोकण आणि इतर विभाग या सर्वांनी भाऊ भाऊ म्हणून नांदू विदर्भ असो, मराठवाडा असो, कोकण असो किंवा इतर विभाग असो तेथील सर्व प्रश्नांकडे आईच्या अंतकरणाने पाहिले पाहिजे. त्यांच्यातील भिन्नभिन्न प्रश्न असतील तर ते समजून घेतले पाहिजेत आणि ते प्रश्न आईच्या ममतेने सोडवण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. प्रेमाचा मार्ग सांगितला पाहिजे. ही परीक्षा मी जरूर घेत आहे. सर्व मागासलेल्या लोकांच्या विकासाचा प्रश्न याच माध्यमातून सोडवता आला पाहिजे. त्यांच्यातील अनेक प्रश्न आहेत. शेतीचा प्रश्न, सहकारी तिचा प्रश्न, विणकरांच्या प्रश्न आपुलकीने सोडविताना मी नापास होणार नाही याची काळजी त्यांनी घेतली.

**केंद्र सरकार मध्ये यशवंतराव चव्हाण यांची भूमिका:-**

महाराष्ट्राचे प्रथम मुख्यमंत्री होण्याबरोबरच त्यांनी भारताच्या केंद्र सरकारमध्ये कॅबिनेट मंत्री, च्या रूपानं अनेक वेळा सेवा केली आहे. गृह, रक्षा, वित्त तसेच परराष्ट धोरणाबाबत ते मंत्री राहिलेले आहेत. तसेच ते भारताचे उपप्रधानमंत्री सुद्धा राहिलेले आहेत. १९६२ च्या भारत चीन सीमा वादा मध्ये यशवंतराव चव्हाण यांना भारताचे रक्षा मंत्री म्हणून नियुक्त केले गेले होते. १९६२ मध्ये रक्षा मंत्री कृष्णा मेनन यांच्या राजीनाम्यानंतर पंडित नेहरू यांनी यशवंतराव चव्हाण यांना महाराष्ट्र केंद्र सरकार मध्ये बोलावले आणि संरक्षण मंत्र्याचा पदाचा कारभार त्यांच्याकडे सोपवला. त्यांनी युद्ध परिस्थितीची नाजूक स्थिती याचा आढावा घेऊन अनेक निर्णय त्याठिकाणी घेतले आणि पंडित नेहरू यांच्यासोबत चीन सोबत युद्ध विराम घडवण्यासाठी वार्तालाप केला. ते सप्टेंबर १९६५ भारत-पाकिस्तान युद्धाच्या दौरानभी रक्षा मंत्री होते. १४ नोव्हेंबर १९६६ मध्ये त्यांना देशाचे गृहमंत्री म्हणून नियुक्त केले गेले. २६ जून १९७० ला त्यांना भारताचे वित्त मंत्री आणि ११ ऑक्टोबर १९७४ मध्ये परराष्ट्रमंत्रीच्या रूपाने नियुक्त केले गेले. १९७७ यशवंतराव चव्हाण विरोधी पक्ष नेता म्हणून नियुक्त केले. १९७८-७९ यशवंतराव चव्हाण त्यांनी काँग्रेस पक्ष सोडला आणि देवराज उर्स, कासू ब्रह्मानंद रेड्डी, ए.के. एंटणी, यांच्यासोबत काँग्रेसमध्ये सहभागी झाले. प्रधानमंत्री चरण सिंह यांच्या मंत्रिमंडळामध्ये त्यांना भारताचे गृहमंत्री तथा उपप्रधानमंत्री म्हणून नियुक्त केले गेले. अशी एकंदरीत संपूर्ण त्यांची राजकीय कारकीर्द जर पाहिली तर केंद्र सरकार मध्ये यशवंतराव चव्हाण यांनी मोठमोठी पद उपभोगलेले असून आपल्या राज्य राजकारणाचा ठसा त्यांनी केंद्र सरकारमध्ये सुद्धा दाखवून दिलेला आपल्याला पाहायला मिळतो.

**संदर्भसूची:-**

१. यशवंतराव ते विलासराव - डॉ. वि. वास मेंहेदळे, अनुबंध प्रकाशन, पुणे. द्वितीय आवृत्ती ३० ऑक्टोबर २००७.

२. थोरले साहेब, प्रा. डॉ. विजय पाथ्रीकर, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती डिसेंबर २०१०.

३. आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण, ले. संपा प्रा. अशोक नाईकवाडे, प्रकाशक डॉ. प्रदीप जबदे प्राचार्य देवगिरी महाविद्यालय औरंगाबाद.

४. यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय व्यक्तिमत्व, केळकर भा. कृ.

५. वादळमाथा, राम प्रधान, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, प्रथमावृत्ती नोव्हेंबर १९९५.

# यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक कार्य

प्रा.डॉ.संजय बाबुराव वाकळे
इतिहास विभाग प्रमूख
कला व विज्ञान महाविद्यालय चिंचोली ता.कन्नड जि.औरंगाबाद
Email-sbwakle77@gmail.com, मो.नं 9422810591

प्रस्तावना :

साहित्य कला व राजकारणात मनापासून रुची रस आणि अभ्यास करणारे राजकारणातील रसिकराज व्यक्तिमत्व उक्ती आणि कृती यांचा प्रत्यक्ष मिळणारी व्यक्तिमत्व महाराष्ट्राचे 'पहिले' मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण 'भगतसिंगांची फाशी 'यामुळे त्यांच्या मनावर झालेला खोल परिणाम व त्यांचीच प्रचिती म्हणून त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होण्याचा निश्चय केला आणि त्यांच्या या सहभागामुळे त्यांना 1932 मध्ये पहिला कारावास भोगावा लागला.त्यावेळी त्यांनी कार्ल मार्क्स त्यांच्यासारख्या विचारवंताच्या साहित्याचा अभ्यास केला व त्यांच्या विचारांचा प्रभाव यशवंतराव चव्हाण यांच्या मनावर झाला.त्यामुळेच ते गांधीजीच्या सविनय कायदेभंग चळवळीत सहभागी झाले. त्यामुळे त्यांना अठरा महिने कारावास भोगावा लागला. त्यावेळी एस एम जोशी आचार्य भागवत इत्यादींच्या सहवासामुळे देशभक्तीचे संस्कार त्यांच्यावर झाले. 1957 मध्ये मुंबई द्विभाषिक राज्याचे मंत्री असताना संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी त्यांनी पुढाकार घेतला व त्यांच्याच प्रयत्नांमुळे 1 मे 1960 रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. व महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री होण्याचा त्यांना मान मिळाला. यशवंतराव चव्हाण हे केवळ राजकारणीच नव्हते तर ते एक लोकशिक्षक होते. त्यांनी आपल्या कारकिर्दीत शिक्षण, शेती, औद्योगिक, सामाजिक, साहित्य प्रशासन अशा सर्वच क्षेत्रात सहभाग घेऊन लक्ष घालून त्यामध्ये परिपूर्णता आणून जनसामान्यांचा विकास साधण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केला.

संकुचित वृत्तीने काम करण्यापेक्षा कुठल्यातरी व्यापक दृष्टीने काम केले पाहिजे यावर यशवंतरावांचा विश्वास होता. त्यामुळे महाराष्ट्राचे नेतृत्व करताना वेगवेगळया क्षेत्राबरोबर शैक्षणिक क्षेत्रात देखील त्यांचे भरीव योगदान आहे. शिक्षणावर कोणाची मक्तेदारी नाही. शिक्षणाने सर्वांसाठी आहे. शिक्षणाद्वारे राज्याचा पर्यायाने राष्ट्राचा विकास होतो. हे त्यांना ज्ञात होते. बहुजन समाजाने शिकले पाहिजे हे खरे, पण ते कशासाठी? निव्वळ नोकरीसाठी की देशासाठी काही विशेष करण्यासाठी? अशा अनेक वैचारिक दृष्टिकोनातून शिक्षण संबंधित ते विचार मांडत. यशवंतरावांनी महाराष्ट्राचे नेतृत्व हाती घेतल्यानंतर सत्तेच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन घडवून आणले. लोकशाही धर्मनिरपेक्षता यावर त्यांची श्रद्धा होती. बहुजन समाजाच्या चौफेर विकासाचा विचार त्यांनी अंगिकारला होता. तर समाजवादाचे तत्त्वज्ञान त्यांनी आत्मसात करून समाजाची समाजरचना निर्माण करण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रामध्ये आपले विचार व कार्य तिच्या माध्यमातून एक वेगळा ठसा निर्माण केला. यामुळेच महाराष्ट्र राज्य प्रगत राज्य म्हणून ओळखले जाते.

संशोधनाचा उद्देश:

1) यशवंतराव चव्हाण यांच्या शिक्षण विषयक कार्याचा आढावा घेणे.

यशवंतराव चव्हाण यांचे शिक्षण विषयक कार्य-

यशवंतराव चव्हाण यांनी आधुनिक महाराष्ट्राच्या विकासाचा पाया भक्कम करण्यासाठी महत्वपूर्ण कार्य केलेले आहेत. 19 56 ते 19 62 पर्यंत संयुक्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असेपर्यंत त्यांनी अनेक शैक्षणिक सवलती स्कॉलरशिप जाहीर केल्या. मूलभूत स्वरूपाच्या शैक्षणिक संस्था स्थापन केलेल्या अनेक संस्थांना प्रेरणा दिल्या. यामुळेच शैक्षणिक क्षेत्रामध्ये महाराष्ट्र प्रगत राज्य म्हणून ओळखले जाते.

आर्थिक दृष्ट्या मागास वर्गासाठी मोफत शैक्षणिक सवलत (ई बी सी):-

यशवंतराव चव्हाण हे सर्वसामान्य कुटुंबातील असल्यामुळे अनेक अडचणी मधून त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. अत्यंत बिकट परिस्थितीतून शिक्षण घेतल्यामुळे गरिबांना शिक्षण घेताना किती अडचणी येतात याचा अनुभव त्यांना होता. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या मुलांना दलित उपेक्षित वंचित अशा बहुजन समाजातील मुलांना शिक्षण घेणे परवडत नव्हते. यशवंतराव चव्हाण हे द्विभाषिकांचे मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी बहुजनांच्या शिक्षणासाठी काही करण्याचे ठरविले.मुख्यमंत्री झाल्यानंतर महाराष्ट्रामध्ये 900 रुपये पेक्षा कमी उत्पन्न असलेल्या आर्थिक दृष्ट्या मागास वर्गासाठी मोफत शिक्षण देण्याची योजना त्यांनी मंजूर केली. आपले मुख्यमंत्रीपद पणाला लावून यशवंतरावजींना ही योजना मंजूर करून घ्यावी लागली. अशा प्रकारची सवलत देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. त्यामुळे शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली झाली. याचा लाभ आर्थिक दृष्ट्या मागास वर्गातील लोकांना अधिक झाला. सुरुवातीला ज्या पालकांचे उत्पन्न 900 रुपये पेक्षा जास्त नसेल अशांच्या पाल्यांना मोफत शिक्षणाचा नियम लागू केला व लवकरच ही मर्यादा बाराशे रुपये पर्यंत वाढविली या सोयीमुळे ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार होण्यास मिळाला. महाराष्ट्राच्या बहुजन समाजामध्ये शैक्षणिक क्रांती झाली. आज बहुजन समाजातील जे शिक्षक डॉक्टर वकील इंजिनियर इत्यादी सर्व क्षेत्रांमध्ये चमकत आहेत ते केवळ यशवंतराव चव्हाण यांच्या या मोफत शिक्षण योजने मुळेच असे म्हटल्यास ते चुकीचे ठरणार नाही.

महाराष्ट्रातील सर्वांगीण शिक्षणाला चालना-

यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली शिक्षण क्षेत्रात अनेक क्रांती घडविणारे निर्णय घेण्यात आले. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण मंडळाची स्थापना करून शिक्षणाची गंगा सर्वसामान्यापर्यंत पोचविण्याचा प्रयत्न केला. तसेच माध्यमिक शिक्षणामध्ये सुसूत्रता निर्माण होण्यासाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाची स्थापना केली. शैक्षणिक कार्याला गती देण्यासाठी पुस्तकी शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षणापर्यंत विविधांगी कार्यक्रम त्यांनी मोठ्या प्रमाणावर सुरू केले. मूल उद्योग शिक्षणाला चालना दिली. प्राथमिक शिक्षणामध्ये इंग्रजी या विषयाचे महत्त्व जाणून पाचव्या वर्गापासून इंग्रजी हा विषय ऐच्छिक केला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना इंग्रजी शिकविण्यास नाकारले जाणार नाही याची काळजी घेतली गेली. प्राथमिक शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी यशवंतराव चव्हाण यांनी 1962 सली प्राथमिक शिक्षकांसाठी पेन्शन योजना लागू केली. तसेच राष्ट्रीय कल्याण निधी चाही प्रारंभ केला. महाराष्ट्रात गरीब आणि पात्र विद्यार्थ्यांसाठी कर्ज शिष्यवृत्ती 1954 पासून पुढे चालू ठेवली. राज्य पुनर्रचना पूर्वीपासून विदर्भात सहा ते पधंरा वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण योजना त्यांनी पुढे चालू ठेवली.दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात शिष्यवृत्ती बाबत यांनी आधीचे धोरण पुढे चालू ठेवल्यामुळे राज्याच्या भिन्न विभागातील योजनांमध्ये भेदभाव होऊ दिला नाही.

शिक्षणाची गंगा आदिवासींच्या दारी पोहोचविण्याच्या दृष्टीने त्यांनी आश्रम शाळेची योजना आखली. आश्रम शाळेच्या माध्यमातून आदिवासी समाजामध्ये शिक्षण पोहोचले. औरंगाबाद आणि कराड येथे नवीन इंजीनियरिंग महाविद्यालय नागपूरच्या सरकारी इंजिनिअरिंग कॉलेज केंद्र सरकार पुरस्कृत करण्यात येणाऱ्या इंजिनिअरिंग कॉलेज मध्ये रूपांतर करण्याचा निर्णय यशवंतराव चव्हाण यांच्या कारकीर्दीतीलच होता. इंजीनियरिंग कॉलेज मुळे महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी प्राप्त झाली. देशातील वेगवेगळया कंपन्यांमध्ये व संस्थेमध्ये येथील विद्यार्थ्यांना संधी मिळाली स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेला ही यशवंतराव चव्हाण यांनी मोलाची मदत केली. तसेच विदर्भ व मराठवाडा या विभागातील शिक्षणाच्या विकासासाठी खास प्रयत्न केले. गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या सुरू केल्या.

सातारा सैनिक स्कूल ची स्थापना-

महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील मुलांना सैनिक शिक्षण मिळावे. देशाच्या सैन्यदलामध्ये बहुजन समाजातील विद्यार्थी सहभागी व्हावेत ऐतिहासिक काळापासून चालत आलेली महाराष्ट्राची शुरविरांची परंपरा अखंड चालू राहावी या उद्देशाने यशवंतराव चव्हाण यांनी सातारा येथील सैनिकी स्कूलची स्थापना केल्याने नॅशनल डिफेन्स अकादमीसाठी शिक्षण मिळण्याची सोय येथे उपलब्ध झाली भारतातील अशा प्रकारचे हे पहिले सैनिकी स्कूल ठरले या सैनिकी स्कूल मुळे महाराष्ट्रातील अनेक तरुण भारतीय संरक्षण दल नौदल आणि हवाई दल यामध्ये अधिकारी झाले आहेत येथून पुढेही या स्कूल मधून देशाला अधिकारी पुरविले जातील.

मराठवाडा विद्यापीठाची स्थापना-

उच्च शिक्षणाची संधी बहुजन समाजातील व दलित वर्गातील विद्यार्थ्यांना मिळावी म्हणून यशवंतराव चव्हाण यांनी मराठवाडा करता स्वतंत्र विद्यापीठाची स्थापना 23 ऑगस्ट 1958 रोजी केली या विद्यापीठाचे उद्घाटन पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते केली या विद्यापीठांमध्ये शिक्षण घेऊन अनेक विद्यार्थी महाराष्ट्राच्या व देशाच्या राष्ट्र उभारणी मध्ये योगदान देत आहेत त्या विद्यापीठाच्या स्थापनेमुळे उच्चशिक्षणाची उच्च वर्गाची मक्तेदारी मोडून निघाली व उच्च शिक्षणाची गंगा बहुजन समाजापर्यंत पोहोचली मराठवाड्यामध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी अनेक शैक्षणिक संस्थांना त्यांनी सढळ हाताने अनुदान दिली.

मराठी राज्यभाषा-

महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर मराठी भाषा ही राज्यभाषा करण्याचे यशवंतराव चव्हाण यांनी ठरविले त्यासाठी भाषा संचालनालयाची निर्मिती करण्यात आली सरकारी कामकाजात मराठी भाषेचा उपयोग करण्यासाठी त्वरित उपाययोजना करण्यात आली शासकीय कार्यालयातील कामकाज मराठी भाषेतून चालविण्याचा निर्णय करून सर्व तालुका कोर्ट कचऱ्यात कारभार पत्र व्यवहार मराठी भाषेतूनच करावा असा निर्णय घेण्यात आला मातृभाषेतून कामकाज चालू झाल्यामुळे लोक समाधानी झाले कारभारामध्ये पारदर्शकता निर्माण झाली महाराष्ट्रातील विद्यापीठांनी शिक्षणामध्ये शिक्षणाचे माध्यम म्हणून मराठीचा अवलंब करण्याच्या दृष्टीने पावले उचलावीत अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली मराठी राजभाषा करण्याचा प्रश्न त्यांनी सोडविला उच्च शिक्षणामध्ये मराठी माध्यम करून त्यांनी मातृभाषेतून शिक्षण देण्याची संधी उपलब्ध करून दिली लोक भाषा ही ज्ञानभाषा असल्याशिवाय ज्ञान लोकांपर्यंत पोहोचणार नाही म्हणून यशवंतरावांनी उच्च शिक्षणाचे माध्यम मराठी केले.

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाची स्थापना-

यशवंतराव चव्हाण यांनी 19 नोव्हेंबर 19 60 च्या शासकीय आदेशानुसार महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाची स्थापना केली मराठी साहित्य आणि इतिहास याविषयी संशोधनास उत्तेजन देण्यासाठी मंडळाची निर्मिती करण्यात आली मंडळाचे पहिले अध्यक्ष महाराष्ट्रातील प्रख्यात विद्वान तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी हे होते यांच्या नियंत्रणाखाली मंडळाचे कार्य चालू झाले मराठी भाषा समृद्ध ती खऱ्या अर्थाने ज्ञान वाहिनी व्हावी म्हणून महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाची त्यांनी स्थापना केली पुढे महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ अस्तित्वात आली मराठी विश्वकोशाचे प्रचंड कार्य यांच्या प्रेरणेने व पुढाकाराने प्रारंभ करण्यात आले. निरनिराळया ज्ञानशाखा मराठीत आणाव्यात अशी त्यांनी भूमिका घेतली यशवंतराव चव्हाण यांनी निर्माण केलेल्या या साहित्य संस्कृती मंडळाने महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा जतन केला आहे पुस्तकांना ग्रामस्थांना नियतकालिकांना संशोधन संस्थांना लेखकांना अनुदान देऊन मंडळ त्यांच्याकडून भरीव कामगिरी करून घेते नवलेखकांना प्रोत्साहन देण्यासाठी शिबिरे घेत आहे त्यामुळे नवीन लेखक निर्माण होत आहेत त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळत आहे मंडळाकडून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये भरीव कामगिरी करणाऱ्या अग्रेसर व्यक्तींचे सत्कार करून सामाजिक बांधिलकीची भावना जपत आहे यशवंतराव चव्हाण यांच्या कार्यामुळे आधुनिक महाराष्ट्राचा सांस्कृतिक शैक्षणिक पाया घातला गेला.

रयत शिक्षण संस्थेस मदत-

महाराष्ट्रामध्ये शैक्षणिक क्रांती करणाऱ्या रयत शिक्षण संस्थेच्या विकासामध्ये यशवंतराव चव्हाण यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे कर्मवीर भाऊराव पाटील हे हयात असताना सन 1958 ते 59 मध्ये रयत शिक्षण संस्थेचा सुवर्ण महोत्सव साजरा करण्याचे ठरले त्यावेळी या सुवर्ण महोत्सव समितीचे अध्यक्ष त्यावेळचे ग्वाल्हेर चे महाराज जिवाजीराव शिंदे हे होते आणि उपाध्यक्ष द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण होते त्यांनी या सुवर्णमहोत्सवास शासनाच्या वतीने दोन लाख रुपये देणगी दिली होती यावरून यशवंतराव चव्हाण यांच्या मनामध्ये रयत शिक्षण संस्थेच्या कार्य विषयी व कर्मवीर अण्णांच्या विषयी किती असता होती हे दिसून येते यशवंतराव चव्हाण रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष होते. (8जुन 1960 ते 25 नोवेंबर 1984) या काळात यशवंतरावांनी रयत शिक्षण संस्थेचा सर्वांगीण विकास घडवून आणला.

शिवाजी विद्यापीठाची स्थापना-

ग्रामीण भागातील शेतकरी दलित उपेक्षित वंचित वर्गातील मुलांना पुणे आणि मुंबईमध्ये जाऊन उच्च शिक्षण घेणे आर्थिक दृष्ट्या परवडणारे नव्हते. त्यामुळे या बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी प्राप्त करून देण्यासाठी मराठवाडा प्रमाणेच दक्षिण महाराष्ट्रासाठी कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठाची स्थापना करण्याचा विचार यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्रिपदाच्या कारकिर्दीत त्याला गेला आणि त्यासाठी पन्नास लाख रुपयाची तरतूद करण्यात आली 18 नोव्हेंबर 1962 साली राष्ट्रपती डॉक्टर राधाकृष्णन यांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठाच उद्घाटन झाल. शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेमुळे पश्चिम महाराष्ट्रातील बहुजन समाजाला उच्च शिक्षणाची संधी प्राप्त झाली थोडक्यात यशवंतराव चव्हाण यांनी स्थापन केलेल्या या विद्यापीठाने सांगली सातारा कोल्हापूर या जिल्ह्याचा शैक्षणिक विकास घडून आला आहे.

सारांश**:-**

एकंदरीत वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की मा.यशवंतराव चव्हाणांचे शैक्षणिक विचार हे केवळ अकॅडमिक स्वरूपाची नव्हते हे आपल्या लक्षात येते महाराष्ट्र राज्याची धुरा त्यांनी ज्या काळात सांभाळली ती सांभाळत असताना नवनिर्वाचित महाराष्ट्राच्या जडणघडणीचा पायाच त्यांनी घातला असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. महाराष्ट्र राज्याचे धोरण निश्चित करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता म्हणूनच त्यांच्या विचारांना प्रत्यक्ष कार्याची जोड मिळू शकली. आज महाराष्ट्रात शिक्षणप्रसाराचे कार्य प्रचंड प्रमाणात वाढल्याचे आपणास दिसून येते. त्यामागे यवसंतरावांचे शैक्षणिक विचार व त्या कार्यातील प्रत्यक्ष कृती आज प्रेरणादायी ठरली आहे. विदर्भ, मराठवाडा आणि प. महाराष्ट्र या विभागाचे शैक्षणिक एकत्रीकरण त्यांच्याच मार्गदर्शनाखाली झाले. ऐतिहासिक कारणासाठी मराठी संस्कृतीचे माहेर असलेला मराठवाडा मागे पडला होता. तो उर्वरित महाराष्ट्र बरोबर यावा म्हणून मराठवाडा विद्यापीठाची त्यांनी स्थापना केली. शिवाजी विद्यापीठाची स्थापना त्यांच्यात प्रेरणेने झाली. ग्रामीण महाराष्ट्राच्या अस्मितेचा अविष्कार दोन्ही विद्यापीठाच्या रुपाने झाला. आज महाराष्ट्रात महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय शिक्षणाचा विस्तार प्रचंड प्रमाणात झाला आहे त्यामागे यशवंतरावजींच्या प्रेरणा आहेत. आर्थिक दृष्ट्या मागासवर्गीय मुला-मुलींना शुल्कात पूर्णतः सूट देण्याचा धाडसी निर्णय त्यांनी घेतला. महाराष्ट्रातील लाखो मुला-मुलींना त्याचा फायदा मिळावा ही वरील विवेचनातून स्पष्ट होते.

संदर्भ:-

1) रामभाऊ जोशी :-यशवंतराव चव्हाण -एक इतिहास प्रतिभास प्रकाशन,परभणी
2) बा.ह कल्याणकर:- युगंधर नेते यशवंतरा चव्हाण: आकांक्षा प्रकाशन,14 प्रतापनगर,
3) प्रा. डॉ. जे. एफ. पाटील:- सह्याद्रीचा सूर्य समाजवादी प्रबोधनी प्रकाशन, 'इचलकरंजी,
4) वाघमारे जनार्दन:-' हाकआणि आक्रोश' श्री विद्या प्रकाशन पुणे,1984
5) चव्हाण यशवंतराव आत्मचरित्र,'कृष्णाकाठ'पुणे प्रेस्टिज पब्लिकेशन्स-1984
6) चव्हाण यशवंतराव:-' सह्याद्रिचे वारे' भाषण संग्रह, मुंबई महाराष्ट्र शासन प्रसिद्धी विभाग,1962

# यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय कार्य

प्रा. निखिल गणेश जगताप
पद्ममणी जैन महाविद्यालय पाबळ, ता – शिरूर, जि – पुणे, पिन कोड – ४१२४०३
मो. न – ७८८७९९००७२ ईमेल -njagtap858@gmail.com

**प्रास्ताविक :**

यशवंतराव चव्हाण यांनी आधुनिक महाराष्ट्राच्या विकासाचा पाया घातला. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या नव्हे तर देश्याच्या राजकारणामध्ये आपल्या कर्तृत्वाचा प्रभाव पाडला. आधुनिक महाराष्ट्राच्या विकासामध्ये आपल्या दूरगामी निर्णयाने महाराष्ट्राचा नावलौकिक वाढविला अश्या व्यक्तीचे नाव यशवंतराव बळवंतराव चव्हाण होय. सर्वसामान्य परिस्थितीतुन उदयास आलेले यशवंतराव हे लोकप्रिय नेतृत्व होते. समाज आणि राजकारण, मंत्रिमंडळाचे निर्णय घेत असताना त्यांनी दाखवलेला मुत्सद्दीपणा , द्वीभाषिक राज्याचा वेळी झालेली टीका, भाऊसाहेब हिरेना विरोध करून मिळवलेले मुख्यमंत्री पद तसेच भारताचे उपपंतप्रधान, अर्थमंत्री, संरक्षण मंत्री, गृहमंत्री, परराष्ट्रमंत्री, या सर्वातून त्यांच्या राजकीय कार्याचा आढावा आपणास घेता येईल.

**संशोधनाची उद्दीष्टे :**

1. यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय कार्याचा आढावा घेणे
2. यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय कार्याच्या माध्यमातून त्यांच्या साहित्यावर प्रकाश पाडणे
3. यशवंतराव चव्हाण यांच्या राजकिय कार्याची ज्ञानमीमांसा करणे
4. यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय व्यक्तिमत्वाचा शोध घेणे.

**संशोधन पद्धती :**

हा शोधनिबंध तयार करण्यासाठी संदर्भ ग्रंथ, विविध लेख, प्राथमिक तसेच दुय्यम साधनांचा वापर केला, तसेच वर्तमानपत्रातील लेख याचा संदर्भ घेण्यात आला.

**यशवंतराव चव्हाण यांचा जीवन परिचय :**

यशवंतराव चव्हाण यांच्या बद्दल महाराष्ट्रातील सर्वच प्रकारच्या जनतेला आदर होता असे ते नेते होते. ,यशवंतराव चव्हाण यांचा जन्म १२ मार्च १९१४ रोजी मु. पो. देवराष्ट्रे ता. खानापूर, जि. सांगली येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव बळवंतराव चव्हाण होते. त्यांचे मूळ गाव भाळवणी हे होते. त्यांच्याकडे चार पाच एकर कोरड वाहू जमीन होती, त्यामुळे आर्थिक स्थिती ही बेताची होती.

यशवंतराव चव्हाण यांचे मूळ गाव ढवलेश्वर पुढे ते भाळवणी येथे स्थायिक झाले. बळवंतराव यांचे आजोबा विट्याला स्थायिक झाले. बेलीफ म्हणून नोकरी करत असताना बळवंतराव यांची बदली कराडला झाली आणि कराड हेच त्यांचे गाव झाले. यशवंतराव यांच्या आई देवराष्ट्रे येथील दाजीबा घाडगे यांच्या गगिनी होत्या. आईचे नाव विठाबाई होतें बळवंतराव आणि विठाबाई या दाम्पत्यास अनुक्रमे ज्ञानोबा, राधाबाई, गणपतराव आणि यशवंतराव अशी चार अपत्ये होती अल्पशा जमिनीतून प्राप्त होणाऱ्या उत्पन्नच्या आधारे सहा जणांचे कुटुंब चालविणे शक्य न झाल्याने बळवंतराव विटा येथे उदरनिर्वाहासाठी भाळवणी येथून स्थळांतरीत झाले. पुढे १९१८ च्या प्लेगच्या साथीत त्यांचे निधन झाले कुटुंबातील आर्थिक स्थिती बेताची असताना देखील यशवंतराव हे देवराष्ट्रे येथील शाळेतून चौथीची परीक्षा पास झाले.

यशवंतराव चव्हाण १९४१ मध्ये ते कायद्याचे पदवीधर झाले २ जून १९४२ रोजी त्यांचा विवाह फलटणच्या मोरे कुटुंबातील वत्सल अश्या वेणूताई यांच्याशी झाला. १९४० – १९४५ च्या दरम्यान सातारा जिल्हा हा राजकीय क्षेत्रात कार्य करणारा जिल्हा म्हणून प्रसिध्द झाला. कारण सातारा जिल्ह्यामध्ये क्रांतिकारकांचे कार्य , क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या सरकारने ब्रिटिशयांशी सातारा जिल्ह्यतील सत्ता उलथवून टाकली. सातारा जिल्ह्याचा इतिहास हा खऱ्या अर्थाने क्रांतिकारकांचा इतिहास आहे. पुढे घरची परीस्थिती बिघडल्याने त्यांना वकिली हा व्यवसाय सुरू करावा लागला. १९४६ मध्ये झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत यशवंतराव चव्हाण दक्षिण सातारा विधानसभा मतदारसंघातुन के. डी. पाटील, व्यंकटराव पवारांनी बाबुराव गोखले यांच्यासह विजयी झाले.

यशवंतरावांची राजकीय वाटचाल खऱ्या अर्थाने १९४६ च्या निवडणुका पासूनच सुरू झाली. विधानसभा साठी निवडून आल्यानंतर मुंबई राज्याचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांनी यशवंतराव यांचा मंत्रिमंडळात समावेश केला नाही. यशवंतराव यांचा मंत्रिमंडळात समावेश न करता मोरारजींच्या गृहखात्यामध्ये संसदीय सचिव म्हणून यशवंतरावांची निवड झाली. १९५२ मध्ये मुंबई राज्यात झालेल्या विधानसभेच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणूकामध्ये शेतकरी कामगार पक्ष पराभूत झाला आणि महाराष्ट्र प्रदेश कांग्रेसचे उमेदवार मोठ्या प्रमाणात विजयी झाले. यामध्ये यशवंतराव चव्हाण यांचे योगदान महत्वाचे होते. पंडित नेहरूंचा महाराष्ट्र दौऱ्यावर झालेला वितोध यशवंतराव यांच्यावर होणारी विरोधी पक्षाकडून जहाल टीका सहन करूनही यशवंतराव यांनी द्वीभाषिक राज्याचे मुख्यमंत्री पद सांभाळले. हे पद सांभाळत असताना त्यांच्यावर खलनायकासारखी टीका करण्यात आली. त्यांचा अपमान करण्यात आला तरी देखील त्यांनी त्यांचा सुसंस्कृतपणा सोडला नाही. संयम मनाशी बाळगून महाराष्ट्रातील जनतेच्या भावना किती उग्र आहेत हे नेहरूंना पटवून दिले. आणि स्वतंत्र महाराष्ट्राची निर्मिती करण्यामध्ये मोलाची भूमिका पार पाडली. स्वतंत्र महाराष्ट्र ची स्थापना १ मे १९६० ला झाल्यानंतर त्यांनी संरक्षण मंत्रीपद स्वीकारण्यास पर्यंतच्या कालावधीमध्ये अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले.

यशवंतराव चव्हाण यांच्यावर मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचारसरणीतून समाजवादाचे खूप ठळक संस्कार झाले होते. कारण नंतरच्या त्यांच्या राजकीय वाटचालीत त्यांनी त्या विचारसरणीचा कोठेही आग्रह धरलेला आढळत नाही त्यांना पडलेल्या ऊपयुक्त दोन बाबीचा पाठपुरावाही केलेला दिसत नाही. युध्दातल्या सहभागावरून मतभेद झाला हे समजू शकले तरी रॉय यांनी पुढे जो मानवतावादी विचार मांडला तो मार्कद्वादला भारतीय परिस्थितीसी जुळवण्याचा एक खटाटोप होता. चव्हाण यांनी भूमिका तशीच असली तरी त्यानी रॉयवादाचा आधार मात्र पुढे कधीच घेतलेला दिसत नाही यावरच हे स्पस्ट होते की त्यांना वाटलेले आकर्षण रॉय यांच्या विचारापेक्षा व्यक्तिमत्वाचेच होते. आणि त्यांचे स्वरूप बौद्धिक असण्यापेक्षा भावणीकच होते.

यशवंतराव चव्हाण यांचे शिक्षण, सहकार, पाटबंधारे, कृषीउद्योग, आणि कारभाराचे विकेंद्रीकरण हे पुरोगामी महाराष्ट्राच्या आर्थिक विकास घडवून आणण्यामध्ये महत्वाचे ठरले, त्यावर आपण प्रकाश टाकूयात.

1. राज्याच्या अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या दृष्टीकोनातून कृषी, मस्त व्यवसाय, उद्योग वन आणि सहकाराशी निगडित कार्यक्रम तयार करून राबविले.

2. राज्याच्या विकासातील प्रादेशिक असमतोलाचा विचार करून पंचायत राज्य पद्धतीचा विकासासाठी जिल्हा परिषद यांची निर्मिती केली.

3. शिक्षण आणि आरोग्य याची सोयी ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंत पोचविण्याच्या दृष्टिकोनातून धोरणे राबविली.

4. प्रशासन भ्रष्टाचार मुक्त राहावे म्हणून मूलभूत स्वरूपाचे निर्णय घेतले.

5. मागास भागाच्या विकासासाठी स्वतंत्र विकास कार्यक्रम तयार करून अंमलबजावणी चा प्रयन्त केला.

6. दुर्बल घटकांच्या विकासासाठी वेगवेगळया योजना हाती घेतल्या
7. शिक्षणा चा विकास झपाट्याने व्हावा म्हणून मराठवाडा विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठाची स्थापना केली.
8. १९६१ मध्ये नवोदित लेखकांना प्रेरणा मिळावी आणि मराठी भाषेत दर्जेदार ग्रंथ प्रसिद्ध व्हावे म्हणून साहित्य व सांस्कृतिक मंडळाची स्थापना केली.

**संरक्षणमंत्री :**

१९६२ मध्ये खचलेल्या सैन्याचे मनोधैर्य उंचावण्यासाठी यशवंतराव याना प्राधान्य होते. यशवंतराव यांची संरक्षण मंत्री म्हणून निवड करण्याचा निर्णय प. नेहरूंनी घेतला. दरम्यान ५ नोव्हेंबर १९६२ ला पंडित नेहरू यांनी यशवंतराव याना फोन करून संरक्षण मंत्रीपद स्वीकारण्याबाबत हो किंवा नाही या दोन शब्दात उत्तर माघीतल. यावर त्यांनी होकार दिला. दिनांक १४ नोव्हेंबर १९६२ ला भारताचे नवे संरक्षण मंत्री त्यांच्या नावाची घोषणा झाली.

यशवंतराव चव्हाण संरक्षण मंत्री झाल्यावर त्यांनी केलेले महत्वपूर्ण कार्याचा आढावा पुढीलप्रमाणे सांगता येईल. लष्करात मनोधैर्य निर्माण केला.

1. लष्कर आणि संरक्षण मंत्रालयात संघर्ष असण्याची कारणे शोधली.
2. लष्कर आणि संरक्षण मंत्रालयात समन्वय साधण्याच्या उपाययोजना केल्या.
3. भारतीय लष्कराचे कच्चे दुवे आणि कमतरता शोधून काढल्या.
4. लष्करी अधिकाऱ्यांना विश्वासात घेतले.
5. लष्कर आणि संरक्षणमंत्रालयात कौशल्ये आणि संयमाने समन्वय साधला.
6. पहिले संरक्षणविषयक , पंचवार्षिक योजना तयार करून भारतीय बनावटीची लढाऊ विमाने , लिंदल फ्रिगैर, वैजयंता रणगाड्याचे उत्पादन सुरू केले.
7. लष्कराच्या आठ पहाडी डिव्हिजनसह २१ डिव्हिजनसह ४५ स्कॉड्रयांनचे हवाईदल, युद्धसाहित्य उत्पादन केंद्राचे नूतनीकरण केले, हवाईदल आणि लष्कराचे मध्ये समन्वय केला.
8. भारतीय सीमाभागात सैन्याची ने आन करण्यासाठी रस्ते बांधले. सारक्षणविषयक प्रश्न बाबत संसदेला विश्वासात घेतले.
9. संरक्षण मंत्रालयाशी निगडित अनेक लष्करी आणि मुलकी अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या.
10. यशवंतराव चव्हाण यांनी काश्मीर, राजस्थान, गुजरात, उत्तरेकडील सीमा भागांना भेटी दिल्या. तेथील अधिकारी आणि जवान यांच्याशी चर्चा करून त्यांचे प्रश्न आणि समस्या माहीत करून घेतल्या.
11. यासारख्या इतरही कार्याचा आपणास उल्लेख करता येतो.

**अर्थमंत्री :**

व्ही. व्ही. गिरी यांची राष्ट्रपती पदी नियुक्ती झाल्यानंतर २६ जून१९७० ला श्रीमती इंदिरा गांधीनी गृहखाते स्वतःकडे घेऊन स्वतःकडील अर्थखाते यशवंतराव चव्हाण यांच्याकडे सोपविले ते देशाचे ११ वे अर्थमंत्री झाले. त्यांनी संसदेमध्ये अर्थसंकल्प सादर केला. या सर्व परिस्थितीत अर्थमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांनी घेतलेले महत्त्वाचे निर्णय पुढील प्रमाणे :

1. देशातील महागाई नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न
2. आर्थिक प्रश्नाचा विस्तृतपणे अभ्यास करून अर्थमंत्रालय पातळीवर निर्णय
3. आर्थिक क्षेत्रातील मक्तेदारी चा अभ्यास आणि उपाययोजना या संदर्भात आयोगाची नियुक्ती
4. आर्थिक क्षेत्राच्या संदर्भात अनेक महत्वाचे कायदे मंजूर करण्यात आले.

5. देशातील काळापैसा साठवण्याच्या प्रवृत्तीला आळा घालण्याचा प्रयन्त
6. देशातील कर दात्याचे प्रमाण वाढवून कर चुकवेगिरीवर नियंत्रण
7. गरिबी हटवा योजनेचे पूरक निर्णय आणि आर्थिक तरतूद उपलब्द करून देण्याचा प्रयत्न केला.

यशवंतराव चव्हाण यांनी अर्थसंकल्प मध्ये सादर केलेल्या काही महत्वपूर्ण ठळक बाबी :

दारिद्र्य निर्मूलन यावर पूर्ण भर देण्याचा ठोस प्रयत्न केल्याचे दिसून येते.

1. रोजगार निर्मिती च्या अनेक योजना जाहीर केल्या.
2. विदेशी चलनावरील नियंत्रणे आणखी वाढविण्यात आले.
3. राष्ट्रीयकृत बँकांना त्यांच्या लाभतेवर होणाऱ्या परिणामाचा विचार न करता ग्रामीण भागात शाखा उघडण्यास भाग पाडण्यात आले.
4. अर्थसंकल्पातील तुट वाढत गेली ही तूट कमी करणे आणि विकासाची गती राखणे या परस्परविरोधी वाटणारे उद्दिष्टमध्ये समन्वय साधने शक्य झाले नाही.

**यशवंतराव चव्हाण यांची अर्थशास्त्रीय भूमिका :**

यशवंतराव चव्हाण यांच्या समाजवादी अथवा अर्थशास्त्रीय त्यांच्या विचारावर एम. एन. रॉय यांच्या विचारांचा प्रभाव जाणवतो. या देशात शेतकऱ्यांची क्रांती झाली पाहिजे हे रॉय यांच्यासह चव्हाण यांनाही मान्य होते. या देशातील लोकशाहीची पायामुळे घट्ट व्हावी म्हणून त्यांनी विरोधी मतांना सुद्धा महत्व दिले. असे महत्व समाजवादयामध्ये दिले जात नाही मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचारांचा प्रभाव यशवंतराव यांच्यावर होता. ग्रामीण शिक्षण व पुनर्रचना या बाबीवरही त्यांनी विचार व्यक्त केले. समानते साठी शिक्षण विकासाचा विकासालाही शिक्षण व त्याद्वारे पुनर्रचना यावर त्यांनी भर दिला असल्याचे दिसते.

**संदर्भ ग्रंथ :**

1. कृ. भा. बाबर, 'यशवंतराव चव्हाण – व्यक्ती व कार्य' , ठोकळ प्रकाशन, पुणे, १९६०
2. भास्कर लक्ष्मण भोळे, ' यशवंतराव चव्हाण – राजकारण आणि साहित्य' , साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९८५
3. डॉ. गंगाधर कायंदे पाटील, ' यशवंतराव चव्हाण' , चैतन्य प्रकाशन, डिसेंबर २०००
4. यशवंतराव चव्हाण ' ऋणानुबंध', रोहन प्रकाशन, नोव्हेंबर २०१३
5. यशवंतराव चव्हाण, ' भूमिका', रोहन प्रकाशन, जानेवारी २०१३

# 'यशवंतराव चव्हाण यांचे शिक्षण विषयक कार्य : ऐतिहासिक विश्लेषण'

**डॉ नितीन उल्हासराव सराफ**
**श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान,महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती. भ्रमणध्वनी ९७६५३५१११५ ईमेल:** nusaraf88@gmail.com

**गोषवारा :**

भारताच्या समग्र जडणघडणी मध्ये ज्या विभूतींचे अमूल्य असे योगदान आहे त्यातील यशवंतराव चव्हाण हे अत्यंत महत्वाचे व्यक्तिमत्व होते. त्यांनी महाराष्ट्राबरोबरच भारताच्या जडणघडणीमध्ये महत्वपूर्ण भूमिका वठवलेली दिसते. यामध्ये सर्व क्षेत्रांचा समावेश होतो. ते जनतेसाठी केवळ राजकारणी नव्हते तर मानवतावादी शिक्षण सुधारक, जनसामन्यांवर प्रेम करणारा, असामन्य साहित्यिक, कृषीतज्ञ अशा एक ना अनेक भूमिकांमध्ये जगाने त्यांना अनुभवले होते. बालपणापासूनच त्यांचा शिक्षणाकडे ओढा होता, त्यांच्या ह्या आवडीमुळेच पुढील आयुष्यात त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी अनेक अमुलाग्र सुधारणा केल्या. ज्याकाळात मेकॉलेच्या कारकून तयार करणाऱ्या शिक्षण पद्धतीचा बोलबाला होता तेव्हा देखील त्यांनी शिक्षणाकडे केवळ रोजगार किंवा नोकरी चाकरी देणारे मध्यम म्हणून न बघता आपल्या जीवनाला, विचारांना योग्य दिशेने नेणारे तसेच जीवनातील परिस्थितीचे योग्य ते आकलन करण्याची क्षमता निर्माण करणारे मध्यम म्हणूनच बघितले, यावरून त्यांचा शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टीकोन हा नेहमीच जीवन समृद्धीचे साधन असाच होता. या शोधनिबंधात यशवंतराव चव्हाण यांच्या शिक्षण विषयक कार्याचे ऐतिहासिक विश्लेषण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यातून महाराष्ट्रातील शैक्षणिक क्षेत्रात झालेला अमुलाग्र बदल मांडलेला आहे.

**प्रस्तावना :**

यशवंतराव चव्हाण यांचा शिक्षणाकडे बालपणापासूनच ओढा होता तसेच त्यांच्या घरातूनही त्यांच्यावर झालेल्या संस्कारामधून त्यांची शिक्षणाकडे बघण्याची दृष्टी किती प्रगतीशील होती हे लक्षात येते. शिक्षण हे आर्थिक विकासाचे साधन आहे असा त्यांचा विश्वास होता. विज्ञान हा विषय पूर्णपणे अवगत करायचा असेल तर त्याचे शिक्षण हे मातृभाषेतून व्हायला हवे असा त्यांचा आग्रह होता. त्यांनी त्यांच्या संपूर्ण आयुष्यात शिक्षणाला अनन्य साधारण महत्व दिलेले दिसते. त्यांनी रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष म्हणून त्यांची कारकीर्द खूप महत्वाची होती. महाराष्ट्रातील शैक्षणिक वर्तुळात त्यांचे कार्य मोलाचे आहे. मिलिटरी शिक्षण संस्थेची स्थापना असेल, अनेक शैक्षणिक संस्थाना मदत असेल ह्या कार्यात ते नेहमीच अग्रेसर राहात होते. त्यांच्या पुढाकारानेच शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांची स्थापना झालेली आहे. त्यांची ह्याबाबतची भूमिका म्हणजे तत्कालीन परिस्थितीतील शैक्षणिक वर्तुळातील महत्वाचे पाऊल म्हणून ओळखले जाते. त्यांनी नेहमीच सर्वसामान्य लोकांकरिता शिक्षण मिळविणे सोपे झाले पाहिजे याकडे लक्ष दिले, त्यामुळेच मानवतावादी शिक्षण सुधारक असा त्यांचा उल्लेख केला जातो.

**यशवंतराव चव्हाण यांचे शिक्षण विषयक कार्य :**

**रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष म्हणून केलेले कार्य :**

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या मृत्यूनंतर यशवंतराव चव्हाण हे रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष झाले. त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत भाऊराव पाटील यांनी निर्माण केलेल्या आदर्शावरच कारभार चालवला. त्यांनी संस्थेच्या प्रशासनात कोणत्याही स्वरुपात विनाकारण हस्तक्षेप केला नाही. कोणास नोकरीवर ठेवावे किंवा कोणास नोकरीवरून काढून टाकावे असे त्यांनी कधीच म्हंटले नाही. यशवंतरावांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या**'कमवा व शिका'**ह्या धोरणाचामनःपूर्वक स्वीकार केला. भाऊराव पाटील यांच्या निधनानंतर संस्थेच्या कार्यात जी पोकळी निर्माण झाली होती ती भरून काढण्याचा पदोपदी प्रयत्न केला.

सन १९५८-५९ मध्ये रयत शिक्षण संस्थेचा सुवर्ण महोस्तव साजरा करण्याचे ठरले होते. द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री असताना शासनाच्या वतीने संस्थेला दोन लाख रुपयाची देणगी त्यांनी दिलेली होती, तसेच संस्थेची सर्व वसतिगृहे अनुदानित केलेली होती. संस्थेकरिता नवनवीन कामाची आखणी करणे, कार्यकर्त्यांची भांडणे, समस्या सोडविणे अशी कामे सुद्धा ते स्वतः जातीने करीत असत. संस्थेच्या वार्षिक पुर्तीला ते स्वतः दरवर्षी हजार राहात असत.[१]

सन १९६० मध्ये नेर्ले, ता. वाळवा, जि. सांगली येथील संस्थेच्या हायस्कूलचे 'कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय' असे नामकरण यशवंतरावांच्या हस्ते झाले. त्यावेळी यशवंतराव म्हणाले, " मुंबई राज्याचा मुख्यमंत्री झाल्यावर मला जे समाधान झाले होते, त्यापेक्षा अधिक समाधान मला रयत शिक्षण संस्थेचा अध्यक्षह झाल्याने होत आहे." असे आस्थापूर्वक भाषण त्यांनी केले होते.[२]

**कोल्हापूर येथील स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेला आर्थिक मदत :**

महाराष्ट्रात शैक्षणिक विकास व्हावा, शैक्षणिक बाबतीत महाराष्ट्र अग्रेसर असावा याकरिता महात्मा फुले व राजर्षी शाहू महाराज यांच्या शिक्षण प्रसाराच्या उद्देशात यशवंतराव चव्हाण यांनी मनस्वी योगदान दिलेले दिसते. कोल्हापूरच्या स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक बापुजी साळुंखे यांच्या बाबतीत यशवंतरावांना प्रचंड आदर होता. त्यांनी सातारा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सभागृहात दिनक २७/०४/१९८२ रोजी बापूजींचा सत्कार केला. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण असतांना शिक्षण खात्याच्या बजेटातील कित्येक लाख रुपये खर्च व्हायचे राहिले होते त्याची माहिती घेऊन यातील बरीच रक्कम स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेस शिक्षणचा प्रसार करण्यासाठी दिली. सध्या या संस्थेच्या अनेक केंद्रावर ज्या इमारती दिसतात त्या यशवंत रावांनी दिलेल्या मोठ्या अनुदानातूनच बांधण्यात आलेल्या आहेत.[३]

आजही हि संस्था पवित्र ज्ञानदानाचे कार्य करीत आहे व हजारो विद्यार्थी येथून शिक्षण घेऊन उच्च पदावर विराजमान झालेले आहेत. सामान्य जनतेच्या साठी मनापासून ज्ञान दानाचे काम करणाऱ्या दोन मोठ्या संस्था म्हणजे रयत शिक्षण संस्था व विवेकानंद शिक्षण संस्था ह्यांच्याशी यशवंतराव चव्हाण यांचा फार जवळून संबंध आलेला होता. मराठा शिक्षणपरिषदेद्वारे पुणे येथे स्थापन झालेल्या शाहू कॉलेज ला यशवंतराव चव्हाणयांनी उरन्येश्वर विभागात नोठी जमीन सरकार तर्फे दिली.

**महाराष्ट्रात विद्यापीठांची स्थापना :**

**मराठवाडा विद्यापीठाची स्थापना :**

आताचे डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे स्थापन करण्यात मराठवाडास्थापनकरण्यातयशवंतराव चव्हाण यांचा सिहांचा वाट होता. समाजाच्या व्यापक हितासाठी नियमांना योग्य पद्धतीने कसे वळवावे हे यशवंतरावांकडून शिकण्यासारखे होते. त्यांनी त्याच्या कौशल्याचा उपयोग करून मराठवाडा विद्यापिठाच्या स्थापनेचा मार्ग मोकळा करून घेतला. मराठवाडा पूर्वी हैद्राबाद संस्थानात होते, त्यामुळे शैक्षणिक बाबतीत अत्यंत मागासप्रदेश म्हणून नावाजलेला होता. मराठवाडा महाराष्ट्रात सामील होताना विनाअट सामील झालेला होता. अशावेळी हे शैक्षणिक मागासलेपण यशवंतरावांच्या डोळ्यात खूपत होते, परंतु शिक्षण खात्याच्या नियमानुसार विद्यापीठाच्या स्थ्पानेकारिता विभागात किमान ६० महाविद्यालये अस्तित्वात असावी असे होते. मराठवाड्यात मात्र फक्त ९ महाविद्यालये होती, अशावेळी यशवंतराव चव्हाणयांनी हा नियम मराठवाड्यासारख्या मागास विभागासाठी शिथिल केला. २३ ऑगस्ट १९५९ रोजी त्यांनी तत्कालीन प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते[४] मराठवाडा विद्यापीठाची स्थापना केली.

त्यांच्या ह्या महत्वाच्या निर्णयानंतर त्यांच्या प्रेरणेने अनेक नेत्यांनी मराठवाड्यात महाविद्यालयांची स्थापना केली. यशवंतराव चव्हाण यांच्या ह्या दूरदृष्टीमुळे मराठवाड्यात शैक्षणिक विस्ताराला चालना मिळाली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची दारे खूली करून त्यांच्या आयुष्याला योग्य वळण देण्याचे काम यशवंतरावांनी केले.

**शिवाजी विद्यापीठाची स्थापना :**

यशवंतराव चव्हाण यांच्या शिक्षण विषयक विचारांमध्ये सर्वात महत्वाचा विचार म्हणजे आपल्याकडे असणारे सर्व मनुष्यबळ शिक्षण प्रसारासाठी वापरले पाहिजे असा त्यांचा आग्रह. इ.स. १९६० च्या दशकात त्यांनी मांडलेला हा विचार शिक्षणाच्या प्रसारामध्ये सर्वात महत्वाचा मानला गेला. राष्ट्रीय पातळीवर उच्च शिक्षण आणि तांत्रिक शिक्षण यांचा आग्रह त्यांनी धरलेला होता. मराठवाड्याप्रमाणे दक्षिण महाराष्ट्रासाठी कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठ स्थापन केले जावे यासाठी यशवंतराव चव्हाण यांनी मुख्यमंत्री असतानाच विद्यापीठ स्थापण्याचा निर्णय घेतलेला होता. त्यामुळे १८ नोव्हेंबर १९६२ रोजी राष्ट्रपती डॉ राधाकृष्णन यांच्या हस्ते कोल्हापूर विद्यापीठाची स्थापना झाली.[५] आज हे विद्यापीठ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर या नावाने ओळखले जाते, यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृती जाग्या ठेऊन ज्ञान दानाचे पवित्र कार्य करीत आहे.

**विद्यापीठात संशोधन व इतिहास मंडळांची स्थापना करण्यावर जोर :**

यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यावर फार थोड्या कालावधीतच शिक्षण क्षेत्राकडे लक्ष वळविले. यात प्राथमिक शिक्षणापासून तर विद्यापीठीय शिक्षणापर्यंतच्या भागाचा समावेश होता. यासर्व कामाकरिता त्यांनी विविध क्षेत्रातील अनेक उत्तम जाणकार, विद्वान  व तज्ञ लोकांची साखळीच तयार केली.याद्वारे त्यांनी  महाराष्ट्रातील शैक्षणिक क्षेत्रातील सर्वांगीण विकासाला उत्तेजन देऊन प्रगतीला वेग दिला. यशवंतराव इतरांपेक्षा बदलत्या जगाचा वेध घेण्यात खूप पुढे होते. अनेकवेळा तुरुंगात जावे लागल्यामुळे त्यांनी त्या काळात ग्रंथ वाचनाचा सपाटा लावला होता. या वाचनाने प्रगल्भ झालेली यशवंतरावांनी अनेक प्रश्नाबाबत आपली स्वतःची उकल मनात तयार करून ठेवलेली होती. विद्यापीठात केवळ ज्ञानदान व्हावे व त्याचा फायदा समाजाला व्हावा असा त्यांचा मुल हेतू होता. विद्यापीठांमध्ये समाजातील समस्यांवर अधिक संशोधन झाले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. ते आपल्या एका साहित्य संम्मेलनात भाषणात ते म्हणाले होते, "इतिहासाचे सर्वांगीण अध्ययन व संशोधन झाले पाहिजे महाराष्ट्रातील अनेक थोर पुरुषांच्या जीवनाचा सखोल अभ्यास करणारे ग्रंथ, त्यांच्या चरित्र साधनांची जमवाजमव यात विद्यापीठांनी लक्ष घालावयास हवे. महाराष्ट्रातील सहा विद्यापीठात विषयवार वाटणी करून अध्यासने निर्माण करून योजनापूर्वक हे काम करावे लागेल."[६]

यशवंतराव नुसते मुरब्बी राज्यकर्ते नव्हते तर ते साहित्यप्रेमी, कलारसिक होते त्यांचे वाचन अफाट, चौफेर होते. शिक्षणात कोणकोणते प्रश्न पुढे येऊ शकतात याविषयी त्यांना जाण होती. त्यांचे शैक्षणिक विचार आजही महाराष्ट्रातील शिक्षणात जसेच्या तसे राबविल्यास वावगे ठरणार नाही. आजही महाराष्ट्रातील सर्व विद्यावीठात संशोधनाबाबतीत काय स्थिती आहे व किती अध्यासने रिक्त आहेत, हे पाहिल्यास यशवंतरावांच्या बौद्धिक समृद्धीची तसेच प्रश्न समोर ठेऊन त्यावर योग्य प्रशासक या नात्याने राजकारणाचा गुंता न करता त्या प्रश्नांची उकल करण्याच्या पद्धतीची माहिती होऊ शकते. यशवंतरावांमधला राजकारणी सर्वात शेवटी जागा होत असे. प्रथम त्यांच्यातील मानवतावादी, जनसामान्यांवर प्रेम करणारा, असामान्य प्रतिभाशाली साहित्यिक, हळव्या कवी मनाचा समाजसुधारक जागा होत असे. **कृष्णाकाठ** हे आत्मचरित्र त्यांनी सोप्या व बोली मराठी भाषेत लिहिलेले आहे. यशवंतरावांच्या असामान्य कर्तुत्वाची दखल घेऊन पुएन विद्यापीठाने त्यांना डी.लीट. ही

पदवी सन्मानपूर्वक बहाल केली. यशवंतरावांच्या कर्तृत्वाच्या पाऊलखुणा मिरवत अवघा महाराष्ट्र आजही त्यांचे नित्य स्मरण करतो आहे.[७]

**समारोप :**

बालवयात शिक्षणाबाबत झालेले संस्कार व स्वतःचा शिक्षणाकडे असणारा ओढा यामुळे यशवंतराव चव्हाण यांची शिक्षणाकडे बघण्याची दृष्टी प्रगीतीशील बनली. शिक्षण हे आर्थिक विकासाचे साधन आहे असे ते नेहमीच म्हणत. विज्ञानाचे पूर्ण ज्ञान यावयाचे असेल तर ते ज्ञान मातृभाषेतूनच घेतले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता.

त्यांच्या शैक्षणिक कार्यात रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी सांभाळलेली जबाबदारी असेल, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेला दिलेली मदत असेल, मिलीटरी शिक्षण संस्थेची स्थापना असेल, महाराष्ट्रातील असंख्य शैक्षणिक संस्थाच्या स्थापनेत योगदान असेल, शिवाजी व मराठवाडा विद्यापीठांच्या स्थापनेतील पुढाकार असेल या सर्व घटनांमध्ये यशवंतराव चव्हाण यांची भूमिका निर्णायक ठरली. त्यांच्या शिक्षण विषयक कार्याचे विश्लेशन करताना त्यांच्या सारखा सर्वगुण संपन्न मुख्यमंत्री आपल्या राज्याला लाभला हे आपल्या राज्याचे भाग्य समजले पाहिजे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१. पाटील, अप्पासाहेब भाऊराव, **'मी पाहिलेले यशवंतराव',** महाराष्ट्र राज्य साहित्य व सांस्कृतिक मंडळ, मुंबई, १९८८, पृ. ४८०-८१.

**२.** लोखंडे, नारायण मेघाजी, **महाराष्ट्र श्रमविज्ञान संस्था, महाराष्ट्र शासन, स्मरणिका** २०१२, पृ. ४९**.**

३. चव्हाण, रा. ना**.**, **'यशवंतराव चव्हाण यांचे समाजकारण',** डायमंड पब्लिकेशन, पुणे प्रथम आवृत्ती, २०१०, पृ. ४७.

४. नाईकवाडे अशोक, **'महाराष्ट्राचे भाग्यविधाते यशवंतराव चव्हाण', गौरव ग्रंथ,** विद्याभारती प्रकाशन, लातूर, प्रथमावृत्ती, २०१२, पृ. ९३.

**५.** लोकराज्य मासिक, मार्च २०१३, पृ. ८०-८१.

**६.**चव्हाण,यशवंतराव, **ऋणानुबंध** , प्रेस्टीज प्रकाशन, १९८६, पुणे, पृ. २१७.

**७.** चौगुले, श्रीकांत, **'महाराष्ट्राचे मुख्यमंत्री: यशवंतराव चव्हाण',** अविष्कार प्रकाशन, पुणे, सहावी आवृत्ती, २००७, पृ. ३६.

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –7.675,Issue NO, 289 (CCLXXXIX )
ISSN : 2278-9308
March, 2021

# यशवंतराव चव्हाण यांचे परराष्ट्र धोरण एक चिंतन

डॉ. महेश मोटे
सहयोगी प्राध्यापक, संशोधन मार्गदर्शक राज्यशास्त्र पदवी–पदव्युत्तर विभाग
श्री माधवराव पाटील महाविद्यालय, मुरूम, ता. उमरगा, जि. उस्मानाबाद
पिन कोड ४१३६०५,भ्र. क्र. ९९२२९४२३६२इमेल:maheshmote96@yahoo.in

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत यशवंतराव चव्हाण यांचे उल्लेखनीय योगदान असून त्यांना महाराष्ट्र राज्याचे शिल्पकार असे म्हटले जाते. त्यांचे कार्य महाराष्ट्र राज्यापुरते मर्यादित न राहता आपल्या कर्तृत्व व बुध्दीमतेच्या जोरावर त्यांनी देशाच्या संरक्षण, गृह, अर्थ, परराष्ट्र, उपपंतप्रधान व प्रथम विरोधी पक्षनेता म्हणून केलेली कामगिरी ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाची ठरली आहे. पुढारी होण्यासाठी लागणारी राजकीय परंपरा नसताना स्वकर्तृत्वाने देशाच्या राजकारणात आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या नेत्यांपैकी ते एक होते. संघटन कौशल्य, मितभाषी, मनमिळावू नेता म्हणून ते सर्वदूर परिचित होते. यामुळे राज्याचे व देशाचे नेतृत्व करताना सर्वसमावेशक नेता म्हणून त्यांना ओळखले गेले.

यशवंतराव चव्हाण यांचे नेतृत्व भारतीय स्वातंर्त्य चळवळीच्या काळात उदयास आले. भारतीय स्वातंर्त्य आंदोलनातील अनेक चळवळीत त्यांनी सक्रिय सहभाग घेतला होता. त्यामुळे त्यांना अनेकदा तुरुंगवासही भोगावा लागला. स्वातंर्त्यपूर्व काळात १९४६ साली मुंबई विधिमंडळाच्या निवडणुकीतून त्यांनी आपल्या राजकीय जीवनाला सुरवात केली. कुठलाही राजकीय वारसा नसताना, ग्रामीण भागातील पार्श्वभूमी असूनही त्यांनी पुढे द्विभाषिक मुंबई राज्य आणि संयुक्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून नेतृत्व केले. पुढे पंडित जवाहरलाल नेहरूंच्या मंत्रिमंडळातील एक विश्वासू मंत्री म्हणून काम पाहिले. केंद्रातील अनेक खाते आणि महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या त्यांनी पार पाडल्या. संयुक्त महाराष्ट्राचे समर्थपणे नेतृत्व करीत असतानाच पंडित नेहरुंनी त्यांना संरक्षणमंत्री पदावर नियुक्ती देवून त्यांच्यावरचा विश्वास अधिक दृढ केला आणि तेवढ्यच समर्थपणे केंद्रातील अनेक पदे सांभाळत त्यांचा विश्वास त्यांनी सार्थ करून दाखवला. केंद्रातील अनेक जबाबदाऱ्यांपैकी एक म्हणजे परराष्ट्र मंत्रालयाचा सन १९७४ ते ७७ या काळात त्यांनी यशस्वी कारभार पाहिला. अनेक पर्याय उपलब्ध असतानाही नेहरूंनी त्यांच्यावर मोठा विश्वास दाखविला होता. वास्तविक यशवंतरावांच्या कर्तुत्वातील प्रत्येक पैलू हा वैशिष्ट्यपूर्ण राहिलेला आहे. तथापि त्यांनी परराष्ट्रमंत्री म्हणून केलेले काम आणि दिलेले योगदान हे विशेष उल्लेखनीय राहिले आहे. तत्कालीन आंतरराष्ट्रीय परिस्थितीत त्यांनी दाखवलेला मुत्सद्धीपणा, शेजारी राष्ट्रांशी जोपासलेले मैत्रीपूर्ण संबंध, चीन–पाकिस्तानशी दाखवलेला राजनय आणि भारतीय उपखंडासह जगभरात देशाची निर्माण केलेली प्रतिमा ही आजच्या भारताच्या परराष्ट्र धोरणाची पार्श्वभूमी ठरलेली आहे. भारताच्या परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार म्हणून पंडित नेहरुंचा चालविलेला वारसा, गांधीवादी आदर्श विचारांना दिलेला अग्रक्रम, ही त्यांच्या परराष्ट्रनीतीची वैशिष्ट्ये होती. भारताचे परराष्ट्र धोरण हे आदर्श मानवतावादी असून त्यांचे महत्त्व सर्व राष्ट्रांसाठी महत्त्वाचे आहे. हे त्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर सिद्ध करून दाखवले. परराष्ट्रमंत्री या नात्याने त्यांनी ही युगोस्लोव्हाकिया, रशिया, अमेरिका, लेबनान, इजिप्त, इराक, फ्रान्स, जपान, श्रीलंका, नेपाळ, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया, भूतान, इंडोनेशिया, तुर्कस्तान व बांगलादेश इत्यादी राष्ट्रांना भेटी देऊन भारताचे इतर राष्ट्रांशी असलेले आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय, मैत्रीपूर्ण सहकार्याचे धोरण वृद्धिंगत केले. आपल्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाने जागतिक राजकारणात भारताची प्रतिमा उज्वल केली. स्वातंर्त्यानंतर भारताच्या परराष्ट्र

धोरणामध्ये ज्या अनेक नेत्यांनी आपले योगदान दिलेले आहे. त्यामध्ये यशवंतराव चव्हाणांचे महत्त्वपूर्ण योगदान निश्चितच आहे. तथापि त्यांच्या काळात भारताचे इतर राष्ट्रांशी असलेले संबंध, त्यासाठी त्यांनी आखलेली रणनीती, इतर देशांशी केलेले द्विपक्षीय आणि त्रिपक्षीय करार, भारत आणि पाकिस्तान संबंधातील त्यांची भूमिका, चीनबाबत त्यांची असलेली मते, जागतिक राजकारणात आणि बदलत्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीत त्यांनी इतर देशांशी ठेवलेले मैत्रीपूर्ण संबंध आणि जागतिक शांतता आणि

विकासासाठी त्यांनी केलेले अलिप्ततावादाचे समर्थन या सर्व बाबींचे अभ्यासपूर्ण परीक्षण करण्यात आले आहे. सारांश रुपाने एकंदरीत यशवंतराव चव्हाणांचे परराष्ट्र धोरणाची प्रासंगिकता तथा कालसापेक्षता तपासण्यात आलेली आहे. या अनुषंगाने प्रस्तुत संशोधनात त्यांच्या कार्यांचे मूल्यांकन करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

### ❖ संशोधनाची उद्दिष्टे :

१. मानवतावादी परराष्ट्र धोरणाचा पुरस्कर्ता म्हणून यशवंतराव चव्हाणांच्या कार्याचा आढावा घेणे.
२. भारताच्या आंतरराष्ट्रीय धोरणाचा व राजकारणाचा अभ्यास करून त्यातील यशवंतराव चव्हाणांचे योगदान अधोरेखित करणे.
३. विकसनशील राष्ट्रांच्या विकासासाठी यशवंतराव चव्हाणांनी केलेल्या कार्याचा आढावा घेणे.
४. यशवंतराव चव्हाणांच्या अलिप्ततावादी धोरणाचा अभ्यास करणे.
५. जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी यशवंतराव चव्हाणांच्या परराष्ट्र धोरणाची उपयुक्तता जाणून घेणे.

### ❖ गृहितके :

१. मानवतावादी दृष्टिकोनातून यशवंतराव चव्हाणांचे परराष्ट्र धोरण होते.
२. यशवंतराव चव्हाणांनी अलिप्ततावादी परराष्ट्र धोरणाचा स्वीकार केला.
३. विकसनशील राष्ट्रांच्या विकासात यशवंतराव चव्हाणांचे परराष्ट्र धोरण महत्त्वपूर्ण आहे.
४. जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी यशवंतराव चव्हाणांचे कार्य महत्त्वपूर्ण आहे.

### ❖ संशोधनाचे क्षेत्र :

प्रस्तुत संशोधनात यशवंतराव चव्हाणांनी भारताच्या परराष्ट्र धोरण निर्धारणात मांडलेल्या दृष्टिकोनाचा अभ्यास केला आहे. परराष्ट्रमंत्री पदाचा स्वीकार केल्यानंतर भारताच्या परराष्ट्र धोरणाची स्थिती कशी होती व तत्कालीन परिस्थितीत त्यांनी केलेल्या द्विपक्षीय चर्चा व अनेक परिषदांमधून मांडलेल्या विचारांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. भारतीय परराष्ट्र धोरणाची संकल्पना विशद करून यशवंतराव चव्हाणांच्या परराष्ट्रविषयक भूमिकेचा अभ्यास या संशोधन पेपर मध्ये करण्यात आलेला आहे. भारताच्या परराष्ट्रमंत्री पदी ऑक्टोबर १९७४ रोजी यशवंतराव चव्हाणांनी पदभार सांभळल्यानंतर त्यांनी विविध देशांना भेटी दिल्या आणि त्यांनी परराष्ट्र खातेही कौशल्याने सांभाळले. परराष्ट्रमंत्री पदाच्या कारकिर्दीमध्ये आणीबाणीच्या काळातील परराष्ट्रमंत्री पद आणि त्यांची देशाप्रती असणारी देशभक्तीपर विचार, विश्लेषण भारताच्या परराष्ट्र धोरणातील मुख्य मूलतत्त्व म्हणजे अलिप्ततावाद होय. यामध्ये यशवंतरावांचे कार्य, भारताच्या शेजारील राष्ट्रांशी प्रस्थापित केलेले संबंध, शक्तिशाली राष्ट्रे म्हणजेच अमेरिका व रशिया या दोन्ही देशांशी जोडलेले संबंध आणि यशवंतराव चव्हाण यांच्या कारकीर्दीचा भारताच्या परराष्ट्र व्यवहारावर झालेला परिणाम अभ्यासणे महत्वाचे आहे.

### ❖ संशोधन पद्धती :

भारतीय परराष्ट्र धोरणाच्या दृष्टीने यशवंतराव चव्हाणांच्या भूमिकेचा अभ्यास करण्यासाठी या संशोधनासाठी यष्टी अध्ययन पद्धतीचा अवलंब केला आहे. ऐतिहासिक दृष्ट्या या विषयाचे

महत्त्व वैशिष्ट्यपूर्ण असून त्यासाठी या संशोधनात ऐतिहासिक, वर्णनात्मक, विश्लेषणात्मक, ग्रंथालय संशोधन पद्धतीचा वापर केला आहे.

❖ **परराष्ट्रमंत्री होण्यापूर्वीची स्थिती :**

अर्थखात्याचा कारभार पाहत असतांनाच १९७४ च्या मध्यावर केंद्रीय मंत्रिमंडळात बदलाची हवा निर्माण झाली. दिल्लीत १९६२ मध्ये संरक्षणमंत्री म्हणून आल्यानंतर ज्या महत्त्वाच्या खात्याचा कारभार त्यांनी सांभाळला तो चोखपणे सांभाळला. अमूक खातं हवं असा हव्यास कधीच धरला नाही किंवा त्यासाठी लाचारी पत्करली नाही. कोणतीही जबाबदारी स्वीकारल्यानंतर मागे वळून पाहिले नाही. मंत्रिमंडळात फेरबदल घडणार असल्याचे त्यांनी ऐकले आणि अस्वस्थ न बनता दौऱ्यावर निघून गेले. २५ सप्टेंबरला सुरू झालेला दौरा संपवून ८ ऑक्टोबरला ते दिल्लीत पहाटे परतले. सकाळी दहा वाजता कॅबिनेट मिटिंग असल्याचा निरोप त्यांना विमानतळावरच मिळाला.[१]

विदेशमंत्री पद यशवंतरावांकडे सुपूर्द करण्याच्या मनसुबा पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी समक्ष चर्चेत दि. ९ ऑक्टोबरला व्यक्त केला परंतु मंत्रिमंडळात प्रत्यक्ष फेरबदल घडण्यासाठी नोव्हेंबरचा दुसरा आठवडा उजाडला. फेरबदलाचे सर्व सोपस्कार झाल्यानंतर दि. ११ ऑक्टोबर १९७४ ला यशवंतराव चव्हाणांनी परराष्ट्रमंत्री पदाची जबाबदारी स्वीकारली. १९६२ ला संरक्षणमंत्री पद स्वीकारून दिल्लीत पोहोचल्यानंतर चढत्या श्रेणीने ते आता परराष्ट्र खात्यात दाखल झाले होते.

यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय जीवनात त्यावेळेस होणारा हा बदल सुरळीतपणे घडला असे अभ्यासावरून दिसून येते. संरक्षण, गृह आणि अर्थ खात्याचा स्वीकार नाट्यमय रीतीने त्यांना स्वीकारावा लागला होता. केंद्रस्थातील जबाबदारीचे खाते प्रथम पंतप्रधानांनी स्वत:कडे घ्यावयाचे आणि आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली की, त्याची जबाबदारी यशवंतराव चव्हाणांकडे द्यायची, असा बदल होणार होता. परराष्ट्रमंर्त्याचा कारभार मात्र थेट सोपविण्यात आला होता. संरक्षण आणि अर्थ खाते सांभाळतांना परराष्ट्र व्यवहाराचा अनुभव त्यांच्याकडे होता. याचा विचार यावेळी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी केला असल्याचे अभ्यासावरून दिसून येते.[२]

❖ **परराष्ट्र संबंध आणि आणीबाणी :**

१९७३—७४ या वर्षात राजकीय व आर्थिक या दोन्ही विषयाच्या संबंधी काँग्रेस व इतर पक्षात चर्चा करण्याचे बंद झाले होते. अशावेळी देशाची आर्थिक व राजकीय परिस्थिती ढासळत असताना कोणत्याही परराष्ट्रमंर्त्यास परदेशात विशेष काही करण्यासारखे नसते, असे एकंदरीत राजकीय गुणाकारावरून दिसून येते. यशवंतराव अर्थमंत्री असताना बऱ्याच देशांना भेटी दिल्या होत्या. त्याचा फायदा त्यांना परराष्ट्रमंत्री झाल्यावर झाला.[३]

मंत्री पदाचा कार्यकार स्वीकारुन परदेश दौऱ्यावर गेले. या दरम्यानच्या काळात देशात अस्थिरता सुरू झाली. जयप्रकाश यांनी परिवर्तन आंदोलन सुरु करुन **न भूतो न भविष्यती**असे आव्हान त्यावेळी दिल्लीतील सत्ताधाऱ्यांना दिले होते. राजकीय क्षेत्र अस्वस्थ बनण्यात या आंदोलनाचा परिणाम झाला. हे आंदोलन चिरडण्यासाठी पंतप्रधान इंदिरा गांधींनी देशात आणीबाणी पुकारली.[४]

❖ **देशांतर्गत आणीबाणी घोषीत :**

देशांतर्गत असुरक्षितता आणि बंडाळीचे कारण देऊन २५ जून १९७५ रोजी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधींनी देशात आणीबाणी घोषीत केली. संपूर्ण देशासाठी ही मोठी धक्कादायक घोषणा ठरली. स्वतंत्र भारताच्या इतिहासात सर्वांत देशांतर्गत राजकीय कारणाकरिता आणीबाणी लागू करण्याची ही पहिलीच घटना होती. दीड वर्षापेक्षा जास्त कालखंड लागल्याने देशातील लोकशाही हक्कांचा ज्या प्रमाणात संकोच झाला व ज्या तऱ्हेने सत्तेचा निरंकुश वापर झाला.

तो पाहता स्वतंत्र भारताच्या इतिहासातील हा एक काळा कालखंड मानला जातो. इंदिरा गांधींच्या एकंदर राजकीय कारकिर्दीतील हा सर्वात वादग्रस्त निर्णय ठरला. आणीबाणी जाहीर होताच जयप्रकाश नारायण, मोरारजी देसाई, चरणसिंह, अटलबिहारी वाजपेयी या प्रमुख नेत्यांसह हजारो राजकीय कार्यकर्त्यांना तुरुंगात टाकण्यात आले. वर्तमानपत्रांवर निर्बंध घालून त्यांच्यावर प्रसिद्धीपूर्व सेन्सॉरशिप लादली गेली. राजकीय कार्यकर्त्यांमध्ये विनाकारण छळ केल्याचे आरोप झाले. आणीबाणी घोषीत करून स्वतंत्र भारतात प्रथमच मोठ्या प्रमाणात लोकशाही हक्कांवर गदा आणण्यात आली. त्याच वेळी वीस कलमी कार्यक्रमाद्वारे जनतेला विश्वासात घेण्याचा प्रयत्न सुरू केला गेला. मात्र आणीबाणीच्या निर्णयामुळे इंदिरा गांधी वादग्रस्त बनल्या आणि त्यांच्यावर एकाधिकारशाही व हुकूमशाही राजवट राबविल्याचा आरोप झाला. याची अंमलबजावणी करून भारताची विकसित राष्ट्राच्या दिशेने वेगाने वाटचाल होईल, असा दावा करण्यात आला.

❖ **उच्च न्यायालयाचा खळबळजनक निकाल :**

आणीबाणीपूर्वीचा दोन वर्षाचा काळ प्रचंड राजकीय धामधुमीचा होता. गुजरात व बिहार येथे आंदोलने पेटलेली होती. देशभर सरकारविरोधी वातावरण तयार झाले होते. गुजरातमधील विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाला होता. या सार्या पार्श्वभूमीवर इंदिरा गांधी यांच्याविरोधात अलाहाबाद उच्च न्यायालयात एक खटला दाखल झाला होता. १९७१ च्या लोकसभा निवडणुकीत रायबरेली मतदारसंघातून इंदिरा गांधी यांच्या विरोधात पराभूत झालेले समाजवादी नेते राजनारायण यांनी हा खटला दाखल केला होता. निवडणुकीत इंदिरा गांधींनी भ्रष्ट मार्गाचा अवलंब केल्याचा आरोप होता. त्यामुळे त्यांची निवडणूक रद्द केली जावी, अशी त्यांची मागणी होती. १२ जून १९७५ रोजी न्यायालयाने निर्णय जाहीर केला व त्यात इंदिरा गांधींची निवडणूक रद्द ठरवली. कायद्यातील तरतुदीनुसार त्यांना सहा वर्षे निवडणूक लढविण्यास बंदी घातली गेली. त्यांच्यावरील भ्रष्टाचाराचे आरोप अमान्य करण्यात आले.[५]

❖ **जयप्रकाश नारायण यांच्या आंदोलनाचा परिणाम आणि आणीबाणीची घोषणा :**

दुसरीकडे जयप्रकाश नारायण यांनी अधिक आक्रमक भूमिका घेतली व पंतप्रधानांच्या राजीनाम्यावर ते अडून बसले. त्यांनी विरोधी पक्षांच्या मदतीने दिल्लीच्या रामलीला मैदानावर विराट जाहीर सभा घेतली. या सभेत इंदिरा गांधी यांच्याविरोधात देशव्यापी कायदेभंगाची चळवळ सुरू करण्याचे आवाहन जयप्रकाश यांनी केले. इंदिरा गांधींच्या बेकायदेशीर सरकारच्या आज्ञा पोलीस व सेनादल यांनी पाळू नयेत, असे आवाहन त्यांनी केले. या सभेत मोरारजी देसाई यांनी इंदिरा गांधींना त्यांच्या घरी घेराव घालण्याची कल्पना मांडली. या सभेनंतर वातावरण तापत गेले आणि संघर्ष तीव्र होत गेला. इंदिरा गांधींना राजीनामा देऊन स्वर्णसिंग, यशवंतराव चव्हाण, जगजीवनराम किंवा सिद्धार्थ शंकर हे या वरिष्ठ मंत्र्यांपैकी कोणाला तरी पंतप्रधानपदी नेमून हा पेच सुटू शकला असता परंतु त्याऐवजी त्यांनी आणीबाणीची घोषणा करण्याचा अंतिम निर्णय घेतला व मंत्रिमंडळाची संमती न घेता त्या राष्ट्रपती फक्रुद्दीन अली अहमद यांना भेटल्या. मंत्रिमंडळाच्या संमतीचे पत्र नंतर देते, असे सांगून त्यांनी राष्ट्रपतीकडून सही मिळवली. राष्ट्रपतींची सही झाल्यानंतर इंदिरा गांधी यांनी हा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत ठेवला. या बैठकीत संरक्षणमंत्री स्वर्णसिंग यांनी काही प्रश्न उपस्थित केले.[६]

या निर्णयास यशवंतराव चव्हाण यांच्याबरोबर जगजीवनराम, ब्रह्मानंद रेड्डी आदी नेत्यांचा मनातून विरोध होता परंतु त्यांनी तो उघड केला नाही. गृहमंत्री असलेल्या ब्रह्मानंद रेड्डी यांना तर या निर्णयाबद्दल संपूर्णपणे अनभिज्ञ ठेवण्यात आले होते. ज्या स्वर्णसिंग यांनी

विरोध केला त्यांना इंदिरा गांधी यांनी तातडीने पदच्युत केले आणि त्यांच्या जागी संजय मित्र बंशीलाल संरक्षणमंत्री बनवले. या निर्णयानंतर देशभर दडपशाही सुरू झाली आणि शासकीय यंत्रणेचा वापर करून इंदिरा गांधी विरोधी आवाज संपूर्णपणे दडपून टाकण्यात आला.[७]

### ❖ आणीबाणीच्या काळातील यशवंतराव चव्हाणांची भूमिका :

यशवंतराव चव्हाण यांचा मनापासून यास विरोध होता पण ते विरोध त्यांनी कधीच प्रकट केला नाही. किंबहूना तो विरोध प्रकट करण्याची मुभाही त्यांना नव्हती. स्वत: यशवंतराव चव्हाण देखील या आणीबाणीच्या दडपणाला बळी पडले होते. याबद्दलचा अनुभव राम जोशी यांनी विरंगुळा या रोजनिशीत मांडला आहे.

### ❖ भारत आणि अलिप्ततावादी धोरण :

भारताचे परराष्ट्र मंत्री या नात्याने यशवंतराव चव्हाण यांनी पूर्वीपासूनच भारताने अलिप्ततेचे धोरण अवलंबिले होते. ते त्यांनी संपूर्ण जगात पसरविण्यास सुरुवात केली. त्या दृष्टीने त्यांनी महत्त्वाची कामगिरी पार पाडली होती.

### ❖ अलिप्तवादी आंदोलन आणि यशवंतराव चव्हाण यांची भूमिका :

यशवंतराव चव्हाण यांनी १९७६ मध्ये कोलंबो येथील पाचव्या शिखर परिषदेमध्ये मुख्यत: अलिप्ततावादाच्या महत्त्वपूर्ण विषयांवर भर देण्यात आला. त्यामुळेच अलिप्त राष्ट्रांची एक स्वतंत्र वृत्तसंस्था स्थापन करण्यासाठी भरावयाच्या परिषदेत यजमानत्व स्वीकारण्याच्या भारताच्या पुढाकाराने सर्व देशांनी मन:पूर्वक स्वागत केले. अलिप्त राष्ट्रांच्या स्वतंत्र वृत्तसंचलयामुळे जनसंपर्क माध्यमांच्या क्षेत्रात एक नवी आंतरराष्ट्रीय व्यवस्था कार्यान्वीत होणार होती. कारण त्यामुळे बातम्या पाठवण्याबाबत सध्या काही बड्या देशांवर अवलंबून राहावे लागते, ती परिस्थिती नाहीशी होणार होती.

### ❖ भारत आणि शेजारील राष्ट्राशी संबंध :

भारताच्या परराष्ट्र धोरणाची सूत्रे हाती घेतल्यानंतर यशवंतरावांनी आपल्या सांस्कृतिक परंपरेचा व स्वातंर्त्यसंग्रामाचा वारसा जपला. जागतिक शांततेचे प्रस्थापनेसाठी क्रियाशील राहणे, सर्व देशांची सहजीवनाच्या आणि सहकार्याच्या भूमिकेवरून संबंध प्रस्थापित करणे, समान आणि न्याय अर्थव्यवस्था उभारण्यासाठी प्रयत्नशील असणे आणि जगात जेथे कोठे स्वातंर्त्य आणि मानवी प्रतिष्ठा यासाठी संघर्ष चालू असेल, त्याला मन:पूर्वक पाठिंबा देणे ही मूलतत्त्वे त्यांनी जपली. याच मूलतत्वाला जपण्यासाठी त्यांनी भारताच्या शेजारील राष्ट्रांशी देखील संबंध दृढ केले. यात श्रीलंका, बांगलादेश, नेपाळ या राष्ट्रांशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवले.

### ❖ अमेरिका व रशिया यांचे भारतासोबत सलोख्याचे संबंध :

यशवंतराव चव्हाणांनी परराष्ट्र धोरणाची सूत्रे हाती घेतल्यानंतर ते बरेचदा अमेरिका दौऱ्यावर गेले काही वेळा युनो परिषदेच्या निमित्ताने तर काही वेळा गुडविल भेटीनिमित्त. त्यावेळचे युरोपियन करार व व्हिएतनाममधील पराभव यामुळे अमेरिका अलिप्त बनेल, अशी शक्यता यशवंतराव चव्हाण यांना होती परंतु त्यांना हेही वाटत होते की, अमेरिका एकाकी अलिप्तवादी बनणार नाही कारण लहान–मोठ्या आंतरराष्ट्रीय प्रश्नांमध्ये लक्ष घालण्यात अमेरिकेला रस आहे, असे नाही तर त्यात त्यांचे हितसंबंधही गुंतलेले आहेत, असे यशवंतराव चव्हाण यांना वाटत होते. तरीदेखील इतरांची अडचण होईल, इतक्या टोकापर्यंत जाऊन राजकीय पुढाकार घेण्याची अमेरिकेची तयारी असते. शीतयुद्धाच्या काळात हेलेसिंकी परिषदेत सोविएत रशियाच्या बरोबरीने अमेरिकेने भाग घेतला. पश्चिम आशिया प्रश्नातही ते अट्टाहासाने मध्यस्थी करत होते. मात्र यशवंतराव चव्हाण यांच्या लक्षात आले की, राष्ट्रसंघाच्या

अधिवेशनातील काही आर्थिक प्रश्नांत थोड्याशा समजूतदारपणाने अमेरिका भाग घेत आहे. यशवंतराव चव्हाण म्हणतात की, विकसनशील देशातील प्रश्नांपासून स्वत:ला अलग ठेवण्याचे अमेरिकेचे धोरण दिसत नाही परंतु लहान व गरीब देशांचे प्रश्न सोडविण्यासाठी आपल्या हितसंबंधाला बाधा न येता जेवढे करता येईल, तेवढेच करण्याची अमेरिकेची आपमतलबी भाषा आहे. जगातील आर्थिक रचनेची पुरोगामी पुर्नमांडणी करण्याच्या कल्पनेला त्यांचा विरोध आहे.[८]

यशवंतराव चव्हाण यांच्या मते, युरोपमध्ये शांतता परिषदेच्या यशस्वी वाटचालीनंतर कदाचित रशिया शांततेच्या प्रश्नांना चालना देण्याची व त्यांच्या पाठीमागच्या तत्त्वाची मांडणी करण्याची शक्यता आहे परंतु आशियाई सुरक्षा कराराच्या कल्पनेची अजूनही सुनिश्चितपणे व तपशीलवार मांडणी झालेली नाही. रशियाचे नेते व तज्ञ यांनी या बाबतीत एक गोष्ट स्पष्ट केली आहे की, ही योजना कोणाही राष्ट्राच्या विरुद्ध मांडलेला असा लष्करी करार किंवा योजना नाही. म्हणूनच या सर्व पार्श्वभूमीवर रशिया व चीनचे संबंध बिघडावेत, असे कोणतेही कारण नाही, असे यशवंतराव चव्हाण यांना वाटत होते. यशवंतराव चव्हाण म्हणतात की, सोव्हिएत रशियाने शांततामय सहजीवनाचे तत्व मान्य केलेले आहे आणि रशियाची परराष्ट्रनीती त्या तत्वावर आधारलेली आहे किंबहुना असेही म्हणता येईल की, एकूणच सर्व जगात शांततामय सहजीवनाच्या तत्त्वाला अधिकाधिक मान्यता मिळालेली आहे. त्यामुळे कोणत्याही देशातील राजकीय पद्धती किंवा आर्थिक प्रणाली यामुळे मैत्रीच्या संबंधात बाधा येण्याचे काही कारण नाही.[९]

**❖ भारताच्या परराष्ट्र संबंधावरील परिणाम :**

परराष्ट्रमंत्री या भूमिकेतून कार्य करतांना यशवंतरावांनी भारताची आणि भारताच्या नेतृत्वाची एक आगळी, समर्थ प्रतिमा जागतिक राजकारणात निर्माण केली. भारताचे परराष्ट्र धोरण हे पंडित नेहरूंच्या कारकिर्दीत निश्चित झालेले धोरण होते. अलिप्ततेचे धोरण म्हणून ते सर्वश्रुत आहे. परराष्ट्रनीती बद्दलच्या या धोरणाने जगात मूळ धरलेले आहे. यशवंतरावांनी आंतरराष्ट्रीय क्षेत्रात या धोरणाचा सातत्याने हिरीरीने अवलंब केला. अलिप्तता ही केवळ काही देशाची मर्यादित शक्ती न राहता, परराष्ट्रीय धोरणाची ही एक चळवळ बनावी यासाठी त्यांनी प्रयत्न करून क्रमाक्रमाने त्याला मूर्त स्वरूप प्राप्त करून दिले. अलिप्तता धोरणाबरोबर विकसनशील राष्ट्रांसमोरील विकासाचे विविध प्रश्न यशवंतरावांनी महत्त्वाचे ठरविले. विकासाच्या स्पर्धेत बड्या राष्ट्रांच्या जोडीला बसण्याची ईर्षा प्रत्येक राष्ट्र बाळगून आहे. हे त्यांनी अर्थमंत्री असताना अनुभवले होते. विकासाच्या रथाला अडथळा प्राप्त होणार नाही. असेच जागतिक वातावरण निर्माण करण्याचा चंग यशवंतराव चव्हाणांनी बांधला होता.

थोडक्यात ऑक्टोबर १९७४ मध्ये इंदिरा गांधी यांनी यशवंतराव चव्हाण यांना परराष्ट्रखात्याचे मंत्री केले. त्यामुळे अनेक परकीय राष्ट्रप्रमुखांशी, मुत्सद्दयांच्या भेटी घेऊन भारताच्या विदेशी नीतिविषयक चर्चा यशवंतराव चव्हाण यांनी केली. भारताच्या अलिप्ततेच्या धोरणाचा पाठपुरावा त्यांनी केला. भारत—अमेरिका, भारत—रशिया, भारत—पाकिस्तान, भारत—चीन यांच्यातील राजनैतिक संबंध सुधारण्यासाठी त्यांनी सतत प्रयत्न केले. परराष्ट्रखातेही त्यांनी कौशल्यपूर्ण रीतीने सांभाळून भारताला प्रतिष्ठा मिळवून दिली. निरनिराळ्या राष्ट्रांच्या विकासाचे कार्यक्रम अंमलात आणून ते पूर्णत्वाकडे नेले. आंतरराष्ट्रीय राजकारणाचा सखोल अभ्यास, व्यापक वैविध्यपूर्ण अनुभव आणि विविध राष्ट्रप्रमुखांशी त्यांनी जोडलेले सलोख्याचे संबंध यामुळे आंतरराष्ट्रीय क्षेत्रात यशवंतराव चव्हाण यांचा प्रभाव सर्वत्र जाणवतो.

**❖ निष्कर्ष :**

संशोधनातील अंतिम टप्प्यातील प्राथमिक व दुय्यम साधनांच्या माध्यमातून प्राप्त झालेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे

• महात्मा गांधी व पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या आदर्शवादी व मानवतावादी विचारांचा प्रभाव यशवंतराव चव्हाणांच्या परराष्ट्र धोरणावर पडल्याचे जाणवते. भारताच्या आदर्शवादी परराष्ट्र धोरणाचा स्वीकार करून त्यांनी पारंपारिक मूल्यांची जोपासना केल्याचे दिसते.

• जागतिक सत्तासंतुलनात यशवंतराव चव्हाणांनी महत्त्वपूर्ण भूमिका निभाऊन द्विध्रुवी राजकारणाच्या सत्ताकेंद्रात जगाला मध्यम मार्ग दाखविला तो शांतता, सहकार्य, इतर राष्ट्रांच्या सार्वभौमत्वाचा आदर आणि मानवी मुल्यांचा आदर करणारा होता.

• चीन व पाकिस्तानसारख्या राष्ट्रांच्या विस्तारवादी भूमिकेला विरोध करण्यासाठी यशवंतरावांचे जागतिक मत भारताच्या बाजूने करण्यामध्ये यशस्वी ठरले.

• पंडित नेहरुंपासून चालत आलेले भारताचे परराष्ट्र अलिप्ततावादी परराष्ट्र धोरण यशवंतरावांनी पुढे समर्थपणे चालवल्याचे दिसते. यशवंतरावांचा परराष्ट्रमंत्री पदाचा कार्यकाळ हा जागतिक शीतयुद्धाचा कालखंड होता. अशा स्थितीत पश्चिम राष्ट्रातील साम्राज्यवादी व युद्धखोर भूमिकेला त्यांनी युनोसारख्या व्यासपीठावरून विरोध दर्शविला.

• यशवंतराव चव्हाणांनी परराष्ट्र मंत्रालय ही केवळ इतर राष्ट्राशी संपर्क अथवा संबंध निर्माण करणारे खाते आहे. अशा भूमिकेला छेद देत त्यांनी त्या पलीकडे जावून या पदाचा वापर करून आंतरराष्ट्रीय पातळीवर सहकार्याच्या विचाराला चालना दिली. परस्पर सहकार्यासाठी त्यांनी विकसनशील राष्ट्रांची बांधलेली मुठ याची साक्ष देते.

• वर्तमान काळातील भारत सरकारचे परराष्ट्र धोरण हे बदलत्या जागतिक परिस्थितीचे निर्देशक असले तरी त्याचा मूळ पाया हा पंडित जवाहरलाल नेहरू आणि यशवंतराव चव्हाणांनी आखलेल्या परराष्ट्रनीतीच्या रणनीतीमध्ये दिसून येतो.

• कोणत्याही देशाची परराष्ट्रनीती ही त्या—त्या काळाशी सुसंगत असते. गरजा आणि आवश्यकतांवर देशाचे परराष्ट्र धोरण ठरत असते. तथापि यशवंतरावांनी त्यांच्या काळात देशाचे राबवलेले परराष्ट्र धोरण हे त्या काळाशी प्रासंगिक आणि सुसंगत असे होते.

• ७० च्या दशकात यशवंतरावांनी परराष्ट्रनीतीमध्ये दाखवलेली मुत्सद्देगिरी ही देशाच्या भविष्यासाठी किंबहुना त्यानंतरच्या काळातील जागतिक राजकारणात आलेल्या परिवर्तनासाठी ती उपयुक्त ठरलेली दिसते.

• यशवंतराव चव्हाणांचे परराष्ट्र धोरण हे देशाच्या परंपरा खंडित करणारे नव्हते. आंतरराष्ट्रीय राजकारणात जेवढी व्यवहारिकता पाहिजे. त्या प्रमाणात त्यांनी मुत्सद्देगिरी दाखवली परंतु भारतीय संविधान, प्राचीन भारतीय परंपरा, श्रद्धा, आदर्शवादी मूल्ये आणि सिद्धांत यांच्यात त्यांनी कोठेही तडजोड केलेली दिसत नाही.

### ❖ संदर्भ सूची :

१.रामभाऊ जोशी, यशवंतरावांचे अंतरंग, विरंगुळा, श्री यशोदा प्रकाशन, पुणे, २००५, पा. नं. १४८
२. उपरोक्त, पा. नं. १५०
३. गोविंद तळवलकर, यशवंतराव चव्हाण : व्यक्तित्व व कर्तृत्व, मौज प्रकाशन गृह, मुंबई, २०१२,पा. नं. २९७
४. रामभाऊ जोशी, यशवंतरावांचे अंतरंग, विरंगुळा, श्री यशोदा प्रकाशन, पुणे, २००५, पा. नं. १५२

५. सुहास कुलकर्णी, मिलिंद चंपानेरकर, (संपादक), असा घडला भारत, १९४७—२०१२, पुणे, २०१३, पा. नं. ४२३ ते ४२६
६. उपरोक्त, पा. नं. ४२३ ते ४२६
७. उपरोक्त, पा. नं. ४२३ ते ४२६
८.यशवंतराव चव्हाण भूमिका, रोहन प्रकाशन, पुणे, जानेवारी २०१३ (जन्मशताब्दी वर्ष), पा. नं. १७९
९. उपरोक्त, पा. नं. १८०ते १८३

# यशवंतराव चव्हाण यांचे आर्थिक विचार

डॉ. अशोक भाऊराव माळशिखरे
अर्थशास्त्र विभाग
आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा ता. आष्टी जि. बीड
मो.नं. ९४२०४१२२१९ E-mail – ashok_m2013@rediffmail.com

**प्रस्तावना :**

भारताचे उपपंतप्रधान, पहिले मुख्यमंत्री, कुशल प्रशासक, उत्कृष्ट संसदपटू, भारताचे संरक्षणमंत्री अशा यशवंतरावाचा जन्म सांगली जिल्हयातील देवराष्ट्रे या गावी १२ मार्च १९१४ रोजी झाला. १९१४ म्हणजे पहिल्या महायुध्दाचा काळ १९१७—१८ मध्ये युध्द संपले आणि प्लेगची साथ सुरु झाली या प्लेगच्या साथीमध्ये यशवंतराव चव्हाण यांच्या वडीलांचे निधन झाले. त्यानंतर कुटुंबाची सर्व जबाबदारी विठाबाईवर पडली. त्या चार मुलांना घेवुन कराडला आल्या. रोजगार करत त्या मुलांचा संभाळ करु लागल्या परंतु ही मिळकत खुप कमी होती. त्यांनी न्यायधिशांना भेटून ज्ञानोबाला कराडच्या कोर्टात बेलीफ म्हणुन नौकरी मिळवुन दिली परंतु आर्थिक अडचणीमुळे ज्या गावात यशवंतरावांचा जन्म झाला त्या देवराष्ट्रे या गावी पुन्हा यावे लागले. त्यांचे चौथी पर्यंतचे शिक्षण देवराष्ट्रे येथेच झाले. पुढील शिक्षणासाठी कराडच्या टिळक हायस्कुलमध्ये दाखल करण्यात आले. १९३४ मध्ये ते मॅट्रीकची परीक्षा पास झाले. १९३८ मध्ये त्यांनी कोल्हापुरच्या राजाराम महाविद्यालयातुन बी.ए. ची पदवी संपादन केली. १९४१ ला पुण्याच्या लॉ कॉलेजमधुन त्यांनी एल.एल.बी. ही पदवी प्राप्त केली. २ जुन १९४२ रोजी यशवंतराव चव्हाण व वेणुताई यांचा विवाह सोहळा पार पडला. यशवंतरावांनी आपल्या वकिली व्यावसायाला कराड येथे सुरुवात केली.

पुढे यशवंतराव राजकारणामध्ये सक्रिय सहभागी झाले. सातारा जिल्हा कॉग्रेसचे अध्यक्ष व त्यानंतर १९५२ मध्ये कराड मतदार संघातुन विधान सभेवर निवड झाली. १९५६ मध्ये द्वैभाषीक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले. १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची निर्मीती झाली व पहिले मुख्यमंत्री म्हणुन चांगली कामगिरी केली. १९६३ मध्ये ते लोकसभेवर निवडुन गेले. १९८२ मध्ये दहाव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष म्हणुन त्यांची निवड झाली. ''देशातील सर्वोत्तम मुख्यंमत्री'' म्हणुन त्यांची प्रशंसा केली जाते या सर्वोत्तम मुख्यमंत्र्याचे २५ नोव्हेंबर १९८४ रोजी दिल्ली येथे निधन झाले.

**यशवंतराव चव्हाण यांचे आर्थिक विचार**

यशवंतराव चव्हाण यांचे आर्थिक विचार प्रामुख्याने शेती, उद्योग, सहकार, समाजवाद, आर्थिक विषमता इत्यादीशी निगडीत आहेत.

**१) शेतीसंबंधीचे विचार :**

यशवंतराव चव्हाण यांनी कृषिविषयक विचार मांडताना शेतीच्या मालकी हक्काचा प्रश्न, भुमिहीनांचा प्रश्न व कृषी विकासासाठी उपाय यावर भर दिला. त्यांच्या मते जमीन कसणारा जमिनीचा मालक असला पाहिजे. भारतात शेती क्षेत्रात भुमिहीनांची संख्या अधिक आहे. म्हणुन ज्यांच्याकडे अधिक जमीन आहे त्यांनी एक ते दोन टक्के जमीन भुमिहीनांना द्यावी. त्याच बरोबर पडीक जमीन लागवडीखाली आणली जावी. शेतीच्या आधुनिकीकरणाच्या मार्गातील अडथळे दुर केले जावेत. नद्यांचा पाण्याचा शेतीसाठी वापर केला जावा. नद्यावर धरणे बांधली जावेत जेणे करुन शेती उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ होईल.

**२) शेतीचे आधुनिकीकरण :**

आपल्या देशातील शेती आधुनिकीकरणाबाबत खुप मागे आहे त्यामुळे शेतीचा म्हणावा तेवढा विकास झाला नाही. याचे कारण शेतीला अपुरा कर्जपुरवठा पाणी पुरवठ्यांच्या सोईचा अभाव, आधुनिक खते व बि–बियानांचा अभाव या सर्व गोष्टींच्या अभावामुळे शेतीचा विकास होऊ शकला नाही.

**३) अडाणी अशिक्षीतपणा :**

देशातील लोक अडाणी व अशिक्षीत असल्यामुळे शिक्षण व शेती यांचा एकत्रित विचार करु शकत नाही म्हणुन शेती संबंधीत असणारा शेतकरी जोपर्यंत शहाणा होत नाही तोपर्यंत शेतीचा विकास होणार नाही. शेतकऱ्यांना शेतीसंबंधी आधुनिक ज्ञान देऊन त्यांचे अज्ञान दुर केल्यास शेती उत्पादनात वाढ होईल.

**४) पाणीपुरवठ्याचा प्रश्न :**

भारतात शेतीला पाणीपुरवठा करणाऱ्या लहान मोठ्या धरणांची संख्या फार कमी आहे. नद्यांच्या पाण्याचा वापर शेतीसाठी केला जात नाही. नद्यांचे पाणी वापराविना वाया जाते. त्यासाठी नद्यावर लहान–मोठी धरणे बांधली पाहिजेत. धरणामुळे जे लोक विस्थापित होतील त्यांच्या पुनर्वसनाची सोय केली पाहिजे. लहान मोठ्या धरणांमुळे शेती उत्पादनात वाढ होण्यास मदत होईल.

**५) समतोल विकास :**

यशवंतराव चव्हाण यांच्या मते समतोल विकास करतांना अविकसित विभागाचांच आधी विचार केला जावा. ग्रामीण भागात उद्योग सुरु करुन शेती व उद्योगांची सांगड घातली जावी. त्यामुळे श्रमीकांचा शहरांकडे जाणारा लोंढा कमी करता येईल. त्यासाठी त्यांनी 'विकासाच्या मास्टर प्लॉनची' कल्पना मांडली. त्यांच्या मते देशाच्या विकासासाठी भारतासारख्या कृषीप्रधान देशात विकासासाठी सहकारी तत्वे फार उपयुक्त ठरतात. समतोल विकासाच्या दृष्टीने पंचायत राज, पंचवार्षिक योजना, कोयना व उजनी प्रकरणांची उभारणी, १८ सहकारी साखर कारखान्यांची स्थापना करुन समतोल विकास करण्याच्या प्रयत्न केला.

**६) ग्रामीण औद्योगिकरण :**

देशाच्या आर्थिक विकासासाठी ग्रामीण भागात शेतीवर आधारीत उद्योगाची स्थापना करुन शेती व उद्योग यांची सांगड घातल्यास आर्थिक विकासाला चालना मिळेल. औद्योगिकीकरणामुळे शेतकऱ्यांच्या शेतमालास योग्य बाजारपेठ मिळेल. उद्योगांना लागणारा कच्चामाल ग्रामीण भागातच उपलब्ध होईल. वाहतुकीचा खर्च वाचेल. ग्रामीण भागात रोजगार वाढेल असे यशवंतराव चव्हाण यांना वाटत होते.

**७) नविन तंत्राचा वापर :**

देशाचा औद्योगिक विकास करण्यासाठी उद्योगात आधुनिक तंत्राचा वापर केला जावा. नवीन तंत्रज्ञानामुळे कौशल्यात वाढ होते. परिणामी उत्पादनात वाढ होऊन देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळते असे मत मांडले.

**८) आर्थिक नियोजन :**

औद्योगिक विकासासाठी आर्थिक नियोजन महत्वाचे असते. लोखंड, पोलाद, वीज, वाहतुक या सारख्या क्षेत्राचा विकास नियोजनामुळे करता येतो व यातुनच विकासाला चालना मिळते. त्यासाठी मुलभुत व अवजड उद्योगांच्या उभारणीवर भर देणे आवश्यक आहे, असे मत मांडले.

**९) कामगारांचा सहभाग :**

कामगार उत्पादनातील महत्वाचा घटक आहे. त्याला उद्योगाच्या व्यवस्थापनात सहभागी करुन घेतल्यास औद्योगिक कलह निर्माण होणार नाही. त्यांची उत्पादन क्षमता वाढुन मालक व कामगार यांच्यात सलोख्याचे संबंध निर्माण होतील. याशिवाय उत्पादनात वाढ होण्यासाठी कामगारांना प्रशिक्षण अशा योजना राबविण्यात याव्यात.

**१०) सहकारासंबंधी विचार :**

भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी सहकारी तत्वाचे पालन महत्वाचे असते. कारण सहकारी तत्वामध्ये आर्थिक विकास करण्याची शक्ती आहे. यशवंतराव चव्हाण यांच्या मते सहकारी शेतीमुळे शेतीमधील उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढते. त्यासाठी सहकारी शेतीसंस्था स्थापन करावी. अशा सहकारी संस्थेमुळे शेतकऱ्यांना शेतीसंबंधीत ज्ञानाची देवाण—घेवाण करता येते. परिणामी शेतीउत्पादनात वाढ होते, असे मत यशवंतराव चव्हाण यांनी मांडले.

**११) सहकारी खरेदी—विक्री संस्था :**

शेतकऱ्यांनी पिकवलेल्या शेतमालास योग्य भाव मिळण्यासाठी सहकारी खरेदी—विक्री संस्था स्थापन कराव्यात व या संस्थामार्फत पीकवलेला शेतमाल विकला जावा. जेणे करुन शेतकऱ्यांनी पीकवलेल्या शेतमालास योग्य किंमत मिळेल व देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळेल, असे मत मांडले.

**१२) सहकारी बँकांची स्थापना :**

शेतकऱ्यांना शेतीसाठी योग्य दराने पतपुरवठा व्हावा यासाठी सहकारी बँका व पतसंस्था स्थापन करव्यात, ग्राहकांना योग्य किंमतीत वस्तु उपलब्ध होण्यासाठी ग्राहक सहकारी संस्था स्थापन कराव्यात, जेणेकरुन सहकारी चळवळीचा विकास होऊ शकेल. त्याच बरोबर शेतीवर आधारीत उद्योगांची स्थापना सहकारी क्षेत्रात करण्यात यावी.

**१३) शेतीपुरक व्यवसाय :**

ग्रामीण भागाचा सामाजिक व आर्थिक विकास करण्यासाठी शेतीवर आधारीत उद्योग स्थापन करण्यात यावेत. अशा उद्योगानमधुन उपभोग्य वस्तु व सेवा यांची निर्मीती केली जावी, असे मत मांडले.

**१४) समाजवादाविषयी विचार :**

देशाच्या आर्थिक विकासासाठी समाजवादाचा अवलंब करण्यात यावा. भारतातील परिस्थिती लक्षात घेवुन इतर राष्ट्रांनी कशा प्रकारे प्रगती केली आहे, हे लक्षात घेऊन समाजवादाचा स्वीकार करण्यात यावा. सार्वजनिक क्षेत्र विकसित करुन लोकांच्या कल्याणावर अधिक भर देण्यात यावा. जेणे करुन समाजातील विषमता कमी होईल. कारण समाजातील सर्व लोकांना समान संधी उपलब्ध करुन देणे हा समाजवादाचा मुख्य उद्देश असतो. थोडक्यात लोकांचे शोषण न करता मुलभुत समस्या सोडवणे म्हणजे समाजवाद होय. विषमता कमी करणे, पिळवणुक बंद करणे म्हणजे समाजवाद होय.

**१५) शैक्षणिक धोरण :**

शिक्षित व्यक्तींला स्वत:च्या भोवती घडणाऱ्या गोष्टी आणि जगामध्ये घडणाऱ्या गोष्टी याचा अर्थ समाजावुन घेता येतो. त्याचा परिणाम आपल्या जीवनावर होत असतो तो समाजावुन घेणे आणि समजावुन देणे त्यास शिक्षण म्हणतात. त्यांच्या मते बहुसंख्य समाज हजारो वर्षापासुन शिक्षणापासुन दुर आहे. लोकशाहीचा अर्थ त्यांना समजावुन सांगावयाचे असेल तर त्यांना त्यांच्या मातृभाषेतुन शिक्षण दिले पाहिजे. त्यातुन आमची जनता शहाणी होईल व खऱ्या अर्थाने तो लोकशाहीचे रक्षण करेल. त्यांच्या मते शिक्षणाचे माध्यम प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण व

उच्चशिक्षण या बरोबरच विज्ञान व तंत्रज्ञानाची कास धरल्याशिवाय राज्याचा औद्योगिक विकास घडुन येणार नाही. अंधश्रध्देला मुठमाती देऊन विज्ञान आणि तंत्रज्ञानाची कास धरली पाहिजे. त्यासाठी नियोजनबध्द पध्दतीने पावले टाकली जावेत. १९६० च्या दरम्यान आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना विनाशुल्क शिक्षण देणारी 'ईबीसी' सवलत योजना आणली. परिणामी या योजनेचे लाभ अनेक पिढ्यांनी घेतला व समृध्द झाल्या.

**संदर्भ ग्रंथ :**

१. इंगळे बी.डी., आर्थिक विचारांचा इतिहास, अरूणा प्रकाशन, लातुर.
२. उढाण उल्हास एकनाथराव, महाराष्ट्र टाईम्स, मार्च २०१४.
३. यशवंतराव चव्हाण विकास मंच, जुलै २०१७.
४. महानोर ना. धो. यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –7.675,Issue NO, 289 (CCLXXXIX )
ISSN : 2278-9308
March, 2021

# यशवंतराव चव्हान व्यक्ती व कार्य

सौ सरिता दशरथ.देशमुख
इतिहास विभाग शेठ ज आट्र्स,पालीवाला कॉम. नौ. अँड सायन्स कॉलेज पाली,रायगड ईमेल आयडी-: saritadeshmukh23@gmail.com Mo.9423382475

**प्रस्तावना**

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार थोर नेते. श्री यशवंतराव चव्हाण यांचा जन्म 12 मार्च 1913 रोजी झाला. सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्र या छोट्याशा गावामध्ये झाला. पण चव्हाण मंडळीची खरी मूळ गाव खानापूर तालुक्यात ढवळेश्वर म्हणून छोटेसे गाव आहे.त्या गावातून पुढे यशवंतरावांच्या पूर्वजांनी स्थलांतर केले. हे एक अत्यंत गरीब शेतकरी कुटुंब होते. शिक्षणाची फारशी परंपरा या अल्पशिक्षित घराण्याला नव्हती. अशा सर्वस्वी प्रतिकूल परिस्थितीत जन्मलेला हा मुलगा आपल्या स्वतंत्र पद्धतीने शिकत गेला. अर्थात मोठे बंधू व आई या सर्वांनी यशवंतरावांच्या जडणघडणीत भरपूर मदत केली. यशवंतराव चार वर्षाचे असताना त्यांच्या वडिलांचा प्लेगच्या साथीने निधन झाले. त्यांच्या मागे आई व दोन मोठे भाऊ डोंगरा सारखे आधाराला उभे होते. घरची परिस्थिती अत्यंत गरीब होती. जी काही थोडीफार शेती चव्हाण कुटुंबाची होती ती कोरडवाहू असल्याने उत्पन्नाच्या दृष्टीने नगण्य होती. त्याचे वडील बेलीप असल्याने असल्यामुळे यशवंतरावांचा सर्वात मोठे बंधू ज्ञानोबा यांनी बेली फळाची नोकरी वडील वारल्यानंतर त्यांच्या जागेवर मिळाली. त्यानंतर बंधू गणपत्राव व आई विठाबाई यांनाच घर खर्चाची काही ना काही तोंडमिळवणी करावी लागे. अशा ओढ आवडीच्या परिस्थितीत मुलांनी शिकून मोठे झाले पाहिजे याबद्दल आई चा पक्का निर्धार होता. अगदी अधीर स्वभावाच्या त्या निरक्षर माऊलीने आपल्या परीने मुलांना शिकवण्याचा मोठा प्रयत्न केला. लहान वयाच्या यशवंतरावांनी मनावर ठसलेला खंबीर हा सहनशील देणे संस्कार यशवंतराव कधीही विसरले नाहीत. त्यांच्या राजकीय जीवनात प्रदीर्घ व कालखंडामध्ये या गुणांची अनेकदा कसोटी लागली. आईच्या धार्मिक श्रद्धेतून मिळणारा निधीचा संस्कार आपोआप त्यांना मिळाला. या काळातल्या अनुभवून यशवंतराव लिहितात. माझी आई शाळेत शिकली नव्हती. पण शिक्षणाचा मोल ती मनोमन ती जाणवत होती. आमची घरची गरिबीची होती पण संस्काराने आम्ही श्रीमंत होतो. असे उद्गार यशवंतरावांनी त्यांच्या आईबद्दल काढले आहेत. गरीबी माणसाला विनम्रता शिकवते. ती केवळ मोरारजी देसाई आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या पुरतीच मर्यादित नव्हती. यशवंतरावांचे खंडीभर टीकाकार आणि राजकीय विरोधक या सर्वांच्या तीव्र शब्दांचा प्रतिसाद जन्मभर यशवंतराव सौम्य व सभ्य भाषेमध्ये करत असत. कालांतराने टीकाकारच यशवंतरावांची कौतुक करू लागले. तरीही स्वतःबद्दल यशवंतराव नेहमी म्हणत मी एक वादग्रस्त व्यक्ती आहे. परिस्थितीतून आणि आईकडून मिळालेल्या संस्कार मधून यशवंतरावांनी आपल्या उपजत बुद्धी च्या साह्याने योग्य ती जीवननिष्ठा संपादन केली तो निर्धार जन्मभर उराशी बाळगला . गरिबीत जीवन काढणारा मनुष्य गरिबीने कठोरही बनतो. परंतु यशवंतराव तसे झाले नाहीत. पुढे या पितृ प्रयोगाला अनेक वर्षे उलटून गेल्यावर एकदा मराठवाड्यात यशवंतराव दौऱ्यावर गेले होते. नाथांच्या पैठण तालुक्यात छोट्याशा गावात सहज विचारले पाच दहा माणसे उभी होती. तेव्हा एका म्हाताऱ्याने आपली काठी टेकीत टेकीत खिशातून एक पिशवी काढली पिशवी मधून

कुठल्याही प्रकारचे वस्तू नव्हती फुले नाहीत पण एक रुपयांचा दहा बारा नोटा ने बांधलेला हार बाहेर काढला. यशवंतराव चकित झाले निशब्द झाले अश्रू नाही कंठ फुटला म्हातारा म्हणाला बाळा तुझ्या सारखा पुत्र व्हावा अशी इच्छा होती. तूला खाऊसाठी हे पैसे आणले आहेत. यशवंतराव पितृ वंचित होते कारण त्यांचे वडील लहानपणीच वारले होते. परंतु या वयातही आपल्याला खाऊ खायला देणारा कोणी तरी आहे या भावनेने त्यांचे मन भरून आले आणि त्यांचे आनंद अश्रू वाहू लागले. असे म्हणून ते जनतेला म्हणतात मातेचे हृदय जनते जवळ आहे असे मला वाटते. यशवंतराव बुद्धिमान होते भारताच्या राजकीय व सामाजिक वास्तवाचा परिचय यशवंतरावांना लहान वयापासूनच होता. तसेच ते अत्यंत भावनाशील तपशीलही होते जीवनातल्या कडू गोड अनुभव हलके झाले होते. भावनेला बुद्धीचा अंकुश असल्याने ती भलतीकडे धाव घेणारी होऊ शकली नाही. त्यामुळे राजकीय पारतंत्र्य आणि सामाजिक विषमता हे जटील प्रश्न त्यांना सतत प्रयत्नाला येत होतेच. तसेच महात्मा गांधीजींची राजकीय चळवळी सुरू होत्या सामाजिक विषमतेविरुद्ध सत्यशोधक चळवळ तसेच राजकीय पक्षाचे कार्य हेही तरुण यशवंतराव जवळून पाहत होते. भारताच्या राजकीय सामाजिक शैक्षणिक कार्य यशवंतरावांनी जवळून पाहिले होते.

**राजकीय सामाजिक वाटचाल**

इ.स.;१९५६ मध्येस्थापन झालेल्या द्विभाषिक मुंबई राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून त्यांची निवड झाली. तसेच मुंबईसह स्वतंत्र महाराष्ट्र निर्माण झाल्यानंतर १मे१९६० महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणूनही त्यांचीच निवड झाली. इ.स. १९६२ मध्ये चीन युद्धाच्या काळात तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरूंनी यशवंतरावांची नेमणूक देशाच्या संरक्षणमंत्रीपदावर केली. हा त्यांच्या कारकीर्दीचा सर्वोच्च बिंदू म्हणता येईल. पुढील काळात त्यांनी उपपंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्री, अर्थमंत्री, संरक्षणमंत्री, परराष्ट्रमंत्री ही पदे यशस्वीरीत्या भूषविली. केंद्रात जनता पक्षाचे सरकार असताना (१९७७-७८) ते विरोधी पक्षनेते होते. तसेच पुढे ते आठव्या केंद्रीय वित्त आयोगाचे अध्यक्षही झाले.

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी असताना त्यांनी काही महत्त्वाच्या योजना राबवल्या .

यशवंतराव राजकारण समाजकारण आर्थिक नियोजन सांस्कृतिक कार्य शैक्षणिक कार्य यांचे सखोल अभ्यासक होते. अनेक गुणांचा समुच्चय त्यांनी स्वप्रयत्नातुन निर्माण केलेला होता. उपजत हुशारीला अशा दुर्मिळ गुणांची जोड मिळाल्याने त्यांच्या कर्तुत्वाला आणि यशाला जन्मभर बहर आला होता. ज्या काळात यशवंतराव राजकारणात भाग घेऊ लागले तो स्वराज्याच्या चळवळीचा महत्त्वाचा टप्पा होता. स्वराज्य हा आपला जन्मसिद्ध हक्क आहे अशी घोषणा करून धीटपणा ने त्यासाठी जनमत तयार करणारे लोकमान्य टिळक यांचे नेतृत्व नुकतेच संपले होते. एवढेच नव्हे तर ब्रिटिशांनी हिंदुस्तान सोडल्यानंतर या भूमीमध्ये कसले स्वराज्य अवतरले पाहिजे हे आत्ता अधिक स्पष्टपणे काँग्रेसने 1930 मध्ये सांगितले होते. 10 डिसेंबर 1948 या दिवशी संयुक्त राष्ट्र संघाच्या सर्वसाधारण सभेने मानवी हक्काची सार्वत्रिक घोषणा प्रस्तुत केली या घोषणेत अधोरेखित केलेली. मानवी हक्क त्यानंतर अनेक देशांच्या राज्य घटनांमध्ये उद्धृत केले गेले. यशवंतरावांनी जसे यश अनेकदा पाहिले तसेच अनेकदा अपयशही तोंड कडू कर चाखले अपयशाचा कहर मात्र अखेरच्या दिवसांमध्ये झाला . त्याचप्रमाणे टीकाकाराच्या प्रतिपादाना प्रतिसाद करायला यशवंतराव उदासीन असतात. यशवंतराव तारुण्यामध्ये चळवळीत सामील झाल्यामुळे लोकांच्या संघटनाकाराचा अनुभवांचा त्यांचे व्यक्तिमत्त्व घडवण्यात महत्त्वाचा भाग होता. आपण भोगलेल्या दारिद्र्याचे भांडवल करण्याचा त्यांनी कधी प्रयत्न

केला नाही. उगा चुकून माकून त्यांचा उल्लेख त्यांच्याकडून सहज झाल्यावर ऐकणाऱ्यांना अशा काळाच्या हकीकती कळत. शालेय जीवनातले दिवस आठवताना ते एकदा म्हणाले आम्ही काही विद्यार्थी घरी अभ्यासाची सुविधा नसल्याने टिळक हायस्कूलमध्ये रात्री अभ्यासासाठी जात असू. असले तरी वेगवेगळ्या प्रश्नांच्या संदर्भात ज्या भूमिका विचारपूर्वक यशवंतरावांनी घेतल्या.

**आर्थिक वाटचाल:-**

यशवंतराव चव्हाण यांची आर्थिक वाटचाल. प्रामुख्याने .सहकार क्षेत्र .उद्योग क्षेत्र, समाजवाद, शेती, आर्थिक विषमता, विकासाचे समस्या, आणि नियोजनाचे महत्त्व इत्यादींची निगडित आहे. यशवंतराव चव्हाणांनी कृषी विषयक आपले विचार मांडताना शेतीच्या याचा प्रश्न महत्त्वाचा मानला. भूमिहीनांना प्रश्न व कृषी विकासासाठी उपाय यावर काही अधिक भर दिला. शेत जमिनीचा मालक असावा तसेच त्यांनी सामाजिक क्षमता व सामाजिक न्यायाच्या दृष्टिकोनातून शेतीचा महत्त्वाचा विचार केला. भारतात सगळ्यात जास्त शेती क्षेत्रात भूमिहीन यांची संख्या अधिक पटीत आहे म्हणून अधिक जमीन असणाऱ्या लोकांनी त्यांच्या जमिनीचा एक ते दोन टक्के जमीन त्यांना द्यावी. तसेच जमीन अविकसित असल्याने ती अनुत्पादक व पडीक राहिली आहे अशी जमीन लागवडीखाली आणणे आवश्यक आहे अशी ही महत्त्वाची भूमिका त्याने ते पार पडलेली दिसून येते. अशा जमिनी लागवडीखाली आणणे आवश्यक आहे शेती व्यापारी तत्त्वाने केली पाहिजे शेतीच्या आधुनिकीकरणाच्या मार्गातील अडथळे दूर केले पाहिजेत. नद्यांच्या पाण्याचा शेतीसाठी वापर केला पाहिजे तसेच नद्यांवर वेगवेगळ्या प्रकारचे म्हणजे नियोजन आंतक बंधारे बांधले पाहिजेत धरणे बांधली पाहिजेत आणि विस्थापित होणाऱ्या लोकांची पुनर्वसन केले पाहिजे. शेतकऱ्यांनी कृषी शास्त्राचा अभ्यास केला पाहिजे असे मत त्यांनी मांडलेले दिसून येते. यशवंतराव चव्हाण हे समतोल विकासाचे पुरस्कर्ते होते म्हणून त्यांनी विकास योजना आखताना अविकसित विभागांचा आधी विचार केला गेला पाहिजे ग्रामीण औद्योगीकरण याबाबत ते म्हणतात की ग्रामीण भागात उद्योग सुरु करुन शेती आणि उद्योग यांची सांगड घातली जावी शहरी व ग्रामीण अर्थव्यवस्थेची सांगड घालून शहरांकडे धाव घेणारा श्रमिकांचा लोंडा थोपविला येईल औद्योगिक विकासासाठी नियोजन महत्त्वपूर्ण आहे देशाचा संतुलित आर्थिक विकास व्हावा यासाठी ते औद्योगिक विकासाच्या दृष्टीने कल्पना माडतात. याशिवाय राष्ट्राच्या आर्थिक विकासासाठी ते सहकाराचा पुरस्कार करतात. भारतासारख्या कृषिप्रधान देशाचे विकासासाठी सहकारी तत्वे फार उपयुक्त ठरतात.

**योजना:-**

१) पंचायत राज या त्रिस्तरीय जिल्हा परिषद पंचायत समिती, ग्रामपंचायत, व्यवस्थेची सुरुवात.
२) राज्य पंचवार्षिक योजनांचा प्रारंभ.
२) मूलभूत सोयी सुविधांचा विकास.
३) 18 सहकारी साखर कारखान्यांची स्थापना.
४) मराठवाडा ,कोल्हापूर विद्यापीठ यांची स्थापना.
५) राज्यातील कृषी विद्यापीठांच्या स्थापनेतही संकल्पनात्मक सहभाग.
६) मराठी साहित्य संस्कृती महामंडळ व विश्र्वकोश मंडळाची स्थापना.

**शैक्षणिक वाटचाल:-**

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे एक प्रभावी साधन आहे. त्याचा उपयोग समाज हितासाठी करणे गरजेचे ठरते. भारत हा खेड्यांचा देश असल्याने भारताचा मूळ समूळ विकास करण्यासाठी शिक्षणाची

ज्योत ग्रामीण भागात घरोघरी पेटवली जावी हा यशवंतरावांचा ध्यास होता. यशवंतराव चव्हाण आपले शैक्षणिक विचार स्पष्ट करताना म्हणतात की शिक्षण ही सामाजिक गरज असली तरी ते आर्थिक विकासाचे एक मूलभूत साधन आहे. व्यक्तीला शिक्षणाची जोड दिल्याशिवाय समाजात नवीन सामर्थ्य निर्माण होणार नाही. यशवंतराव चव्हाण आपली शिक्षणाची ची व्याख्या स्पष्ट करताना म्हणतात. शिक्षक व्यक्तीला स्वतः होती घडणाऱ्या इतर गोष्टी आणि जगामध्ये घडणाऱ्या इतर गोष्टी यांची ज्यामुळे संगती लावता येते त्यांचा योग्य अर्थ समजावून घेता येतो. आणि त्याचा परिणाम आपल्या जीवनावर व व्यक्ती पदावर काय घडतो हे समजावून घेता येते. त्याला शिक्षण म्हणतात. यशवंतरावांना इतिहास , मराठी व गणित विषयाची फार आवड होती. इतिहास म्हणजे केवळ पुनरावृत्ती ऐसा ठोकळे हिशोब ते करत नसत. इतिहास काल घडला आज घडत आहे आणि उद्या घडणार आहे अशी त्यांची इतिहासाची उत्क्रांतवादी श्रद्धा होती. या शैक्षणिक विचारातून त्यांनी शिक्षण विकासाच्या अनेक योजना कार्यान्वित केल्या. महाराष्ट्राच्या राजकीय सामाजिक आर्थिक व सांस्कृतिक विकासासाठी सर्वत व प्राथमिक शिक्षणाचा प्रचार प्रसार होणे गरजेचे आहे असे त्यांचे मत होते. शिक्षण संदर्भात व्यक्त केलेले मत या संदर्भात अतिशय महत्वपूर्ण आहे. ते म्हणतात "समाजभिमुख शिक्षणाची संकल्पना मांडताना शिक्षणातून केवळ ज्ञानाची उपासना वा बुद्धीची जोपासना करून चालणार नाही."तर भावनांची प्रगल्भता आणि अंत करण्याचा मोठेपणा अंगी असणे आवश्यक आहे. मानवाची मत शिक्षणाच्या संस्काराने अधिक संपन्न केल्याशिवाय समाज खऱ्या अर्थाने समाज बनत नाही. शिक्षण घेतल्याने मानव स्वावलंबी होऊ शकतो आणि आपली प्रगती करून घेऊ शकतो. त्यामुळे यशवंतराव म्हणतात. शिक्षण व राष्ट्रीय दृष्टिकोनाचा अभाव यामुळे आपल्याला जीवनाच्या खऱ्या क्षेत्रात माघार घ्यावी लागते. याउलट शास्त्रीय वैज्ञानिक ज्ञानाने युक्त अशी राष्ट्रे स्वतःहाची सार्वभौमत्व अखंड ठेवू शकतात. इतकेच नव्हे तर दुसऱ्याच्या मदतीला धावून जाऊ शकतात. यामुळे शिक्षण रुपी ज्ञानाचा झरा वाहत ठेवणे गरजेचे ठरते. म्हणून ज्ञान हे अमृत आहे या अमृताने स्वतःला समर्थ बनवायचे आहे. यशवंतराव मंत्रीपदावर असताना त्यांनी शैक्षणिक बाबतीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेतल्याचे दिसून येते.

१. सन 1958 साली मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथे स्थापना झाली.
२. इ.बी.सी सवलत सुरू केली.
३. सन 1962 झाली कोल्हापूर शिवाजी विद्यापीठाची स्थापना केली.
४. राहुरी येथे कृषी विद्यापीठाची स्थापना.
५. आदिवासींच्या मुलांसाठी आश्रम शाळेची स्थापना.
६. साताऱ्यात सैनिक स्कूल ची स्थापना.
७. कराड दू औरंगाबाद येथे अभियांत्रिकी महाविद्यालयाची सुरुवात.
८. रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष.

**सारांश:-**

यशवंतराव चव्हाण यांना संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळात जनतेच्या प्रचंड रोषाचा सामना करावा लागला. यशवंतरावांना संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री होण्याचा मान मिळाला. शिक्षण सहकार ,उद्योग व्यापार ,शेती व इतर अनेक क्षेत्रातील राज्यांच्या प्रगतीची पायाभरणी यशवंतरावांच्या प्रगल्भ नेतृत्वाखाली झाली. म्हणूनच त्यांना आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार हे बिरुद्ध लावले जाते. सर्वांगीण विकासाची दूरदृष्टी हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा गाभा होता. साहित्यप्रेमी आणि सुसंस्कृत राजकारणी अशी त्यांची प्रतिमा आजच्या जनमानसात ही कायम आहे. सुरवातीच्या काळात रॉयलवादी

आणि नंतरच्या काळात नेहरूवादी अशी त्यांची वैचारिक भूमिका राहिली. 1962 मध्ये नेहमी त्यांची देशाच्या संरक्षण मंत्री पदावर नियुक्ती केली तेव्हा त्यांची वर्णन "हिमालयाच्या मदतीला सह्याद्री" असे केले गेले. त्यानंतरच्या दोन दशकांमध्ये त्यांनी केंद्र सरकारात अर्थ परराष्ट्र गृह अशी महत्त्वाची खाती संभाळून आणि उपपंतप्रधान पदावर व विरोधी पक्षनेते पदावर विराजमान होऊन दिल्लीच्या राजकारणावर स्वतःचा ठसा उमटवला. यशवंतराव चव्हाण यांनी केलेल्या कार्याची दखल अवघ्या महाराष्ट्राने घेतली नाही तर अवघ्या भारत वर्ष त्यांचे गोडवे गाते त्यांच्या कार्याची पोचपावती म्हणून त्यांना जे मानसन्मान मिळाला आहे. अशा एका तेजस्वी राष्ट्रीय नेतृत्वाचा अस्त दिनांक 25 नोव्हेंबर 1984 रोजी झाला. आणि अवघ्या महाराष्ट्र एका असामान्य राजकीय कर्तुत्वाला आणि प्रतिभावंताला मुकला.

**संदर्भसूची :-**

१. महाराष्ट्र भूषण यशवंतराव चव्हाण-विश्वास नाईकनवरे, गंधर्व- वेद प्रकाशन, पुणे
२. चव्हाण यशवंतराव बळवंतराव-कृष्णाकाठ 1987 प्रेस्टिज पब्लिकेशन पुणे.
३. थोरात संभाजी बाबा, यशवंतराव चव्हाण, झुंजार नेतृत्वाचा शोध आणि बोध ,कराड 1988.
४. यशवंतराव चव्हाण, सह्याद्रिचे वारे, मुंबई 1962.
५. विकिपीडिया-यशवंतराव चव्हाण यांची कार्य.
६. दैनिक तरुण भारत 12 मार्च 2012 स्व. यशवंतराव चव्हाण जन्म शताब्दी विशेषांक लेख- रामभाऊ.
७. यशवंतराव चव्हाण जडण-घडण संपादन .अरुण साधू ,मधू मंगेश कर्णिक ,प्रा. कोडीलकर ,अनघा प्रकाशन.

# अष्टपैलू यशवंतराव चव्हाण

**डॉ. महेश प्रल्हादराव गोमासे**
नेहरू महाविद्यालय, नेरपरसोपंत जि. यवतमाळ
मो. नं. ९४२३६२४८४९maheshgomase68@gmail.com

महाराष्ट्र राज्याचे पहीले मुख्यमंत्री आणि एक राष्ट्रीय नेते. देवराष्ट्रे येथिल एका सामान्य शेतकरी कुटुंबात यशवंतराव चव्हाण यांचा जन्म झाला. प्राथमिक शिक्षण कराड येथे त्याच बरोबर उच्च शिक्षण कोल्हापूर व पूणे येथे घेतले, आणि बी.ए.एल.एल.बी. झाले. १९३० साली महात्मा गांधी यांनी सविनय कायदेभंग चळवळ सुरू केली, तेव्हा त्यात यशवंतराव चव्हाण यांनी भाग घेतला. १९३२ साली त्यांना पहीला तुरूंगवास घडला. यशवंतराव यांचे वडील बळवंतराव चव्हाण हे यशवंतराव लहान असतांनाच वारले. त्याचें बंधू ज्ञानदेव यांनी कष्ट करू घर चालविले. यशवंतराव या पुत्राने खुप शिकावे ही यशवंतराव चव्हाणच्या आईची खुप इच्छा होती. यशवंतरावांनी शालेय जिवनात वक्तृत्व स्पर्धेत अनेक पारितोषिके पटकाविली. त्यांनी संगीत, भजन, किर्तन यांचाही स्वाद घेतला. कऱ्हाड येथे तर्कतिर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, लोकमान्य टिळक, ना. गोखले यांची भाषणे ऐकली. येरवडा तुरूंगात असतांना आचार्य भागवत, एस.एम.जोशी यासारखे नेते तेथे होते. तुरूंगामध्ये राजकीय, सामाजिक विषयावर चर्चा होत. यशवंतरावांना त्या वयातच विचारवंत, साहित्यीक यांच्या ग्रंथा संबंधी आकर्षण वाटू लागले. त्यांनी कोल्हापूरातील राजाराम महाविद्यालयामध्ये असतांना त्यांचा व्यासंग वाढला. ना.सी.फडके यांच्या सारखे नामवंत साहित्यीक प्राध्यापक होते. बी.ए.एल.एल.बी. ची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर १९४२ मध्ये स्वातंत्र्य लढ्यात भूमीगत होवून कार्य केले. त्यांनी १९४७ नंतर मंत्री, मुख्यमंत्री आणि नंतर देशाचे संरक्षण, गृह, परराष्ट्र आणि वित्तमंत्री ही पदे समर्थपणे सांभाळली. त्यांनी केंद्र सरकारमध्ये पं.नेहरू यांच्या नेतृत्वाखाली कार्य केले.

**स्वातंत्र्यलढ्यात सहभाग व तुरूंगवास :–**

कराडमधिल केंद्रशाळेतून व्हर्नाक्युलर फायनल परीक्षा पास झाल्यानंतर १९२७ मध्ये यशवंतरावांनी कराडच्या टिळक हायस्कुलमध्ये प्रवेश घेतला. माध्यमिक शिक्षण सुरू असतांनाच देशभर क्रांतीचा वणवा भडकलेला होता. क्रांतीकारांच्या विचारांचा मोठा प्रभाव या दरम्यान यशवंतरावांवर होता. वृत्तपत्रातील बातम्या वाचून, राष्ट्रीय नेत्याचे चरीत्र्य वाचून यशवंतरावांचे मन देशप्रेमाने भारावून गेले होते. यतिंद्रदासांनी तुरूंगात केलेल्या आत्मबलिदानाने त्यांचे मन पेटून उटले. इ.स. १९२९ मध्ये भगतिसंग व त्यांच्या साथीदाराने असेम्ब्ली बॉम्ब फेकला. या घटनेनंतर ब्रिटीश सरकारने भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांना पकडून फाशी दिली. इंकलाब जिंदाबाद घोषणा देत. हसत हसत फासावर जाणाऱ्या भंगतसिंगच्या कृतीतुन प्रेरणा घेवून यशवंतरावांनी निर्धार केला, 'तेथून पुढे संपूर्ण आयुष्य स्वातंत्र्य लढ्यासाठी अर्पण करावयाचे' यानंतर त्यांनी कधीच मागे वळून पाहीले नाही.

इ.स. १९३०–३१ हा काळ संपुर्ण देशभर असहकार आंदोलनाचे व्यापला होता. मिठावरील अन्यायकारक कराला विरोध करण्यासाठी म. गांधीच्या नेतृत्वाखाली देशाच्या कान्याकोपऱ्यात कायदेभंग चळवळ सुरू होती. विद्यार्थी वर्ग ही यामध्ये कमी नव्हता यशवंतरावांनी यशवंतराव विद्यार्थी दशेत असहकार चळवळीत उडी घेतली. १९३२–३३ मध्ये त्यांना १८ महीन्याचा तुरूंगवास, वयाच्या अवघ्या २० व्या वर्षी भोगावा लागला. त्यानंतर आंदोलने, चळवळी, भाषणे, याने यशवंतरावाचे जीवन व्यापून गेले. प्रचंड वाचन, प्रभावी वक्तृत्व हे गुण या काळात यशवंतरावांनी आत्मसात केले.

**महाराष्ट्र निर्मिती व वाटचाल :–**

१९५४ साली मुंबई राज्यात पंचायत संघाची स्थापना झाली. या दरम्यान राज्य पुनर्रचना समिती गठीत करण्यात आली होती. या समितीत मुबंई राज्यांची विभागणी करून विदर्भासाठी स्वतंत्र्य राज्य करून उर्वरित प्रदेशात मराठी व गुजराती भाषीकांचे संयुक्त राज्य स्थापना करण्यात यावे अशी शिफारस करण्यात आली. मुंबई, विदर्भ, मराठवाड्यासह 'संयुक्त महाराष्ट्र राज्य' असावे या मागणीसाठी संपुर्ण राज्यभर आंदोलन पेटू लागले. कॉंग्रेस निष्ठा व्यक्त करत यशवंतरावांनी या आंदोलनाला विरोध दर्शविला. १ डिसें १९५५ मध्ये सातारा जिल्हा कॉंग्रेस कमिटीच्या सभेत

यशवंतरावांनी घोषणा केली. "उपोषण, संप, राजीनामे हे संयुक्त महाराष्ट्र मिळविण्याचे मार्ग नव्हेत महाराष्ट्रापेक्षा राष्ट्रहित श्रेष्ठ आहे. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र मिळविण्याच्या प्रयत्नात यापुढे शंकरराव देव याचे नेतृत्व मी स्विकारणार नाही."

संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचा जोर वाढत असतांना प्रवाहा विरूध्द भूमिका घेण्याचे धैर्य यशवंतरावांनी दाखविले. दरम्यानच्या काळात विशाल द्विभाषिक 'मुंबईराज्य' स्थापन करावे असा ठराव लोकसभेत मंजुर झाला. त्यानुसार १ नोव्हेंबर १९५६ रोजी द्विभाषीक मुंबई राज्याची स्थापना झाली. वयाच्या अवघ्या ४३ व्या वर्षी मुंबई राज्याचे पहीले मुख्यमंत्री बनण्याचा बहूमान यशवंतराव चव्हाण यांना मिळाला. काही काळानंतर चळवळीने गती घेतली व यशवंतरावांनी आपल्या कौशल्याच्या आधारे प्रथम मुंबई, मग मराठवाडा, विदर्भ व संपुर्ण महाराष्ट्र आपलासा करून घेतला. एप्रील १९६० मध्ये एक ठराव मंजुर करण्यात आला. या ठरावा नुसार महाराष्ट्र व गुजरात अशी दोन राज्ये निर्माण करण्यास लोकसभेत मंजुरी दिली. दिर्घकाळ सुरू असलेल्या संयुक्त महाराष्ट्र लढ्यात मुर्त स्वरूप प्राप्त होण्याचा तो एक महत्वाचा क्षण होता. १ ते १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात झाली. महाराष्ट्र राज्याचे पहीले मुख्यमंत्री बनण्याचा बहुमान यशवंतराव चव्हाण यांना मिळाला. मुख्यमंत्री पदाची जबाबदारी स्विकारल्या नंतर त्यांनी राज्याच्या विकासा संदर्भात अनेक धोरणात्मक निर्णय घेतले. महाराष्ट्राचे भाग्य उजळून टाकणाऱ्या कोयना जलविद्युत प्रकल्पाचे पहीले जनित्र १६ मे १९६२ रोजी यशवंतरावांच्या हस्ते बसविण्यात आले. त्याच बरोबर नागपूर येथिल दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक उभारणे. व १४ एप्रीलला सार्वजनिक सुट्टी जाहीर करणे, गुढी पाडव्याला सार्वजनिक सुट्टी जाहीर करणे असे कितीतरी महत्वपूर्ण निर्णय यशवंतरांच्या कारकिर्दीत करण्यात आले. यशवंतरावांच्या या दिलेल्या योगदानामुळे त्यांना 'आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार' म्हणून गौरविण्यात आले.

**साहित्यक्षेत्राचा व्यासंग :—**

यशवंतरावाना राजकारणा बरोबरच साहित्यक्षेत्राचाही खुप मोठा व्यासंग होता. मराठी भाषेच्या समृध्दीसाठी त्यांनी महत्वपूर्ण योगदान दिले. नवी दिल्ली येथे भरलेल्या ४३ व्या अखिल भारतीय नाट्य संमेलनाचे स्वागताध्यक्षपद त्यांनी स्विकारले. १९६२ मध्ये सातारा येथे भरलेल्या अ.भा.मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन यशवंतरावांच्या हस्ते झाले. नांदेड येथे भरलेल्या मराठी नाट्य परीषदेचे उद्घाटनही त्यांच्या हस्ते झाले. मराठी भाषा वाढली पाहिजे, व ती समृध्द बनली पाहीजे यासाठी त्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केल्याचे दिसून येते व त्याच बरोबर त्यांचे अनेक ग्रंथ त्यांनी लिहूनही काढले.

**परदेश दौरे :—**

यशवंतराव चव्हाण यांनी जगातील बहुतांश देशांना भेटी दिल्या. इंग्लंड, अमेरिका, कॅनडा, पेरू, रशिया, जपान, आफ्रिका इ. अनेक देशांना भेटी दिल्या. जवळ जवळ संपुर्ण जगाची त्यांनी सफर केली. यशवंतराव ज्या वेळी परदेशात गेले त्यावेळी त्यांनी तेथे वास्तवास असलेल्या भारतीय लोकांची आवर्जून भेट घेतली. परदेशातील भारतीयांच्या मनात आपल्या देशाबद्दल व त्यांच्या प्राचिन इतिहासाबद्दल आस्था असल्याचे यशवंतरावांन पहावयास मिळाले. भारत सरकारने या सर्वांशी संस्थात्मक संबंध निर्माण करावेत असा प्रयत्न यशवंतरावांनी प्रथम केला. जगातील विविध देशांना भेटी दिल्यानंतर तेथील प्रवास वर्णने यशवंतरावांनी शब्दाबध्द करून ठेवली. भव्य—दिव्य गोष्टी पाहतांना त्यांच्यातील साहित्यीक जागरूक होत असे.

**राजकिय वाटचाल :—**

पं.नेहरू विषयीच्या आपल्या आठवणी सांगतांना यशवंतराव चव्हाण म्हणतात,

"पं. नेहरूंना मी प्रथम १९३१ मध्ये कराडला पाहिले त्यावेळी मी शाळेत शिकत होतो. पंडीतजी बंगलोर मेलने जाणार होते. ही रेल्वे मध्यरात्री कराड स्टेशनवर येते. पाचशे विद्यार्थ्यांना सोबत घेवून मध्यरात्री आम्ही कराड स्टेशनला पोहचलो बंगलोर मेल येताच प.नेहरू ज्या डब्यात बसले होते तो डब्बा शोधून काढण्यात आला होता. झोपेत असणारे प. नेहरू जागे झाले. काहीशा रागेट मुद्रेने त्यांनी सर्वांकडे पाहीले, पण अल्प काळातच त्यांचा तो राग मावळला. सुमारे ५ मिनीटे ते बाळगोपाळात रमले. नेहरूचे मला झालेले हे पहीले दर्शन."यानंतर संयुक्त महाराष्ट्राची भूमिका यशवंतरावांनी नेहरूजींना पटवून दिली. ते १९५६ मध्ये १९६० मध्ये महाराष्ट्राचे पहीले मुख्यमंत्री झाले व १९६२ मध्ये केंद्रीत मंत्री मंडळात संरक्षणमंत्री आदी विविध जवाबदाऱ्या पं.नेहरूनी यशवंतरावावर सोपविल्या.

१९६२ साली भारत–चीन यांच्यात युध्द झाले. चीनच्या अचानक आक्रमणामुळे भारताला नामुष्कीजनक पराभव पत्कारावा लागला. चीनचे राष्ट्रध्यक्ष 'माओ–से–तुंग' यांच्याकडून झालेला विश्वासघात नेहरूंच्या जिव्हारी लागला. 'हिन्दी चीनी भाई–भाई' या घोषणेला चीन ने दगा दिला. या प्रसंगी देशाच्या संरक्षणमंत्री पदावरून श्री. व्ही. के. कृष्णमेनन यांना काढुन त्या जागेवर यशवंतरावांना बसवावे असे नेहरूंना वाटू लागले. या वेळी यशवंतराव महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते २२ नोव्हेंबर १९६२ रोजी देशाच्या संरक्षणमंत्री पदाची यशवंतरावांनी शपथ घेतली.१९६५ हे साल भारत–पाक यांच्यातील लढाईच्या धुमश्चक्रीचे होते. या दरम्यान यशवंतरावांच्या मातोश्री विठाबाई ह्या खुप आजारी होत्या. कराडहून त्यांना उपचारासाठी मुंबईला आणल्या गेले. वय झाले होते. आयुष्यभर खुप कष्ट करून ती माता थकलेली होती. १८ ऑगट १९६५ रोजी त्यांनी जगाचा निरोप घेतला. यावेळी यशवंतराव दिल्लीत होते. देश युध्दालाच्या खाईत असल्याने यशवंतरावांना आपल्या मातेचा अखेरचा सहवास लाभला नाही.

१९६५ च्या युध्दात भारताने पाकिस्तानवर मिळविलेला पहीला विजय देशाने पाहीला. १९७१ च्या युध्दात भारताने पाकिस्तानचा निर्णायक पराभव करून त्याचे दोन तुकडे केले. तर त्या यशावर प्रशस्तीची मोठी कमान उभी राहील्याचेच देशाला दिसले. संरक्षणमंत्री या नात्याने यशवंतराव चव्हानांनी केलेले काम औपचारीक मार्गदर्शनाचे नव्हते, राम प्रधानांनी संपादित केलेल्या त्या काळातील यशवंतरावांच्या डायरी नुसार नुसती चाळली तरीष्शस्त्रबळाच्या वाढीपासुन सेनेच्या प्रत्यक्ष हालचाली पर्यन्त त्यांनी उचलेले निर्णायक पाउल नजरेत भरले.जुन १९७० मध्ये यशवंतरावांची केद्रींय अर्थमंत्री म्हणून नियुक्ती झाली. देशाची आर्थिक घडी पुढील चार वर्षात बसविण्यात त्यांनी महत्वपूर्ण योगदान दिले. पाकिस्तान आणि चीन यांच्या भारताविरोधी कारवायांनी संघटीत स्वरूप घेतले, तेव्हा देशाने यशवंतरावांची नियूक्ती ऑक्टो १९७४ मध्ये परराष्ट्र खात्याच्या मंत्रीपदावर केली. देशाने परराष्ट्र धोरण निश्चित करण्यात त्यांनी महत्वाची भुमिका बजावली.

**चतुरस्त्र व्यक्तिमत्व : –**

लोकनेते यशवंतराव चव्हाण जर राजकारणात आले नसते तर एक थोर साहित्यीक म्हणून नावारूपास आले असते. असे त्यांच्याबदद्ल अनेक नामवंत साहित्यीकांनी नमुद करून ठेवले आहे. चव्हाण साहेबांच्या व्यक्तीमत्तवाचे अनेक पैलु त्यांच्या वाटचालीतून स्पष्ट होतात. जीवनाचे नम्र उपासक असलेल्या चव्हाण साहेबांच्या प्रत्येक कृतीत व बोलण्यात सहजता असायची कोणतेही काम सहजपणे हाताळण्याची कुशलता हा अन्य कोणामध्ये सहजासहजी न आढळणारा पैलु यशंवतरावांच्या व्यक्तीमत्त्वा मध्ये होता. वृत्तपत्र संपादक, उद्योजक, कलाकार, शिक्षणतज्ञ, राजकारण अशा समाजातील विविधस्तरात यशवंतरावांचा खुप मोठा मित्रपरिवार होता. कोणत्याही क्षेत्रातील माणसात ते सहजपणे मिसळत. राजकारणात अनेक चढउतार पाहीलेल्या व आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर देशभर नावलौकीक मिळविलेल्या यशवंतरावांचा सामान्यातील सामान्य माणसाशी थेट सबंध होता. शेतकरी हा विकासाचा केंद्रबिंदु माणुन त्यांनी राजकारण केले. भाषावाद, प्रांतवाद ही समस्या देशाला विनाशाच्या गर्देत नेणारी आहे. प्रत्येक भारतीयाने राष्ट्रवाद जापासला पाहीजे. हा विचार त्यांनी ठामपणे मांडला. राजकारणातील तत्वनिष्ठा त्यांनी आयुष्यभर जोपासली. गल्लीपासून दिल्लीपर्यन्त स्वंयतेजाने तळपणारे हे व्यक्तीमत्व प्रत्येक भारतीयास हवेहवेसे वाटत राहीले. यशवंतरावांची व्यापक दृष्टी, चौफेर वाटचाल, विविध क्षेत्राशी असणारा सबंध म्हणुन एक अष्टपैलू व्यक्तीमत्व म्हणून त्यांच्याकडे पाहीले गेले.

**संदर्भग्रंथ :–**

१. मी पाहीलेले यशवंतराव :– संपा. डॉ. सरोजीनी बाबर प्रकाशक :– महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई प्रथम आवृत्ती :– ऑगष्ट १९८८
२. लोकनेते :– यशवंतराव चव्हाण – लेखक – अनिल चव्हाण प्रकाशक :– भरारी एज्यूकेशन ॲन्ड सोशल फॉउंडेशन, कोल्हापूर. प्रथम आवृत्ती :– ऑगष्ट २०१२
३. यशवंतराव चव्हाण :– आठवणी – आख्यायिका – लेखक लक्ष्मण माने प्रकाशक :–ग्रंथाली प्रकाशन, मुंबई पहिली आवृत्ती :– २५ फेब्रुवारी २०१३
४. यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार संकलन :– ना. धो. महानोर प्रकाशन :– यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई प्रथम आवृत्ती :– २००९
५. सहयाद्रीचे वारे :– यशवंतराव चव्हाण प्रकाशक :–यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई प्रथम आवृत्ती :– २००६
६. कृष्णाकाठ :–यशवंतराव चव्हाण प्रकाशक :– यशवंतराव चव्हाण, प्रतिष्ठान मुंबई ई–बुक प्रथमआवृत्ती :– २००६

# "अष्टपैलू यशवंतराव चव्हाण"

**डॉ. सविता ज्ञानेश्वर वावगे**

सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख

श्री. मुक्तानंद महाविद्यालय गंगापूर, जि. औरंगाबाद

मोबाईल क्रमांक ९४२३४४८५५४, Email:- wawgesavita@gmail.com

सारांश:

कोणत्याही महापुरुषांच्या वा कर्तुत्ववान व्यक्तीच्या कार्य आणि कर्तुत्वावर निश्चित काही मर्यादा असतात. त्या मर्यादा तत्कालीन परिस्थिती, भौतिक परिस्थिती, नैसर्गिक परिस्थितीच्या स्वरूपात पुढे येत असतात. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण त्यांच्या जीवनाची जडणघडण एक स्वातंत्र्यसैनिक, कॉंग्रेस पक्षाचा कार्यकर्ता ते महाराष्ट्रचे मुख्यमंत्री, भारताचे संरक्षणमंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री, परराष्ट्रमंत्री, नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष ते भारताचे उपपंतप्रधान अशा उच्च पदावर कार्य करणाऱ्या तसेच महाराष्ट्राच्या राजकारणात शेती, शिक्षण, उद्योग- व्यवसाय सहकार, साहित्य आणि संस्कृती आदी विषयातील त्यांचे कार्य बघता त्यांनी नैसर्गिक मर्यादा वरती सुद्धा मात केल्याचे आपणास दिसते. राष्ट्रवाद आणि लोकशाही यांची चाड असणारा धर्म, जात आणि वर्गवादाला फाटा देऊन छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराला खऱ्या अर्थाने मूर्त स्वरूप देण्याचे आणि त्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे कार्य केले. यशवंतरावांनी सत्ता हे परिवर्तनाचे एक प्रभावी साधन आहे. म्हणूनच त्यांनी सत्तेचा वापर समाज परिवर्तनासाठी केला, म्हणूनच राजकारणामधले आणि समाजकारणामधले एक अष्टपैलू व्यक्तिमत्व म्हणून यशवंतरावांच्या दूरदृष्टी नेतृत्वाला मात्र मान्यता द्यावी लागेल.

**मुख्यशब्द:** अष्टपैलू, अभिप्रेत, पुरोगामी, अस्मिता, सर्वस्पर्शी, समर्पक, विलक्षण, दूरदृष्टी, तुलनात्मक, परिवर्तनवादी.

**प्रस्तावना:**

'महात्मा गांधींनी चले जाव' ची घोषणा केली होती. देशातील असंख्य तरुण एका झेंड्याखाली एकत्र आले होते. मातृभूमीसाठी जिंकू किंवा मरू या निर्धाराने ते सर्व या स्वातंत्र्य लढ्यात उतरले होते. त्यांच्यापैकी यशवंतराव चव्हाण हे एक होते. १२ मार्च १९१३ रोजी यशवंतराव चव्हाण यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्र या खेड्यात झाला. घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. प्लेगच्या साथीने यशवंतरावांचे वडील बळवंतराव गेले होते. आई विठाई ने त्यांचा सांभाळ केला, त्यांना वाढविलं. "नको बाळांनो डगमगू, सूर्य चंद्रावरील जाईल ढगू" ही जात्यावरची ओवी यशवंतरावांनी अनेक वेळा त्यांच्या आईच्या तोंडून ऐकली होती. हीच ओवी त्यांच्या संघर्षाची प्रेरणा झाली. स्वातंत्र्य चळवळीत त्यांनी एक स्वातंत्र्य सैनिक म्हणून जबाबदारीने काम केले, तसेच राजकारणात सुद्धा एक जबाबदार कार्यकर्ता, एक जबाबदार नेता म्हणून त्यांनी कार्य केले. ते सर्वत्र फिरले, समाज घटकातील पिचलेला, गांजलेला परिस्थितीने घायाळ झालेला माणूस त्यांनी बघितला होता. सर्वसामान्य माणसाला भेडसावणारे प्रश्न त्यांनी स्वतःच्या आयुष्यात अनुभवलेले होते. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, एम.एन. रॉय यांच्या परिवर्तनवादी

विचाराने ते भारावून गेलेले होते. जेव्हा ते महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री झाले तेव्हा त्यांनी राजसत्तेच्या माध्यमातुन छत्रपती, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांना अभिप्रेत असलेली कृती प्रत्यक्षात आणली. या महामानवाच्या विचाराला मूर्त स्वरूप देण्याचे काम त्यांनी केले.

यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राची माती, इतिहास, भूगोल, संस्कृती आणि परंपरा यांचा बारकाईने अभ्यास करून आपल्या सत्तेच्या काळात सर्वसामान्यांचे प्रश्न आणि राज्याच्या विविध विभागाच्या गरजा लक्षात घेऊन त्यांनी निर्णय घेतले. यशवंतराव चव्हाण नेहमी म्हणत असत "सत्ता हे समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. त्या सत्तेचा उपयोग सर्वसामान्यांच्या हितासाठी आणि राज्याच्या विकासासाठी झाला पाहिजे." विकास म्हणजे काय? याची व्याख्या करतांना यशवंतराव कायमपणे सर्वांगीण विकास हा शब्द वापरत असत. विकास म्हणजे फक्त रस्ते बांधणे आणि इमारती उभी करणे नव्हे तर मानवाच्या सर्वांगीण विकासाच्या योजना राबविणे होय. म्हणूनच त्यांनी १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतांना शिवरायांना अभिवादन करून जे भाषण केले होते, त्यावेळी ते म्हणाले होते, 'स्वातंत्र्य आपल्याला मिळाले आहे. महाराष्ट्राचा मंगल कलशही आणला आहे. आणि आपल्या समोर एक आणि एकच प्रश्न आहे. आणि तो म्हणजे महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा.'

आर्थिक विकास:

महाराष्ट्राचा आर्थिक विकास, सामाजिक विकास, राजकीय विकास, शैक्षणिक विकास, सांस्कृतिक विकास करण्यासाठी त्यांनी नियोजनबद्ध धोरण आखले. आर्थिक विकास साधण्यासाठी त्यांनी महाराष्ट्राला कृषी औद्योगिक धोरण दिले. उद्योग निर्मितीसाठी आणि बेरोजगारीचे निर्मूलन करण्यासाठी त्यांनी महाराष्ट्रात उद्योग धंदे उभे करण्यासाठी प्रोत्साहनपर धोरण आखले. त्यातून महाराष्ट्र्या आर्थिक विकासाला गती प्राप्त झाली. याबाबत नामवंत शिक्षणतज्ञ प्रा. राम ताकवले म्हणतात, "आर्थिक व सामाजिक दुर्बल घटकातील मुलांना यशवंतरावांच्या निर्णयामुळेच मोफत शिक्षण मिळू लागले त्यांच्यातूनच आजचा सुशिक्षित महाराष्ट्र निर्माण झाला. त्याचबरोबर सहकाराला चालना, पाटबंधारे योजना, सत्तेचे विकेंद्रीकरण, एमआयडीसीची स्थापना कसेल त्याची जमीन, कोकण रेल्वे सुरुवात, वरळी दूध डेअरीची स्थापना असे आर्थिक विकासाला चालना देणारे महत्त्वपूर्ण निर्णय त्यांनी घेतले."

कसेल त्याची जमीन नसेल त्याचे काय? असा थेट सवाल जेंव्हा शासन व व्यवस्थेला केला गेला. तेव्हा ही गोष्ट संवेदनशील मनाचे मुख्यमंत्री यशवंतरावांना पटली व त्यांनी ती मान्य केली व तातडीने भूमिहीनांना जमीन वाटपाचा कार्यक्रम हाती घेतला. परिणामी जमिनीचे पट्टे भूमिहीनांच्या कुटुंबीयांच्या मालकीचे झाले. यातून त्या समाजाच्या आर्थिक विकासाची प्रक्रिया गतिमान झाली. ही गोष्ट महात्मा फुले यांच्या पुरोगामी महाराष्ट्राची प्रतिमा उंचावणारी ठरली. एखादा निर्णय लहान असेल अथवा मोठा असेल तो घेत असतांना त्यामध्ये राज्याचे व्यापक हित लक्षात घेऊनच त्यांनी निर्णय घेतले. नागपूर व औरंगाबाद येथील उच्च न्यायालयाचे खंडपीठ असो अथवा महाराष्ट्रातील विविध संस्थांची उभारणी असो ज्यामध्ये महाराष्ट्र हाऊसिंग बोर्ड असेल महाराष्ट्र विद्युत मंडळ, खादी ग्रामोद्योग मंडळ अथवा वित्त महामंडळ असेल या आणि अशा मंडळाची स्थापना त्यांनी केली.

केवळ सत्तेचे विकेंद्रीकरण करून भागणार नाही तर विकासाच्या अनुषंगाने काही भौतिक सुविधा पण उपलब्ध कराव्या लागतात. म्हणून यशवंतरावांनी स. गो. बर्वे यांच्या अध्यक्षतेखाली राज्य पाटबंधारे मंडळाची स्थापना केली. महाराष्ट्रातील बहुतांशी भाग नैसर्गिक पावसावर अवलंबून असल्याने

शेतीवर कायमपणे अस्मानी-सुलतानी संकट येत राहीली याचा सक्षम पणे मुकाबला करण्यासाठी पाणीपुरवठ्यासाठी व्यवस्था करणे, उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करणे या बाबींसाठी यशवंतरावांनी खास जलसिंचन विभागाची स्थापना केली. मराठवाड्याच्या विकासाचा विचार करून पूर्णा नदी वरील प्रकल्प हाती घेतला व तो पूर्णत्वासही नेला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून आपल्या विकासाच्या कल्पनेला भौगोलिक अस्मिता किंवा मर्यादा त्यांनी केव्हाच आड येवू दिल्या नाही. विदर्भातील पारस थर्मल पावर स्टेशन सारखा भव्यदिव्य प्रकल्प त्यांनी सुरू केला यावरून स्पष्ट दिसून येते की, तुलनात्मक दृष्ट्या महाराष्ट्राच्या सत्तास्थानी असलेले व असणारे राजकीय नेते घेत असलेले निर्णय विशेषत: पाणी व जलसिंचनाच्या अनुषंगाने महाराष्ट्रात पाणी वाटपाच्या संदर्भात न्यायालयीन व रस्त्यावरील झालेली आंदोलने या पार्श्वभूमीवर यशवंतरावांच्या विकासात्मक दृष्टिकोन किती व्यापक व दूरदृष्टीपणाचा व समर्पक होता याची तीव्र जाणीव होते. अशा मूलगामी योजनांचा महाराष्ट्राच्या कृषीक्षेत्रावर सकारात्मक परिणाम होऊन अन्न धान्यांमध्ये प्रचंड वाढ झाली.

**सामाजिक विकास:**

सामाजिक विकासाच्या बाबतीत त्यांनी सर्व समाज घटकांना समोर ठेवून सामाजिक न्यायाची भूमिका घेतली. धर्मांतरामुळे निर्माण झालेल्या नवबौद्ध विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सवलतीचा निर्माण झालेला प्रश्न त्यांनी चुटकीसरशी सोडविला. हरिजन व दलित समूहांना राजकीय सोयी सवलती मिळत होत्या त्यापासून नवबौद्ध वंचित झाले होते. ही बाब एक समाजशील व्यक्तिमत्व म्हणून यशवंतरावांच्या लक्षात आले. दलित व हरिजनांनी बौद्ध धर्म स्वीकारल्यामुळे सामाजिक मागासलेपण काही प्रमाणात कमी झाले तरी शैक्षणिक व आर्थिक मागासलेपण कायम होते. नवबौद्धांना शैक्षणिक सवलती मिळाव्यात ही बाबासाहेबांनी केलेली मागणी त्यांनी तात्काळ मान्य करून अमलात आणली. एवढेच नव्हे तर नागपूर या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारण्याचा निर्णयही त्यांनी घेतला. १४ एप्रिल बाबासाहेब आंबेडकर जयंती दिनाची सुटीही जाहीर केली. या सर्व बाबीवरून यशवंतरावांचे पुरोगामित्व व सर्व समावेशक विकासात्मक दृष्टिकोन प्रतिबिंबित होतो. त्याचबरोबर महाराष्ट्रातील बहुजन समाजाचा वर्ग शिक्षणापासून कोसो दूर होता त्यांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी राज्याच्या विविध विभागांमध्ये जसे की औरंगाबाद येथे (मराठवाडा विद्यापीठ) आत्ताचे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, तसेच कोल्हापूर येथे असलेले श्री शिवाजी विद्यापीठ स्थापन केले. या दोन्ही भागातील सर्वसामान्यांच्या मुलांना उच्च शिक्षण त्यांच्या दारी उपलब्ध करून दिले. एवढे करून यशवंतराव थांबले नाहीत तर त्यांनी शेतकऱ्यांच्या मुलांना मोफत शिक्षण देण्याची योजनाही सुरू केली. या योजनेला मंत्रिमंडळातील काही सदस्यांनी प्रखर विरोध केला परंतु यशवंतराव नमले नाहीत त्यांनी स्वत:चे मुख्यमंत्री पद पणाला लावून ईबीसी सवलतीचा क्रांतिकारी निर्णय घेतला. म्हणूनच बहुजन समाजाची लक्षावधी मुले शिक्षणाच्या प्रवाहात आली. यातूनच महाराष्ट्रातील शिक्षणाची प्रक्रिया गतिमान झाली.

**राजकीय विकास:**

महाराष्ट्राच्या अर्थ चक्राला गती देण्यासाठी त्यांनी १८ सहकारी साखर कारखान्यांची निर्मिती केली मोठ्या धरणाची निर्मिती करून राजकीय विकास सुद्धा झाला पाहिजे यासाठी त्यांनी पंचायतराज व्यवस्थेची भारतामध्ये प्रथम महाराष्ट्रात प्रभावी अंमलबजावणी केली. त्यातूनच जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत या त्रिसूत्री योजनेची निर्मिती झाली. त्यांच्या या धोरणात्मक निर्णयामुळे जिल्हा परिषद, पंचायत समित्या ग्रामीण विकासाच्या रक्त वाहिन्या ठरल्या. यातूनच महाराष्ट्राच्या विविध

विभागात नवे राजकीय नेतृत्वपण उदयास आले. विलासराव देशमुख आणि सुधाकरराव नाईक ही त्याची ठळक दोन उदाहरणे होत. या दोघांचाही राजकीय प्रवास ग्रामपंचायत सरपंच ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असा झाला. हे यशवंतरावांच्या दूरदृष्टीचे, निर्णयाचे फलित होते. महाराष्ट्राला मोठी सांस्कृतिक परंपरा आहे, माणसाचा जसा सर्वांगीण विकास झाला पाहिजे तसाच त्यांचा सांस्कृतिक विकास देखील झाला पाहिजे म्हणून त्यांनी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाची निर्मिती केली. प्रकांड पंडित असे तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी यांच्याकडे त्या मंडळाची सूत्रे दिली. या विषयी लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात "महाराष्ट्राची कला आणि साहित्यिक या विषयाची फार मोठी दीर्घकालीन परंपरा लक्षात घेऊन त्याकरिता अत्यंत महत्त्वाची धोरणे ठरवली परंपरागत धोरणे बदलून टाकली. १९४८ ते १९५७ पर्यंत सरकारी करांचा बोजा मराठी रंगभूमीवर होता त्यामुळे ती जीर्ण झाली होती. महाराष्ट्रातील रंगभूमी हिंदुस्थानातील एक उत्कृष्ट रंगभूमी असल्यामुळे तिचा हा पडता काळ हा सर्वांनाच तीव्रतेने जाणवत होता. यशवंतरावांनी यासंबंधी शासनाचे धोरण पूर्णपणे बदलून टाकले. त्यामुळे रंगभूमी अधिक उजळून निघाली."

**सांस्कृतिक विकास:**

समाजातला सर्वसामान्य माणूस ते साहित्य क्षेत्रातला विद्वान माणूस या सर्व व्यक्तिमत्त्वाचा, त्यांच्या कार्याचा व त्यांच्या बुद्धिमत्तेचा यशवंतरावांनी कायम सन्मान केला. विचारवंताचे विचार राज्याच्या प्रगतीला पोषक असतात. म्हणूनच ते विचारवंत साहित्यिकांचा नेहमीच सन्मान करीत होते. श्री रणजित देसाई यांना साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्याची बातमी त्यांनी दिल्लीत वाचली तेव्हा यशवंतराव गृहमंत्री होते तरीही त्यांनी रणजित देसाई यांच्या घरी जाऊन अभिनंदन केले. शिवाजी सावंत यांच्या छावा कादंबरीच्या प्रकाशकाला पोस्टकार्डवरच्या निमंत्रणावरून यशवंतराव स्वतः हजर राहिले. यशवंतराव चव्हाणांनी महाराष्ट्राच्या राजकारणात मुख्यमंत्री पदावर फक्त अडीच वर्षे काम केले त्यांच्या या अतिशय कमी कालावधीच्या कारकिर्दीतही त्यांनी जी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाची धोरणे आखली त्यातूनच आधुनिक महाराष्ट्राची उभारणी झाली. म्हणूनच आपण त्यांना आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणतो.

देशाच्या राजकारणात भारताचे संरक्षण मंत्री म्हणून त्यांनी नेत्रदीपक कामगिरी केली. भारताचे गृहमंत्री म्हणून त्यांनी गृहखात्याला एक नवीन दिशा दिली. अर्थमंत्री म्हणून भारताची आर्थिक घडी उत्तम बसवत वेगवेगळ्या राज्याला योग्य प्रकारची मदतही केली. परराष्ट्र मंत्री म्हणून त्यांनी परराष्ट्र खात्याचा एक दबदबा निर्माण केला. देशाचे उपपंतप्रधान आणि भारताच्या नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष म्हणून त्यांनी चमकदार कामगिरी केली. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ते देशाचे उपपंतप्रधान हा त्यांचा विलक्षण असा राजकीय प्रवास नव्या पिढीला कायम प्रेरणा देत आला आहे. यशवंतरावांना सत्तेच्या राजकारणाचा मोह कधीच जडला नाही. आपल्या स्वतःच्या मनगटावर त्यांचा विश्वास कधी ढळला नाही. म्हणूनच त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये अनेकांना वेगवेगळ्या पदावरती काम करण्याची संधी उपलब्ध करून दिली, नव्हे त्यांनी नवीन नेतृत्व घडवून आणले जे की आजच्या राजकारणामध्ये दुर्मिळ बाब आहे. समाजाच्या विविध क्षेत्रात आणि विविध पक्षात उत्तम काम करणारी माणसे त्यांनी हेरली आणि राजकारणात उभी केली. यशवंतरावांनी कायमपणे बेरजेचे आणि गुनीजनांचे राजकारण केले. जातीयवादाला आणि धर्म वादाला त्यांनी कधीही स्थान दिले नाही. गुणवत्तेची आणि गुणवंतांची त्यांनी कायम कदर केली. मराठवाड्यात विनायकराव पाटलांसारख्या एका सामान्य युवकाच्या पाठीशी त्यांनी शक्ती उभी केली. त्या शक्तींमधून मराठवाडा विभागामध्ये शैक्षणिक

विकासाची गंगा उभी राहिली. म्हणूनच एक स्वातंत्र्यसेनानी, धुरंदर राजकारणी, संवेदनशील मनाचा माणूस, आदर्श मुख्यमंत्री, गृहमंत्री संरक्षणमंत्री, परराष्ट्रमंत्री अशा कितीतरी भूमिका त्यांनी यशस्वीपणे वठविल्या परंतु हे सर्व करतांना आपले चारित्र्य अबाधित राखत एक आदर्श राजकारणी म्हणून त्यांचं सर्व भारतभर झालं राज्यातले प्रमुख पद आणि केंद्रातील अनेक प्रमुख पदे तीस ते बत्तीस वर्ष त्यांच्या आधिपत्याखाली असूनही त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या खात्यावर फक्त ३७ हजार रुपयांची रक्कम शिल्लक असावी हे आजच्या काळात आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाही. म्हणूनच यशवंतरावांचे नेतृत्व, सर्वस्पर्शी व दूरदृष्टी असलेले एक अष्टपैलू नेतृत्व होते.

**संदर्भग्रंथ:**

१. डॉ.नागनाथ हेगे, (२००२)जनमनातील यशवंतराव

२.गोविंद तळवळकर, (२०१२) यशवंतराव चव्हाण व्यक्तित्व व कर्तुत्व

३.यशवंतराव चव्हाण,(१९९२) सह्याद्रीचे वारे

४.डॉ.उल्हास उढाण,(२०१७) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचा अशय

५.संपा.प्रमोद नलावडे, (२०१२) लोकराज्य (यशवंत कीर्तीवंत)

६. यशवंतराव चव्हाण, (२०१३) भूमिका

७.यशवंतराव चव्हाण, (२०१३) कृष्णाकाठ

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –7.675,Issue NO, 289 (CCLXXXIX )
ISSN : 2278-9308
March, 2021

# समृद्ध महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण

**डॉ. गोरखनाथ पांडुरंगराव फसले**
इतिहास विभाग प्रमुख , श्री. सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव.

**प्रस्तावना**

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी राज्याच्या सर्वांगिण विकासाला गती आणि दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले म्हणूनच त्यांना आपण सर्वजण महाराष्ट्राचे शिल्पकार असे म्हणतो. शेती, सहकार, उद्योग, वीजनिर्मिती आणि शिक्षण आदी क्षेत्रांचा विकास त्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने घडवून आणला. यशवंतराव चव्हाण यांचे नेतृत्व सुसंस्कृत आणि दूरदृष्टीचे होते. त्यांच्या कृतीशिल विचारातून आजचा महाराष्ट्र घडल्याचे आपणास दिसून येते. आधुनिक महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडणघडणीत थोर नेते यशवंतराव चव्हाण यांचा सिंहाचा वाटा आहे. यशवंतरावांचे जीवन म्हणजे साक्षात एक इतिहास आहे. तो सत्यशोधक समाजाचा, स्वातंत्र्य चळवळीचा, संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाचा आणि नव महाराष्ट्राच्या जडणघडणीचा एक इतिहास आहे. यशवंतरावांचे राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक कार्य अफाट होते. त्यांचे जीवन हेच एखाद्या महासागरासारखे होते. त्याचा तळ कुणालाही शोधणे सहजी सहजी शक्यच नाही.सबंध देशात एक प्रगतिशिल आणि चांगलं राज्य म्हणून महाराष्ट्राला जो नावलौकिक प्राप्त झाला त्यामध्ये यशवंतराव चव्हाणंचा सिंहाचा वाटा आहे.

एखाद्या मोठ्या व्यक्तीबद्दल बोलताना त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व अष्टपैलू आहे किंवा होते असे म्हणण्याची रीत आहे. मात्र महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्याबाबतीत मात्र ही औपचारिकता केवळ औपचारिकता राहात नाही. जसे एका हि-याला हिरकणी करताना किती पैलू दिले हे सहजी मोजता येत नाही, त्याप्रमाणे यशवंतरावांचे व्यक्तिमत्त्व होते. थोर देशभक्त, रसिक साहित्यिक, धुरंधर मुत्सद्दी राजकारणी, विचारवंत, गुणग्राहक, सौजन्ययुक्त, जनतेच्या प्रेमाने गुरफटलेला निष्ठावंत नेता, एक जाणकार समाजवादी, लोकशाहीवर नितांत श्रद्धा ठेवणारा, चारित्र्य संपन्न सुसंस्कृत नागरिक, ओजस्वी वक्ता, समृद्ध महाराष्ट्राचा शिल्पकार आदी पैलूंनी बद्ध असे व्यक्तिमत्त्व अभ्यासताना त्यांचे शैक्षणिक विचार आजच्या युगातही युगप्रवर्तक असल्याचे जाणवतात. टिळक हायस्कूलमध्ये शिक्षण घेताना झालेल्या संस्कारामुळे यशवंतरावांच्या मनात टिळकांप्रमाणेच प्रखर ध्येयवाद, देशप्रेम, स्वार्थत्याग व जिद्द या भावना पेरल्या गेल्या होत्या. त्यांच्या सर्व विचारांचा केंद्रबिंदू ग्रामीण भागात राहणारा माणूस हाच होता. त्यांनी राबविलेल्या शेती, उद्योगधंदे, शिक्षण व मनुष्यबळ या चारसूत्री कार्यक्रमांतूनही हेच स्पष्ट होते.

पहिले मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांनी १ मे १९६० पासून १९ नोव्हेंबर १९६२ पर्यंत धुरा सांभाळली. यशवंतराव चव्हाण यांचे 'आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार' असेही वर्णन केले जाते. नावातच "यश" आणि "यशवंत" असल्यामुळे त्यांना प्रारब्ध भाग्य आणि नशीब दोन्ही गोष्टी प्राप्त झाल्या होत्या. महाराष्ट्रातील राजकारणाला सुयोग्य दिशा देण्याचे आणि समतोल व जातिभेदरहीत राजकारणाचा

ISSN : 2278-9308
March, 2021

वारसा देण्याचे कार्य केले. ज्ञानोपासक व अभिरुचीसंपन्न व्यक्तिमत्त्व, सुसंस्कृत व वैचारिक अधिष्ठान असलेले नेतृत्व आणि मुत्सद्दी व विरोधकांचाही मान राखणारे संयमी राजकारणी असेही त्यांना म्हणता येईल. गरीब कुटुंबातील असल्यामुळे त्यांना समाजातील तळागाळाच्या घटकांच्या समस्या ज्ञात होत्या, त्या दृष्टीने देखील त्यांनी योजना आखल्या. राज्यात सहकार चळवळीपासून अनेक साखर कारखान्यांच्या स्थापनेसह कृषि, सांस्कृतिक, आर्थिक आणि शैक्षणिक क्षेत्रातदेखील त्यांचे योगदान आहे. यशवंतरावांनी मुख्यमंत्री पदानंतर उपपतंप्रधान, संरक्षणमंत्री, परराष्ट्र मंत्री अशी महत्वाची पदे देखील सांभाळली. यशवंतराव यांची दुसरी ओळख म्हणजे त्यांचा साहित्यातही नावलौकिक असून ऋणानुबंध आणि कृष्णाकाठ या लिखित पुस्तकांमध्ये त्यांच्यातला चांगला लेखक दिसतो. याचबरोबर त्यांची पत्रं, त्यांना आलेली महनीयांची पत्रं देखील अजूनही जतन केलेली असून या पत्रांमुळे त्यांचा जनसंपर्क दिसून येतो. कराड येथे त्यांच्या निवासस्थानीच त्यांच्या विविध वस्तूंचे जतन करण्यात आले आहे. यशवंतरावांना चीन युद्धाच्या वेळी संरक्षणमंत्री पदावर नियुक्त करण्यात येऊन यावेळी त्यांनी त्यांचे कर्तृत्वाचे आणि निर्णयक्षमतेचा आदर्श जगासमोर उभा केला.

**शैक्षणिक धोरणासाठी यशवंतरावांचा आदर्श :**

आजच्या जागतिकीकरणाच्या काळात महागडे होत जाणारे शिक्षण. शिक्षणातून आपली जबाबदारी झटकणारे शासनाचे धोरण आणि वंचितांच्या शिक्षणाचा निर्माण झालेला प्रश्न भविष्यात गंभीर स्वरूप धारण करेल. या पार्श्वभूमीवर, यशवंतरावांच्या शैक्षणिक भूमिकेची राज्याला आणि देशाला नितांत गरज आहे असे मला वाटते. शिक्षणाच्या अनुषंगाने अनेकांनी वेगवेगळ्या व्याख्या केल्या आहेत, आपले विचार मांडले आहेत. या पार्श्वभूमीवर शिक्षणाच्या व्याख्येपासूनच आपण यशवंतराव चव्हाण यांचा शैक्षणिक दृष्टिकोन, भूमिका आणि धोरण समजावून घेण्याचा या ठिकाणी अल्पसा प्रयत्न करू या. शिक्षणाची व्याख्या करताना यशवंतराव म्हणतात, 'शिक्षित व्यक्तीला स्वतःच्या भोवती घडणाऱ्या गोष्टी आणि जागामध्ये घडणाऱ्या इतर गोष्टी यांची ज्यामुळे काही संगती लावता येते, त्यांचा योग्य अर्थ समजावून घेता येतो. त्यांचा परिणाम आपल्या जीवनावर काय घडतो, आपल्या व्यक्तिमत्त्वावर काय घडतो हे समजावून घेता येते आणि समजावून देता येते त्याला मी शिक्षण मानत आलो आहे.' (सह्याद्रीचे वारे, पान १४०) शिक्षणाची अत्यंत साधी-सरळ आणि सोपी व्याख्या करणारे यशवंतराव चव्हाण यांनी राज्याचे शैक्षणिक धोरण निश्चित करताना देशातील शिक्षणाचा इतिहास आणि परंपरा लक्षात घेतल्या होत्या, हे त्यांच्या शैक्षणिक विषयांवरील प्रतिपादनावरून लक्षात येते.

शिक्षणाचे माध्यम कोणते असावे आणि का? याबाबतही त्यांनी आपली भूमिका मांडताना स्पष्ट केले आहे की, 'आमच्या येथील बहुसंख्य समाज हजारों वर्षांपासून शिक्षणापासून दूर आहे. लोकशाहीचा खरा अर्थ त्यांना समजावून सांगावयाचा असेल आणि लोकशाही मजबूत करावयाची असेल, तर शिक्षण हे त्यांच्या मातृभाषेतूनच दिले पाहिजे. त्यातूनच आमची जनता शहाणी होईल आणि खऱ्या अर्थाने ती लोकशाहीचे रक्षण करेल. कारण परकीय भाषेत शिक्षण घेण्याने माणसाची बौद्धिक वाढ खुंटते आणि मौलिकता हिरावते. व्यक्ती स्वदेशापासून दूर जातो आणि म्हणूनच शिक्षणाकरिता प्रांतिक भाषांना प्राधान्य द्यावे, याकरिता ते आग्रही होते. ज्ञानभाषा एक आणि लोकभाषा दुसरी अशी हिंदुस्थानच्या

जीवनाची परंपरागत कहाणी आहे. ऋषीमुनींची आणि पंडितांची ज्ञानभाषा होती संस्कृत. कारण ती देवभाषा होती आणि जनसामान्यांची भाषा होती प्राकृत, हे फार पूर्वी पण नंतर ही तेच झाले. इंग्रज आले आणि या देशातील ज्ञानभाषा इंग्रजी बनली' (युगांतर पान १७३)

स्वातंत्र्यपूर्व काळात महात्मा जोतीराव फुले यांनी शिक्षणाबाबत अतिशय गांभीर्याने मत व्यक्त करताना म्हटले होते, 'तुम्हाला जर झाड मोठे आणि मजबूत करावयाचे असेल तर त्याच्या बुंध्याला पाणी घातले पाहिजे.' १९८३ च्या कालावधीमध्ये आजच्या प्रगत अमेरिका राष्ट्राने सार्वजनिक शाळांतील गुणवत्तेतील उत्कृष्टतेचा शोध घेण्यासाठी आयोग नेमला होता. प्रारंभिक चौकशीमध्येच शालेय शिक्षणाची गुणवत्ता अतिशय निकृष्ट असल्याचे लक्षात येताच आयोगाचे नाव 'राष्ट्र धोक्यात '(Nation at Risk) असे करावे, अशी विनंती नियुक्त आयोगाच्या अध्यक्षांनी अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांना केली होती आणि त्या आयोगाचा अहवाल Nation at Risk या नावानेच प्रसिद्ध आहे. यावरून प्राथमिक शिक्षणाचे महत्त्व किती आहे हे अधोरेखित होते. शिक्षणाचे माध्यम, प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण व उच्च शिक्षण यातील परस्पर संबंध एवढाच विचार करून यशवंतरावजी थांबत नाहीत, आपणास आपल्या राज्याचा सर्वांगिण विकास खऱ्या अर्थाने साधवयाचे असेल तर विज्ञान आणि तंत्रज्ञानाची कास धरल्याशिवाय राज्याचा औद्योकि विकास घडू शकणार नाही, त्याच बरोबर भारत हा कृषीप्रधान देश असल्यामुळे शेतीच्या विकासावर त्याचे भवितव्य अवलंबून आहे, आणि म्हणून अंधश्रद्धेला मूठमाती देत विज्ञानाची आणि तंत्रज्ञानाची आपण कास धरली पाहिजे, त्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने पावले टाकली पाहिजे, हा विचार घेऊनच ते सतत आग्रही राहिले.

शिक्षण हे सामाजिक, राजकीय आणि आर्थिक विकासाचे महत्त्वाचे साधन आहे. ते सर्वांना मिळाले पाहिजे, म्हणून आरक्षणाच्या परिघाबाहेर असणाऱ्या आर्थिकदृष्ट्या मागास घटकांतील विद्यार्थांना शिक्षणापासून वंचित राहावे लागत आहे, हे त्यांच्या १९६० च्या दरम्यान लक्षात आले आणि देशात प्रथमच महाराष्ट्रात त्यांनी आपलं मुख्यमंत्रीपद पणाला लावून प्रचंड विरोधाला सामोरे जात आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थांना विनाशुल्क शिक्षण देणारी **'ईबीसी'**ची योजना आणली. हा खऱ्या अर्थाने क्रांतीकारक निर्णय होता. परिणामी महाराष्ट्रातील अनेक पिढ्या या सवलतीचा लाभ घेत शिकल्या आणि समृद्ध झाल्या. याचे संपूर्ण श्रेय यशवंतरावांच्या दूरदृष्टी निर्णयाला जाते. याबरोबरच मराठवाड्यात पुरेशी महाविद्यालये नसतानाही त्यांनी औरंगाबाद येथे आताचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठ स्थापन करण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय घेऊन या परिसरातील लक्षावधी विद्यार्थ्यांना आपल्याच परिसरात उच्च शिक्षण घेण्याचा मार्ग खुला करून दिला. एकीकडे शिक्षणाचा आग्रह दुसरीकडे शिक्षणाचा मार्ग आणि तिसरीकडे त्यातून निर्माण होणाऱ्या समस्यांची चिंता वाहणारा सखोल ज्ञानी शिक्षणतज्ज्ञ यशवंतरावजी म्हणतात. आज ज्या तऱ्हेचे शिक्षण आपल्या अवतीभोवती दिले जाते त्याचा ग्रामीण जीवनावर काय परिणम होतो? 'खेडूत बाप आणि आई यांनी कष्ट करून शिक्षणासाठी बाहेर पाठविलेला मुलगा पदवी घेऊन जेव्हा शहाणा होतो, तेव्हा ते त्याचे शहाणपण खेड्यामध्ये राहून शेती करणाऱ्या किंवा दुसरा काही उद्योग करणाऱ्या त्याच्या मातापित्याचे आर्थिक जीवन सुधारण्यास उपयोगी पडत नाही.' (सह्याद्रीचे वारे पान १४१) तो शहरात एखादी सोयीची, सुखाची नोकरी मिळवून आपले

आई-बाप आणि त्याच्या मातृभूमीला मुकतो. हे फार मोठे करुण चित्र आहे. शिक्षणाच्या वाढीबरोबर अशा तऱ्हेचे प्रश्न जर घरोघरी निर्माण होणार असतील, तर आपणास या शिक्षणासंबंधाने विचार करावा लागेल.

**शिक्षणक्षेत्रातले अमूलाग्र निर्णय:**

नव्या राज्याचे मुख्यमंत्री म्हणून शिक्षणक्षेत्रात यशवंतराव चव्हाण यांनी घेतलेले काही निर्णयही दूरगामी परिणाम करणारे ठरले. ते कसे, याचा अंदाज या निर्णयांकडे बघितल्यावरच आपल्याला येईल. सगळयात महत्वाचा म्हणजे नवी विद्यापीठं स्थापन करायचा निर्णय. तेव्हा मुंबई-पुण्यासारखी मोजकी विद्यापीठं महाराष्ट्रात होती. शिक्षण सर्वदूर न्यायचं असेल, नवी पिढी घडवायची असेल तर नवी विद्यापीठं हवीत. पण तेव्हा विद्यापीठ एखाद्या भागाला मिळण्यासाठी अनेक अटी होत्या. मुख्य म्हणजे त्या भागात काही संख्येनं महाविद्यालयं असणं आवश्यक होतं. पण मराठवाड्यासारख्या भागात तेव्हा मोजण्याइतपतच महाविद्यालयं होती आणि परिणामी विद्यापीठ नव्हते. पण यशवंतरावांनी तो निर्णय बदलला आणि मराठवाड्यात औरंगाबादमध्ये विद्यापीठ स्थापन केलं. ते आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ म्हणून ओळखलं जातं. असंच विद्यापीठ त्यांनी कोल्हापूरातही छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावानं स्थापन केलं. या दोन्ही विद्यापीठांमुळं या विभागांमध्ये शिक्षणक्षेत्रात कसे बदल झाले हे आज डोळयांना स्पष्ट दिसतं. आजही महाराष्ट्रात आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्यांना शैक्षणिक शुल्कात सवलत मिळते.'EBC ' साठी ही सवलत यशवंतरावांनी सुरु केली. तेव्हा 1200 रुपये आर्थिक उत्पन्न वा त्यापेक्षा कमी असलेल्या पालकांच्या पाल्यांना शैक्षणिक शुल्क माफ करण्यात आलं होतं. कालानुरुप ही रक्कम बदलत गेली. पण त्यामुळे अनेकजण मुख्य शैक्षणिक प्रवाहात आले. आपल्या 'यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक विचार व कार्य' या लेखात डॉ. ज. रा. दाभोळे लिहितात, "यशवंतराव चव्हाण यांनी शिक्षणाच्या क्षेत्रात दूरगामी पावलं टाकली. याचे एक उदाहरण म्हणजे सातारा इथे सैनिक स्कूलची केलेली स्थापना हे होय. सातारा जिल्ह्यातील काही गावांमधून सैन्यात भरती होण्याचे प्रमाण आजही मोठे असल्याचे दिसून येईल. त्याऐवजी सैनिक स्कूलमध्येच प्राथमिक स्वरुपाचे शिक्षण उपलब्ध झाल्यास सैन्यामध्ये अधिकारी पदावर पोहोचणे शक्य होईल. म्हणून सातारा येथील सैनिक स्कूलमध्ये नैशनल डिफेन्स अकदमीसाठी शिक्षण मिळण्याची सोय त्यांनी उपलब्ध करुन दिली." त्यांच्या अजून एक महत्वाचा निर्णय मानला जातो तो म्हणजे कायद्यानं नवबौद्धांना सवलती मिळवून देणं. डॉ आंबेडकरांसोबत धर्मांतर केलेल्या अनेकांना पूर्वी मिळत असलेल्या सवलती सरकारनं बंद केल्या होत्या. पण त्यानं शैक्षणिक वा सामाजिक मागासलेपण कमी होणार नव्हतं. म्हणून यशवंतरावांनी निर्णय घेऊन नवबौद्धांनाही सवलती मिळतील हे पाहिलं.

**साहित्य, संस्कृती आणि भाषावृद्धी :**

यशवंतरावांचे साहित्य आणि सांस्कृतिक वर्तुळाशी असलेले घनिष्ठ संबंध सवश्रुत आहेत. ते स्वत: राजकारणाच्या व्यस्ततेतून लेखन करत. त्यामुळे याच तळमळीतून त्यांनी घेतलेले काही निर्णय महत्वाची नोंद ठरावेत. त्यांनी 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळा'ची स्थापना केली. या मंडळानं केलेली प्रकाशनं, राबवलेले उपक्रम बहुविध आहेत. सर्वात महत्वाचं म्हणजे त्यांनी 'मराठी विश्वकोष मंडळा'ची निर्मिती केली आणि त्याचे मुख्य तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी होते. मराठी विश्वकोषाचं खूप मोठं काम इथं

झालं. यशवंतरावांनी भाषा संचालनालयाचीही स्थापना केली. नाट्य चित्रपट कलाकारांसाठी योजना सुरु केल्या.

राहुरी कृषी विद्यापीठासारख्या तंत्रशुद्ध शेतीविषयक प्रशिक्षण देणा-या शिक्षणसंस्था उभ्या राहिल्या. ग्रामीण भागातील प्रत्येक विद्यार्थ्यांला उच्चशिक्षणाचा अधिकार आहे आणि असे शिक्षण त्याला त्याच्या गावात, तालुक्याच्या ठिकाणी मिळाले पाहिजे, या जाणिवेतून यशवंतरावांनी आग्रहाने शिवाजी विद्यापीठ आणि मराठवाडा विद्यापीठाची स्थापना आपल्या कार्यकाळात केली. शेतक-यांच्या आणि विशेषत: ग्रामीण भागातल्या विद्यार्थ्यांना सैन्यात येण्याचा मार्ग दाखवतानाच त्यांनी भारतातले पहिले सैनिक स्कूल साता-यात सुरू केले. आज या सैनिक स्कूलमधून बाहेर पडलेल्या अनेक कर्तबगार विद्यार्थ्यांनी आपल्या तिन्ही सरंक्षण दलांचे प्रभावी नेतृत्व केले आहे. यशवंतराव चव्हाण असे म्हणत की, आजपर्यंत आम्ही घेतलेल्या शिक्षणाने आमच्यात नोकरपेशाची मनोवृत्ती निर्माण झाली आहे. आमची बुद्धी व आमचा पिंडच नोकरीपेशाचा आहे, असे आमच्यावर रुजविण्यात आले, पण मला ही गोष्ट मंजूर नाही. भारतात असणा-या त्रिस्तरीय शिक्षण पद्धतीचा सांगोपांग विचार यशवंतरावांनी केला होता. शासनाने सक्तीचे शिक्षण द्यावे, याकरिता त्यांनी आग्रही भूमिका मांडली होती. ई. बी. सी सवलत, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शुल्क माफी, शिष्यवृत्ती, ग्रामीण भागात शाळा, कॉलेज काढण्याकरिता प्रोत्साहन अशा अनेकविध कार्यक्रमांतून त्यांनी आपला सर्वदूर शिक्षण प्रसाराचा कार्यक्रम प्रत्यक्षात राबविला. त्यांच्या मते राज्याची औद्योगिक प्रगती जितकी महत्त्वाची, तितकीच शैक्षणिक प्रगतीही महत्त्वाची आहे. शिक्षण हे केवळ सामाजिक गरजेकरिता नाही, तर ते आर्थिक विकासाचे आणि पर्यायाने देशविकासाचे साधन आहे, यावर त्यांचा विश्वास होता. त्याकरिताच उच्च शिक्षण हे कोणाची मक्तेदारी न राहता ते सर्वाकरिताच खुले झाले पाहिजे, याकरिता त्यांनी कृतीशीलपणे प्रयत्न केले.

शिक्षण ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. त्यातूनच व्यक्ती विकास, समाज विकास व पर्यायाने समाजीकरण प्रक्रिया सुलभ होते, ज्ञानाची गंगा समाजाच्या खोलापर्यंत पोहोचली तरच ख-या अर्थाने कल्याणकारक ठरेल, असा त्यांचा विश्वास होता. आजच्या अस्वस्थ वातावरणात महाराष्ट्राच्या या द्रष्ट्या नेत्याचे विचार म्हणूनच तर अर्थपूर्ण अनुकरणीय वाटते. एखाद्या नेत्याचं मोठेपण हे त्यानं घेतलेल्या निर्णयांसोबत त्या निर्णयचं काळाच्या कसोटीवर लकाकून उठणं यावरही ठरतं. जर ते निर्णय कालौघात फिके पडत जाणार असतील तर नेतृत्वही विस्मृतीत जातं. यशवंतरावां उल्लेखाशिवाय न होणारं महाराष्ट्राचे आजचे राजकीय-आर्थिक-सामाजिक-सांस्कृतिक व्यवहार, त्यांच्या निर्णयांचं मोठेपण दर्शवितात. समृद्ध महाराष्ट्राचे द्रष्टे शिल्पकार म्हणून यशवंतराव चव्हाण यांचे व्यक्तिमत्त्व अभ्यासताना त्यांचे शिक्षणविषयक विचार आजच्या स्पर्धात्मक युगातही किती परिणामकारक ठरतात आणि त्यांच्या विचारांची आजही किती गरज आहे, हे लक्षात येते. महात्मा जोतिबा फुले आणि थोरले बंधू गणपतराव यांच्या सामाजिक व आर्थिक विषमता दूर करण्याच्या कार्यामुळे त्यांना एक नवी दृष्टी प्राप्त झाली होती. देवराष्ट्रे गावात राहून त्यांनी विषमतेबरोबरच शेतक-यांची दु:खे जाणली होती. त्यातूनच शिक्षणाची गरज आणि महत्त्वही लक्षात घेतले होते. शेतक-याची पुढची पिढी ही शिकती पिढीच असली पाहिजे आणि

शिक्षण हे तळागाळातल्या प्रत्येकाला मिळाले पाहिजे, याकरिता ते आग्रही होते. त्यांच्या दूरदृष्टिकोनातूनच सैनिक स्कूल, शिवाजी विद्यापीठ आणि मराठवाडा विद्यापीठाची निर्मिती झालेली आहे.

आज कोणत्याही क्षेत्रात, राष्ट्रीय महत्त्वाच्या घडामोडींत महाराष्ट्राचे वेगळेपण देशात उठून दिसते. हे वेगळेपण विकसित होण्यामध्ये आणि हिमालयाच्या मदतीला सह्याद्री धावून जाण्याचे चित्र निर्माण होण्यामध्ये यशवंतराव चव्हाण यांचे अमूल्य योगदान आहे हे निश्चित!

**विद्यापीठाच्या नावाबाबत मतभेद :**

डॉ. बाळकृष्ण यांच्या इच्छेनुसार छत्रपती शिवरायांचे नाव विद्यापीठाला द्यायचे याबाबत कोणाचेही हरकत नव्हती, विद्यापीठाच्या कायद्यासंबधीही मतभेद नव्हते. पण नाव कोणत्या पद्धतीने द्यायचे याबाबत चिकित्सा समिती मध्ये मतभेद होते,समिती मधील काही सदस्यांनी विद्यापीठाचे नाव 'श्री छत्रपती शिवाजी विद्यापीठ' ठेवावे असे वाटत होते,या आग्रहमध्ये कोल्हापूरचे पाहिले आमदार बलवंतराव बराले हे पण होते, त्यांनी सतत दोन तीन दिवस हा आग्रह धरून ठेवला त्यांच्या या भूमिकेला समर्पक असे कोणी उत्तर दिले नव्हते, शेवटी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी त्यांना चेंबर मध्ये बोलावले आणि सांगितले की " तुम्ही असा आग्रह धरू नका कारण बडोद्याचे महाराजा सयाजीराव युनिव्हर्सिटीचा उल्लेख लोकांच्या तोंडी नेहमी एम एस युनिव्हर्सिटी असाच असतो. तसेच आपल्या श्रीमती नाथीबाई दामोदर ठकरासी विद्यापीठाचा उल्लेख ही लोक नेहमीच एस एन डी टी विद्यापीठ असाच करतात 'तसे आपल्या विद्यापीठाचे होऊ नये.' **शिवाजी विद्यापीठ** ' या नावानेच सतत उल्लेख झाला तर शिवाजी हे नाव लोकांच्या सतत डोळयासमोर राहील. शिवाय एवढ्याच नावामुळे आपण दुसऱ्या कोणाच्या नावाने हे विद्यापीठ सुरू करत असे मानण्याचे कारण नाही. या नावामध्ये सुद्धा श्री छत्रपती शिवाजी विद्यापीठ असे सूचित होते "

**खंबीरनेतृत्व:**

संयुक्त महाराष्ट्राचा उदय झाल्यावर नव्या महाराष्ट्राची जडणघडण त्यांनी केली हे त्यांचे महान कार्य आहे. कृषी-औद्योगिक समाजरचना, सहकारातून समाजप्रगती, विविध औद्योगिक वसाहती, सहकारी बॅंका, पतसंस्था, पूरक संस्था यांची उभारणी कोयनानगर सारखी मोठी धरणे व छोटी गाव-शेततळी योजना, जलसंधारण कामे, विभागीय विद्यापीठांची उभारणी लेखकांना उत्तेजन आणि पुरस्कार योजना, साहित्य संस्कृती मंडळ निर्मिती, विश्वकोष निर्मिती मंडळ, अशी चौफेर दृष्टी ठेवून केलेली रचनात्मक कामे हे स्व. यशवंतरावजींचे कार्य कर्तृत्व आहे. निर्मितीक्षम प्रतिभा आहे. सामान्य लोकांचा समाजकारणात, राजकारणात सहभाग असावा म्हणून पंचायतराज, जिल्हा परिषद निर्मिती, स्थानिक नेतृत्वाला संधी व कार्यकर्तृत्वाचे डोंगर उभा करण्याचे आव्हान हे सारे यशवंतरावांनी आपल्या कार्यकाळात करून घडवून दाखविले. ही त्यांची महाराष्ट्राला मोठी देणगी आहे. त्यामुळे जिल्ह्या-जिल्ह्यातून कर्तबगार नेतृत्वाचा उदय झाला आणि पुढे तेच महाराष्ट्राचे राज्यकर्ते बनण्याची एक अखंड साखळी तयार झाली, होत आहे. याचे सारे श्रेय स्व. चव्हाणसाहेबांनाच आहे. जीवनाच्या विविध क्षेत्रातील कर्तबगार माणसे हाताशी धरून त्यांनी महाराष्ट्राची जडण-घडण केली. देशात महाराष्ट्र विकासाच्याबाबतीत सर्वप्रथम राहील याची दक्षता त्यांनी

घेतली. म्हणूनच आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण हे आहेत. त्यांनी दाखवून दिलेल्या मार्गाने आज महाराष्ट्र विकासाची घोडदौड करीत आहे हे त्यांचे द्रष्टेपण आहे.

**संदर्भग्रंथ:**

१) चव्हाण यशवंतराव(२००६),युगांतर, कॉन्तिनेन्तल प्रकाशन,पुणे.
२) चव्हाण यशवंतराव(१९९२),सह्याद्रीचे वारे, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,मुंबई.
३)भोळे भा. ल.(१९८५), यशवंतराव चव्हाण राजकारण आणि साहित्य,साकेत प्रकाशन,औरंगाबाद.
४) नाईकवाडे आशोक (संपा.) (२००९), आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण, औरंगाबाद.
५) पाटील बाबासाहेब (२०१२),कृष्णापुत्र,रिया पब्लिकेशन,कोल्हापूर.
६) लोकराज्य मासिक ,मार्च २०१२.

# सामर्थ्य शाली भारत-नेतृत्व यशवंतरावजी चव्हाण

**डॉ.भांगे चंद्रकांत बन्सीधर**
**प्राध्यापक**
**शोधनिर्देशक मार्गदर्शक व विभाग प्रमुख श्री.शिवाजी कॉलेज,परभणी**
Emil-bhangecb@gmail.comMo.9421082775

**प्रास्तावना :-**

आज 21 वी सदी में भारत राष्ट्र विश्वस्तर पर प्रभावी राष्ट्र अर्थात सामर्थ्यशाली राष्ट्र की ओर मार्गक्रमण कर रहा है, स्वातंत्रता प्राप्ती के उपरांत की आज भारत राष्ट्र की आयु 74 वर्ष की हुई है, इस कालखंड में (1947-2021) भारत राष्ट्र ने कई उतार चढाव राष्ट्रीय और आंतरराष्ट्रीय क्षेत्र में देखे है इनका मुकाबला किया है इसमें कई सामान्यजन से नेतृत्व का योगदान सरहानीय रहा है, इन्हेमें एक नाम आज भी महाराष्ट्र एवं राष्ट्र के नेतृत्व में आदरणीय स्फुर्तीदायी नाम, नेतृत्व का रहा है, वे नेतृत्व यशवंतरावजी चव्हाण का है।

**यशवंतराव चव्हाण :-**

यशवंतराव चव्हाण का जन्म 12 मार्च 1913 को हुआ उनके पिताजी का नाम बळवंतराव और माता का विठाई था, उनका ग्राम देवराष्टे जि. सांगली है, बचपण में ही 1917 को उनके पिताजी बळवंतराव का निधन हुआ इससे उनका परिवार बुरी तरह से प्रभावित हुआ ऐसी कठीण स्थिती में उनकी माताजी विठाबाई ने गरिबी की स्थिती होती हुए बडी हिम्मत एवं धैर्य से उन्होने पूत्र यशवंतराव का पालनपोषण किया साथही उन्हे सुसंस्कृत बनाया जो की समाज, राष्ट्र समर्पित यशवंतराव चव्हाण बने।

माता विठाईद्वारा जो यशवंतराव चव्हाण को संस्कार एवं मार्गदर्शन था वो समाजहीत , राज्य-राष्ट्रहित केंद्रीत था इसका परिणाम यशवंतराव चव्हाण बचपण से ही राष्ट्र कल्याण, राष्ट्रहीत कार्य मंे सहभागीता करने लगेए इसमे एक-यशवंतरावजी की माध्यमिक शिक्षा पुरी होने के पूर्व ही उनपर राष्ट्र स्वातंत्र ध्येयवाद का प्रभाव हुआ इसका प्रमाण 1930 के राष्ट्रीय आंदोलन में यशवंतरावजी ने हिस्सा लिया। उन्हे 18 महिनें सक्तमजुरी की कैद हुई, पुणे येरवडा जेल में बंद रहे, इस समय उन्हे हजारों सत्याग्रहों का सहवास प्राप्त हुआ विभिन्न क्षेत्र, विचारवंत से वे जुडे, विभिन्न विचारधारा के लेखक, वक्ता, पत्रकार, शिक्षक, संस्थापक आदी इसका परिणाम यशवंतराव चव्हाण जी का भारत भारतराष्ट्र कार्य में समर्पण व्यापक बना इसका परिणाम, वे स्वातंत्र एवं सामर्थ्यशाली भारत के समर्पक बने। इस समर्थक से उन्होंने भारत राष्ट का विकास, रक्षा, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय स्तर प्रतिष्ठा को जीवन का, महत्वपूर्ण कार्य माना है वे निम्न मुद्दे द्वारा :-

**अ) राष्ट्रीय मुद्दे :-**

1. **लोकतंत्र एवं धर्मरिपेक्षता भारत:-** भारत राष्ट्र की भौगोलिक स्थिती, संस्कृती, इतिहास, लोकसमूह विविधता, महत्वपूर्ण जन संख्या आदी भारत राष्ट्र के अंगो का अवलोकन एवं भारतीय स्वतंत्रता आंदोलन की सहभागीतता, राष्ट्रीय नेतृत्व की नजदीकीयाँ, विविध, क्षेत्रों में संपर्क एवं योगदान से यशवंतरावजी चव्हाण ने भारतीय लोकतंत्र एवं धर्मनिरपेक्षता का समर्थन किया है साथ ही उसे सामर्थ्याशाली के लिऐ प्रयास जारी रखे

2. **महाराष्ट्र राज्य राष्ट्र के लिए :-** 1 मे 1660 को महाराष्ट्र राज्य का निर्माण हुआ, कवीवर्य गोविंदाग्रज के महाराष्ट्र गीत में महाराष्ट्र का वर्णन-

राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा ।
नाजुक देशा, कोमल देशा, फुलांच्याही देशा।
अंजनकांचन करवंदीच्या काटेरी देशा।
बकुल फूलांच्या प्राजक्तीच्या दळदारी देशा।
भाव भक्ती देशा, आणिक बध्दीच्या देशा।
शाहीरांच्या देशा, कर्त्या मर्दाच्या देशा।

इस मराठी कविता में महाराष्ट्र के गुणवैशिष्टये, स्पष्ट किये गये है, सबसे महत्वपूर्ण महाराष्ट्र राष्ट्र कार्य करने वालो का राज्य है, वे कार्य राष्ट्रहीत के हित है, हम देखते है की, भाषावाद , प्रांतवाद द्वारा आज भी दक्षिणी राज्यों के नेतृत्वने, उनमे विशेषकर यशवंतराव चव्हाण जी का नाम , कार्य महत्वपूर्ण है जो की महाराष्ट्र राज्य की राजनीती हा या कार्य वे भारत राष्ट्र समर्पित रहा है। इसलिए लंबे समय से आज भी राष्ट्रीय पार्टीयों मे महाराष्ट्र का योगदान रहा है। इस संदर्भ में यशवंतरावजी का विधान , **महाराष्ट्र भारत के लिए है** इस परिणाम भारत को सामर्थ्यशाली बनाने के कार्य में महाराष्ट्र का योगदान महत्वपूर्ण विविध क्षेत्रों में है, रहेगा।

3. **विदेश आक्रमण एवं राष्ट्रीय शौर्य का कथन :-** भारतीय सीमा एवं संरक्षण पर अपने विचार रखते हुए, दि. 29 दिसंबर 1965 को मद्रास मे संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण जी कहते है की, राष्ट्रीय संरक्षण के लिए, भारत के एक हजार वर्ष इतिहास का अवलोकन करना होगा,प्राचीन कालखंड में वायव्य सरहद्द द्वारा आक्रमण हुये, इसके बाद यह आक्रमण होते रहे, भारत पर विदेशियों ने कब्जा कर दिया इस आक्रमण में भारतीय नेतृत्व कई बार पराभूत हुये किंन्तु भारतीयों द्वारा शौर्य कार्य हुआ, आज की स्थिती में भविष्य के लिऐ विदेशी आक्रमणो का इतिहास अवलोकन संरक्षणमंत्री यशवंतरावजी चव्हाण की विधान सही है, आज भी भारतीय संरक्षण, सीमा व्यवस्था के लिए, विदेशी आक्रमणों का अवलोकन होना चाहीए, वे एक भविष्य के खतरे की जाननेवाले संरक्षणमंत्री, नेतृत्व थे।

4. **शौर्य, वीर भक्ती नेतृत्व :-** यशवंतरावजी चव्हाण का एक महत्वपूर्ण गुण रहा है की, वे शौर्य , वीरभक्ती वाला नेतृत्व थे, भारत राष्ट्र को सामर्थ्यशाली बतानेवाले नेतृत्व के वे भक्त थे, विशेष संदर्भ, महाराष्ट्र के दैवत छत्रपती शिवाजी महाराज, उनका स्मारक प्रतापगड पर निर्माण करने के कार्य सामाजिक तत्वोंने विरोध किया, इसपर यशवंतरावजी चव्हान ने कडी आपत्ती जताकर मुंबई के भाषण मे कहा की, छत्रपती शिवाजी महाराज भारत के मानबिंदू है, 40 करोड भारतीयों की भावना से कोई खिलवाड न करे क्योंकि शिवाजी महाराज इतिहास की हमे देन है, विश्व के इतिहासकार कहते है की, शिवाजी जैसा महापुरूष हमारे देश मे होता तो हम विश्व पर अभिमान व्यक्त करणे शौर्य पर राज करते, यशवंतरावजीने शिवाजी पर अभिमान व्यक्त करते है ú शौर्य, कार्य का उचित सम्मान करते हुये पंतप्रधान प. नेहरूजी के द्वारा **शिवाजी स्मारक** अनावरण किया, इस कार्य से प्रतापगड पर शिवाशाही का तेज निर्माण हुआ। यशवंतराव जी जानते थे कि, शिवाजी का कार्य सदाही जनकल्याणकारी रहा है, भविष्य में सामर्थ्यशाली भारत के लिए मार्गदर्शन रहेगा , होगा।

5. **सांस्कृतिक एवं साहित्यीक को सीमा पर जाने का आव्हान :-** 1962 चीन ने भारत को युध्द में पराजीत किया, स्वातंत्र्य प्राप्ती के बाद की भारत की बडी पराजय की, भारतीय जवानों मे नवचैतनय , हौसला बनने के लिऐ भारत राष्ट्र उनके साथ है, इस भावना से भारतीय साहित्यीक, संस्कृतिक कलाकार को सीमा पर

ISSN : 2278-9308
March, 2021

जवानों से मिलने, उत्साह बढाते का अहवान संरक्षणमंत्री यशवंतरावजी चव्हाण ने किया, इसका परिणाम, भारतीय प्रांतो से साहित्यीक उत्तर सीमापर गये, देशभक्ती के नारे गुंजने लगे, इससे भारतीय जवानों को अहसास हुआ की पूरा भारत राष्ट्र उनके साथ है, महाराष्ट्र के पु.ल. देशपांडे , पू.भा. भावे, वसंत बापट, ग.दि. माडगुळकर आदी साहित्यिक उत्तर सीमापर गये, उन्होंने भारती जवानों का हौसला बढाया।

**कविवर्य ग.दि. माडगूळकर :-**

जियेंग या मरेंगे। अंतमें विजयी होंगे।
मानवने शत्रु के साथ । हमारा युध्द शुरू ॥

यह गीत उत्तर भारत से घर घर में गाये जाने लगा अर्थात भारतीय अब सीमा युध्द में जागृत हुये साथ ही जवानों के साथ खडे हुये, यह कार्य सामर्थ्यवान भारत के लिये महत्वपूर्ण है, इन राष्ट्रीय मुद्दो से स्प्ष्ट होता है की , यशवंतरावजी चव्हाण सामान्यजन से सीमा के रक्षक जवान में समन्वय बनाकर भारत को सामर्थ्यवान बनने के लिए सतत प्रयास कर रहे थे, यह भारत के लिऐ गौरवपूर्ण कार्य है।

**आंतरराष्ट्रीय मुद्दे :-**

1. **1962 चीन आक्रमण द्वारा भारत की पराजय :-** 20 ऑक्टोबर 1962 को चीनने भारतीय सीमा पर आक्रमण किया, यह हुआ आक्रमण आचानक हुआ हम बिना तैयारी के युध्द लढे, भारतीय जवानोनें शौर्य का दर्शन करके राष्ट्र के लिए अपने प्राणों की आहुती दी, इससे भारतीय संरक्षण व्यवस्था बुरी तरह प्रभावीत हुई, अर्थात भारत के लिए यह अभीतक का सबसे बडा राष्ट्रीय संकट था, इस संकट का वर्णन मराठी भाषिक कविवर्य कुसूमाग्रज कहते है की,

बर्फाचे तट पेटून उठले, सदर शिवचे कोसळते
रक्त आपूल्या प्रिय आईचे, शुभ्र हिमावर ओघळते

अर्थात हिमालय में भारतीय जवानों का खून बह रहा है, भारतीय पंतप्रधान प. नेहरून का नेतृत्व कसोटीपर खडा था, इस स्थिती में महाराष्ट्र के मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण को नियुक्त किया गया। इस घटना को कहते है की, **हिमालय के रक्षा के लिए सह्याद्री** इसके दुसरे ही दिन में 20 नोव्हेंबर 1962 को चीनने भारत के साथ का युध्द को पूर्ण विराम दिया, इस समय शवंशराव जी चव्हाण दिल्ली के लिए रवाना हुये, संरक्षण मंत्री पद का पदभार संभालने के लिऐ, यही एक योग था की, संरक्षणमंत्री यशवंतरावजी चव्हाण पद संभालने से समपयपूर्व चीनने युध्द को विराम दिया किंन्तु इससे संरक्षणमंत्री यशवंतरावजी चव्हाण संतुष्ट नही थे वे भारत राष्ट को सामर्थ्यशाली बनानेवाले में से एक थे वे संरक्षणमंत्री पदपर आते ही, उन्होने भारतीय संरक्षण व्यवस्था, चीनी आक्रमणे पर चिंतन करके, भारतीय संरक्षण व्यवस्था सक्क्षम बनाने के लिऐ प्रयास किये।

**उसमे :-** प्रथम संरक्षण व्यवस्था मे जो , चीनने 1962 को भारत की पराजय की इसमे भारतीय सेना में नैराश्य की स्थिती थी-

सेना के सैनिक, अधिकारी एवं संरक्षणमंत्री इनमे समन्वय पूरी तरह प्रभावीत हुआ था, सेना का आत्मविश्वास तूट चूका था, इस स्थिती में सुधार के लिऐ संरक्षण मंत्री यशवंतराव जी चव्हाणने उत्तर सीमा पर स्वयं जाकर सेना से संवाद किया, सेना की कमजोरीयाँ आवश्यकता आदि मुद्दे पर चर्चा की, साथ ही शस्त्रास्त्रा की कमी का मुद्दा भी सामने आया।

भारत के पास जो संरक्षण साधन सामुग्री है, वे कालबाहृय है, तो स्पष्ट हुआ की, भारतीय शौर्य के साथ सामर्थ्यशाली भारत के लिऐ नये, समयानुसार शस्त्रसामुग्री की आवश्यकता है, इसस्थिती को समझते हुये संरक्षणमंत्री यशवंतरावजी चव्हाण ने विदेशी यात्रा की, इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, सोव्हिएट, रशिया आदिराष्ट्रो के

दौरे किये, इसमें उन्हे ये अनूभव आया की, विदेशी राष्ट्र महत्वपूर्ण शस्त्रसामुग्री बेचने के लिए तयार है। किंन्तू वे भारत को स्वयंपूर्ण, संरक्षण क्षेत्र में परिपूर्ण बनाने के लिए आवश्यक सहयोग नही कर रहे है इसका परिणाम भारत को संरक्षण क्षेत्र के स्ववलंबित करने के दिशा में भारतीय संरक्षण -पंचवर्षिक योजना कार्यन्वित की साथ ही भारतीय सेना, संरक्षण व्यवस्था में जनता की, रुचि बढाने के लिऐ प्रयास किये, अर्थात भारत मे संरक्षण व्यवस्था की बहस शुरू की, इससे भारतीय सेना का मनोबल बढा.

2. **भारत-पाक संबंध परभाष्य :-भारतीय** संरक्षण व्यवस्था, सीमा सुरक्षा का महत्व देखते हुऐ भारत को चीन के साथ पाकीस्थान की चुनौतीया है। तय पाकिस्तन के साथ संबंध पर संरक्षणमंत्री यशवंतरावजी चव्हाण ने भाष्य किया, स्वतंत्र राष्ट्र निर्मिती के उपरान्त पाकिस्तान ने भारत के साथ सदा ही शत्रुत्व की नीती का अवलंब किया है, पाकीस्तान की दृष्टीसे काश्मीर समस्या भारत-पाकिस्तन का विवादीत मुद्दा है, किंन्तू वह भारत के लिऐ भी महत्वपूर्ण है, हमे हमारी इंच इंच भूमी प्रिय है, किन्तु भारत-पाकिस्तानवाद केवल काश्मीर सीमीत नही है, भूभाग के अलावा कई महतवपूर्ण मुद्दे होते है, भारतीय प्रजातंत्र जीवन संबंधीत वह समस्या है, यही असली चुनौती है, संरक्षणमंत्री यशवंतरावजी चव्हाण का वक्तव्य सही है यह आज 21 वी सदी में स्पष्ट हो रहा है, पाकीस्तान के काश्मीर हित के साथ कई महत्वाकांक्षा शामील है।

3. **1965 भारत पाक युध्द एवं भारतीय प्रजातंत्र :-** 1965 को पाकिस्तान ने भारत पर आक्रमण किया, प्रारंभ में पाकीस्थान को युध्द में यश प्राप्त हुआ किन्तु बाद में भारतीय सेनाने शौर्य पराक्रम से पाकीस्तानी अक्रमन को रोखा और पाकिस्तान को पराभूत किया इस संदर्भ में संरक्षणमंत्री यशवंरावजी चव्हाण कहते है की, आज की भारत लोकतंत्रवादी राष्ट्र है, सभी राज्यों , सभी धर्म , सभी भाषीक एक होकर आक्रमण के विरुध्द खडे रहे, अर्थात भारतीय लोकतंत्र सभी भारतीयों को एकजूट करने में सफल रहा है, 1965 भारत-पाक युध्द में भारतीय जवानों के शौर्य , साहस की भुमिका शस्त्र प्रणाली से अधिक महत्वपूर्ण साबित हुई। अर्थात पाकीस्तान को अमेरिका-चीन द्वारा आधुनिक शस्त्रसामुग्री प्राप्त हुई थी े अमेरीका द्वारा प्राप्त पॅटर्न टॅंक पाक ने तैनात किये थे यह 10 टन वजन क्षमतावाला पॅटर्न टॅंक था उससे 90 मिलीमिटरकी तोफ, बंदूक का मारा करने वाला ठिकाण एवं क्षमता आश्चर्य कारक थी, भारत के पास ऐसी कोई बढी शस्त्रसामूग्री नही थी। किंन्तु भारतीय सेनाने हिंमत एवं ताकद से , ईर्षा, जिद्द से शॉर्प पराक्रम दिखाते हुये पॅटन रणगाडे की कमर तोड दी, भारतीय सेनाने, भारतीय बनावट के रणगाडे से , बंदुकों द्वारा ऐस शत्रुपर मारा किया की, पा सेना पॅटर्न रणगाडे रणभुमीमे छोडकर भागी, अर्थात, संरक्षणमंत्री यशवंतरावजी चव्हाण जी सामर्थ्यशाली भारत को देख रहे थे, उसके द्वारा 1965 के भारत-पाक युध्द में जो भारत की प्रभावी जीन हुई उससे वो शुश हुये, यह जीत भी भारतीय सेना के लिए जसबा देनेवाली थी।

संक्षेप मे यह कहना उचीत होगा की, आज 21 वी सदी में रक्षा संकट तथा करोना संकट , विश्व संकट, भारत राष्ट्र सामर्थ्यशाली बनाने का कार्य जो ही रहा है, उसमे आज भारतपर्वू संरक्षणमत्री यशवंतरावजी चव्हाण के विचार कार्य की छबी दिख रही है।

**संदर्भ :**

1. प्रा.डी.ए. मनि - शिल्पकार यशवंराव पाटील
2. विजय पाथरीकर - थोरले साहेब
3. डॉ. अशोक नाईकवाडे-यशवंत चव्हाण
4. साधना साप्ताहिक,-शनिवार 20 मार्च 2021

# महामेरू यशवंतराव चव्हाण एक अष्टपैलू व्यक्तिमत्व

डॉ. डी. डी. कोल्हेकर
इतिहास विभाग प्रमुख
कै.बाबासाहेब देशमुख गोरठेकर महाविद्यालय,उमरी जि. नांदेड
मो. नं. 9923359517Email:-dattakolhekar@gmail.com

प्रस्तावना :-

नेतृत्व आणि कर्तृत्वाच्या जोरावर ज्यांनी यशस्वी राजकारण व समाजकारण केले ते व्यक्तिमत्व म्हणजे महामेरू यशवंतराव चव्हाण होय. महाराष्ट्राच्या जडणघडणीत ज्यांचा ज्यांचा उल्लेख केल्या जातो त्यात यशवंतरावांचे स्थान अग्रस्थानी आहे. महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. आंबेडकर यांच्या पुरोगामी महाराष्ट्राची धुरा सांभाळण्याचे कार्य यशवंतरावांनी केले. त्यांच्या अचूक निर्णय आणि कृतिशील विचारातून प्रगतीशील महाराष्ट्र घडला. यशवंतरावांचे राजकारण, समाजकारण, अर्थकारण, सहकार आणि शिक्षण, कुशल प्रशासक, साहित्यिक, तत्वचिंतक, लोककल्याणाची जाण असणारा नेता, शेती आणि शेतकरी यांच्या विषयी तळमळ असणारा द्दष्टा नेता, मराठमोळ्या माणसावर नितांत प्रेम करणारा माणूस अशा कितीतरी बाबी आपणाला यशवंतराव चव्हाण यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्वातन दिसून येतात. सामान्य कुटुंबात जन्माला आलेला मुलगा देशाच्या उपपंतप्रधान पदापर्यंत जाऊन पोह्चू शकतो हा एक आदर्श सामान्य जनतेसमोर यशवंतरावांनी ठेवला. यशवंतरावाचे कर्तृत्व व व्यक्तिमत्व बहुआयामी होते. संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून पदभार स्वीकारून पुरोगामी महाराष्ट्र आणि कल्याणकारी राज्याची त्यांनी भिन्न कल्पना मांडली व कृती सुद्धा केली आणि या देशात आपल्या कार्यपद्धतीचा वेगळाच ठसा उमटविला.

लोक कल्याणकारी राज्याची त्यांची संकल्पना आणि दृष्टीकोण वेगळा होता. जनता जनार्दन हे आपले मालक आहेत आणि आपण सर्व राजकारणी त्यांचे सेवक आहोत. आपण सेवक म्हणून जनतेच्या कल्याणाची कामे करावीत असे त्यांचे दृढ विचार होते. आजचे राजकारण संपूर्णपणे बदललेले दिसते आहे अस्थिर आणि चंचल बनलेले आहे. मुत्सुद्दी राजकारण आणि लोककल्याण यांचे भान राहिल्याचे दिसत नाही. प्रजा आणि देशावर यशवंतरावांनी निस्सीम प्रेम केले त्यांच्या जीवनातील अनेक प्रसंग आणि उदाहरणे आहेत. मळकटलेल्या कपड्यातील शेतकरी मित्राला कडकडून मिठी मारून भेटायला त्यांना कधीच संकोच वाटला नाही. पद प्रतिष्ठेचा त्यांना कधीच गर्व नव्हता. सरळ साधा माणूस म्हणून यशवंतरावांचा अनेक ठिकाणी उल्लेख येतो.

**उद्दिष्टे** :-

आपणाला एखादी गोष्ट साध्य करावयाची असते त्यापाठीमागे कांही तरी उद्देश असतोच म्हणून याला अपुवाद असू नये. माझ्यापण या शोधनिबंधाच्या पाठीमागे अनेक उद्देश आहेत. यशवंतरावांचे

जीवन आणि चरित्र अत्यंत ओजस्वी आहे त्यांच्या जीवनातील अनेक प्रसंग चढउतार व समाज उपयोगी त्यांनी केले कार्य जाणून घेणे. त्यांचे राजकारण, समाजकारण, सहकार, शिक्षण विषयक धोरण, कृषी धोरण,तत्त्वचिंतन,अर्थकारण आणि विशेष म्हणजे त्यांचे पुरोगामी विचार व कृतिशीलता जाणून घेणे व त्यांचा हा आदर्श आजच्या पिढी साठी किती मोलाचा आहे हे समजावून घेणे व समजावून सांगणे अत्यंत गरजेचे आहे हा उद्देश या शोधनिबंधाच्या पाठीमागचा आहे.

**संशोधनाचे महत्त्व :-**

यशवंतराव चव्हाणांची जीवनपद्धती व कृती निश्चितच विचारशील व चिंतनशील होती हे आपणाला मान्य करावेच लागेल. त्यांच्या प्रत्येक कृतीमागे निश्चित असा विचार होता. त्यांच्या विचारांना तात्विक असे अधिष्ठान होते. त्यांचे विचार हे एका कोणत्या कोंदणापुरते मर्यादित नव्हते तर ते संपूर्ण मानवी कल्याणासाठी उपयोगी होते. यशवंतरावांचे व्यक्तिमत्त्व अष्टपैलू स्वरूपाचे आहे त्यांच्या कृती व उपक्तित कोठेच फरक नव्हता. महाराष्ट्राच्या उभारणीतील त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. म्हणून या शोधनिबंधाच्या माध्यमातून त्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्वावर प्रकाश टाकता येईल.

**विषयाची व्याप्ती :-**

यशवंतराव चव्हाण यांच्या कार्याचे विश्व खूप मोठे आहे त्यांच्या विचार व कार्याची व्याप्ती खूप मोठी आहे. म्हणून शोधनिबंधासाठी येणाऱ्या मर्यादा लक्षात घेऊन या ठिकाणी यशवंतरावांच्या कांही निवडक कार्याविषयी विचार करण्यात येईल जे की आज वर्तमान काळात जीवन जगणाऱ्या प्रत्येक भारतीयांना अत्यंत उपयोगी पडेल.

**गृहितके :-**

1. यशवंतराव चव्हाणांची कृती नैतिक अधिष्ठानावर आधारित आहे.
2. यशवंतरावांच्या सहकारात कृतिशीलता जाणवते.
3. यशवंतरावांची कृती व विचार हे मानवी कल्याणाचे अधिष्ठान आहे.
4. यशवंतरावांचे राजकारण व समाजकारण समजावून घेणे.
5. आजच्या महाराष्ट्राला यशवंतरावांच्या विचारांची कितपत गरज आहे हे तपासून पाहणे.

**संशोधन पद्धती :-**

या शोध निबंधासाठी प्राथमिक व दुय्यम साधनाचा उपयोग करण्यात आलेला आहे. येथे वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आलेला आहे. अवश्यक्ता असेल तेथे पुर्वसुरीच्या मतांची पुष्टी दिलेली आहे. त्याचबरोबर मासिके इंटरनेटवरील माहिती वृत्तपत्रे व इतर साहित्याचा वापर करण्यात आलेला आहे.

**एक दूरदृष्टीचा नेता :-**

यशवंतराव चव्हाण हे एक दूरदृष्टीचे नेते होते. संयुक्त महाराष्ट्राच्या उभारणीत अनेक अडचणी आल्या. मुंबई महाराष्ट्रात समाविष्ट करण्यावरून वाद सुरूच राहिला 1956 साली द्विभाषिक मुंबई राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण बनले परंतु ते समाधानी नव्हते. त्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या लोकांच्या या अग्रहाच्या मागणीचे महत्व पंडित नेहरूंना पटवून दिले. पंडित नेहरू जेंव्हा प्रतापगड येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती अश्वारूढ पुतळ्याच्या अनावरण समारंभाच्या वेळी आले तेंव्हा संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाचा आणि लोकभावनेचा अनुभव घेतलेला होताच त्यामुळे त्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला हळू हळू अनुकूलता दर्शविली आणि शेवटी लोकसभेने एप्रिल 1960 मध्ये मुंबईसह महाराष्ट्र राज्यास मान्यता दिली. 1 मे 1960 रोजी संयुक्त महाराष्ट्र उभा राहिला. आपल्या

भाषणात यशवंतराव म्हणतात हे राज्य मराठी माणसाच्या कल्याणाचे काम तर करेलच परंतु जे जे महाराष्ट्राकडे देशाला देण्यासारखे आहे ते सुद्धा देशाला अर्पण करेल कारण त्यामुळे देश मजबूत होईल, देश मजबूत झाला तर महाराष्ट्र देखील मजबूत व मोठा होईल पुढे जाऊन यशवंतराव म्हणतात जर कधी काळी भारताच्या हिमालयावर संकट आलेच तर महाराष्ट्राचा हा सह्याद्री आपल्या काळया पत्थराची छाती हिमालयाच्या संरक्षणासाठी ठामपणे पुढे करून उभा राहील. महाराष्ट्राचे सत्तासूत्रे हाती घेतल्यानंतर यशवंतरावांनी जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी सर्वप्रथम शेतीमालाला भाव, शेती महामंडळाची स्थापना, आर्थिक सुबत्ता, लघुउद्योगांना प्राधान्य, बेरोजगारी, सहकार, एम. आय. डी. सी. कर्ज धोरण, दुष्काळावर मात अशी अनेक कामे पूर्ण केली महाराष्ट्रातील शेतकरी सुधारला पाहिजे याची त्यांना विशेष तळमळ होती यशवंतराव चव्हाण एक दूरदृष्टीचा नेता होते म्हणूनच त्यांना महाराष्ट्राचा शिल्पकार म्हणून संबोधले जाते.

**यशवंतरावांची सामाजिक दूरदृष्टी :-**

प्रारंभापासून चालत आलेली सामाजिक विषमता यशवंतरावांच्या काळात पण चालू होतीच. त्यांचा काळ त्यास अपवाद ठरवू नये. कारण जातीसाठी माती खाणारी मानसे याही काळात होतीच. म्हणून प्रथम यशवंतरावांनी राजकारणाबरोबरच तेवढ्याच ताकतीने समाजकारणही केले. जातीय विषमता ही भारतीय समाज व्यवस्थेला लागलेली कीड आहे म्हणून जातीयवादाला खतपाणी घालणाऱ्या घटकांना मुळासकट उपटून टाकले पाहिजे असे मत यशवंतरावांनी व्यक्त केले. पुरोगामी विचारांची कास धरणाऱ्या यशवंतरावांनी जातीयतेला कडाडून विरोध केला. ते म्हणतात नवसमाजाची जर आपणाला निर्मिती करावयाची असेल तर जातीय वाद हा शाप दूर केला पाहिजे. आणि सर्वसमावेशक समानता स्थापन झाली पाहिजे. त्याचबरोबर समाजामध्ये बोकाळलेली अस्पृश्यता कायद्याने नष्ट केली पाहिजे. कोणी उच्च नाही वा नीच नाही श्रीमंत नाही वा गरीब नाही. यशवंतरावांनी महार वतन नष्ट करून या समाजाला शेकडो वर्षाच्या गुलामगिरीतून मुक्त केले. त्यांचे हे महान कार्य अत्यंत मोलाचे व परिवर्तनवादी होते. त्याचबरोबर अशा लोकांच्या जीवनाचा प्रश्न सोडवण्यासाठी कसेल त्याची जमीन हे तत्त्व मांडून भूमिहीनांना शेती मिळवून दिली. त्यामुळे श्रीमंत व गरीब यांच्यातील विषमतेची दरी कमी होण्याचा प्रयत्न यशवंतरावांनी यशस्वीपणे केल्याचे दिसते.

**ग्रामीण भागाविषयी यशवंतरावांची दृष्टी :-**

भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा हा कृषी आहे. परंतु पूर्वीपार पासून शेती आणि शेतकऱ्यांकडे अपार दुर्लक्ष केल्याचे दिसते. परंतु यशवंतराव चव्हाणानी मात्र शेती आणि शेतकरी सुधारला पाहिजे म्हणून कृषी उद्योग नवनवीन बियाणे नवे तंत्रज्ञान शेतीला लागणारी नवीन अवजारे छोटे-मोठे उद्योग अशा अनेक बाबी नव्याने आणण्याचा प्रयत्न केला. भारत देश हा खेड्यात बसलेला आहे या महात्मा गांधींच्या तत्त्वज्ञानाचे पालन यशवंतरावांनी केल्याचे दिसते. ते म्हणतात जोपर्यंत खेडे आणि शहर यातील कृत्रिम अंतर जोपर्यंत कमी होणार नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने देशाचा विकास होणार नाही. खेड्यांचा विकास म्हणजेच देशाचा विकास त्यांच्या या तत्वज्ञानाची गरज आज महाराष्ट्राला आहे शेती आणि शेतकरी अत्यंत मोठ्या आर्थिक अडचणीत सापडलेला आहे सद्यस्थितीत खेडे गावातील मंडळी अत्यंत वेगाने शहरांकडे धावताना दिसते आहे खेड्यातील रोजगार सोडून शहराकडे रोजगार मिळविण्यासाठी त्यांचा कल अधिकच आहे. त्यामुळे खेड्यातील मजूरीचा प्रश्न हा अत्यंत भयावह बनलेला आहे. त्यामुळे शेतीच्या उत्पादकतेवर त्याचा मोठा परिणाम जाणवत आहे. म्हणून अशा

लोकांना खेड्यामध्ये थांबवणे गरजेचे आहे त्यामुळे शेतमजुरांचा प्रश्न सुटेल व शेतीमालाच्या उत्पादकतेत वाढ होईल.

**यशवंतराव आणि सहकार चळवळ :-**

सहकार चळवळ ही लोक चळवळ बनावी अशी यशवंतराव चव्हाण यांची तळमळ होती. कारण महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाला गती देण्यासाठी ती महत्त्वाची होती. प्रत्येक गावात सहकारी संस्था स्थापन झाल्या पाहिजे असा त्यांचा आग्रह होता.इ.स. 1960 मध्ये सहकार कायदा विषयक विधेयक संमत करून महाराष्ट्र सहकारी चळवळीला नवी दिशा दिली. ग्रामीण भागाचा विकास साधण्यासाठी गावा गावां मध्ये सहकारी पतसंस्था सहकारी, बँका, भूविकास बँका यांच्यामार्फत कर्ज पुरवठ्याची सोय करून दिली त्यांच्याच काळात 18 सहकारी साखर कारखाने उभे राहिले या माध्यमातून खेडेगावचा चेहरामोहरा बदलण्यासाठी फार मोठा प्रयत्न यशवंतरावांनी केला. सहकार आणि कारखानदारी क्षेत्रातील अनेक बदल घडवून आणले अशाप्रकारे यशवंतरावांनी सहकार चळवळीचा पाया घालून दिला.

**सत्तेचे विकेंद्रीकरण :-**

लोकशाही व्यवस्थेत सामान्य माणसाला केंद्रबिंदू मांनले असले तरी प्रत्यक्ष निर्णय प्रक्रियेत मात्र त्याचा सहभाग नावापुरताच असतो हे यशवंतरावांनी ओळखून महाराष्ट्रात या सामान्य माणसाला या पवित्र लोकशाहीच्या प्रक्रियेत सहभागी करून घेण्यासाठी 1 मे 1962 रोजी पंचायत राज(जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत ) ही संकल्पना प्रत्यक्षात अमलात आणून सत्तेचे विकेंद्रीकरण केले व सामान्य माणसाला संधी उपलब्ध करून दिली. ही संकल्पना प्रत्यक्षात आणणारे महाराष्ट्र हे देशातले पहिले राज्य ठरले त्यामुळे स्थानिक पातळीवरची मंडळी निर्णय प्रक्रियेत प्रत्यक्ष सहभागी होऊ लागली आणि स्थानिक प्रश्न स्थानिक पातळीवरच सोडविले जाऊ लागले. याचा फायदा पुढे मोठा होऊ लागला पंचायत समिती जिल्हा परिषद मध्ये घडणारे नेतृत्व पुढे विधिमंडळ व संसदेतही काम करू लागले यशवंतरावांच्या या संकल्पनेचा फायदा महाराष्ट्रालाच नव्हे तर देशाला पण झाला

**आर्थिक समानता आणणे गरजेचे :-**

यशवंतरावांना अभिप्रेत असणारा महाराष्ट्र आर्थिक मागासलेपणामुळे कोसो मैल दूर होता त्याच्या पाठीमागचे अनेक कारणे असली तरी अत्यंत महत्त्वाचे कारण म्हणजे मागासलेल्या समाजामध्ये बुद्धिमत्ता असून सुद्धा आर्थिक विपन्नावस्थेमुळे त्यांचा विकास साधला जात नाही म्हणून आर्थिक समानता निर्माण करून अशा वर्गाला समान संधी देणे व त्यांचा आर्थिक विकास साधणे गरजेचे आहे असे यशवंतरावांना वाटत होते. त्यामुळे गोरगरिबांच्या मुलांच्या हाताला काम मिळेल व त्यांच्या बुद्धीचा कुशलतेने उपयोग करून घेता येईल. उद्योग-व्यवसाय औद्योगिक करणा बरोबरच आर्थिक नियोजन सुद्धा महत्त्वाचे असून आर्थिक बाबतीत समानता आणली पाहिजे असे विचार यशवंतरावांनी मांडले.

**सर्वगुणसंपन्न व्यक्तिमत्व :-**

यशवंतरावांचे व्यक्तिमत्व प्रेरणादायी व आदर्शाचा एक दीपस्तंभ आहे. आजच्या राजकारण्यांना शुद्ध राजकारण करण्यासाठी त्यांचे चरित्र व कार्य मार्गदर्शक आहे. आजचे राजकारणी जर त्यांच्या आदर्शावर चालले तर महाराष्ट्र भ्रष्टाचार मुक्त होऊन देशातली एक प्रगतिशील व प्रेरणादायी

राज्य बनेल. परंतु असे होणे मला शक्य वाटत नाही कारण आज सत्य आणि आदर्श बाजूला ठेवून राजकारण केल्या जात आहे. यशवंतरावांचा महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्या राजकारणावर मोठा प्रभाव होता. एकनिष्ठता व विश्वासामुळे त्यांनी पंतप्रधान पदाला सुद्धा ठोकरले म्हणून ते आदर्शाचा महामेरू आहेत. एक आदर्श पुत्र बंधू, पती, मित्र, नेता पुढारी, विचारवंत, समाजसुधारक, यशस्वी राजकारणी, उत्तम वक्ता, उत्तम संसदपटू, पुरोगामी विचारवंत, ओजस्वी वकृत्व कर्तव्यनिष्ठ धर्मनिरपेक्ष सहिष्णू प्रतिभावंत, चारित्र्यसंपन्न, मृदूवाणी अशा कितीतरी गुणांनी युक्त असणारी व्यक्ती. त्यांच्या अनेक गुणांची आपण मांडणी केली तरी यशवंतरावांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाला कमीच पडेल असे मला वाटते. यशवंतराव हे सर्वगुणसंपन्न व्यक्तिमत्व होते.

**निष्कर्ष :-**

महाराष्ट्राच्या उभारणीत अत्यंत महत्त्वाचे व सर्वश्रेष्ठ एकमेव व्यक्तिमत्त्व म्हणजे महामेरू यशवंतराव चव्हाण होत. महात्मा फुले राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असणाऱ्या महाराष्ट्राच्या उभारणीत व पुरोगामी विचारावर आधारलेला महाराष्ट्र उभा करण्याचे मोलाचे कार्य यशवंतराव चव्हाण यांनी पार पाडले. सामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून राजकारण करणारा हा एकमेव नेता आहे असे म्हटले तर वावगे ठरू नये. महात्मा फुले नंतर शेतकऱ्यांच्या दुःखाला वाचा फोडणारा एकमेव माणूस म्हणजे यशवंतरावच होत. पांढऱ्या शुभ्र कपड्यातील मुख्यमंत्री असून सुद्धा मळक्या कपड्यातील येणाऱ्या आपल्या शेतकरी मित्राला कडकडून मिठी मारतो आणि सुख दुःखाची विचार ना करतो मान-अपमान पद प्रतिष्ठा याची तमा न बाळगणारा माणूस म्हणजे यशवंतराव चव्हाण होत. म्हणूनच म्हणावेसे वाटते असा माणूस पुन्हा होणे नाही!!!.

**संदर्भ सूची :-**


1. बा. ह. कल्याणकर,2003, युगंधर नेते यशवंतराव चव्हाण,आकांक्षा प्रकाशन नागपूर.
2. यशवंतराव चव्हाण,2012,कृष्णकाठ, रोहन प्रकाशन शनिवारपेठ पुणे
3. रामभाऊ जोशी,2010,यशवंतराव एक इतिहास,प्रतिभास प्रकाशन परभणी.
4. प्रा.अशोक नाईकवाडे, आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण.
5. युगप्रवर्तक यशवंतराव,2008, यशवंतराव चव्हाण व्यासपीठ अहमदनगर
6. विश्वास मेहेंदळे, यशवंतराव ते विलासराव
7. यशवंतराव चव्हाण,1979, ऋणानुबंध प्रेस्टिज प्रकाशन पुणे
8. डाॅ. पंजाब जाधव,1970, यशवंतराव चव्हाण जीवन दर्शन, कर्मवीर प्रकाशन पुणे.
9. भा. कृ. केळकर, यशवंतराव:राष्ट्रीय व्यक्तिमत्व.
10. इंटरनेटवरील माहिती एप्रिल 2021

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –7.675,Issue NO, 289 (CCLXXXIX)
ISSN : 2278-9308
March, 2021

# यशवंतराव चव्हाण यांचे शिक्षण विषयक विचार

**प्रा. डॉ. संजय कांबळे**
सहयोगी प्राध्यापक व लोकप्रशासन विभाग प्रमुख
राजर्षी शाहू कला व विज्ञान महाविद्यालय, वाळूज, ता.गंगापूर, जि. औरंगाबाद

**प्रस्तावना :**

"बहुजन हिताय बहुजन सुखाय"चा विडा उचलून आधुनिक महाराष्ट्राच्या जडण-घडणीत ज्या-ज्या महापुरुषांनी योगदान दिले अशा थोर महापुरुषांच्या मालिकेत यशवंतराव चव्हाण यांचे नाव विशेष करुन घेतले जाते. म्हणूनच यशवंतराव चव्हाण यांना आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून ओळखले जाते. ते एक व्यासंगी लोकनेता होते. त्यांचा महाराष्ट्रासाठीचे नाही तर संपूर्ण देशासाठी पूरोगामी विचार अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामध्ये कृषी, औद्योगिकरण, कला, संस्कृती, शिक्षण व सामाजिक आणि आर्थिक विकास या सर्व पैलूंचा धोरणात्मक निर्णय घेऊन अंमलबजावणीत आणलेला आहे. महाराष्ट्र राज्यांच्या स्थापने पूर्वी व नंतरची परिस्थिती लक्षात घेता या सक्षम नेतृत्वाने महाराष्ट्राला नवीन दिशा दाखविण्याचे कार्य केले आहे. एकंदरीतच या महाराष्ट्रामध्ये व देशामध्ये समाजवादी समाजरचना निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी हाती घेतलेले होते. राज्यातील शहरी भागामध्येच पूर्ण विकासाची प्रक्रिया न राबविता ग्रामिण भागाकडे विकासाचे झूकते माप दिले पाहिजे असा ध्येयवाद उराशी बाळगून प्रचंड तळमळीने कार्य करणारा दृष्टा नेता, चारित्र्यसंपन्न, वैचारिक समृद्धता लाभलेला प्रशासक या महाराष्ट्राला पहिला मुख्यमंत्री म्हणून लाभला हे या महाराष्ट्राचे भाग्यच म्हणावे लागेल.

महाराष्ट्राच्या जनसामान्यांसाठी स्वातंत्र्यापूर्वीच्या काळात फूले-शाहू-आंबेडकर या थोर महापूरुषांची कार्य केले त्यांच्या विचारांची कास धरून शेतकरी, कामगार, मध्यमवर्गीय, पद्दलीत, व्यापारी, कारखानदार या सर्वांसाठी मानवतावादी विचारसरणीच्या माध्यमातून जनकल्याणात्मक धोरणांचा स्विकार केला व त्यादृष्टीने या राज्याला विकासाच्या प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. सामान्य परिस्थितीतून वर आलेले असामान्य व्यक्तीमत्व म्हणजेच यशवंतराव चव्हाण होत. यांचे शिक्षणविषयक विचार याबाबतचा विचार मांडण्याचा प्रयत्न येथे केलेला आहे.

**संशोधन लेखाचा उद्देश :**

प्रस्तुत संशोधन लेखाचा मुख्य उद्देश, यशवंतराव चव्हाण यांचे शिक्षणविषयक विचार जाणून घेणे हा आहे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधन लेखासाठी प्राथमिक व दुय्यम साधनसामुग्रीचा उपयोग करण्यात आलेला आहे. त्यात मूळ संदर्भग्रंथ, लेख, इत्यादींचा उपयोग करण्यात आला आहे.

**यशवंतराव चव्हाण यांचे शिक्षणविषयक विचार :**

फुले, शाहू, आंबेडकरांनी शिक्षण हे समाज परिवर्तनांचे साधन आहे असे म्हटले होते. कारण कोणत्याही देशाची प्रगती ही त्या देशातील शिक्षणावरच अवलंबून असते. त्याचप्रमाणे यशवंतराव चव्हाण यांनीही शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन माणून महाराष्ट्राच्या बदलत्या परिस्थितीचा विचार करुन यशवंतराव चव्हाण यांनी राज्यांमध्ये विकासाचे मुख्य प्रभावी माध्यम शिक्षण असले पाहीजे म्हणून त्यांचा प्रसार केला पाहीजे अशी त्यांनी भूमिका घेतली होती व त्याला त्यांनी गतिमानता प्रदान केलेली होती. यशवंतराव चव्हाणांनी प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण हे जितक्या सवलतीच्या व सक्तीच्या माध्यमातून देऊन हा शिक्षणाचा प्रवाह महाराष्ट्राच्या प्रत्येक शहरात व प्रत्येक खेड्यात पोहचविला. त्यामुळे या शैक्षणिक धोरणांचा फायदा आजतागायत तळागाळातील जनतेला मिळतो आहे. या उदात्त व पुरोगामी विचारामुळे आज आपल्या राज्यातील शैक्षणिक दर्जा निश्चितच उंचावलेला दिसून येतो. यशवंतरावाच्या मते शिक्षण म्हणजे "स्वत:ला समजून घेणे, त्याचा परिणाम आपल्या जीवनावर कसा होतो तसेच आपल्या व्यक्तीमत्वाभोवतीच्या गोष्टीचा काय परिणाम होतो हे समजून घेणे व देणे यास शिक्षण म्हणतात." उद्योग, शेती आणि शिक्षण हे यशवंतरावांच्या शासकीय धोरणांची त्रिसूत्री होती. परंतु शिक्षण हे सामाजिक, आर्थिक क्रांतीचा मूलाधार आहे असे यशवंतराव चव्हाणांना वाटत असे. म्हणून त्यांच्या नियोजनामध्ये शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व दिलेले होते. याशिवाय शिक्षण हे समाजापर्यंत पोहचविण्यासाठी मातृभाषेतूनच दिले पाहीजे असा त्यांचा आग्रह असायचा. याबरोबरच कृषी शिक्षण, तांत्रिक शिक्षण व व्यवस्थापन शिक्षण देखील घेणे आवश्यक आहे. यावरुन त्यांची आधुनिक दूरदृष्टीपणा दिसून येतो. जो २१ व्या शतकातील गरज

त्यांनी ७० च्या दशकात विचारात आणलेली होती. कारण या शिक्षणातूनच मूलाचे करीत बनेल व ते स्वतःच्या पायावर उभे राहतील. पर्यायाने त्यांना रोजगार मिळेल. भारत हा कृषीप्रधान देश आहे यामुळे येथील युवकांना कृषी शिक्षण दिले पाहिजे यासाठी कृषी विद्यापीठाची स्थापना केली. ज्यामुळे येथील युवक कृषी शिक्षण घेऊन उत्पन्नात वाढ करतील पर्यायाने या राज्यांचा विकास होईल. महाराष्ट्रामध्ये इ.बी.सी. सवलत म्हणजेच आर्थिक मागास असलेल्या घटकातील मूलांना ही सवलत देणारे ते पहीले मुख्यमंत्री आहेत. त्यामुळे या घटकातील मूले शिक्षणापासून वंचित राहणार नाहीत. तसेच आदिवासी, भटक्या मूलांच्या शिक्षणासाठी आश्रमशाळा, वस्तीगृह निर्माण करण्याचा धोरणात्मक निर्णय यशवंतराव चव्हाणांनी घेतलेला होता, यामुळे त्यांचा समाजकल्याणात्मक असा दृष्टीकोण हा प्रत्येक घटकासाठीचा दिसून येतो.

महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास व्हावा असे वाटत असले तर प्राथमिक, माध्यमिक शिक्षणाचा टप्पा पार केल्यानंतर राष्ट्र उभारण्यात उच्च शिक्षणाची महत्त्वाची भूमिका असते. असे यशवंतराव चव्हाणांना वाटत होते. म्हणून उच्च शिक्षण हे काही विशिष्ट लोकांपूरते मर्यादित न ठेवता समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत पोहचले पाहीजे असा त्यांचा आग्रह होता. उच्च शिक्षणातून समाजाला नविन दिशा मिळते कारण उच्च शिक्षित हे आपल्या ज्ञानाचा फायदा वैयक्तिक किंवा स्वतःपूरता न करता समाज उभारण्यासाठी करतील, यामूळे समाज, राज्य, राष्ट्र असा सर्वांगीण विकास उच्च शिक्षणामूळे होईल असे यशवंतरावांची मनिषा होती.

यशवंतराव चव्हाण हे शिक्षणाविषयी किती आदर्शवादी होत याबद्दल ते स्वतः म्हणतात की, "मला अशिक्षित बेकाराच्या फौजपेक्षा, सुशिक्षित बेकारांची फौज परवडेल कारण ते देशाचे प्रश्न समजावून घेऊन ते सोडविण्यास मदत तरी करु शकतील. महाराष्ट्राचा आर्थिक विकास होण्यासाठी जसे उद्योग उभारणे आवश्यक आहे. तसेच उच्च शिक्षणात तांत्रिक शिक्षणाला महत्त्व दिले पाहीजे तसेच तांत्रिक शिक्षणाची कास धरली पाहीजे असे म्हणत. ग्रामीण भागामध्ये जोपर्यंत विज पोचविल्या शिवाय शेतीचा विकास होत नाही तोपर्यंत शिक्षणरुपी प्रकाश मिळाल्याशिवाय नवसामर्थ्य निर्माण होणार नाही, असे यशवंतरावांना वाटत असे. आज महाराष्ट्रात अनुदानित, विनाअनुदानित आणि कायम विनाअनुदानित असे प्रकार पाहावयास मिळत आहेत. विकसित राज्य, पुरोगामी राज्य आणि सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे करणाऱ्या राज्यातील शिक्षणाची ही अवस्था यशवंतरावांच्या पक्षाच्या विचारसरणीच्या नेत्यांनी केलेली दिसून येते. शिवाय पटपडताळणी, शाळा बाह्य मुलींचे प्रमाण, गळतीचे प्रमाण, कंत्राटी पद्धत, शिक्षण सेवक असे नानाविध प्रकार या विकसीत राज्यात घडताना उघड्या डोळ्यांनी पाहत आहोत. आज उच्च शिक्षणासंदर्भातही फार चांगले चित्र आहे असे नाही. यशवंतराव चव्हाणांनी उच्च शिक्षणासंदर्भात मांडलेले विचार आज निश्चितपणे विस्तारलेले आहेत परंतु त्यांचे स्वरुप मात्र बदलले आहे. महाराष्ट्रामध्ये उच्च शिक्षण देणारी महाविद्यालये कायम विनाअनुदानित, बाजारु वृत्तीने निर्माण झालेली, सर्व सामान्यांना न परवडणारी आणि एका विशिष्ट समूह किंवा गटाच्या हातची बाहूले बनलेली आहेत. पूर्णपणे बेरोजगारांची फौज निर्माण करणारी ही यंत्रणा राबवित आहेत. विज्ञान, तंत्रज्ञान, कृषी, व्यवस्थापन आणि वैद्यकीय शिक्षणांचा महाराष्ट्रात बोलबाला झालेला दिसून येत आहे. याला सर्वस्वी या राज्यातील सरकार आणि सत्ताधारी पक्ष जबाबदार आहेत. येथे निश्चितच यशवंतरावांच्या विचाराला यांचे अनुयायी तिलांजली देत आहेत. असेच म्हणावे लागेल.

यशवंतराव धोरणात्मक निर्णय घेणारे दृष्टे लोकनेते होते. आज वास्तवात महाराष्ट्रामध्ये, देशामध्ये धोरण आखले जात आहे, निर्णय घेतले जात आहेत परंतु त्यांच्या अंमलबजावणीमध्ये इच्छा शक्तीचा अभाव स्पष्टपणे दिसून येतो. यांना लोकनेते न म्हणता स्वार्थी पुढारी म्हटले पाहीजे कारण देश, समाज, राज्य यांच्या विकासासाठी यांना काही एक देणे घेणे नसते. अशा राजकीय नेत्यांना यशवंतरावांचे अनुयायी म्हणून मिरवण्याचा काही अधिकार नाही. त्यांनी राजकारण सोडून संन्यास घ्यावा कारण ज्या लोकनेत्यांच्या विचारांचा वारसा तुम्हाला पुढे चालवायचा नसेल तर त्यांचे नाव घेऊन त्यांच्या विचारांचा अपमान तरी करु नका. यशवंतरावांचे राजकारण कमी समाजकारण मोठ्याप्रमाणावर असायचे आज उलट परिस्थिती आहे. विशेषतः नैतिक मूल्य बाजूला सारुन सर्व काही समष्टीसाठी असे आजचे राजकारण होत आहे. म्हणजे राष्ट्रहित, समाज हित, उपेक्षित, दुर्लक्षित, आदिवासी जनतेच्या हितासाठी फक्त कागदोपत्री विकास आपण दाखवित आहोत. वास्तवात मात्र अनेक प्रश्न राज्यापुढे, राष्ट्रापुढे उभे आहेत. त्या सोडविण्याच्या दृष्टीने प्रामाणिक प्रयत्न होणे गरजेचे आहे. तरच यशवंतरावांच्या विचारांच्या स्विकार केला असे म्हणता येईल.

**समारोप :**

यशवंतराव चव्हाण हे एक थोर साहित्यिक, विचारवंत, मुत्सुद्दी नेते, विरोधकांचा मान राखणारे संयमी राजकारणी आणि जनतेच्या सुख-दुःखाशी समरस असणारे लोकनेते होते. यशवंतराव हे केवळ बोलके विचारवंतच नव्हते तर त्यांच्या व्यक्तीमत्वात एक कृतीशिल विज्ञानवाद समाविष्ट होता. ते म्हणत देशाची शास्त्रशुद्ध पूर्नरचना करण्यासाठी विज्ञानवादी तरुण निर्माण झाले पाहिजेत, ते उत्कृष्ठ तरुण शिक्षणातूनच निर्माण होतील. महाराष्ट्र राज्याची स्थापना होण्यापूर्वी व नंतर देखील या राज्यांचा सर्वांगीण

विकास होण्यासाठी सतत प्रयत्नशील असणारा नेता म्हणजे यशवंतराव चव्हाण होत. राज्यामध्ये पायाभूत प्रकल्प आणि भौतिक सुविधा निर्माण करीत असताना तेथील समाजकारणाला आणि राजकारणाला योग्य दिशा दिली. याशिवाय सर्वसमावेशक, समतोल आणि जातीभेदरहीत राजकारण केलेले दिसून येते. परंतू आजची वास्तविक स्थिती पाहता एखाद्या समाजाला, वर्गाला, जातीला, महत्त्व देणारे राजकारणी निर्माण झालेले आहेत. त्यामुळे यशवंतराव चव्हाण यांचा आदर्श घेवून आजच्या राजकारण्यांनी मार्गक्रमण केल्यास निश्चितच महाराष्ट्रात परिवर्तन घडून येईल असे वाटते.

**संदर्भ :**

१. रामभाऊ जोशी, यशवंतराव इतिहासाचे एक पान, पूणे.
२. मूंगडकर मा. प., १९८५, यशवंतराव चव्हाण प्रेरणा व कार्य, सूवर्णा प्रकाशन, पूणे.
३. डॉ. पंजाबराव देशमुख, भारताचे सुपूत्र, यशवंतराव चव्हाण, कर्मविर प्रकाशन, पूणे.
४.संपा. रा. गो. कूणे., १९८४, लोकमानसातील यशवंतराव, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पूणे.
५.नाईकवाडे अशोक, २००९, आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण, देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद.
६. लोकराज्य, मार्च, २०१२, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
७.लोकसत्ता, दिवाळी अंक - २०११, यशवंतराव ते विलासराव.
८.गुरव रा. ग., १९५७, यशवंतराव चव्हाण चरित्र, सत्कार प्रकाशन, मिरज.
९. प्रतिभा पाटील व आंबादास अरगडे, (२०१४), युगपुरुष यशवंतराव चव्हाण, एज्युकेशन पब्लिकेशन, औरंगाबाद.

# यशवंतराव चव्हाण यांचे पंचायत राज व सहकार क्षेत्रातील कार्य

डॉ. बबन आमले
लोकप्रशासन विभाग प्रमुख, विनायकराव पाटील शिक्षण प्रसारक मंडळ संचालित कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, कन्नड.
मोबाइल नंबर, ९४२३६८८४४५E-mail:- babanamle999@gmail.com

**प्रस्तावना**

संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री आणि आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांचे महाराष्ट्राच्याच नव्हे, तर देशाच्याही जडणघडणीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावलेली होती. त्यांनी देशाच्या स्वातंत्र्यलढयातही आपले महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे. स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्राला तसेच देशाला फक्त कायदा व सुव्यवस्था या स्वरूपाच्या प्रशासनाची गरज नसून, विकासाभिमुख प्रशासनाची गरज आहे. हे ओळखणाऱ्या द्रष्टया व्यक्तींमध्ये यशवंतराव अग्रगण्य होते. विकासाभिमुख प्रशासनाची गरज ओळखण्यामध्ये यशवंतरावांचे जसे द्रष्टेपण होते तसेच त्यांची महाराष्ट्र राज्यामध्ये यशस्वी अंमलबजावणी करून, प्रशासनाची एक वेगळीच छाप दाखवून, त्याचा आदर्श वस्तुपाठ यशवंतरावांनी देशपातळीवर देखील दाखवून दिला होता. अशा त्यांच्या विविध कार्यामुळे यशवंतराव चव्हाण यांना कर्तव्यदक्ष, प्रशासक, चतुर राजकारणी, समीक्षक, कलारसिक, लेखक, वक्ता, विचारवंत, वाचक, समाजसुधारक, सुप्रशासनाचे आदय शिल्पकार अशा विविध पैलूंनी त्यांचे व्यक्तिमत्व ओळखले जाते.

पंचायतराज व्यवस्थेमुळे सत्तेचे विकेंद्रीकरण गावातील शेवटच्या घटकापर्यंत झाले आहे. राज्यातील ग्रामीण भागाकडे वळून पाहिले असता विकासविषयक अनेक देदीप्यमान घडामोडी आपल्याला दिसून येतात. पंचायतराजमुळे गावातील सामान्यातील सामान्य माणूस शासन प्रक्रियेत सहभागी होऊ लागला आहे. त्याला अधिकार प्राप्त झाले आहेत. पंचायत राज व्यवस्थेचे हे फार मोठे यश आहे. पण या सर्वांमध्ये प्रभावी निर्णय ठरला तो पंचायतराज व्यवस्थेत महिलांना देण्यात आलेल्या महत्त्वपूर्ण स्थानाचा. महाराष्ट्रात पंचायतराज संस्थांमध्ये महिलांना ५० टक्के जागा राखीव आहेत. या माध्यमातून महिलांना शासन व्यवस्थेत आणि निर्णय प्रक्रियेत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. महिला गावाच्या कारभारात सहभागी होऊ लागल्या. चूल आणि मूलमध्ये अडकलेल्या महिलांनी घराचा उंबरठा ओलांडला, त्यांचा आत्मविश्वास वाढला आणि महिलांनी मिळालेल्या या संधीचे सोने करून आणि त्याच्याही पुढे जाऊन इतर विविध क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली आहे. राज्यात आणि देशात यामधून महिला सक्षमीकरणाची क्रांती घडून आली असून याचे सर्वस्वी श्रेय पंचायतराज व्यवस्थेला जाते.

**यशवंतराव चव्हाण यांचे पंचायत राज क्षेत्रातील कार्य**

“महाराष्ट्र ग्रामपंचायत कायदा १९५७ मध्ये केला. गावपातळीवर थेट लोकांनी निवडून दिलेल्या ग्रामपंचायती निर्माण करण्यात आल्या. ग्रामपंचायती आणि त्याचे संघटन यावर त्यांनी सर्वप्रथम आपले लक्ष केंद्रीत केले. महाराष्ट्रात हजारों खेडी असल्यामुळे ग्रामपंचायतचा विस्तार ही मोठया प्रमाणात आहे. ग्रामपंचायत हा लोकशाहीचा पाया असल्यामुळे या संस्था केवळ खेडेगावाचा नागरी कारभार चालवणाऱ्या यंत्रणा न राहता त्यांच्यावर गावातील समाज जीवनाचे सर्व तऱ्हेने कल्याण करण्याची जबाबदारी आहे.”[१] त्यामुळे १मे १९६२ रोजी महाराष्ट्र राज्य वर्धापन दिनाच्या मुहूर्तावर पंचायत राज्य स्थापन केले. त्यासमयी दिलेल्या संदेशात यशवंतराव म्हणतात

की, ग्रामीण लोकांची विलक्षण विचार शक्ती, ऐक्यभाव व कष्ट करण्याची कुवत लक्षात घेता पंचायत राज्याचा आपला प्रयोग पूर्ण यशस्वी होईल व संबंध भारतभर लोकशाहीचा रंग दिमाखाने झळकेल अशी खात्री वाटते. महाराष्ट्राने जिल्हा परिषदेद्वारा अंमलात आणलेले लोकशाही विकेंद्रीकरण हे खरे पंचायत राज होय.

**लोकशाहीचे विकेंद्रीकरण**

महात्मा गांधीजी यांची ग्रामस्वराज्याची संकल्पना यशवंतराव यांना मान्य होती. ''१ मे १९६२ रोजी पंचायतराज अंमलबजावणी केली. सत्तेचे विकेंद्रीकरण केले. यशवंतराव चव्हाणांनी सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रात ग्रामीण महाराष्ट्राचा उत्कर्ष केंद्रबिंदू ठेवून ग्रामीण भागात पंचायतराज व्यवस्था बळकट केली. जिल्हापरिषद पंचायतराज यंत्रणा उभी करून ग्रामीण भागातील सर्व जमातीतून नेते आणि कार्यकर्त निर्माण केले.''[२] राज्यात मुंबई शहर आणि मुंबई उपनगर वगळता इतर ३४ जिल्हयांमध्ये जिल्हा परिषदा आहेत. तसेच ३५१ पंचायत समित्या असून सुमारे २८ हजार ग्रामपंचायती आहेत. महात्मा गांधीजींनी स्वातंत्र्यानंतर 'खेडयाकडे चला' हा मूलमंत्र देशाला दिला. ग्रामविकासाचा कळस गाठण्यासाठी देशात पंचायतराजची स्थापना झाली. महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्या दूरदृष्टीखाली आणि वसंतराव नाईक यांच्या संकल्पनेतून पंचायतराजची आखणी झाली. आज पंचायतराजमध्ये महाराष्ट्र देशात अग्रेसर आहे. लोकशाहीचे विकेंद्रीकरण ही महत्त्वाकांक्षी संकल्पना महाराष्ट्राने स्वीकारली आहे. रयतेचे राज्य, स्थानिक स्वराज्य संस्थांचे राज्य अर्थात 'मिनी मंत्रालय' या नावाने हा कारभार प्रभावी करण्याचा प्रयत्न आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांना अनेक महत्त्वाचे अधिकार हस्तांतरित करण्यात आले आहेत. सरकारने विविध महत्त्वाच्या विषयांचे हस्तांतरण जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतीकडे केले आहे.

**खेडयांच्या विकासाला चालना**

''भारत सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांवर टाकलेल्या विश्वासामुळे व १९९२ च्या ७३ व ७४ व्या घटनादुरूस्तीमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना संवैधानिक दर्जा प्राप्त होऊन त्यांच्या विकासाला गती मिळाली.''[३] 'भारत हा खेडयांचा देश आहे आणि ही खेडीच आपल्या देशाचे भविष्य आहे', असे राष्ट्रपिता महात्मा गांधी म्हणाले होते. म्हणूनच त्यांनी नेहमीच ग्रामस्वराज्याच्या संकल्पनेवर भर दिला. पंचायतराज व्यवस्थेतील त्रिस्तरीय रचनेमुळे सत्तेचे विकेंद्रीकरण झाले. जनतेला स्थानिक प्रश्न आपल्याच पातळीवर सोडवणे शक्य झाले. ग्रामविकासाला चालना मिळाली. जगातील सर्वात मोठी संसदीय लोकशाही प्रणाली राबवणारे राष्ट्र म्हणून भारताकडे पाहिले जाते. या सर्वात मोठया लोकशाहीला स्थानिक स्वराज्य संस्थांमधील लोकशाहीच्या लहानशा प्रक्रियेतून बळकटीच मिळाली आहे.

**यशवंतराव चव्हाण यांचे सहकार क्षेत्रातील कार्य**

''भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी औद्योगिकरणाद्वारे देशाचा विकास करण्याचे स्वप्न पाहिले. पंडित नेहरूच्या या स्वप्नांना मूर्तरूप देण्याचे ध्येय महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांनी बाळगले आणि त्या दिशेने पावले उचलली. यशवंतरावांच्या या दूरदृष्टीचे फलित म्हणूनच आज महाराष्ट्र राज्य उद्योग क्षेत्रात आघाडीवर आहे. ''[४] उद्योग क्षेत्रामध्ये आपल्या राज्याने अगदी पहिल्यापासून आघाडी मिळविलेली असली तरी अद्यापही ग्रामीण महाराष्ट्र हा कृषिप्रधान आहे. या सगळया प्राचीन अर्थव्यवस्थेचा कणा सरकार चळवळ हाच आहे. महाराष्ट्राच्या प्रगतीत सहकार क्षेत्राचा वाटा लक्षणीय आहे. यशवंतरावांचे सहकार क्षेत्रातील योगदान अतिशय महत्वाचे आहे. यशवंतरावांना ग्रामीण भागातील समस्यांची खरी जाण होती. ग्रामीण भागातील जनता गरीब असण्याचे महत्वाचं कारण म्हणजे त्यांच्याकडे

असलेला भांडवलाचा अभाव होय. ग्रामीण भागातील समस्या सोडविण्यासाठी त्यांनी सहकार क्षेत्राकडे लक्ष केंद्रीत केले.

**सहकार क्षेत्रामुळे राजकीय नेतृत्वाचा उदय**

नवमहाराष्ट्राचे शिल्पकार स्व. यशवंतरावजी चव्हाण यांची संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाल्यावर सहकार क्षेत्राकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले. ग्रामीण भागातून नवे राजकीय आणि सामाजिक नेतृत्व उभे करावयाचे असेल तर त्यासाठी सहकार क्षेत्रच महत्त्वाचे ठरेल, हे त्यांनी धोरणीपणाने ओळखले होते. म्हणूनच त्यांच्या काळात सहकाराच्या एका नव्या पर्वाची सुरूवात झाली. त्या काळात जे राजकीय नेतृत्व उदयाला आले, त्या सर्वाचा पाया सहकार क्षेत्रच होते, असे बारकाईने पाहिल्यास लक्षात येईल. आज परिस्थिती नेमकी उलटी झाली आहे. आधी राजकीय स्थान मिळवायचे आणि मग त्याचा आधार घेऊन सहकारी संस्था काढायच्या, एवढे मोठे स्थित्यंतर या क्षेत्रात झाले आहे.

**लोकशाही मूल्यावर आधारीत कार्य**

'यशवंतरावांच्या कार्याचा, विचारांचा आणि धोरणांचा केंद्रबिंदू सर्वसामान्य माणूस हा होता व त्यांचे जीवनमूल्य हे लोकशाही मूल्य होते.'[५] या दोन्हींचा मिलाफ सहकारात झालेला आहे. कारण सहकार चळवळीच्या धोरणांचा, विचारांचा केंद्रबिंदू माणूसच आहे आणि या संस्थांचा कारभारही लोकशाही पद्धतीने चालविला जातो. त्यामुळे सहकाराची कार्यपद्धती ही यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वाशी जवळीक साधणारी आहे.

**सर्वसामान्य माणूस विकासाचा केंद्रबिदू**

सर्वसामान्यांच्या विकासाचे मुलभूत उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून स्व. यशवंतराव चव्हाण यांनी सहकार चळवळ गतिमान केली. पद्मश्री विखे पाटील, स्व. वसंतदादा पाटील यांनी ती वाढवली. त्यांच्या सांघिक प्रयत्नांतून सहकार म्हणजे महाराष्ट्र असे चित्र राज्यात ६० वर्षांत निर्माण झाले. देशातील एकूण सहकारी संस्थापैकी ७० टक्के संस्था एकटया महाराष्ट्रात आहेत. याचे श्रेय याच नेत्यांना जाते. सहकाराच्या माध्यमातून साखर कारखानदारी कशी यशस्वी करता येईल, याचा स्व. यशवंतराव चव्हाण यांनी अभ्यास केला आणि सहकारी साखर कारखानदारीला राज्यात सर्वत्र पोषक वातावरण तयार केले. ग्रामीण भागातील लक्षावधी शेतकरी, युवक, उद्योजक आणि सर्वसामान्यांच्या आयुष्याला मोलाची साथ देणारी सहकार चळवळ हे महाराष्ट्राचे आगळेवेगळे वैशिष्टय आहे. ते कायम टिकविणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

**निष्कर्ष**

कृषी औद्योगिक विकासाचा महाराष्ट्र उभा करण्यासाठी स्व. यशवंतरावजी चव्हाण यांनी दिलेल्या विकासाच्या प्रारूपामध्ये मुख्य प्रेरणाकारक घटक होते. यामध्ये शिक्षण, सहकार व पंचायत राज, म्हणजेच लोकशाही विकेंद्रीकरण शिक्षणातून मानवी भांडवल, उत्पादक कौशल्ये, कल्पक उद्योजक, जबाबदार नेतृत्व, निर्मितीक्षम संशोधक व सामाजिक उत्तरदायित्व जपणाऱ्या नेतृत्वाची निर्मिती. सहकारी अर्थकारण व संघटन सामान्य माणसाच्या कल्याणाच्या निकषावर उत्पादन व वितरण व्यवस्था आयोजित करते व त्यामुळे विकासाचा लाभ जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचतो, असा विश्वास यशवंतराव चव्हाण यांचा होता. तसेच कृषी व औद्योगिक विकासाला चालना देताना राज्याच्या वेगवेगळया भागात धरणे बांधण्याचे धोरण स्विकारले. नियोजनबध्द आर्थिक विकासाचे धोरण स्विकारताना महाराष्ट्रात पंचवार्षिक योजनांचा प्रारंभ केला. तळागाळातील माणसांचे कल्याण करण्याचे धोरण स्विकारून कृषी आणि औद्योगिक विकासावर भर दिला. प्रशासन आणि राजकीय कार्यकर्ते यांच्यातील समन्वयाला नवी दिशा दिली. एकूणच महाराष्ट्राच्या विकासाला दिशा देणारे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय त्यांनी घेतले.

ISSN : 2278-9308
March, 2021

राजकीय नेत्यांनी घेतलेल्या निर्णयांची योग्य अंमलबजावणी करण्याचे काम योग्य आणि कार्यक्षम प्रशासनावर असते. हे यशवंतराव चव्हाण चांगले जाणून होते. वेगवेगळया सरकारी, निमसरकारी व अनुषंगित संस्थाचे यशापयश चांगल्या प्रशासकीय कार्यावर अवलंबून असते. स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्राला तसेच देशाला फक्त कायदा व सुव्यवस्था या स्वरूपाच्या प्रशासनाची गरज नसून विकासाभिमुख प्रशासनाची महाराष्ट्राला गरज आहे. हे यशवंतराव चव्हाण यांनी निर्माण केलेल्या महाराष्टातील पंचायतराज व्यवस्थेसंबंधीच्या कार्यावरून दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ**

१) जोशी रामभाऊ, १९७६,यशवंतराव:इतिहासाचे एक पान, केशरी मुद्रणालय, पुणे, पृ. क्र. २१४.
२) लोकराज्य, मार्च २०१२, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,महाराष्ट्र शासन पृ. क्र. ३०.
३) शिरसाठ शाम, बैनाडे भगवानसिंग, २००६,भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था,विद्या पब्लिशर्स, औरंगाबाद, पृ. क्र. २६.
४) लोकराज्य,ऑक्टोबर २०१२,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,महाराष्ट्र शासन पृ. क्र. २३.
५) लोकराज्य, सप्टेंबर २०१२, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासनपृ. क्र. ०५.

# यशवंतराव चव्हाण आणि बहुजनांचे सक्षमीकरण

डॉ भारत वि कल्याणकर/ डॉ. प्रविण सु. सदार
छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय आसेगाव पुर्णा,जिल्हा अमरावती.
kalyankarbharat16@gmail.comCell: - 9422546747

महात्मा फुले, शाहू महाराज, आगरकर, गोखले, लोकमान्य टिळक,इत्यादींनी महाराष्ट्रात सामाजिक परिवर्तन घडून आणले पण परिवर्तनाच्या प्रक्रियेत नव महाराष्ट्राच्या निर्मितीपासूनच बहुजन समाजातल्या माणसाचे अस्तित्व यशवंतरावांनी शोधले . बहुजन समाजातल्या अठरापगड जाती जमातीचे रूप जवळून यशवंतरावांनी अनुभवले होते ते त्यांनी केवळ बुद्धीने पाहिले नव्हते तर मनाने देखील अनुभवले होते.

1960 नंतर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले आणि सामाजिक, राजकीय,आर्थिक, आणि सांस्कृतिक क्षेत्रात परिवर्तनाची सुरुवात झाली. यशवंतरावांचा वारसा सत्यशोधकाचा आणि सार्वजनिक जीवनात सत्यशोधकीय वारसा त्यांनी कधी सोडला नाही. स्वातंत्र्योत्तर काळात व विशेषता महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर 'बहुजन'या शब्दाचा यशवंतराव चव्हाणांनी परवलीचा बनवला.या शब्दाला लोकशाहीचा साज तर होताच शिवाय त्यात बेरजेच्या राजकारणाचेही एक नवे परिमाण होते. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर ची यशवंतरावांची सर्व भाषणे याची साक्ष देतात.बहुजन शब्द या काळात बेरजेच्या राजकारणातील चलनाने बनला. एक नवोदित भाषिक राज्य स्थिरावण्यासाठी राज्यातील विविध घटकांमध्ये जी किमान सहमती असावी लागते ती साध्य करण्यासाठी हे बेरजेचे राजकारण आवश्यकही होते ते करून चव्हाणांनी एक द्रष्टेपण दाखवले हे ही निर्विवाद.यशवंतरावांनी सुरुवातीपासूनच महाराष्ट्रात बहुजन समाजाला पुरक कृषी औद्योगिक समाज व संस्कृती निर्माण करण्याचे ध्येय व उद्दिष्टे आणि त्यातून काढण्याचा मार्ग प्रथमतः सार्वजनिक जीवनात महाबळेश्वर मधील काँग्रेस पक्षाच्या शिबिरातून सर्वांच्या पुढे ठेवला आणि पुढे त्यासोबतच पंचायतराजच्या माध्यमातून बहुजन समाजाचे एक नेतृत्व त्यांनी निर्माण केले यशवंतरावांची सांस्कृतिक वैचारिक संपन्नता ही वैयक्तिक होती प्रातिनिधिक नव्हती त्यामुळे त्यांनी बहुजन समाजात सांस्कृतिक वैचारिक उन्नयनायाची एक गरज, एक प्रेरणा, व जाणीव निर्माण करण्यासाठी उपयोग केला.

देशामध्ये पंचायत समित्या, जिल्हा परिषदा प्रथम महाराष्ट्रात उभ्या करून बहुजन समाजाला राजकीय क्षेत्रातील द्वार उघडे करत यशवंतरावांनी विकेंद्रित लोकशाहीचा पाया भक्कम केला इतकेच नव्हे तर सहकार चळवळी आणि सार्वजनिक संस्था उभ्या करतानाही खूप कष्ट घेतले. ग्रामीण भागातला शेतकरी अडचणीत येणार नाही याकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले. आणि त्याबरोबरच महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी समृद्धीसाठी त्यांनी पावले टाकलेली होती. साहित्य, कला, संगीत, उद्योगाचा पाया यशवंतरावांनी घातला सीकॉम सारख्या महत्वपूर्ण संस्था यशवंतरावजी असतानाच झाल्या आणि अश्या

प्रकारच्या संस्थांच्या विकेंद्रीकरणाचा व्यापक दृष्टिकोन त्यांच्याकडे होता त्यामुळेच त्याचा वैचारिक पाया देखील त्यांनीच उभा केलेला आहे.

यशवंतरावानी बहुजन समाजाचे हित लक्षात घेऊन कृषी- औद्योगिकरचने बरोबर बहुजन समाजाच्या सांस्कृतिक परिवर्तनासाठी सतत प्रयत्नशील राहिले. त्यांनी ग्रामीण भागातला शेतकऱ्याला सहकाराच्या माध्यमातून आर्थिक बळ दिले भूविकास बँका, सहकारी बँका यांना प्राधान्य देऊन शेतकऱ्यांच्या जीवनात गुणात्मक दैनंदिन बदल केले.साखरकारखानदारी बरोबर बहुजन समाजात निर्माण झालेल्या उणिवांवरही त्यांनी वेळ प्रसंगी टीकाही केली

आहे. बहुजन समाज सर्वार्थाने प्रगत व्हावा अशी त्यांची धारणा होती. शेती करणारा माणूस नुसता श्रीमंत होता कामा नये तर त्या श्रीमंती बरोबर त्याच्या घरात चार पुस्तके हवीत याची देखील त्यांना ओढ होती. समाज आर्थिक दृष्ट्या प्रगत होण्यात त्यांना स्वारस्य होते पण आर्थिक आणि मानसिक स्वास्थ्य टिकविण्यासाठी मन सुसंस्कृत ठेवले पाहिजे हेही त्यांनी बहुजन समाजाला सातत्याने सांगितले. सामान्य माणसासाठी सत्ता राबवली ती राबवत असताना त्या सत्तेचा कोणी गैरफायदा घेणार नाही या गोष्टीकडे ही त्यांनी गांभीर्याने लक्ष दिले, म्हणूनच सामान्य माणसाला मनापासून प्रेम वाटत राहिले. यशवंतरावांना महाराष्ट्राचे आधुनिक शिल्पकार म्हणतात याचे कारण महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा पाया त्यांनी घातला.

**शैक्षणिक कार्य :-**

यशवंतरावांनी बहुजन समाजातील युवकां चा विकास साधायचा असेल तर शिक्षणा शिवाय दुसरा पर्याय नाही हे त्यांनी ओळखले होते, त्यासाठी शैक्षणिक कार्याला गती देण्यासाठी पुस्तिका शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षणापर्यंत विविधरंगी कार्यक्रम त्यांनी मोठ्या प्रमाणावर सुरू केले. मुलोउद्योग शिक्षणाला चालना दिली. प्रौढ शिक्षणाची व्याप्ती वाढवली मोफत शिक्षणाची योजना राज्यात प्रथमच सुरू केली. त्यामुळे शिक्षणाची दारे बहुजन समाजासाठी खुली झाली. त्यांनी शिक्षण क्षेत्रातील, साहित्य क्षेत्रातील कार्याबरोबरच स्थापत्य -अभियांत्रिकी, व तंत्र शिक्षण संस्थांचे जाळे विणण्याच्या कार्यक्रमाचा पाया रचला. मराठवाड्यामध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी शैक्षणिक संस्थांना सढळ हस्ते अनुदाने दिली. मराठवाडा करिता स्वतंत्र विद्यापीठाची शिफारस करून 23 ऑगस्ट 1958 रोजी त्याचे तत्कालीन देशाचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते उद्घाटन केले.आरे- डेअरी मधील डेअरी टेक्नॉलॉजी संस्थेत भारतीय दुग्धालय पदविका अभ्यासक्रम यशवंतरावांच्या कारकीर्दीत सुरू झाला. अशा प्रकारचा हा भारतातील पहिला अभ्यासक्रम होय.

आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी त्यांनी काही महत्त्वपूर्ण निर्णय घेतले शिक्षणाची गंगा आदिवासींच्या दारी पोहोचविण्याच्या दृष्टीने त्यांनी आश्रमशाळांचे योजना आखली.

सातारा येथील सैनिकी स्कूलची स्थापना केल्याने नॅशनल डिफेन्स अकादमीसाठी शिक्षण मिळण्याची व्यवस्था या स्कूलमध्ये उपलब्ध झाली. भारतातील हे अशा प्रकारचे पहिले सैनिकी स्कूल ठरले.

दक्षिण महाराष्ट्रासाठी कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय यशवंतरावांनी आपल्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकिर्दीत घेतला पुढे त्याची स्थापना 18 नोव्हेंबर 1962 रोजी राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यांच्या हस्ते झाले.

**सहकार क्षेत्रातील कार्य:-**

सहकारी क्षेत्र विस्तृत करण्यासाठी व त्याचा ग्रामीण जीवनाच्या आर्थिक परिस्थितीवर अनुकूल परिणाम घडविण्यासाठी सहकाऱ्याला त्यांनी चालना दिली.ग्रामीण भागातील समाजाचे जीवन सुधारण्यासाठी त्यांना कर्ज पुरवठ्याची सोय त्यांनी सहकारी बँका, भूविकास बँका, प्राथमिक भूविकास बँका, यांच्यामार्फत करून दिली. मुंबई राज्यसभा कुळ कायदा लागू करून कसेल त्याला जमिनीत हे तत्त्व त्याने स्वीकारले. त्यामुळे महाराष्ट्राच्या शेती क्षेत्रात जमिनी मालकीच्या क्षेत्रात प्रचंड क्रांती झाली. खास जमीन धारा पद्धत नष्ट करण्याचा कायदा अमलात आणून राज्यातील जहागीरदारी पद्धत नष्ट केली. देशात सर्वप्रथम शेतजमिनीच्या कमाल धारणेवर मर्यादा घालण्याचा

सिलिंग कायदा करून संपूर्ण देशात महाराष्ट्र राज्य ही खऱ्या अर्थाने पुरोगामी असल्याचे प्रत्ययास आणून दिले. शेती पिकवण्यासाठी पाणीपुरवठ्याची कायमची व्यवस्था करण्याच्या दृष्टीने पाटबंधारे,पाणीपुरवठा, पाण्याची उपलब्धता व

वीजनिर्मिती अशा विविध हेतूने त्यांनी कामाची आखणी केली. त्यातूनच पुढे मुंबई राज्य इरिगेशन बोर्डाची स्थापना केली.पश्चिम महाराष्ट्राचे भाग्य उजळून करणाऱ्या कोयना जलविद्युत योजनेचा प्रारंभ 01 मार्च 1958 रोजी यशवंतरावांच्या हस्ते झाला.मराठवाड्याचा कायापालट घडविणाऱ्या पूर्णा प्रकल्पाचा प्रारंभ यशवंतरावांच्या हस्ते झाला. आणि विदर्भातील पारस थर्मल पॉवर स्टेशन या भव्यदिव्य प्रकल्प यशवंतरावांनी आपल्या कारकिर्दीत पूर्ण केला.राजकारणात आपले म्हणजे बहुजन समाजाचे स्थान बळकट करण्याकरता त्यांनी शासनाच्या भरभक्कम राजकीय व आर्थिक पाठिंब्यावर सहकारी क्षेत्रात विविध तऱ्हेच्या संस्थांचे जाळे निर्माण केले त्यात प्रामुख्याने सूतगिरण्या तेलगिरण्या दुग्धपालन, कुक्कुटपालन, मासेमारी,रेशीम उद्योग,ग्राहक भांडारे, खरेदी विक्री संघ, फळे व भाजीपाला विक्री व प्रक्रिया संघ आणि सहकारी साखर कारखाने यातून बहुजन समाजात खास नवा राजकीय आर्थिक सत्ता असलेला सामाजिक स्तर यशवंतरावांनी उभा केला आहे.

आज महाराष्ट्रात सर्वच पातळीवर प्रशासकीय सत्ता बहुजन समाजाच्या हाती गेली आहे याचे मोठे श्रेय यशवंतरावांना द्यावे लागेल.

**सामाजिक कार्य:-**

बौद्ध धर्माचा स्वीकार करणाऱ्या हरिजनांना मिळणाऱ्या सवलती सरकारने बंद केले होते.हरिजन आणि बौद्ध धर्म स्वीकारला नेत्यांचा सामाजिक आर्थिक व शैक्षणिक मागासलेपणा कमी होणार नव्हता हरिजनांना मिळणाऱ्या सवलती पोत धार्मिकांना मिळाव्यात ही मागणी यशवंतरावांनी मान्य केली. त्यांना सवलती देण्याचे आदेश काढले. बॉम्बे इन्फिरिअर व्हिलेज वॉन्टस □बॉलिशन ॲक्ट 1958 हा कायदा करून महार वतन पद्धतीला प्रतिबंध केला. व वतन जमिनी या पूर्ण शेत पतीच्या तिप्पट किंमत घेऊन वहिवाटदार मालकांना मालकी हक्काने परत ताब्यात दिल्या.

भूमिहीनांना जमिनी वाटपाचे काम ही त्यांनी सुरू केले

नागपूर येथे दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारण्याचा निर्णय त्यांनीच घेतला व तसेच 14 एप्रिल रोजी डॉ. आंबेडकर जयंती दिनी सार्वजनिक रजा जाहीर केली.

**साहित्य, संस्कृतिक,कला क्षेत्रातील कार्य:-**

एप्रिल 1957 पासून चित्रपटांना करमणूक करात सूट देण्याची नवीन पद्धत लागू केली. अनेक प्रादेशिक भाषेतील उत्कृष्ट पुस्तकांना बक्षिसे जाहीर केली त्याबरोबरच कलावंतांना शासनामार्फत आर्थिक साहाय्य देण्याची प्रथा यशवंतरावांनी सुरुवात केली पुण्यातील बालगंधर्वांना त्यांच्या विपण्णावस्थेत 300□ मासिक मानधन सुरू केले तसेच राज कवी यशवंत यांना महाराष्ट्र कवी म्हणून भूषवून त्यांना चारशे रुपये मासिक मानधन देण्याचा निर्णय घेतला. 21 डिसेंबर 1960 रोजी महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे उद्घाटन यशवंतरावांनी केले या मंडळाची स्थापना म्हणजे महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर संस्कृती क्षेत्रात झालेली एक महत्त्वपूर्ण घटना होय. 17 मे 1962 रोजी वाई येथे साहित्य व संस्कृती मंडळाने स्थापन केलेल्या विश्वकोश कार्यालयाचे उद्घाटन यशवंतरावांच्या हस्ते झाले. महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर गुढीपाडव्या सार्वजनिक सुट्टी देण्याचा निर्णय देखील यशवंतरावांनी घेतला. नाट्य कलेला उत्तेजन देण्यासाठी नाटकाच्या पुस्तकांना बक्षिसे, हौसी कलावंतांचा नाट्यमहोत्सव, खुल्या नाट्यगृहाची निर्मिती गरीब कलावंतांना आर्थिक साह्य संगीत नृत्य आणि नाट्य शाळांना अनुदान तमाशा यांना पारितोषिके अधिक

गोष्टी महाराष्ट्रामध्ये यशवंतराव जींनी सर्वप्रथम सुरू करून प्रशासकीय गुन्हा बरोबरच आपल्या रसिक व कलाप्रेमी वृत्तीचा परिचय त्यांनी जनतेला करून दिला

अशाप्रकारे महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक समाजाला प्रदेशाला गटाला योग्य न्याय वागणूक मिळेल असे धोरण यशवंतरावांनी राबविले आणि या सर्व गोष्टी राबविणाऱ्या प्रशासनाची कार्यपद्धती ही त्यांनी निश्चित केली. यशवंतरावांच्या सुसंस्कृतपणाची,कर्तृत्वाची नोंद महाराष्ट्राच्या जनतेने जेवढी घेतली तेवढी राजकारण्यांनी घेतली नाही असे वक्तव्य शरद पवार यांनी केले आणि यशवंतराव नुसते राजकारणी नव्हते तर त्यांच्या राजकारणाला समाज शास्त्रज्ञांची जोड होती असे वक्तव्य अण्णासाहेब शिंदे यांनी केले यावरूनच यशवंतरावांची बहुजन समाजाच्या प्रगती मागील प्रतिभा लक्षात येते

संदर्भ ग्रंथ सूची :-

1) यशवंत किर्तीवंत,लोकराज्य मासिक,मुंबई,मार्च 2012
2) बापट राम, 2015 : भारतीय राजकारण :मर्म आणि वर्म, लोकवांगमय गृह, मुंबई.
3) शेवते अरुण,1998 : कृष्णाकाठचा माणूस, ऋतुरंग प्रकाशन,मुंबई 63

# साहित्यप्रेमी यशवंतराव चव्हाण

प्रा. डॉ. बडुरे राजू सायन्ना
मराठी विभाग,श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी
भ्रमणध्वनी : ९०४९१२९६९८

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून ज्यांचा सार्थ गौरव केला जातो ते म्हणजे महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री, केंद्रीय गृहमंत्री, अर्थमंत्री, परराष्ट्रमंत्री, उपपंतप्रधान असे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असणारे यशवंतराव चव्हाण होय. यशवंतरावांचा जन्म १२ मार्च १९१३ रोजी देवराष्ट्रे ता. खानापूर जि. सांगली येथे बळवंतराव व विठाबाई या गरीब शेतकरी दांपत्याच्या पोटी झाला. बळवंतराव व विठाबाई या दांपत्यास अनुक्रमे ज्ञानोबा, राधाबाई, गणपतराव आणि यशवंतराव अशी चार अपत्ये होती. यशवंतरावांच्या घरची परिस्थिती अत्यंत बेताची होती. त्यांच्याकडे फक्त तीन ते चार एकर कोरडवाहू शेती होती. इ.स. १९१८ मध्ये यशवंतरावांचे वडील बळवंतरावांचे निधन झाले. त्यावेळी यशवंतरावांचे वय फक्त चार वर्षाचे होते. बालपणातच यशवंतरावांचे पितृछत्र हारवले. वडिलांच्या निधनानंतर घरची संपूर्ण जबाबदारी यशवंतरावांच्या आईवर विठाबाईवर येऊन पडली.

यशवंतरावांचे प्राथमिक शिक्षण देवराष्ट्रे येथील शाळेतून झाले. ते लहानपणापासूनच वर्गामध्ये अतिशय हुशार होते. त्यांना लहानपणापासूनच वाचण्याचा व लिखाणाचा छंद होता. १९३१ मध्ये कऱ्हाडच्या टिळक विद्यालयातर्फे आणि पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयातर्फे वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांना वेळेवर एखादा विषय देऊन दहा मिनिटे बोलण्याची संधी दिली जात होती. यशवंतरावांना 'ग्रामसुधारणा' हा विषय देऊन बोलण्यास सांगितले. त्यांचे या विषयावरील भाषण ऐकूण परिक्षक खूश झाले. त्यांना पुन्हा दहा मिनिटे देण्यात आली. या स्पर्धेमध्ये यशवंतरावांना १५० रूपयांचे प्रथम पारितोषिक मिळाले. इ.स. १९३४ मध्ये वयाच्या विसाव्या वर्षी ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. यशवंतरावांनी बी.ए. करण्यासाठी कोल्हापूर येथील राजाराम महाविद्यालयात प्रवेश घेतला. या महाविद्यालयात त्यांना प्राचार्य बाळकृष्ण व प्रा. ना.सी. फडके यांचा सहवास व मार्गदर्शन मिळाले. बी.ए. ला इतिहास आणि अर्थशास्त्र हे विषय घेऊन ते १९३८ मध्ये पदवीधर झाले. १९४१ साली त्यांनी पुण्यातून कायद्याची पदवी (एल.एल.बी.) उत्तीर्ण झाले. ०२ जून १९४२ रोजी त्यांचे लग्न फलटणच्या मोरे कुटुंबातील कुटुंबवत्सल अशा वेणूताई यांच्याशी झाला.

यशवंतराव चव्हाण यांना लहाणपणापासूनच ग्रंथ वाचण्याची अतिशय आवड होती. त्यांचे साहित्यावर खूप प्रेम होते. त्यांना चांगल्या दर्जेदार मराठी व इंग्रजी पुस्तकांची आवड होती. ते जेंव्हा जेंव्हा प्रवास करीत असत तेंव्हा त्यांच्या बॅगेत दोन–तीन पुस्तके नक्कीच असायची. प्रवास करीत असतांना ते ग्रंथाचे वाचन करीत असत. आपले दैनंदिन काम आटोपल्यानंतर ते दररोज रात्री ग्रंथाचे वाचन करीत असत. विदेशी दौऱ्यावर असतांना त्यांच्या नियोजित कार्यक्रमातून वेळ काढून ते इंग्लंड आणि अमेरिकेतील प्रसिध्द पुस्तकालयांना भेटी देऊन अनेक ग्रंथांची खरेदी करीत असत. यशवंतरावांचा दुर्मिळ आणि उपलब्ध ग्रंथ वाचनाकडे अधिक कल होता. यशवंतरावांच्या जीवनातील सर्वात प्रिय वस्तू म्हणजे ग्रंथ होते. एखादे ग्रंथ जर दिल्लीत उपलब्ध नसेल तर ते ग्रंथ यशवंतराव मुंबईहून मागवून घेत असत. त्यामुळे सतत ग्रंथ खरेदीमुळे त्यांचा ग्रंथ संग्रह हा सतत वाढत असे. यशवंतरावांचे असे म्हणणे होते की, एखाद्या व्यक्तिला भेटवस्तू देण्यापेक्षा त्यांना ग्रंथ भेट द्यावा म्हणून यशवंतरावांना कोणी वस्तूभेट दिल्यापेक्षा ग्रंथ भेट दिले तर त्यांना फार फार आनंद होत असे. ते एखादे ग्रंथ वाचण्यासाठी घेतले असता त्याचे पूर्ण वाचन झाल्याशिवाय त्यांना समाधान मिळत नसे. यशवंतरावांना नवीन काही वाचन केल्यामुळे त्यांच्या ज्ञानात भर पडल्याचा आनंद होत असे. इतके त्यांचे साहित्यावर प्रेम होते.

यशवंतरावांचे मराठी भाषेवर व साहित्यिकांवर प्रेम होते. मराठी भाषेत 'विश्वकोश' तयार व्हावा आणि त्या विश्वकोशाची निर्मिती उत्तम व्हावी यासाठी विश्वकोशाची जबाबदारी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यावर ती सोपवली होती. त्यामुळेच मराठी विश्वकोशाची निर्मिती दर्जेदार झालेली दिसून येते. इ.स. १९६१ मध्ये नवोदित लेखकांना प्रेरणा मिळावी आणि मराठी भाषेत दर्जेदार ग्रंथ प्रसिध्द व्हावे म्हणून 'महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाची' स्थापना यशवंतरावांनी केली.

यशवंतरावांचा जसा साहित्य व साहित्यिकांबद्दल आदर होता. त्याचप्रमाणे कलाकाराबद्दलही त्यांना आदर होता. अनेक वेळा ते पेंटिंगचे प्रदर्शन बघण्यास जात असत आणि त्यांना आवडलेल्या चित्राकृतीची खरेदी करीत असत. त्याचबरोबर त्या कलाकारांचे मनभरून कौतूकही करीत असत. यशवंतरावांनी त्या कलाकारांचे मन आणि भावना जोपासण्याचा सतत प्रयत्न केला.

यशवंतरावांचे आणखी एक वेगळेपण म्हणजे सुसंस्कृतपणा व साहित्याबद्दलची असलेली ओढ होय. त्या काळातील मराठी साहित्यिक ग.दि. माडगूळकर, रणजित देसाई, कवी यशवंत, पु.ल. देशपांडे, ना.धो. महानोर, व्यंकटेश माडगूळकर, श्रीनिवास कुलकर्णी, लक्ष्मण माने, भाऊसाहेब खांडेकर इत्यादी साहित्यिकांच्या सहवासासाठी ते आसुसलेले असत. त्यांना जेंव्हा एखादा साहित्यिक भेटायला आला असेल तर ते आपूलकीने त्यांचे स्वागत करीत असत. त्यांचा सत्कार ते करीत असत. साहित्याबद्दल त्यांच्याशी दीर्घ अशा प्रकारची चर्चा ते करीत असत. कौटुंबिक पातळीवर आणि स्वत:च्या घरी साहित्यिकांचा सत्कार करणारा, मनाचा मोठेपणा दाखविणारा नेता म्हणून त्यांची ख्याती होती. आज अशा प्रकारचा नेता दुर्मिळ झाला आहे. यशवंतराव हे काम, क्रोध, मद, मत्सर, दंभ आणि अहंकारापलीकडे पोहचलेले होते. म्हणून त्यांच्या मनाच्या मोठेपणाच्या कक्षा वृंदावतच गेल्या. कोणाबद्दलही व्देष न करता वागावे, होईल तितके आपल्या शक्तीप्रमाणे दुसऱ्याला उपयोगी पडणे हे गुण यशवंतरावांकडे होते.

यशवंतराव चव्हाण हे सुध्दा एक साहित्यिक होते. त्यांना जसे ग्रंथ वाचण्याची आवड लहाणपणापासून होती तसेच लहाणपणापासूनच ते कविता लिहीत होते. शालेय जीवनात कोठेही पुस्तक वही मिळाली की यशवंतराव त्यावर कवितेच्या ओळी लिहीत असत. यशवंतरावांनी शिवनेरीच्या नौबती, युगांतर, ऋणानुबंध, सहयाद्रीचे वारे, कृष्णकाठ आणि भुमिका इत्यादी ग्रंथ लिहीले. त्यांची भाषाशैली साधी, सोपी, निर्मळ, प्रसन्न, प्रासादिक, स्पष्ट, ओघवती आणि ओजस्वी होती. ती माणसाच्या ह्रदयाला जाऊन भिडत असे. यशवंतराव हे राजकारणात गेले नसते तर फार मोठे साहित्यिक झाले असते. हे त्यांच्या लेखनशैलीवरून आपणास निदर्शनास येते.

यशवंतराव चव्हाण हे देशातील एकमेव राजकारणी व्यक्ती असेल की ज्यांच्यावर सर्वात जास्त ग्रंथ लिहिण्यात आले आहे. कारण ते मोठया दिलाचे, सुस्वभावी, समंजस, साहित्यिकांचा मान–सन्मान करणारे, सगळयांना सोबत घेऊन जाणारे, विरोधकांचे सुध्दा मन जिंकणारे, मित्रवेडा व्यक्ती होते. त्यांचे साहित्य व साहित्यिकांवर खूप प्रेम होते. म्हणून 'साहित्यप्रेमी यशवंतराव चव्हाण' हा यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक महत्त्वाचा आणि आकर्षक पैलू समजला जातो.

**संदर्भ ग्रंथ :**

१. डॉ. गंगाधर वि. कायंदे : 'यशवंतराव चव्हाण– राजकारण आणि साहित्य'.
२. संपा. वसंत केशव पाटील : 'यशवंतराव : विचार आणि वारसा'.
३. भास्कर लक्ष्मण भोळे : 'यशवंतराव चव्हाण : राजकारण आणि साहित्य'.
४. लोकराज्य : 'यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी विशेषांक मार्च २०१२'.
५. विठ्ठलराव वि. पाटील : 'महाराष्ट्राचे शिल्पकार'.

# यशवंतराव चव्हाण यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान

**प्रा. उगीले माधव उत्तमराव**
समाजशास्त्र विभाग रामकृष्ण परमहंस महाविद्यालय उस्मानाबाद.
E-mail-ugilemahadev06@gmail.com ,Mob No : 9423721390

**प्रस्तावना :-**

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार असे ज्यांच्या कर्तृत्वाचे सार्थ वर्णन केले जाते ते महाराष्ट्राचे पहीले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे महाराष्ट्र व देशाच्या संदर्भातील कार्य आणि कर्तृत्व उत्तूंग व उच्च प्रतीचे आहे. त्यांचा पिंड स्वातंत्र्य चळवळीतून तयार झालेला होता. संघर्षमय जीवनातून स्वबळावर पुढे आलेला कर्तबगार लोकनेता, माणसातला माणुस शोधणारा, समाजवादी अर्थ कारणाचा पुरस्कार करणारा संघर्ष ऐवजी समन्वयाची भूमीका घेणारा थोर देशभक्त, मुत्सद्दी, व्यवहारी, थोर चारित्र्य संपन्न नेता, सुसंस्कृत राजकारणी, सहयाद्रीचा प्रतिभा संपन्न नेता यशवंतराव चव्हाण यांचे आधुनिक महाराष्ट्राच्या अडचणघडणीत फार मोठे योगदान राहीले आहे. यशवंतरावानी आपल्या वैचारीक संपन्नतेमुळे महाराष्ट्राला स्थीर व भक्कम शासन दिले परिणामी महाराष्ट्राची शेती शिक्षण, उदयोगाचा विकास झाला. महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक, औद्योगिक, शैक्षणिक, सांस्कृतीक क्षेत्रात अमुलाग्र परिवर्तन घडविले. यशवंतराव चव्हाण यांनी शहराप्रमाणे ग्रामीण जीवनाच कायापालट केला .

प्रस्तूत शोधनिबंधात यशवंतराव चव्हाण यांनी शैक्षणीक क्षेत्रातील दिलेल्या योगदानाचा आढावा घेण्यात आल आहे.

**शोधनिबंधाचा उद्देश :-**

१) यशवंतराव चव्हाण यांचे शिक्षण विषयक कार्य अभ्यासणे

२) यशवंतराव चव्हाण यांचे शिक्षण विषयक विचार अभ्यासणे

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तूत शोधनिबंधासाठी दुय्यम साधनाचा उपयोग केला आहे त्यामध्ये संदर्भग्रंथ, मासिके, वर्तमानातील लेख, इंटरनेट इत्यादी दुय्यम साधनांचा उपयोग केला आहे.

**यशवंतराव चव्हाण यांचे शिक्षण विषयक कार्य :-**

यशवंतरावानी महाराष्ट्राच्या आधुनिक शिक्षणाच पाया भक्कम करण्यासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. यशवंतरावानी अनेक शैक्षणिक सवलती, स्कॉलरशिप जाहीर केल्या मुलभूत स्वरूपाच्या शैक्षणिक संस्था स्थापन केल्या अनेक संस्थांना प्रेरणा दिल्या मुळेच शैक्षणिक क्षेत्रात महाराष्ट्र प्रगत राज्य म्हणून ओळखले जाते.

**१) आर्थिकदृष्टया मागास वर्गासाठी मोफत शैक्षणिक सवलत :-**

यशवंतराव चव्हाण यांनी अत्यंत बिकट परिस्थितीमधून वकिलीचे शिक्षण पूर्ण केले होते. यामुळे गरीबाना शिक्षण घेत असताना किती अडचणी येतात याचा अनुभव त्यांना होता ग्रामीण भागातील शेतकऱ्याच्या मुलांना, दलित, अउपेक्षीत, वंचित अशा बहुजन समाजातील मूलांना शिक्षण घेणे परवडत नव्हते मुख्यमंत्री झाल्यानंतर महाराष्ट्रामध्ये रू. ९०० पेक्षा कमी उत्पन्न असलेल्या आर्थिकदृष्टया मागास वर्गासाठी मोफत शिक्षण देण्यच योजना यांनी सुरू केली अशा प्रकारची सवलत देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. त्यामुळे शिक्षणाची दारे सर्वासाठी खुली झाली याचा लाभ आर्थिक दृष्टया मागास वर्गातील लोकांना अधिक झाला. प्रारंभी ज्या पालकाचे उत्पन्न ९००/- रूपयापेक्षा जास्त नसेल अशांच्या पाल्यांना मोफत शिक्षणाचा नियम लागू केला व लवकरच ही मर्यादा १,२००/- रूपयापर्यंत वाढवली या सोयीमुळे ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार व्हायला चांगली चालना मिळाली.

**२) सातारा सैनिक स्कूलची स्थापना :-**

ग्रामीण भागातील बहुजन समाजातील विद्यार्थी देशच्या सैनयदलात सहभागी व्हावेत. या उद्देशाने त्यांनी सातारा येथे सैनिकी स्कूलची स्थापना केल्यने नॅशनल डिफेन्स अकादमीसाठी शिक्षण मिळण्याची सोय या स्कूलमध्ये उपलब्ध झाली. भारतातील अशा प्रकारचे हे पहिले सैनिकी स्कूल ठरले. या सैनिक स्कूलमुळे महाराष्ट्रातील अनेक तरूण भारतीय संरक्षण दलामध्ये नौदलांमध्ये आणि हवाई दलामध्ये अधिकारी झाले आहेत यशवंतरावानी हे फार मोठे योगदान महाराष्ट्राला दिले आहे.

**३) मराठवाडा विद्यापीठाची स्थापना :-**

उच्च शिक्षणाची संधी बहुजन समाजातील व दलित वर्गातील विद्यार्थ्यांना मिळावी म्हणून यशवंतरावानी मराठवाडया करीता स्वतंत्र विद्यापीठाची स्थापना २३ ऑगस्ट १९५८ रोजी केली. या विद्यापीठात शिक्षण घेऊन अनेक विद्यार्थी महाराष्ट्राच्या व देशाच्या राष्ट्र उभारणीत योगदान देत आहेत या विद्यापीठाच्या स्थापनेमुळेच उच्च शिक्षणाची गंगा बहुजन समजापर्यंत पोहचली मराठवाडयात शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी अनेक शैक्षणिक संस्थांना त्यांनी सढळ हातानी अनुदाने दिली.

**४) मराठी राज्यभाषा :-**

महाराष्ट्र राज्य निर्मीती नंतर मराठी भाषा ही राज्यभाषा करण्याचे यशवंतरावानी ठरवले त्यासाठी भाषा संचालनायाची निर्मीती करण्यात आली सरकारी कारभारात मराठी भाषेत माध्यम म्हणून उपयोग करण्यासाठी त्वरीत उपाय योजण्यात आले मातृभाषेतून कारभार चालू झाल्यामुळे लोक समाधानी झाले. कारभारात पारदर्शकता निर्माण झाली महाराष्ट्रातील विद्यापीठांनी उच्च शिक्षणाचे माध्यम म्हणून मराठीचा अवलंब करण्याच्या दृष्टीने पावले उचलावीत अशी अपेक्षा व्यक्त केली उच्च शिक्षणाचे माध्यम मराठी करून त्यांनी मातृभाषेतून शिक्षण देण्याची संधी उपलब्ध करून दिली लोकभाषा ज्ञान भाषा असल्याशिवाय ज्ञान लोकापर्यंत पोहचनार नाही म्हणून यशवंतरावानी उच्च शिक्षणाचे माध्यम मराठी केले.

**५) रयत शिक्षण संस्थेस मदत :**

रयत शिक्षण संस्थेच्या सर्वांगीण विकासामध्ये यशवंतरावाचे योगदान महत्तवपूर्ण आहे सन १९५८ - ५९ मध्ये रयत शिक्षण संस्थेचा सुवर्ण महोत्सव साजरा करण्याचे ठरले यशवंतरावानी या सुवर्ण महोत्सवात शासनाच्या वतीने रू.२००,०००/- (दोन लाख रूपये) देनगी दिली होती. यशवंतराव हे रयत शिक्षण संस्थेचे (८ जून १९६० ते २५ नोव्हेंबर १९८४) अध्यक्ष होते. रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष झाल्यावर ते म्हणाले ''महाराष्ट्राचा मुख्यमंत्री होण्यापेक्षा रयत शिक्षण संस्थेचा अध्यक्ष होण्यामध्ये माझा मोठा बहुमान आहे. असे मी म्हणतो.'' या विधानावरून यशवंतरावाची शिक्षणाविषयीची तळमळ दिसून येते.

**६) शिवाजी विद्यापीठाची स्थापना :-**

बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी प्राप्त करून देण्यासाठी मराठवाडयाप्रमाणेच दक्षीण महाराष्ट्रासाठी कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठ स्थापना करण्याचा विचार यशवंतरावाच्या मुख्यमंत्री पदाच्या कारकीर्दीत केला गेला आणि योजनेत त्यासाठी ५० लाखाची तरतूद करण्यात आली १८ नोव्हेबर १९६२ ला राष्ट्रपती डॉ. राधाकृषणन यांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठाचे उद्घाटन झाले. शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेमुळे पश्चीम महाराष्ट्रातील बहुजन समाजाला उच्च शिक्षणाची संधी प्राप्त झाली. या विद्यापीठाने सांगली,सातारा, कोल्हापूर, सोलापूर या जिल्हयाचा शैक्षणिक विकास घडवून आणला आहे.

**७) महाराष्ट्रातील सर्वांगीण शिक्षणाला चालना :-**

शिक्षण क्षेत्रात क्रांती घडविणारे अनेक निर्णय यशवंतराव यांच्या नेतृत्वाखाली घेण्यात आले महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण मंडळाची स्थापना करून शिक्षणाची गंगा सामान्यापर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला. माध्यमिक शिक्षणामध्ये सुसुत्रता निर्माण करण्यासाठी ''महराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाची '' स्थापना केली. पुस्तकी शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षणापर्यंत विविधांगी कार्यक्रम त्यांनी मोठया प्रमाणावर सुरू केले मूलोद्योग शिक्षणाला चालना दिली प्राथमिक शिक्षणाचा दर्जा वाढवण्यासाठी यशवंतरावानी १९६२ साली प्राथमिक शिक्षकासाठी निवृत्ती वेतन योजना लागू केली तसेच राष्ट्रीय कल्याण निधीलाही प्रारंभ केला.

शिक्षणाची गंगा आदिवासीच्या दारी पोहचवीण्याच्या दृष्टीने त्यांनी आश्रम शाळाची योजना आखली आश्रम शाळाच्या मुळे महाराष्ट्रातील आदिवासी समाजामध्ये शिक्षण पोहचले या यशवंतरावाच्या शैक्षणिक कार्यामुळे आधुनिक महाराष्ट्राचा पाया घातला.

**यशवंतरावाचे शिक्षण विषयक विचार :-**

यशवंतरावाचे शैक्षणिक विचार मूलगामी स्वरूपाचे होते. आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत या विचारांना फार महत्त्व आहे. प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण, उच्च शिक्षण, विद्यापीठीय शिक्षण आणि ग्रामीण शिक्षण विषयक यशवंतरावाचे विचार फार मौलीक स्वरूपाचे आहेत यशवंतरावाच्या मते शिक्षण हे सर्वांगीण विकासाचे साधन आहे. उद्योग, शेती आणि शिक्षण ही यशवंतरावाच्या शासकीय धोरणाची त्रीसूत्री होती सर्वांगीण विकासाचे तत्वज्ञान या त्रीसुत्रीवाच आधारलेले होते.

**१) प्राथमिक शिक्षण विषयक विचार :-**

देशातील सर्व थरातील नागरिकांना प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे देणे आवश्यक आहे. प्राथमिक शिक्षण प्राप्त झाले तर त्यातून लोकशाही सक्तीचा अविष्कार प्रभावीपणे होऊ शकतो हा विचार यशवंतरावांनी अनेकदा आपल्या भाषनातून मांडला होता. प्राथमिक शिक्षण हे तळागाळातील सर्व दुर पसलेल्या ग्रामीण भागातील पिढयानपिढया शिक्षणापासून वंचित राहिलेल्या बहुजन समाजाला उपलब्ध करून देता आले. तरच भारतीय लोकशाहीची पालेमुळे खोलवर रूजतील अशी यशवंतरावांची प्रामाणिक धारणा होती.

**२) माध्यमिक शिक्षण विषयक विचार :-**

उच्च शिक्षणाचा पाया हा माध्यमिक शिक्षण असल्यामुळे उच्च शिक्षणासाठी लागणाऱ्या गुणांची मंडळी तयार करण्याचे काम माध्यमिक शिक्षणाला करावे लागेल. असे यशवंतराव म्हणतात माध्यमिक शिक्षणात व्यवसायीक शिक्षण देण्याची गरज आहे असे मत यशवंतरावानी मांडले माध्यमिक शिक्षण पूर्ण केलेला विद्यार्थी कॉलेजला गेला नाही तरी आपल्या हाताचा व बुध्दीचा उपयोग करून त्याला स्वतःच्या पायावर उभ राहण्याची पात्रता त्याच्यात निर्माण झाली पाहिजेत माध्यमिक शिक्षणात तांत्रीक शिक्षणाचा अंतर्भाव करून त्याची पूर्णरचना केली पाहिजेत असे यशवंतराव म्हणतात.

**३) विद्यापीठीय शिक्षण विषयक विचार :-**

विद्यापीठीय शिक्षण हा शिक्षणाचा तिसरा टप्पा आहे आणि तो प्रगल्भ होणे आवश्यक आहे असे यशवंतरावाचे स्पष्ट मत होते. विद्यापीठीय शिक्षण हे लोकशाहीच्या प्रसाराची शक्ती आहे असे शिक्षण सर्वांगीण असावे आणि मूठभर समाजाची त्यावर मालकी नसावी असे यशवंतरावाचे मत होते.

विद्यापीठीय शिक्षणात फार मोठया संख्येने महाविद्यालयाची निर्मीती केल्यास सुशिक्षित बेरोजगाराची संख्या वाढेल असे काही टिकाकारांनी यशवंतरावजीवर टिका केली तेव्हा त्यांना प्रतिउत्तर देताना यशवंतराव महणाले की "अशिक्षीत बेकारापेक्षा सुशिक्षीत बेकार आधीक चांगले कारण सुशिक्षीत बेकार निदान विचार तरी करू शकेल आपण बेकार का राहिलो याची तो कारण मिमांसा शोधील आणि ती दुर करण्याचा तो प्रयत्न करील तेव्हा शिक्षणाने सुशिक्षीत बेकारांचा धोका निर्माण या शंकेस अर्थ नाही."

**४) ग्रामीण शिक्षण विषयक विचार :-**

यशवंतरावाच्या मते ग्रामीण भागातील शिक्षण घेऊन बाहेर पडणारे जे युवक आहेत त्यांचा उपयोग ग्रामीण भागातील जीवनमान सुधारण्यासाठी झाला पाहिजेत शेतीशी संबंधीत उद्योग धंदयाची वाढ कशी होईल हे धंदे समृध्द कसे होतील या दृष्टीने आपनास ग्रामीण शिक्षण निर्माण करण्याची गरज आहे. शेतीत सुधारणा घडवून आणण्यासाठी शेतीचे शिक्षण वाढविले पाहिजेत त्याचप्रमाणे शेतीच्या शास्त्रीय शिक्षणाचा दृष्टीकोन लोकामध्ये वाढविला पाहिजेत.

**सारांश :-**

एकदरीत वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्रातील शिक्षण विषयक कार्याला एक नवा आयाम देण्याचा सर्वार्थाने प्रयत्न केला आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च शिक्षणाबाबत त्यांची भूमीका महत्वाची होती उच्च शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली असली पाहिजेत शिक्षण हे लोक भाषेतून दिले गेले पाहिजेत ज्ञान विज्ञान शेवटच्या घरापर्यंत पोहचले पाहिजेत असे यशवंतरावाचे मत होते. यशवंतरावानी शिक्षणाच्या प्रसारासाठी केलेली कामगीरी मौलीक स्वरूपाची आहे समाजाच्या शेवटच्या घटकाचा विकास करावयाचा असेल तर त्या घटकापर्यंत शिक्षण पोहचले पाहिजेत असे यशवंतरावाचे स्पष्ट मात्र होते ते त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून दाखून दिले. यशवंतराव म्हणतात की शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. परंतू हे शिक्षण शेवटी राष्ट्रीय एकात्मता आणि राष्ट्रीय विकासाचे प्रभावी माध्यम ठरले पाहिजेत असे त्यांचे ठाम मत होते.

**संदर्भ :-**

१) डॉ. कायदेपाटील गंगाधर . वि. यशवंतराव चव्हाण – चैतन्य पब्लीकेशन – नाशीक – २०००
२) प्रा. डॉ. देशमुख शिवाजीराव - शैलीकार यशवंतराव – कौसल्या पब्लीकेशन- सोलापूर २००९
३) कांबळे उत्तम – यशवंतराव चव्हाण नव महाराष्ट्राचे शिल्पकार - सकाळ प्रकाशन कोल्हापूर – २०१२
४) तळवलकर गोविद - यशवंतराव व चव्हाण व्यक्ती आणि कर्तृत्व - मौज प्रकाशन मुंबई -२०१२
५) डॉ.पाटील प्रतिभा, युगपुरूष यशवंतराव चव्हाण – एज्युकेशन पब्लिशर्स - औरंगाबाद २०१४

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –7.675,Issue NO, 289 (CCLXXXIX )
ISSN : 2278-9308
March, 2021

# यशवंतराव चव्हाण यांचा शिक्षणा संबधीचा दृष्टीकोन

प्रा.डॉ. निलेश शेरे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय नळदुर्ग,

**प्रास्तवना :-**

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण हे सर्वार्थाने लोकोत्तर लोकनेता होते. महाराष्ट्राच्या सर्वांगिण विकासासाठी त्यांनी दाखविलेली दुरदृष्टी आणि घेतले अचुक निर्णय यातूनच आजचा प्रगत शील महाराष्ट्र घडला आहे. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या उतुंग व्यक्तीमत्वाचे अनेक पैलू आपणास सांगता येतील.

महाराष्ट्राच्या भवितव्याचा विचार करताना यशवंतराव चव्हाणांनी ज्या घटकांचा जाणिवपुर्वक विचार कला त्यात शिक्षण या विषयाला त्यांनी विशेष महत्व दिले होते. आपल्या मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात शिक्षणाच्या संदर्भात त्यांनी अनेक महत्वाचे निर्णय घेतले. प्रौढ शिक्षणाची व्याप्ती वाढविली, शैक्षणिक प्रसारासाठी अर्थसंकल्पात अनुदानाची व्यवस्था केली. संपुर्ण महाराष्ट्रात शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, कृषी विद्यापीठे इ. संस्था स्थापन करण्यास प्रयत्न केले. त्यांना सतत वाटत महाराष्ट्राची औद्योगीक प्रगती करण्याचा, शेतीचे औद्योगीकरण करण्याचा कार्यक्रम जितका महत्वाचा आहे. तितकाच शिक्षणाच्या प्रसाराचा कार्यक्रम जितका महत्वाचा आहे. तितकाच शिक्षणाच्या प्रसाराचा कार्यक्रमही महत्वाचा आहे. थोडक्यात महाराष्ट्राच्या भवितव्याचा विचार करताना यशवंतराव चव्हाणांनी ज्या घटकांचा जाणिवपुर्वक विचार केला त्यात शिक्षण या विषयाला त्यांनी विशेष महत्व दिले. याचाच थाडक्यात आढावा प्रस्तुत शोधनिबंधात घेण्याचा प्रयत्न केला आहे. यशवंतराव चव्हाण यांनी शिक्षणाची एक सरळ आणि साधी व्याख्या केली आहे, यशवंतराव चव्हाण म्हणतात शिक्षित व्यक्तीला स्वतःच्या आजुबाजूला घडणाऱ्या गोष्टी आणि जगात घडणाऱ्या इतर गोष्टी यांची ज्यामुळे काही संगती लावता येते, त्यांचा योग्य अर्थ समजावून घेता येतो आणि त्यांचा परिणाम आपल्या जीवनावर काय घडतो हे समजावून घेता येते आणि समावून देता येते, त्याला म शिक्षण मानत आलो आहे. यशवंतराव चव्हाण म्हणतात की, शिक्षण हे सर्वागीण विकासाचे साधन आहे. आपणाला सर्वागीण प्रगती साध्य करायची असेल तर देशातील शैक्षणिक संस्था, विद्यापीठे, शासन आणि त्याचे नियोजन करणारे नियोजनकार या सर्वांनी मिळून शैक्षणीक विकासासाठी प्रयत्न केले पाहिजेत आणि ज्यांच्या विकासासाठी करणे आवश्यक आहेत त्यांचा त्यात सहभाग असणे हे देखील तितकेच महत्वाचे आहे.

**सैनिकी शिक्षण :-**

आज देशात अनेक क्षेत्रे तरूण—तरूणीच्या कर्तृत्वाचे स्वागत करण्यासाठी सिध्द आहेत. अखंड भारताचे संरक्षण करण्याची व आपणाला मिळालेले स्वातंत्र्य चिटकाल टिकविण्याची जबाबदारी देशातील तरूण वर्गावर आहे. स्वतःचे रक्षण करू न शकणारा देश स्वाभिमानाने व स्वतंत्र कधीच राहू शकत नाही. म्हणून प्रत्येक तरूणाने हे ठरविले पाहिजे की, आपल्या कर्तृत्वाचा उपयोग प्रथम देशाच्या संरक्षणासाठी झाला पाहिजे.

आजचा तरूण व सैनिक शिक्षण या वरती देखील यशवंतराव चव्हाण यांनी आपले मत प्रतिपादन केलेले दिसून येते. सैन्य हा जीवनाचा एक आवश्यक भाग झाला तरच एवढया विशाल देशाचे संरक्षण होऊ शकेल. म्हणून ते म्हणतात, आम्ही शत्रुमध्ये धडली भरविणारी सामर्थ्य संपन्न

 ISSN : 2278-9308
March, 2021

आधुनिक सेना निर्माण करित आहोत. देशात तरूण वर्गाला महाविद्यालयीन जीवनापासून सैनिकी शिक्षणाचे प्रशिक्षण मिळावे म्हणुन भारत सरकारने १५ ऑगस्ट १९६३ पासून एन.सी.सी. चे शिक्षण देण्यास सुरवात केली आहे. कारण देशसंरक्षणाच्या शिक्षणाशिवाय विद्यार्थ्यांचे शिक्षण अपूर्ण आहे म्हणून यशवंतराव चव्हाण म्हणत की, प्रत्येक विद्यार्थ्याने स्वत:हून एन.सी.सी.च्या शिक्षण घेण्यासाठी पुढे आले पाहिजे. त्यांच्या मते, एन.सी.सी.च्या शिक्षणामुळे तरूणांमध्ये चारित्र्य, बंधुभाव, देशप्रेम, त्यागवृत्ती, सेवावृत्ती इ. गुणांची जोपासना व वाढ होते.

**विज्ञानाला महत्व:-**

यशवंतराव चव्हाण म्हणतात की, मोठया शत्रुशी सामना करायचा तर आपण आपला देश अर्थिक व वैज्ञानिक दृष्टीकोनातून प्रबळ बनविला पाहिजे. देशात मोठे सेनापती असून भागात नाही तर शत्रूवर विजय मिळवायचा आहे. म्हणून यशवंतराव चव्हाण यांना तळमळीने वाटत की, शालेय जीवनात विद्यार्थ्यांने आपले लक्ष वैज्ञानिक विषयांकडे दवून त्याचा अभ्यास केला पाहिजे शास्त्रीय ज्ञानाचा आधार घेतल्याशिवाय आपल्याला आपला विकास साध्य करता येणार नाही. यासाठी शास्त्रीय ज्ञान घेण्याची सामान्य माणसामध्ये कुवत निर्माण होणे गरजेचे आहे. ही कुवत निर्माण करायची असेल तर लोक साक्षर होणे गरजेचे आहे. म्हणुन यशवंतराव चव्हाण म्हणतात की, देशातील सर्व स्तरातील नागरिकांना प्राथमिक शिक्षण मोफत देणे आवश्यक आहे. कारण प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराशिवाय लोकशाही समाजाची कल्पनाही आपणास करता येणार नाही. सामान्य लोकांनी प्राथमिक शिक्षण घेतलेतर त्यातुन लोकशाही शक्तीचा अविष्कार प्रभावीपणे हाऊ शकतो. प्राथमिक शिक्षण हे तळागाळातील व सर्वदूर पसरलेल्या ग्रामिण भागातील पिढयानपिढया शिक्षणापासून वंचित राहिलेल्या बहुजन समाजाला उपलब्ध करुन देता आला तरच भारतीय लोकशाहीची पाळेमुळे खोलवर रूजतील अशी यशवंतराव चव्हानांची प्रामाणिक धारणा होती. यशवंतरावांनी एका ठिकाणी केलेल्या भाषणात म्हणाले होते की, शिक्षण प्रसार ही प्रौढ मतदान पध्दत हा लोकशाही राज्यकारभाराचा पाया आहे. म्हणून आपल्या लोकशाहीची मुळे खोलवर रूजविण्याच्या दृष्टीने प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारास राजकीय महत्व देखील आहे.

प्राथमिक शिक्षणाबरोबर त्यांनी माध्यमिक शिक्षणाच्या विकासाठी प्रयत्न केले. माध्यमिक शिक्षणामध्ये सुसुत्रता निर्माण व्हावी यासाठी त्यांनी 'महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाची' स्थापना केली.

**उच्च शिक्षण :-**

शिक्षणाचे माध्यम मराठी करुन त्यांनी उच्च शिक्षण देखील सर्वासाठी खुले केले उच्च शिक्षणाची संधी समाजातील सर्व थरातील लोकांना मिळवून द्यायची असेत तर ते शिक्षण मातृभाषेतून द्यावे लागेल असे त्यांचे मत होते. शिक्षण जर आम्हाला खालच्या स्तरापर्यंत जाणार नाही. ज्ञानप्राप्तीची भाषा व लोकांची भाषा एकच असली तरच त्या ज्ञानाचा आपल्या जिवनात उपयोग करून घेता येईल. अन्यथा बहुसंख्या समाज शिक्षणापासून वंचीत राहिल. महाराष्ट्रातील विद्यापीठांनी उच्च शिक्षणाचे माध्यम म्हणून मराठीचा अवलंब करण्याच्या दृष्टीने पावले उचलावीत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यशवंतराव सतत म्हणत, हिंन्दूस्थामध्ये सामाजिक परिवर्तन झाले नाही याचे मुळ कारण म्हणजे लोकभाषा व ज्ञानभाषा या वेगवेगळया होत्या. यामुळे ठराविक वर्गाचे सांस्कृतीक जीवनामध्ये वर्चस्व निर्माण झाले. म्हणून स्वांतन्त्र्यानंतर असे होऊ नये म्हणून यशवंतराव म्हणतात की, 'उच्च शिक्षण' हे संस्कृतीचे प्रवेशद्वार आहे. पण या प्रवेशद्वाराची किल्ली मात्र आता विज्ञानाच्या हातात गेली आहे. म्हणून निरनिराळया शास्त्राचे ज्ञान मराठीत आले पाहिजे संशोधनाच्या क्षेत्रात नवे विचार आणण्याचा प्रयत्न करणारी माणसे जशी निर्माण होतील तशी भाषा वाढत जाईल. थोडक्यात सर्वांगीण विकासाच्या कार्यातून भाषा विकसीत होते आणि भाषेच्या

विकासातून सांस्कृतिक संपन्नता वाढते. या सर्व गोष्टीचे संक्रमण आणि संवर्धन उच्च शिक्षणातून व्हायला हवे.

**सारांश :-**

थोडक्यात शिक्षण हे व्यक्तीच्या सर्वांगीण प्रगतीचे मुळ कारण आहे. शिक्षणाने माणूस सुसंस्कृत, विचारी झाला पाहिजे त्याच्यात दुसऱ्याच्या सुख दु:खाविषयी विचार करण्याची शक्ती आली पाहिजे असे यशवंतरावांना वाटत असे. शिक्षण हा यशवंतराव चव्हाण यांचा अत्यंत जिवाळयाचा विषय होता. E.B.C. ची सवलत लागू करते वेळी मंत्रीमंडळाच्या बैठकीत यशवंतराव एकाकी पडले होते. पण त्यांनी अतिशय कठोर भूमिका घेतली व म्हणाले की हा निर्णय मंत्रीमंडळात जर होणार नसेल तर मला मुख्यमंत्र्याच्या खुर्चीवर राहण्यास कसल्यास प्रकारचे स्वारस्य नाही. एवढेच नव्हे तर या निर्णयामुळे महाराष्ट्राचे दिवाळे निघून जर बहुजनांना शिक्षणाची संधी मिळणार असेल तर तो निर्णय घेतलाच पाहिजे अशी ठाम भुमिका त्यांनी घेतली. उच्च व तंत्राशिक्षणातही प्रगती झाल्याशिवाय कुशल मनुष्यबळ तयार होणार नाही. यासाठी वेगवेगळया पातळीवर शैक्षणिक संस्था स्थापन केल्या एवढेच नव्हे तर शैक्षणिक कार्यात जो कोणी पुढाकार घेईल त्याला सर्वागींन मदत करण्याची भुमिका त्यांनी घेतलेली दिसून येते. थोडक्यात पिढयानपिढया अंधारात खितपत पडलेल्या समाजाला प्रकाश देण्याचे काम यशवंतराव चव्हाण यांनी केले. त्यामुळे खऱ्या अर्थाने शिक्षणापासून वंचित असलेला समाज शिक्षणाच्या प्रवाहात आला. याचे पुर्ण श्रेय स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांनाच दयावे लोगते.

**संदर्भसुची :-**

१) चव्हाण शेषराव, 'यशवंतराव चव्हाण:आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार,' विमल पब्लिकेशन्स, औरंगाबाद. १९९०.
२)पाटील विठ्ठलराव,'यशवंतराव चव्हाण विविधांगी व्यक्तीमत्व,'सांकेत प्रकाशन,औरंगाबाद, १९९४.
३)यशवंतराव चव्हाण यांचे महाराष्ट्रातील विकासाचे राजकारण: शैक्षणिक विकासाचा विशेष संदर्भ.
४)लोकराज्य, अंक १२ मार्च २०१२.

# यशवंतराव चव्हाण : विचार व कार्य

**प्रा. किशन मिराशे**
बळीराम पाटील महाविद्यालय गोकुंदा ता. किनवट जि. नांदेड -४३१८११
मो.न.९५२१५४२४२ इमेल. आयडी- kvmirashe@gmail.com

स्वांतत्र्यपूर्व काळातील महाराष्ट्रातील समाज जिवनाच्या दुभंलेल्या देवूळाचा जीर्णोद्धार करून त्यात यशवंतराव बळवंतराव चव्हाण यांनी सामाजीक न्याय देवतेची प्रतिस्थापना केली. येथील समाज जिवणाची एक घडी बसली . एकसंघ भारत मातेच्या मंदीरात समाजवादी समाज रचनेची सुंदर मूर्ती घडविण्याचे प्रयत्न केले. यशवंतरावांनी देशाच्या उभारणीसाठी दिलेले योदगान म्हणजे मराठी मातीने दाखविलेला मानवतेचा दिपस्तंभ होता. आजच्या दुभंगलेल्या भारतीय समाज व्यवस्थेला साधण्यासाठी या दिपस्तंभाच्या प्रकाशात रस्ता सापडू शकले असात विश्वास वाटतो. १ मे रोजी मुंबईत महाराष्ट्र दिन मोठया थाटाने साजरा होतो . मुंबई ही महाराष्ट्र राज्याची तशीच देशाची अर्थिक राजधानी आहे . याचा मराठी भाषीकांना सार्थ अभिमान आहे. परंतू ६० वर्षापूर्वी मुंबई महाराष्ट्रात राहील की नाही, या विषयी शंका निर्माण झाली होती. १९५५-५६ या काळातील घडामोडी हा एक रोमाचंक इतिहास आहे . संयुक्त महाराष्ट्र कसा निर्माण झाला आणि त्या विषयी राजकीय पातळीवर काय घटना घडल्या आहेत. हे समजून घेण्यासाठी यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचा व कार्याचा मागोवा घेतला पाहीजे.

संयुक्त महाराष्ट्र निर्मितीवेळी यशवंतरावांनी सांगीतलेला एक विचार महत्वपूर्ण वाटतो असा की -"आपल्यावरच्या सावल्या आणि आपल्यावर लागणारी दृष्ट याची झळ नवीन होणाऱ्या बाळाला लागू नये अशी आईची चिंता असते , तशी चिंता माझ्या मनाशी आहे . कारण नवीन जन्माला येणाऱ्या आपल्या या राज्याला अनेक संकटाच्या सावल्यातून जावयाचे आहे. "

नवीन महाराष्ट्र राज्याच्या प्रभाती शिवनेरी वरून बोलतांना ते म्हणाले होते की,"दु:खात असलेल्या जनतेच्या जीवनावर सुखाची सावली निर्माण करणे हे , राजाचे कार्य आता प्रत्येक मराठी मानसाने केले पाहीजे .एकेक माणुस, एकेक मुल हे सावली देणारे झाड आहे. असे मानून त्यास खतपाणी घातले पाहीजे." केवळ राज्यातील नव्हे तर अखिल भारत आणि विश्वातील माणसां विषयी यशवंतरावाची हिच धारणा होती. 'महाराष्ट्र हे सर्व जनतेचे राज्य होईल,' अशी ग्वाही देवून ते लोक कल्याणा करीता झटले आणि भारताच्या नकाशा वरील ताऱ्यात एका तेजस्वी ताऱ्याची भर टाकील, असेही म्हटलेले आढळते.

महाराष्ट्र आणि भारत यांच्या विषयीची आपली भावना यशवंतरावांनी पंतप्रधान पंडीत नेहरूच्या साक्षीने बोलून दाखविली होती . ते म्हणाले होते -" आमचा हा पहिल्या पासूनचा विश्वास आहे. भारत राहीला तर महाराष्ट्र राहील. भारत मोठा झाला तर महाराष्ट्र मोठा होईल . भारताचे आणि महाराष्ट्राचे हित जेंव्हा एकरूप होते तेव्हा भारतही मोठा होतो . हा इतिहास महाराष्ट्राच्या रक्तारक्तातून भिनलेला आहे." आमच्या मराठी जीवनात ते ते काही चांगले ते ते भारताच्या सुख समृतीद्धीसाठी , संरक्षणासाठी आणि सेवेसाठी आम्ही देणार आहोत. जी अपूर्णता , जे दोष असतील ते आम्ही आमच्यापाशी ठेवणार आहोत. आम्ही प्रथम भारतीय आणि नंतर महाराष्ट्रीय आहेत.

राजकीय नेते आणि जनता या विषयी ते म्हणाले होते की, "जनता आणि नेता असे हे माता आणि पूत्र यांचे नाते आहे. जनता हीच शेवटी माता. तिच्या आर्शिवादातून , तिच्या सर्वस्वातून , तिच्या भावनेतून , तिच्या परंपरेतून नेतृत्व उभे राहते." अशा तऱ्हेरेची ममता ज्याच्या अंतकरणात असते .त्याच्यावर काही अलोट प्रेम राहते. जनतेचे हे प्रेम सख्या आई सारखे असते . राजकीय नेत्यांना जनतेचे हे प्रेम मिळाले की, त्याला दुप्पट जोमाने कार्य करण्याची शक्ती मिळते. जनतेचेचे हेच प्रेम आणि या प्रेमाची शक्ती ज्याच्या जवळ आहे तीच समर्थ मनुष्य होय.

मुख्यमंत्रीपदावरून मराठी माणसामोर म्हणाले - " महाराष्ट्राच्या राजकारणात जबाबदरीने काम करणारा मी एक कार्यकर्ता आहे . मी हिंदूस्थानच्या राजकारणात गेलो काय ,काम किंवा जगाच्या राजकारणात गेलो काय, शेवटी माझे पाय मातीवर उभे आहेत. आणि या मातीतच मला परतायचे आहे. हे मला विसरून चालणार नाही. मराठी भाषेचे राज्य यशस्वी

करण्यासाठी, मराठी माणसाच्या मनात त्यांया मनात जो ज्ञानेश्वर आहे, जो रामदास आहे, जो तुकाराम आहे. आणि त्यांच्या मनात जी मराठी माऊली आहे. त्या सर्वांना जागे करण्याचा माझ्या शरीरातील रक्ताचा थेंब असे पर्यत मी प्रयत्न करीन.

लोकशाही प्रस्थानेसाठी ज्यांनी बलीदान दिले .त्याचे स्मरण ठेवून हे सतास्थान भुषविले पाहीजे . त्या बलीदानाची आठवण करून देतांना यशवंतरावांनी म्हटलेआहे की, "त्या तक्ता जवळ गांधीजीचे जे रक्त पडले आहे. ते कोणा एका व्यक्तीचे नाही, कोणा एका धर्माचे नाही, कोण एका वर्गाचे नाही. ते या देशातल्या चाळीस पंचेचाळीस कोटी लोकांचे रक्त आहे, आणि त्यांचे रक्षण करणे हे तूमचे कर्तव्य आहे. कारण ते आमच्या स्वातंत्र्याचे व लोकशाहीचे प्रतिक आहे . अशा तऱ्हेची देश भक्तीची भावना आपल्या मनात फुलली पाहीजे , पेटली पाहीजे.

काही पक्ष अपवाद सोडला तर सर्व पक्षाचे नेतृत्व वर्गवादी आहेत. काही तर जात आणि जमात व धर्मवादी आहेत. यशवंतरावांनी म्हटले आहे की, " राजकारणामध्ये जेंव्हा धर्माला प्राधान्य येते तेंव्हा ते राजकारण जातीयवादी बनते. कुठल्याही व्यक्तीच्या विचारावर किंवा निष्ठेवर आधारलेली काम टिकत नाही. " म्हणुन याच सुत्रा आधार असे म्हणता येते की, व्यक्ती वर्ग - जात आणि धर्मवादी राजकारणयांना म. गांधीचे रक्त ज्या स्वातंत्र्याच्या आणि लोकशाहीच्या वेदीवर सांडले आहे. त्या वेदीवर - तक्तावर हक्क सांगण्याचा अधिकार पोहचत नाही ! आणि कोणी संकुचीत विचारवाद्याला ते तक्त मिळालेच तर ते त्याला दिर्घकाळ टिकविता येणार नाही ! ते या देशात स्थिर होणार नाही. या देशातील जनता ते स्विकारणार नाही !!

साधारणता : अशी होती यशवंतराव चव्हाणांची विचार धारा. तिला मातृभूमीच्या भक्तीचा आणि मातीतील माणसांच्या प्रेमाचा आधार आहे. सामान्य शेतकरी कुटुंबात जन्माला आलेल्या यशवंतरावांनी जनतेवर असे जीवापाड प्रेम केले. त्याच्या प्रमाणे मराठी जनतेनेही त्यांना संयुक्त महाराष्ट्राची चळवळ सूरु असतांना व त्यानंतर मुख्यमंत्री , मंत्री म्हणुन काम करतांना उदंड प्रेम दिले. म्हणुन त्यांना खुप काम करता आले.

मुंबईकरांनी मुंबई महाराष्ट्रात आणण्यासाठी काय केले, हाही इतिहासाचा भाग आहे. या दोन एकमेकांशी संबंध असलेल्या घटना आजच्या पिढीला समजण्यात म्हणुन महाराष्ट्राच्या निर्मिती अगोदरचे द्विभाषीक राज्य निर्माण करण्यात आले होते. त्याची पार्श्वभूमी माहीत असणे अत्यंत आवश्यक आहे.

स्वांतत्र्यानंतर अनेकांनी भाषीक तत्वावर राज्याची पर्नरचना व्हावी अशी मागणी देशामध्ये सुरु झाली. त्यानुसार काही राज्याची निर्मिती करण्यात आली .अशीच मागणी मुंबईसह महाराष्ट्र राज्याची करावी सुरू झाली . यासाठी सुप्रीम कोर्टाचे निवृत्त न्यायाधिश फाजल अली यांच्या अध्यक्षतेखाली कमीशन नेमण्यात आले . देशाची अर्थिक राजधानी मुंबई कुणाकडे असावी यासाठी महाराष्ट्र व गुजरात मध्ये रस्सीखेच सुर झाली. स्वत: मुख्यमंत्री मोरारजीभाई देसाई यांना भाषीक राज्याची कल्पना मान्य नव्हती. यांच्याच मंत्रीमंडळातील सहकारी समाजकल्याण व वनविभागाचे मंत्री यशवंतराव चव्हाण मात्र मुंबईसह महाराष्ट्र राज्याचा पुरस्कार करु लागले. तसेच जेष्ठ नेते शंकरराव देव , काकासाहेब गाडगीळ , मामासाहेब देवगिरीकर , भाऊसाहेब हिरे हे ही होते.

१९५५ ला फाजल अली कमिशनच्या अहवालात मुंबई केंद्रशासित प्रदेश, विदर्भाचे स्वातंत्र राज्य, आणि अलग महाराष्ट्र राज्य अशी त्रिराज्य शिफारस करण्यात आली . यशवंतराव चव्हाणांनी या त्रिराज्य शिफारशीला मान्यता दिली नाही. राज्य पुर्नररचना समितीच्या अहवालावर लोकसभेत चर्चा होऊन पंडीत नेहरूनी १६ जानेवारी १९५६ ला मुंबईला स्वतंत्र राज्य करण्याचे जाहीर केले . तेंव्हा पासून मुंबईत दंगल उसळली या आंदोलनात १०० पेक्षा जास्त मृत्यू पावले. महाराष्ट्र कॉग्रेस वर्किग कमिटीत दोन गट पडले. यावर तोडगा काढण्यासाठी पंडीत नेहरूनी द्विभाषीक राज्य निर्माण करून यशवंतराव चव्हाण यांची निवड करून त्यांना १ नोव्हेंबर १९५६ ला मुंख्यमंत्री म्हणुन शपथ दिली . पुढील चार वर्षात कौशल्याने त्यांनी पंतप्रधान पंडीत नेहरू आणि कॉग्रेस नेत्यांनी महाराष्ट्र राज्यास मान्यता मिळवली व सर्वाच्या संमतीने मुंबई शहर महाराष्ट्राची राजधानी म्हणुन राहीली. अशी झाली मुंबई महाराष्ट्राची राजधानी.

महाराष्ट्र राज्याच्या जन्माचा सोहळा १ मे १९६० मुंबई येथील राजभवनात सूरू झाला. बागेत एका टोकाला सहा फुट उंचीचे व्यासपीठ उभारून त्यावर एक टेबल व चार खुर्च्या ठेवण्यात आल्या होत्या. समोर ५०० ते ७०० खुर्च्या रांगेत मांडल्या होत्या. रात्री ११ वाजल्या पासून निमंत्रीत आपआपल्या जागेवर येवून बसत होते. त्यानंतर पंतप्रधान पंडीत नेहरू मुंबई द्विभाषीक राज्याचे राज्यपाल श्री. प्रकाशजी व यशवंतराव चव्हाण आले. सर्वजन आतुरतेने घडयाळाचे दोनही काटे बारावर केंव्हा पोहचतील याची वाट पाहत होते. बरोबर त्या क्षणी पंडीतजीनी एक रेशमी दोर ओढून पडदा दूर केला त्याबरोबर कित्येक विजेच्या दिव्यांनी दैदीप्यमान केलेला महाराष्ट्र राजाच्या नकाशा सर्वासमोर झळकला सर्वानी त्या क्षणाचे टाळयाच्या गजरात स्वागत केले. जिवापाड प्रयत्न करुन यशवंतरावानी मुंबईसह महाराष्ट्र राज्य निर्मितीचे स्वप्न साकार केले.

आज राज्यात व देशात अनेक अर्थिक घोटाळे ,आमदार - खासदाराचा घोडेबाजार, सभागृहातील मारामाऱ्या, क्षणाक्षणाला बदलणाऱ्या पक्ष निष्ठा, परकीय शत्रुला मदत करणे , दशाचे गुपीत फोडणे, अतिरेकी - गुंडाना आश्रम देणे, तस्करी करणे, अशी कृत्य करणारे नेते राजकारणात ठाण मांडून बसले आहेत. हे आपले व भारतीय लोकशाहीचे दुदैव आहे. पण यशवंतराव बळवंतराव चव्हाण हे सर्वापेक्षा वेगळे होते. ते भारतीय स्वातंत्र्य चळवळ, सातारा क्रांतीचे जनक, सयुंक्त महाराष्ट्राचे निर्माते, भारतीय संसदेचे रत्न, आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार , कृर्षी - औद्योगिक क्रांतीचे जनक, लोकमान्य टिळकानंतर भारताच्या राजकारणांवर यशस्वी ठसा उमटवणारे नेते. ही त्याची सर्व कामगीरी भारताच्या व महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये सुवर्णाक्षरात कोरून ठेवल्या गेली आहे. आजच्या नेत्याना जनतेला, विद्यार्थ्यांना व भावी पिढीला त्यांचे कार्य दिपस्तंभाप्रमाणे पथदर्शक ठरणारे त्यांच्या विचारांचे यशोदिप लावत आहेत.

- **संदर्भ :-**

१) युगानंतर :- यशवंतराव चव्हाण
२) यशवंतराव एक इतिहास :- रामभाऊ जोशी
३) वादळ मामा :- राम प्रधान
४) यशवंतराव ते अशोकराव :- डॉ. विश्वास मेहेंरळे
५) कर्तत्वाचा सयाद्री :- डॉ. जनार्धन वाघमारे
६) बंधनाचे ऋण :- राम प्रधान
७) यशवंतराव चव्हाण : व्यक्तीत्व व कर्तव्य - गोविंद तळपळकर
८) यशवंतराव राष्ट्रीय व्यक्तीमत्व - संपादक भा. कृ. केळकर

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –7.675,Issue NO, 289 (CCLXXXIX )
ISSN : 2278-9308
March, 2021

# यशवंतराव चव्हाण यांचे स्वातंत्र्यलढ्यातील व राजकीय क्षेत्रातील कार्य

डॉ. गजानन बापुराव ठाकरे
Ph.d, M. A. (English), M. A. (Marathi)M. A. (Economics), M. A. (History)M. A. (Political Science), M. A. (Sociology)English Literature, Marathi Literature PAT, D.Ed., B.Ed., M.Ed.
मंगलधाम हनुमान मंदीराजवळ हुडको कॉलनी मंगरूळपीर जि. वाशिम
मो. न. ९३७०३२२६४५E Mail –gajananthakare2012@gmail.com

यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राला लाभलेले अनमोल रत्न होत. देवराष्ट्रे या लहानश्या खेड्यात एका सामान्य शेतकऱ्याच्या कुटूंबात जन्मलेल्या यशवंतराव यांनी देशाच्या उपपतंप्रधानपदापर्यंत केलेला राजकिय प्रवास हा थक्क करणारा आहे. जिद्द, महत्वाकांक्षा, एकनिष्ठता, मुत्सद्दीपणा यासारख्या गुणांमुळे त्यांनी राजकारणातील जवळजवळ सर्वच क्षेत्रे पादाक्रांत केली. यासोबतच ते एक उत्कृष्ट वक्ते सुध्दा होते. त्यांनी आपल्या भाषणातुन श्रोत्यांनी मनेलिलया जींकुन घेतलीत. यशवंतराव चव्हाण हे एक उत्कृष्ट संसदपटू होते. त्यांनी जेव्हा जेव्हा गरज पडली तेव्हा पंडित नेहरू, लाल बहादुरशास्त्री, इंदीरा गांधी यासारख्या नेत्यांनी मदत केली. महाराष्ट्राच्या मातीतुन जन्मलेल्या या सुपुत्राने भारताच्या राष्ट्रीय पातळीवरील राजकारणात जवळजवळ प्रत्येक पद सन्मानाने व श्रेष्ठतेने भुषविले. जेव्हा जेव्हा हिमालयाने साद घातली तेव्हा तेव्हा या सह्याद्रीने आपुलकीने व तळमळीने मदतीचा हात दिला. संयुक्त महारष्ट्राचा प्रश्न असो की, भारतावर चीनने केलेले आक्रमण असो की, पाकला युध्दात नामोहरम करण्याचा प्रसंग असो, प्रत्येकवेळी यशवंरावांना दिल्लीला साहाय्य केले. यशवंतराव चव्हाण हे थोर मुत्सद्दी होते. देशातील विरोधी नेते असोत की परदेशातील नेते असोत त्यांनी आपल्या वाक्चातुर्याने व अमोघ वाणीमुळे स्वत:चे श्रेष्ठत्व सिध्द केले. त्यांना ग्रंथाचा प्रचंड व्यासंग होता. यशवंतरावांनी केलेल्या असंख्य भाषणामधून आपणास त्यांच्या अगाध ज्ञानाची साक्ष पटते. सामान्य परिस्थिती असलेल्या कुटुंबात जन्मलेल्या यशवंतरावांनी सर्वात तरूण मुख्यमंत्री, मंत्रीमंडळातील सर्वच महत्वाचे खाते, विरोधी पक्ष नेते, उपपंतप्रधान या पदांना विभूषित केले. इतकेच नव्हे तर चरणसिंग सरकार कोसळल्यानंतर जर कॉंग्रेसमधील एका गटाने विरोध केला नसता तर कदाचित देशाचे पंतप्रधान हे सर्वोच्च पदसुध्दा त्यांनी भूषविले असते. महाराष्ट्राचे सुपूत्र यशवंतराव चव्हाण यांचा हा सन्माननीय राजकीय प्रवास सर्वांना प्रेरणा देणारा तसेच तमाम भारतीयांना अचंबित करणारा आहे.

**यशवंतराव चव्हाण यांचा स्वांतत्र्यलढयातील सहभाग :—**

१९२० मध्ये भास्करराव जाधव हे मुंबई लेजिस्टेटिव्ह कौन्सिलचे उमेदवार म्हणून उभे राहले होते. लहान वयात यशवंतरावांनी या निवडणूकीत स्वंयसेवक म्हणून काम केले. त्यांनी सातव्या वर्गात शिकत असतांनाच 'विजयीमराठा', राष्ट्रवीर ही वृत्तवत्रे वाचण्यास सुरुवात केली होती. कराड येथे झालेल्या श्री केशवराव जेधे व श्री दिनकरराव जवळकर यांच्या सभेनंतर यशवंतराव विचाराने व मनाने आमूलाग्र बदलले.[१]यशवंतराव यांनी जरी इंग्रजी शिक्षण संपादन केले असले तरी आपण स्वत:च बहुजन समाजात जावून त्यांना त्यांच्या भाषेत समजावून सांगितले पाहिजे. आणि स्वांतत्र्य चळवळीचा प्रसार करण्यासाठी बहुजन समाजाच्या प्रचंड शक्तीचा संगम या चळवळीच्या उद्दिष्टांशी घडविला पाहिजे असे त्यांचे मत होते.[२]

लाहोरच्या रावी नदीच्या तीरावर झालेल्या राष्ट्रीय कॉंग्रेसच्या अधिवेशनात २६ जानेवारी १९३० रोजी स्वांतत्र्यदिन साजरा करण्याचे ठरले होते. यशवंतराव व त्यांच्या मित्रांनी चर्चा करुन २६ जानेवारीच्या दिवशी एक प्रतिज्ञापत्रक तयार करुन वाचावे असे ठरविले. यशवंतरावांनी भावनाप्रधान असे पाचपंचवीस वाक्यांचे प्रतिज्ञापत्रक तयार केले. २४ तारखेला रात्रीच यशवंतराव व त्यांच्या मित्रांनी प्रतिज्ञापत्रक छापून घेतले. सकाळी आठ वाजता कृष्णा घाटावर झेंडावदन होणार होते. हरिभाऊच्या नेतृत्वाखाली यशवंतराव व इतर लोक सात वाजता कृष्णेच्या घाटावर पोहोचले. सर्वांच्या मनात उत्साह ओसांडून वाहत होता. सर्वांना प्रतिज्ञापत्रके वाटल्यानंतर झेंडावंदन झाले. त्यानंतर सर्वांनी स्वातंत्र्याच्या पूर्ततेसाठी प्रयत्न करायचे अशी सर्वांनी मन:पूर्वक शपथ घेतली. यशवंतरावांना राष्ट्रीय कॉंग्रेसच्या तिरंगी झेंडयाखाली प्रतिज्ञावाचन केल्याचा अभिमान वाटत होता. येथूनच यशवंरावांच्या राजकीय जीवनाला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली.[३]

यशवंतराव टिळक विद्यालयात इंग्रजी चौथीत शिकत असतांना त्यांच्या जीवनातील एक महान प्रसंग घडला. त्यांचे वर्गशिक्षक श्री शेणोलीकर गुरूजींनी सर्व विद्यार्थ्यांना, तुम्ही कोण होणार? हा प्रश्न विचारला विद्यार्थ्यांनी लोकमान्य टिळक, क्रिकेटर होणार अशी उत्तरे दिली. पण यशवंतरावांनी “मी यशवंतराव चव्हाण होणार” असे ताठ मानेने उत्तर दिल्यानंतर त्यांचे वर्गशिक्षक देखिल आर्श्चयचकित झाले. यशवंतराव त्यांच्या मित्रांसमवेत टिळक हायस्कुलच्या प्रांगणात लिंबाच्या झाडावर झेंडावंदन करित असत. शिक्षणाधिकाऱ्याला हे प्रकरण माहीत पडल्यानंतर ‘हे ध्वजवंदन कोणाच्या परवानगीने करता’ हा प्रश्न त्याने यशवंतरावांना विचाराला. यशवंरावांनी स्वयंस्फूर्तीने ध्वजवंदन करतो हे निर्भीड उत्तर दिल्याने टिळक हायस्कूलवर येणारे संकट टळले. पण या प्रकरणात यशवंतरावांना शिक्षा होऊन त्यांना येरवडा तुरुंगात अठरा महिन्याचा सश्रम कारावास भोगावा लागला. या तुरुंगवासाने त्यांच्या भावी कर्तबगारीचा पाया घातला गेला.[४]

यशवंतराव जेव्हा १९३० साली राष्ट्रीय चळवळीत उतरले तेव्हा त्यांच्या मनात दोन विचारप्रवाह उभे राहिले होते. सत्यशोधक चळवळ की राष्ट्रीय चळवळ असे द्वंद्व त्यांच्या मनात उभे राहले होते. स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेण्याची त्यांच्या मनाची तयारी होती, पण चळवळीचे स्वरूप कसे राहील, आपल्या कल्पनेला मुर्त स्वरूप कसे द्यायचे याबाबत अनिश्चितता होती. सत्यशोधक चळवळीतील सामाजिक न्यायाची भूमिका योग्य वाटत होती. पण स्वातंत्र्यवादी राजकिय विचारापासून ही चळवळ दुर असल्याची खंत त्यांना वाटत होती. केवळ असहकाराने स्वातंत्र्य मिळेल का याविषयीही त्यांचे मत साशंक असे.[५] महात्मा गांधीच्या आवाहनानुसार कायदेभंग चळवळीत कराडमध्ये सत्याग्रह झाला. या सत्याग्रहात शिरोडवाहुन बेकायदेशिररित्या मीठ तयार करून त्याची विक्री होणार होती. यशवंतराव व त्यांच्या मित्रांनी सत्याग्रहासाठी येणाऱ्या प्रमुख मंडळीच्या स्वागताची व सभेची व्यवस्था केली होती. या सभेत व्यापारी शामजीभाई व हरीभाऊ लाड यांनी मिठाच्या पुड्या विकत घेतल्या. पोलीसांनी श्री निकम, शामजीभाई व हरीभाऊ लाड यांना अटक केली. कायदेभंगाची चळवळ खेड्यापाड्यात पोहचली होती. यशवंतराव व इतर कार्यकर्ते खेड्यात सभासाठी जात होते. यशवंतराव कराड शहरात दररोज सकाळी प्रभात फेरी काढत होते. त्यांचे नाव पुर्ण कराड तालुक्यातील जनतेला परिचीत झाले होते. या चळवळीत बिळाशी या भागात अधिक संघटित उठाव झाला.[६]

१९४२ च्या आनंदोलनात यंशवंतरावांनी सक्रिय भाग घेतला होता. ८ ऑगष्ट १९४२ रोजी मुंबईत गोवालीया टॅकच्या मैदानात कॉंग्रेसचे ऐतिहासीक अधिवेशन झाल. अधिवेशनात माहात्मा गांधीजी इंग्रजी सत्ता उलथून लावण्यासाठी ‘छोडो भारत हाच एकमेव उपाय आहे’अशी गर्जना केली. पंडीत नेहरूच्या भाषणानंतर ‘छोडो भारत’ हा ऐतिहासीक ठराव संमत झाल. ‘करेंगे या मरेंगे’ ‘चेलेजाव’ या घोषणा मनावर बिंबवून सर्व राजकीय नेत्यांनी महात्मा गांधीच्या नेतृत्वाखाली

इंग्रजी सत्तेविरूध्द निर्वाणाचा लढा देण्याचे ठरविले.[७] या अधिवेशनाला यंशवंतराव सुध्दा त्यांच्या सहकाऱ्यासह उपस्थित होते. दुसरे दिवशी कऱ्हाडची जनता यशवंतरावांच्या आगमनाची उत्सुकतेने प्रतिक्षा करत होती. यशवंतरावांनी जनतेला संबोधित करतांना म्हटले, "ही चळवळ तुरूंग भरतीची नाही. करु किंवा मरू या इर्षेने हा स्वातंत्र्यलढा लढावयाचा आहे. ब्रिटीश सत्तेविरूध्द आपणास आम जनतेची क्रांती करावयाची आहे.या क्रांतीच्या होमकुंडात प्रसंगी स्वत:चीही आहुती द्यावी लागेल. एवढी ज्यांची तयारी असेल त्यांना मी काय करायचेते सांगेन". यंशवंतरावांच्या प्रभावी विचाराने चाळीस – पन्नास विद्यार्थी भारावून गेले व त्यांनी शाळा सोुन प्रत्यक्ष चळवळीत सहभाग घेतला.[८]त्यानंतर या चळवळीत यशवंराव भूमिगत झाले. सरकारने त्यांना पकडून देणाऱ्याला मोठे इनाम जाहिर केले. त्यावेळी यशवंतराव पुण्यात बबन गोसावी यांच्या घरी मुक्कामी होते. इंग्रजसरकारने यशवंरावाच्या पत्नी वेणुबाईना अटक करून कराडच्या तुरुंगात ठेवले.[९] यशवंतरावांनी भुमिगत असुन सुध्दा सभा बैठकी घेतल्या. १९४३ मध्ये त्यांच्या पत्नी वेणुबाई अतिशय आजारी पडल्या. यशवंतराव पत्नीच्या भेटीला फलटनला गेले असता पोलीसांनी त्यांना अटक केली.[१०]

१९३५ चा कायदा पास झाल्याने देशातील सर्व राजकिय पक्ष प्रांतिक सरकार बनविण्याच्या कार्यात गुंतणार होती.[११] यावेळी यशवंतराव सातारा जिल्हा कॉंग्रेसचे कार्यकर्ते होते. त्यांनी जिल्ह्याच्या राजकारनात लक्ष घालण्यास सुरूवात केली. यशवंतराव चव्हाण यांनी सरदार पटेल यांना भेटुन प्रयत्न केल्याने आत्माराम पाटील यांना निवडणूकीचे तिकीट मिळाले. त्यांच्या विजयीसाठी यशवंतराव व त्यांच्या मित्रांनी सायकलवरून प्रचार केला. या निवडणुकीत आत्माराम पाटील हे विजयी ठरले.[१२]१९४६ मध्ये असेंब्लीच्या निवडणूका झाल्या. यशवंतरावांनी ज्येष्ठबंधु गणपतराव, कार्यकर्ते यांच्या आग्रहानंतर ईच्छा नसुन सुध्दा उमेदवारी स्विकारली. सातारा जिल्हा मतदार संघातुन यशवंतराव प्रचंडमतांनी निवडून आले.[१३]या सार्वजनिक निवडणुकीनंतर यशवंतराव चव्हाण थेट मंत्रिमंडळात गृहखात्याचे पार्लमेंटरी सेंक्रेटरी झाले. वयाच्या ३२ व्या वर्षी त्यांच्यावर राज्यकारभारासोबत पक्षसंघटनेची जबाबदारी आली. यशवंतरावांनी कॉंग्रेसला लोकशाही समाजसंघटनेचे व्यापक स्वरुप दिले. इतकेच नव्हे तर सत्यशोधक समाजाचे नेते श्री.केशवराव जेधे तथा बहुजन समाजातील हजारो कार्यकर्त्यांनी कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला. शेतकरी कामगार पक्षातील अनेक नेते यांनीसुध्दा यशवंतराव चव्हाण यांचे नेतृत्व स्विकारुन कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला.[१४]

२६ जानेवारी १९५० ला भारताची राज्यघटना अस्तित्वात आल्यानंतर देशात १९५२ ला पहिल्या सार्वजनिक निवडणुका पार पाडल्या.[१५] या निवडणूकीत यशवंतरावांनी महाराष्ट्रात सर्वत्र दौरा केला. त्यांच्या प्रभावी भाषणांनी कॉंग्रेसला महाराष्ट्रात घवघवीत यश मिळाल्यानंतर यशवंतरावांचा मोरारजी यांच्या मंत्रिमंडळात समावेश झाला. त्यांनी पुरवठा खात्याचा कारभार अत्यंत कार्यक्षमतेने सांभाळला. स्थानिक स्वराज्यमंत्री असतांना त्यांना ग्रामपंचायत हा लोकशाहीचा पाया असल्याने व त्याचा विस्तारही मोठा असल्याने ग्रामपंचायतीची संघटनेची आवश्यकता वाटून त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांच्या मदतीने मुंबई राज्य ग्रामपंचायतीची स्थापना केली.[१६]

म्हाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्राची मागणी १९४६ पासून पुढे आली होती. संयुक्त महाराष्ट्राचा लढा हा प्रामुख्याने उद्योगपती, भाडवलदार, मोठे व्यापारी आणि सामान्यजनता यांच्यातील लढा होता. दिल्लीतील वरिष्ठ नेत्यांनी नेहमीच उद्योगपती व भांडवलदारांच्या दबावापुढे झुकून सामान्य जनतेच्या भावनांचा चुराडा केला होता. हा ज्वंलत प्रश्न सोडविण्यासाठी केंद्र सरकारने अनेक कमिशनची नियुक्ती केली. परंतु प्रत्येक कमिशनने संयुक्त महाराष्ट्रासंबंधी नकारात्मक अहवालच दिला. महाराष्ट्रातील नेत्यांनी देखील दृढ राहून मुंबई शहर महाराष्ट्रापासून वेगळे करण्याचा डाव यशस्वी होऊ दिला नाही.[१७]शेवटी लोकसभेने ऑक्टोंबर १९५६मध्ये विदर्भासह विशाल द्विभाषिक

मुंबई राज्याची स्थापना करण्यास मान्यता दिली. १ नोव्हेंबर १९५६ ला यशवंतराव चव्हाण यांनी विशाल द्विभाषिक मुंबई राज्याची मुख्यमंत्री म्हणून सत्ता स्विकारली.१८

महाराष्ट्रातील तमाम जनतेप्रमाणे यशवंतराव चव्हाणांना देखील छत्रपती शिवाजी महाराजाबद्‌दल नितांत आदर होता. १९५७ च्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर नाईक निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या 'शिव स्मारक समिती' ने प्रतापगडावर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयाचे अनावरण पंतप्रधान पंडित नेहरु यांच्या हस्ते करण्याचा निर्णय घेतला.यावेळी समितीचा प्रभाव मोठया प्रमाणात महाराष्ट्रात होता. त्यांनी पंडित नेहरुंना शिवस्मारकाचे उद्‌घाटन करु देणार नाही. त्यांना या समारंभास आमच्या प्रेतावरुन जाव लागेल अशी भूमिका घेतली. नेहरुजींनी त्यांच्या एका ग्रंथात शिवाजी महाराजांविषयी चूकीचे विधान केले होते. त्यामुळे समितीच्या पुढाऱ्यांनी नेहरुंचा प्रतापगडचा मार्ग अडविण्याचा कार्यक्रम जाहिर केला.१९ अखेर यशवंतराव चव्हाणांच्या चातृर्याने व प्रसंगावधानाने ३० नोव्हेंबर १९५७ रोजी प्रतापगडावर पंतप्रधान पंडित नेहरु यांच्या हस्ते शिवस्मारकाचे उद्‌घाटन झाले. शिवरायांबद्‌दल यशवंतराव म्हणतात, 'एकच शिवाजी महाराज होवून गेले. महाराष्ट्राचा इतिहास ज्यांनी घडविला ते शिवाजी महाराज आता पुन्हा होणार नाहीत'.२० १ मे १९६० रोजी जेव्हा महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली : तेव्हा महाराष्ट्राचे प्रथम मुख्यमंत्रीपदाची म्हणून श्री. यशवंतराव चव्हाण यांचीच सन्मानाने नियुक्ती करण्यात आाली. त्यांनी मुख्यमंत्रीपदाची धुरा स्विकारल्यानंतर महाराष्ट्राचा सर्व समस्या एका देशाच्या राष्ट्रीय वृत्तीच्या पार्श्वभूमिवर सोडवून भारताचा एक अविभाज्य भाग म्हणूनच महाराष्ट्र राज्याचाविकास करण्याचे धोरण स्विकारले.२१

यशवंतराव चव्हाणांनी केद्रिय मंत्रीमंडळात भूषविलेली विविध पदे व कार्य.

यशवंतरावरुपी सहयाद्रीने जेव्हा जेव्हा हिमालयाने साद घातली तेव्हा लगेच मदतीचा हात पुढे केला. १९६२ ला चीनने भारतावर केलेल्या लष्करी आक्रमणात भारताला अपमानास्पद पराभव झाला. यानंतर नेहरुजींच्या आग्रहाने यशवंतरावांना देशाचे संरक्षणमंत्रीपद स्विकारावे लागले२२ देशाचा जिवनमरणाचा प्रश्न असल्याने त्यांनी या निर्णयाला लगेच मान्यता दिली.२३ लालबहादुर शास्त्री यांच्या मृत्यूनंतर पंतप्रधानपदासाठी इंदिरा गांधी व यशवंतराव चव्हाण यांच्यात झालेल्या स्पर्धेत यशवंतरावांनी माघार घेवून इंदिरा गांधीना पंतप्रधानपदासाठी पाठींबा दर्शविला. इंदिरा गांधीनी १४ नोव्हेंबर १९६६ ला गृहमंत्रीपदाची सुत्रे यशवंतरावांच्या हाती दिली.२४यानंतर अर्थविषयक सुधारणांना गती देणे, आर्थिक धोरण राबविणे ही उद्‌दीष्टे डोळयासमोर ठेऊनइंदिराजींनी २६ जुन १९७० रोजी देशाच्या अर्थमंत्रीपदी नियुक्ती केली.इतकेच नव्हे तर यशवंतराव चव्हाणांनी देशाचे परराष्ट्र व्यवहारमंत्रीपद सुध्दा भुषविले.२५

निष्कर्ष :—

देवराष्ट्रे या छोटया खेड्यात जन्माला आलेल्या, हलाखीच्या परीस्थितीत जीवन जगलेल्या बाणेदार यशवंतरावांनी आपल्या कर्तुत्वाने व दुर्दम्य आत्मविश्वासाने यशाला गवसणी घातली. भारताच्या राष्ट्रीय पातळीवरील जवळजवळ सर्वच सन्मानाची पदे त्यांनी भूषविली. देशातील संरक्षणमंत्री, परराष्ट्र व्यवहार मंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री या पदांना त्यांनी विभुषित केले. प्रत्येक खात्याचा कारभार चालविताना त्यांना सखोल अभ्यास करून तसेच समोरिल आव्हानांचा विचार करून प्रत्येक समस्येवर तोडगा काढला. जेव्हा जेव्हा वरिष्ठ नेत्यांनी त्यांना अडचणीच्या वेळी हाक दिली, तेव्हा तेव्हा महाराष्ट्राचा हा सह्याद्री त्यांच्या मदतीला तातडीने धावून गेला.

यशवंतरावांनी लहानपणापासूनच देशकार्याला वाहुन घेतले होते. विद्यार्थी दशेत त्यांनी टिळक विद्यालयात लिंबाच्या झाडावर तिरंगा फडकविला होता. २६ जानेवारी १९३० रोजी त्यांनी कृष्णाकाठावर प्रतिज्ञापत्रके वाटून स्वातंत्र्याची शपथ घेतली होती. १९३० च्या कायदेभंग चळवळीत

त्यांनी सक्रीय सहभाग घेतला होता. विद्यार्थी दशेत त्यांनी अठरा महीने सश्रम कारावासाची शिक्षा भोगली होती. १९४२ च्या 'छोडो भारत' आंदोलनात त्यांनी भुमिगत राहुन चळवळीचा प्रसार करण्यासाठी सभा बैठका घेतल्या होत्या.

यशवंतराव हे एक महान वक्ते देखील होते. त्यांची भाषणे उपस्थित जनतेचा मनाचा ताबा घेत होती. ते पंडीत नेहरू व इंदिर गांधी यांच्याशी नेहमीच एकनिष्ठ राहले. नेहरूजी व इंदीराजींनी देखील प्रत्येक पेच प्रंसगात यशवंतरावांचा सल्ला व मदत घेतली. यशवंतराव हे एक महान मुत्सद्दी होते. त्यांनी देशपातळीवरील तथा परराष्ट्र पातळीवरील नेत्यांना आपल्या वावचातुर्याने नामोहरम केले होते. एकनिष्ठता व विश्वासार्हता या त्यांच्या गुणामुळे यशवंतरावांनी उपपंतप्रधान पदापर्यंत मजल मारली. यशवंतरावांनी राष्ट्रीय पातळीवरील प्रत्येक पद सन्मानाने व स्वाभीमानाने भूषविले.

संदर्भ सूची

१) चव्हाण यशवंतराव – 'कृष्णाकांठ', रोहन प्रकाशन शनिवारपेठ, पुणे, १९८४, पृ.क्र.३१
२) जोशी रामभाऊ – 'यशवंतराव एक इतिहास', प्रतिभास प्रकाशन, परभणी, २०१०, पृ.क्र.३७
३) चव्हाण यशवंतराव–'कृष्णाकांठ', रोहन प्रकाशन शनिवारपेठ, पुणे, १९८४, पृ.क्र.५८
४) डॉ. जाधव, पंजाबराव रामराव – 'यशवंतराव चव्हाण जीवन दर्शन', कर्मविर प्रकाशन, पुणे १६, १९७०, पृ.क्र.३
५) चव्हाण यशवंतराव– 'ऋणानुबंध', प्रेस्टीज प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, १९७९, पृ.क्र. ६७ ते ७१
६) चव्हाण यशवंतराव–'कृष्णाकांठ', रोहन प्रकाशन शनिवारपेठ, पुणे, १९८४, पृ.क्र.३१
७) जोशी रामभाऊ – 'यशवंतराव एक इतिहास', प्रतिभास प्रकाशन, परभणी, २०१०, पृ.क्र. ९०,९१
८) डॉ. जाधव, पंजाबराव रामराव –'यशवंतराव चव्हाण जीवन दर्शन', कर्मविर प्रकाशन, पुणे १६, १९७०, पृ.क्र. ५ ते ६
९) माने लक्ष्मण –'यशवंतराव आठवणी आख्यायीका', ग्रंथाली प्रकाशन, मुबई, २०१३, पृ.क्र. १५२
१०) चव्हाण यशवंतराव– 'ऋणानुबंध', प्रेस्टीज प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, १९७९, पृ.क्र. ६८
११) चव्हाण यशवंतराव– ''कृष्णाकांठ', रोहन प्रकाशन शनिवारपेठ, पुणे, १९८४, पृ.क्र.१६३
१२) चव्हाण यशवंतराव– 'ऋणानुबंध', प्रेस्टीज प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, १९७९, पृ.क्र. ७१
१३) जोशी रामभाऊ – 'यशवंतराव एक इतिहास', प्रतिभास प्रकाशन, परभणी, २०१०, पृ.क्र. १०९, ११०
१४) डॉ. जाधव, पंजाबराव रामराव –'यशवंतरावचव्हाण जीवन दर्शन', कर्मविर प्रकाशन, पुणे १६, १९७०, पृ.क्र. ७, ८
१५) जोशी रामभाऊ – 'यशवंतराव एक इतिहास', प्रतिभास प्रकाशन, परभणी, २०१०, पृ.क्र. १४२,
१६) डॉ. जाधव, पंजाबराव रामराव – 'यशवंराव चव्हाण जीवन दर्शन', कर्मविर प्रकाशन, पुणे १६, १९७०, पृ.क्र. ८
१७) जोशी रामभाऊ – 'यशवंतराव एक इतिहास', प्रतिभास प्रकाशन, परभणी, २०१०, पृ.क्र. १४५,
१८) डॉ. जाधव, पंजाबराव रामराव –'यशवंतराव चव्हाण जीवन दर्शन', कर्मविर प्रकाशन, पुणे १६, १९७०, पृ.क्र. ९

१९) जोशी रामभाऊ – 'यशवंतराव एक इतिहास', प्रतिभास प्रकाशन, परभणी, २०१०,पृ.क्र. २३३, २३४
२०) डॉ. जाधव, पंजाबराव रामराव –'यशवंतरावचव्हाण जीवन दर्शन', कर्मविर प्रकाशन, पुणे १६, १९७०, पृ.क्र.१३
२१) जोशी रामभाऊ – 'यशवंतराव एक इतिहास', प्रतिभास प्रकाशन, परभणी, २०१०,पृ.क्र.३११
२२) कित्ता, पृ.क्र.४३०
२३) चव्हाण यशवंतराव– 'युगांतर', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे ३०, १९७०, पृ.क्र.३
२४) जोशी रामभाऊ – 'यशवंतराव एक इतिहास', प्रतिभास प्रकाशन, परभणी, २०१०,पृ.क्र. ४८३
२५) कित्ता, पृ.क्र. ५८९

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –7.675,Issue NO, 289 (CCLXXXIX )
ISSN : 2278-9308
March, 2021

# यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय विचारांचा व कार्याचा चिकित्सक अभ्यास

डॉ. मधुरा प्रतापसिंह मोहिते
सहयोगी प्राध्यापक,राज्यशास्त्र विभाग,
महिला महाविद्यालय,कराड,जिल्हा – सातारा
मोबाईल: 9960083640 Email: mpmkarad@gmail.com

**प्रस्तावना:**

यशवंतराव चव्हाण यांचा जन्म एका सामान्य, गरीब, शेतकरी कुटुंबात झाला. त्यांना कुटुंबाकडून कोणताही राजकीय वारसा मिळाला नाही. ते स्वकर्तृत्वावर, स्वप्रयत्नाने प्रतिकूल परिस्थितीतून शिकत सामान्य कार्यकर्त्यापासून महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री, देशाचे संरक्षण मंत्री, परराष्ट्र व्यवहार मंत्री, गृह मंत्री, उपपंतप्रधान या मानाच्या पदांपर्यंत पोहचले. एके काळी त्यांचे नाव पंतप्रधान पदाच्या चर्चेत देखील होते. त्यांनी सामान्याकडून असामान्याकडे केलेला हा प्रवास प्रथम दर्शनी थक्क करणारा वाटत असला तरी त्यांनी त्यासाठी जी परिश्रमपूर्वक वाटचाल केली, त्या वाटचालीचे टप्पे समजून घेतले तर त्यांचे असामान्यत्व समजते व महाराष्ट्राचे लोकनेते म्हणून प्रत्येकालाच त्यांच्या विषयी आदरभाव व अभिमान वाटतो.

**संशोधन पद्धती:**

भारतीय राजकीय विचारांच्या परंपरेत फुले विचार,गांधी विचार,आंबेडकर विचार, शाहू विचार यांचा अभ्यास शास्त्रीय पद्धतीने केला जातो. या विचारवंताच्या विचारांना प्रचलित अर्थाने 'राजकीय विचार', 'राजकीय तत्वज्ञान' म्हणून मान्यता मिळाली आहे. आपण अभ्यासक म्हणून या विचारवंतांची ओळख, विचार आणि कार्य या दोन्ही पातळीवर करून घेतो. त्यांच्या व्यक्तिमत्वाचे विचार आणि कार्य हे दोन्ही पैलू समन्याय पद्धतीने अभ्यासतो. यशवंतरावांच्या व्यक्तिमत्वाचेदेखील विचार आणि कार्य असे दोन पैलू आहेत. त्यांच्या कार्यामागे अतिशय कसदार,डोळस अशा विचारांची प्रेरणा आहे. त्यांनी महाराष्ट्राचे, देशाचे नेतृत्व करताना जी सामाजिक, राजकीय चळवळ उभी केली, ज्या संस्था उभ्या केल्या आणि त्याच्या माध्यमातून समाजाच्या विकासाचे जे महान कार्य केले त्याच्या मुळाशी एक निश्चित असा विचार,प्रेरणा, मूल्ये ,तत्व होते. तो विचार आपण 'यशवंत विचार' म्हणून समजून घेतला पाहिजे. कारण बहुधा यशवंतरावांच्या राजकारणाचा, त्यांनी केलेल्या कार्याचा, योगदानाचा अभ्यास केला जातो. परंतु त्याच्या गाभ्याशी असलेला 'यशवंत विचार' काहीसा दुर्लक्षित राहतो. या शोध निबंधाच्या माध्यमातून यशवंतरावांच्या कार्याची ओळख करून घेणे हा हेतू दुय्यम असून त्याच्या पाठीमागे असलेला 'यशवंत विचार' समजून घेणे, त्याचे विवेचन करणे हा मुख्य उद्देश आहे. त्यामुळे या शोध निबंधात विषयाची मांडणी करताना ती दोन भागात केली आहे. पहिल्या भागात यशवंतरावांच्या कार्याची ओळख आणि दुसऱ्या भागात त्या कार्यामागील 'यशवंत विचार' स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

**राजकीय विचार - संकल्पना व अर्थ :**

मनुष्य हा समाजशील प्राणी आहे तसाच तो राजकीय प्राणी आहे. मानवाच्या समाज जीवनावर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य संस्थेची निर्मिती झाली. 'सत्ता' हा राज्यशास्त्राचा गाभा आहे. राज्यशास्त्राची व्याप्ती खूपच मोठी आहे. त्यात राज्याचा उदय, विकास, शासन संस्था,तिचे घटक,त्यांची कार्ये,राजकीय सिद्धांत,तत्वे,प्रशासन,आंतरराष्ट्रीय राजकारण,राज्य आणि नागरिक यातील संबंध इ. घटकांचा समावेश होतो. सर फेड्रिक पोलॉक यांनी राज्यशास्त्राचे दोन विभाग सांगितले आहेत. ते म्हणजे सैद्धांतिक राज्यशास्त्र व व्यवहारवादी राज्यशास्त्र होय. राजकीय सिद्धांत किंवा विचारांचा अभ्यास करताना पाश्चात्य विचारवंतांनी मांडलेले विचार तसेच भारतीय विचारवंतांनी मांडलेले विचार यांचा तुलनात्मक अभ्यास केले जातो.ज्या विचारवंतांनी राजकीय विचारांची सैद्धांतिक मांडणी केली आहे,त्यांना आपण राजकीय विचारवंत म्हणून ओळखतो.प्लेटो,अॅरीस्टॉटल, मेकियाव्हेली, रुसो इ. तसेच म.फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पं.नेहरू, म.गांधी इ. हे सर्व विचारवंत सैद्धांतिक राज्यशास्त्राचे अभ्यासक होते. त्यांच्या राजकीय विचारांचा आधार घेऊन प्रत्यक्ष राजकारण,सत्ताकारण करणारे नेते हे व्यवहारवादी राजकारणी असतात.राजकारण ही संकल्पना कृतीशील आहे. कोणत्याही देशातील,राज्यातील राजकीय घडामोडी,राजकीय प्रश्न, त्यावरील उपाय,राजकीय वातावरण,राजकीय डावपेच,शह-प्रतिशह या सर्वांना

मिळून राजकारण असे म्हटले जाते. राजकारण हे व्यवहारवादी राज्यशास्त्राचे उपयोजनाचे साधन आहे. परंतु आजच्या काळात राजकारण हा शब्द बदनाम झाला आहे. राजकारण म्हणजे स्व:ताचे हितसंबंध सांभाळणे व त्यासाठी प्रसंगी इतरांना नुकसानदेखील पोहचविणारी कृती, असा समज झाला आहे तो आजच्या राजकीय परिस्थितीमुळे व राजकारणातील व्यक्तींमुळे होय. स्वातंत्र्यानंतर सुरुवातीच्या काळात भारतीय राजकारणाला, सैद्धांतिक, नैतिक मूल्यांचे अधिष्टान होते. आजची राजकीय व्यवस्था जर बदलायची असेल तर त्या काळातील नेत्यांच्या राजकीय विचारांचा, कार्याचा आढाव घेणे व ते विचार तरुणांमध्ये रुजविणे आवश्यक ठरते. यशवंतराव चव्हाण हे सुद्धा त्या काळातील एक अत्यंत चारित्र्यवान व कर्तृत्ववान नेते होते. म्हणूनच त्यांच्या राजकीय विचारांचा, कार्याचा चिकित्सक अभ्यास करण्याचा प्रयत्न या शोध निबंधामध्ये केला आहे. या अभ्यासासाठी यशवंतरावांचे मूळ साहित्य, त्यांच्यावर इतरांनी लिहिलेली, संपादीत केलेली पुस्तके, संकेत स्थळे इ. चा दुय्यम साहित्य म्हणून वापर केला आहे.

**कार्याची ओळख:**

यशवंतरावांनी लहानपणापासूनच भविष्यातल्या कर्तृत्वासाठी लागणाऱ्या कुशल नेतृत्व गुणांची जाणीवपूर्वक जोपासना केली. त्यासाठी त्यांनी विद्यार्थी दशेपासूनच चौफेर वाचन, वाक्चातुर्य, भाषा प्रभुत्व, व्यासंगी लिखाण, विविध क्षेत्रातील जाणकारांबरोबर स्नेहसंबंध या गुणांचे संवर्धन केले. या गुणांच्या संवर्धनातून त्यांची विविध विषय, प्रश्न याविषयी असणारी जाणीव प्रगल्भ झाली. आकलन अधिक व्यापक झाले. कोणत्याही विषयाचा सर्व बाजूंनी चिकित्सकपणे विचार करण्याची व त्यावर आपले मत, प्रतिक्रीया तयार करण्याची अभ्यासू वृत्ती तयार झाली. यामुळे ते लहान वयातच विचारांच्या बाबतीत कितीतरी अधिक परिपक्व बनले. या गुणांचा उपयोग त्यांना नंतरचा काळात राजकारण, समाजकारण, अर्थकारण करताना झाला.

त्यांचे घरचे वातावरण अत्यंत साधे, मोकळे होते. त्यांच्या आई हे त्यांचे वैचरिक दैवत होते. जात्यावर दळण दळताना त्या स्वरचित ओव्या म्हणत. आईकडून ऐकलेल्या ओव्या, अभंग यामुळे त्यांचे बालमन संस्कारीत झाले. त्यांच्या घरात समाजातील सर्व जाती-धर्माच्या लोकांना मुक्त प्रवेश होता. बालवयातच या वातावरणाचा संस्कार त्यांच्यावर झाला आणि त्यातून त्यांचे उदारमतवादी, सर्वसमावेशक व बहुजनांविषयी अपार कळवळा असणारे व्यक्तिमत्व घडत गेले. कुटुंबाप्रमाणेच जन्मगाव, आजूबाजूचा ग्रामीण परिसर, समाज, शाळेतील शिक्षक व त्यांनी घडविलेले संस्कार या सर्वांचा त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीत मोठा वाटा आहे. अशा प्रकारे कुटुंब व जन्मभूमीत रचल्या गेलेल्या भक्कम पायावरच नंतरच्या काळात त्यांच्या कर्तृत्वाचा, यशाचा एक एक मजला उभा रहात गेला. महाविद्यालयात शिक्षण घेत असताना त्यांचा म.फुले, शाहूमहाराज, डॉ.आंबेडकर, म. गांधी यांच्यासह अनेक विदेशी विचारवंतांनी मांडलेल्या विचारांशी परिचय झाला. इंग्लंड, अमेरिका, रशिया, फ्रान्स या देशात घडून आलेली क्रांती, त्यानंतरचे राजकीय,सामाजिक,आर्थिक परिवर्तन, या परिवर्तनाच्या मुळाशी असलेल्या प्रेरणा तसेच जगाचा इतिहास, विद्वानांची चरित्रे यांच्याशीदेखील त्यांचा परिचय झाला. या सर्वांच्या एकत्रित परिणामातून त्यांचे विचारविश्व अधिकाधिक व्यापक होत गेले. लोकशाही, समाजवाद यांच्याविषयी त्यांच्या मनात श्रद्धा निर्माण झाली. त्यांनी भविष्यकाळात जे प्रत्यक्ष कार्य केले त्याची वैचारिक, तात्विक पार्श्वभूमी अशी विद्यार्थी दशेपासूनच तयार होत गेली.

स्वातंत्र्याचे आंदोलन सुरु झाले तेव्हा यशवंतराव विद्यार्थी दशेत होते. त्यांचे विचार विश्व जसे व्यापक झाले होते तसे त्यांचे जीवनाविषयीचे उद्दिष्टही ठळक, सुस्पष्ट बनले होते. त्यांनी कॉंग्रेसचा एक सामान्य कार्यकर्ता बनून राष्ट्रीय आंदोलनात सहभागी होण्याचा निर्णय घेतला. कॉंग्रेसचे आंदोलन हे केवळ परकीय सत्ता देशातून घालवून देण्यापुरते मर्यादित नसून ते सामन्यांचे- शेतकरी, कामगार, कष्टकरी,शोषित,वंचित,उपेक्षित,तळागाळातील लोकांच्या मुक्तीचे आंदोलन आहे,या धारणेतून ते यात सहभागी झाले. कॉंग्रेसच्या आंदोलनाविषयी संपूर्ण सातारा जिल्ह्यात जागृती करण्याचे अत्यंत कष्टप्रद काम त्यांनी सुरु केले. तसेच बहुजन वर्गातील तरुणांच्या मनात स्वातंत्र्याविषयी व त्यानंतर समतेवर,न्यायावर आधारलेली नवी समाज व राज्य व्यवस्था निर्माण करण्याविषयीची आकांक्षा निर्माण करण्यालाही अग्रक्रम दिला. या अकांक्षेच्या पूर्ततेसाठी तरुणांचे संघटन उभारण्याचे, त्यांना प्रेरणा व मार्गदर्शन करण्याचे अवघड कामदेखील यशवंतरावांनी केले. हीच त्यांच्या राजकीय व सामाजिक कामाची व नेत्तृत्वाची सुरुवात होती. त्यानंतरच्या काळात सामन्यांविषयी कळवळा असणारा, त्यांच्या कल्याणासाठी अहर्निश झटणारा एक संघटन कुशल, धुरंधर नेता अशा विविध टप्प्यांवरून प्रवास करत त्यांचे नेतृत्व अधिक प्रगल्भ होत गेले आणि कालांतराने त्यांच्या नेतृत्वाला जनसंमतीचे, लोकमान्यतेचे एरवी दुर्लभ वाटणारे अधिष्ठान लाभले.

यशवंतरावांच्या राजकारणाचे ठळक वैशिष्ठ्य म्हणजे त्यांनी राजकारणाला एका अत्यंत सुसंस्कृत पातळीवर नेले. त्यांचे अनेक समकालीन नेते जेंव्हा सत्ताकारण, पद, पैसा, प्रतिष्ठ या भ्रामक गोष्टीमध्ये अडकून पडले, त्यावेळी यशवंतराव राजकारणाकडे अत्यंत परिपक्व दृष्टीकोनातून पहात होते. त्यांनी कधीही राजकारणाला

व्यक्तिगत हेवेदावे, संकुचित स्वार्थ, तत्वशून्य कुरघोड्या, विरोधकांचे व्यक्तिगत चारित्र्य हनन अशा खालच्या, अभद्र, कुटील, हीन पातळीवर नेले नाही. उलट राजकारणासारख्या काहीश्या बदनाम झालेल्या क्षेत्रात देखील कायम विचारांचे पावित्र्य आणि कृतीच्या बाबतीत सुसंकृतपणा जपला. त्यांनी नेहमीच साध्य व साधन विवेक बाळगला. सुसंकृत, विवेकी, संयमी राजकारणी म्हणून त्यांनी आपली वेगळी प्रतिमा राज्याच्या आणि देशाच्या राजकारणात निर्माण केली, आणि ती आयुष्यभर टिकविली. या सगळ्याच्या मुळाशी त्यांचा देश हिताचा, लोक कल्याणाचा विचारच दिसून येतो. म्हणूनच अनेक उच्च पदांवर विराजमान होऊनही ते सामान्यांसाठी त्यांचे लोकनेतेच राहिले. त्यांनी सत्तेला साध्य न मानता सामन्यांच्या सेवेचे, त्यांच्या कल्याणाचे व अपेक्षांच्या पूर्ततेचे एक साधन मानले. ही वैचारिक परिपक्वता जी आज अनेकांच्यात अभावाने दिसते ती यशवंतरावांच्या ठिकाणी विशेष प्रभावाने दिसून येते.

**संयुक्त महाराष्ट्र राज्याची निर्मिती:**

संयुक्त महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीच्या अभूतपूर्व सोहळयात यशवंतरावांनी मुंबईच्या शिवाजी पार्कवर महाराष्ट्राच्या जनतेला पहिले मुख्यमंत्री म्हणून 'देशावर प्रेम करावे आणि स्वराज्य आपला मंत्र मानवा', असा दिव्य संदेश दिला. तसेच हे राज्य जनतेचे होईल, ते लोक कल्याणासाठी आणि सामान्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी झटेल, असे आश्वासन दिले. त्यांनी हे आश्वासन प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले. त्यांनी महाराष्ट्राचे राजकारण करताना नेहमीच सामान्य माणूस आणि त्याचे हित,कल्याण या गोष्टी राजकारणाच्या केंद्रस्थानी ठेवल्या. त्यामुळे त्यांची पुढील कारकीर्द लोकाभिमुख,समाजाभिमुख झाली. महाराष्ट्र राज्याला प्रगतीच्या शिखरावर नेण्यासाठी त्यांना सर्वांच्या सहकार्याची गरज वाटत होती. विशेषतः विविध जाती समूहांमध्ये सौदाहार्याचे संबंध असावेत,त्यांची एकजूट व्हावी, यासाठी त्यांनी सतत प्रामाणिकपणे प्रयत्न केले. संघटनेतच खरी शक्ती असते हे ओळखून यशवंतरावांनी सुरुवातीपासूनच समाज आधिक एकजिनसी बनविण्यावर भर दिला. सर्व घटकांच्या अपेक्षा समजून घेणे, त्यांना नव्या व्यवस्थेत अधिकाधिक संधी उपलब्ध करून देणे,त्यातून त्यांच्यातील तणाव कमी करणे या विविध मार्गांनी सावधपणे व नेटाने प्रयत्न केले.

सामान्य जनतेचे राज्य निर्माण करण्याच्या उद्देशाने यशवंतरावांनी सहकार, शिक्षण,कृषी- उद्योग या क्षेत्रांच्या विकासाला प्राधान्य दिले. सहकारी साखर कारखाने, सूत गिरण्या, दूध संघ, खरेदी-विक्री संघ, सहकारी बँका स्थापन करून सहकार क्षेत्राला बळकटी आणली.सरकारकडून अर्थ सहाय्य उपलब्ध करून दिले. शेती उत्पादनाला बाजारभावाची हमी दिली. प्रतिकूल परिस्थितीतही शेतीसाठी पाणी,वीज पुरवठा, माल वाहतुकीसाठी दळणवळणाच्या सुविधा शक्य तितक्या प्रमाणात उपलब्ध करून दिल्या आणि अशक्य असेल तिथे केंद्राकडे सातत्याने पाठपुरावा केला. अशारितीने यशवंतरावांनी सुरुवातीच्या कालखंडात केलेल्या पायाभरणीमुळे महाराष्ट्राची नंतरच्या काळात भरभराट झाली. सहकाराचे सुवर्ण युग निर्माण झाले. महाराष्ट्राचा, विशेषतः ग्रामीण महाराष्ट्राचा कायापालट झाला आणि त्याला प्रगत राज्याचा दर्जा प्राप्त झाला. याचे कारण म्हणजे यशवंतरावांचे द्रष्टेपण होय. उत्कृष्ट नियोजन, धोरणात्मक निर्णयांची खंबीर व सातत्यपूर्ण अंमलबजावणी यामुळे अशक्य असलेले विकासाचे उद्दिष्ट अल्पावधीत शक्य व साध्य झाले. या यशाच्या पाठीमागे यशवंतरावांचे कुशल आणि कल्पक नेतृत्व होते.

**पंचायत राज्य व स्थानिक स्वराज्य संस्था:**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संदर्भातील त्यांचे कार्य विशेष दखल घेण्या योग्य आहे. यशवंतरावांनी पंचायत राज्याच्या माध्यमातून लोकशाही विकेंद्रीकरणाचा प्रयोग इतर कोणत्याही राज्यापेक्षा अधिक यशस्वीपणे राबविला. राजकीय सत्ता ग्रामीण भागात खेडी,वाड्या,पाडे,वस्त्या यांच्यापर्यंत पोहचावी, सर्वांना सत्तेत सहभाग मिळावा हा पंचायत राज्याचा उद्देश डोळसपणे प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर सहकार चळवळ,शिक्षण,शेतीविषयक सुधारणा,कृषी- औद्योगिक समाजाची निर्मिती, पंचायत राज्य व स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या माध्यमातून केलेला लोकशाही विकेंद्रीकरणाचा प्रयोग यामुळे ग्रामीण भागात स्थानिक पातळीवर नविन नेतृत्व उदयाला आले. रत्नाप्पा कुंभार, तात्यासाहेब कोरे, पी.डी.पाटील,विठ्ठलराव विखे पाटील, यशवंतराव मोहिते यांचा स्थानिक राजकारणात प्रवेश झाला.महाराष्ट्रात नेतृत्वाची एक नवी पिढी निर्माण झाली. यशवंतरावांनी आपल्या राजकीय विचारांचा वारसा पुढे चालविणारे नेतृत्व घडविले. त्यामुळे जरी यशवंतराव २२ वर्ष केंद्राने दिल्लीत दिलेली विविध उच्च पदांची जबाबदारी पार पाडण्यात व्यस्त असले तरी या नव्या स्थानिक नेतृत्वाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या सर्वांगिण विकासासाठी ते कटिबद्ध राहिले. महाराष्ट्राच्या राजकारणावर असलेल्या यशवंतरावांच्या प्रभावामुळे त्यांचा केंद्रातील दबदबा कायम राहिला.

**संसदीय नेतृत्व:**

विविध प्रश्नांचा सर्वव्यापी अभ्यास, मुद्देसूद,चिकित्सक मांडणी, चर्चेनंतर लोक हिताचेच निर्णय घेण्याला प्राधान्य, विरोधकांविषयी कमालीचे सौजन्य यामुळे यशवंतरावांची संसदीय कारकीर्द इतरांपेक्षा अतिशय वेगळी आणि अधिक सरस ठरली. उत्कृष्ट संसदपटू म्हणून आवश्यक असणारे अनेक दुर्मिळ गुण त्यांच्याकडे होते. त्यांची

संसदीय कारकीर्द इतरांसाठी आदर्श व अनुकरणीय ठरली, हे त्यांच्या विरोधकांनी देखील मान्य केले आहे. यशवंतरावांच्या दृष्टीने संसद हे लोकांचे प्रश्न मांडण्याचे, त्यांच्या अडचणींना वाचा फोडण्याचे सर्वोच्च व्यासपीठ आहे. संसदेत लोकमानसाचे, समाजमनाचे प्रतिबिंब पडते. त्यामुळे कोणत्याही प्रसंगात, परिस्थितीत संसदेचे पावित्र्य, श्रेष्ठत्व जपण्याचा ते प्रयत्न करीत असत. त्यासाठी आवश्यक त्या सर्व संसदीय प्रथांचे पालन करण्याकडे त्यांचा कटाक्ष असे. त्यामुळेदेखील त्यांच्या संसदीय व्यक्तिमत्वाला एक वेगळी उंची,परिमाण लाभले. त्यांच्या संसदेतील एकंदर कामकाजातून,चर्चेतून,प्रश्नोत्तरातून,त्यांनी वेळोवेळी मांडलेल्या मतांमधून,दिलेल्या प्रतिक्रियांमधून त्यांचा अभ्यास, लोकहिताची तळमळ यागोष्टी प्रकर्षाने जाणवतात. ते संसदीय कामकाजात लोकांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीला सर्वोच्च प्राधन्य देत असत. एखादा मुद्दा विरोधकांना अतिशय कौशल्याने पटवून देत की त्यामुळे विरोधकांच्या विरोधाची धार बोथट होई.

**यशवंत विचार:**

यशवंतराव उत्कृष्ठ साहित्यिक होते.ते वैचारिक, तात्विकदृष्ट्या प्रगल्भ होते. कोणतेही राजकीय धोरण, निर्णय, कृती यांच्या पाठीमागे हा प्रगल्भ विचार दिसून येतो.जाणता नेता, धुरंधर राजकारणी, उत्कृष्ठ लोकसंघटक अशी त्यांची प्रतिमा निर्माण होण्यास त्यांचे परिपक्व विचार कारणीभूत आहेत. हजारो, लाखो लोकांच्या जीवनात विधायक बदल घडवून आणण्याचे सामर्थ्य 'यशवंत विचारा'त आहे. यशवंतरावांनी राजकीय कार्यक्षेत्रात लोकशाही,समाजवाद या विचारसरणीवर विश्वास ठेवला. त्यांच्या सामाजिक कार्याची प्रेरणा समाजवाद ही आहे. समाज जीवनाच्या सर्व क्षेत्रात समाजवादी विचारांची प्रतिष्ठापना करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. मात्र समाजवादा वरचा त्यांचा विश्वास डोळस होता. "मला अभिप्रेत असलेला 'समाजवाद' हा केवळ एक आर्थिक सिद्धांत नाही. तो मूल्यावरही आधारलेला आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा विकास हा आपल्या विचाराची,आचाराची आधारशिला असली पाहिजे.पिढ्यानपिढ्या हरिजन,गिरीजन यांची अवहेलना होत आहे, त्यांच्यावर अन्याय होत आहेत, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या त्यांचे शोषण चालू आहे. राष्ट्रीय जीवनाच्या मुख्य धारेपासून त्यांना अलग करण्यात आले आहे. आपल्या राष्ट्रीय जीवनातील हे वैगुण्य आपण किती लवकर नाहीसे करणार आहोत यावरच आपल्याला समाजवादाचा कोणता आशय अभिप्रेत आहे हे ठरणार आहे. जोपर्यंत हे वैगुण्य दूर होत नाही तोपर्यंत सामाजिक उद्दिष्टांची चर्चा करणे निरर्थक आहे. समाजाचे महावस्त्र नव्याने विणावयाचे तर त्यासाठी गरज आहे ती समर्पणशीलतेची आणि ध्येयवादी आवेशाची". या त्यांच्या विचारांवरून लक्षात येते की, त्यांनी समाजवादाचा तात्विक आणि व्यावहारिक आशय ओळखला होता. त्याच्या तात्विक चर्चेमध्ये फारसे अडकून न पडता सामाजिक वैगुण्याला दूर करण्याचा उपाय म्हणून ते समाजवादाचा विचार करतात. समाजवादाच्या आधारे समाज व्यवस्थेची नव्याने रचना करायची असेल तर ध्येयवादाची गरजदेखील ते अधोरेखित करतात. राजकारणाचे जातीयकरण होऊ देण्याचे त्यांनी कटाक्षाने टाळले. हे जाती-धर्मनिरपेक्ष राष्ट्राच्या उभारणीच्या दृष्टीने अत्यंत मोलाचे आहे.

यशवंतरावांच्या विचारांमध्ये लोकशाही ही संकल्पना मध्यवर्ती आहे.त्यांच्या राजकीय कार्याला लोकशाही मूल्यांचे अधिष्ठान आहे."लोकशाही प्रक्रियेतील छोट्या माणसांच्या संघटन शक्तीचे सामर्थ्य लक्षात घेऊन त्यांच्या पाठीशी राज्यशक्तीने राहण्याची गरज आहे." हे ओळखून सुरवातीपासूनच यशवंतरावांनी सामान्यांच्यात वावरताना त्यांच्यातीलच आपण एक आहोत, या भावनेतून त्यांचे प्रश्न, अडीअडचणी, त्यांच्या आशा आकांक्षा, स्वप्ने काय आहेत ते जाणून घेतले. त्यांच्या सोडवणुकीचे, पूर्ततेचे मार्ग,उपाय काय असावेत, हे मनाशी ठरविले. लोकशाहीच्या मार्गाने ही स्वप्ने वास्तवात आणली.यशवंतरावांच्या दृष्टीने सामान्य माणूस, त्याचे सुख,समाधान हे सर्वाधिक महत्वाचे होते. त्या दृष्टीने त्यांनी आपल्या कार्याची दिशा निश्चित केली. लोकांच्या समस्या सोडविण्याला त्यांनी आपल्या कार्याच्या केंद्र स्थानी ठेवल्यामुळे ते लोकांना आपलेसे वाटू लागले. लोकांच्या पाठींब्यामुळे त्यांच्या नेतृत्वाचा पाया अधिक व्यापक आणि भक्कमही झाला. या सगळयाच्यामागे लोकशाही विचार, लोकशाहीवरील दृढ निष्ठाच आहे. "लोकशाही यंत्रणा तयार करणाऱ्या तज्ञ मंडळीनी राजकीय सत्तेवर कायद्याची आणि इतर बंधने घालून ती सत्ता समतोल करून ठेवली आहे. सत्तेचे स्थान हे लोकांच्या कल्याणासाठी उभारलेली एक वेदी आहे, यंत्रणा आहे, ते एक मोठे जोखमीचे काम आहे, ही जाणीव सतत आपल्या मनात असली पाहिजे". या त्यांच्या विचारांमधून लोकशाहीचा खरा आशय व्यक्त झाला आहे. "पक्ष चालतात ते निष्ठेने चालतात हे जरी खरे असले, तरी लोकशाही पक्ष हे विचारांच्या निष्ठेने चालले पाहिजेत, असा तुमचा-आमचा आग्रह असला पाहिजे." लोकशाहीत राजकीय पक्षांनी विचारांचे,निष्ठेचे अनुपालन करण्याविषयी ते आग्रह धरतात.

"समाजाचा विकास व्हायचा असेल तर शिक्षण,सहकार व लोकशाही यांची सांगड घातली पाहिजे. समाजातील तळागाळातील लोकांचा शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. शिक्षण हे सर्वांगिण विकासाचे प्रवेशद्वार आहे." असा त्यांचा उद्दात्त हेतू होता. तळागाळातील लोकांच्या शिक्षणाचा असा विचार करणारे आणि त्याचा

पाठपुरावा करणारे यशवंतराव हे पुरोगामी विचारवंत होते. त्यांनी दाखविलेल्या या पुरोगामी मार्गानेच आजपर्यंत महाराष्ट्राने वाटचाल केली आहे. "सहकार चळवळीत आर्थिक सत्ता आहे याची जाणीव लोकांत आणि त्याचप्रमाणे सहकारी कार्यकर्त्यांत निर्माण झाली आहे. ही चळवळ एका अर्थाने सत्तेचे एक केंद्र आहे; आणि सत्तेचे केंद्र म्हटले की लोकशाहीचा अंकुश त्यावर ठेवलाच पाहिजे. तसे न केल्यास अनियंत्रित सत्तेमुळे विकासाचे हे शस्त्र दुधारी ठरेल अशी मला साधार भीती वाटते" असे त्यांचे मत होते. यशवंतरावांनी महाराष्ट्रात शिक्षण,शेती,सहकार या क्षेत्रात अनेक नव्या सुधारणा केल्या. त्यांच्या प्रयत्नामुळे अल्पावधीतच सहकाराचे नवे युग अवतरले. परंतु या सर्व सुधारणांचा पाया विधायक लोककल्याण हाच असला पाहिजे. त्यामध्ये व्यक्तिकेंद्रित राजकारणाचा शिरकाव होऊ नये. विशेषतः सहकाराची ही चळवळ विघातक शक्तीचे सत्ता केंद्र बनू नये. यासाठी त्यावर लोकशाही मार्गाने नियंत्रण ठेवले पाहिजे.लोकशाहीत लोकांनी सतत जागल्याच्या भूमिकेतून नियंत्रणाचा अधिकार वापरला पाहिजे. अन्यथा विकासा ऐवजी विनाश होण्याची भिती निर्माण होईल आणि मग ही चळवळ तिच्या मूळ उद्देशापासून दूर जाईल,अशी भीती देखील ते व्यक्त करतात. "स्वातंत्र्यानंतर लोकशाही राज्यातील दिशाहीन तरुणांना मार्गदर्शन व्हावे, त्यांनी थोर नेत्यांची चरित्रे अभ्यासून स्वतःही प्रतिकूल परिस्थितीशी झगडावे, स्वकर्तृत्वाने मोठे व्हावे. एखद्या थोर व्यक्तीचे चरित्र देखील एखद्याचे चरित्र घडविते," असा संदेश त्यांनी दिला आहे. तसेच "राज्य करण्याची संधी म्हणजे लोकसेवेची संधी." यशवंतरावांच्या अशा अनेक अवतरणामधून त्यांचे विवेकी विचार दिसून येतात. "क्रांती होते ती शस्त्रांनी नव्हे तर विचारांनी होते ", हे म.जोतीबा फुले यांचे विचार सूत्र त्यांनी आपल्या जीवनात महत्वाचे मानले. ज्या लोकशाहीवर त्यांची श्रद्धा होती त्या लोकशाहीतील कार्यकर्ता कसा असावा याविषयी अतिशय सुंदर विचार ते कार्यकर्त्यांसमोर मांडताना म्हणतात की , "आपल्याला लोकांच्या जीवनातील दैन्य व दारिद्र्य दूर करायचे आहे. त्यासाठी आपण विकासाचा कार्यक्रम हाती घेतला आहे. पण विकासाच्या कार्यक्रमात आपण गुंतलो असताना आपले राजकीय विचारांचे ज्ञान ताजे ठेवले पाहिजे. आपण कशासाठी, कोणासाठी, विकास योजना राबवित आहोत याचे भान दिलदिमागामध्ये असले पाहिजे. विद्यमान परिस्थितीचे सम्यक ज्ञान व जळते प्रश्न त्याला माहित असले पाहिजेत आणि आपल्या वाचनातून आणि परिस्थितीच्या निरीक्षणातून त्याला त्या प्रश्नांची उत्तरे मिळाली पाहिजेत." लोकशाहीतील निवडणुका, प्रचार व निवडून येणे, जनतेचे प्रतिनिधित्व करणे याकडे ते गांभीर्यपूर्वक पाहतात. ते म्हणतात, "आपल्याकडे निवडणुका आल्या की आपण जागे होतो. मग कोणकोण कार्यकर्ते आहेत, कोणाकोणाच्या मनात बाशिंग बांधायचे आहे,याचा शोध सुरु होतो. परंतु अशी परिस्थिती असणे उपयोगाचे नाही." कार्यकर्ता निवडणुकी पुरता नको तर तो लोककार्यातून तयार झाला पाहिजे आणि अशाच कार्यकर्त्याला निवडणुकीत उमेदवारी मिळाली पाहिजे. थोडक्यात त्यांनी लोकशाहीतील घराणेशाही, अनुवंशिकता,वारसा यापेक्षा स्वकर्तृत्वाला महत्व दिले आहे. विचारांचा वारसा जरूर पुढे चालत रहावा. परंतु लोकशाहीतील पद,प्रतिष्ठा या गोष्टी स्वप्रयत्नातूनच मिळाल्या पाहिजेत,हा त्यांचा विचार आजच्या काळात निश्चितच प्रेरणा देणारा आहे.

**सारांश:**

याच यशवंत विचारांचा वारसा पुरोगामी महाराष्ट्राला एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे भविष्यातही मार्गदर्शन करत रहील. यशवंतरावांचा द्रष्टेपणा त्यांच्या सामाजिक,राजकीय आकलनात आहे. राजकारण व सत्ताकारण यांच्या मुळाशी असलेला 'यशवंत विचार' आजच्या पिढीने विशेषतः राजकारण करणाऱ्या युवा पिढीने समजून घेतला पाहिजे. आजच्या राजकारणातील अपप्रवृत्ती बाजूला करून या क्षेत्राचे शुद्धीकरण करण्यासाठी यशवंत विचार समजून घेण्याची व त्याचे अनुकरण करण्याची नितांत गरज आहे. याच यशवंत विचारांचा वारसा पुरोगामी महाराष्ट्राला एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे भविष्यातही मार्गदर्शन करत राहील.

**संदर्भ:**

१) भोळे भास्कर लक्ष्मण, बेडकिहाळ किशोर (संपादक) : शतकांतराच्या वळणावर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर अकादमी,सातारा.
२) चव्हाण यशवंतराव: कृष्णाकाठ, प्रेस्टीज प्रकाशन,पुणे.
३) भोळे भास्कर लक्ष्मण: यशवंतराव चव्हाण- राजकारण आणि साहित्य, साकेत प्रकाशन, पुणे.
४) महानोर ना. धों. (संकलन) : यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,मुंबई.
५) चव्हाण यशवंतराव: सह्याद्रीचे वारे, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,मुंबई.
६ ) पाटील विठ्ठलराव वि. (संग्राहक / संपादक): यशवंतरावांच्या प्रस्तावना,अमेय प्रकाशन पुणे.
७) डॉ. दमामे धोंडीराम जगन्नाथ (अप्रकाशित पी.एच.डी.प्रबंध): यशवंतराव चव्हाण यांच्या पत्रव्यवहारातील विचारदर्शन, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

# ''यशवंतराव चव्हाण –सक्षम नेतृत्व''(भारत – चिन–पाक संदर्भात)

प्रा. डॉ. श्रीकांत म. सोनटक्के
सहयोगी प्राध्यापक इतिहास विभाग प्रमुख
संताजी महाविद्यालय, वर्धा रोड, नागपूर
मो. नं. ९८२२६४०८७२ shrikantsontakke786@gmail.com

**सारांश**

यशवंतराव बळवंतराव चव्हाण यांचा जन्म १२ मार्च १९१४ रोजी सांगली जिल्हयातील देवराष्ट्रे यागावी झाला त्यांच्या लहानपणीच वडीलांचा मृत्यू झाला त्यामुळे घरची परिस्थिती नाजूक झाली व अतिशय खडतर परिस्थितीत त्यांनी बी.ए., एल.एल.बी. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले.

यशवंतरावंवांवर विद्यार्थी दशेपासूनच राष्ट्रवादी विचारांचा प्रभाव होता. शिक्षण घेत असतांनाच त्यांनी भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात सहभाग घेतला १९३० च्या सविनय कायदेभंग आंदोलनाच्या चळवळीत भाग घेतल्यामुळे त्यांना तुरूंगवासही झाला. तसेच १९४२ च्या चलेजाव चळवळीत त्यांनी भूमिगत राहून कार्य केले.

यशवंतरावांवर मानवेन्द्रनाथ रॉय यांच्या विचारांचा प्रभाव होता. तरीही महात्मा गांधी वरिल त्यांची अढळ निष्ठा होती. त्यांनी कॉग्रेसच्या प्रचारासाठी सातारा जिल्हयातील ग्रामिण भागात जनजागृती घडवून आणली. १९३७ मध्ये प्रांतिक कायदेमंडळासाठी झालेल्या निवडणकीत ते कॉग्रेस पक्षाच्या प्रचार कार्यात सहभागी झाले.

**प्रस्तावना**

यशवंतराव चव्हाण हे अष्टपैलू व्यक्तीमत्वाचे राजकीय नेते म्हणून भारताला परिचित आहे. आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत त्यांचा महत्वपूर्ण सहभाग होता. तसेच इ.स.१९२० च्या असहकार आंदोलनात ते सहभागी झाले. तसेच १९४२ च्या 'चले जाव' आंदोलनातही यशवंतराव सहभागी झाले. त्यांनी भुमिगत राहून कार्य केले. परंतू ते पकडल्या गेले व त्यांना तुरूंगवासाची शिक्षा झाली. १९४६ च्या निवडणूकीत प्रांतिक कायदेमंडळासाठी त्यांना कॉग्रेसची उमेदवारी मिळाली ते निवडून आले. तर १९५२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणूकीत यशवंतरावांनी मुंबई राज्याच्या विधानसभेत त्यांची निवड झाली त्याचवेळी राज्यांच्या मंत्रिमंडळातही त्यांचा समावेश झाला. १९५२–१९५६ च्या काळात त्यांनी राज्यांच्या मंत्रिमंडळाचे सदस्य म्हणून काम केले. १९५६ मध्ये भाषेच्या आधारावर राज्यांची पूर्नरचना करण्यात आली व महाराष्ट्र व गुजरात ही दोन्ही राज्ये मिळून दैभाषिक मुंबई राज्य निर्माण झाले. या दैभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून यशवंतरावाची निवड झाली. त्याचवेळी संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर मराठी लोकांच्या भावना अतिशय तिव्र झाल्या. त्यामुळे जनतेच्या विरोध झाला. तेव्हा जनतेला विश्वासात घेवून त्यांनी महाराष्ट्र राज्यांच्या निर्मितीसाठी कॉग्रेस पुढाऱ्यांचे मन वळविले, त्यामुळे १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली व महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री होण्याचा मान यशवंतरावांना मिळाला. त्यांनी महाराष्ट्रातील कृषी – औद्योगिक क्षेत्रांचा विकासाचा पाया घातला. त्यामुळेच महाराष्ट्राने प्रगतीची कास धरली.

इ.स. १९६२ मधे चिंनने भारतावर आक्रमण केले त्यावेळी यशवंतरावाची केंद्रिय मंत्रिमंडळात संरक्षण मंत्री म्हणून नियुक्ती झाली. त्यांच्या सक्षम नेतृत्वाची जाणीव पूर्ण जगाला दिसली.

'हिमालयाच्या साहाय्याला सहयांद्री धावून गेला' अशा शब्दांनी वर्णन केलेली घटना म्हणजे नोव्हेंबर १९६२ मध्ये घडली. चिनी आक्रमणाच्या अनपेक्षित आपत्तीला तोंड देण्यासाठी नेहरूंच्या विनंतीवरून, यशवंतराव चव्हाणांनी संरक्षण खात्याची जबाबदारी स्वीकारली. नेहरूंना त्या वेळी चव्हाणांनी असे सांगितले होते, की एक देशभक्ती सोडली तर या पदासाठी आवश्यक अशी अन्य कोणतीही विशेष पात्रता त्यांच्याजवळ नाही.

चव्हाणांनी सर्वप्रथम आपले खाते स्वच्छ करून त्यात आत्मविश्वास आणि आज्ञापालनाची शिस्तबद्धता आली. सैन्यदलांच्या प्रमुखांशी जवळचा संपर्क ठेवला. इ.स. १९६३ सालच्या ३६५ दिवसांपैकी १६९ दिवस यशवंतराव चव्हाण यांच्या बैठकी झाल्या. सकाळच्या बैठकीची परंपरा त्यांनी सुरू केली. तिन्ही दलांचे प्रमुख, संरक्षण आणि संरक्षण उत्पादन खात्यांचे सचिव या सकाळच्या बैठकींना उपस्थित असत.

स्थलसेना, वायुसेना आणि नौवसेना या तिन्हीही दलांची गतिसुलभ रचना करून त्यांचे पूर्णपणे भारतीयीकरण करणे आवश्यक होते. याचे कारण आपल्या सैन्यदलांची संघटना ब्रिटिश सूत्रानुसार करण्यात आलेली होती. भारत स्वतंत्र झाल्यानंतरही तिच्यात बदल केलेला नव्हता. श्री बदलदेवसिंग, एन. गोपालस्वामी अय्यंगार आणि कृष्ण मेनन या तीनही माजी संरक्षण मंत्र्यांनी सेनादलांचे आधुनिकीकरण आणि भारतीयीकरण करण्याचे प्रयत्न केलेले होते. दुसऱ्या महायुद्धाच्या कालखंडात स्थापन केल्या गेलेल्या संरक्षण खात्याच्या कार्यमर्यादा फारच सीमित होत्या. अंतर्गत सुरक्षितता, नागरी संरक्षण आणि सैनिकी तळांची व्यवस्था एवढयाच गोष्टींचा त्यात समावेश होता. भारत स्वतंत्र झाला त्या वेळचा ब्रिटिश कमांडर–इन–चीफ हा स्थलसेनेचा आणि जी काही नौसेना व वायुसेना अस्तित्वात होती, तिचाही प्रमुख होता.

चव्हाणांनी संरक्षण खात्याची जबाबदारी स्वीकारल्यावर अल्पावधीतच अनेक समित्यांची स्थापना केली. पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली व राष्ट्रीय संरक्षण समितीचाही समावेश असणारी एक आणीबाणी समिती यापूर्वी अस्तित्वात आलेली होती. संरक्षण समितीने सेना — व्यवहार समिती नावांची एक उपसमिती नेमलेली होती. जनरल थिमय्या, जनरल थोरात इ. प्रमुखांचा निवृत्त सेनादलप्रमुखांचा तिच्यात समावेश होता.

भारताचे विमान दलही फारसे सामर्थ्यवान नव्हते. अनेक देशांकडून वेळोवेळी मिळालेल्या अनेकविध प्रकारांच्या विमानांचा त्यात समावेश होता. एखाद्या देशाकडे एखाद्या जातीच्या विमानाचे सुटे भाग मागितले तर ते मिळत नव्हते. कारण तोपर्यंत त्या देशाने तसले विमान वापरायचे सोडून देऊन नवीन विमानांचा स्वीकार केला होता. विमानांच्या बाबतीत भारत परावलंबी होत आहे ही गोष्ट चव्हाणांनी उघड उघड बोलून दाखविले व विमानांचे सुट्टया भागांचे उत्पादन याच देशात व्हायला हवे असा त्यांचा ठाम विश्वास आणि आग्रह होता.

**भारतात विमानांची निर्मिती**

याच काळात 'मिग–२१' ही विमाने तयार करणाऱ्या कंपनी स्थापना करण्यात आली. विमान उत्पादनाला गती देण्यासाठी नाशिक, कोरापुट आणि हैदराबाद येथे विमानांचे व विद्युतयंत्रणा निर्माण करणारे कारखानेही सुरू करण्यात आले व वॉट विमानाची उत्पादनाला गती दिली गेली. 'एच्.एल्.२४' व मॅक–१' या विमानाची सुधारणा घडवून त्यांचेही उत्पादन सुरू केले. नौदलाच्या दृष्टीने ते सशक्त करण्याच्या दृष्टीने त्यावरही यशवंतरावांनी भर दिला.

**अमेरिकेकडून नकार — रशियाचा प्रतिसाद**

१९६४ च्या मे महिन्यात अमेरिकेचे संरक्षण — सचिव रॉबर्ट नॅक्नामारा यांच्या निमंत्रणावरून चव्हाणांनी अमेरिकेला भेट दिली. अमेरिकेने पाकिस्तानला एफ–१०४ प्रकारची विमाने दिली होती. आपल्याकडे मिग — २१ विमाने होती. पण ही केवळ युद्धासाठी उपयोगी पडणारी होती. हवाई

युद्ध आणि जमिनीवर हल्ला या साठी उपयुक्त अशी विमाने आपल्याला हवी होती. अमेरिकनांकडे ही एफ – १० विमाने मागण्यासाठी यशवंतराव चव्हाण गेले होते, पण त्यांना यश आले नाही.

भूतलिंगम आणि कृष्णम्माचारी समित्यांनाही सुपरसॉनिक विमाने मिळविण्याबाबत यश आले नाही. भारताला ही जेट विमाने मिळण्यात अडथळा म्हणून अमेरिकेने विमानांची किंमत डॉलर्समध्ये मागितली. अनेक प्रयत्न करून रॉबर्ट मॅक्नामार आणि अमेरिकन सरकारच्या अन्य वजनदार अधिकाऱ्यांची यशंतवरावाने भेट घेऊन भारताची बाजू प्रभावीपणे मांडण्याचा प्रयत्न केला तरीही चव्हाणांना यश आले नाही. २८ ऑगस्ट १९६४ ला यशवंतराव चव्हाणांनी रशियाला दोन आठवडयांसाठी भेट दिली. अध्यक्ष निकिता क्रुश्चेव्ह यांच्याबरोबर त्यांच्या एकंदर तीन बैठका झाल्या. कोणताही संकोच न बाळगता खुल्या दिलाने भारताला मदत करण्याची रशियाची ईच्छा होती. परंतु यशवंतराव चव्हाण भारतात आल्यावर थोडयाच दिवसात क्रुश्चेव्ह यांची रशियाच्या पंतप्रधानपदावरून हकालपट्टी झाली. रशियाबरोबर आपण केलेल्या वाटाघाटी आणि ११ सप्टेंबर १९६४ ला केलेला करार या गोष्टींची कल्पना यशवंतराव चव्हाणांनी मंत्रिमंडळात दिली. भारतीय नौदलाच्या बाबतीत रशियाची मदत किती प्रमाणात घ्यावी याबाबत पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री साशंक होते. त्यांच्याच सांगण्यावरून नोव्हेंबर १९६४ मध्ये ब्रिटनमध्ये जाऊन चव्हाणांनी पंतप्रधान हॅरॉल्ड विल्सन यांची भेट घेतली. तेव्हा मजूरपक्ष सत्तेवर आला होता. ब्रिटन स्वत:च्याच संरक्षण सामर्थ्यांची परिक्षा त्यावेळी करत असल्यामुळे भारताला मदतीविषयी निश्चित आश्वासन देता येणार नाही असे त्यांनी चव्हाणांना सांगितले. चव्हाणांनी ब्रिटनचे परराष्ट्रमंत्री संरक्षण मंत्री – क्लेमंट ॲटली, लॉर्ड माउंटबॅटन इ. अनेकांच्या भेटी घेतल्या, चर्चा केल्या परंतु ब्रिटिश नौदलप्रमुखांपासून बहुतेक सर्वांचाच प्रतिसाद निराशाजनक होता. चव्हाणांच्या प्रयत्नांना अपेक्षित यश मिळू शकले नाही.

शस्त्रास्त्रांच्या खरेदीसाठी चव्हाणांनी हे जे परदेश दौरे केले त्यामधून भारताच्या परराष्ट्र संबंधांना एक नवीन दिशा मिळाली. चव्हाण परराष्ट्रमंत्री झाले तेव्हा रशियाशी असलेले संबंध सौहार्दाचे होते. यापूर्वी कृष्ण मेनन यांनी मिग विमानाचा व्यवहाराही यशस्वीपणे पार पाडला होता. तरीही भारताच्या चीनबरोबरच्या संघर्षात जी भूमिका रशियांनी घेतली, त्यामुळे रशियाच्या हेतूविषयी अंदाज व्यक्त करणे हे भारताच्या वाटयाला आले. त्यामुळेच पंडित नेहरूंना नापसंत असले तरीही ब्रिटन आणि अमेरिकेच्या लष्करी वर्तुळात प्रवेश करण्याचीही तयारीही भारताने केली. परंतु चीनबरोबरच्या युद्धानंतर आणि दीर्घकालीन साहाय्याबद्दलची पाश्चिमात्य राष्ट्राबरोबरची बोलणी फिसकटल्यानंतर भारताने आपल्या पाश्चात्य राष्ट्रांबरोबरच संबंधात पुर्नेविचार केला. पाकिस्तानला अमेरिकेने पाणबुडी आणि एफ – १०४ सुपरसैनिक जेट विमाने दिली होती, पण सतत २ वर्षे खटपटी आणि वाटाघाटी करूनही भारताला तीव्र गरज होती, ती विमाने किंवा पाणबुडया पाश्चिमात्य देशांनी मिळू दिली नाहीत. भारत रशियाच्या अधिक निकट गेला तो केवळ गरजेपोटी. इंग्लंड आणि अमेरिकेकडून विनाअट, भरघोस संरक्षण सहाय्य मिळू शकणार नाही असा ठाम विश्वास निर्माण झाल्यामुळेच! चिनी आक्रमणानंतर भारताबद्दल आस्थेचे जे भडक प्रदर्शन अमेरिकेने केले आणि त्यानंतर तो तटस्थपणा, हिशोबीपणा स्वीकारला त्यामुळेच भारताला रशियाकडे झूकावे लागले.

**भारत – पाक संघर्ष (१९६५)**

१४ एप्रिल १९६५ रोजी एक पूर्ण ब्रिगेडच्या सामर्थ्यानिशी पॅटन रणगाडे व १०० पौंडी तोफांसह पाकिस्तानने कच्छच्या रणात चार ठिकाणी हल्ला केला, ''कच्छ आणि सिंधच्या सीमेवर अघोषित युद्ध सुरू झाले आहे'', अशी बातमी दिल्लीहून करण्यात आली. ''पाकिस्तानी सेनांनी भारतीय प्रदेशात खोलवर आपली संरक्षण ठाणी उद्ध्वस्त केली आहेत'' असेही सांगितले गेले.

यातली काही आपल्याला साडून द्यावी लागली. चव्हाणांनी उद्गार काढले ते असे, ''कच्छच्या रणातील घटनांमुळे मंत्रिमंडळाला खेद होत आहे. काही ठिकाणी आम्हाला माघार घ्यावी लागली आहे. यावेळी लालबहादूर शास्त्रीने इशारा दिला की, पाकिस्तानने कच्छच्या रणामधील आक्रमण थांबवले नाही तर ८०० मैल लांबीच्या सीमेवर सोयीस्कर अशा कोणत्याही ठिकाणी भारत हल्ला चढवेल असा तो गंभीर इशारा होता. चव्हाणांनी लष्करप्रमुखांना पंजाब सीमेवरील सैन्याला निर्बध करण्याच्या सूचना दिल्या. पंजाब — सिंधू सीमांवर सैन्याच्या तुकडया उभ्या होत्या. पंतप्रधान लालबहादूर शास्त्रींच्या घोषणेमुळे आयुबखानांचे पित्त खवळले. चव्हाणांनी आयुबखानांच्या या आक्षेपाला सणसणीत उत्तर दिले त्यांनी सांगितले, ''जर कोण्या देशाने भारताविरूद्ध युद्ध पुकारले तर भारताला प्रत्युत्तरही द्यावे लागले."

काश्मीर मधील युद्धबंदी रेषेचा भंग करणारी प्रकरणेही एकीकडे चालू होती. पाकिस्तानने भारतीय हद्दीत केलेल्या आक्रमणांना भारतीय सेना चोख उत्तर देत. अर्थात यामुळे पाकिस्तानच्या लष्करी महत्वाकांक्षांना कोणत्याही प्रकारे आळा बसणे अर्थातच शक्य नव्हते. चव्हाणांनी म्हटले होते, ''कच्छच्या रणासंबंधातील करार झाल्यावर आम्हाला असे वाटले होते की, पाकिस्तान आता शांततामय सहजीवनाचा मार्ग स्वीकारील आणि लष्करी धाडस करण्याचा मार्ग पुन्हा स्वीकारणार नाही. परंतु मे १९६५ मध्ये रावळपिंडीमध्ये मोठया गनिमी आक्रमणाच्या घटना घडत होत्या. या योजनेचा एक भाग म्हणनू, आझाद काश्मीरमधील १६ ते २५ या वयोगटातील तरूणांना लष्करी प्रशिक्षण द्यायला पाकिस्तानने सुरूवात केली होती. एका खास 'मुजाहिद' दलाची उभारणी केली होती आणि मुलकी व्यवसायातील १,५०,००० नागरिकांनाही लष्करी प्रशिक्षण देऊन एक राखीव दल निर्माण केले होते. याला तोंड देण्यासाठी भारताने केलेले उपाय यावर यशवंतरावांनी आपले निवेदन १६ ऑगस्ट १९६५ रोजी लोकसभेत केले व २३ ऑगस्ट १९६५ रोजी त्यांनी ठामपणे सांगितले की, ''पाकिस्तानी हल्ले भारताने पूर्णपणे परतवून लावले व युद्धबंदी रेषेवरील आपली ठाणी आपल्याकडेच आहे." तर १ सप्टेंबर रोजी छाब विभागात हवाई दलाची मदत घेवून यशवंतरावांनी ''आगे बढो'' चा इशारा दिला व पुढे पाकिस्तानने माघार घेतली.

**निष्कर्ष**

द्विभाषिक मुंबई राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांनी सुत्रे आपल्या हाती घेऊन जे धोरणात्मक निर्णय घेतले ते पूढील काळात महाराष्ट्राला महत्वपूर्ण ठरले. त्यांनी कृषी व औद्योगिक क्षेत्राला गती देऊन ग्रामीण भागातील अर्थकारणाला व्यापक स्थैर्य दिले. गरीब मुला—मलींची शिक्षणाकरिता सवलती प्राप्त करून दिल्या. साहित्य संस्कृती क्षेत्रात अनेक योजना आखल्या, दिल्लीत त्यांनी संरक्षण मंत्री म्हणून प्रवेश केला. पुढे गहमंत्री, अर्थमंत्री आणि परराष्ट्रमंत्रीपद त्यांनी खंबीर व यशस्वीपणे सांभाळले. भारत चिन युद्ध व भारत पाक युद्धांच्या वेळी त्यांच्या खंबिर नेतृत्वाची चुणूक पूर्ण भारताने पाहिली व भारतीय सैन्य व जनता, यशवंतरावाकडे एक समर्थ नेता म्हणून पाहू लागली. यशवंतराव चव्हाणाच्या कार्याचे व व्यक्तीमत्वाचे महात्म्य दिवेसंदिवस वाढत जाणार व त्यातून येणाऱ्या नविन पिढीला प्रेरणा मिळेल.

**संदर्भ सूची —**

१. यशवंतराव चव्हाण, भोळे भास्तर, साकेत प्रकाशन औरंगाबाद, १९८७.
२. 'यशवंतराव कर्तृत्व आणि नेतृत्व', सारडा शंकर, दिलीपराज प्रकाशन, पुणे, २००३.
३. 'यशवंतराव चव्हाण', पाटील व्ही.व्ही., साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९४.
४. 'यशस्वी जिवनाची नवी शितीजे', वि. घे. प्रभाकर, गजानन बुक डेपो, मुंबई, १९६६.
५. 'महाराष्ट्रातील समाजसुधारक', के. सागर पब्लिकेशन, २०१२.
६. 'स्वतंत्र भारताचा इतिहास १९४७ ते १९८०', कोल्हारकर शरद, मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९७.
७. 'आधुनिक भारताचा इतिहास', गोव्हर बी.एन., अनु. बेल्हेकर एन.के., यश चंद्र ॲण्ड कंपनी, नवी दिल्ली, २०१७.

# समृद्ध महाराष्ट्राचे शिल्पकार व लोकनेते यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक विचार व कार्य

**Dr. Vandana Rajesh Shinde**
(Assistant Professor) History Department
526/202 Rameshwar Colony, Rameshwar Plaza, Kharepatan, Tal-Kankavli,
Dist- Sindhudurg Pin Code-416703 Ph no -9850574176

---

समृद्ध महाराष्ट्राचे शिल्पकार व लोकनेते ही उक्ती मा. यशवंतराव चव्हाण यांचे यथार्थ वर्णन करते. सुमारे ४० वर्षाच्या कारकिर्दीत महाराष्ट्रातील राजकारणाला योग्य दिशा देण्याचे, महाराष्ट्राचा सर्वांगिन विकास करण्याचे व महाराष्ट्राला जातीभेदरहित राजकारणाचा वारसा देण्याचे महत्त्वपूर्ण काम यशवंतरावांनी केले. ज्ञानोपासक, अभिरुची संपन्न व्यक्तिमत्त्व, वैचारिक अधिष्ठान प्राप्त झालेले नेतृत्व, मुसुद्दी, पराक्रमी व विरोधकांचाही मान राखणारे संयमी राजकारणी असे त्यांच्या अंगी असलेल्या गुणांचे वर्णन करता येईल. या अष्टपैलू गुणांच्या बळावरच त्यांनी एक गरीब शेतकरी कुटुंबातील मुलगा ते राष्ट्रीय नेते त्यानंतर महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री अशी अलोकनीय झेप घेतली होती. आधुनिक महाराष्ट्राची उभारणी करण्यामध्ये ज्या ज्या व्यक्तीने कष्ट घेतले, प्रयत्न केले त्यामध्ये यशवंतराव चव्हाण यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते कारण विकास म्हणजे केवळ रस्ते, तलाव आणि इमारती बांधणे नव्हे तर त्यासोबत माणसाची, पर्यायाने समाजाची आर्थिक, सामाजिक,शैक्षणिक व भौतिक प्रगती करणे अभिप्रेत असते म्हणूनच महाराष्ट्राची आणि देशाची सर्वांगीण प्रगती करण्याचा त्यांचा ध्यास प्रचंड मोठा होता. अशा अष्टपैलू गुणांनी युक्त असलेल्या यशवंतरावांच्या शैक्षणिक कार्याचा व विचारांचा आढावा सदरच्या शोधनिबंधात घेण्यात आला आहे.

**संशोधनाची पध्दती -** सदरच्या शोध निबंध लिखाणासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. याशिवाय यशवंतराव चव्हाण यांचे विकिपीडिया, विकास पीडिया, त्यांची ग्रंथमाला सह्याद्रीचे वारे व युगांतर, काही मासिके,वर्तमानपत्रे, दैनिके यांच्या आधारे प्रस्तुतच्या शोधनिबंधाचे लिखाण करण्यात आले आहे.

**संशोधनाची गरज -** आत्तापर्यंतच्या बऱ्याच संशोधकांनी, अभ्यासकांनी यशवंतराव चव्हाण यांच्या अष्टपैलू कार्याचा दीर्घकाळ अभ्यास केला आहे त्यांचे कार्य विस्तृत स्वरूपात उलगडून दाखवले आहे पण त्यांचे शैक्षणिक कार्यही तितकेच महत्त्वाचे होते याकडे बऱ्याच जणांनी दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. त्यांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेणे ही काळाची गरज आहे हा दृष्टिकोन पुढे ठेवून सदरच्या शोधनिबंधात यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक विचार व कार्य मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

१) यशवंतराव चव्हाण यांची शैक्षणिक भूमिका अभ्यासणे.

२) यशवंतराव चव्हाण यांची विद्यापीठे स्थापन करण्यामागची कल्पना समजावून घेणे.

३) तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षण पोहोचवण्याची त्यांची धडपड अभ्यासणे.

४) मागासवर्गीय विद्यार्थ्यांना यशवंतरावांनी लागू केलेल्या सवलतींचा सविस्तर आढावा घेणे.

५) यशवंतरावाचे शैक्षणिक धोरण अभ्यासणे.

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून संपूर्ण देशाला परिचित असणारे यशवंतराव चव्हाण यांनी राज्याच्या सर्वांगीण विकासाला गती व दिशा देण्याचे कार्य केले म्हणूनच संपूर्ण महाराष्ट्र त्यांना महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून ओळखतो शेती उद्योग, सहकार, उद्योग विजनिर्मिती व शिक्षण या सर्व क्षेत्रांमध्ये त्यांनी अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने प्रचंड विकास घडवून आणला. मुळातच यशवंतराव चव्हाण हे अत्यंत दूरदृष्टी वृत्तीचे होते. त्यांना काळाच्या

पुढची बुद्धिमत्ता लाभलेली होती. भविष्यात कोणत्या गोष्टीची तरतूद करावी याची दूरदृष्टी त्यांच्याकडे होती मुळातच त्यांचे नेतृत्व सुसंस्कृत, जातीभेदविरहीत व दूरदृष्टी पणाचे होते त्यांच्या कृतिशील व प्रगतिशील विचारातून आजचा विकसित महाराष्ट्र घडल्याचे आपल्याला दिसून येते. संपूर्ण भारतात एक प्रगतशील व विकसीत राज्य म्हणून महाराष्ट्राला जो नावलौकिक प्राप्त झाला त्यामध्ये यशवंतराव चव्हाण यांचा सिंहाचा वाटा होता असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही. आज आपली पावले जागतिकीकरणाकडे वळत आहेत. पण याच जागतिकीकरणाच्या काळात महागडे होत जाणारे शिक्षण व शिक्षणातून आपली जबाबदारी झटकून टाकण्याचे शासनाचे धोरण आणि वंचितांच्या शिक्षणाचा निर्माण झालेला प्रश्न भविष्यात गंभीर स्वरूप धारण करेल याच पार्श्वभूमीवर यशवंतराव चव्हाण यांच्या शैक्षणिक भूमिकेची राज्याला आणि देशाला नितांत गरज असल्याचे आपल्याला दिसून येते. यशवंतरावांचे राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक कार्याबरोबर त्यांचे शैक्षणिक कार्यही अफाट होते. त्यांचे संपूर्ण जीवन हेच एखाद्या महासागरा सारखे होते त्याचा तळ शोधणे कोणालाही सहजासहजी शक्य झाले नाही.

महाराष्ट्राचे शिल्पकार या नात्याने यशवंतराव चव्हाण यांचे व्यक्तिमत्त्व उलगडत असताना त्यांचे शिक्षणविषयक विचार आजच्या ग्लोबल व स्पर्धेच्या युगातही किती परिणामकारक ठरू शकतात आणि त्यांच्या विचारांची आजही आपल्याला किती प्रमाणात गरज आहे हे देखील लक्षात येते. मुळातच लहानपणापासून अचूक दूरदृष्टी असलेल्या यशवंतरावांना महात्मा ज्योतिबा फुले आणि त्यांचे थोरले बंधू गणपतराव यांच्या सामाजिक व आर्थिक विषमता दूर करण्याच्या कार्यामुळे एक नवी दृष्टी प्राप्त झाली होती. आपल्या मूळ जन्मगावी देवराष्ट्र गावात राहून त्यांनी विषमतेबरोबरच शेतकऱ्यांची दुखे जाणली होती. त्यांच्या अज्ञानाचे व गरिबीचे कारण शिक्षणच आहे हे त्यांनी जाणले होते .त्यातूनच शिक्षणाची गरज आणि महत्त्वही त्यांच्या लक्षात आली होती. शेतकऱ्यांची पुढची पिढी ही शिक्षीत पिढी असलीच पाहिजे आणि शिक्षण हे तळागाळातल्या प्रत्येक व्यक्तीला मिळाले पाहिजे यासाठी त्यांनी प्रचंड आग्रह धरला आणि त्यांच्या दूरदृष्टीमुळे सैनिक स्कूल ,शिवाजी विद्यापीठ व मराठा विद्यापीठाची निर्मिती झाली.[१]

शिक्षणाच्या अनुषंगाने अनेकांनी विविध व्याख्या केल्या, आपले विचार मांडले याच पार्श्वभूमीवर यशवंतराव चव्हाण यांनी शैक्षणिक दृष्टिकोन, भूमिका, शैक्षणिक धोरण याविषयीचे विचार मांडले ते उल्लेखनीय होते. शिक्षणाची व्याख्या करताना यशवंतराव म्हणतात,"शिक्षित व्यक्तीला स्वतःच्या भोवती घडणाऱ्या गोष्टी आणि जगामध्ये घडणाऱ्या इतर गोष्टी यांची संगती लावता येते त्याचा योग्य अर्थ समजावून घेता येतो त्याचा परिणाम आपल्या जीवनावर काय घडतो. आपल्या व्यक्तिमत्त्वावर काय घडतो

हे समजावून घेता येते आणि समजावून देता येते त्याला मी शिक्षण मानत आलो आहे" शिक्षणाची साधी, सोपी, सरळ व्याख्या करणारे यशवंतराव चव्हाण यांनी राज्याचे शैक्षणिक धोरण निश्चित करताना देशातील शिक्षणाचा इतिहास आणि परंपरा लक्षात घेतल्या होत्या हे त्यांच्या शैक्षणिक विचारावरून लक्षात येते.[२] त्याकाळातील शिक्षणाचे माध्यम कोणते असावे आणि का? याबाबतही त्यांनी आपली भूमिका मांडताना स्पष्ट केले होते की"येथील बहुसंख्य समाज हजारो वर्षापासून शिक्षणापासून दूर व वंचित आहे लोकशाहीचा खरा अर्थ त्यांना समजून सांगायचे असेल आणि लोकशाही मजबूत करायचे असेल तर शिक्षण हे त्यांच्या मातृभाषेतून व भाषेतूनच दिले पाहिजे त्यातूनच आमची जनता शहाणी होईल आणि खऱ्या अर्थाने ती लोकशाहीचे रक्षण करेल. ज्ञानभाषा एक आणि लोकभाषा दुसरी अशी हिंदुस्तानच्या जीवनाची परंपरागत कहाणी आहे. ऋषीमुनीची आणि पंडितांची ज्ञानभाषा होती संस्कृत कारण ती देवभाषा होती आणि जनसामान्यांची भाषा होती प्राकृत हे फार पूर्वी होते. पण नंतरही तेच झाले .इंग्रज आले आणि या देशातील ज्ञानभाषा इंग्रजीबनली.[३] एखाद्या मोठ्या व्यक्तीबद्दल बोलताना त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्व अष्टपैलू आहे किंवा होते असे म्हणण्याची पद्धत आहे. पण महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव

चव्हाण यांच्या बाबतीत ही केवळ औपचारिकता राहत नाही जसे एका हिऱ्याला पैलू देताना किती पैलू दिले जातात हे मोजता येत नाही तसेच यशवंतरावांचे व्यक्तिमत्त्व होते. थोर देशभक्त, रसिक साहित्यिक, धुरंदर, मुत्सद्दी राजकारणी, विचारवंत,गुणग्राहक, सौजन्य युक्त जनतेच्या प्रेमाने गुरफटलेला निष्ठावंत नेता, एक जाणकर समाजवादी, लोकशाहीवर नितांत श्रद्धाठेवणारा, चारित्र्यसंपन्न, सुसंस्कृत नागरिक ओजस्वी वक्ता, समृद्ध महाराष्ट्राचा शिल्पकार इ. पैलूंनी युक्त असे व्यक्तिमत्त्व अभ्यासताना त्यांचे शैक्षणिक विचारही आजच्या युगातही युगप्रवर्तक असल्याचे जाणवतात. टिळक हायस्कूलमध्ये शिक्षण घेत असताना झालेल्या संस्कारांमुळे यशवंतरावांच्या मनात टिळका प्रमाणेच प्रखर ध्येयवाद, देशप्रेम स्वार्थत्याग, जिद्द या भावना पेरला गेल्या होत्या. त्यांच्या सर्व विचारांचा केंद्रबिंदू हा ग्रामीण भागात राहणारा माणूसच होता. त्यांनी राबविलेल्या शेती, उद्योगधंदे, शिक्षण, मनुष्यबळ या चारसूत्री कार्यक्रमातून सुद्धा हे स्पष्ट होते .

यशवंतराव चव्हाणांनी शिक्षणाच्या क्षेत्रात दूरगामी पावले टाकली याचे उत्तम उदा. म्हणजे सातारा येथे सैनिक स्कूलची केलेली स्थापना होय. शेतकऱ्याच्या विशेषत: ग्रामीण भागातल्या विद्यार्थ्यांना सैन्यात येण्याचा मार्ग दाखवतानाच त्यांनी भारतातील पहिले सैनिक स्कूल सातारा सुरू केले.आजही सातारा जिल्ह्यातील काही गावांमधून सैन्यात भरती होण्याचे प्रमाण मोठे असल्याचे दिसून येते. आज या सैनिक स्कूलमधून बाहेर पडलेल्या अनेक कर्तबगार विद्यार्थ्यांनी संरक्षण दलाचे प्रभावी नेतृत्व केल्याचे दिसून येते .त्यावेळी सैनिक स्कूलमध्येच प्राथमिक स्वरूपाचे शिक्षण उपलब्ध झाल्यास सैन्यांमध्ये अधिकारीपदावर पोहोचणे सहज शक्य होईल म्हणून सातारा येथे सैनिक स्कूलमध्ये नॅशनल डिफेन्स अकादमीसाठी शिक्षण मिळण्याची सोय यशवंतराव चव्हाण यांनी उपलब्ध करून दिली.[४] शिक्षणाचे माध्यम प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण ,उच्च शिक्षण,यातील परस्पर संबंध एवढाच विचार करून यशवंतराव थांबले नाही तर आपल्या राज्याचा सर्वांगीण विकास खऱ्या अर्थाने साधायचा असेल तर विज्ञान आणि तंत्रज्ञानाची कास धरल्याशिवाय राज्याचा औद्योगिक विकास होवू शकणार नाही. त्याचबरोबर भारत हा कृषी प्रधान देश असल्यामुळे शेतीच्या विकासावरच त्यांचे भवितव्य अवलंबून आहे म्हणून अंधश्रद्धेला मूठमाती देत विज्ञानाची आणि तंत्रज्ञानाची आपण फक्त कास धरली पाहिजे व नियोजन पद्धतीने पावले टाकली पाहिजेत हा विचार घेऊनच ते सतत आग्रही राहिल्याचे दिसून येतात आणि याचीच फलश्रुती म्हणजेच नव्या राज्याचे मुख्यमंत्री या नात्याने शिक्षण क्षेत्रात यशवंतराव चव्हाणांनी घेतलेले काही निर्णय दूरगामी परिणाम करणारे ठरले. त्यामध्ये नवी विद्यापीठे स्थापन करण्याचा निर्णय महत्त्वाचा मानला जातो त्याकाळात मुंबई-पुण्यासारख्या मोजकीच विद्यापीठे महाराष्ट्रात होती. शिक्षण तळागाळापर्यंत पोचवायचे असेल, शिक्षणाने नवी पिढी घडवायची असेल तर नवीन विद्यापीठे हवीत पण तेव्हा विद्यापीठ एखाद्या भागाला मिळवण्यासाठी अनेक अटी असत. मुख्य म्हणजे त्या भागात काही संख्येने महाविद्यालये असणे गरजेचे होते. पण मराठवाड्यासारख्या भागात तेव्हा बोटावर मोजण्याइतकीच महाविद्यालये होती. पण तेथे विद्यापीठ नव्हते. पण यशवंतराव चव्हाणांनी तो निर्णय बदलला आणि मराठवाड्यात औरंगाबाद मध्ये विद्यापीठ स्थापन केले जे आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ म्हणून ओळखलं जाते. असेच दुसरे विद्यापीठ त्यांनी कोल्हापुरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने स्थापन केले. या दोन्ही विद्यापीठामुळे या विभागांमध्ये शिक्षण क्षेत्रात कसे बदल होत गेले आज आपल्याला स्पष्ट दिसून येत आहेत.[५] अशाप्रकारे शिक्षण हे सामाजिक, राजकीय व आर्थिक विकासाचे महत्व साधन आहे ते सर्वांना मिळाले पाहिजे म्हणून आरक्षणाच्या परिघाबाहेर असणाऱ्या आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित रहावे लागत आहेत हे त्यांच्या १९६० च्या दरम्यान लक्षात आले व मुख्यमंत्री पदावर येतात त्यांनी प्रचंड विरोधकांचा सामना करून आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना विनाशुल्क शिक्षण देणारी ई.बी.सी. ची योजना अमंलात आणली. हा खऱ्या अर्थाने क्रांतिकारक निर्णय होता. परिणामी महाराष्ट्रातील अनेक पिढ्या या सवलतीचा लाभ घेत शिकल्या आणि समृद्ध

झाल्या. याचे संपूर्ण श्रेय यशवंतरावाच्या दूरदृष्टी निर्णयाला दिले जाते .याच वेळी धर्मांतरीत नवबौद्ध समाजाला शैक्षणिक सवलती मिळण्यात निर्माण झालेल्या अडचणी ही त्यांनी सोडवल्या तसेच मराठवाडयात पुरेशी महाविद्यालय नसतानाही त्याने औरंगाबाद येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठ स्थापन करण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय घेऊन या परिसरातील असंख्य विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाचा मार्ग खुला करून दिला. ग्रामीण भागातील प्रत्येक विद्यार्थ्याला उच्च शिक्षणाचा अधिकार आहे आणि असे शिक्षण त्याला त्याच्या गावात, तालुक्याच्या ठिकाणी मिळाले पाहिजे या जाणिवेतून यशवंतराव चव्हाणांनी वरील दोन्ही विद्यापीठाची स्थापना केल्याचे दिसून येते.

शिक्षणाच्या बाबतीत यशवंतराव चव्हाण यांचे विचार प्रचंड दूरदृष्टीपणाचे व उदात्त होते. शिक्षणाबाबतीत यशवंतराव म्हणतात, आजपर्यंत आम्ही घेतलेल्या शिक्षणाने आमच्यात नोकरपेशांची मनोवृत्ती निर्माण झाली आहे. आमची बुद्धी व आमचा पिंडच नोकरीपेशाचा आहे असे आमच्यावर रुजविण्यात आले, पण मला ही गोष्ट मंजूर नाही. भारतात असणाऱ्या त्रिस्तरीय शिक्षण पद्धतीचा सांगोपांग विचार यशवंतरावांनी केला होता. शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावे असा ठाम विचारांचे प्रतिपादन त्यांनी केले.कारण परकीय भाषेचे शिक्षण घेण्याने माणसाची बौद्धिक वाढ खुंटते आणि मौलिकता हिरावते. व्यक्ती स्वदेशापासून दूर जातो आणि म्हणूनच शिक्षणाकरिता प्रांतिक भाषेला प्राधान्य द्यावे, याकरिता ते आग्रही होते शासनाने सक्तीचे प्राथमिक शिक्षण द्यावे याकरिता त्यांनी आग्रही भूमिका मांडली होती. ई.बी.सी. सवलत, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शुल्क माफी, शिष्यवृत्ती, ग्रामीण भागात शाळा-कॉलेज काढण्याकरिता प्रोत्साहन या विविध कार्यक्रमातून त्यांनी आपल्या सर्वदूर शिक्षण प्रसाराचा कार्यक्रम प्रत्यक्षात राबविला. त्यांच्या मते, राज्याची औद्योगिक प्रगती जितकी महत्त्वाची तितकीच शैक्षणिक प्रगती देखील महत्त्वाची आहे शिक्षण हे केवळ सामाजिक गरजेकरीता नाही तर ते आर्थिक विकासाचे पर्यायाने देश विकासाचे साधन आहे यावर त्यांचा विश्वास होता याकरिताच उच्च शिक्षण हे कोणाची मक्तेदारी न राहता ते सर्वांकरिताच खुले झाले पाहिजे यासाठी त्यांनी कृतिशीलपणे प्रयत्न केल्याचे दिसून येते. शिक्षण ही सतत चालणारी प्रक्रिया आहे त्यातूनच व्यक्ती विकास, समाज विकास,पर्यायाने समाजीकरण प्रक्रिया सुलभ होते . ज्ञानाची गंगा समाजाच्या खोलापर्यंत पोचली तरच खऱ्या अर्थाने कल्याणकारी ठरेल असा त्यांचा विश्वास होता आजच्या या अस्वस्थ व गुंतागुंतीच्या वातावरणात महाराष्ट्राच्या या दूरदृष्टी नेत्याचे विचार आजही आपल्याला अर्थपूर्ण वाटतात यात काही शंकाच नाही.

**निष्कर्ष-** अशा प्रकारे संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री व समृद्ध महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांनी सुरुवातीपासूनच स्वतंत्र महाराष्ट्र राज्य निर्मितीचे स्वप्न पाहिले होते. त्याचबरोबर महाराष्ट्राचा आणि मनुष्यबळाचा सर्वांगीण विकास हा शिक्षणाशिवाय होणार नाही पण त्यासाठी केवळ शिक्षण महत्त्वाचे नाही तर ते दर्जेदार व गुणवत्ता प्रधान असावे यावर त्यांनी भर दिला होता. शाश्वत विकासावर त्यांचा गाढ विश्वास होता. राष्ट्राची संपत्ती म्हणजे मानवी संपत्ती असते मानवी संपत्तीच्या प्रगतीशिवाय राष्ट्राची प्रगती होऊ शकणार नाही आणि ही मानवी प्रगती शिक्षणात सामावलेली आहे हे ओळखून त्यांनी शैक्षणिक विकासाकडे लक्ष केंद्रित केले होते. राज्याच्या विकासासाठी शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, विचारवंत, कलावंत महत्त्वाचे असतात पण त्यांच्या निर्मितीचे केंद्र म्हणजे शिक्षण होय आणि शिक्षण या ध्येयानेच यशवंतरावांनी राज्य साहित्य व संस्कृती मंडळाची स्थापना करून साहित्य संस्कृतीचे व्यवहाराला शासकीय अधिष्ठान प्राप्त करून दिले. राजकारण हे साहित्यिकांचे शब्दबंधू असतात असे त्यांचे मत होते उच्च शिक्षण तळागाळापर्यंत नेण्यासाठी त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ व कृषी विद्यापीठाची स्थापना केली तसेच मराठी साहित्य संस्कृती महामंडळ व विश्वकोश मंडळाची स्थापना केली. भारताची शास्त्रशुद्ध पुनर्रचना करण्यासाठी विज्ञानवादी तरुण निर्माण झाले पाहिजेत याच भूमिकेतून त्यांनी विज्ञानाची मूल्ये प्रयत्नपूर्वक शिक्षणातून रुजविली . अशी शिक्षणाविषयी अफाट दूरदृष्टी, कुशल मुत्सद्दी

व्यवहारचातुर्य, उत्तम वकृत्व यशवंतरावांकडे होते याबद्दल शंकाच नाही. शिक्षणासाठी त्यांनी केलेल्या महत्त्वाच्या कार्याला, त्यांच्या दूरदृष्टी वृत्तीला व त्यांच्या भगीरथ प्रयत्नांना विनम्र अभिवादन करणेच योग्य ठरते.

**संदर्भ साधने:-**

१) महाराष्ट्र टाइम्स-समृद्ध महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण, मुंबई आवृत्ती,२२ नोवेंबर २००७
२) यशवंतराव चव्हाण-सह्याद्रीचे वारे, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, जगन्नाथ भोसले मार्ग, मुंबई, प्रथमावृत्ती २००६ पृ.क्र.१४०
३) यशवंतराव चव्हाण-युगांतर निवडक भाषणे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, मुंबई,पृ. क्र.१७३
४) यशवंतराव चव्हाण विकिपीडिया
५) उपरोक्त ,सह्याद्रीचे वारे यशवंतराव चव्हाण पृ. क्र.२४०

# यशवंतराव चव्हाण . एक अष्टपैलू व्यक्तिमत्व

प्रा. डॉ. प्रदिप शा. ढोले
इतिहास विभाग प्रमुख स्व. पंचफुलाबाई पावडे कला व वाणिज्य महिला महाविद्यालय,वरूड जि. अमरावती.
मो. न. ९४२३६०९८५० ,E Mail – drpradeepdhole@gmail.com

यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या कर्तबागारीने केवळ महाराष्ट्राचेच नव्हे तर भारतीय त्याचप्रमाणे आतंरराष्ट्रीय राजकाराणास प्रभावित केले. देवराष्ट्रे या महाराष्ट्रातील छोट्याश्या खेड्यात जन्मलेल्या यशवंतरावांचा संयुक्त महाराष्ट्राचे प्रथम सर्वात तरूण मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्याचे प्रथम मुख्यमंत्री, देशाचे संरक्षणमंत्री, अर्थमंत्री, गृहमंत्री, परराष्ट्र व्यवहारमंत्री अशा अनेक पदापर्यतचा झालेला प्रवास हा सर्वानाच थक्क करुन साडणारा आहे. भरतासारख्या विशाल देशाचे उपपंतप्रधान पद देखील त्यांनी सन्मानाने भुषविले. चरणसिंग यांचे सरकार कोसळल्यानंतर यशवंतराव चव्हाण पंतप्रधानपदाचे सर्वात प्रबळ उमेदवार होते. जर कॉग्रेसमधील एका गटाने विरोध केला नसता तर भारतासारख्या विशाल देशाच्या पंतप्रधानपदावर देखील ते विराजमान राहीले असते. महाराष्ट्राच्या तंसेच भारताच्या राजकारणत निर्माण झालेल्या अनेक पेचप्रसंगातून त्यांनी कॉग्रेस पक्षाला सहीसलामत बाहेर काढले. कॉग्रेस पक्ष, पंडीत नेहरु, इंदीरा गांधी, यांच्याशी ते कायम एकनिष्ठ राहीले.

भारताच्या स्वतंत्र्यलढ्यात देखील यशवंतरावांनी निर्भीडपणे सक्रीय सहभाग घेतला. कायदेभंग चळवळ, छोडो भारत आंदोलन या गांधीप्रणित राष्ट्रीय स्वातंत्र्यचळवळीत त्यांनी उत्साहाने भाग घेतला. त्यांचा ग्रंथसहवास दांडगा होता.यशवंतराव हे एक थोर मुत्सदी होते. त्यांनी आपल्या वाक्चातुर्याने केवळ विरोधकांनाच नव्हे तर राष्ट्रीय तथा अंतरराष्ट्रीय पातळीवरील मुत्सद्यांना नामोहरम केले. यशवंतराव हे एक महान वक्ते होते. त्यांची भाषणे, त्यांचे परखड व अभ्यासपूर्ण विचार हे सभेतील उपस्थितांच्या मनाची पकड घेणारे होते. यशवंतराव चव्हाण हे साहित्यप्रेमी होते.मंत्रीमंडळातील विविध खाती सांभाळतांना त्यांनी शिक्षण, समाज, उद्योग, शेती अशा प्रत्येक मुद्यांचे सखोल अध्ययन करुन, संबंधीत समस्यांचा समग्र विचार करून त्यांनी प्रत्येक समस्यावर तोडगा काढला. हिमालयाने म्हणजेच दिल्लीने जेव्हा जेव्हा महाराष्ट्राच्या या सह्याद्रीला म्हणजे यशवतंरावांना साद घातली, तेव्हा प्रत्येक वेळी हा सह्याद्री धावून गेला. भाषा, साहित्य, संरक्षण राष्ट्रीय एकात्मता, समाज, राजकारण, उद्योग, शिक्षण अशा प्रत्येक क्षेत्रात आपला ठसा उमटविणारे यशवंतराव हे खऱ्या अर्थाने अष्टपैलू होते.

**क्रांतिकारक यशवंतराव**

वयाच्या सोळाव्या वर्षापासून यशवंतरावांनी राष्ट्रीय चळवळीत कार्य करण्यास प्रारंभ केला होता. लाहोरच्या रावी नदीच्या तीरावर आलेल्या राष्ट्रीय कॉंग्रेसच्या अधिवेशनात २६ जानेवारी १९३० रोजी स्वातंत्र्य दिन साजरा करण्याचे ठरविले होते. यशवंतरावांनी या कार्यक्रमासाठी स्वत: प्रतिज्ञापत्रक तयार केले. २६ जानेवारी १९३० रोजी यशवंतराव त्यांच्या मित्रांसमवेत कृष्णेच्या घाटावर पोहचले. तिथे झेंडावंदन झाल्यानंतर सर्वांनी स्वातंत्र्यासाठी पूर्ततेसाठी प्रयत्न करायचे अशी मनपूर्वक शपथ घेतली.[१]

यशवंतराव टिळक महाविद्यालयात इंग्रजी इयत्ता चौथीत शिकत असताना त्यांचे वर्ग शिक्षक शेणोलीकर गुरुजींनी 'तुम्ही कोण होणार?' हा प्रश्न सर्व विद्यार्थ्यांना विचारला असता विद्यार्थ्यांनी लोकमान्य टिळक होणार, क्रिकेटर होणार अशी ठराविक उत्तरे दिली. पण

यशवंतरावांनी बाणेदारपणे 'मी यशवंतराव चव्हाण होणार' असे उत्तर दिले. तसेच याच टिळक हायस्कूलच्या आवारात यशवंतराव त्यांच्या मित्रांसोबत लिंबाच्या झाडावर तिरंगी झेंडा लावून झेंडावंदन करित असत. शिक्षणाधिकाऱ्याच्या लक्षात आला असता त्याने 'हे ध्वजवंदन कोणाच्या परवानगीने करता?' असा प्रश्न यशवंतरावांना विचारला यशवंतरावांनी 'स्वयस्फूर्तीने ध्वजवंदन करतो' असे उत्तर दिल्याने टिळक हायस्कूलवर येणारे सरकारी गंडांतर टळले. पण या प्रकरणी त्यांना विद्यार्थी दशेतच अठरा महीन्याचा सश्रम कारावास येरवाडा तुरूंगात भोगावा लागला.[२]

१९३० पासून महात्मा गांधींच्या कायदेभंग चळवळीने भारतात सर्वत्र जोर पकडला. शाळेत शिकत असतांनाच कराडच्या तरूणांनी यशवंतरावांच्या नेतृत्वात कराड म्युनिसिपालिटीवर राष्ट्रीय झेंडा लावून गावात चळवळीचे पत्रक लावायची असा निश्चय केला. त्यांनी एक दिवस 'वंदे मातरमेचा जयघोष करित म्युनिसिपालिटीवर झेंडा फडकावला. ब्रिटीश सरकारने चिडून जाऊन केलेल्या धरपकडीत यशवंतरावांनाही अटक करून त्यांना शिक्षा ठोठावण्यात आली.[३] १९४२ च्या मुंबई येथील गोवालाया टॅंकच्या मैदानात झालेल्या अधिवेशनाला यशवंतराव त्याच्या सहकाऱ्यांसह उपस्थित होते. महात्मा गांधींच्या 'चले जाव' या ठरावास मान्यता मिळाल्यानंतर दुसऱ्या दिवशी भारतभर हरताळ, सभा झाल्या.यशवंतराव वऱ्हाडच्या जनतेसमोर भूमिगत क्रांतिवीरांच्या रूपात प्रगट झाले. ते जनतेला उद्देशून म्हणाले, 'ही चळवळ तुरूंगभरती नाही.करू किंवा मरू या ईर्षेने हा स्वातंत्र्यलढा लढावयाचा आहे.' यशवंतरावांच्या या क्रांतीकारक विचारांनी प्रेरित होऊन चाळीस —पन्नास विद्यार्थ्यांनी शाळा सोडून प्रत्यक्ष 'चले जाव' चळवळीत उडी घेतली. ब्रिटीश सरकारने यशवंतरावांना पकडून देण्यासाठी एक हजार रूपयांचे बक्षीस लावले.[४]

**संयुक्त महाराष्ट्र व महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यशवंतराव:—**

संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या आंदोलनाने संपूर्ण महाराष्ट्र ढवळून निघाला होता. महाराष्ट्र व गुजरातच्या अनेक भागात दंगली घडल्या.अनेकांना आपले प्राण गमवावे लागले.यशवंतरावांच्या सांगली येथील संयुक्त महाराष्ट्रासंबंधीत त्यांच्या भाषणानंतर महाराष्ट्रभर त्यांची बदनामी करण्यात येऊन त्यांची सूर्याजी पिसाळ म्हणून संभावना केली गेली.[५] शेवटी ऑक्टोंबर १९५६ मध्ये लोकसभेने विदर्भासह विशाल द्विभाषिक मुंबई राज्याची स्थापना करण्याचे निश्चित केले. १ नोव्हेंबर १९५६ ला विशाल द्विभाषिक मुंबई राज्याची स्थापना होऊन यशवंतराव चव्हाण या राज्याचे सर्वात तरूण मुख्यमंत्री झाले.[६] मुख्यमंत्रीपद स्विकारल्यानंतर यशवंतरावांनी देशातल्या आणि महाराष्ट्रातल्या माणसांना भौतिक कल्याणाद्वारे सुखी व संपन्न केले पाहिजे हे धोरण समोर ठेवून कार्य केले.[७]ऑगस्ट १९५९ मध्ये यशवंतरावांनी महाराष्ट्र राज्याची स्थापना करण्याबाबात महत्वाचा निर्णय कॉंग्रेसश्रेष्ठींनाकळविला. कॉंग्रेसश्रेष्ठींनी नेमलेल्या नऊ सदस्यीय समितिने मुंबईसह मराठी प्रदेशाचे एक व गुजरात प्रदेशाचे दुसरे अशी दोन राज्ये निर्माण करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार १ मे १९६० रोजी स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची निर्मिती होऊनयशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे प्रथम मुख्यमंत्री म्हणून विराजमान झाले.[८]

**यशवंतराव एक उत्कृष्ट वक्ते व साहित्यिक:—**

यशवंतराव हे एक महान वक्ते होते. यशवंतरावांचे विचार समोरील व्यक्तींना मंत्रमुग्ध करणारे होते. स्वातंत्र्यपूर्व काळात कायदेभंग चळवळीदरम्यान खेड्यापाड्यातील सभांमध्ये यशवंतराव भाषण देत होते. या चळवळीदरम्यान तुरुंगात असतांना यशवंतरावांनी ह. रा. महाजनी यांनी सूचविल्याप्रमाणे 'गांधीवाद' हा विषय घेऊन ३४ ते ४० मिनिटांचे भाषण दिले होते.[९] शिवनेरी नौबती (१९६१), सह्याद्रीचे वारे (१९६२), युगांतर (१९७०) भुमिका (१९७९) आणि विधी मंडळातील निवडक भाषणे १९४६— ६२ खंड १ (१९८९) हे यशवंतरावांचे भाषणसग्रह प्रसिध्द आहेत. यशवंतरावांचे 'कृष्णाकांठ' (आत्मचरित्र १९८४), ऋणानुबंध (लेखसंग्रह १९७५). ही

पुस्तके प्रकाशित झाली आहेत. रामभाऊ जोशी यांनी संपादित केलेली विदेश दर्शन (१९८८) व विरंगुळा (२००७) पत्रसंग्रह प्रकाशित आहेत. रामप्रधान यांनी संपादित केलेली 'रोजनिशी' भारत पाक युध्दाच्या पार्श्वभूमिवर आधारीत आहे.[१०]

**यशवंतराव चव्हाण - आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार:—**

यशवंतरावांनी महाराष्ट्राचे प्रथम मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी महाराष्ट्रातील माणसाची प्रगती हा केद्रबिंदू मानून राज्यकारभार केला. म्हणूनच त्यांना आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हटले जाते. स्वातंत्र्यानंतरही जुनी व्यवस्था वंशपरंपरेनुसार जन्माधिष्ठित होती. घटनेमध्ये जरी सामान्य माणसाला विकासाचा केंद्रबिदू मानले तरी प्रत्यक्षात समाजात जमिनदारी, सरंमजादारी, वतनदारी हया प्रथा कायम रूजल्या होत्या. घटनेने समतेचे तत्वे स्विकारली तरी प्रत्यक्षात ठिकठिकाणी विषमता होती. या परिस्थितीत बदल करण्यासाठी यशवंतरावांनी 'पंचायतराज' चे विधेयक विधिमंडळात आणले. राज्यघटनेतील संसद आणि विधिमंडळ अशा द्विस्तरीय शासनप्रणालीला यशवंतरावांनी त्रिस्तरीय करण्याचे ठरविले. या सत्तेच्या विकेंद्रीरणातून सत्ता अधिकाअधिक लोकांपर्यंत व तळागाळापर्यंत जाणार होती. यशवंतरावांचे म्हणणे होते, 'राज्य सर्वांचे आहे, ते सर्वांसाठी आहे आणि सर्वांनी एकत्र येऊन करायचे आहे. ते कोणा जातिधर्मांच, गटाचे असणारे नाही.' यशवंतरावांच्या या दूरगामी धोरणाने स्त्रियांसाठी जिल्हा परिषदांची दारे उघडली.[११] त्यांनी महाराष्ट्रात महार वतनाची पध्दत नष्ट करणारा कायदा करून व त्याची अंमलबजावणी करून हजारो वर्षांपासून गुलामगिरीत खितपत पडलेल्या अस्पृश्यांना मुक्त करण्याचा महत्कार्य केल. तसेच त्यांनी भूमिहीनांसाठी जमीन वाटपाचे कार्यही केले.[१२] अस्पृंश्याच्या प्रश्नाविषयी ते म्हणत, 'जातीयवादाच्या विषारी विचारापासून आपण महाराष्ट्राला मुक्त केल पाहिजे. जातीयवादाचा हा विचारच समूळ नष्ट केला पाहिजे. अस्पृश्य समाजात जे कर्तृत्ववान आणि बुध्दिमान लोक आहेत त्यांना आपण जवळ केले पाहिजे'[१३]

महाराष्ट्राराज्याची सर्वांगीण प्रगती होण्यासाठी त्यांनी विविध योजना आखल्या. कोकण भागात दिवा दासगाव व दिवा पनवेल या रेल्वे मार्गांचा काम सुरू केल. मराठवाडयातल्या कला व क्रिडागुणांना श्रेष्ठत्व देण्यासाठी मराठवाडा सांस्कृतिक मंडळाची स्थापना राज्यकामगार योजनेखाली मुंबईत महात्मा गांधी स्मारक इस्पितळ, महाराष्ट्रातील पहिले नर्सिंग कॉलेज, पहिली नेत्रपेढी, माजी सैनिकांसाठी साताऱ्याला प्रशिक्षण तथा उत्पादन केंद्र, नाशिकच क्षयरोग चिकित्सालय, शुगर फार्मच राष्ट्रीयकरण अशा कितीतरी केंद्राची स्थापना करून त्यांनी महाराष्ट्र प्रगतीच्या मार्गांवर अग्रेसर केले.

**यशवंतराव चव्हाण - समर्थ संरक्षणमंत्री:—**

यशवंतरावांनी महाराष्ट्राच्या महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपदाची सूत्रे स्विकारल्यानंतर 'हिमालयाच्या रक्षणासाठी सहयाद्री धावेल' असा शब्द दिला होता. १९६२ च्या हिवाळयात सिमावादाच निमित्त करून चीनने भारतावर आक्रमण केल. चीनने नेफामध्ये त्यांच्याबाजूने लष्करी तळ उभारला होता. २१ जुलै १९६२ ला दोन देशाच्या सैनिकांमध्ये चकमक उडाली. चीनने बळकावलेल्या १२ हजार चौरस मैलाचा भाग भारताने परत मिळविला. ऑक्टोंबर१९६२ मध्ये चीन भारताच्या सिमेवर लागोपाठ हल्ले चढवल्याने भारतीय लष्कराची अवस्था शोचनीय झाली होती. परिणामी संरक्षणमंत्री कृष्णन मेनन यांचा राजीनामा स्विकारण्यात आला. नंतर यशवंतरावांना दिल्लीला बोलावून पंडित नेहरूंनी त्यांच्याशी चर्चा केली.१४ नोव्हेंबर १९६२ ला पंडित नेहरूंनी यशवंतराव संरक्षणमंत्री बनल्याच दिल्लीत जाहिर केल.[१५] यशवंतराव या प्रसंगाबद्दल म्हणतात, 'संरक्षणमंत्रीपदाची मोठी जागा चालून आली म्हणून मी जातो आहे असे मात्र आपण कृपा करून समजूनका. पण ही देशाची हाक आहे. देशाच्या नात्याने मारलेली हाक आहे.[१६] यशवंतरावांनी संरक्षणमंत्री झाल्यावर भराभर निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी करण्यास प्रारंभ केला. संरक्षणविषयक समस्यांचा सखोल अभ्यास करण्यासाठी त्यांनी विविध समित्या स्थापन केल्या. २३ मार्च १९६४ ला

संरक्षणमंत्री यशवंतरावांनी ५ हजार कोटी रूपये खर्चाची पंचवार्षिक योजना लोकसभेत मांडली. त्यांनी संरक्षणसाठी आवश्यक संरक्षणसामग्री पाश्च्यात्य देशांकडून मिळविली. संरक्षणाच्या बाबतीत भारताला स्वयंपूर्ण करण्यासाठी त्यांनी कसोशीने प्रयत्न केले. १९६५ च्या युध्दात पाकिस्तानला खडे चारल्यानंतर यशवंतरावांची समर्थ संरक्षणमंत्री ही प्रतिमा तयार झाली.[१७]

**यशवंतराव चव्हाणांचे गृहमंत्रीपदावरील कार्यः—**

ताश्कंद करारानंतर लालबहादूर शास्त्री यांचे देहावसन झाले. पंतप्रधानपदासाठी झालेल्या स्पर्धेत यशवंतराव चव्हाणांनी माघार घेऊन इंदिराजींना आपला पाठिंबा दिला.इंदिराजीनी यशवंतराव चव्हाणांची गृहमंत्रीपदी निवड केल्यानंतर यशवंतरावांनी १४ नोव्हेंबर १९६६ ला गृहमंत्रीपदाची सूत्रे स्विकारली. यशवंतरावांसमोर तेव्हा अनेक गंभीर समस्या होत्या.कायदा आणि सुव्यवस्थेविषयी देशात आणिबाणीची परिस्थिती निर्माण झाली होती.उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, बिहार या राज्यामध्ये विद्यार्थ्यांच्या चळवळी सुरू झाल्या होत्या.या सर्व समस्या यशवंतरावांनी कुशलतेने हाताळल्या.[१८]

**यशवंतराव चव्हाणांचे अर्थमंत्रीपदावरील कार्यः—**

१९७० मध्ये कॉंग्रेसमध्ये घडलेल्या अंतर्गत यादवीनंतर इंदिराजींनी यशवंतरावांकडे २६ जून १९७० च्या मंत्रिमंडळाच्या खातेवाटपात अर्थखात दिल. यशवंतरावांना अर्थमंत्री या पदावर असतांना अनेक आघाडयावर लढाव लागल. आर्थिकधोरणासंबंधी यशवंतराव म्हणतात, ' राष्ट्राची संकटे ही परराष्ट्रीय आक्रमणातून निर्माण होतात. आर्थिक प्रश्नातून निर्माण होतात, अन्नाच्या प्रश्नावरून निर्माण होतात'.[१९] देशात अनेक आर्थिक समस्या निर्माण झाल्या होत्या.औद्योगिक आणि शेतीच उत्पादन डबघाईला आल होत. देशातील जनतेला जगविण्यासाठी 'पी एल ४८०' नुसार अमेरिकेकडून प्रचंड प्रमाणात अन्नधान्याची आयात करावी लागली. किमती भरमसाठ वाढल्याने किमती समपातळीवर आणण्यासाठी यशवंतरावांना महागाई नियंत्रणात आणण्यावर लक्ष केंद्रीत करावे लागेल. बेकारीच्या प्रश्नानेही या काळात उचल खाल्ली. आर्थिक धोरणाचा अवलंब करून यशवंतरावांनी या आर्थिक समस्यावर मात केली.[२०]

यशवंतराव चव्हाणांचे परराष्ट्र व्यवहारमंत्रिपदावरिल कार्यः—

१९७४ मध्ये केंद्रीय मंत्रीमंडळात खातेबदलाची परिस्थिती निर्माण झाल्यानंतर ११ ऑक्टोंबर १९७४ रोजी यशवंतराव चव्हाणांकडे परराष्ट्र व्यवहार त्यांची सूत्रे आली. जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी आंतरराष्ट्रीय तंटे हे तडजोडीच्या मार्गाने सुटावेत या धोरणाचा यशवंतरावांनी हिरिरीने पुरस्कार केला. या वेळी यशवंतरावांनी विविध देशांना भेटी दिल्या.[२१] यशवंतरावांनी विदेशमंत्री म्हणून अडीच वर्ष कार्य केले. या काळातविदेशमंत्री या नात्याने त्यांनी अनेक महत्वाची पावले उचलली.विदेशी मंत्रालयातील कारभाराला वेगळे वळण देण्याचा प्रयत्न केला.[२२]

**निष्कर्ष :—**

देवराष्ट्रे या छोट्याशा खेड्यात जन्मलेल्या यशवंतरावांनी स्वकर्तूत्वाने प्रगतीचे शिखर गाठले. स्वातंत्र्यपूर्वकाळात त्यांनी इंग्रजाविरूध्द कायदेभंग चळवळ, छोडो भारत या आदोलनात सहभाग घेतला. भूमिगतराहून त्यांनी सभा, बैठका घेतल्या. संयुक्त महाराष्ट्राचे प्रथम तरूण मुख्यमंत्री होण्याच्या मान त्यांना मिळाला. एवढेच नव्हें तर स्वतंत्र्य महाराष्ट्राचे सर्वात पहिले मुख्यमंत्री होण्याचा मानही त्यांनाच मिळाला. संयुक्त महाराष्ट्र तथा मुंबईसह स्वतंत्र्य महाराष्ट्रातून राज्याच्या निर्मितीत त्यांची भूमिका मोलाची ठरली. मुख्यमंत्री झाल्यानंतर महाराष्ट्रातील तमाम जनतेच्या हदयात स्थान मिळविले. यशवंतराव एक उत्कृष्ट वक्तेदेखील होते. त्यांचा भाषणसंग्रह पुस्तकांच्या रुपात प्रसिध्द झाला आहे. यशवंतराव एक साहित्यिक म्हणुन सुपरिचीत आहेत. त्यांचा कृष्णाकांठ हे आत्मचरित्र प्रसिध्द झाले आहे. रामभाऊ जोशी यांनी त्यांची पत्रसंग्रहे प्रकाशित केली आहेत. यशवंतराव नेहमीच पंडीत नेहरू व इंदिरा गांधी यांच्याशी एकनिष्ठ राहले. पंडीत नेहरू

आणि इंदिरा गांधी यांनी प्रत्येक राजकिय पेचप्रसंगात यशवंतरावांचा सल्ला घेतला. यशवंतरावांनी देखील दिल्लीने नेहमीच दिलेली जबाबदारी समर्थपणे स्विकारली. महाराष्ट्राच्या या सह्याद्रीने प्रत्येकवेळी हिमालयाच्या हाकेला ओ देवून मदतीचा हात दिला. यंशवंरातरावांनी केंद्रीय मंत्रीमंडळात संरक्षणमंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री, परराष्ट्र व्यवहार मंत्री अशी अनेक सन्माननीय भूषविली.या प्रत्येक खात्यांचा कारभार करतांना त्यांनी आपल्या नियोजनबध्द विचारांनी व कृतीने प्रत्येक खाते यशस्वीपणे साभांळले. संरक्षणमंत्री असतांना त्यांनी विदेशी राष्ट्रांकडून आवश्यक शस्त्रांची आयात करून देशाला स्वरक्षणार्थ सुसज्ज केले. गृहमंत्री असतांना देशांतर्गत उध्दभवलेले कठीण प्रसंग त्यांनी कुशलतेने हाताळले. अर्थमंत्री असतांना आर्थिक धोरणांचा अवलंब करून त्यांनी देशाला आत्मनिर्भर करण्याचा प्रयत्न केला. पराष्ट्रव्यवहार खात्याचे मंत्री असतांना त्यांनी अमेरीका तथा इतर देशांबरोबर भारताचे संबंध सुधारण्यावर भर दिला.यशवंतराव चव्हाण या महाराष्ट्राच्या सुपूत्राने क्रांतिकारक, उत्कृष्ट वक्ते, थोर मुत्सद्दी, साहित्यीक, कुशल राजकारणी अशा आपल्या बहुमुखी प्रतिभेने एक अष्टपैलू व्यक्तिमत्व म्हणून महाराष्ट्राच्याच नव्हे तर तमाम भारतीय जनतेच्या मनात आपले सन्माननीय स्थान कोरले आहे.

**संदर्भ सूची**

१) चव्हाण यशवंतराव –'कृष्णाकांठ',रोहन प्रकाशन शनिवारपेठ, पुणे, १९८४, पृ.क्र.५८
२) डॉ. जाधव,पंजाबराव रामराव –'यशवंतराव चव्हाण जीवन दर्शन',कर्मविर प्रकाशन, पुणे १६, १९७०, पृ. क्र. ३
३) जोशी रामभाऊ –'यशवंतराव एक इतिहास', प्रतिभास प्रकाशन,परभणी, २०१०,पृ.क्र. ५२
४) डॉ.जाधव, पंजाबराव रामराव–'यशवंतराव चव्हाण जीवन दर्शन',कर्मविर प्रकाशन, पुणे १६, १९७०, पृ. क्र. ३
५) जोशी रामभाऊ –'यशवंतराव एक इतिहास', प्रतिभास प्रकाशन, परभणी, २०१०, पृ.क्र. १८६
६) डॉ. जाधव, पंजाबराव रामराव –'यशवंतराव चव्हाण जीवन दर्शन',कर्मविर प्रकाशन,पुणे १६, १९७०, पृ. क्र. १०
७) जोशी रामभाऊ –'यशवंतराव एक इतिहास', प्रतिभास प्रकाशन, परभणी, २०१०, पृ.क्र. २१५
८) डॉ.जाधव,पंजाबराव रामराव –'यशवंतराव चव्हाण जीवन दर्शन', कर्मविर प्रकाशन, पुणे १६, १९७०, पृ.क्र. १०
९) चव्हाण यशवंतराव – ''कृष्णाकांठ', रोहन प्रकाशन शनिवारपेठ, पुणे, १९८४, पृ.क्र. १३५
१०) चव्हाण यशवंतराव – 'युगांतर', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे ३०, १९७०, पृ.क्र. १४३
११) माने लक्ष्मण 'यशवंतराव आठवणी आख्यायीका',ग्रंथाली प्रकाशन,मुबई,२०१३,पृ.क्र. ९८,९९
१२) जोशी रामभाऊ–'यशवंतराव एक इतिहास', प्रतिभास प्रकाशन, परभणी, २०१०, पृ.क्र. ३५०
१३) डॉ. जाधव, पंजाबराव रामराव –'यशवंतराव चव्हाण जीवन दर्शन',कर्मविर प्रकाशन,पुणे १६, १९७०,पृ.क्र. ११
१४) जोशी रामभाऊ –'यशवंतराव एक इतिहास',प्रतिभास प्रकाशन, परभणी, २०१०, पृ.क्र. ३४७
१५) कित्ता पृ.क्र. ४३९,
१६) चव्हाण यशवंतराव – 'युगांतर', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे ३०, १९७०, पृ.क्र. ११
१७) जोशी रामभाऊ –'यशवंतराव एक इतिहास',प्रतिभास प्रकाशन, परभणी, २०१०, पृ.क्र. ४४७
१८) कित्ता पृ.क्र. ४८४
१९) चव्हाण यशवंतराव – 'युगांतर', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे ३०, १९७०, पृ.क्र. ११४
२०) जोशी रामभाऊ –'यशवंतराव एक इतिहास', प्रतिभास प्रकाशन,परभणी, २०१०,पृ.क्र. ५५९
२१)कित्ता, पृ.क्र. ५९० २२) कित्ता, पृ.क्र. ५९९

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –7.675,Issue NO, 289 (CCLXXXIX )
ISSN : 2278-9308
March, 2021

# यशवंतराव चव्हाण यांची संरक्षण मंत्री म्हणून भूमिका आणि कार्य

डॉ. लक्ष्मी रामभाऊ कांगुणे
श्री ज्ञानेश्वर महाविद्यालय नेवासा. ता. नेवासा , जि. अहमदनगर .
Email ID :- laxmikangune123@gmail.com Mob. No 9673800080

**प्रस्तावना**

प्रखर राष्ट्रनिष्ठा , ध्येयवाद, मूल्या वरील प्रचंड आस्था, सहिष्णुता ,साहित्य विश्वात रममाण होणारा राजकारणी साहित्यिक जीवनाच्या अखेरपर्यंत राष्ट्रीयत्वा चा ध्यास असणारे व्यक्तिमत्व म्हणजे यशवंतराव चव्हाण होय. "संयुक्त महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून त्यांनी शिक्षण, सहकार ,उद्योग, व्यापार ,शेती व इतर अनेक क्षेत्रात राज्याच्या विकासाचे पायाभरणी केली. बेरजेचे राजकारण आणि सर्वांगीण विकासाची दूरदृष्टी हा त्यांच्या विचारांचा पाया होता सुसंस्कृत राजकारणी म्हणून त्यांची प्रतिमा आजही कायम आहे"[1] .ग्रामीण विकासासाठी झटणारा माणूस हा त्यांचा नावलौकिक, "संयुक्त महाराष्ट्राची पहिले मुख्यमंत्री होण्याचा मान त्यांना मिळाला महाराष्ट्राचा आर्थिक विकास घडवून आणण्यात त्यांचा वाटा महत्त्वपूर्ण होता."[2] महाराष्ट्राला देशाच्या राजकारणात सन्मान मिळवून देण्यात यशवंतरा चव्हाणांचे योगदान खूपच मोठे मानावे लागेल. सहकार चळवळीची पाळेमुळे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात रूजवून सहकार समृद्ध करण्याचे कार्य त्यांच्या हातून घडले. देशाच्या क्षितिजावर चमकणारे व महाराष्ट्राला प्रगतीपथावर आणणारे 'आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार' म्हणून या लोकनेत्याच्या कर्तृत्तावाचा ठसा कायमस्वरूपी जनसामान्यांच्या हृदयसिंहासनावर कोरला गेला.यशवंतराव चव्हाण यांनी संरक्षण मंत्री म्हणून केलेल्या कार्याचा आणि पार पाडलेल्या भूमिकेचा अभ्यास केल्यास ते ध्येयनिष्ठ व्यवहारकुशल आणि देशभक्त संरक्षणमंत्री होते हे स्पष्ट होते. यशवंतरावांचे व्यक्तित्व विवेकी तर कर्तृत्व विधायक होते. यशवंतराव ही केवळ एक व्यक्ती नसून ती एक विचारधारा होती.

**संरक्षण मंत्री यशवंतराव**

पंचशील तत्त्वाचा भंग करून चीनने भारतावर आक्रमण केले तत्कालीन संरक्षण मंत्री कृष्ण मेनन यांना पंडित नेहरू यानी संरक्षण मंत्री या पदावरून हटवून यशवंतराव चव्हाण यांना संरक्षण मंत्री पदी नियुक्त केले . "14 नोव्हेंबर 1962 रोजी भारताचे नवे संरक्षणमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांच्या नावाची घोषणा झाली. 20 नोव्हेंबर 1962 ला यशवंतरावांनी संरक्षण मंत्री पदाची शपथ घेतली. 21 नोव्हेंबर 1962 ला संरक्षण मंत्री पदाची सूत्रे स्वीकारून भारताच्या इतिहासात नवीन विजय पर्वाची मुहूर्तमेढ रोवली गेली"[3] "गेल्या हजार वर्षात भारताचा इतिहास हा अनाक्रमक व पराजयाचा राहिला आहे आमच्यात पराक्रम व धैर्य असूनही आम्ही भारतीय म्हणून न लढता शिख, राजपूत म्हणून लढल्याने हरलो परंतु स्वातंत्र्यानंतर आम्ही भारतीय असून देशाची एकता अभंग राहिले पाहिजे"[4] अशी त्यांची धारणा होती १ नोव्हेंबर 1962 रोजी मुंबई आकाशवाणी केंद्रा वरून यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्रातील जनतेला संबोधित केले त्यात ते असे म्हणाले की "भारत राहिला तर महाराष्ट्र राहील आणि भारत मोठा झाला तर महाराष्ट्र मोठा होईल आणि जर कधी भारताच्या हिमालयावर संकट आले तर महाराष्ट्र सह्याद्री आपल्या काळया पथरा ची छाती हिमालयाच्या रक्षणाकरता पुढे करेल".[5]तख्त कोणा एका व्यक्तिचे नाही, कोणा एका धर्माचे नाही, कोणा एका वर्गाचे नाही, ते या देशातल्या चाळीस-पंचेचाळी कोटी लोकांचे आहे; आणि त्याचे रक्षण करणे तुमचे आमचे कर्तव्य आहे. तुमचे-आमचे हे तख्त जोपर्यंत चंद्रसूर्य उगवत राहतील तोपर्यंत कायम राहिले पाहिजे. कारण ते आमच्या स्वातंत्र्याचे व लोकशाहीचे प्रतीक आहे, अशा त देशभक्तीची भावना आपल्या

मनात फुलली पाहिजे. असे यशवंतराव मानत असत. सक्रिय राजकारणातील प्रत्यक्ष अनुभव, बुध्दिवादी भूमिकेतून केलेले वेगवेगळया तत्त्वप्रणालींचे विश्लेषण आणि समाज व देश घडविण्याच्या संदर्भात सातत्याने चालणारे चिंतन यांतून त्यांच्या तात्त्विक बैठकीला एक पक्केपणा आलेला दिसतो.यशवंतरावांची संरक्षणमंत्री म्हणून निवड होताच वृत्तपत्रांनी त्यांच्या कार्यक्षमतेबद्दल प्रशंसोद्गार काढले. त्यात वृत्तपत्रे लिहितात, "हिमालयाच्या रक्षणाकरता सह्याद्री धावुन गेला"[6] यावरून त्यांचे महत्व लक्षात येते.चीन आक्रमणाच्या पार्श्वभूमीवर यशवंतरावांनी चीन चा संदर्भ देत असे म्हटले की " हमे हिम्मत नही हारनी चाहिये, चीन, चीन है हम तो प्राचीन है".[7]चिनी आक्रमणानंतर संरक्षणखात्यात चैतन्य आणण्याची जबाबदारी यशवंतरावांनी पार पाडली. सर्वसामान्य जनतेच्या मनात सेना दलाच्या भूमिकेविषयी एक नवी जाणीव निर्माण करून देशातील उद्योगधंदे आणि सेना यांच्यातील सुसूत्रीकरणाचे महत्व त्यांनी सभासदांना पटवून देण्याचा प्रत्यत्न केला. देशाच्या आर्थिक प्रगतीचे जे तत्त्व आपण स्वीकारले आहे, त्या तत्त्वाचा आपल्याला त्याग करता येणार नाही. ज्या दिवशी ह्या तत्त्वाचा आपण त्याग करू, त्या दिवशी देशाच्या संरक्षणाच्या प्रश्नांची धुळधाण होईल हे आपण नक्की समजा. माझ्या या सगळया म्हणण्याचा सारांश असा की, देशाची अंतर्गत नीती, परराष्ट्रनीती आणि देशाची संरक्षणनीती ही परस्परावलंबी असतात. एवढेच नव्हे तर राष्ट्रीय नीतीच्या एकाच सूत्राची ही केवळ वेगवेगळी रूपे असतात. कुठल्याही देशाची संरक्षणाची अलग, परराष्ट्रनीती अलग आणि अंतर्गत आर्थिक नीती अलग अशी परिस्थिती निर्माण झाली म्हणजे त्या देशाचे भवितव्य धोक्यात येते. "कोणत्याही देशाचे संरक्षण विषयक धोरण ही केवळ लष्करी बाब नसते तर ती सैनिकी राजकीय आणि आर्थिक तिहेरी स्वरूपाची असते"[8]असे ते मानत असत.संरक्षण मंत्री पदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर त्यांनी आपल्या खात्याचा विविधांगी अभ्यास करण्याला सुरुवात केली चीन देशाची मानसिकता तसेच युद्धनीती यांच्या सखोल अध्ययन आला प्रारंभ केला त्यांनी माऊ से तुंग याच्या साहित्याचा अभ्यास केला त्याबाबत श्री राम प्रधान यांच्याशी चर्चा करताना यशवंतराव म्हणाले की "शत्रूच्या मनात काय असते ते ठाऊक असणे आवश्यक असे असते कारण संघर्षाचा मूळ उगम तेथेच असतो इतकेच नव्हे तर शत्रु कसा वागेल याचा अंदाज बांधण्यासाठी ते आवश्यक आहे"[9] माऊ से तुंग चा अभ्यास केल्यानंतर त्यांनी स्वतःच्या स्मरणासाठी एक टिप्पणी तयार करून त्याला शीर्षकही दिल. व त्यानुसारच सैन्याच्या वेगवान हालचाली कल्पकतेने आक्रमणाच्या तपशिलाची जुळवाजुळव पूर्वतयारी शिवाय लढाई नाही आणि जिथे विश्वास नाही त्या लढाईत पडायचे नाही ही भूमिका यशवंतरावांनी ठेवल्याचे दिसते 1965 भारत-पाक युद्धातील कठीण प्रसंगात स्वतः जबाबदारी घेऊन भारतीय सेनेला पाकिस्तानी सैन्यावर प्रति हल्ला करण्याचा आदेश दिला हा त्यांचा निर्णय निर्णयक ठरला "1962 ते 1966 या काळात संरक्षण मंत्री म्हणून नव्याने लष्कराची पायाभरणी केली व त्यामुळेच भारत-पाक युद्धातील भारताने पाकिस्तानचा पराभव केला"[10] 1965 च्या संरक्षण खात्यात संदर्भात लोकसभेतील चर्चेच्या वेळी "गेल्यादोन वर्षात आम्ही गाजावाजा न करता चांगली तयारी केली"[11] असे यशवंतरावांनी आत्मविश्वासपूर्वक सांगितले

**यशवंतराव चव्हाण आणि हेंडरसन ब्रुक्स अहवाल**

1962 भारत-चीन युद्धात भारताचा अपमानास्पद दारुण पराभव झाला या पराभवाची चौकशी करण्यासाठी पंडित नेहरूंनी संसदे ला दिलेल्या आश्वासनानुसार द्विस्तरीय समिती स्थापन केली या समितीत लेफ्टनंट जनरल हेंडरसन ब्रुक्स व ब्रिगेडियर पी. सी .भगत यांचा समावेश होता या समितीने आपला अहवाल 02 जुलै 1963 रोजी संसदेला सादर केला यशवंतराव चव्हाण यांच्यावर हा अहवाल संसदेला सादर करण्याची जबाबदारी मिळाली होती संसदीय लोकशाहीच्या मार्गाने परिवर्तन घडवून आणण्याचे जितके प्रयत्न करता येतील तितके करावे, ही त्यांची धारणा होती. अहवालाचा यशवंतराव यांनी अत्यंत बारकाईने अभ्यास केला आणि त्यातूनच सरकारचे भविष्यकालीन

संरक्षण विषयक धोरण काय असावे हे ठरविले गेले व त्यानुसार यशवंतरावांनी संरक्षण मंत्री म्हणून पुढील पाच बाबींची तयारी करण्याचा निश्चय तसेच आत्मविश्वास व्यक्त केला

1. भारतीय सेनेला आवश्यक युद्ध साहित्याचे उत्पादन भारतात भारतात करणे
2. सैनिक व अधिकाऱ्यांना अद्यावत युद्धसाहित्य व तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षण संस्थेची स्थापना करणे
3. नोदल विकासासाठी नवनवीन योजना राबविणे
4 हवाई दलासाठी आवश्यक क्षेपणास्त्रे वरणार व्यवस्था खरेदी करण्यावर भर देणे
5. सीमा भागापर्यंत जाणारे रस्ते व दळणवळणाची साधने यात वाढ करणे

वरील बाबींची योग्य ती तयारी केल्यामुळेच 1965 1971 चे युद्ध भारत जिंकू शकला थोड्याच कालावधीत भारतीय सैन्याची संख्या चार लाखावरून अकरा लाखावर गेली नेता व लडाखमध्ये पाच वर्षात 56 हजार मैल लांबीचे रस्ते संरक्षण खात्याने तयार केले "1961- 62 मध्ये संरक्षण विभागाचे अंदाजपत्रक 311 कोटीचे होते 1962 -63 आर्थिक वर्षात 376 कोटी, 1963- 64 च्या अंदाजपत्रकात संरक्षण खात्याचा खर्च 837 कोटीपर्यंत वाढविण्यात आला त्यामुळे हवाई दल नवोदल व लष्कर यांची साधनसामुग्री अद्यावत करता आली"[12] 8 एप्रिल 1963 रोजी लोक सभेत बोलताना यशवंतराव चव्हाण आपल्या भाषणात म्हणाले की "देशाच्या संरक्षण सिद्धतेसाठी दीर्घ व अल्पमुदतीचे धोरण आखावे लागेल अल्पमुदतीच्या धोरणा चा टप्पा काही वर्षाचा असेल भारतीय लष्कराच्या आधुनिक ते साठी व गुणवत्ता वाढीसाठी त्यांनी चार सूत्री कार्यक्रम संसदेसमोर ठेवला त्यातील पहिले सूत्र लष्कराचे विस्तारीकरण दुसरे सूत्र हवाई दलाचे आधुनिकीकरण व विस्तार तिसरे सूत्र संरक्षण खात्यांतर्गत संरक्षण उत्पादनाचा भक्कम आधार निर्माण करणे चौथे सूत्र संपर्क आणि दळणवळण यंत्रणेचा विकास करणे यावरून यशवंतराव संरक्षण मंत्री म्हणून किती अभ्यासू व दूरदृष्टीचे होते याची साक्ष पटते"[13]आधुनिक लढाईमध्ये सैनिक तर लढतोच, पण त्या सैनिकाच्या पाठीमागे डावपेच आखणारा सेनापती, राज्यकारभार हाकणारा मंत्री, सैनिकाला शस्त्र पुरविणारा तंत्रज्ञ, कारखान्यात कामकरणारा कामगार, शेतीचे उत्पादन वाढविणारा शेतकरी, सरकारी नोकरीत काम करणारा कर्मचारी यांपैकी प्रत्येक जण, शत्रुदेशातील आपापल्या क्षेत्रातील व्यक्तीबरोबर आधुनिक युध्दात लढत असतो. आधुनिक युध्दाचे हे वैशिष्ट्य आहे की, एका देशाची शक्ती, त्याची अर्थव्यवस्था, त्याचे कार्यकौशल्य, त्याची कार्यक्षमता ही दुस-या देशातील शक्तीशी, अर्थव्यवस्थेशी, कार्यकौशल्याशी आणि कार्यक्षमतेशी लढाई करीत असते. एक संपूर्ण शक्ती दुस-या संपूर्ण शक्तीशी लढत असते. तेव्हा ही लढाई दीर्घ काल चालू राहील या दृष्टीनेच तुम्हां-आम्हांला आता तयारी करावयाची आहे. या बाबतीत आपल्या मनात कोणत्याही प्रकारचा संदेह असता कामा नये असे यशवंतराव मानत असत.

**यशवंतराव चव्हाण आणि सैनिकी स्कूल**

संरक्षण मंत्री झाल्यावर भारतातील सर्व शाळा महाविद्यालयांमधून सक्तीचे लष्करी शिक्षण दिले जावे अशी भूमिका यशवंतरावांनी घेतली महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना सातारा येथे सैनिकी शिक्षण देणाऱ्या स्कूल ची स्थापना करण्याचा त्यांना अनुभव होता संरक्षण मंत्री असताना ते भारतीय सैनिकी शाळांच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष होते अध्यक्ष या नात्याने मंडळाच्या अडचणी करण्यासाठी ते सातत्याने पुढाकार घेत असत . मी 1964 आली त्यांनी केरळ मधील सैनिकी स्कूलला भेट दिली होती देश संरक्षणासाठी उत्तम सैनिकांची आवश्यकता असते म्हणून आदर्श सैनिक तयार करण्यासाठी या सैनिकी स्कूल ची स्थापना झाली आहे असे मत मांडले होते तसेच जेव्हा जेव्हा भारतातील या सैनिकी शाळांना ते भेट देत तेव्हा छत्रपती शिवाजी महाराजांपासून आपण शिस्तबद्ध नागरिक पाहायला शिकले पाहिजे असे आवर्जून सांगत असत

**यशवंतरावांचे संरक्षण मंत्री झाल्यानंतर केलेले कार्य**

यशवंतरावा कडे 1962 ते 1966 या काळात संरक्षण मंत्री पद होते पंडित नेहरूंनी ज्या विश्वासाने यशवंतराव चव्हाण यांच्यावर देशाच्या संरक्षण मंत्रिपदाची धुरा सोपवली तेवढ्याच विश्वासाने संरक्षण खात्यात अमुलाग्र बदल घडवून आणणारी पावले त्यांनी उचलली संरक्षण मंत्री म्हणून त्यांनी पार पडलेली कार्य त्यांचे नेतृत्व क्षमता निर्णय क्षमता कार्यकुशलता मुत्सद्दीपणा सिद्ध करणारी आहेत

1 लष्करात मनोधैर्य निर्माण केले

2. लष्कर व संरक्षण मंत्रालयातील संघर्षाची कारणे शोधणे त्यात समन्वय साधण्याच्या विविध उपाययोजना केल्या

3. भारतीय लष्करातील कच्चे दुवे शोधले लष्करी अधिकाऱ्यांना विश्वासात घेतले प्रसंगी पुनर्नियुक्ती ही दिल्या

4. भारताची पहिली संरक्षण विषयक पंचवार्षिक योजना तयार केली

5. भारतीय बनावटीची लढाऊ विमाने भारतात बनवण्यास सुरुवात केली

6. पोलीस दलाचे आधुनिकीकरण करण्यासाठी उपाययोजना केल्या

7. सीमा भागात रस्ते व दळणवळण साधनात वाढ केली

8. सैन्यात समर्पण व आत्मविश्वासाची भावना निर्माण केली

9. सैन्याची युद्ध सज्जता वाढविताना शस्त्रास्त्र युद्धसाहित्य व आर्थिक मदत मिळवण्यासाठी देशांतर्गत प्रयत्नांबरोबरच पाश्चात्त्य राष्ट्रांकडून नही मदत मिळविण्याचे प्रयत्न केले

संरक्षणमंत्री असताना यशवंतरावांकडे त्यांच्या खात्यातर्फे येणारी गुप्त माहिती आणि परराष्ट्र गुप्तहेर खाते, अर्थखाते इत्यादींची माहिती यात तफावत असल्याचे काही वेळा दिसून येत होते. तेव्हा यशवंतरावांनी एक टिपण तयार करून सर्व प्रकारची गुप्त माहिती एका ठिकाणी केंद्रित करणे सोयीचे होईल अशी सूचना केली होती.[14] संरक्षण खात्याचे 1962 ते 1966 पर्यंत नेतृत्व करताना यशवंतरावांनी आधुनिकतेने संपन्न असलेल्या भक्कम लष्करी अधिकाऱ्यांची पायाभरणी केले त्यासाठी त्यांनी घेतलेल्या अपार कष्टाची तुलना कशाशीही करता येणार नाही .संरक्षण मंत्री पदानंतर केंद्रात गृहमंत्री परराष्ट्रमंत्री उपपंतप्रधान ही पदे भूषवली सहकार, शिक्षण विज्ञान तंत्रज्ञान कला संरक्षण अशा जीवनाच्या विविध क्षेत्रावर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची छापा आपल्याला आजही जाणवते “कोणी बुद्धीने ज्येष्ठ असतील, कोणी शक्तीने श्रेष्ठ असतील, परंतु शक्ति-युक्ति ज्यांच्या ठायीं एकत्र आहे आणि ज्यांनी या शक्ति-युक्तीचा उपयोग कालिदासाने रघुवंशांत सांगितल्याप्रमाणे परप्रयोजनासाठी केला असे यशवंतराव होत. म्हणून ते लोकनेते ठरले”[15]

**संदर्भ**

01. नरेंद्र मोखाडे, कृष्णाकाठ एक आस्वाद, कैलास पब्लिकेशन औरंगाबाद.

02. सारडा शंकर , यशवंतराव कर्तृत्व आणि नेतृत्व,2003 , दिलीपराव प्रकाशन.

03 .भा ल भोळे यशवंतराव चव्हाण राजकारण आणि साहित्य साकेत प्रकाशन 1985 औरंगाबाद.

04. कल्याणकर बा. ह., युगधर नेते यशवंतराव चव्हाण ,2006.

05. राम प्रधान , भारत-पाक युद्ध पहिली फेरी 1965.

06 केळकर . भा. कृ .यशवंतराव राष्ट्रीय व्यक्तिमत्व, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ ,मुंबई.

07. कुलकर्णी एस के. लोकोत्तर लोकनेता.

08. खेरा एस एस,. इंडियन डिफेन्स प्रॉब्लेम.

09. राम प्रधान., शब्दांचे सामर्थ्य ,यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,2000, मुंबई.

10. भोळे भा. ल,, यशवंतराव चव्हाण राजकारण आणि साहित्य, 2007 साकेत प्रकाशन

11. कांबळे उत्तम, संपादन, नाईकवाडे अशोक , महाराष्ट्राचे भाग्यविधाते यशवंतराव चव्हाण , 2012विद्याभारती प्रकाशन

12 यशवंतराव किर्तिवंत, लोकराज्य, मार्च 2010

13. तळवळकर गोविंद, यशवंतराव चव्हाण व्यक्तित्व व कर्तुत्व,मौज प्रकाशन, 2012 मुंबई.

14. तळवळकर गोविंद, यशवंतराव चव्हाण व्यक्तित्व व कर्तुत्व,मौज प्रकाशन, 2012 मुंबई.

15. संपादक : रामभाऊ जोशी यशवंतराव इतिहासाचें एक पान

16.देशमुख अलका संपादन यशवंतराव चव्हाण संरक्षक व परराष्ट्र विषयक धोरण 2013 विश्व पब्लिशर्स नागपूर

17. संकलन : श्री. ना. धो. महानोर यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार

18. संकलन : विनायक पाटील यशोधन यशवंतराव चव्हाण यांचे निवडक विचार

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor -(SJIF) –7.675,Issue NO, 289 (CCLXXXIX )

ISSN : 2278-9308 March, 2021

# मा. यशवंतराव चव्हाण यांचे भारतीय संरक्षण क्षेत्रातील योगदान

**प्रा. डॉ. जितेंद्र आनंदा माळी**

कै. न्हानाभाऊ म. तु. पाटील कला महाविद्यालय, मारवड. ता. अमळनेर. जि. जळगांव.४२५०४०२.

मोबा. ९४२२८ १४१५४Email - j.mali251@yahoo.com

**"उंच उंच शिखरे असेलला बर्फाच्छादीत हिमालय हे भारताचे प्रतिक आहे. तर दोन तीनशे इंच पावसाचा मारा आपल्या डोक्यावर घेणाऱ्या काळया फत्तरांचा सह्याद्री आमचे प्रतीक आहे, आणि जर कधी भारताच्या हिमालयावर संकट आले तर महाराष्ट्राचा हा सह्याद्री आपल्या काळया फत्तराची छाती हिमालयाच्या रक्षणाकरीता उभी करील. "**

**- यशवंतराव चव्हाण**

**प्रस्तावना -**

महाराष्ट्राच्याच नव्हे, तर देशाच्या राजकारणात ज्यांनी आपल्या कर्तृत्वाचा प्रभाव टाकला आणि आपल्या दूरगामी निर्णयांनी आपल्या पदाचा नावलौकिक वाढविला असे भारतीय राजकारणातील अद्वितीय व्यक्तीमत्व म्हणजे, आदरणीय यशवंतराव बळवंतराव चव्हाण होय. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणुन कामकाज करीत असतांना आधुनिक महाराष्ट्राचे रचनात्मक स्वरुप त्यांनी देशासमोर ठेवले. आपल्या प्रशासकीय कौशल्यातुन महाराष्ट्राला प्रगती पथावर नेण्याचे कार्य सुरु असतांनाच अचानक भारतावर चीनने आक्रमण केले. भारताचा मोठा भूप्रदेश चीनने गिळंकृत केला, आणि भारतावर नामुष्कीची वेळ आली. भारतीय सैन्याचा अनेक चौक्यांवर पराभव होत होता. अशा बिकट परिस्थितीत पंतप्रधान पंडीत नेहरुंनी यशवंतरावांवर संरक्षण मंत्री पदाची जबाबदारी टाकली. त्यानुसार राष्ट्राची गरज ओळखून यशवंतरावांनी २० नोव्हेंबर १९६२ रोजी भारताचे संरक्षणमंत्री म्हणुन सुत्रे आपल्या हाती घेतली. अल्पावधीतच आपल्या प्रतिभाशाली व्यक्तीमत्व व प्रशासकीय कौशल्याच्या जोरावर यशवंतरावांनी या संधीचे सोने करीत, भारतीय सैन्य दलात अनेक बदल केले तसेच सैन्याच्या आधुनिकीकरण व स्वयंपुर्णतेवर भर दिला. परिणामी भारतीय सैन्यदलात नविन उर्जा व कार्यशिलता निर्माण झाली. त्याअनुशंगाने प्रस्तृत शोध निबंधात **"मा. यशवंतराव चव्हाण यांचे भारतीय संरक्षण क्षेत्रातील योगदान"** या विषयावर त्यांच्या कार्याचा उहापोह केलेला आहे.

**चीनी आक्रमण -**

भारताच्या उत्तरेला असलेल्या साम्यवादी चीनने मे १९६२ पासुन युध्दविषयक हालचालींना प्रारंभ केला. भारतीय सेनेच्या हालचाली, उपस्थिती, शस्त्रास्त्रांची संख्या व क्षमता, पुरवठा व्यवस्था अशा प्रकारची सामरिक माहीती गोळा केली. त्यानुसार जुन १९६२ पासून चीनी आक्रमक हालचालींना वेग आला. चीनी आक्रमणाचे प्रामुख्याने दाने टप्पे पडतात. पहिला टप्पा हा (१० ते २७ ऑक्टोंबर १९६२) आहे. यानुसार चीनने भारतावर पहिले आक्रमण १० ऑक्टोंबर १९६२ रोजी केले. यात थांग खिंडीच्या दक्षिणेला दोला क्षेत्रातील भारतीय सैन्याच्या सर्व मोर्चावर चीनने उखळी तोफा व मशिनगन्सने मारा सुरु केला. त्यामुळे भारत चीन यांच्यात युध्द सुरु झाले. पंतप्रधान नेहरुंनी १२ ऑक्टोबर रोजी आपल्या सेनेला मॅकमोहोन रेषेच्या दक्षिणेकडील प्रदेशातून चिन्यांना हाकलून लावण्याचे आदेश दिले. त्यानुसार भारतीय सेनेनेही जोरदाररित्या चिनी सैनिकांचा प्रतिकार केला. परंतु तुटपुंज्या युध्दसाहित्य व प्रशिक्षणाच्या अभावामुळे ते शक्य होत नव्हते. यावेळी पंतप्रधान नेहरु व चीनी पंतप्रधानांनी परस्पर विरोधात आंतरराष्ट्रीय स्तरावर राजनैतिक आघाडी उघडली. त्यामुळे चीनवर आंतरराष्ट्रीय दबाव वाढला, तेव्हा चीनी पंतप्रधान चौ-एन-लाय यांनी गोळीबार स्थगितीचा तीन कलमी अटींचा प्रस्ताव भारतापुढे मांडला. परंतु भारताने चीनचा प्रस्ताव झिडकारल्याने चीनी आक्रमणाचा दुसरा टप्पा (१५ ते २१ नोव्हेंबर १९६२) सुरु झाला. यात चीनने १५ नोव्हेंबर रोजी भारतावर दुसरे जोरदार आक्रमण केले. यावेळी चीनने भारताच्या नेफा व लडाख भागात जोरदार आक्रमण चढविले. भारतीय सैन्य चीनी आक्रमणाचा प्रतिकार करीत होते, परंतु फारसे यश येत नव्हते. अशी युध्दमय परिस्थती सुरु असतांनाच २१ नोव्हेंबरला चीनने अचानक युध्दबंदीची घोषणा करुन भारताला धक्का दिला. तसेच १ डिसेंबर पर्यत सर्व सैन्य माघारीची घोषणा केली. अशारितीने ज्या युध्दाला चीनने स्वत:हून सुरुवात केली होती, ते युध्द त्यांनीच स्वतः संपविले. त्यामुळे जानेवारी १९६३ च्या अखेरपर्यंत चीनी सेनेने माघार घेतली आणि लडाख व नेफा सीमेवर पूर्व परिस्थिती निर्माण झाली. *(पाटील के.बी.,९३,२०१७)*

**संरक्षण मंत्रीपदी यशवंतराव चव्हाणांची निवड -**

पंतप्रधान पंडीत नेहरुंच्या पंचशील तत्वांचा भंग करुन चीनने भारतावर ऑक्टोंबर १९६२ मध्ये आक्रमण केले. अचानक झालेल्या आक्रमणामुळे अनेक ठिकाणी भारतीय सैन्याचा पाडाव होत होता. भारताचा मोठा भुप्रदेश चीनने गिळंकृत केला आणि भारतावर नामुष्कीची वेळ आली. यावेळी भारताचे संरक्षण मंत्री श्री. कृष्ण मेनन हे होते. श्री. मेनन हे पंडीत नेहरु व मंत्री मंडळाची दिशाभुल करीत होते असे म्हणण्यास वाव आहे. भारतीय संरक्षणाच्या दुर्दशेला मेनन हेच कारणीभुत आहेत, अशी मंत्री मंडळ व जनतेची भावना झाली होती. त्यामुळे भारतीय जनता व विविध राजकीय पक्षांनी श्री. मेनन यांच्या हकालपट्टीची मागणी केली. लोकांचा लोकक्षोभ वाढल्याने कृष्ण मेनन यांनी संरक्षणमंत्री पदाचा राजीनामा दिला, पं. नेहरुंनीही जनतेच्या प्रक्षुब्ध भावना विचारात घेवून तो स्विकारला. आता अशा कठीण प्रसंगी संरक्षण मंत्रालय कोणाकडे सोपवावे ? असा गंभीर प्रश्न मंत्रीमंडळ व पं. नेहरुंसमोर होता. त्यादृष्टीने त्यांनी नेतृत्वाची चाचपणी केला असता, त्यांच्या समोर **१)** टी. टी. कृष्णम्माचारी **२)** बिजू पटनाईक आणि **३)** यशवंतराव चव्हाण अशी तीन नावे होती.

तेव्हा, प्रत्येकाचे गुणदोष विचारात घेऊन खचलेल्या भारतीय सैन्याचे मनोधैर्य उंचावण्यासाठी पं. नेहरुंनी यशवंतरावांना प्राधान्य दिले. कारण यशवंतराव चव्हाण वादातीत होते आणि ते प्रशासकीय कौशल्यामध्ये निपुण होते. त्यांना राजकीय पाठींबा चांगला होता. या तीन गुणांवर यशवंतरावांची संरक्षणमंत्री म्हणून निवड करण्याचा निर्णय पंडीत नेहरुंनी घेतला. दरम्यान ५ नोव्हेंबर १९६२ ला पं. नेहरुंनी यशवंतरावांना फोन करुन संरक्षणमंत्रीपद स्विकारण्याबाबत हो किंवा नाही या दोन शब्दांतच उत्तर देण्यास सांगितले. तेव्हा यशवंतरावांनी नम्रपणे सौ. वेणूताईंना विचारुन कळवितो असे उत्तर दिले. त्यानंतर त्यांनी होकार देतांना पं. नेहरुंना सांगितले की, आपल्याला लष्करी बाबींचा अनुभव नाही, पूर्वपरिचय नाही फक्त राष्ट्रभक्ती आणि राष्ट्रप्रेमाखेरीज त्या पदाला लागणारी गुणवत्ता नाही. तरीही पं. नेहरुंचा निर्णय कायम राहीला, आणि १४ नोव्हेंबर १९६२ रोजी भारताचे नवे संरक्षणमंत्री म्हणून त्यांच्या नावाची घोषणा झाली. *(कायदे पाटील,६९,२०००)*

यावेळी यशवंतराव महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणुन कामकाज पाहात होते. संरक्षणमंत्री पदावर नियुक्ती झाल्यानंतर मंत्रालयातील कर्मचाऱ्यांनी आयोजित केलेल्या समारोप प्रसंगी यशवंतराव चव्हाण म्हणाले, "देशाची हाक येते, तेव्हा महाराष्ट्र प्रथम धावून जातो. अशी आपली परंपरा आहे, त्या परंपरेला अनुसरुन मी दिल्लीला जात आहे. माझ्या मते, राज्यापेक्षा देश मोठा असतो, देश असेल तर राज्य असते." यावरुन त्यांच्या देशभक्ती व वैचारीक परिपक्वतेची जाणिव होते. त्यानुसार महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची सूत्रे बाबासाहेब कन्नमवार यांच्याकडे सोपवून यशवंतरावांनी २० नोव्हेंबर १९६२ रोजी संरक्षणमंत्री पदाची सूत्रे हाती घेतली.

**संरक्षण मंत्रीपदावरील उल्लेखनिय कामगिरी -**

संरक्षण मंत्रीपद हे यशवंतरावांच्या जीवनातील सर्वोच्चक्षण होता, संरक्षणमंत्री म्हणून त्यांनी केलेले कार्य देशाविषयीची तळमळ आणि प्रखर राष्ट्रनिष्ठा दर्शविणारे आहे. "गेल्या हजार वर्षांचा भारताचा इतिहास हा आक्रमक आणि पराजयाचा आहे. आमच्यामध्ये पराक्रम, शौर्य, धैर्य असूनही आम्ही भारतीय म्हणून न लढता, शिख, मराठा, राजपूत म्हणून लढल्याने हरलो. परंतु स्वातंत्र्यानंतर आम्ही भारतीय असून देशाची एकता अभंग राहीली पाहिजे" अशी यशवंतरावांची धारण होती. *(कायदे पाटील,६७, २०००)* आता भारतीय सेनेला मुत्सद्दी व कुशल प्रशासक असा संरक्षणमंत्री प्राप्त झाला. या भीतीमुळेच की काय? संरक्षणमंत्री चव्हाण यांचा चीनचे अध्यक्ष चौ एन लाय यांनी धसका घेतला आणि २१ नोव्हेंबर १९६२ रोजी अचानक एकतर्फी युध्द समाप्तीची घोषणा केली. यामुळे चौ एन लाय चीनमध्ये खलनायक ठरले.

१९६२ साली यशवंतराव भारताचे संरक्षण मंत्री झाले, तो काळ फार कठीण होता. पारंपारिक सैन्य व युध्द पध्दती, तुटपुंजी शस्त्रास्त्रे व युध्द साहित्य, कुठलीही परकीय मदत नाही, मनोधर्य खचलेले सैन्य अशा बिकट परिस्थितीत संरक्षण विभागाची मोठी जबाबदारी यशवंतरावांनी यशस्वीरित्या पार पाडली. संरक्षणमंत्री पदावर असतांना भारतीय सैन्य आधुनिक व अदययावत शस्त्रास्त्रांनी सुसज्ज करण्यासाठी मोठया राष्ट्रांकडून शस्त्रास्त्रे उत्पादन कारखाने निर्मिती व अत्याधुनिक शस्त्रास्त्रे खरेदी करण्यावर भर दिला. यशवंतराव नेहमी तज्ज्ञांची मते आणि सल्ला यांना फार महत्व देत असत. याबाबत एअर चीफ मार्शल श्री. लतीफ परवा सांगतात की, भारतीय वायुसेनेकरीता लढाऊ विमान खरेदीसाठी आम्ही एक शिष्टमंडळ घेऊन लंडनला गेलो होतो. अमुक एक ब्रिटीश बनावटीचे लढाऊ विमाने खरेदी करावे, असा त्या परदेशी सरकारचा व काही भारतीयांचा जोरदार आग्रह होता. पण भारतीय संरक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना व तज्ज्ञांना ते फारसे पसंत पडत नव्हते. तेव्हा विवंचनेत पडलेल्या सल्लागारांना यशवंतरावांनी सांगितले, "तुमचा पुर्ण सल्ला घेतल्याशिवाय मी कोणताही निर्णय घेणार नाही, तुम्हाला ते विमान वापरावयाचे आहे, मला नाही."

यावरुन त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्यांना मनमोकळेपणाने विचार करता येई व सरकार दरबारी आपले विचार निर्भयपणे स्पष्ट मांडता येत, एवढा आत्मविश्वास ते आपल्या सहकाऱ्यांत निर्माण करु शकत होते.

पुढे पाकिस्तानने १ सप्टेंबर १९६५ रोजी भारतावर खडया सैन्यासह उघडपणे आक्रमण करुन युध्द सुरु केले. यावेळी संरक्षणमंत्री म्हणुन यशवंतरावच होते. त्यांच्या मुत्सद्दी नेतृत्वाखाली अवघ्या २२ दिवसातच भारतीय सैन्याने पाकिस्तानी सेनेचा दारुण पराभव केला. या युध्दाचा परिणाम व सो. रशियाच्या मध्यस्थीने २२ सप्टेंबर १९६५ रोजी युध्दबंदी अंमलात आली. *(पाटील के.बी.,१०३,२०१७)* या युध्द विजयाबद्दल यशवंतराव म्हणतात की, "युध्दात विजयासाठी उत्तम प्रतीची शस्त्रास्त्रे नाहीत तर त्यापेक्षा सैनिक आणि त्यांच्या मनोधैर्याची शक्ती खूप महत्वाची असते. तसेच भारतीय सैन्याच्या आत्मनिर्भरतेच्या जोरावरच भारताला हा ऐतिहासिक विजय प्राप्त झाला आहे." या युध्दानंतर सो. रशियाचे पंतप्रधान कोसिजिन यांच्या मध्यस्थीने भारतीय पंतप्रधान लालबहाद्दूर शास्त्री आणि पाकिस्तानचे राष्ट्रपती जनरल अयुब खान यांच्यात १० जानेवारी १९६६ रोजी रशियातील ताश्कंद येथे करार झाला. त्यास "ताश्कंद करार" किंवा "शांतता करार" असेही म्हणतात. या कराराप्रसंगी संरक्षण मंत्री म्हणुन यशवंतराव चव्हाण उपस्थित होते. करारावर उभयतांच्या स्वाक्षऱ्या झाल्यानंतर त्याच रात्री पंतप्रधान लालबहाद्दूर शास्त्री यांचे ताश्कंद येथेच हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. यशवंतरावजी पंतप्रधान शास्त्रीजींचा देह घेऊन भारतात परत आलेत.

पंतप्रधान शास्त्रीजींच्या अचानक निधनानंतर यशवंतरावांनी पंतप्रधान म्हणून मोरारजी देसाईंना पाठींबा न देता, श्रीमती इंदिरा गांधींना पाठींबा दिला. यावेळी यशवंतरावांनीच स्वत: इंदिराजींचा पाठींबा घेवून पंतप्रधान झाले पाहिजे होते, असे अनेकांचे मत होते. परंतु यशवंतरावांना पद, प्रतिष्ठा यांची हाव नव्हती, ते फक्त काम हेच दैवत मानत होते. हे त्यांनी आपल्या कृतीतुन दाखवत इंदिराजींना पाठींबा दिला. इंदिरा गांधी भारताच्या पंतप्रधान झाल्या तरीही संरक्षण मंत्री म्हणून यशवंतरावच कायम राहीले.

**संरक्षण मंत्री असतांना भारतीय लष्करासाठी केलेले महत्वपुर्ण कार्य -**

सलग तीन पंतप्रधानांच्या (पंडीत नेहरु, लाल बहादूर शास्त्री व श्रीमती इंदिरा गांधी) कार्यकाळात संरक्षणमंत्री पदावर कायम राहून देशाची सेवा करणारे यशवंतरावांचे कार्य देशनिष्ठा आणि प्रखर राष्ट्रभक्ती याने ओतप्रोत भरलेले दिसते, त्याला तोड नाही. त्यांनी संरक्षणमंत्री म्हणुन भारतीय लष्कराच्या पुर्नउभारणीसाठी पुढीलप्रमाणे काही महत्वपुर्ण कार्य केलेले दिसून येते. (कायदे पाटील,७१,२०००)

१) भारतीय लष्करात मनोधैर्य निर्माण केले.
२) लष्कर आणि संरक्षण मंत्रालयात संघर्ष असण्याची कारणे शोधली.
३) लष्कराची फेररचना करतांना राजकीय हस्तक्षेप स्विकारला नाही.
४) लष्कर आणि संरक्षण मंत्रालयात समन्वय साधण्याच्या उपाययोजना केल्या.
५) भारतीय लष्कराचे कच्चे दुवे आणि कमतरता शोधून काढल्या.
६) लष्करी अधिकाऱ्यांना विश्वासात घेतले.
७) लष्कर आणि संरक्षण मंत्रालय यांत कौशल्य आणि संयमाने "समन्वय" साधला.
८) पहिली संरक्षणविषयक "पचवार्षिक योजना" तयार करुन भारतीय बनावटींची लढाऊ विमाने, लिंडल, फ्रिगेट, विजयंता रणगाडयांचे उत्पादन सुरु केले.
९) मिग विमाने तयार करण्याचा कारखाना नाशिक (महाराष्ट्र) येथे सुरु केला.
१०) लष्कराच्या आठ पहाडी डिव्हिजनसह २१ डिव्हिजन, ४५ स्क्वाड्रनचे हवाईदल, युध्दसाहित्य उत्पादन केंद्राचे नुतनीकरण केले. हवाई दल आणि लष्करामध्ये समन्वय निर्माण केला.
११) भारतीय सीमा भागात सैन्याची ने-आण करण्यासाठी पक्के रस्ते बांधले.
१२) संरक्षण विषयक प्रश्नांबाबत संसदेला विश्वासात घेतले.
१३) संरक्षण मंत्रालयाशी निगडीत अनेक लष्करी आणि मुलकी अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या.
१४) यशवंतरावांनी काश्मीर, राजस्थान, गुजरात, उत्तरेकडील सीमा भागांना भेटी देऊन तेथील लष्करी अधिकारी आणि जवानांचे मनोबल उंचावले व त्यांच्याशी चर्चा करुन त्यांच्या अडचणी, समस्या समजून घेतल्या.
१५) अमेरिकन राष्ट्राध्यक्ष जॉनसन यांच्याशी चर्चा आणि संरक्षण विषयक करार करण्यासाठी अमेरिकेला भेट दिली.
१६) पंतप्रधान लालबहादूर शास्त्रींजींच्या काळात रशियन अध्यक्ष क्रुश्चेव्ह यांच्याशी संरक्षण विषयक चर्चा करुन विविध करार केले.

**१७)** संरक्षण विषयक तज्ज्ञांची मते व निवृत्त सेनाधिकाऱ्यांचे अनुभव व सल्ला यांच्या नुसार सैन्यात समर्पण व आत्मविश्वासाची भावना निर्माण केली. वगैरे.

वरीलप्रमाणे उल्लेखनिय कामगिरी यशवंतराव चव्हाण यांनी संरक्षण मंत्री पदावर असतांना केलेली दिसून येते.

**सारांश -**

मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनाचा विचार केल्यास अतिशय सर्वसामान्य परिस्थितीत जन्माला येवुन, त्यांनी सर्वच प्रकारच्या समस्या आणि संकटांचा सामना यशस्वीपणे केला. देशासाठी व जनतेसाठी जे काही करता येईल ते त्यांनी मनापासुन केले. देशातील अनेक चांगल्या - वाईट घटनांचे यशवंतराव साक्षीदार होते. यशवंतराव हे महाराष्ट्राचे असे एकमेव पुत्र होते की, ज्यांनी देशाच्या केंद्रीय मंत्रीमंडळात संरक्षण, गृह, अर्थ आणि परराष्ट्र व्यवहार अशी चारही अतिमहत्वाची खाती सांभाळली. त्यात संरक्षण मंत्रीपद हे यशवंतरावांच्या जीवनातील सर्वोच्चक्षण होता, संरक्षणमंत्री म्हणून त्यांनी केलेले कार्य देशाविषयीची तळमळ आणि प्रखर राष्ट्रनिष्ठा दर्शविणारे आहे. संरक्षणमंत्री पदावर असतांना त्यांनी पारंपारीक भारतीय संरक्षण यंत्रणेत सुधारणा करुन अमुलाग्र बदल घडवून आणलेत. आधुनिकतेची कास धरत शस्त्रास्त्रे उत्पादनात स्वयंपुर्णता, युध्द सराव व प्रशिक्षण, सैन्याची आधुनिकता व शस्त्र सज्जतेवर भर दिला. त्यामुळेच भविष्यात भारतीय सैन्याची शक्ती वाढून १९६५ च्या भारत - पकिस्तान युध्दात पाकिस्तानी सैन्याला आपण सहजरित्या पराभुत करु शकलो. थोडक्यात यशवंतरावांच्या संदर्भात सांगायचे झाल्यास ते स्वातंत्र्यसैनिक, मुत्सद्दी व कुशल प्रशासक, विचारप्रवर्तक राजकारणी, भविष्याचा वेध घेणारे विचारवंत, अनुभव व चारित्य संपन्न अष्टपैलू व्यक्तीमत्वाचे धनी अशा शब्दांनी त्यांचे वर्णन करावे लागेल.

**- संदर्भ ग्रंथ सूची -**

१. Pradhan R. D., 1965 War, the Inside Story: Defence Mininster Y.B.Chavan's Diary of India-Pakistan War,Atlantic Publishers & Distributors (p) Ltd. New Delhi. 2007.
२. Pradhan R. D., 1965 War, Debacle To Revival (Y. B. Chavan as Defence Minister). Atlantic Publishers & Distributors (p) Ltd., New Delhi. 2009.
३. Thapa C.R. (Major), Technology and war; Sumit Enterprises, New Delhi, 2009.
४. कायंदे पाटील गंगाधर वि., *यशवंतराव चव्हाण,* चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक-५. २०००.
५. पाटील विठ्ठलराव,*महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण*, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुबई. २००२
६. केळकर भा. कृ.(संपा.), यशवंतराव राष्ट्रीय व्यक्तिमत्व, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुबई. २००६.
७. महानोर ना. धो., यशवंतराव चव्हाण, साकेत पब्लिकेशन्स, औरंगाबाद. १९८३
८. श्रीवास्तव जे., *राष्ट्रीय सुरक्षा की अवधारणा;* तृतीय संस्करण, चंद्र प्रकाश ॲण्ड कंपनी, हापुड, १९९६.
९. जाधव व्ही. वाय., *भारताची राष्ट्रीय सुरक्षा,* स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे. २०११.
१०. पाटील के.बी व इतर, *भारतीय युध्दकला*, अथर्व पब्लिकेशन्स्, धुळे. २०१७.

ISSN : 2278-9308
March, 2021

# यशवंतराव चव्हाण यांचे महाराष्ट्राच्या निर्मितीचे ओजस्वी कार्य

**प्रा.डॉ. दिलीप तुकाराम कदम**
इतिहास विभाग कै.न्हानाभाऊ मन्साराम तुकाराम पाटील कला महाविद्यालय,
मारवड ता.अमळनेर जि.जळगांव
email-mr.kadamdilip123@gmail.com

**प्रस्तावना -**

भारतीय स्वातंत्र्य चळवळ ही एक दीर्घ अशी जगातील सर्वात बलवान अशा वसाहतिक ब्रिटीश सत्तेविरुध्दची संघर्षाची कथा आहे. या स्वातंत्र्य चळवळीमध्ये प्रत्येक कालक्रम आणि प्रवाहामध्ये प्रामुख्याने तीन प्रांताचे अतुलनीय असे योगदान आहे. यामध्ये महाराष्ट्र, पंजाब आणि बंगाल यांचे कार्य भरीव अशा स्वरूपाचे आहे. मवाळवाद, जहालवाद, क्रांतिकारी आंदोलन, असहकार, सविनय आणि चलेजाव (१९४२) आदि सर्वच बाबीत महाराष्ट्राचे कार्य खुप उल्लेखनिय आहे. भारतीय इतिहासाबाबत एक निराळी बाब प्रो.रामचंद्र गुहा यांनी Makes of Modern India (२०१८) या पुस्तकामध्ये मांडले आहे.

"जगाच्या इतिहासात भारतासारखा राष्ट्र विराळाच आहे. या देशात राष्ट्रीय नेत्याबाबत एक बाब अशी दिसून येते की, येथील राष्ट्रीय नेते हे एकीकडे जसे कृतिशिल असे कार्यकर्ते होते. संघटक होते. तसेच ते दुसरीकडे प्रखर असे लेखक, विचारक ही होते. यांच्या स्पष्टीकरणाकरीता त्यांनी अमेरिकेचे उदाहरण दिले आहे की, त्यांच्या देशात अगोदर थॉमस जेफरसन आणि असले प्रचंड लेखक विदवान जन्माला यावी लागली आणि त्यानंतर त्यावर अंमल करणारी कृतीशिल अशी कार्यकर्ते मंडळीही पुढे यावी लागली होती, परंतु भारतात मात्र असे कदापी घडले नाही. पंडित नेहरू, महात्मा गांधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर इ.ची त्यांनी उदाहरणे दिली आहेत. " (गुहा, २०१८, प्रस्ता.)

यावरून आपणास एक बाब अशी स्पष्ट दिसून येते की, महाराष्ट्र ही अशाच कार्यशिल अशा नेतृत्वाची दीर्घ अशीच परंपरा आहे. ज्याअर्थी महाराष्ट्राचा विचार निघाला त्याअर्थी आणखी एक बाब आपल्याला प्रकर्षाने अशी दिसून येते की, प्रस्तूत भारतीय स्वातंत्र्य चळवळीसह महाराष्ट्राच्या नशिबाला यासह संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या अनुषंगाने आणखी एक दीर्घ अशी चळवळ पुढे यावी लागली आणि इथे आणखी एक बाब अशी नमुद करावीशी वाटते की, या संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत संबंध महाराष्ट्र निराळया अर्थाने ढवळून निघाला होता. (फडके, २०००, प्रस्ता.)

या संबंध ढवळून निघाल्यात प्रचंड मोठया प्रमाणात सामान्य माणुसही केंद्रीभूत असा होता. या चळवळीमध्ये जितके लोकोत्तर दृष्टये नेते होते तसेच यामागे प्रचंड अशी भाबडी जनताही होती. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ (गोवा मुक्ती चळवळ) यासह निश्चितपणे राष्ट्रवादाची निराळी अशा संदर्भ घेवून येणारी लोकचळवळ होती. परंतु दुर्दैवाने याचे फारसे इतिहास विश्लेषण आपल्याकडे केले जात नाही. हा लढा मुंबईच्या महाराष्ट्राच्या अस्तित्वाचा, अस्मितेचा लढा होता. या लढयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर, प्रबोधनकार ठाकरे, प्र. के. अत्रे, सप्रे आणि महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण आदी नेतृत्व प्रामुख्याने लाभले आहे. ( पवार, १९९०, १२३)

महाराष्ट्राच्या बाबतीत आपल्याला एक बाब ही आणखी समजून घ्यावी लागेल की महाराष्ट्राची प्रतिमा ही कायमच पुरोगामी महाराष्ट्र अशीच आहे. या महाराष्ट्राच्या पुरोगामीत्वाच्या विरूदच्या स्पष्टीकरणादाखल प्रामुख्याने प्रो.य.दि.फडके यांनी विसाव्या शतकातील महाराष्ट्र हे दीर्घ असे पंचखंडात्मक लेखन केले आहे. (फडके, २०००, प्रस्ता.) या त्याच्या सर्वच खंडातुन अनुक्रमे महाराष्ट्राचा आधुनिकतेचा अचुक असा धागा पकडला आहे. आणि महाराष्ट्र हा कसा सदैव कसा कालच्या संदर्भात दृष्टेपणाने पुढे आहे यांची अंत्यत सांगोपांग अशी मांडणी केली आहे. अशा या आधुनिक आणि त्यातही पुरोगामी अशा महाराष्ट्राची प्रखर अशी उभारणी ही मुख्यत: महाराष्ट्राचे भुमिपुत्र आणि पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण (१९१३ - १९८४) यांनी आपल्या ओजस्वी अशा कार्यातुन केल्याचे आपणांस दिसून येते. यांचा जन्म १२ मार्च १९१३ रोजी कराड अर्थात पश्चिम महाराष्ट्रात झाला होता. त्यांच्या वडिलांचे नाव बळवंतराव चव्हाण आणि आईचे नाव विठाबाई चव्हाण असे आहे. अगदी लहानपणापासूनच त्यांच्यात नेतृत्व गुण हे निश्चीतपणे पुढे आले होते. अत्यंत रांगडे असे हे व्यक्तिमत्व होते. अस्सल मातीचा गंध आणि प्रेम असणाऱ्या या व्यक्तीमत्वाने महाराष्ट्राचाही चेहरा मोहरा बदलला. (कायंदे, २०००, प्रस्ता. चैतन्य प्रकाशन,

नाशिक) यशवंतराव चव्हाण यांनी दीर्घकाळ हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून तर कार्य केलेच आहे परंतु त्यांनी प्रामुख्याने देशाचे संरक्षणपदाची धुराही अत्यंत प्रभावीपणे त्यांनी जपलेली दिसून येते.

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत ज्यांनी यांची प्रचंड अशी उभारणी केली आहे. यामध्ये यशवंतराव चव्हाण यांचे अभूतपुर्व असे योगदान आहे. ज्या काळात त्यांच्या हाती महाराष्ट्राची सत्ता सुत्रे हाती आली होती तो काळ अत्यंत नाजुक अशा स्थितीचा आणि प्रभावशाली अशा राजकीय मुल्यांचा असा काळ होता. देशाने नुकताच असा राष्ट्रवादाचा प्रचंड असा लढा यशस्वी केला होता. हा स्वातंत्र्य आणि राष्ट्रवादाचा लढा यशस्वी केला होता. संबंध देश या राष्ट्रवादाच्या प्रवाहाने ढवळून तर निघालाच होताच परंतु त्यासहचे आंतरराष्ट्रीय पातळीवरही दुसऱ्या महायुध्दाने (१९३९-१९४५) प्रचंड असे संहारक युध्द मानवजातीपुढे एक आव्हान म्हणून पुढे आले होते. आणि सुदैवाने या महायुध्दाच्या लोकशाहीवादाचा गटाचा प्रभावी असा विजय झाला आणि त्याअंतर्गत केवळ भारतालाच नव्हे तर जगातील बहुतांशी अशा वसाहतवादी राष्ट्रांना स्वातंत्र्याची नवी पहाट मिळाली. (चंद्रा, २००१, ११२ )

या असल्या दुसऱ्या महायुध्दाच्या सावटाखाली देशाला स्वातंत्र्य मिळाले असले तरी हे स्वातंत्र्यच मुळात प्रचंड असे आव्हानास्पद होते आणि त्यापेक्षाही लोकशाही या देशात प्रभावीपणे नांदू शकेल काय ? कारण भारताला मुळात विविधतेची प्रचंड अशी ऐतिहासिक परंपरा आहे या देशात प्रचंड भाषा, संस्कृती, खादयसंस्कृती, जाती, वंश, पितृसत्ता, सरंजामशाही मुल्ये अशा एकुण पृष्ठभुमीवर निश्चित संस्थानिक आणि त्यांचे विशाल असे राज्य, लोकशाही कशी दृढमुल करावी हा प्रचंड मोठा प्रश्न होता. ( देव, १९९०, ७८)

या असल्या अत्यंत बिकट स्थितीत महाराष्ट्राची धुरा ही दृष्टये नेतृत्व यशवंतराव चव्हाण यांच्याकडे आले. त्यांच्या या नुतन अशा सत्तेपुढे यासारखी प्रचंड आव्हाने होती. आणि या सर्वच पातळीवर त्यांनी एका प्रखर अशा महाराष्ट्राची पुढीलप्रमाणे निर्मिती केली.

**१) सक्षम लोकशाहीची उभारणी -**

यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राची प्रखर अशी उभारणी करण्याकरीता सर्वप्रथम सक्षम अशा लोकशाहीची निर्मिती केली त्यांनी सदैव आपल्या कारकिर्दीत या लोकशाहीच्या मुल्यांची मनापासून जोपासना केली होती. सत्तेत असतानांही त्यांनी सदैव विरोधी पक्ष आणि त्यांची मते, टिका यांचा अचुकपणे वेध घेतला आणि अधिकाधिक प्रमाणात विकासाचे राजकारण करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. ( फडके, २०००, १३)

**२) जिल्हा परिषदांची निर्मिती लोकशाहीला पारदर्शक विचार -**

ना.यशवंतराव चव्हाणांनी आपल्या एकुणच कार्यातील सर्वात महात्वाचे असे कार्य म्हणजे त्यांनी प्रभावीपणे जिल्हा परिषदाची प्रभावीपणे निर्मिती केली होती. या जिल्हा परिषदांच्या निर्मितीतून त्यांनी लोकशाहीच्या पारदर्शकेचा विचार प्रस्तूत केला होता. (कायंदे, २०११, १२३) त्यांना या जिल्हापरिषदाचे जाळे हे जागृत लोकशाहीचा आत्मा वाटत होता. भारतीय इतिहासात कायदयाचा विचार केला तर या प्रकारच्या स्वराज्य संस्थाची निर्मिती ही १९१९ च्या कायदयातंर्गत करण्यात आली होती. परंतु ती आपल्या महाराष्ट्रात चव्हाण यांनी आपल्या कार्यातून दृढमुल केली होती. ( वैदय, २०००, १७८)

**३) एकजिनसी महाराष्ट्राची प्रभावी बांधणी -**

महाराष्ट्राची खरी अवस्था ही अत्यंत निराळी अशी होती येथे मोठया प्रमाणात जातीव्यवस्था, संरजामशाही मूल्ये आदी बाबी होत्या शिवाय दीर्घकाळ येथे निरनिराळया अशा सत्ता येथे दृढमुल होत्या, परंतु श्री यशवंतराव चव्हाणाचे द्रष्टेपणा यात आहे की त्यांनी केवळ एकजिनसी अशा महाराष्ट्राची केवळ कल्पानाच केली असे नाही तर त्यांनी याच्या एकजिनसीपणासाठी वैविध्यपणे अनेक असे उपक्रम राबविले होते. (थरूर, २०१८, १३)

**४) समाजवादाची प्रेरणा -**

यशवंतराव यांनी केलेले आणखी एक प्रभावी असे कार्य म्हणजे त्यांनी जितकी लोकशाहीची बांधणी प्रभावीपणे केली तितक्याच प्रभावीपणे त्यांनी समाजवादाची ही निर्मिती केली होती. त्यांची समाजवादावर प्रचंड मोठी श्रध्दा होती आणि हा समाजवाद आपल्या समाजामध्ये क्रमबध्द पध्दतीने दृढमुल झाला पाहिजे असा त्यांना यांच्याप्रती विचार होता. त्यांना कायमच असे वाटत होते की, लोकशाहीच्या विकासाची दुसरी प्रगतावस्था म्हणजे समाजवाद होय आणि समाजवाद हे सर्वांना एकसमान रितीने न्याय मिळवून देणाऱ्या व्यवस्थेची नांदी अशा सुरातच त्यांना पाहत आहे.

**५) प्रखर प्रशासकांची बांधणी -**

यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या कार्यकाळात अत्यंत प्रभावी अशी प्रशासकीय यंत्रणा उभी केली होती. या प्रशासनात मुख्यत: पारदर्शकपणा कसा येईल किंबहूना जबाबदार अशी यंत्रणा कशी निर्माण होईल हाच त्यांच्या सत्तेचा प्रमुख असा श्वास

होता. त्यांच्या प्रशासकीय यंत्रणा आणि व्यवस्थेवर मोठा विश्वास होता. वेळप्रसंगी त्यांनी जितके या प्रशासकांना सडेतोड असे प्रश्न विचारली तेवढेच त्यांनी प्रसंगी त्यांचे गुणगौरवही केले होते. त्यामुळे कर्तृत्ववान, कार्यशिल अशा प्रशासकांना ते फार जवळचे असेच वाटत होते.

**६) देशाचे सरंक्षणमंत्री म्हणून महत्वपूर्ण कार्य -**

यशवंतराव चव्हाण यांचे महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणूनच कार्य महत्वाचे आहे असे नाही तर त्यांचे देशाचे सरंक्षणमंत्री म्हणूनही अत्यंत जोखमीचे असे पद अत्यंत प्रभावीपणे यांनी भूषविले आणि यामधूनच त्यांनी देशाची या क्षेत्रात मान उंचावली होती. यामध्ये यांचे कार्य खुप भरीव अशा स्वरूपातील आहे. (फडके, २०००, १२)

**७) प्रखर कार्यकर्त्यांची उभारणी -**

यशवंतराव चव्हाण यांच्या व्यक्तीमत्वाचा एक अनोखा असा आयाम म्हणजे त्यांनी उभी केलेली प्रखर अशा कार्यकर्त्यांची एक कर्तबगार अशी पिढीच तयार केली होती. ही पिढी कदापीही आजच्या आपल देशातील पक्ष आणि त्यांचे भाडेफिरू अशा कार्यकर्त्यासारखी ही पिढी कदापी नव्हती तर ती निष्ठावान अशा कार्यकर्त्यांची पिढी त्यांनी महाराष्ट्र उभारणीच्या संदर्भातच निर्माण केली होती. (कायंदे पाटिल, २०००, १९)

**८) प्रतिभाशाली असा साहित्यिक -**

यशवंतराव चव्हाण यांच्या व्यक्तिमत्वाचा अत्यंत प्रभावी असा पैलू म्हणजे साहित्यीक असणे होय. त्यांनी अत्यंत प्रांजळपणे आपले आत्मचरित्र लिहिले आहे आणि त्यास कृष्णाकाठ असे नाव दिले आहे. त्यांनी यामध्ये या कृष्णा नदीला साक्ष म्हणून आपले आयुष्य अत्यंत सफाईदारपणे टिपले आहे. हे अत्यंत वाचनीय असे आत्मचरित्र आहे यांची तुलना कायम महात्मा गांधीच्या My Experience with Truth आणि पंडित नेहरूAutobigraphy या प्रकारच्या दिग्गज अशा आत्मचरित्रांशी यांची तुलना केली जाते, हे केवळ त्यांचे आत्मवृत्त नव्हे तर आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीची कथा आहे याचा पदोपदी अनुभव येतो. (चव्हाण, २०००, प्रस्ता.)

**संदर्भ -**

१) वैदय, सुमन (१९९७) *आधुनिक भारताचा इतिहास,* साईनाथ प्रकाशन, नागपूर
२) चंद्रा बिपन (२०००) *आधुनिक भारत का इति,* मॅकमिलन प्रकाशन
३) चव्हाण, यशवंतराव (२०००) *कृष्णकाट,* मुंबई
४) फडके, य. दि.(२०००) *२० व्या शतकातील महाराष्ट्र,* के. सागर
५) पवार, जयसिंग (१९९०) *भारताचा इतिहास,* फडके प्रकाशन, कोल्हापूर
६) दवे, प्रभाकर (१९९९) *प्राचीन भारत,* नांदेड
७) कायंदे, पाटील (२०१९ ), यशवंतराव चव्हाण, चैतन्य प्रकाशन, नाशिक
८) गुहा रामचंद्र (२०१८) *Makers of Modern India, आधुनिक भारताचे विचारस्तंभ,* रोहन प्रकाशन, पुणे
९) थरूर, शशी (२०१८) *शोध नेहरूचा आणि भारताचा,* रोहन प्रकाशन, पूणे

# अष्टपैलू यशवंतराव चव्हाण

प्रा.एस. के. इंगळे
ग्रंथपाल नेहरू महाविद्यालय नेरपरसोपंत, जि. यवतमाळ
मो.नं. ८०८७६०२२८८Email id :- sureshingle666@gmail.com

महाराष्ट्राच्या मराठमोळ्या मातीत अनेक दिग्गज थोर पुरुष होऊन गेले. त्यांनी देशाच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात खूप मोठे योगदान दिले. स्वातंत्र्य चळवळीत मोठा लढा उभारून स्वातंत्र्य साठी अनेक सर्वस्व अर्पण करणारे क्रांतिकारक, नेते यांचा वारसा लाभलेली अशी महाराष्ट्राची भूमी. सातारा जिल्ह्यामध्ये प्रतिसरकार स्थापन करून ब्रिटिश सत्तेला मोठा हादरा देण्याचे काम क्रांतिसिंह नाना पाटील यांनी केले. या सातारा जिल्ह्यामध्ये आपल्या आजोळी देवराष्ट्रे येथे १२ मार्च १९१३ रोजी यशवंतराव बळवंतराव चव्हाण यांचा जन्म झाला. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर देवराष्ट्रे हे गाव सांगली जिल्ह्यामध्ये समाविष्ट करण्यात आले. सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात जन्म घेऊन परिश्रम व लढाऊ बाणा या गुणांच्या आधारे देशाच्या उपपंतप्रधान पदापर्यंत मजल मारण्याची दिव्य कामगिरी यशवंतरावांनी केली. स्वातंत्र्यचळवळीत सहभाग देशप्रेमाने भारलेले वातावरण महात्मा गांधी, पंडित नेहरू आदी नेत्यांकडून घेतलेली प्रेरणा या जोरावर यशवंतरावांनी आपल्या जीवनाला आकार दिला.

- **बालपण आणि शिक्षण:—**

यशवंतराव चव्हाण यांचे बालपण देवराष्ट्रे व कराड मध्ये गेले यशवंतराव यांचा जन्म केव्हा झाला तेव्हा त्यांचे वडील कराडला नोकरीला होते यशवंतराव चव्हाण यांचे प्राथमिक शिक्षण कराडला झाले. यशवंतराव चव्हाण यांचे वडील यशवंतराव लहान असताना मरण पावले व संपूर्ण जबाबदारी त्यांचे मोठे भाऊ ज्ञानदेव चव्हाण यांच्यावर आली. यशवंतरावांच्या आईची खूप इच्छा होती की मुलाने शिकावे. लहानपणापासूनच त्यांना भजन कीर्तनाची आवड होती तसेच शालेय जीवनात त्यांनी अनेक पारितोषिके वकृत्व स्पर्धेत जिंकली. कराड येथे त्यांनी तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी, लोकमान्य टिळक, ना. गोखले यांची भाषणे ऐकली. कोल्हापूरच्या राजाराम महाविद्यालयात त्यांचा व्यासंग वाढला. बी.ए.एल.एल.बी. ची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर १९४२ मध्ये स्वातंत्र्यलढ्यात भूमिगत होऊन कार्य केले. १९३० मध्ये महात्मा गांधींनी सविनय कायदेभंग चळवळ सुरू केली, त्यात यशवंतरावांनी सहभाग घेतला. १९३२ मध्ये त्यांना पहिला तुरुंगवास घडला. त्यावेळी त्यांना १८ महिन्यांचा तुरुंगवास भोगावा लागला. १९४७ नंतर मंत्री, मुख्यमंत्री आणि देशाचे संरक्षण, गृह, परराष्ट्र आणि वित्त मंत्रिपदे समर्थपणे त्यांनी सांभाळली. त्यांनी केंद्र सरकारमध्ये पंडित नेहरू यांचे नेतृत्वाखाली कार्य केले.

- **यशवंतरावांचे स्वातंत्र्यलढ्यात सहभाग आणि पहिला तुरुंगवास :—**

कराडच्या केंद्र शाळेतून व्हर्णयक्युलर फायनल ची परीक्षा पास झाल्यानंतर १९२७ मध्ये यशंतरावांनी कराडच्या टिळक हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला. माध्यमिक शिक्षण सुरू असतांना देशभर क्रांतीचा वणवा भडकलेला होता. क्रांतिकारकांचा मोठा प्रभाव यशवंतरावांच्या व्यक्तिमत्वावर पडला होता. वृत्तपत्रातील बातम्या वाचून राष्ट्रीय नेत्यांची चरित्र वाचून यशवंतरावांचे मन देशप्रेमाने भारावून गेले. जतींद्र दासाने तुरुंगात केलेल्या आत्मबलिदाना मुळे त्यांचे मन पेटून उठले. इसवी सन १९२९ मध्ये भगतसिंग व त्यांच्या साथीदारांनी असेंब्लीत बॉम्ब फेकला. १९३१ मध्ये भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांना फाशी दिली. इन्कलाब जिंदाबाद च्या घोषणा देत हसत हसत

ISSN : 2278-9308
March, 2021

फासावर जाणाऱ्या भगतसिंग यांच्या कृतीतून प्रेरणा घेऊन यशवंतरावांनी निर्धार केला, "इथून पुढे संपूर्ण आयुष्य स्वातंत्र्यलढ्यसाठी अर्पण करायचे" या नंतर त्यांनी कधीच मागे वळून पाहिले नाही.

इसवी सन १९३०—३१ हा काळ संपूर्ण देशभर असहकार आंदोलनाने व्यापला होता. मिठावरील अन्यायकारक कराला विरोध करण्यासाठी महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली देशाच्या कानाकोपऱ्यात कायदेभंग चळवळ सुरू होती. विद्यार्थी वर्गही यामध्ये कमी नव्हता. यशवंतरावांनी विद्यार्थीदशेत असहकार चळवळीत उडी घेतली १९३२—३३ मध्ये त्यांना १८ महिन्यांचा तुरुंगवास भोगावा लागला. वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी त्यांनी पहिला तुरुंगवास भोगला. त्यानंतर आंदोलने, चळवळी, भाषणे याने यशवंतरावांचे जीवन व्यापून गेले. प्रचंड वाचन प्रभावी वक्तृत्व हे गुण त्या काळातच यशवंतरावांनी आत्मसात केले.

- **यशवंतरावांच्या पत्नीचे योगदान :—**

यशवंतरावांच्या जीवनात त्यांची पत्नी वेणूताईचे योगदान खूप मोठे मानावे लागेल. २ जून १९४२ ला कराड येथे यशवंतराव चव्हाण यांचा विवाह वेणूताईशी झाला. यशवंतरावांच्या झंजावाती वादळी जीवनात साथ देण्याचे दिव्य कार्य वेणूताईंनी आयुष्यभर पार पाडले. विवाहानंतर अवघ्या दोन महिन्यात संपूर्ण देशभर 'चलेजाव' आंदोलन भडकले. ९ ऑगस्ट १९४२ रोजी महात्मा गांधीनी मुंबईच्या आझाद मैदानावर देशवासियांना 'करा किंवा मरा' असा संदेश दिला. यशवंतराव यांनी चले जाव आंदोलनात सातारा जिल्ह्याचे नेतृत्व केले. प्रमुख राष्ट्रीय नेत्यांना अटक झाल्यानंतर यशवंतरावांनीया लढ्याचे नेतृत्व केले. या लढ्यातील सहभागाबद्दल त्यांना तुरुंगात जावे लागले. यशवंतरावांचा एक पाय घरात तर दुसरा पाय तुरूंगात असायचं. या काळात पत्नी वेणूताईंनी कुटुंबाची जबाबदारी समर्थपणे सांभाळली.

- **महाराष्ट्राची निर्मिती व पुढील वाटचाल :—**

इसवी सन १९५४ साली मुंबई पंचायत राज संघाची स्थापना झाली. या दरम्यान राज्य पुनर्रचना समिती गठीत करण्यात आली होती. या समितीने मुंबई राज्याची विभागणी करून विदर्भासाठी स्वतंत्र राज्य करून उर्वरित प्रदेश मराठी व गुजराती भाषिकांचे संयुक्त राज्य स्थापन करण्यात यावे अशी शिफारस करण्यात आली. मुंबई, विदर्भ, मराठवाडा, संयुक्त महाराष्ट्र राज्य असावे या मागणीसाठी संपूर्ण राज्यभर आंदोलने पेटू लागली. काँग्रेस निष्ठा व्यक्त करत यशवंतरावांनी या आंदोलनाला विरोध केला. १ डिसेंबर १९५५ मध्ये सातारा जिल्हा काँग्रेस कमिटी सभेत यशवंतरावांनी घोषणा केली. "संप,आंदोलने,उपोषण, राजीनामे हे संयुक्त महाराष्ट्र मिळविण्याचे मार्ग नव्हेत महाराष्ट्रापेक्षा राष्ट्रहित महत्त्वाचे आहे. संयुक्त महाराष्ट्र मिळवण्याचा प्रयत्न यापुढे शंकरराव देव यांचे नेतृत्व मी स्वीकारणार नाही."

संयुक्त महाराष्ट्र मागणीचा जोर वाढत असताना प्रवाहाविरुद्ध भूमिका घेण्याचे धैर्य यशवंतरावांनी दाखविले. दरम्यानच्या काळात विशाल द्विभाषिक मुंबई राज्य स्थापन करावे असा ठराव लोकसभेत मंजूर झाला. त्यानुसार ९ नोव्हेंबर १९५६ रोजी द्विभाषिक मुंबई राज्याची स्थापना झाली. वयाच्या अवघ्या ४३ व्या वर्षी मुंबई राज्याचे पहिले मुख्यमंत्री बनण्याचा बहुमान यशवंतराव चव्हाण यांना मिळाला. काही काळानंतर चळवळीने गती घेतली व यशवंतरावांनी आपल्या कौशल्याच्या आधारे प्रथम मुंबई राज्य नंतर मराठवाडा, विदर्भ व संपूर्ण महाराष्ट्र आपलासा करून घेतला. एप्रिल १९६० मध्ये एक ठराव मंजूर करण्यात आला. या ठरावानुसार महाराष्ट्र व गुजरात अशी दोन राज्ये निर्माण करण्यात लोकसभेत मंजुरी दिली. दीर्घकाळ सुरू असलेल्या संयुक्त महाराष्ट्र लढ्यास मूर्त रूप प्राप्त होण्याचा तो एक महत्त्वाचा क्षण होता. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात झाली. महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री बनण्याचा बहुमान यशवंतराव चव्हाण यांना मिळाला. मुख्यमंत्री पदाची जबाबदारी

 ISSN : 2278-9308
March, 2021

स्वीकारल्यानंतर राज्याच्या विकासाच्या संदर्भात अनेक धोरणात्मक निर्णय घेतले.महाराष्ट्राचे भाग्य उजळून टाकणाऱ्या कोयना विद्युत प्रकल्पाचे पहिले जनित्र १९६५ मध्ये यशवंतरावांच्या हस्ते बसविण्यात आले. त्याचबरोबर नागपूर येथील दीक्षाभूमी वर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक उभारले व १४ एप्रिल हा दिवस सार्वजनिक सुट्टी म्हणून जाहीर करणे, गुढीपाडव्याला सार्वजनिक सुट्टी जाहिर करणे अशी कितीतरी महत्त्वपूर्ण निर्णय यशवंतराव यांच्या कारकिर्दीत करण्यात आले यशवंतराव चव्हाण यांनी दिलेल्या योगदानामुळे त्यांना आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून गौरविण्यात आले.

- **साहित्यक्षेत्रात कामगिरी :—**

यशवंतराव चव्हाण यांना राजकारणाबरोबरच साहित्याशी त्यांचा खूप मोठा व्यासंग होता. मराठी भाषेच्या समृद्धीसाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. नवी दिल्ली येथे भरलेल्या ४३ व्या अखिल भारतीय नाट्य संमेलनाचे स्वागताध्यक्षपद त्यांनी स्वीकारले. १९६२ मध्ये सातारा येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते झाले. नांदेड येथे भरलेल्या मराठी नाट्य परिषदेचे उद्‌घाटन त्यांच्या हस्ते झाले. मराठी भाषा वाढली पाहिजे व समृद्ध झाली पाहिजे यासाठी त्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केल्याचे दिसून येते व त्याचबरोबर त्यांनी अनेक ग्रंथया वेळेस लिहून काढले.

- **यशवंतरावांची राजकीय कारकीर्द :—**

यशवंतरावांची राजकीय कारकीर्द खऱ्या अर्थाने पंडित नेहरू यांच्या मार्गदर्शनात उदयास आली. १९५६ मध्ये संयुक्त महाराष्ट्राची भूमिका यशवंतरावांनी पंडित नेहरूंना पटवून दिली. १९६० मध्ये महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री बनले व १९६२ मध्ये केंद्रीय मंत्रिमंडळात संरक्षण मंत्री आदी विविध जबाबदाऱ्या पंडित नेहरूंनी यशवंतराव चव्हाण यांच्यावर सोपविल्या.

१९६२ भारत चीन यांच्यात युद्ध झाले. चीनच्या अचानक आक्रमणामुळे भारताला नामुष्कीजनक पराभव पत्कारावा लागला. चीनचे राष्ट्राध्यक्ष माओ—से—तुंग यांच्या कडून झालेला विश्वासघात नेहरूजींना जिव्हारी लागला. 'हिंदी चीनी भाई भाई' या घोषणेला चीन ने दगा दिला. या प्रसंगी देशाच्या संरक्षण मंत्री या पदावरून श्री. बी.के. मेनन यांना काढून त्या जागेवर यशवंतरावांना बसवावे असे नेहरूंना वाटू लागले. त्यावेळी यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. २२ नोव्हेंबर १९६२ रोजी देशाचे संरक्षण मंत्री पदाची शपथ यशवंतराव चव्हाण यांनी घेतली.

१९६५ साली भारत—पाक यांच्यातील लढाईचे धुमश्चक्र सुरू होते. यादरम्यान यशवंतरावांच्या मातोश्री विठाबाई या खूप आजारी होत्या. त्यांना उपचारासाठी मुंबईला आणले गेले. वय झालं होतं आयुष्यभर कष्ट करून ती आता थकलेली होती. १८ ऑगस्ट १९६५ रोजी त्यांनी जगाचा निरोप घेतला त्या वेळी यशवंतराव दिल्लीला होते. देश युद्धाच्या खाईत असल्याने यशवंतरावांना आपल्या मातेचा अखेर चा सहवास लाभला नाही.

१९६५ च्या युद्धात भारताने पाकिस्तानवर मिळविलेला पहिला विजय देशाने पाहिला. १९७१च्या युद्धात भारताने पाकिस्तानचा पराभव करून त्याचे दोन तुकडे केले.या यशात यंशवंतरावांची मोठी भूमिका देशाला दिसली. संरक्षण मंत्री या नात्याने यशवंतरावांनी केलेले काम औपचारिक मार्गदर्शन नव्हते. राम प्रधान यांनी संपादित केलेल्या त्या काळातील यशवंतरावांची डायरी नुसार नुसती चाळणी केली तरी शस्त्रास्त्र बळाच्या वाढी पासून तर सेनेच्या प्रत्यक्ष भरती पर्यंत त्यांनी उचललेले निर्णायक पाऊल नजरेत भरले.

जून १९७० मध्ये यशवंतरावांची केंद्रीय अर्थमंत्री म्हणून नियुक्ती झाली. देशाची आर्थिक घडी पुढील चार वर्षात बसविण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. पाकिस्तान आणि चीन यांच्या

भारतविरोधी कारवाया ने संघटित स्वरूप घेतले तेव्हा यशवंतरावांची नियुक्ती ऑक्टोबर १९७४ मध्ये परराष्ट्र खात्याच्या मंत्री पदावर करण्यात आली. देशाचे परराष्ट्र धोरण निश्चित करण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

- **अष्टपैलू व्यक्तिमत्व :–**

यशवंतराव चव्हाण जर राजकारणात आले नसते तर थोर साहित्यिक म्हणून नावलौकिक झाले असते असे त्यांच्याबद्दल अनेक साहित्यिकांची मत आहे. यशवंतराव चव्हाण यांच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू त्यांच्या वाटचालीतून स्पष्ट होतात. जीवनाचे उपासक असलेले यशवतंरावांच्या प्रत्येक कृतीतून, बोलण्यातून सहसा दिसून येते. कोणतेही कार्यसहजतेने हाताळण्याची खुबी अन्य कोणामध्ये सहजासहजी न आढळणारा हा पैलू यशवंतराव यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये होता. वृत्तपत्र संपादक, उद्योजक, कलाकार, शिक्षण तज्ञ, राजकारण अशा विविध स्तरात यशवंतरावांचा खूप मोठा मित्र परिवार होता. कोणत्याही क्षेत्रातील माणसात ते सहजपणे मिसळत. राजकारणात अनेक चढउतार पाहिलेल्या व आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर देशभर नावलौकिक मिळविलेल्या यशवंतरावांचा सामान्यातील सामान्य माणसाशी थेट संबंध होता. शेतकरी हा विकासाचा केंद्रबिंदू मानून त्यांनी राजकारण केले. भाषावाद, प्रांतवाद ही समस्या देशाला विनाशाच्या गर्तेत नेणारी आहे. प्रत्येक भारतीय राष्ट्रवाद जोपासला पाहिजे हा विचार त्यांनी ठामपणे मांडला. राजकारणातील तत्वनिष्ठ त्यांनी आयुष्यभर जोपासली. गल्लीपासून दिल्लीपर्यंत स्वयंतेजाने तळपणारे हे व्यक्तिमत्व प्रत्येक भारतीयांनाआपलेसे वाटत राहिले. यशवंतरावांची व्यापक दृष्टी, चौफेर वाटचाल, विविध क्षेत्राशी असणारा संबंध असे अष्टपैलू व्यक्तिमत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले गेले.

**संदर्भ ग्रंथ :–**

१) **कृष्णाकाठ** लेखक :–यशवंतराव चव्हाण प्रकाशक :–यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई ई –बुक प्रथमावृत्ती :– २००६
२) **सह्याद्रिचे वारे** लेखक :–यशवंतराव चव्हाण प्रकाशक :–यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई
३) **लोकनेते** : यशवंतराव चव्हाण लेखक :–अनिल चव्हाण प्रकाशक :–भरारी एज्युकेशन ॲन्ड सोशल फाउंडेशन,कोल्हापूर.प्रथमावृत्ती :– ऑगस्ट २०१२
४) **मी पाहिलेले यशवंतराव** लेखक :– संपा. सरोजिनी बाबर प्रकाशक :– महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई.प्रथमावृत्ती :– ऑगस्ट १९८८
५) **यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार** संकलन :– ना. धो. महानोर प्रकाशक:– यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई. प्रथमावृत्ती :– २००९

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor -(SJIF) –7.675,Issue NO, 289 (CCLXXXIX )

ISSN : 2278-9308 March, 2021

# धुरंधर नेते यशवंतराव चव्हाण

प्रा.सुनिता विठ्ठलराव भोसले.

सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग राजर्षी शाहू महाविद्यालय स्वायत्त लातूर

Mail id : srmbhosale@gmail.comMob No: 9552142663.

आज महाराष्ट्र सर्वच क्षेत्रात आघाडीवर असलेले राज्य आहे. महाराष्ट्राला देशात जे स्थान आहे ते मिळवून देण्यात महाराष्ट्रातील राजकारणी ,समाजसुधारक, अभ्यासक, कार्यकर्ते, वैज्ञानिक, साहित्यिक इत्यादींचा वाटा महत्त्वाचा आहे. महाराष्ट्राला सर्वच क्षेत्रात पुढे नेण्यात महत्त्वाचा वाटा मुख्यमंत्र्याचा आहे.1 मे 1960 महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले व त्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण सत्तेवर आले. यशवंतराव चव्हाणांनी त्यांच्या राजकीय जीवनात उपपंतप्रधान, संरक्षणमंत्री, परराष्ट्रमंत्री, अर्थमंत्री, गृहमंत्री इत्यादी पदभार सांभाळले यशवंतराव चव्हाण यांच्या इतका आवाका असलेला व आपल्या कर्तृत्वाची पाळेमुळे सामान्य माणसांच्या जीवनात खोलवर रुतलेला मुख्यमंत्री, नेता, केंद्रीय मंत्री भारतात झाला नाही. यशवंतरावातील राजकारण्यापेक्षा नेत्यापेक्षा त्यांच्यातील माणूस महान होता. माणसे जोडण्याचा मृदुलपणा, नेमकेपणा त्यांच्यात होता. मराठी साहित्य, मराठी संस्कृती, मराठी मन, मराठी माणूस, मराठी जीवन, यावर मनापासून प्रेम करणारा अस्सल मराठमोळा माणूस म्हणून ते ओळखले जातात. महाराष्ट्रात मराठा अहंकाराची मुहूर्तमेढ कळत-नकळत यशवंतराव चव्हाणांनी रोवली.1970 पर्यंत महाराष्ट्राच्या राजकारणावर यशवंतराव चव्हाण यांची छाप होती. त्यांच्या उदयामुळे ब्राह्मण नेतृत्व लोप पावले. महाराष्ट्राच्या नव्हे तर देशाच्याही राजकारणात आपले वेगळेपण त्यानी टिकवले. यशवंतराव चव्हाण यांची राजकीय वाटचाल धकाधकीची होती. कमालीची लोकप्रियता व लोक निंदा त्यांना सहन करावी लागली.

यशवंतराव बळवंतराव चव्हाण यांचा जन्म 12 मार्च 1913 रोजी देवराष्ट्र या गावी एका शेतकरी कुटुंबात झाला. त्यांच्या आईचे नाव विठाबाई होते. बळवंतराव व विठाबाई या दाम्पत्यांना ज्ञानोबा,राधाबाई, गणपतराव, यशवंतराव अशी चार आपत्ती होती. यशवंतराव चार वर्षाचे असताना त्यांच्या वडिलांचे निधन झाले .त्यांचे पालन पोषण आई व चुलता यांनी केले. यशवंतरावाचे बंधू गणपतरावांनी यशवंतरावांच्या शिक्षणासाठी सर्वतोपरी मदत केली. ते बि .ए. एल .एल .बी .झाले. त्यांचा विवाह फलटण येथील रघुनाथराव मोरे कुटुंबातील वेणुताईशी झाला. त्यांनीविद्यार्थीदशेतच वृत्तपत्र वाचणे व नाटके पाहण्याचा छंद जोपासला होता.

लाहोर कटाशी जतींद्रनाथ यांचा संबंध नसताना देखील पाच वर्षात चार वेळा तुरुंगात टाकले त्यांना गुन्हेगारासारखी वागणूक दिली. त्यामुळे जतींद्रनाथ यांनी आमरण उपोषण केले.लाहोरच्या तुरुंगात जतींद्रनाथ त्याचा मृत्यू झाला त्याचा परिणाम यशवंतरावांच्या मनावर झाला. त्यांची मनोवृत्ती बदलली यशवंतरावांनी त्यांचे जीवन देश कार्याला समर्पित करण्याचे ठरविले. विद्यार्थी असताना वेगवेगळ्या चळवळीत यशवंतरावांनी भाग घेतला. महात्मा गांधी यांनी सुरू केलेल्या सविनय कायदेभंग चळवळीत भाग घेतला. त्यांना तुरुंगवास झाला.येरवडा विसापूर कारागृहात त्यांनी शिक्षा भोगली. 1942 छोडो भारत चळवळीत यशवंतराव सहभागी झाले. सातारा जिल्ह्यात प्रतिसरकारची स्थापना झाली या चळवळीच्या प्रारंभिक अवस्थेत यशवंतरावांनी भूमिगत राहून कार्य केले जास्त काळ भूमिगत न राहता

प्रगट होऊन त्यांनी कारावास पत्करला. सातारा जिल्ह्यातील भूमिगत नेत्यांपर्यंत निरोप पोहोचविण्याचे कार्य त्यांनी केले. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे आदेश भूमिगत नेत्यापर्यंत पोचवीत असल्याने ब्रिटिश पोलीस यशवंतरावांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न करीत होते.इसवी सन 1943 मध्ये यशवंतरावांना तुरुंगवास झाला. पत्नी आजारी असल्याने त्यांची जामिनावर सुटका झाली.घरची आर्थिक परिस्थिती खालावली त्यामुळे यशवंतरावांनी वकिली व्यवसाय सुरू केला.

**यशवंतरावांची राजकीय वाटचाल**

यशवंतरावांना राजकीय वारसा नव्हता.त्यांनी स्वप्रयत्नातुन राजकीय वाटचाल केली. स्वतंत्र महाराष्ट्राची प्रस्थापना होण्याआधीच त्यांनी आपली राजकीय पकड प्रभावीपणे बसवली होती. 1946 च्या निवडणुका पासून राजकीय वाटचाल सुरू झाली.1946 मध्ये झालेल्याविधानसभेच्या निवडणुकीत यशवंतराव दक्षिण सातारा विधानसभा मतदारसंघातून के .डी. पाटील, व्यंकटराव पवार, आणि बाबूराव गोखले यांच्यासह विजयी झाले.

1952 मध्ये मुंबई राज्यात झालेल्या विधानसभेच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये महाराष्ट्र काँग्रेसचे उमेदवार विजयी झाले. मोरारजी देसाई मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले. मोरारजी देसाईंनी यशवंतरावांना नागरी पुरवठा समाज कल्याण आणि वनखात्याचे राज्यमंत्री पद दिले. याच ठिकाणी यशवंतरावाचे प्रशासकीय कौशल्य विकसित झाले.

यशवंतराव चव्हाण मुंबई द्वैभाषिक राज्याचे मुख्यमंत्री झाले. मुंबई द्वैभाषिक राज्याचे मुख्यमंत्री पद प्राप्त करण्यामध्ये यशवंतरावांना वसंतराव नाईक यांनी साथ दिली. द्वैभाषिक राज्याचे मुख्यमंत्रीपद सांभाळताना यशवंतरावांना खलनायका सारखी टीका करण्यात आली. त्यांचा अपमान करण्यात आला. तरीही त्यांनी त्यांचा सुसंस्कृतपणा सोडला नाही. संयम मनाशी बाळगून महाराष्ट्रातील जनतेच्या भावना किती उग्र आहेत हे पंडित नेहरूला पटवून दिले. आणि स्वतंत्र महाराष्ट्राची निर्मिती करण्यामध्ये मोलाची भूमिका पार पाडली.

मराठी भाषिकांचे राज्य असावे अशी मागणी करणाऱ्या मध्ये यशवंतराव चव्हाण हे होते. स्वतंत्र महाराष्ट्राची स्थापना 1मे 1960 ला झाल्यानंतर महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांची नियुक्ती झाली. महाराष्ट्रहे सर्व मराठी जनतेचे राज्य असेल अशी ग्वाही त्यांनी दिली. यशवंतराव हे कुशल प्रशासक मुत्सद्दी व दूरदृष्टी असलेले नेते होते.1960 नंतर त्यांनी धूर्तपणे सत्तेच्या राजकारणातील डावपेच आखले.महाराष्ट्राचे भवितव्य घडवताना मला कर्तबगार सहकारी हवेत असे आवाहन यशवंतरावांनी केले. बहुजन समाजातील कर्तबगार व्यक्तींनी विरोधाचे राजकारण करण्याऐवजी सत्तेत सहभागी होऊन महाराष्ट्राचे हित साधावे असे स्पष्ट आवाहन यशवंतरावांनी केले होते. यशवंतराव चव्हाण हे निश्चयी, दूरदर्शी,निधर्मी,त्यागी नेते होते त्यांनी सचोटीने व धोरणीपणाने महाराष्ट्राला लागलेले ग्रहण सोडविले. महाराष्ट्राचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी यशवंतरावांनी वेगवेगळी धोरणे आखली महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी केली.

महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक विकासाच्या दृष्टिकोनातून शेती उद्योग क्षेत्राच्या विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. शेतकरी वर्गाच्या कल्याणासाठी नवे कृषी धोरण स्वीकारले. बहुजन समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकडे लक्ष वेधले ग्रामीण भागात शिक्षण व आरोग्याच्या सोयी पोहोचविण्यासाठी धोरणे राबवली .राज्याच्या विकासातील प्रादेशिक असमतोलाचा विचार करून पंचायत राज्य पद्धतीच्या विकासासाठी जिल्हा परिषदांची निर्मिती केली. प्रशासन भ्रष्टाचारमुक्त राहावे म्हणून मूलभूत स्वरूपाचे निर्णय घेतले. राजकीय नेते आणि कार्यकर्ते यांच्यात समन्वय साधला. दुर्बल

घटकांच्या विकासासाठी वेगवेगळ्या योजना हाती घेतल्या.साहित्य, संस्कृती,कला यांच्या संगोपन व संवर्धनासाठी अनेक नवनवीन योजनांना जन्म देऊन त्या राबविल्या वेगवेगळ्या योजना मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी शिक्षण सहकार कृषी उद्योगधंदे आणि संस्कृती इत्यादी क्षेत्रात राहून महाराष्ट्राची विकासाच्या दृष्टीने वाटचाल सुरू केली.

1962 मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले त्यावेळी नेहरुंनी आपल्या मदतीसाठी यशवंतरावांना केंद्रात बोलावले. 1962 मध्ये यशवंतरावांनी भारताचे संरक्षण मंत्री म्हणून शपथ घेतली.संरक्षण मंत्री असताना यशवंतराव चव्हाणांनी भारतीय सैन्यामध्ये आत्मविश्वास निर्माण केला.सैन्याचे आधुनिकीकरण केले आणि संरक्षण खात्यातील त्रुटी दूर करण्यावर यशवंतरावांनी भर दिला.

इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्यानंतर 1966 मध्ये यशवंतराव चव्हाण गृहमंत्री झाले.त्यानंतर त्यांनी 1970 मध्ये अर्थमंत्री म्हणून पदभार सांभाळला .1974 मध्ये परराष्ट्र मंत्री म्हणून पदभार सांभाळला.1977 मध्ये आणीबाणीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या निवडणुकीमध्ये यशवंतराव चव्हाण विजयी झाले. व लोकसभेत विरोधी पक्ष नेते म्हणून कार्य केले .1979 मध्ये चरण सिंग यांची पंतप्रधान म्हणून निवड झाली तर यशवंतराव यांनी उपपंतप्रधान झाले. 1980 मध्ये लोकसभेच्या मुदतपूर्व निवडणुका घेण्यात आल्या यशवंतराव सातारा लोकसभा मतदारसंघातून विजयी झालेसत्तेपासून मात्र ते दूर गेले.

यशवंतराव चव्हाण यांनी शरद पवार यांनी काढलेल्या नागपूर शेतकरी दिंडीत सहभागी झाले. त्यात त्यांना अटक झाली. पुढे त्यांची सुटकाही झाली. 1982 मध्ये काँग्रेसमध्ये पुन्हा प्रवेश केला आठव्या वित्त आयोगाचे ते अध्यक्ष बनले.1983 मध्ये त्यांची पत्नी वेणूताई यांचे निधन झाले. यशवंतराव एकाएकी पडले. दरम्यान इंदिरा गांधीची हत्या झाली. त्यानंतर राजीव गांधी पंतप्रधान झाले.यशवंतराव सारखा अनुभवी व्यक्तीची गरजहोती.25 नोव्हेंबर 1984 ला यशवंतरावांचे निधन झाले. यशवंतराव चव्हाणांनी ऋणानुबंध, भूमिका, विदेश दर्शन, कृष्णाकाठ इत्यादी पुस्तके लिहिली.यशवंतराव चव्हाण यांचे कार्य लक्षात घेता राजकीय कीर्तीची, स्वच्छ चारित्र्याचा, तळागाळातल्या विषयी अखंड आत्मीयता बाळगणारा सज्जन नेता म्हणून त्यांचा गौरव करावा लागेल, यशवंतराव चव्हाणांनी आपल्या व्यक्तिमत्त्वाची छाप भारताच्या व महाराष्ट्राच्या राजकारणावर सोडली,शेती उद्योग प्रधान महाराष्ट्र झाला पाहिजे अशी त्यांची तळमळ होती. आज त्यांचे स्वप्न साकार होताना दिसते.

**संदर्भसूची**

यशवंतराव चव्हाण- डॉ. गंगाधर वि. कायंदे पाटील.
युगंधर नेते यशवंतराव चव्हाण- बा.ह. कल्याणकर
यशवंतराव चव्हाण राजकारण आणि साहित्य-भास्कर लक्ष्मण भोळे
द युनिक ॅकॅडमी महाराष्ट्र वार्षिकी 2010- तुकाराम जाधव
आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास- प्राचार्य डॉ.एस.एस. गाठाळ.

# अष्टपैलु यशवंतराव चव्हाण

**प्रा. राहुल चोखाजी साळवे**

इतिहास विभाग प्रमुख तथा संचालक, महात्मा गांधी अध्ययन केंद्र,देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद.

मो.न.८८०५९३७७२४ इ-मेल-rc_salve@yahoo.com

आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण मराठी मातीतल्या अनेक सुपुत्रानी केलेली आहे. श्रेष्ठ भारतीय संस्कृतीचा, इतिहास आणि प्रगतीचा एक अविभाज्य भाग म्हणजे महाराष्ट्र होय. स्वातंत्रय चळवळीत महाराष्ट्राचे फार मोठे योगदान राहिलेले आहे. अशा या स्वातंत्र्य चळवळीच्या मुशीतून तयार झालेले एक प्रभावी व्यक्तिमत्व आणि नेतृत्व म्हणजे यशवंतराव चव्हाण होत. समाजवादी विचाराचा प्रभाव असणारे, लोकशाही मूल्यावर श्रध्दा असणारे यशवंतराव चव्हाण छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतीराव फुले, राजर्षी शाहू महाराज, महर्षी विठल शिंदे, महात्मा गांधी, कर्मवीर भाऊराव पाटील व डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा थोर व्यक्तिमत्वांच्या जीवनकार्य व विचारातून प्रेरणा घेवून विद्यार्थी अवस्थेतून अवघड अशा राजकीय क्षेत्रात प्रचंड असे कर्तत्व गाजवू शकले, स्वप्रयत्नाने. राष्ट्रीय नेते होऊ शकले ते स्वत:च्या व्यापक मानवतावादी, राष्ट्रवादी विचारांमूळे. पुरोगामी विचार व कार्यामूळे.

स्वातंत्र्यांनतरच्या पहिल्या दोन-तीन दशकात ज्यानी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, कृषी, सहकार, औद्योगिकीकरण आणि याचबरोबर साहित्य, संस्कती, कला, क्रिडा आणि संगीत अशा मानवी जीवनाच्या सर्व अंगाचा विकासाला स्पर्श करून त्याचा कायापालट करण्याचे कार्य दूरदृष्टी ठेवून समाजातील सर्वाधिक मागासलेल्या घटकाला विकासप्रवाहात आणण्याच्या कार्याला प्रारंभ करून नव्या महाराष्ट्र राज्याला पुरोगामी-प्रगतीशिल महाराष्ट्र राज्य अशी उपाधी मिळवून दिली आणि सर्व क्षेत्रातील विकासाचा पाया रचला. तेव्हापासून आजपर्यंत महाराष्ट्र राज्य त्यांनी दाखवून दिलेल्या मार्गावरूनच आपली वाटचाल करीत आहे. म्हणूनच आपण यशवंतराव चव्हाण यांना ''आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार'' म्हणून आदराने संबोधतो.

१९५६ मध्ये पंडित जवाहरलाल नेहरू यांनी द्विभाषिक मुंबई राजयाचा प्रयोग केला आणि यशवंतराव चव्हाण यांना मुख्यमंत्रीपदी विराजमान होण्याची संधी मिळाली. हे पद त्यांनी अतिशय कुशलतेने मिळविले व ते सांभाळले. देशात भाषावार प्रांतरचनेचे वारे वाहत होते. त्याला मराठी भाषिक जनता अपवाद कशी काय राहिल? म्हणून त्या काळात संपूर्ण मराठी भाषिकांचे एक राज्य व्हावे म्हणून द्विभाषिक राज्याला विरोध आणि मुंबईसह विदर्भ, खानदेश, कोकण, पश्चिम महाराष्ट्र या विभागाचे छत्रपती शिवरायांचे प्रेरणा असणारे महाराष्ट्र राज्य व्हावे अशी तमाम मराठी भाषिक जनतचे तीव्र इच्छ ा होती. आणि त्यासाठी संयूक्त महाराष्ट्र चळवळीचे आंदोलन सुरु झाले. कॉंग्रेस सोडून इतर सर्व राजकीय पक्ष एकत्र आले, अशा या कठीण काळात यशवंतराव चव्हाण यांच्यासारखे अत्यंत संयमी, दूरदष्टी, कुशल नेतृत्व लाभल्यामूळेच पंडित नेहरू, श्रीमती इंदिरा गांधी आणि कॉंग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाला मराठी भाषिकांचा न्याय हक्क देण्यास भाग पाडून १ मे १९६० या दिवशी नव्या महाराष्ट्र राज्याची निर्मिती करण्यात त्यांना यश मिळविता आले.

महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा प्रारंभ त्यांनी शिक्षण प्रसाराच्या कार्यापासून केला. साधने कमी असतांनाही निर्माण करणाऱ्या हातांना त्यांनी बळ दिले. कारण शिक्षणप्रसाराची व समाजसूधारणेची महात्मा फुल्यापासून सुरु झालेली परंपरा त्यांना माहित होती आणि ते स्वत: कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यासोबत रयत शिक्षण संस्थेत कार्यही करीत होते. म्हणून प्राथमिक ते विद्यापीठीय शिक्षणापर्यंत इबीसी सवलत त्यांनी सुरु केली आणि त्यामूळे महाराष्ट्रातील शेतकरी, शेतमजूर, सामान्य माणूस तसेच मागासवर्गीयासाठी शैक्षणिक सवलती, शिष्यवृत्ती सुरु केल्यामूळे शिक्षणाद्वारे प्रगतीची द्वारे सर्वांसाठी खुली झाली.

महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यांनतर हे 'राज्य मराठी माणसाचे होणार की मराठा माणसाचे होणार'? असा प्रश्न माडखोलकरांनी यशवंतराव चव्हाण यांच्यासमोर उपस्थित केला तेव्हा यशवंतरावाच्या भाषेत भंगलेल्या मनाची ती परिणती होती. माडखोलकरांचा हा प्रश्न यशवंतरावांनी अतिशय गांभीर्याने घेतला व त्यांचे अगदी समर्पक व तेवढेच सडेतोड उत्तर दिले. त्यांच्याच शब्दांत ''जोपर्यंत माझ्या हातात महाराष्ट्राच्या सत्तेची सूत्रे असतील, तोपर्यंत तरी निदान मी हे राज्य एका जातीचे, मराठयांचे किंवा आणखी एखाद्या जातीपातींचे होऊ देणार नाही व तसे होत आहे, असे वाटले तर महाराष्ट्राच्या कल्याणाकरिता मराठा जातीत जन्माला आलो आहे महणून मला कदाचित एका बाजूला हटावे लागले तरी मी हटण्याचा प्रयत्न करीन, परंतु ही गोष्ट कदापीही होऊ देणार नाही.'' यशवंतरावांचे हे प्रतिपादन त्यांच्या सत्याग्रही समाजवादी वृत्तीचे द्योतक समजले पाहिजे.

खेडयातील प्रत्येक माणूस हा स्वत:च्या श्रमाचा मालक झाला पाहिजे हे त्यांच्या नवसमाजरचनेच्या संकल्पनेतील प्रमुख सुत्र होते. त्यासाठी लोकशाही निष्ठेचा स्विकार करून त्यानी महाराष्ट्राच्या विकासाची वाटचाल निश्चित केली होती. १९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले आणि नेहरूनी यशवंतराव चव्हाणांना संरक्षणमंत्री म्हणून दिल्लीला बोलावले. हे कार्य त्यांनी अतिशय कार्यक्षमतेने व आत्मविश्वासाने सांभाळले. देशाचे मानसिक धैय त्यांनी वाढविले. हिमालयाच्या मदतीला सहयाद्री धावून गेला असे या घटनेचे वर्णन केले गेले. तसेच मराठी भाषा व साहित्याचा विकासाचाही ध्यास त्यांनी घेतला होता. राज्य मराठी साहित्य-संस्कृती मंडळाची स्थापना त्यांनीच केली. विश्वकोष निर्मितीचे कार्य त्यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यावर सोपविले. सहकार चळवळीला बळ दिले. जिल्हा परिषदांच्या विकेंद्रीकरणाची प्रकिया त्यांनी बळकट केली. लोकशाही गावपातळीवर पोचवण्याचा तो प्रयोग होता. त्यामूळे ग्रामीण भागातून नेतृत्व उभे राहीले. यशवंतराव चव्हाण नेते घडविण्याचे काम अतिशय कौशल्याने करीत होते. उदाहरण म्हणून शरद पवारांचे नाव घेता येईल.

मराठवाडयात मराठवाडा विद्यापीठ स्थापन करण्यात त्यांचा प्रमुख सहभाग होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या हयातीत महार वतन नष्ट झाले नाही पण ते नष्ट करण्याच खर कार्य यशवंतराव चव्हाण यांनी केले. महार वंतन नष्ट करण्यामूळे शासनावर त्याकाळी १ कोटी ८ लाखांचा खर्च येणार होता. त्यावर यशवंतराव चव्हाण सांगितल हा प्रश्न पैशाचा नाही तर मानवी मूल्यांचा आहे. त्यासाठी समाज जीवनावरचा डाग पूसणे गरजेचे आहे. पैशापेक्षा मानवता नि मूल्यं महत्वाची आहेत. कै. यशवंतराव चव्हाण यांच दलितोध्दाराचे दूसरे कार्य म्हणजे १९५६ नंतर महाराष्ट्रातील पूर्वाश्रमीच्या महार समाजानं डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली बौध्द धम्माचा स्विकार केला. त्यामूळे केंद्र सरकारनं या दलितांना सवलती नाकारल्या. परंतू कै. यशवंतराव चव्हाणांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यानंतर महाराष्ट्र राज्याच्या पातळीवर स्वत:च्या हिमतीवर निर्णय घेवून महाराष्ट्रातील सर्व बौध्दजनं ना मागासलेल्या वर्गाच्या सर्व सवलती पुढाकार घेवून सामाजिक न्यायाच्या भूमिकेन दिल्या.

यशवंतराव चव्हाण हे राजकारणी असले तरी ते थोर साहित्यीक होते. त्यांनी विविध विषयांवर असणाऱ्या ११४ ग्रंथांना प्रस्तावना लिहून आपले साहित्यीक विचार व्यक्त केले आहेत. त्याशिवाय १४ ग्रंथ त्यांनी लिहीले आहेत. त्यामधील त्यांचे आत्मचरित्र कृष्णाकाठ भाग-१ सहयाद्रीचे वारे, युगांतर, ऋणानुबंध, विरंगूळा ही पूस्तके खूपच गाजली आहेत.

यशवंतरावानी जाणीवपूर्वक सहकार चळवळीला उर्जितावस्था दिली. राजकारणात सक्रीय असणाऱ्या नेत्या-कार्यकर्त्यांना सहकार चळवळ हे एक महत्वाचे माध्यम प्राप्त झाले. परिणामी सहकारी साखर कारखान्यांची संख्या महाराष्ट्रात वाढत गेली. त्याचबरोबर ग्रामीण भागात इतरही अनेक सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्या. खते, बी-बियाणे वाटप संस्था, विपणन संस्था या उभ्या राहिल्या. या सहकारी संस्थापूढे ज्या समस्या होत्या त्या तुटपूंजे अर्थसाहय, नोकरशाहीची मनमानी, अत्यल्प लाभ व इतर अनेक अडचणी यशवंतरावांनी सोडवण्याचा प्रयत्न केला. पूढील काळात सहकारी कारखान्यांचे जाळे संबंध महाराष्ट्रभर पसरले. या सहकारी चळवळीचा पाया यशवंतरावाच्या दूरदृष्टीने नेतृत्वाने घातला हे कुणालाही अमान्य करता येणार नाही.

लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाचे स्थान सत्ताउभारणीच्या कार्यात महत्वाचे असते म्हणून कोणत्याही धोरणाची आखणी करतांना मतभेद असू शकतात, परंतू मतभेद म्हणजे शत्रूत्व नव्हे अशी त्यांची प्रांजळ भूमिका होती. त्यामूळे तीन दशकाहून अधिक काळ सत्तेतील विविध पदे उपभोगतांना त्याचा वापर करतांना त्यांच्या विधायक सुचनांचे स्वागतच केले. तसेच विरोधी पक्षनेते म्हणून वावरत असतांना यशवंतरावांनी सरकारच्या परराष्ट्र धोरणाची वेळप्रंसगी प्रशंसा करतांना संकोच वाटू दिला नाही. आपल्या अनूभवांचे बोल विरोधी पक्षामंध्ये राहूनही स्पष्टपणे सुचवले म्हणजे राष्ट्रहितापूढे पक्षीय स्वार्थ बाजूला ठेवून निकोप लोकशाहीची तत्वे प्रत्यक्षात आणली. म्हणूनच आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत त्यांचा वाटा मोठा आहे कारण ते शासनप्रमुख नव्हे तर नवव्यवस्थेचेही निर्मातेही होते.

संदर्भ ग्रंथ यादी

१. यशवंतराव चव्हाण व्यक्ती आणि कार्य, लेखक बाबर कृ, भ, प्रकाशक ठोकळ प्रकाशन, मुंबई, १९६०
२. यशवंतराव चव्हाण : एक दर्शन, लेखक कानेटकर मा.ज, प्रकाशन नागपूर सेक्रेटरी श्री. यशवंतराव चव्हाण वर्षगाठ सत्कार समिती, नगर कॉग्रेस कार्यालय, रांका भूवन, नागपूर, १२ मार्च १९६१.
३. लोकमानसातील यशवंतराव, संपादक रा.गो. प्रभूणे, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पूणे, १९८५.
४.यशंवतराव: इतिहासाचे एक पान, लेखक रामभाऊ जोशी, पूणे, केसरी प्रकाशन, १९७६.

# आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतराव चव्हाण यांचे शेती,उद्योग व शिक्षणातील योगदान

शिवाजी काशीनाथ गायकवाड
इतिहास संशोधक विद्यार्थी ,इतिहास विभाग,डॉ.बा.आ.म.वि.औरंगाबाद .
shivaji.gaikwad32@gmail.comमो.न. 9960151470

**प्रस्तावनाः**

भारत देशाला विशाल असा भूप्रदेश लाभलेला आहे.त्यातील महाराष्ट्र ज्य या नावाला प्राचीन असा वारसा आहे. काही नवनिर्माण करायचे असेल तर त्याची परंपरा लक्षात घेतल्या जाते.महाराष्ट्राला आतापर्यंत अनेक,संत,महंत,ऋषी,विचारवंत,तत्ववेत्ते,सामाजिक सूधारक यांच्या विचाराची परंपरा लाभलेली आहे.अशा संत महंताची विचार प्रबोधनातून नव सामाजिक परिवर्तनाची दिशा मिळत असते.सामान्य माणसांच्या सर्वांगीन उन्नतिसाठी नेतृत्व गूण विकसीत झालेले द्रष्टेपण ,असणारे सर्वस्पर्शी माणसे काही नवनिर्मायकतेसाठी झटत आसतात.समाजोद्धारासाठी आपले सर्वस्वी हयात घालवतात व देशाच्या ,राष्ट्रांच्या जडणघडणीत आपली छाप सोडत असतात.अशीच छाप महाराष्ट्रातील यशवंतराव चव्हाणांनी महाराष्ट्राच्या राजकीय,सामाजिक,शैक्षणिक ,कृषीविषयक,सांस्कृतिक ,आरोग्य ,साहित्य ,संरक्षण ,सहकार,क्रीडा,आंरराष्ट्रीय संबंध यावर असलेलीछाप सोडल्याचे दिसून येते.

केवळ मंत्रिमंडळात स्थान मिळाले,नेते पद मिळाले,नेतृत्व करण्याची संधी मिळाली म्हनून केवळ विकासाच्या गप्पा मारायच्या नी राजकीय उपभोग घेत मिरवायचे अशा वृत्तीने महाराष्ट्र किंवा देशाचे भले होईल अशी विचारसरणी बाळगून असणारे कीती जण भेटतील ,परंतु यशवंतरावांना महाराष्ट्राच्या जडणघडणीतले शिल्पकार का म्हणतात ? असे कोणते कार्य त्यांनी करुन दाखवले? त्यांनी केलेल्या कार्यामूळे कूणाचे भले झाले? त्यांनीच महाराष्ट्र घडवला का ? या नी अशा कितीतरी प्राश्नांची उत्तरे आपल्याला हवी आसतात.या प्रश्नांचा सखोलपणे धूंडाळा घेतला तर आपल्या लक्षात येईल की,यशवंतराव चव्हाण या नावामागे कूठलीही जन्मजात अथवा त्यांच्या घराण्यात राजकीय वारसा नसतांना तेच पूढे महाराष्ट्राचे व देशाचे भाग्य विधाते ठरतात .असे कोणते गूण त्यांच्यात होते याचा संशोधनदृष्ट्या विचार केला तर आपल्या लक्षात येते की,यशवंतरावांमधे देशाला,महाराष्ट्राला पूढे घेवून जाण्यास केवळ कल्पना करणे,आश्वासने देणे,चर्चाकरत बसणे,केवळ विकासाच्या गप्पा मारणे असे नाही. तर अशा निर्मात्याच्या अंगात बालपणापासूनच काही निर्मायक करुन दाखवण्याची अभिलाषा,प्रचंड मेहनत घेण्याची तयारी,लोकसंबध,जिद्द चिकाटी,प्रमाणिकपणा,निष्ठा आदि गूणांचा सम्मुचय ठायी असावा लागतो तो गुणांचा समुचय यशवंतरावांमधे होता म्हनून यशवंतराव हे महाराष्ट्राच्या जडणघडणीत आपले योगदान देवू शकले.

महाराष्ट्राची एकता,अंखडता,कृषी,सूप्राशासन,औद्योगिक विकास,सहकार,संरक्षण,रोजगार,शैक्षणिक ,सामाजिक,आर्थिक,सिंचन,पाटबंधारे,जलाशयनिर्मिती,आंतरराष्ट्रीय संबध,पूरोगामी विचारसरणी, कार्यतत्परता, यासारख्या राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय स्तरावर विकसनशील देशाच्या हितासाठी ,जनसामान्यांच्या हक्कासाठी केलेले कार्य त्यांच्या कर्तृत्वाची उंची दाखवते.महाराष्ट्र व पूढे देशाच्या पातळीवर एखाद्या व्यक्तीचा जेव्हा आपण विचार करु लागतो तेव्हा आपल्या लक्षात येते की,ज्या ज्या व्यक्तींनी आपल्या जीवन कार्याला सूरुवात केली. तेव्हा बालपणापासून ते जीवनाला यशस्वीतेकडे घेवून जाण्यापर्यंत, संघर्षमय जीवनातिल आव्हांनाना स्वीकारत

अनूभव काहींच्या वाट्याला येतात. त्यापैकी यशवंतराव चव्हाण यांचे नाव आपल्याला घ्यावे लागते. लहानपणापासूनच आपल्या कौटूंबिक जीवनात त्यांना एका गावाहून दूसरया गावाला स्थलांतर करत राहावे लागले होते.म्हनून जीवनात सतत संघर्ष,आव्हानं स्वीकारने,समाजातली माणसं वाचणे,सामान्य लोकांच्यात व सार्वजनिक कार्यक्रमातून जवळीकता निर्माण करणे असे कितीतरी अनूभव यशवंतरावांच्या जीवनाशी निगडीत होते असे लक्षात येते.सामान्याचे जीवन व समस्यांना त्यांनी जवळून अनूभवले आहेत.असे दिसून येते.

**संशोधनाची उद्दिष्ट्येः**

१) यशवंतराव चव्हाण हे सामान्यांचे हित जोपसणारे होते या व्यक्तीमत्वाचा आढावा घेणे.

२)उत्कृष्ट प्रशासक व कार्यक्षम मंत्री म्हनून कार्यरत होते.

३)केवळ शेतीवरच अवलंबून न राहता शेतीपूरक व्यवसाय निर्मितीकडे वळले पाहीजे या दृष्टीकोनाचा अभ्यास करणे.

४) सामाजिक विकासातले योगदान व उद्योग बाबतचा दृष्टीकोन याचा अभ्यास करणे,

५) शिक्षणा संबधी असलेल्या विकासात्मक पैलूंचा थोडक्यात अभ्यास करणे.या उपरोक्त उद्देशावर यशवंतराव चव्हाण यांचे महाराष्ट्राच्या जडणघडणीतले योगदान या उद्देशावर अभ्यास असणार आहे.

गृहितकेः महाराष्ट्राच्या जडणघडणीत यशवंतराव चव्हाण यांचे शेती,उद्योग,शिक्षणात योगदान आहे.

संशोधन पद्धतिः वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतिचा अवलंब करण्यात आला आहे .

तथ्य संकलनः द्वितीय साधनांच्या आधारे,इंटरनेट,गूगल,वर्तमानपत्रे आग्रलेख,संदर्भ ग्रंथाचा उपयोग करुन अभ्यास करण्यात आला.

यशवंतरावांच्या जडणघडणीची सूरुवात शाळेत केलेल्या भाषणातून त्यांना प्रोत्साहन मिळाले होते.तेव्हापासून त्यांनी मागे वळून न पाहता सतत सामान्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देत लोकमान्यता मिळवली व आपल्या राजकीय कारकीर्दिला सूरूवात केलेली होती.म्हनून पूढे महाराष्ट्र राज्याच्या राजकीय कारकीर्दीत अनेक आव्हाने समोर असतांना देखिल ते महाराष्ट्राच्या व देशाच्या राजकारणात यशस्वीपणे धूरा सांभाळणारे होते.असे दिसून येते.

ज्या प्रदेशाची,प्रजा,प्रशासन आणि नेतृत्व सार्वभौम नसेल तर "राज्य" ही संकल्पना निर्माण होवू शकत नाही.म्हनून मानवाच्या सुखी जीवनासाठी राज्य या संकल्पनेची आवश्यकता असते.अन्यथा समाजात सर्वबाबतित अराजकतेची स्थिती निर्माण होत असते.

हिंसेला खतपाणी मिळते.समाजात संघर्ष ,नीती अनीति आदि समस्या आवासून तयार असतात.यासाठी सार्वभौम क्षमता विकसित करणाऱ्या नेतृत्वाची समाजाला आवश्यकता असते. तसे नेतृत्व यशवंतरावात नांदत होते असे दिसून येते.आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण करण्यासाठी महाराष्ट्रातील अनेक सूपूत्रांनी,भूमिपूत्रांनी आपल्या हाडाची काड केली.विविध परंपरानी नटलेल्या महाराष्ट्रातीला चळवळी,संस्कृती,परंपरा, मूल्यांवर श्रद्धा ,एकनिष्ठा आणि नेतृत्वावर विश्वास ठेवून महाराष्ट्र उभारणीला अग्रक्रम यशवंतरावांच्या माध्यमातून झालेला लक्षात येतो.प्रजा,प्रदेश,प्रशासन,प्रभुत्व प्रमाणभूत मानतात सामान्यातिल सामान्यांना त्यांचे हक्क कर्तव्याची जाण करुन दिली. विकेंद्रीकरणाचे महत्त्व लक्षात घेवून पंचायतराज धोरणाची महाराष्ट्र व पूढे देशातील विविध ठिकाणी अंमलबजावणी केली. उद्योग,शेती आणि शिक्षण याद्वारे व महाराष्ट्रात पंचवार्षिक योजनांतून विकास साधण्याकडे अधीक भर दिलेला होता असे दिसून येते.

पंचवार्षिक योजना आणि त्यातील प्राधान्यक्रम ठरवत असताना राष्ट्रविकासासाठी सामाजिक,आर्थिक,राजकीय,आरोग्यविषयक उद्दिष्ट्ये समोर ठेवून कार्यभाग साधणे याला प्राधान्य देतांना आढळतात.यशवंतराव हे धोरणात्मक निर्णय घेणारे द्रष्टे लोकनेते होते.(१) राजकारणापेक्षा त्यांनी सर्वसामान्य

व सार्वजनिक समाजकारणावर भर दिलेला होता हे दिसून येते. विकासाभिमुख प्रशासन व्यवस्था निर्माण करणारा ,महाराष्ट्राची आर्थिक नाळ ओळखून व्यवस्थापन व नियोजन करणारे होते हे समजते.यशवंतरावांवर,छत्रपती शिवाजी महाराज व राजर्षी शाहू महाराज,पंडीत जवाहरलाल नेहरु यांच्या विचाराची छाप होती असे दिसून येते.कारण महाराजांनी त्यांच्या राजकीय काळात कोल्हापूर संस्थानात राबविलेल्या प्लेग रोगाच्या साथीत जे आरोग्यविषयक कौशल्य व आरोग्य साधनांचा उपयोग करुन साथरोग आटोक्यात आणलेली होती. तो विचार आजच्या काळातही प्रासंगिक वाटतो.(२) तसे कार्य व धोरण यशवंतरावांनी महाराष्ट्रात सहा वर्षीय कार्यकालात राबवलेले दिसून येते .त्यांच्या धोरणाचा अभ्यास व अंमलबजावणी करुन सद्यःस्थितीत महाराष्ट्र शासनाने कोरोणा सारख्या महामारीत काळजी घ्यायला हवी होती. आज रुग्ण कोरोणा महामारीत मरण पावली तशी परीस्थिती महाराष्ट्रात निर्माण झाली नसती असे वाटते.यावर शास्त्रीय मार्गाने आरोग्य क्षेत्रात संशोधन होने गरजेचे वाटते.

मानवाच्या पाच मूलभूत गरजा महत्वाच्या अतसतात त्यात अन्न,वस्त्र,निवारा,शिक्षण आणि आरोग्य होय.आजच्या स्थितीतही सर्वसामान्य लोकांच्या आरोग्य सेवेच्या बाबतीत निराशा दिसून येते.आजही सर्वसामान्य लोक खेड्यात व शहरातूनही राहतात. त्यांच्यापर्यंत आरोग्य जागृती अथवा त्यांना वेळेवर उपचार मिळू शकत नाही त्याला अनेक कारणे आहेत.दारिद्र्य,गरिबी,रोजगार न मिळणे,औषधांच्या किमती सर्वसामान्यांच्या कमाईच्या पलीकडे असणे ,प्रचंड प्रमाणातील महागाई,बेकारी, उपचारासाठी रुग्णालयातून प्रशिक्षित मनुष्यबळाचा अभाव व रुग्णालयातील अपूरे मनुष्यबळ,साधनं,रिक्त पदे आणि पदे भरण्यासाठीची राजकीय उदासीनता होय.यामूळे आरोग्य क्षेत्रातील बाबींवर संसर्गजन्य आजार व्हायरोलॉजी सारख्या विषयावर अभ्यास आणि उपचाराच्या साधनांची निर्मिती काळाची गरज आहे असे वाटते.यशवंतरावांनी आपल्या मंत्री मंडळात असताना विधान परीषदेत आरोग्य विषयावरील केलेल्या भाषणातून दिसून येतो.ते म्हणतात की,आरोग्याच्या बाबतीत सर्वसामान्य लोकांना नेहमी सर्दि,पडसे असे छोटे मोठे आजार कायम असतात.त्यावरील औषधे जरी स्वस्त केलीत तरीही आपण आरोग्याच्या बाबतीत बरेच काही मिळवले असे म्हणता येईल.यासाठी औषधी निर्मितीकडे केवळ व्यवसाय म्हनून न पाहता त्यातिल सर्वसामान्यांचा विचार करून सामाजिक आशय लक्षात घेणे महत्त्वाचे आहे असे औषधी कंपन्यांना सूचवताना दिसून येतात.(३)

**शेतीः**

यशवंतराव चव्हाण यांच्या काळात कृषी विकासाच्या बाबतीत विचार करता असे आढळते की,देशात अन्नधान्याचे उत्पादन ५० मिलीयन टन होते .हरीतक्रांतीच्या दरम्यान ते १०० मिलीयन टन झालेले होते (४) शेतीच्या बाबतीत योग्य वेळ साधून जरासाही विलंब न करता महत्वपूर्ण निर्णय घेतल्यामूळे शेतीचे उत्पन्न वाढलेले होते.परीणामी देशाच्या व राज्याच्या अर्थकारणात महत्वपूर्ण बदल घडून आलेले होते असे समजते.दूरदृष्टी ठेवून निर्णय घेण्याच्या तत्वामूळे यशवंतरावांमधील कृषीबाबत येथे द्रेष्टेपणा सिद्ध होतो. सद्यःस्थितीचा विचार करता आपल्या लक्षात येईल की, शेती उत्पादनात १९५० नंतर चौपटीने वाढ झालेली दिसून येते.नंतरच्या काळात याबाबत राष्ट्रीय शेतकरी आयोगाचे माजी सदस्य डॉ.रमाकांत पितळेंच्या 'रिच अॅग्रीकल्चर अॅण्ड प्युअर फार्मर' या पूस्तकात दिलेल्या आकडेवारीनुसार १९९१ मधे शेतकरयांचे दरडोई उत्पन्न ३८०२ रु.पै.होते.(म्हणजेच महिला ३१६ रु.) १२ वर्षानंतर म्हणजे २००२-२००३ चे उत्पन्न ३७३० रु.पर्यंत खाली आहे.(महिना ३११ रु.) याचाच अर्थ एका बाजूला उत्पादनात वाढ होत गेली पण शेतकरयांचे उत्पन्न मात्र वाढले नाही उलट ते कमी होत गेले.असे दिसून येते .एकूणच शेतीचा विकासदर कमी होणे,शेतकरयांच्या दरडोई उत्पन्नात घट होणे,शेतीत होणारी भांडवली गूंतवणूक प्रत्येक पंचवार्षिक योजनेत कमी कमी होत जाणे शेती उत्पादनाला येणाऱ्या खर्चापेक्षा कायम कमी किंमत देणे अभिजनाची शेतकरी विरोधी मानसिकता आणि

शेतकरी विरोधी धोरणे इत्यादी सर्व गोष्टीचा एकत्रित परिणाम शेतकरयांच्या वाढत्या आत्महत्यास कारणीभूत ठरल्या गेला.या उतार्‌यात कृषी विचारांच्या बाबत शासकीय पातळीवर घेण्यात आलेले निर्णय व त्याचे परीणाम हे समजणे गरजेचे वाटते.

**उद्योगः**

उद्योगाच्या बाबतीत विचार करता असे म्हणता येईल की,देशाची व राज्याची आर्थिक स्थिती सूधारायचि असेल तर शेती बरोबरच उद्योग व्यावसायाला चालना व जोडधंदा करणे क्रमप्राप्त ठरते.त्यामुळे उद्योगातून चलनवलन व उत्पादन वाढते आणि खेळते भांडवल हाताशी राहते.म्हनून यशवंत रावांनी एम.आय.डी.सी. सारखे औद्योगिक प्रकल्पांना मंजूरी देवून राज्यातील विविध भागात उद्योगनगरी स्थापण केल्या व त्या परीसरातिल सामान्य नागरीकांना ,तरुणांना रोजगाराच्या संधी निर्मान करुन त्यांचे नागरी ,वैयक्तिक जीवनमान उंचावले.व शहराकडे येणारा तरुणांचा ओढा खेड्यातच थांबवला.(५) शेतीला जोडधंदा देवून कूकूट पालन,गायपालन,कोंबडीपालन,आदि व्यवसाय ठरवून देत त्या व्यवसायासाठी प्रशासकीय पातळीवरुन आनूदान देण्याची तरतूद करण्यात आली होती. असे दिसून येते.

**शिक्षणः**

कोल्हापूर व औरंगाबाद या ठीकाणी विद्यापीठ तर राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी कृषी विद्यापीठ स्थापणा करण्यात येवून शिक्षणाची ज्ञानगंगोत्री पोहचवली.त्यामुळे शेतकर्‌यांची मूले केवळ पारंपारिक शेतीवर अवलंबून न राहता उद्योग ,व्यवसाय व उत्तम तंत्रज्ञानाचा वापर करुन आधूनिक पद्धतिची शेती करावी ,शिक्षण घेवून शहाणे बनावे(६) हा उद्देश यशवंतरावांचा यामागे होता असे लक्षात येते.साहित्य निर्मिती व संशोधना च्या माध्यमातून नवनवीन यंत्र ,तंत्र विकसित करण्यावर भर द्यावा हा शिक्षणाची ज्ञान गंगोत्री आणण्या पाठीमागचा हेतू स्पष्ट होतो.पूढे मराठी साहित्य संस्कृती महामंडळ व विश्वकोष मंडळ स्थापण करुन साहित्य निर्मितीला प्राधान्य दिलेले होते हे लक्षात येते.

**निष्कर्षः**

१)आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण करण्यासाठी महाराष्ट्रातील विविध परंपरानी नटलेल्या महाराष्ट्रात चळवळी,संस्कृती,परंपरा,क्रांती, लोक लढ्यांचा इतिहास आहे.यशवंतरावांना कूठलीही राजकीय पार्श्वभूमि नसतांना केवळ स्वतःमधील गूणांच्या आधारे देशाचे व महाराष्ट्राचे नेतृत्व करण्याची संधी मिळालेली होती.

२)देशाच्या लोकशाही मूल्यांवर श्रद्धा ,एकनिष्ठा आणि नेतृत्वावर विश्वास ठेवून महाराष्ट्र उभारणीला अग्रक्रम यशवंतरावांच्या माध्यमातून झालेला लक्षात येतो.प्रजा,प्रदेश,प्रशासन,प्रभुत्व प्रमाणभूत मानतात सामान्यातिल सामान्यांना त्यांचे हक्क कर्तव्याची जाण करुन दिली.

३) सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे महत्त्व लक्षात घेवून पंचायतराज धोरणाची महाराष्ट्र व पूढे देशातील विविध ठिकाणी अंमलबजावणी केलेली दिसून येते व. उद्योग,शेती आणि शिक्षण याद्वारे महाराष्ट्रात पंचवार्षिक योजनां आखून विकास साधण्याकडे अधीक भर दिलेला होता असे दिसून येते.

४)पंचवार्षिक योजना आणि त्यातील प्राधान्यक्रम ठरवत असताना राष्ट्र विकासासाठी सामाजिक,आर्थिक,राजकीय,आरोग्यविषयक उद्दिष्ट्ये समोर ठेवून कार्यभाग साधणे याला प्राधान्य देतांना आढळतात.

५) राजकारणाला जनसेवेचे साधन मानून सामान्य माणसाचे हित समोर ठेवून सतत कृतिशीलपणे कार्यतत्पर होते.

६) महाराष्ट्र व देशाचे आर्थकारणाला औद्योगीकरण ,शेती,शिक्षण यातून चालना दिलेली होती.

**संदर्भ :**

१.पाटील,प्रतिभा वआरगडे,अंबादास.,यूगपूरुष यशवंतराव चव्हाण,एज्यूकेशनल पब्लीशर्स,औरंगाबाद .पृष्ठ

२. दि.२४/४/२०२१ रोजी आयोजित मराठवाडा इतिहास परीषद राष्ट्रीय चर्चा सत्रातिल पेपर वाचन, मूंढे,सविता ,जालना. यांचे संशोधन पेपर वाचन

३.पाटील,प्रतिभा व आरगडे,अंबादास.,यूगपूरुष यशवंतराव चव्हाण,एज्यूकेशनल पब्लीशर्स,औरंगाबाद .पृष्ठ ३५४.

४.वानखेडे, चंद्रकांत., महाराष्ट्र राज्य सूवर्ण महोत्सव सिंहावलोकन परीषद व संशोधन प्रकल्प,मराठवाडा परीषद, जूलै औरंगाबाद .,जूलै २०१०.पृष्ठ-२२.

५. wikiwand.com,2:10 am.26/4/2021

६.उपरोक्त .wikiwand.com,2:20 am.26/4/2021

 ISSN : 2278-9308
March, 2021

# यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक व सामाजिक विचार व कार्य

प्रा. बालाजी रावसाहेब बोडके
इतिहास विभागप्रमुख,सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव, जि.बीड.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र हा पुरोगामी म्हणून ओळखला जातो तो येथील लाभलेल्या समृद्ध परंपरेमुळे महाराष्ट्राला जी राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी लाभली ती भारताच्या इतर भागापेक्षा तुलनेने जास्तीचे होती.संत ज्ञानेश्वर ,संत तुकाराम ,महात्मा फुले , शाहू महाराज ,भाऊराव पाटील, गाडगेबाबा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या परंपरेतील सृजनशील विचार आणि परंपरा यांची सांगड घालून कृतिशील कार्य करणारे यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील दूरदृष्टीचे नेते व कार्यकर्ते होते. यशवंतराव चव्हाणांचा उदय हा राष्ट्रीय चळवळीतून निर्माण झालेले प्रतिबिंब होते हे त्यांच्या विचार व कार्यातून दिसून येते. यशवंतराव चव्हाणांनी सामाजिक,राजकीय ,आर्थिक, सांस्कृतिक व सुरक्षा इत्यादी स्वतःविषयी राष्ट्रीय विचार मांडले व त्या क्षेत्रात मोलाचे कार्य केले त्यामुळेच आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून ओळखले जाते एवढेच नव्हे तर आधुनिक भारताच्या विकासात मोलाचे योगदान दिले म्हणून ते विकासाच्या परंपरेतील एक पाईक म्हणून ओळखले जातात.

प्रस्तुत शोधनिबंधात राष्ट्रीय इमारत तयार करण्यासाठी ज्या विचार व कार्याची आवश्यकता लागते ते कार्य यशवंतराव चव्हाण यांनी केले म्हणून प्रस्तुत शोध निबंधात त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक विचार आणि कार्याचा आढावा घेतलेला आहे.

संशोधनाची गृहितके :-

१) यशवंतराव चव्हाण यांचे विचार व कार्य राष्ट्राभिमुख होते.
२) यशवंतराव चव्हाण यांनी विविध क्षेत्रात मोलाचे योगदान दिले.
३) यशवंतराव चव्हाण यांचे कार्य सर्वांसाठी होते .

संशोधनाची उद्दिष्टे :-

१) यशवंतराव चव्हाण यांच्या राष्ट्रीय विचार व कार्याची कार्याची ओळख करून देणे.
२)यशवंतराव चव्हाण यांनी विविध क्षेत्रात दिलेले योगदान स्पष्ट करणे .
३)यशवंतराव चव्हाणांनी सर्वांसाठी केलेल्या कार्याचा आढावा घेणे.

प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला असून प्रस्तुत शोधनिबंधात साठी प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा उपयोग केला आहे. यामध्ये विविध संदर्भ ग्रंथ ,पुस्तके ,इंटरनेट व वर्तमानपत्रे इत्यादीचा वापर करून माहितीचे संकलन करण्यात आले आहे .

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात ब्रिटिश राज्यकर्ते आणि भारतीय जनता यांच्या परस्पर हितसंबंधाच्या संघर्षातून सतत लढा सुरू राहिला पहिले महायुद्ध,होमरुल लिग, रोलेट कायदे, रशियन राज्यक्रांती, गांधीजींचा उदय आणि त्यांच्या नेतृत्वातुन उदयाला आलेली राष्ट्रीय चळवळ या सर्व घटकांचा प्रभाव यशवंतराव चव्हाण यांच्यावर पडलेला होता. ते म्हणतात स्वातंत्र्याचा शोध हाच खरा सत्याचा शोध असू शकतो याविषयी माझ्या मनात तिळमात्र शंका नाही. त्यामुळे ते गांधीजीच्या सत्याग्रह चळवळीकडे ओढले गेले. यशवंतराव यांचे मूळ गाव ढवळेश्वर होते

परंतु त्यांचा जन्म १२ मार्च १९१३ रोजी आजोळी देवराष्ट्रे या गावी झाला. वयाच्या चौथ्या वर्षी वडील बळवंतरावाचा प्लेगमुळे मृत्यू झाला. वडिलांचे छत्र हरवल्यानंतर थोरले बंधू ज्ञानोबांनी यशवंतरावांना घडवले. त्यांचे टिळक हायस्कूलमध्ये नाव घातले. येथेच त्यांच्या वाचनाचा व्यासंग वाढवला.जतीनदासाच्या बलिदानामुळे ते महात्मा गांधीच्या विचाराकडे वळले आणि व्यापक देशकार्य करण्याचे ठरवले. गणेश उत्सव , शिवजयंती व झेंडावंदन यात अग्रेसर राहिले. १९३० ते १९४१ हा काळ वैचारिक अंतर विरोधाचा होता तरीही ते रॉयवादी विचाराकडे न ठेवता काँग्रेस कडे वळली व अखेरपर्यंत काँग्रेसमध्येच राहिले. १९५६ ला भाऊसाहेब हिरे व यशवंतराव यांच्यात निवडणूक झाली यात यशवंतरावांना ३३३ तर हिरेना १११ मते पडली आणि १ नोव्हेंबर १९५६ रोजी द्वैभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले. तसेच संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री झाले. १९६२ ला कठीण प्रसंगी देशाचे संरक्षणमंत्री झाले.१९६६ गृहमंत्री झाले.१९७० ला अर्थमंत्री झाले.१९७७ ला विरोधी पक्षनेते झाले.१९७९ ला उपपंतप्रधान झाले व गृहमंत्री झाले.१९८२ ला वित्त आयोगाचे अध्यक्ष झाले. असे केंद्रात विविध खात्यावर निवड झालेले महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील एकमेव व्यक्ती आहे. या व्यक्तिमत्त्वाची उभारणी गांधीवाद, मार्क्सवादी, सत्यशोधक या विचारावर झालेली होती.

सामाजिक व शैक्षणिक विचार व कार्य :- सामाजिक प्रश्नाविषयी म्हणतात समाजातील विविध गटातील लोकांचे प्रश्न वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून समजावून घेऊन सोडविण्याचे वृत्त राज्याने घ्यावे. सामाजिक उदारता अंगी असल्याखेरीज हे व्रत पार पाडणार नाही. हे करीत असताना पूजा गुणांची करावी जातीची नाही असे म्हणतात. तसेच पंढरपूरच्या चंद्रभागेतील एकत्र होणाऱ्या कार्यक्रमाला ते फक्त भागवत धर्माचा झेंडा नाही तर सामाजिक क्रांतीचा व सुधारणेचा झेंडा मानतात. तसेच महापुरूषांची वाटणी करू नये त्यामुळे सामाजिक क्रांती होणार नाही असे म्हणतात. एक आदर्श असा शैक्षणिक विचार व्यक्त करताना म्हणतात, शिक्षणाने मानसिक व बौद्धिक सामर्थ्य निर्माण झाले पाहिजे.एवढेच नव्हे तर बौद्धिक व मानसिक सामर्थ्याच्या जोरावर आपल्या जीवनाचा यशस्वी मार्ग आपण शोधून काढीत असताना ज्या समाजाने आपल्या कल्याणासाठी या ज्ञानगंगा उघडल्या त्या समाजाचेही थोडेफार ऋण फेडण्याची भावना मनात निर्माण झाली पाहिजे. तसेच फक्त ज्ञान महत्त्वाचे नाही तर ज्ञानाबरोबर शहाणपणाचे महत्व सांगतात. ज्ञानी आणि शहाणा यात फरक करतात ज्ञानाचा समाजजीवनात उपयोग करून घेण्याचे जे शास्त्र आहे त्यास शहाणपणा म्हणतात आणि ते राष्ट्राच्या विकासासाठी गरजेचे आहे असे म्हणतात. तसेच तांत्रिक शिक्षणाचा ही पुरस्कार करतात.तसेच उच्च शिक्षणही मातृभाषेतूनच दिले पाहिजे त्यामुळे सामान्य माणसापर्यंत महत्त्वाचा विचार जाऊ शकतो.

समाज घडविण्याचे स्वप्न यशवंतरावांनी आपल्या उराशी बाळगलेले होते. ज्या समाजामध्ये प्रत्येक मनुष्य स्वाभिमानाने आपली मान उंच करून निर्भयपणाने जगू शकेल त्याला पोटभर अन्न व अंगभर वस्त्र मिळेल आणि आपल्या बुद्धीचा व शक्तीचा विकास करण्याची संधी त्याला मिळेल असा समाज त्यांना घडवायचा होता. राणा चव्हाण यांनी यशवंतरावांच्या सामाजिक मार्गाविषयी म्हणतात की,महात्मा फुले डॉ. आंबेडकर यांचा बंडखोर मार्ग न स्वीकारता मवाळ नेमस्त व प्रागतिक मार्गाचे ते सामाजिक क्षेत्राचे भोक्ते होते. आक्रमक नव्हते गांधी टोपी त्यांनी शेवटपर्यंत धारण केली. त्यांच्या सारखी काही प्रमाणात तिरकी टोपी घालने व तत्ससमान खादी पोशाख बदलण्याचे अनुकरण लहान-सहान पुढाऱ्यांनी केले. त्यांच्या राजकारणाला साथ दिली पण त्यांचे समाजकारणाचे स्वरूप अभ्यासले नाहीत. त्यांचे समाजकारण म्हणजे एक चव्हाण मार्ग होता. संयुक्त महाराष्ट्र पूर्वीचा जनतेचा राग आणि नंतरचा प्रेमाचा वर्षाव त्यांनी आईच्या मातृत्वाची लावताना म्हणतात, मुलाला मारण्याचा अधिकार

सच्च्या आईचाच असला पाहिजे कारण कधी मारलाच पाठीवर एखादा धपाटा तर दुसऱ्याच क्षणी ज्याला लागते त्याच्या पेक्षा जी ने मारले तिच्या डोळ्यातून पाणी येते आणि ती आपल्या मुलाला पोटाशी धरते, हा आईचा धर्म आहे. तीच गोष्ट जनतेची आहे. अशा मातृत्वाच्या दृष्टिकोनातून जनतेकडे पाहणारे सामाजिक जाणिवेचे नेते होते.

शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन विषयी म्हणतात आमच्या शिक्षणाची पद्धती कशी असावी हाही आजचा महत्त्वाचा प्रश्न आहे. आज पर्यंत आम्ही ज्या तऱ्हेचे शिक्षण घेतले ते शिक्षण चांगले असेल, योग्यही असेल, परंतु त्यामुळे आमच्यात नोकरी पेशाची मनोवृत्ती निर्माण झाली आहे .आमची बुद्धी आमचा पिंडच नोकरीपेशा चा आहे. मला ही गोष्ट मंजूर नाही. तसेच शिक्षणाची दारे सर्वांसाठी सताड उघडी करून खालच्या थरापर्यंत पोहोचविण्याचे आमचे ध्येय असले पाहिजे. मी तर असे म्हणेन की, या तरुणीच्या शिक्षणाचे प्रकाशझोत अग्री शेवटच्या थरापर्यंत जर आम्ही नेऊ शकलो तर महाराष्ट्राची शक्ती इतकी जबरदस्त वाढेल की, त्याला कोणाचेही मेहरबानीवर अवलंबून राहण्याचे कारण राहणार नाही. तो स्वतःचे रक्षण करील आणि राष्ट्राचेही रक्षण करीत असे स्वावलंबी शैक्षणिक विचार यशवंतरावांनी मांडले. थोडक्यात सामाजिक आणि शैक्षणिक विचार मांडताना ते म्हणतात, शंभर वर्षाच्या हिंदुस्थानचा आढावा घेऊन ते राष्ट्राच्या जीवनातील तीन महत्त्वाच्या प्रेरणा ज्या काम करीत होत्या त्या म्हणजे १) हिंदुस्थानची स्वातंत्र्याची प्रेरणा. २) मानवतेच्या दुःखा संबंधीची प्रेरणा . ३) ज्ञानाच्या आणि विज्ञानाच्या प्रसाराची प्रेरणा. या प्रेरणामधूनच भारतीय समाजात सामाजिक न्यायाची कल्पना आणि सामाजिक अन्यायाविरुद्ध लढण्याची झुंजार प्रवृत्ती निर्माण झाल्याचे ते सांगतात. यावरून त्यांचे समाजाभिमुख विचार असल्या याचे स्पष्ट होते.

सामाजिक कार्य :-

यशवंतराव चव्हाण बोलके विचारवंत नव्हते तर ते कृतीशील विचारवंत होते ज्यावेळी बाबा आमटेंना रोगाचा इलाज करण्यासाठी इंग्लंडला जायचे होते परंतु त्यांच्याकडे पैसे नव्हते तेव्हा त्यांनी तात्काळ त्यांना मदत केली. यावरून समाजातील प्रत्येक घटकाची तळमळ होती हे दिसून येते डॉ. गंगाधर पानतावणे म्हणतात की, दलित आणि बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यानंतर ते छात्रवृतीपासुन वंचित होतील म्हणून त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या वतीने बौद्ध विद्यार्थ्यांना छात्रवृत्ति आरंभ केली. आणि त्यांच्या सामाजिक उन्नतीत बाधा येऊ दिली नाही. राणा चव्हाण म्हणतात, महर्षी शिंदे सांगत होते की,ब्राह्मणेत्तरांनी काँग्रेसचा कब्जा घ्यावा, स्वराज्य संपादनार्थ, गांधी-नेहरूंच्या काँग्रेसमध्ये बहुजन समाजाने जावे. हा शिंदे यांचा उद्देश यशवंतरावांनी पार पडला.

यशवंतरावांना जातियवाद मान्य नव्हता सन १९४८ साली महात्मा गांधी वधोत्तर जाळपोळ झाली. त्यावेळी त्यांनी ब्राह्मण समाजाला नवी घरे बांधण्यास कर्जे दिली व ती माफ केली. तसेच वाईच्या प्रज्ञा शाळेच्या सरस्वती केवलानंद स्मारकास लाखो रुपये दिले. आणि विश्वकोशाचे कार्य तिथेच चालू केले. तसेच दलिताबद्दलही यशवंतरावांना सहानुभूती होती. १९३७ च्या निवडणुकीत आत्माराम बापू पाटील त्यांचे मित्र आमदार होते आणि बाळासाहेब खेर मुख्यमंत्री होते तेव्हा जमिनी वतनाबद्दल फार मोठा मोर्चा आला पण फक्त दोनच आमदारांचा त्यांना पाठिंबा मिळाला. तेव्हा नव्या जाणिवांनी राजकारण चालू केले आणि १९५८ मुख्यमंत्री असताना Bombay inferior village wants abalation act पास करून डॉ. आंबेडकर व कर्मवीर शिंदे यांची इच्छा पुरी केली. एवढेच नव्हे तर त्यांच्या वतन जमिनी त्यांच्याच मालकीची ठेवण्याची अपूर्व तरतूद केली. भूमिहीनांना पडीक जमिनी देखील दिल्या व दलितांना स्वावलंबी व स्वाभिमानी बनवण्याचे कार्य केले.

१९७१ साली दुष्काळाची आपत्ती आली. तिला सर्वांनी मिळून यशस्वीपणे तोंड दिले. विशेष म्हणजे शोषित आणि पीडित ग्रामीण जनतेसाठी रोजगार हमी योजना सर्वसंमतीने पास केली. आज या योजनेची प्रशंसा देशभर होत आहे. ती यशवंतरावांनी चालू केली.या योजनेमुळे शेतमजुरांना दलितांना आणि आदिवासींना घटनेने दिलेल्या लोकशाही हक्कासाठी खंबीरपणे उभे राहण्यासाठी एक साधन उपलब्ध करून दिले आहे.

शैक्षणिक कार्य :-

यशवंतराव चव्हाण यांच्यावर ज्याप्रमाणे गांधीजींचा प्रभाव होता त्याचप्रमाणे बंधू ज्ञानोबा व गणपतराव यामुळे सत्यशोधक समाजाचा म्हणजेच महात्मा फुले यांचाही प्रभाव होता. शिक्षणामुळेच समाजाचा विकास होऊ शकतो असे त्यांचे मत होते २५ ऑगस्ट १९६० रोजी मुख्यमंत्री असताना विधानसभेत म्हणाले की, सामाजिक सुखसोयी कडे दुर्लक्ष होता कामा नये. ही गोष्ट मी मान्य करतो आणि त्यातल्या त्यात शिक्षणाकडे तर मुळीच दुर्लक्ष होता कामा नये. च च्या भाषेत बोलणार नाही परंतु शिक्षणाची बाप इतकी महत्त्वाची आहे की, त्या संबंधी च च्या भाषेत मला बोलावे लागत आहे. आपल्याला नवीन पिढी निर्माण करावयाची आहे. म्हणून मी सांगू इच्छितो की, शिक्षणाच्या बाबीकडे मुळीच दुर्लक्ष होता कामा नये. १९६० ला महाबळेश्वर येथे शिबिर समारंभ प्रसंगी म्हणाले की, शिक्षणाकडे सामाजिक गरज म्हणून न पाहता के आर्थिक विकासाचे एक मूलभूत साधून आहे.

शिक्षणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ई.बी.सी. आणि मागासवर्गीयांना शिष्यवृत्या देण्याचा निर्णय घेण्यात आला. अनुसूचित जाती-जमातींना केंद्राची शिष्यवृत्ती होती परंतु आर्थिक दृष्ट्या मागास लोकांसाठी वार्षिक बाराशे रुपये उत्पन्न असणाऱ्यांना स्वतंत्रपणे ईबीसी सवलत त्यांनी सुरू केली. यावरून तळागाळातील लोक शिक्षणापासून वंचित राहू नये हा उद्देश होता.

यशवंतराव चव्हाण शिक्षणाची व्याख्या करताना म्हणतात की, शिक्षण स्वतःच्या भोवती घडणाऱ्या गोष्टी आणि जगामध्ये घडणाऱ्या गोष्टी यांची काही संगती लावता येते, त्यांचा योग्य अर्थ समजावून घेता येतो आणि त्याचा परिणाम आपल्या जीवनावर काय घडतो, व्यक्तिमत्वावर काय घडतो हे समजावून घेता येणे देता येणे त्यालाच शिक्षण म्हणतात. प्राथमिक शिक्षण अनिवार्य असावे म्हणून स्वतंत्र शैक्षणिक धोरण निश्चित केले. माध्यमिक शिक्षणात विविधता आणि उपयुक्तता आणणे आवश्यक आहे. माध्यमिक शिक्षण मंडळाकडे संसद म्हणून पहात होते उच्च शिक्षणाची दारी दारे खुली करावी का ? कारण महाविद्यालयातून व विद्यापीठातून विद्यार्थ्यांची गर्दी होत आहे त्यामुळे शिक्षणाची गुणवत्ता रसातळाला जात आहे. तसेच सुशिक्षित बेकार यांचाही प्रश्न आहे परंतु यास चव्हाणांनी विरोध केले. यात परंपरागत प्रस्थापित वर्गाचे हितसंबंध दडलेले आहे असे म्हटले त्यामुळे सर्वांना उच्च शिक्षण खुले पाहिजे.

औद्योगिक क्रांतीची प्रक्रिया आणि लोकशाही समाजाच्या निर्मितीची प्रक्रिया अशा ह्या दोन्ही समांतर प्रक्रियेतून विकसित राष्ट्रांना जावे लागलेले आहे. आपणही या दुहेरी प्रक्रियेतून पुढे जात आहोत. विकासाच्या उर्मीतून आणि अस्मितेच्या आविष्कारातून लोकशाहीकरण वाढत जाते. म्हणून उच्च शिक्षणाची दारे सगळ्यांना खुली असली पाहिजे अशी भूमिका मांडली. तसेच ज्ञान संक्रमण, ज्ञान संवर्धन आणि ज्ञान विकास ही उच्च शिक्षणाची उद्दिष्टे यशवंतरावांनी सांगितली. मराठवाडा हा इतर महाराष्ट्राच्या बरोबरीने यावा म्हणून विद्यापीठाची औरंगाबादला स्थापना केली. तसेच कोल्हापूरला ही त्यांच्याच प्रेरणेने विद्यापीठ स्थापन झाले. महाराष्ट्र हा कृषी राज्य आहे. म्हणून कृषी विद्यापीठाची भूमिका मांडली व पुढे स्थापन झाले.तसेच तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी महाविद्यालय ही सुरू करण्यास

प्रोत्साहन दिले त्यांनी फक्त विद्यापीठ महाविद्यालय व शाळा काढण्याच्या धोरणाला पाठिंबा देऊन ते थांबले नाहीत तर त्यास येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर ही चर्चा करून प्रश्न सोडवले. मग नवबौद्ध विद्यार्थ्यांचा प्रश्न असो की, आर्थिक मागास विद्यार्थ्यांचा थोडक्यात बहुजन समाजातील अगदी खालच्या स्तरापर्यंत शिक्षण कसे उपलब्ध करून देता येईल हा त्यांचा दृष्टिकोन होता.

थोडक्यात यशवंतराव चव्हाण हे एक फार मोठे लोक नेते होते खरा लोकनेता हा एका अर्थाने लोकशिक्षक असतो. लोकनेत्याला लोकांच्या विविध प्रश्नांची उकल तर करावीच लागते पण त्याचबरोबर त्याला समाजाचे सातत्याने प्रबोधन ही करावे लागते. म्हणून तो लोकशिक्षक असतो. त्यांच्या विचाराने समाज विचारप्रवण बनतो त्यातून समाजाला कार्यप्रवणता प्राप्त होत असते. देश ओळखला जातो तो तेथील भौतिक सामर्थ्याने नाही तर सांस्कृतिक मूल्य आणि विचार धनाने ते देण्याचे काम यशवंतराव चव्हाणांनी केले. यशवंतरावांनी शिक्षणाशिवाय समाजाची उन्नती होणार नाही आणि समाजाच्या उन्नती शिवाय राष्ट्राची उन्नती शक्य नाही त्यामुळे समाजाभिमुख कृतिशील विचार दिले व त्याला संधी मिळताच कार्याची ची जोड दिली. हे वरील शोधनिबंधातून स्पष्ट होते.

थोडक्यात यशवंतराव चव्हाणांनी शैक्षणिक व सामाजिक विचार व कार्य करीत असताना राष्ट्राच्या एकता आणि एकात्मतेच्या संदर्भात व स्वावलंबी दृष्टिकोनातून आपले विचार आणि कार्य व्यक्त केले व राष्ट्राच्या उन्नतीसाठी ते योगदान दिले. म्हणून २१ व्या शतकातही यशवंतराव चव्हाणांच्या विचार व कार्याची प्रासंगिकता महत्त्वपूर्ण ठरते आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राष्ट्रीय, शैक्षणिक, सामाजिक, साहित्यिक इत्यादी विषयावर विचार मांडले फक्त विचारच मांडले नाहीत तर ते कार्य ही केले संधी मिळताच विचाराचे रूपांतर कार्यात केले म्हणून ते कृतीशील विचारवंत होते त्यांच्या विचार व कार्यातून संतांची, महात्मा फुलेंची, महात्मा गांधीजींची, शाहू महाराजांची कर्मवीर भाऊराव पाटलांची , पंजाबराव देशमुख यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची तळमळ व विचारांचा प्रभाव असल्याचे दिसून येते

संदर्भ ग्रंथ

१) चव्हाण यशवंतराव, ऋणानुबंध, प्रेस्टीज प्रकाशन ,पुणे ,१९७९, पृ. क्रमांक १२
२) चव्हाण यशवंतराव, कृष्णाकाठ, प्रेस्टीज प्रकाशन, पुणे ,१९८४,पृ. क्र.१३. ३)जोशी रामभाऊ, इतिहासाचे एक पान, केसरी प्रकाशन, पुणे,१९७६,पृ.क्र. १३.
४) काळे बाबुराव,यशवंतराव चव्हाण,पृ.क्र. २२.
५) जोशी रामभाऊ ,इतिहासाचे एक पान, पृ.क्र. ३४
६) पाटील विनायक,यशोधन, राजहंस प्रकाशन, पुणे, पृ. क्र. ५२.
७) हेगे नागनाथ, जनममनातील यशवंतराव, पद्मगंधा प्रकाशन, पुणे,पृ.क्र.११.
८) कल्याणकर बा.ह. युगंधर नेते, आकांक्षा प्रकाशन, नागपूर, २००३,पृ.क्र ३.
९) चव्हाण यशवंतराव,सह्याद्रिचे वारे, चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई,१९९२, पृ.क्र.३२. १०) चव्हाण यशवंतराव, युगांतर, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७०, पृ. क्र. १७२.
११) उपरोक्त, सह्याद्रीचे वारे पृ.क्र. १८.
१२) उपरोक्त, पृ.क्र. १९.
१३) युगंधर नेते, पृष्ठ क्रमांक २१६.
१४) जनामनातील यशवंतराव,पृ.क्र. २१६.
१५) उपरोक्त, पृष्ठ क्रमांक ४२.

१६) युगंधर नेते, पृष्ठ क्रमांक ७.
१७) उपरोक्त, पृ. क्र. २६.
१८) सह्याद्रीचे वारे, पृ. क्र.१४४.
१९) युगंधर नेते, पृ. क्र. १०६.
२०) सह्याद्रीचे वारे, पृ.क्र. १४०

# Hon. Shri. Yashwantrao Chavan's Educational Thoughts and Works

**Dr.Sabale Shashikant Gokul**
HOD History
GESoci. R.N.C.Arts J.D.B. Com.N.S.C.Sci.college Nashikroad,Nashik
mobil.- 9561388350, E.mail : Sabale.uma@gmail.com

**Abstract :**

Former Deputy Prime Minister of India Hon'ble Shri. Yashwantraoji Chavan is known as the former Chief Minister of Maharashtra, Home Minister of India, Finance Minister and Union Defense Minister. But beyond that he was a curious scholar, a creative and visionary leader, an administrator. It is necessary to introduce Yashwantraoji Chavan's educational work. His radical and constructive views on education are evident from his ideological background, his coordinated role and the ideas he has taken from the law in his life and from his tenure in power and the decisions he has taken in various ministerial posts.

**Introduction**:

Yashwantrao Chavan's personality was bigger than Dogra. His life was occupied by many events. As a result, many are curious about their life journey. His personality was the walking history of Maharashtra. Holding an important position at the Center, Yashwantrao literally led Maharashtra in Delhi. His personality was three dimensional. His ideas apply even today. No other Chief Minister of India has been able to make such an impact. His contribution to the development of Maharashtra seems to be very important. According to him, as long as there is no development in all areas in Maharashtra, this state will be known as a backward state. Therefore, his research and development policies in all areas of Maharashtra have been reviewed in this research paper.

**Objectives of Research**:

To study the contribution of Hon. Shri. Yashwantrao Chavan's Educational Thoughts and Works. To review the development policies of Yashwantrao Chavan.

**Scope & Limitations**:

The scope of the presented research paper, former Deputy Prime Minister of India Hon'ble Shri. Yashwantrao Chavan's Educational Works.

**Research Methods**:

In this research paper, various bi-sources such as publications, unpublished magazines, weeklies, internet, newspapers, various bibliographies have been used in connection with this subject. Hon'ble . Shri. Yashwantrao Chavan's Educational Thoughts and Works. of can be discussed on the basis of points.

**Hon. Shri. Yashwantrao Chavan's Educational Thoughts and Works.**

The formation of an independent state of Maharashtra is the result of the historic movement for the formation of a united Maharashtra by Yashwantrao Chavan, the first Chief Minister of the State of Maharashtra and the sculptor of the State of Maharashtra. Due to his positive role and methodology, Yashwantrao Chavan's political career became an ideal inspiration and a lifeline for modern Maharashtra. The overall development of the state and

manpower is impossible without education. He emphasized the need to focus on quality education and not just education.

**Hon. Shri. Yashwantrao Chavan's Approach to education**:

Dr. Babasaheb has said that education is the milk of Tigress. Yashwantrao Chavan thought that human transformation could not take place without education. Yashwantrao Chavan emphasized on education, recognizing that the progress of the nation can be achieved without the progress of human resources. Yashwantrao Chavan's constructive vision on democratic lifestyle. Phule, Rajarshi Shahu, Maharshi Vitthal Ramji Shinde and m. Gandhi's progressive thinking is reflected in his academic thinking and work. Yashwantraoji says that education is a basic and important tool for the development of human resources, when we have no other means available than manpower. In 'Krishnakath' Volume-1 (p. 144), after his experience of running a literacy class in a Harijan settlement, he says: We were experiencing this step by step. Economic development cannot take place without changing the social conditions and this work has to be done by education. He came to the conclusion that 'education is the basic tool of development' from the ideology that we should make the decision in the field of thought through education, reading and meditation. He considered the development of education, agriculture and industry as important. Electricity is of paramount importance for agriculture and education is of paramount importance in the development process. And for that, it was important to change the situation by making laws. And he firmly believed that this awareness and change would be achieved only through education. This board is responsible for the entire cultural life of the future generation of Maharashtra. From this point of view, measures have been taken to speed up the educational work along with free and compulsory primary education as well as secondary and higher education, technical and vocational education, physical education and fine arts education. With regard to English education, he also implemented a new decision - English should be taught as an optional subject from the fifth standard, and a committee was appointed to ensure that students in rural areas are not denied English. Provision was made to give generous grants to the private educational institutes imparting education for the expansion of education in the newly joined Marathwada division of the state.

**Hon. Shri. Yashwantrao Chavan's Educational Work** :

According to Yashwantraoji, if you want to achieve the overall development of your state along with the medium of education, primary education, secondary education and higher education for the progress in the field of education, then the industrial development of the state cannot take place without the use of science and technology. As India is an agricultural country, its future depends on the development of agriculture. So we have to give up superstition and embrace science and technology. He insisted that steps should be taken in a planned manner. From this role he worked in the field of education.

**EBC scheme**:

Education is an important tool for social, political and economic development. Education should be available to all, so economically backward students who are outside the scope of reservation have to be deprived of education, it was noticed during Yashwantraoji's 1960s. For the first time in the country, in Maharashtra, he introduced EBC scheme to provide free education to economically backward students.

**Rewards for Technical Education and Training Policy**:

Education is the main tool in all aspects of economic development and prosperity. Naturally, the importance of technical education in economic progress. It was decided that all the doors of education would be opened and it would reach the lower strata to create a situation where the overall education in the state would be maximized.

**Establishment of Universities**:

The present Marathwada University (Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University) was inaugurated on 23rd August 1958 at Aurangabad by P. Nehru. On November 18, 1962, Shivaji University, Kolhapur was inaugurated by Dr. It was done by Radhakrishnan. Yashwantrao has played a pivotal role in the establishment of these two universities.

**Establishment of Sainiki School**:

Establishment of Sainik School at Satara is a lifelong endeavor of Yashwantrao in the field of Sainik Education. Education for the National Defense Academy was made available at this military school in Satara. It became the first military school of its kind in India. This school has been a boon to the military profession in Maharashtra.

**Ashram School Scheme**:

If the tribals were to educate their children, they would have to bring their children to school, but there were many complications in this issue. Then it was decided that instead of bringing tribal children to school, they should be provided with educational facilities at their doorsteps. The establishment of an ashram school was the solution to the complex problem of tribal education. The salt of such ashram schools has remained in the future as well.

**Commencement of Engineering College**:

The decision to start two new Engineering Colleges at Aurangabad and Karad was taken under the leadership of Yashwantrao. Also, the Government Engineering College at Nagpur was converted into an Engineering College to be awarded by the Government of India.

**Conclusion**:

From the present research, it is clear that the decisions taken by Yashwantrao in the interest of the masses during 1947-60, gained the cooperation of the people, gave impetus to the administration, changed the social, economic, industrial, agricultural, educational and political face of Maharashtra. The image of Maharashtra as a stable progressive and conscious state in the country was created all over India and it has survived till date. This is due to Yashwantrao's solid foundation and progressive vision. Once the foundation is laid, the building continues to climb. This is what has happened to the buildings of Maharashtra. Overall All the works of Yashwantrao Chavan were done in accordance with the principles of freedom and equality. It is an indisputable fact that today's progressive Maharashtra emerged from that! That is why today he is universally hailed as the sculptor of modern Maharashtra

**Reference books.**

1. Joshi Rambhau, Itihasache ek pan, (1976), Kesari Prakashan, Pune.
2. Chavan Yashwantrao, Krishnakath - Volume I, First Edition, February, 1984, Prestige Publications, Pune.
3. Waghmare J.M. (Dr. Principal), Yashwantrao Chavan yanche shaikshnik vichar ani karya (Kalyankar B.H., Editor, 'Yugandhar Neta - Yashwantrao Chavan', October 25, 2003, Akanksha Prakashan, Nagpur).
4. Bhole B.L. Yashwantrao Chavan rajakaran aani sahity,Saket prakashan ,Aurangabad,1985
5. Chavan Yashwantrao,Yugantar,kontinetal prkashan,pune,2006
6. Chavan Yashwantrao ,Sahyadriche ware, Yashwantrao Chavan prtisthan,mumbai,1992
7. .Naikwade ashokAaadhunik Maharashtrache shilpkar Yashwantrao Chavan,dr.prdip jabade,Aurangabad,2009
8. Chawan kishor,Shikashnatil marmdrushti,insait publication,nashik.
9. WWW.Wikipidia.com
10. www.lokprabha.com

# The Versatile Personality of Yashwantrao Chavan

**Smt. Mane Poonam Prakashrao**
Asst. Teacher
Z. P. P. S. Waghalwadi, Tq.- Ambajogai Dist. – Beed.
Email- poonamrs5584@gmail.com Cell 8308159640

**Abstract:**

Yashwantrao Chavan had the versatile and dynamic personality – a successful leader with foresight, a social reformer, an ideologist, an orator, a litterateur, an aficionado, an able administrator, an excellent reader, a writer, an author, an activist 1st Chief Minister of Maharashtra, Minister of defence, Minister of Finance, Minister of External Affairs and Minister of Home Affairs, who was born in the family of a farmer from Devrashtre, a remote village in Maharashtra, he went on to become the 5thDeputy Prime Minister of India to prove the mettle of citizen of Maharashtra.

Yashwantrao Chavan wrote several articles, books and delivered his speeches on national and international platforms. He stands with his rational ideas of democracy, social and economic equality, cultural and educational development. His thoughts and writing was published in Marathi, Hindi and English languages. As his career revolved around his multi-talented thinking, the researcher intends to explore the versatile personality of Yashwantrao Chavan.

**Keywords:** Yashwantrao Chavan, Versatile, Chief Minister, Deputy Prime Minister, Maharashtra, Personality.

**Introduction:**

*"Never let yourself be a product of your surroundings,*
*But encourage your surroundings to be a product of your personality".* [1]
*-EventGreetings.com*

Just like Yashwantrao Chavan, he was not only encouraged himself, but also gave hope of rays to all Maharashtriyan. The place of Yashwantrao Chavan, in the history of India and Maharashtra was dignified and constructive. He was played an important role in the political, social, economic, cultural and educational life of modern Maharashtra. His constructive ideas directed the development of Maharashtra. He was the architecture of modern Maharashtra. Its roots are found in the ideological fabric of Yashwantrao. In his constitution was influenced by many factors.

According to Yashwantrao, '*It is a gift of destiny to have a receptive mind. Thoughts, action and companionship affect the mind. The receptive mind stores everything. And out of it man achieves his personality. "And I made."* Such a confession was given by Yashwantrao. According to him, "*Though man is formed by rites, thoughts and associations, it is not that man can fully acquire knowledge of himself. Knowledge of self is largely formed by what people say. So to see how our reflection is reflected in the human eye, he is constantly striving".* [2]His receptive mind was affected by many incidents, and various sheds of his personality kept coming before the society, from which his dynamic personality came before

the world. His early life affected his mind deeply. He was born in a Maratha Hendre Patil family on 12th March, 1913 in the village of Devrashtre in Satara district (now in Sangali district) of Maharashtra, India. He lost his father in his early childhood and brought up by his uncle and mother. His mother taught him about self-dependency and patriotism. From his childhood he was fascinated by the freedom struggle of India. He obtained his B. A. degree in history and political science from Bombay university in1938. In this period, he involved in many social activities and was closely associated with the Congress party and its leaders, such as Jawaharlal Nehru, Sardar Vallabhabhai Patel and Keshavrao Jedhe. In 1940, he became President of Satara District Congress. In 1941, he passed his LLB. In 1942, he married with Venutai at Phaltan in district Satara.

**Objectives, Methods And Materials:**

The present paper is an attempt to highlight the analysis of versatile personality of Yashwantrao Chavan in his whole lifelong career from the architect of modern Maharashtra as 1st Chief Minister of Maharashtra to 5th Deputy Prime Minister of India. The Primary and secondary data collected from library, published papers, books and various sites of internet.

**Analysis and Discussion:**

> *"Personality is very individual's signature trait. There will never be anyone like you, therefore hold on to what makes you so special as a person, a character and a human being"!*[3] *-EventGreetings.com*

Like this the personality of Yashwantrao Chavan is very special and adaptable. Now researcher insures you that we will see all sheds of rainbow personality of Yashwantrao. Let's check it, following below-

**1] Passionate Book-Lover and Avid reader:**

Besides a politician, Yashwantrao was a voracious reader. His love for books was well-known. Always he brought 15 to 20 books every month and would never go to bed without reading 25 to 50 pages daily irrespective of his tight schedule. In his book, *'Unfinished Innings: Recollections of a civil servant',* when he was home minister his private secretary Madhav Godbole recalled how Yashwantrao's work desk was always spotlessly clean and how he would clear all files at the same day and send them back to Godbole.

Godbole wrote, *'I still remember the day when I got to office in the morning and found that not a single file had come back from the minister.'* When the minister reached office, Godbole asked him about files. The minister smiled and told him, N. S. Phadake, a well-known Marathi author, had sent him his autobiography. Yashwantrao told Godbole, as written in the latter book, "*I started reading it after dinner and was so absorbed in it, that I continued reading it and put it down only at five this morning when it was time to go for my morning walk".*[4]

**2] Eminent Litterateur:**

Yashwantrao Chavan took a keen interest in literature. He established the Marathi Sahitya Mnadala and supported the Marathi Sahitya Sammelan. He was very closely associated with many poets, editors and several Marathi and Hindi writers. He initiated completion of '*Marathi Vishwakosh*'. For this he nominated Lakshman Shastri Joshi as a chairman. He had written several bookslike '*Winds of Sahyadri', 'Bhumika', 'Runanubandh', 'Sahyadriche Vare', '1965 War, the Inside Story: Defence Minister Y.B. Chavan's Dairy of India-Pakistan War', 'Y.B. Chavan: Selected Speeches in Parliament', 'Krishnakath'*.

In his autobiography distinguished in three parts. The first part covers his early life in Satara district, this place is situated on the banks of Krishna so he named the first volume as, '*Krishnakath'*. His next few years spent as the 1st Chief Minister of Maharashtra, so he proposed name for the second volume was, 'Sagar Tir'. Later he was appointed Defence Minister of India by Nehru. From then he was in Delhi until his death in 1984, so he proposed the name, '*Yamuna Kath',* for his third volume. He was able to complete and publish only first volume.

**3] The Architect of Modern Maharashtra:**

A close aide of India's first Prime Minister Jawaharlal Nehru, Yashwantrao's role in the emotive and violent struggle for Maharashtra's formation is seen as contentious, but also key in ultimately creating the state on linguistic grounds. "*Chavan was a person of inclusive instinct, so when the Congress went ahead with the experiment of a bilingual state, they asked Chavan, who was the chief minister of Bombay, whether the concept was working. He reported that people weren't happy and there were far too many problems"*. At last the diplomacy of Chavan in convincing Nehru fruited eventually took steps from a separate Maharashtra with Mumbai as its capital. As said by Neeta Kolhatkar said of him in DNA. [5]

**4] The Visionary and Inclusive Chief Minister:**

On 1st May, 1960 Yashwantrao Chavan became the first Chief Minister of Maharashtra. From 1957 to 1960 he also served on the All India Congress Working Committee. He implemented some important schemes as a Chief Minister, they are given below-

-Chavan's vision for Maharashtra for the development envisaged the equal development of both the industrial and agricultural sectors across all the regions of the state. He conceptually participates in the establishment of agricultural universities in the state. Legislation regarding democratic bodies and the Agricultural Land Celling Act were passed during his tenure as Chief Minister. [Development of Agriculture]

-Yashwantrao sought to realize inclusive vision through the co-operative movement, and he supported in establishment of 18 co-operative sugar factories. [Development of co-operation]

-Yashwantrao begins the system of Panchayat Raj as Zilla Parishad, Panchayat Samiti and Gram Panchayat. And hestarted state five years plans.[Administrative and Economic Development]

-Yashwantrao propagates masonry's of Kolhapur. And speedily tried for complete the projects like Koyna and Ujni. [Development of Basic Facilities]

**-**He supported to establishment of Marathwada (now Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University) and Kolhapur University (Shivaji University). [Academic Development]

-He supported to establishment of Marathi Sahitya Sanskrit Sansthan Mahamandal and Vishwakosh Mandal. [Cultural Development]

-The major decision of E. B. C. for free education to economically backwarded class, and its implementation was the first and innovative decision in India. Etc. [6]

**5] Rational Thinker:**

Yashwantrao was rational thinker. His thoughts had scientific reasons. He always said that, science should lend more strength to human being through research and innovative technologies. The basic nature of science complements logic and rational thinking. This thought should get percolated to the commonest of the common man to develop modern society. Only then the conventionally obsolete thoughts and superstitions will get eliminated

from the society. The soon this happens the faster we will grow as the developed nation. He stressed on the need to explain the values of science by educating people. The young generation should be inspired by intellectuals and inculcate values of science in them. Lifelong he lived with this rational thinking.

**6] The Trouble shooter:**

In the T. V. Kunhi Krishnan's book, '*Chavan and the Troubled Decade',*portrays Yashwantrao in different dimensions on the backdrop of The Decade of 1960-70, that saw some crucial national and inter-national developments – wars with China and Pakistan, the death of Jawaharlal Nehru, two successions to prime minister ship, three general elections, the emergence of religious and communal forces on the political scene, the great spilt in the Congress Party preceded by splits in the Communist and Socialist parties. Chavan's life served as a binding thread to put together the story of the Trouble Decade.[7]

**7] The Taskmaster Defence Minister of India:**

As the Defence Minister he promoted the growth in the defence field. Chavan strengthened the military intelligence away from Intelligence bureau. In search of arms he visited countries like the USA, the UK and the USSR which also marked the turning point in India's foreign relations. His hard work in the defence ministery gave an edge to Indian military force to meet the Pakistani aggression in 1965. He allowed the army officers to work with full strength without undue interference. Success of Chavan's leadership manifested itself in the Indo-Pakistan war of 1965.

**8] Man of Crisis The Home Minister of India:**

He was appointed as the Home Minister of India in November 1966. At that time, the agitation of the Sadhus demanding a ban on cow-slaughter had sparked off disturbances in Delhi. The tension in the capital forced the Prime Minister to change the leadership in the home department. Prime Minister Indira Gandhi had chosen Yashwantrao in the place of Gulzarilal Nanda as a home minister in the matter of crisis. Chavan handled the situation carefully and had shown his ability in this critical situation. 1966 was the year of Hindu revivalism, regionalism and political confusion in the history of India. When Chavan took over the home ministery the wide spread student unrest, the fast of Jagatguru Sankaracharya of Puri in support of the demand of the Sadhus for the ban on cow-slaughter. Chavan handled all problems with humanism. Thus, as a home minister, he handled many critical situations effectively.

**9] Budget Master The Finance Minister of India:**

He worked as the Finance Minister of India from June 1970 to October 1974. When Chavan resumed office of the Finance Ministery he faced challenges like shortage of raw materials, high prices of the essential commodities, acute drought conditions. The stabilization of prices was the most important and urgent task before him. He considered black money not only economic problem but social and political evil too. His strong administrative measures in the process of eradication of corruption proved to be highly effective. He presented one of India's epoch budgets as Finance Minister due to a high,'Deficit Black Budget' [1973-74]. He insisted that the banks should give a new orientation, a new social content and meaning to programme and policies. Chavan had encouraged the public sector banks to have a more imaginative and constructive approach.

**10] The Foreign Minister of India:**

Yashwantrao was the foreign minister of India from 1974 to1977. As a foreign minister he worked for the deliberate policy of normalizing and improving relations with all its neighbours. When he became foreign minister he visited number of countries like Sri Lanka, Bangladesh, Yugoslavia, Guiana, Cuba, Jamaica, Mexico, Lebanon, Egypt, Peru etc. He clarified the role of India in the different conferences of the United Nations. He worked hard to establish cordial relations with the countries like China, Pakistan and Bangladesh. He believed in the promotion of the peaceful co-existence and the friendly relation in Asia. He insisted the friendly ties with other countries not merely by political manner but by promoting co-operation in economy, trade, technology and culture. As an External Affairs Minister, Chavan stood firm for the commitment of the Non-alignment movement as the ideal instrument for the perseverance of the independence of the newly liberated countries.

**11] Leader of Common People:**

He was first Indian, who became ground level worker to Deputy Prime Minister of India. He was an extraordinary leader who cared for the common man. He always felt responsible and accountable for people's problem. Common people called him Saheb and treated him like family member of themselves. So when he was appointed Federal Defence Minister following the China war in 1962, a popular saying arose in Maharashtra. "*Himalayachya Hakela Dhavala Sahyadri*".People also called him *"Prati Shivaji"*. After his death in 1984, various places had given name of Yashwantrao Chavan. It's an honour of his longlife creative work.

**Conclusion:**

There are a lot of works which is remaining mentioned in this paper. Words are limited for describing his inclusive personality by the researcher. By his own word he define his personality with saying,

> *"In Democratic governance, I do my job very good. I do beneficial works for people. Such statements are insufficient. The work must be done well, but it must be realize by people. That's why I say that the real test of governance is in the satisfaction of the people. The government is good, this is not satisfactory. When people should feel that really the governance is going well, it works hard and tries for public welfare. Only then can it be said that government is good, governance is good and the leader do his job very well".* [8]

Like this, Yashwantrao Chavan did his job very well, and people also agree it by saying him *"Prati Shivaji"*. He is the role model for current generation. He works like an architect of modern Maharashtra.Everybody knows about his versatile personality as, *"A Shadow of Sahyadri"*.

**References:**

1] https://imges.app.goo.gl/aVZ4ysQk2P1T5ihd8
2] Yashwantrao Chavan. (2018)… '*Runanubandh'*, 'Rohan Prakashan', pp.32 print.
3] https://images.app.goo.gl/YsB6CHAG2UP74Trt8
4] Manasi Phadake. (2019)… '*YB Chavan, the congress leader who was the key to creation of Maharashtra & its first CM'*, 'theprint.in'. Print.
5] Neeta Kolhatkar. (2010)… *'Experiment of an assimilative state by Nehru'*, 'https://www.dnaindia.com/Mumbai/report-1377532.

6] Mitra Publicity. (2018)… '*Yashwantrao Chavan',* 'History of Maharashtra'. Print.
7] Yashwantrao Chavan. *'en.m.wikipedia.org'* Print.
8] https://images.app.goo.gl/h3ubTgL6vk7SiLec8
9] Yashwantrao Chavan. (2013)… *'Krishnakath',* 'Rohan Prakashan', Pune. Print.
10] Dr. Ulhas Udhan. (2017)... *'Yashwantrao Chavan: Maharashtracha Ashay',* 'Pratima Publication', Pune. Print.
11] Ra. Tu. Patil. (1987)… *'Yashwantrao Chavan Ek Kartabgar pan Vadgrasta Mutsadi',* 'Janwani Press', Pune. Print.

ISSN : 2278-9308
March, 2021

# भारताच्या संरक्षण धोरणाविषयी यशवंतराव चव्हाण यांची भूमिका – एक आकलन

प्रा. डॉ. प्रशांत प्रभाकर सराफ
संरक्षणशास्त्र विभाग, श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी
भ्रमणध्वनी : ९४२३४४४६६३

---

राष्ट्राचे संरक्षण ही तात्पुरती व्यवस्था नसून ती निरंतर प्रक्रिया आहे त्यासाठी मानवी, आर्थिक आणि शस्त्रास्त्रांची गुंतवणुक करणे हिताचे आहे. अशी भूमिका यशवंतराव चव्हाणांची होती. यावरूनच संरक्षण धोरणाविषयी त्यांच्या भूमिकेचे आकलन दिसून येते.

**प्रस्तावना :**

यशवंतराव चव्हाण यांचा राजकीय प्रवास देवराष्ट्रे ते दिल्ली पर्यंतचा आहे. केंद्रातील अत्यंत महत्वाचे जबाबदारीचे वेगवेगळे मंत्रालय त्यांनी यशस्वीपणे सांभाळले आहेत. देशाच्या संरक्षण धोरण विषयीचे निती नियोजन ठरविण्याचे कार्य केंद्रीय मंत्रीमंडळाच्यावतीने उपसमीती म्हणजेच केंद्रीय मंत्री मंडळाची संरक्षण समिती पार पाडत असते. या समितीचे सदस्य संरक्षण मंत्री, परराष्ट्रमंत्री, अर्थमंत्री, गृहमंत्री असतात.यशवंतराव चव्हाण महाराष्ट्रातील असे एकमेव राजकीय व्यक्तीमत्व आहे की त्यांनी हे वेगवेगळे महत्वपुर्ण मंत्रालय त्यांच्या एकुण कार्यकाळामध्ये यशस्वीपणे हाताळले आहेत व स्वत:चा एक प्रभाव निर्माण केला आहे. यशवंतराव चव्हाणांवर गांधी, नेहरू यांचा प्रभाव होता म्हणुनच त्यांच्या विचारातून आशादायक आदर्शवादाची संकल्पना जाणवते. १९६२ च्या चीन विरूध्द सुरू झालेल्या युध्दामुळे तत्कालीन पंतप्रधान पंडीत नेहरूंनी यशवंतराव चव्हाणाची संरक्षण मंत्री म्हणून नियुक्ती केली. अशा वेळी आंतरराष्ट्रीय परिस्थिती या सर्व गोष्टींचे भान ठेऊन यशवंतरावांनी आपली संरक्षण मंत्र्याची भूमिका योग्य प्रकारे पाडली.

**संरक्षण धोरणासंदर्भातील भूमिका :**

चीन विरूध्द झालेल्या पराभवामुळे लष्करामध्ये, तसेच जनतेमध्ये एक प्रकारचे नैराश्य आले होते. अशा परिस्थितीत यशवंतरावांनी ०४ वर्षे संरक्षणमंत्र्याची भूमिका यशस्वी पार पाडली. देशाच्या संरक्षण विषयी स्थितीमध्ये बदल घडवून आणण्यासाठी त्यांनी विविध उपक्रम हाती घेतले. लष्करामध्ये आत्मविश्वास वाढविण्यासाठी प्रत्यक्ष सीमेवर जाऊन त्यांच्याशी हितगुज केले. तसेच जनतेमध्ये विकास व संरक्षणाची बाजू किती महत्वाची आहे याविषयी वेगवेगळया भाषणामधून विचार रूजविला. संरक्षणासाठी वाढीव तरतुद मिळावी यासाठी केंद्रीय स्तरावर प्रयत्न केले. त्यामुळेच संरक्षणासाठी पंचवार्षिक योजना सुरू झाली. लष्करासाठी लागणाऱ्या साधन सामग्रीसाठी औद्योगीक प्रकल्प निर्माण करता आले. तिन्ही सैन्यदलाचे आधुनिकीकरणाला प्राधान्य दिले, त्यामुळेच आज आपले लष्कर बऱ्याच लष्करी साधनांच्या बाबतीत आत्मनिर्भर दिसून येते. त्यांच्या उभारणीचा पाया हा यशवंतरावांच्या दुरदृष्टीत दिसून येते. राष्ट्रांची संकटे ही परराष्ट्रीय आक्रमणातून निर्माण होतात, आर्थिक प्रश्नांतून, अन्नाच्या प्रश्नातून निर्माण होतात, अशा वेळी राष्ट्रांच्या सर्वांगीण विकास महत्वाचा आहे हया विषयी ते जाणीवपूर्वक आपले विचार प्रकट करीत असत. चीनकडून झालेल्या पराभवानंतर त्यांनी राजकीय प्रशासन व्यवस्था व लष्करी कार्यालय यामध्ये संतुलन साधण्याचा प्रयत्न केला.

**संरक्षणमंत्री म्हणून कार्यपध्दती :: :**

१. लष्कर आणि संरक्षण मंत्रालयात समन्वय साधण्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबविले.
२. वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांसोबत संवाद साधून भविष्यातील रणनितीविषयी विश्वासहर्यता निर्माण केली.
३. वेगवेगळया लष्करी छावणींना भेट देऊन सैन्यात समर्पण व आत्मविश्वासाची भावना निर्माण केला.
४. सरहद्दीवर रसद पुरवठा सुरळीत होण्यासाठी रस्ते बांधणीला प्राधान्य.
५. युध्दसाहित्य स्वदेशी तंत्रज्ञानावर निर्मितीला प्राधान्य.

**यशवंतराव चव्हाणांचे योगदान :**

१९६४ ला पंडित नेहरूंचे निधन झाले. लाल बहादूर शास्त्री हे भारताचे पंतप्रधान झाले.संरक्षणमंत्री म्हणून यशवंतराव कायम होते. भारतात झालेल्या राजकीय बदलामुळे पाकिस्तान ने १५ ऑगस्ट १९६५ कच्छ (गुजरात) मधील सीमा संघर्ष पुढे करून आक्रमण केले. पंतप्रधान शास्त्रीजींनी संरक्षणमंत्री यशवंतरावांनी उत्तम राजकीय, लष्करी नेतृत्वाच्या आधारे पाठिंबा दिला त्यामुळे पाकिस्तानला माघार घ्यावी लागली. पुढे सोव्हियत रशियाने केलेल्या मध्यस्थीमुळे उभय राष्ट्रांत ताश्कंद येथे १९६६ मध्ये करार झाला. दोन्ही राष्ट्रांनी राजनैतिक संबंध पुन्हा प्रस्थापित करावे हा त्या मधील मुख्य मुद्दा होता. उभय राष्ट्रांतील मतभेदामागे पाकिस्तानचा पारंपारिक दृष्टीकोन आहे असे यशवंतरावांचे ठाम मत होते. ते म्हणतात विव्देषाच्या आधारावर उभे राहिलेले राजकारण जास्त काळ टीकत नसते त्यामुळेच राष्ट्राचे नुकसान होत असते. उदा. आज आपण बघतो पाकिस्तान ने भारताविरूध्द दहशतवादाचा वापर केलेला दिसतो तोच दहशतवाद त्यांच्यावरही उलटलेला दिसून येतो. यशवंतराव चव्हाणांनी १९६२ नंतर संरक्षण प्रश्नाविषयी सर्वसामान्य जनतेपर्यंत आकलन होण्यासाठी विविध मार्गाने प्रयत्न केले. सैनिकीशाळा, सातारा तसेच संरक्षणाच्या प्रश्नांवर अभ्यास करणारी संस्था नवी दिल्ली या ठिकाणी स्थापन करण्यामागे त्यांचा पुढाकार महत्वाचा होता. यशवंतरावांचे अंतर्गत व बाहय सुरक्षेविषयी विचार स्पष्ट होते. जनतेला उद्देशून ते वेगवेगळया तार्किक माध्यमातून स्पष्ट करीत असत. शेतकरी, वैज्ञानिक यांचे योगदान राष्ट्राच्या विकासासाठी व संरक्षणासाठी महत्वपूर्ण आहे असे ते मानीत. त्यासाठी वैज्ञानिक प्रगतीव्दारे अमेरिका व रशिया यांची किती संरक्षण प्रगती झालेली आहे याचा विचार भाषणातून मांडत असत. सैन्यासाठी रसद व त्यासाठी आर्थिक प्रगती व धान्य उत्पादन महत्वाचे आहे. याची जाणीव त्यांच्या विचारातून प्रकट होते.

अंतर्गत सुरक्षा टिकविण्यासाठी राष्ट्रीय एकात्मता आवश्यक आहे यावर त्यांचा भर असे. संरक्षणाची मूलसुत्रे देशाची अंतर्गत आर्थिक निती, देशाची परराष्ट्रनिती आणि संरक्षणनितीवर अवलंबून असतात. या त्रि–सुत्री वर आपण राष्ट्रांची संरक्षण भूमिका पार पाडू शकतो हे त्यांचे विचार आजही महत्वाचे आहेत. कोणत्याही राष्ट्राला न घाबरता विकास व लष्करी व्यवस्था मजबूत करणे राष्ट्राचे मुख्यहित आहे असे संदर्भ त्यांच्या विचारातून दिसून येतात. संरक्षणासाठी विकास कार्य चालूच ठेवले पाहिजे अन्यथा युध्दकाळात संकट निर्माण होतील याची जाणीव त्यांना होती. म्हणूनच पंचवार्षिक योजना व संरक्षणासाठी पंचवार्षिक योजनावर त्यांनी भर दिलेला दिसून येतो. अमेरिका, रशिया या राष्ट्रांचा अभ्यास दौरा करताना भारतातील परिस्थितीचा विचार करून संरक्षण करारांना त्यांनी महत्व दिले. चीन व पाकिस्तान विषयी त्यांची भूमिका आक्रमक नव्हती पण संरक्षक स्वरूपाची होती. यशवंतराव चव्हाणांनी त्यांच्या ४ वर्षाच्या कालावधीत राजकीय व्यवस्थेमुळे दुभंग झालेल्या सशस्त्र सैन्यदलाला संजीवनी मिळवून दिली असे म्हणता येईल याचा प्रत्यय पाकिस्तान विरूध्दच्या १९६५ च्या युध्दात दिसून येतो.

**मूल्यमापन :**

कुठलाही देश भुगोलाने किंवा लोकसंख्येने मोठा होत नाही तर त्यासाठी राष्ट्रातील जनतेचे बुध्दीसामर्थ्य, प्रचंड मेहनत, बलिदान, राष्ट्रप्रेम हे मानवी घटक तितकेच आवश्यक आहेत. संरक्षणमंत्री म्हणून त्यांचे हे विचार अगदी सार्थक वाटतात.

**संदर्भ ग्रंथ**

१. पाटील मंजुषा : 'महाराष्ट्रातील राजकीय व्यक्तीमत्व', डायमंड पब्लीकेशन,पुणे, २०१०.
२. भोळे भास्कर लक्ष्मण : 'यशवंतराव चव्हाण– राजकारण आणि साहित्य', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९८५.
३. कायंदे गंगाधर : 'यशवंतराव चव्हाण – राजकारण आणि साहित्य', चैतन्य पब्लीकेशन, नाशिक.
४. लोकराज्य : यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी अंक – मार्च २०१२.